सत्यमेव जयते

# उल्हासनगर महानगरपालिका

# लेखा परीक्षण अहवाल

# 2011-2012

उपसंचालक, विभाग - 2, स्थानिक निधी लेखापरिक्षा,
रायगड भवन, 7 वा मजला, सेक्टर 11, सीबीडी बेलापुर, नवी मुंबई

# अस्वीकृती प्रमाणपत्र

1. सदर लेखापरीक्षण अहवालात नोंदविलेले आक्षेप हे उल्हासनगर महानगरपालिका यांनी 2011-2012 या वर्षी साठी लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेखे व माहितीच्या आधारे नोंदविण्यात आलेले आहेत.

2. जी माहिती /अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही त्या संबंधातील अनियमितता /अपहार/अफरातफारीस लेखापरीक्षक जबाबदार राहणार नाहीत.

## **<u>उल्हासनगर महानगरपालिकेचा 2011-2012 या वित्तीय वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल</u>**

जा.क्र.स्था-18/उल्हासनगर मनपा/ 624

सह संचालक (मनपालेप),
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
7 वा मजला, रायगड भवन,
सी.बी.डी. बेलापूर,
नवी मुंबई : 400614.
दिनांक : 21/07/2014

प्रति,
आयुक्त,
उल्हासनगर महानगरपालिका,
उल्हासनगर.

उल्हासनगर महानगरपालिकेचे वित्तीय वर्ष 2011-2012 चे लेखापरीक्षण श्री. ध. सा. आंधळे, सहाय्यक संचालक यांच्या पथकाने दिनांक 10/09/2013 ते 28/02/2014 या कालावधीत पूर्ण केले असुन श्री. ध. सा. आंधळे, सहाय्यक संचालक यांनी लेखापरीक्षण अहवालाचे पुनर्विलोकन केले. श्री. सिताराम काळे, उप संचालक (मनपालेप), उपविभाग दोन, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई यांनी दिनांक 27/06/2014 रोजी आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांचे समवेत चर्चा करुन अहवालाचे अंतिमीकरण केले. लेखापरीक्षण कालावधीत खालील पदाधिकारी व अधिकारी कार्यरत होते.

**महापौर**

| **अ.क्र.** | **नाव** | **कालावधी** |
|---|---|---|
| 1 | सौ. राजश्री राजेंद्र चौधरी | दिनांक 01/04/2011 ते 31/03/2012 |

**आयुक्त**

| **अ.क्र.** | **नाव** | **कालावधी** |
|---|---|---|
| 1 | श्री. अशोककुमार रणखांब | दिनांक 01/04/2011 ते 31/03/2012 |

# अनुक्रमणिका


विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण ....1

**I PART I : भाग १ ....3**

मागील लेखा परीक्षण अहवाल ....3

**PART II ....4**

**कलम ९ अ खालील आक्षेप ....5**

1 उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन 2011-2012 च्या मुळ सुधारीत अर्थसंकल्पामधील अनियमितता. ....6

2 उल्हासनगर महानगरपालिकेचे लेखे द्विनोंद पध्दतीत न ठेवलेबाबत… ....10

3 सुरक्षा अनामत रकमेबाबत. ....11

4 न वटलेल्या (DISHONERED CHEQUE) धनादेशाबाबत. ....12

5 शहरातील सांडपाण्या पैकी किमान 20 % सांडपाण्याचे पुन:चक्रीकरण व पुनर्वापर होत नसलेबाबत. ....13

6 उल्हासनगर महानगरपालिकेने माहे मार्च 2012 अखेरपर्यंत साध्य करावयाच्या सेवांची मानकानूसार उदिदष्ट साध्य न केलेबाबत... ....13

7 पाणी पुरवठा योजना तोटयात असलेबाबत… ....17

8 अग्निशामन विभागासाठी विविध प्रकारची आधुनिक व उपयुक्त उपकरणे खरेदीमध्ये झालेल्या अनियमितते बाबत.. ....18

9 वृक्ष लागवड निधीमधील जमा रक्कमांची नोंदवही उपलब्ध करुन न दिल्याबाबत. ....21

10 आरोग्य विभागाकडील अभिलेख उपलब्ध करुन न दिल्याबाबत. ....22

11 अरुणकुमार वैद्य सभागृह, टाऊन हॉल व तरण तलावाच्या भाडयाच्या रकमेवरील व्याज व सेवाकराची रक्कम वसुल करणेबाबत. ....23

12 अरुणकुमार वैद्य सभागृह (टाऊन हॉल) व तरण तलाव या भाडयाने दिलेल्या मालमत्तेवर मालमत्ता कराची रक्कम वसुल करणेबाबत. ....25

13 कर आकारणी नोंदवही न ठेवल्याबाबत. ....26

14 मजूर कामगार सहकारी संस्था यांना वाटप केलेल्या कामांबाबत. ....27

**कलम ९ ब खालील आक्षेप ....29**

15 सेवानिवृत्ती लाभातील अतिप्रदान रु.161753 ....30

16 भ.नि.नि. लेख्यातील त्रुटी आणि संकीर्ण अनियमिततेबाबत ....33

17 कुटुंब निवृत्ती वेतनातील अतिप्रदाना बाबत. ....35

18 वेगवेगळ्या गुंतवणुकीमधून कमी प्राप्त झालेल्या व्याजा बाबत ....36

19 मोठया प्रमाणात थकीत असलेल्या पाणी पटटी,पाणी पुरवठा लाभ कर व मलप्रवाह सुविधा लाभ कराबाबत... 39
20 वाणिज्य नळ जोडणी धारकांकडे पाणीपट्टीच्या थकीत असलेल्या मोठया रकमांच्या वसुलीबाबत.................41
21 JNNURM अंतर्गत पाणीपुरवठा योजनेच्या कामातील अनियमिततांबाबत................................................43
22 पाणी शुध्दिकरण रसायन खरेदीमध्ये झालेल्या अतिप्रदानाबाबत... ...............................................................47
23 पाणी पुरवठा साहित्य खरेदी (दुरूस्ती) अंतर्गत केलेल्या कामातील अनियमितता.......................................48
24 पाणी पुरवठा साहित्य खरेदी व बसविणे (दुरूस्ती)(दुर्बल घटक) अंतर्गत केलेल्या कामातील त्रुटींबाबत... .......53
25 कुपनलिका दुरूस्ती खर्च अंतर्गत केलेल्या कामातील त्रुटींबाबत... ..................................................................58
26 प्रभाग क्षेत्रात पाणी पुरवठा व मल नि:सारण सेवा(प्र.3) अंतर्गत केलेल्या कामासंदर्भात अभिप्राय... ..............63
27 प्रभाग क्षेत्रात पाणी पुरवठा व मल नि:सारण सेवा(प्र.4) अंतर्गत केलेल्या कामामधील अनियमितताबाबत... .66
28 प्रभाग क्षेत्रात पाणी पुरवठा व मल नि:सारण सेवा(प्र.2) अंतर्गत केलेल्या कामातील अनियमितताबाबत... ....69
29 प्रभाग क्षेत्रात पाणी पुरवठा व मल नि:सारण सेवा(प्र.1) अंतर्गत केलेल्या कामासंदर्भात अभिप्राय... ..............72
30 प्रभाग क्षेत्रात पाणी पुरवठा व मल नि:सारण सेवा(प्र.1)दुर्बल घटक अंतर्गत केलेल्या कामाबाबत अभिप्राय... 76
31 प्रभाग क्षेत्रात पाणी पुरवठा व मल नि:सारण सेवा(प्र.2)दुर्बल घटक अंतर्गत केलेल्या कामासंदर्भात अभिप्राय... 79
32 प्रभाग क्षेत्रात पाणी पुरवठा व मल नि:सारण सेवा(प्र.4)दुर्बल घटक अंतर्गत केलेल्या कामातील अनियमिततेबाबत.........................................................................................................................................84
33 उल्हासनगर नं.3 वॉर्ड क्र.41 मधील पंजाबी कॉलनी येथे शास्त्रीनगरकरीता लाईन बुस्टरसाठी खोली बांधण्याबाबत कामातील अनियमितता.. ..............................................................................................87
34 नवीन नळ जोडणीच्या अनुषंगाने आकारण्यात आलेल्या रस्ता खोदाई शुल्काच्या कमी आकारणीबाबत... .....89
35 निर्मल अभियान अंतर्गत केलेल्या कामाच्या देयकातून खोदकाम केलेल्या परीमाणापेक्षा जादा सामग्रीचे परिमाण वाहतूक केल्याचे दाखविल्याने झालेले अतिप्रदान रु.112291...................................................................92
36 करारनाम्यावरील मुद्रांक शुल्काची रक्कम वसुल न केल्यामुळे शासनाच्या महसुलाचे झालेले नुकसान........94
37 प्रभाग समिती नं.4 येथील सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयाची रंगरंगोटी करण्यासाठी केलेल्या खर्चामधील अनियमितता. .............................................................................................................................95
38 उल्हासनगर महानगरपालिकेतील पदाधिकारी व अधिकाऱ्यांना वाहन प्रतिपूर्ती योजना लागू केल्याबाबत.....98
39 भाडयाने दिलेल्या समाज मंदिराच्या थकीत भाडयाबाबत. .........................................................................100
40 उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील जाहिरात फलकाचे दर निश्चित करणे याकामाच्या उणींवाबाबत. ....102
41 बांधकाम विभागाकडून बगीच्यांच्या सुरक्षिततेसाठी खाजगी सुरक्षा रक्षक नियुक्तीतील अनियमितता. .......107
42 प्रभाग समिती - 1 मधील खड्डे डांबराने भरणे व पॅचवर्क करणे..................................................................111
43 उल्हासनगर -3 डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेश व्दाराचे विस्तारीकरण करणे................................................114
44 चांदीबाई कॉलेजसमोरील पुलापासून आर.ओ.बी. पर्यंत एका बाजूने संरक्षक भिंत बांधणे............................119
45 कल्याण अंबरनाथ रस्ता वालधूनी पुलापासून राजीव गांधी चौक शांतीनगर पुलापर्यंत एका बाजूने संरक्षक भिंत बांधणे.........................................................................................................................................126

46 उल्हासनगर 2 निरंकारी हॉल ते भारत चौक या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे कामातील अनियमितता. 132
47 उल्हासनगर - 5 येथील कैलाश कॉलनी ते श्रीराम सिनेमा, कालीमाता मंदिर चौक, नेताजी चौक डांबराने ट्रेंच पट्टी टाकणे. 141
48 बॅरेक नं 2058 ते टॅंकर पॉईंट, गायकवाड पाडा येथे सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता तयार करणे 146
49 निर्मल एम.एम.आर.अभियाना अंतर्गत (वस्ती स्वच्छतागृह) कामाच्या करारनाम्या मध्ये कमी मुद्रांक घेतल्याबाबत. 151
50 निर्मल एम.एम.आर.वस्ती स्वच्छतागृहे बांधण्याच्या कामातून गौण खनिज वापरल्याबद्दल राज्य शासनाचे स्वामित्वधन रक्कम वसुल केली नसल्याबाबत. 152
51 निर्मल एम.एम.आर अभियान अंतर्गत केलेल्या कामाच्या देयकातून शासकीय विमा निधीची रक्कम वसुल केली नसल्याबाबत. 157
52 निर्मल एम.एम.आर योजनेंतर्गत केलेल्या कामाची प्रमाणके उपलब्ध न केल्या बाबत 159
53 प्रभाग क्रमांक 64 मध्ये पेवरब्लॉक टाकणे या कामातील अतिप्रदाना बाबत. 160
54 राहुलनगर आणि वाल्मिकी वसाहत येथे काम सुरु न झाल्याने केंद्र तसेच राज्य शासनाचे अनुदान वाया गेल्या बाबत.. 162
55 खासदार निधी अंतर्गत प्रभाग क्रमांक 10 मिनाताई ठाकरे नगर येथे समाज मंदिर तयार करण्याच्या कामाच्या मोजमाप पुस्तकातील अपूर्ण नोंदी बाबत. 165
56 प्रभाग क्रमांक 20 फुट पाथ तयार करणे या कामात झालेले अतिप्रदान रु. 79449 168
57 दलित वस्ती सुधारणा अंतर्गत केलेल्या कामाच्या देयकातून गौण खनिज वापरल्याबद्दल स्वामित्व धन रक्कम रु. 67423 170
58 निर्मल एम.एम.आर (वस्तीस्वच्छतागृह) योजनेतील त्रुटी बाबत 172
59 खासदार निधी अतर्गत प्रभाग क्रमांक 64 मध्ये कंपाउंड भिंत तयार करणे या कामाच्या देयकातून विलंब आकार, चाचणी अहवालाची रक्कम वसुल न केल्याने झालेले नुकसान रु. 25546 174
60 खासदार निधी अंतर्गत प्रभाग क्रमांक 10 मध्ये नाला तयार करणे आणि दुरुस्ती करणे या कामात झालेले रु.84699 चे अतिप्रदान 176
61 प्रभाग क्रमांक 68 मध्ये नाला बांधणे या कामात जिल्हा दर सूची पेक्षा जादा दर लावल्याने झालेले रु.88298 चे अतिप्रदान 179
62 प्रभाग क्रमांक 71 तानाजी नगर येथे 22 सिट्सच्या शौचालयाचे शिल्लक राहिलेले काम करण्याच्या कामात झालेले अतिप्रदान रु. 121912 181
63 कम्पाउंड भिंत तयार करणे या कामातील त्रुटी आणि त्यात झालेले अतिप्रदान रु.90634 184
64 खासदार निधी अंतर्गत प्रभाग क्रमांक 60 मध्ये फूट पाथ रस्ता तयार करण्याच्या कामामध्ये झालेले रु. 72707 चे नुकसान 186

65 प्रभाग क्रमांक 40 शिवसेना कार्यालय ते आझादनगर मध्ये पेवर ब्लॉक बसविण्याच्या कामावर झालेले अतिप्रदान रु. 76344 ....189
66 प्रभाग क्रमांक 8 मध्ये सी.सी. PASSAGE पेवर ब्लॉक टाकणे या कामात झालेले अतिप्रदान रु.46021 191
67 प्रभाग क्रमांक 64 मध्ये आंबेडकर उद्यानात विकास कामात झालेले अतिप्रदान रु.112916....194
68 खासदार निधी अंतर्गत शिवसेना कार्यालयासमोर समाज मंदिर तयार करण्याच्या कामात अदा केलेली जादा रक्कम रु. 55193 बाबत. ....196
69 दलित वस्ती सुधारणा अंतर्गत प्रभाग क्रमांक 48 मध्ये मिलिंद नगर येथे पेवर ब्लॉक बसविणे या कामाच्या देयकातून आवश्यक त्या रकमा वसुल न केल्याने झालेले नुकसान रु. 89145....199
70 खासदार निधीच्या खर्चाची प्रमाणके लेखापरीक्षणास उपलब्ध केली नसल्या बाबत ....202
71 दलित वस्ती सुधारणा खर्चाची प्रमाणके उपलब्ध न केल्या बाबत....202
72 राजीव गांधी नगरप्रभाग क्रमांक 10 मध्ये नाला तयार करणे आणि दुरुस्ती करणे या कामात झालेले अतिप्रदान रु.72114 आणि मोजमाप पुस्तकातील त्रुटी बाबत....204
73 उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दितील मोबाईल टॉवरवरील कराच्या वसुलीबाबत. ....206
74 महिला व बालविकास विभागातील खरेदीमधील अनियमितता....207
75 सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेच्या स्वयंरोजगार या घटकाखाली केलेले चुकीचे अनुदान वाटप....210
76 सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना अंतर्गत प्रशिक्षण (STEP-UP) या घटकातील खर्चातील अनियमितता . 212
77 सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेच्या रोख पुस्तकातील त्रुटी व अनियमितते बाबत. ....214
78 सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेंतर्गत शहरी मूलभूत सोयी सुविधा या घटकातील खर्चातील त्रुटी व अनियमितते बाबत. ....216
79 बालके व विकास गट (डवाका) (UWSP) या घटका खाली दिलेल्या अनुदाना बाबत. ....219
80 निर्मल एम.एम.आर.(वस्तीस्वच्छतागृह) अभियान अंतर्गत पहिल्या आणि दुस-या टप्प्यातील एकूण 163 वस्तीस्वच्छतागृहे बांधण्याच्या खर्चातील अनियमितता....221
81 वकिलांच्या फी च्या प्रदानातील अनियमितता....222
82 खर्चाची प्रमाणके उपलब्ध न केल्या बाबत....223
83 अग्निशमन सेवा विभागाने ना हरकत दाखल्याची कमी रक्कम स्वीकारल्या बाबत तसेच थकीत रक्कम आणि इतर अनियमितता बाबत....224

**कलम ९ क खालील आक्षेप....228**

**------------------- निरंक ------------------- ....229**

**कलम ९ ड खालील आक्षेप....231**

84 जमा होणा-या महसुलाच्या पावती पुस्तकांच्या साठा नोंदवहया अप्राप्ती बाबत. ....232
85 रोख वहीतील उणीवांबाबत. ....232

86 उल्हासनगर महानगरपालिकेने निर्गमित केलेल्या धनादेशाबाबत.......235
87 उल्हासनगर महानगरपालिकेने घेतलेल्या कर्जाबाबत.......236
88 निवृत्तीवेतन धारकांचे हयातीचे दाखले लेखा परीक्षणास उपलब्ध न केल्याबाबत.......238
89 रजा लेख्यातील त्रुटी आणि अनियमितते बाबत.......238
90 परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना विलंबाने सुरु करण्याबाबत.......240
91 जेएनएनयुआरएम योजनेंतर्गत उल्हासनगर शहरात पाणी पुरवठा योजना कामाच्या अंदाजपत्रकातील बाबींचा दर व म.जी.प्रा. च्या जिल्हा दर सुचीमधील दरातील तफावत त्याचप्रमाणे इतर बाबींबाबत.......241
92 पाणी पुरवठा विभागामार्फत टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याच्या निविदा प्रक्रियेतील तसेच मुदतीअंती कंत्राटदार नेमणूकीतील त्याचप्रमाणे प्रदान केलेल्या रकमेबाबत अनियमितता.......243
93 महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ यांचेकडून खरेदी करण्यात आलेल्या पाणी देयकाबाबत.......247
94 महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळास अदा करण्यात आलेल्या विज देयकांतील अनियमिततेबाबत.......251
95 भुयारी गटार निगा अंतर्गत केलेल्या कामातील त्रुटींबाबत.......255
96 मलप्रवाह वाहनाच्या दुरूस्तीच्या अनुषंगाने प्रदानातील त्रुटींबाबत.......258
97 भुयारी गटार जोडणी साहीत्य निगा अंतर्गत केलेल्या कामातील त्रुटींबाबत.......259
98 पावर पंप व पाणी पुरवठा साहित्य खरेदी व बसविणे अंतर्गत केलेल्या कामातील त्रुटींबाबत.......262
99 जल (प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण) उपकर अधिनियम,1977 अन्वये आकारण्यात आलेल्या उपकर थकबाकीबाबत.......269
100 रु. 15 लक्षपर्यंतची कामे शासन निर्णयानूसार 33:33:34 या गुणोत्तर प्रमाणात वाटप झाली नसलेबाबत.......271
101 पावर पंप व पाणी पुरवठा साहित्य खरेदी व बसविणे (दुर्बल घटक)अंतर्गत केलेल्या कामातील त्रुटींबाबत.......272
102 बुस्टर मशिनरी चालविणे कामाबाबत निविदा नस्ती व इतर माहीती उपलबध न झालेबाबत.......276
103 बुस्टर पंपिंग मशिनरी खरेदी कामाबाबत अभिप्राय.......278
104 उच्च विद्युत दाबाच्या ग्राहकांनी 90% POWER FACTOR न राखल्यामुळे झालेले नुकसानीबाबत.......280
105 कुपनलिका व जेटपंप बसविणे कामातील त्रुटींबाबत.......281
106 पाणी पुरवठा विभागातील अभिलेख/नोंदवहया उपलब्ध न करून दिलेबाबत.......286
107 लेखापरीक्षणाकरीता लेखे/नस्ती उपलब्ध करून देणेबाबत.......287
108 लेखापरीक्षणाकरीता लेखे/नस्ती उपलब्ध न करून दिलेबाबत.......288
109 भुयारी गटार जोडणी साहित्य निगा अंतर्गत केलेल्या कामासंदर्भात अभिप्राय.......289
110 उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत घरगुती,वाणिज्य व इतर जलवाहीनी जोडणीचा तपशिल उपलब्ध करून न दिलेबाबत.......291
111 सुधारीत पाणी पुरवठा योजना,टप्पा क्र.1 अंतर्गत उभारण्यात आलेली पाच पंपिग स्टेशनस चालविणे,देखभाल व दुरूस्ती करणे कामासंदर्भात अभिप्राय.......292
112 मलप्रक्रिया केंद्र,खडेगोळवली येथील पंपिग स्टेशनस चालविणे,देखभाल व दुरूस्ती करणे कामातील अनियमिततेबाबत.......296

113 उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील पिण्याचे पाण्याचे नमूने प्रयोगशाळेतील तपासणीबाबत ................300
114 अंतर्गत लेखापरीक्षण प्रलंबित तसेच त्रोटक स्वरूपाचे असलेबाबत...........................................................301
115 इमारतीचे संरचनात्मक निरिक्षण (STRUCTURAL AUDIT) करण्याबाबत..................................................302
116 बांधकामाना प्रांरभ प्रमाणपत्र देणे, पूर्णत्वाचा दाखला देणे व भोगवटा प्रमाणपत्र प्रलंबित ठेवल्याबाबत.......303
117 विकास भार शुल्काव्दारे जमा केलेली रक्कम विकास निधी मध्ये जमा करुन सार्वजनिक विकास कामासाठी वापर करण्याबाबत.........................................................................................................................304
118 इ.10 वी च्या विद्‌यार्थ्यां करीता 21 व्या शतकातील शैक्षणिक संधी" कार्यक्रमासाठी केलेल्या खर्चातील अनियमितते बाबत. .......................................................................................................................305
119 महापालिका वर्ग क व ड च्या लाभार्थी स्त्री व पुरुष कर्मचा-यांसाठी साडया व गणवेश कापड खरेदी मध्ये झालेल्या अनियमितते बाबत. ..................................................................................................308
120 "श्री गणेश दर्शन प्रतियोगिता -2011" कार्यक्रमासाठी साहित्य खरेदीमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत. ....310
121 मनपातील लाभार्थी कर्मचाऱ्यांना सन 2011-12 करीता रेनकोट,गमबूट व कोल्हापुरी चप्पल पुरविण्यासाठी झालेल्या खरेदीमधील अनियमितता......................................................................................................313
122 प्रभाग समिती नं.2, करीता खुर्च्या व टेबल खरेदी मधील अनियमितते बाबत..........................................315
123 स्थायी समिती सभापती कार्यालयाकरीता सोफासेट खरेदीमध्ये झालेली अनियमितता...............................317
124 मनपाच्या हददीत येणाऱ्या मनपा शाळा व खाजगी शाळा / क.महाविदयालये अंतर्गत शालेय व इतर स्पर्धांचे आयोजना मधील खर्चाच्या अनियमिततेबाबत......................................................................................319
125 मालमता कर आकारणी व वसुली व्यवस्थापन अंतर्गत केलेल्या सुधारणा यासंदर्भातील अहवालाच्या प्रती (PROJECT REPORT PRINTING) छपाई करणे पोटी केलेल्या नियमबाहय खर्चाबाबत..........................................321
126 सन 2011-12 चे अंदाजपत्रक तयार करण्याकरीता स्टेशनरी खरेदी मधील अनियमिततेबाबत..................323
127 महापौर निधीतून केलेल्या खर्चामधील अनियमिततेबाबत.......................................................................325
128 नोटा मोजण्याचे मशिन (CURRENCY COUNTING MACHINE) खरेदी मध्ये झालेली अनियमितते बाबत. .336
129 सार्वत्रिक निवडणूक -2012 साठी साहित्याच्या खरेदी मध्ये झालेल्या अनियमितते बाबत.........................338
130 सन 2011 सालची महापालीका दैंनदिनी छपाई व भांडार विभागास नियमित लागणारे छपाई साहित्य खरेदी मधील अनियमितता. ......................................................................................................................339
131 वाहन खरेदीमधील अनियमिततेबाबत.......................................................................................................341
132 विदयुत अभियांत्रिकी विभागाने 2011-12 मध्ये केलेल्या विदयुतविषयक कामातील अनियमितता. .........343
133 मनपाच्या अधिनस्त असलेली विदयुत जोडणीच्या विदयुत देयकांमधील वीज शुल्काची रक्कम परत घेण्याबाबत........................................................................................................................................346
134 डॅम्पिंग ग्राऊंड येथील कच-याचे सपाटीकरण करणे या कामातील अनियमितता. .......................................347
135 सार्वजनिक आरोग्य विभागातील किटकनाशके /जंतुनाशके / दुर्गंधीनाशके /अळीनाशके / डासनाशके इत्यादींच्या खरेदीमध्ये आढळलेल्या उणींवाबाबत...................................................................................349

136 पावसाळयापुर्वी मशिन व मनुष्यबळाद्वारे नाल्याची सफाई करणे व निघालेला कचरा/गाळ याची डम्परव्दारे वाहतुक डम्पींग ग्राऊंडवर करणे या कामातील उणींवाबाबत. ....353

137 पावसाळयापुर्वी पोकलेन मशिनव्दारे छोटया मोठया नाल्याची सफाई करणे व निघालेला गाळ डम्परव्दारे वाहतुक डम्पींग ग्राऊंडवर वाहतुक करणे याकामातील अनियमितता. ....359

138 उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत मुख्य रस्त्यांची पावर स्विपींग मशिनद्वारे साफसफाई करणे या कामातील अनियमितता. ....364

139 घनकच-याची वाहतुक व त्याची विल्हेवाट लावणे याकामातील अनियमितता. ....368

140 आरोग्य विभागाकडील लस टोचणी याकामावरील खर्चातील अनियमितता. ....372

141 आरोग्य विभागाकडील एड्स टि.बी.व इतर रोग प्रतिबंधक खर्च याकामावरील खर्चातील अनियमितता. ....374

142 आरोग्य विभागाकडील कुत्र्याच्या दंशावर औषधोपचार खर्चातील अनियमितता. ....375

143 आरोग्य विभागाकडील श्वान निर्बिजीकरणावरील खर्चातील अनियमितता. ....377

144 अेस.टी.डी./ पी.सी.ओ.व गटई व्यवसाय स्टॉल भाडयाच्या थकबाकीबाबत. ....380

145 उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी मालमत्तेवर जाहिरात लावणे बाबत अनियमितता. ....382

146 उल्हासनगर शहरात दिशादर्शक फलक लावणेसाठी 15 वर्षाच्या कालावधीसाठी बी.ओ.टी.तत्वावर अभिकर्त्याची नेमणूक करणेबाबत. ....383

147 उल्हासनगर महानगरपालिका मालकीच्या भाडयाने दिलेल्या उदयाने व मैदाने या मालमत्तेच्या थकीत असलेल्या भाडयाबाबात. ....386

148 उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या भाडयाने दिलेल्या गाळयाच्या प्रलंबीत भाडयाबाबत. ....388

149 अतिक्रमण विभागातील माहिती अप्राप्त असल्याबाबत. ....390

150 प्रभाग समिती -1 च्या लेखापरीक्षणातील त्रुटीबाबत. ....393

151 प्रभाग समिती -2 च्या लेखापरीक्षणातील त्रुटीबाबत. ....394

152 नगरसचिव विभागातील खर्चाच्या लेखापरीक्षणात आढळलेल्या उणींवाबाबत. ....395

153 जनसंपर्क विभागातील खर्चाच्या अनुषंगाने आढळलेल्या उणींवाबाबत. ....398

154 संगणक खरेदीमधील अनियमितता. ....400

155 जेएनएनयुआरएम ई-गवर्नस प्रकल्पाबाबत. ....401

156 उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दितील अनाधिकृत बांधकामांबाबत. ....403

157 मालमत्ता कराच्या थकीत रकमेबाबत. ....404

158 कर विभागाने ठेवलेल्या पावती पुस्तक साठा नोंदवहीबाबत. ....406

159 वेतन निश्चित्ती मधील त्रुटी बाबत. ....407

160 श्री श्यामलाल छोटू भगूर, श्रीमती माया भगवान गायकवाड, सफाई कामगार यांच्या चुकीच्या वेतन निश्चिती बाबत 410

161 चुकीच्या वेतन निश्चित्ती मुळे झालेले अतिप्रदान ....412

162 वेतन निश्चित्ती मधील त्रुटी बाबत. ....414

163 श्री परमानंद आनंद श्री जाधव,अनुरेखक आणि श्री मुकेश आयलानी कार्यकारी अभियंता यांच्या चुकीच्या वेतन निश्चिती मुळे त्यांना झालेले अतिप्रदान......416
164 2011-2012 मधील निवडणूक खर्चाची प्रमाणके आणि आस्थापना विषयक अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्याबाबत......418
165 श्री.विजय पी. रिजवाणी, कनिष्ठ अभियंता,श्री भरत जे भटीजा, कनिष्ठ अभियंता यांच्या चुकीच्या वेतन निश्चित्ती मुळे झालेले अतिप्रदान . ......419
166 चुकीच्या वेतन निश्चिती मुळे झालेले अतिप्रदान......422
167 श्री श्याम शिवनानी, लघुलेखक श्री भास्कर तानाजी मिरपगारे, उप स्थानक अधिकारी यांच्या चुकीच्या वेतन निश्चिती बाबत......427
168 खासदार निधी अंतर्गत केलेल्या कामाच्या देयकातून स्वामित्वधन रक्कम रु.131846 वसुल न केल्याबाबत. 429
169 राजीव आवास योजनेची रक्कम शासनास परत न केल्याबाबत. ......431
170 मजूर कामगार सहकारी संस्था यांना देण्यात आलेल्या कामातील अनियमितता......432
171 सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत समाज विकास संस्था (CDS) यांना देण्यात आलेल्या अनुदानाबाबत......433
लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र......438

**विवरणपत्रे व जोडपत्रे......2**

## *विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण*

| विभाग | ९अ | ९ब | ९क | ९ड |
|---|---|---|---|---|
| आयुक्तालय | | | | |
| सामान्य प्रशासन | | | | 159, 160, 161, 162, 163, 164, 165, 166, 167 |
| नगर सचिव | | | | 152 |
| शहर अभियंता किंवा सार्वजनिक बांधकाम | 14 | 41, 42, 43, 44, 45, 46, 47, 48, 49, 50, 51, 52, 53, 54, 55, 56, 57, 58, 59, 60, 61, 62, 63, 64, 65, 66, 67, 68, 69, 70, 71, 72 | | 168, 169, 170 |
| शहर अभियंता आणि विद्युत विभाग | | | | 132, 133 |
| पाणी पुरवठा व मल निसा:रण | 5, 6, 7 | 19, 20, 21, 22, 23, 24, 25, 26, 27, 28, 29, 30, 31, 32, 33, 34, 35 | | 91, 92, 93, 94, 95, 96, 97, 98, 99, 100, 101, 102, 103, 104, 105, 106, 107, 108, 109, 110, 111, 112, 113 |
| लेखा विभाग | 1, 2, 3, 4 | 15, 16, 17, 18 | | 84, 85, 86, 87, 88, 89, 90 |
| लेखापरीक्षण | | | | 114 |
| नगर रचना | 9 | | | 115, 116, 117 |
| जकात किंवा स्थानिक संस्था कर किंवा उपकर | | 36 | | |
| कर निर्धारण व संकलन | 13 | 73 | | 156, 157, 158 |
| आरोग्य | 10 | | | 140, 141, 142, 143 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| भूमी व मालमत्ता विभाग | 11, 12 | 39, 40 | | 144, 145, 146, 147, 148 |
| वाहन विभाग | | 38 | | 131 |
| माहिती आणि जनसंपर्क | | | | 153 |
| विधी विभाग | | 81 | | |
| घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प | | | | 134, 135, 136, 137, 138, 139 |
| भांडार | 8 | 37 | | 118, 119, 120, 121, 122, 123, 124, 125, 126, 127, 128, 129, 130 |
| अनधिकृत बांधकाम प्रतिबंध विभाग | | | | 149 |
| संगणक किंवा माहिती तंत्रज्ञान | | | | 154, 155 |
| नागरी समुदाय विकास प्रकल्प विभाग | | 75, 76, 77, 78, 79, 80 | | 171 |
| महिला व बालकल्याण विभाग | | 74 | | |
| क्रिडा विभाग | | 82 | | |
| अग्निशमन विभाग | | 83 | | |
| प्रभाग कार्यालये | | | | 150, 151 |

# I Part I : भाग १

## ***मागील लेखा परीक्षण अहवाल***

भाग-एक

मागील लेखापरीक्षणअहवाल

13 व्या वित्त आयोगाच्याशिफारशीनुसार राज्यातील सर्व महानगरपालिकांचे वैधानिकलेखापरिक्षण वित्त्त्त विभाग, शासन निर्णय क्रमांक– स्थानिले-1010/प्र.क्र.26ब/विमप्रशा, दिनांक 31.03.2011 अन्वये संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय यांचेकडे सोपविण्यातआले आहे.त्यानुसार उल्हासनगर महानगरपालिकेचेप्रथम 2011-2012 या वित्तीय वर्षापासून लेखापरिक्षण सुरु करण्यात आल्याने मागील प्रलंबितपरिच्छेद भाग-एक निरंक आहे.

# Part II

# भाग एक

# गंभीर अनियमितता

# कलम ९ अ,ब,क खालील आक्षेप

# कलम ९ अ खालील आक्षेप

## *1 उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन 2011-2012 च्या मुळ सुधारीत अर्थसंकल्पामधील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***मनपाचे अर्थसंकल्पीय अंदाज हे पारंपारीक पध्दतीने घेतलेले आहेत. अंदाजपत्रकीय तरतूदीपेक्षा रक्कम रुपये 20931505 जादा खर्च केला आहे. त्यास सर्वसाधारण सभेची मान्यता नाही . पाणीपुरवठा योजना स्वयंपूर्ण असणे आवश्यक आहे.तथापी पाणी पुरवठा योजना तोट्यात असल्याचे दिसून येते.***

उल्हासनगर महानगरपालिकेचे 2011-12 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणामध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 96 व 100 नुसार सर्वसाधारण सभेने मंजूर केलेला 2011-12 या वित्तीय वर्षाचा मूळ अर्थसंकल्प व कलम 103 व 104 अन्वये संमत केलेला सुधारीत अर्थसंकल्प, वित्तीय वर्ष 2011-12 मधील प्रत्यक्ष जमा व खर्च इ. ची तपासणी केली असता अर्थसंकल्पीय रकमा ,प्रत्यक्ष जमा व खर्च खालीलप्रमाणे असल्याचे दिसून येते .

| | |
|---|---|
| मुळ अर्थसंकल्प् मंजूरी 2011-2012 | सुधारीत अर्थसंकल्प् मंजूरी 2011-2012 |
| स्थायी समिती ठराव क्र.108, दि.10.2.2011 | स्थायी समिती मंजूरी ठराव क्र. 4, दि.29.5.2012 |
| महासभा मंजूरी ठराव क्र. 69, दि.18.2.2011 | महासभा मंजूरी ठराव क्र.26, दि. 9.7.2012 |

2011-2012 (आकडे हजारात)

| अंदाजपत्रक | मा.आयुक्तांनी शिफारस केलेले अंदाज | मा.स्थायी समितीने शिफारस केलेले अंदाज | मा. महासभेचे मूळ अंदाजपत्रक | सुधारीत अंदाजपत्रक | प्रत्यक्ष जमा व खर्च |
|---|---|---|---|---|---|
| अ) जमा | | | | | |
| प्रारंभिची शिल्लक | | | | 201501 | 247182 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अंदाजपत्रक अ | 2377071 | 3061742 | 3074634 | 1945465 | 1796525 |
| अंदाजपत्रक ब | 753 | 753 | 753 | 598 | 331 |
| अंदाजपत्रक क | 940359 | 1427159 | 1428759 | 734037 | 549013 |
| एकूण | 3318183 | 4489654 | 4504146 | 26881601 | 2593051 |
| ब) खर्च | | | | | |
| अंदाजपत्रक अ | 1930784 | 2439395 | 2449495 | 1823399 | 1462963 |
| अंदाजपत्रक ब | 1636 | 1636 | 1636 | 187 | 177 |
| अंदाजपत्रक क | 1997946 | 2048446 | 2048446 | 1056258 | 897250 |
| एकूण | 3930366 | 4489517 | 4499577 | 2879844 | 2360390 |
| अखेर शिल्लक | (-) 612183 | 4569 | 4569 | 1757 | 232661 |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका प्रकरण 3 मधील परिच्छेद 30 b नुसार मागील तीन वर्षाचे प्रत्यक्ष जमा खर्च विचारात घेऊन अर्थसंकल्पीय अंदाज करणे आवश्यक असताना असे केलेले दिसून येत नाही.

प्रत्यक्ष जमा : 2008-2009 कोटी रुपये 176.9418000

2009-2010 कोटी रुपये 194.8331000

2010-2011 कोटी रुपये 224.5118000

उपरोक्त तक्त्यावरुन दिसुन येते की, मागील 3 वर्षातील प्रत्यक्ष जमा रकमा पाहता प्रतिवर्षी 10 ते 15 टक्कयांची वाढ होत असल्याचे दिसते. त्या तुलनेत आयुक्तांनी अंदाज करतांना 47 % वाढ केलेली दिसते. स्थायी समितीने 100 % वाढ तर महासभेने 101% वाढ केलेली दिसते. 2011-12 या वर्षीच्या प्रत्यक्ष जमा महासभेच्या अंदाजाच्या केवळ 65 % आहे. यावरुन जमेच्या रकमा वाढविल्याचे स्पष्ट होते. खर्च बाजू वाढविण्यासाठी जमा बाजू अवास्त्वरित्या वाढविलेली आहे. अर्थसंकल्प् हा वास्तववादी असणे आवश्यक आहे. मुळ अर्थसंकल्पाच्या आधारे कामांना मंजूरी असल्याने प्रत्यक्ष उत्पन्न् कमी प्राप्त् झाल्यामुळे महानगरपालिकेच्या दायित्वामध्ये मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे.

2. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 86 व महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 28 नुसार अर्थसंकल्पीय शीर्षकाखाली तरतूद केलेल्या रकमेपेक्षा जादा खर्च अनुज्ञेय नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 101 ते 104 नुसार, सदर जादा खर्चास सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तथापि पत्यक्ष खर्चाचे अवलोकन केले असता विविध लेखाशिर्षाखाली केलेल्या तरतुदीपेक्षा एकूण रु. 20931505 जास्त् खर्च केल्याचे दिसुन येते. सबब महासभेच्या मान्यतेशिवाय अंदाजपत्रकीय तरतूदीपेक्षा जादा केलेला खर्च रक्कम रुपये नियमबाह्य ठरतो.

3. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2009/प्र.क्र.20/09/न.वि.20 मंत्रालय, मुंबई दिनांक 2.8.2010 नुसार पाणीपुरवठा योजना स्वयंपूर्ण असणे आवश्यक आहे तथापि क अंदाजपत्रक तसेच प्रत्यक्ष खर्चाची आकडेवारी

खालीलप्रमाणे आहे.

महसूली उत्पन्न :रु. 252975000 (सुधारीत सन 2011-2012)

महसूली खर्च :रु. 469880000 (सुधारीत सन 2011-2012)

प्रत्यक्ष महसूली खर्च :रु. 436560000

वरील आकडेवारी वरुन पाणी पुरवठा योजना तोटयात असल्याची दिसुन येते.

4. 2011-2012 चा ताळेबंद (Balance Sheet) पाहिला असता Sundry Creditors रुपये 2747989294 इतके असल्याचे दिसुन येते. सदर रक्कम महानगरपालिकेच्या एक वर्षाच्या अर्थसंकल्पीय जमा रकमेपेक्षा जास्त् आहे. दरवर्षी प्रत्यक्ष उत्पन्नापेक्षा जास्त रकमांचे अर्थसंकल्प् मंजुर केल्यामुळे सदरचे दायित्व् निर्माण झाले आहे.

5. नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. जीईएन - 1093/325 /प्र. क्र.24नवि-32,दि .17.04.93 व नगर विकास विभाग शासन निर्णय क्र .जीईएन - 1093/1198/नवि-14, दि .14.07.93 अन्वये <u>महिला व बालविकास कल्याण विभागासाठी बांधील खर्च वजा जाता</u> 5% तरतुद करणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

| | | |
|---|---|---|
| आवश्यक तरतुद 5 टक्के | :रु. | 81588000 |
| अर्थसंकल्पातील मुळ तरतुद | :रु. | 13000000 |
| सुधारीत तरतुद | :रु. | 5000000 |
| खर्च | :रु. | 2673825 |

नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. जीईएन - 1655/प्र. क्र.46/नवि - 33,दि. 14.02.2002 अन्वये अपंगांसाठी 3% तरतुद व खर्च करणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

| | | |
|---|---|---|
| आवश्यक तरतुद 3 टक्के | : रु. | 48952800 |
| अर्थसंकल्पातील मुळ तरतुद | : रु. | 5000000 |
| सुधारीत तरतुद | : रु. | 1500000 |
| खर्च | : रु. | 937243 |

6. शासन निर्णय नगर विकास विभाग क्रमांक : जीइएन 1098/प्र.क्र.21/98/नवि-24, दिनांक 9.3.1998 नुसार महानगरपालिकेने आपल्या वार्षिक खर्चापैकी 5 टक्के खर्च क्रिडा क्षेत्राकरीता शासन निर्णयात नमुद केलेल्या कामांवर करणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

| | | |
|---|---|---|
| आवश्यक तरतुद 5 टक्के | : रु. | 118019500 |
| सुधारीत तरतुद | : रु. | 2000000 |
| खर्च | : रु. | 1349275 |

उपरोक्तबाबत अर्धसमास ज्ञापन क्र. 24 दि. 30/10/2013 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे.

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीवरील अभिप्राय**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या 31/03/2012 रोजीच्या मत्ता दायित्व विवरणपत्रानुसार मालमत्ता कर रु.160.01 कोटी येणे आहे. तसेच पाणीपट्टी रु.37.68 कोटी येणे आहे. तथापि या येणे रकमांचा वर्षनिहाय थकबाकीचा तपशिल उपलब्ध नसल्यामुळे त्या रकमा किती वर्षापासून थकीत आहेत याचा बोध होत नाही. त्यामुळे या थकीत रकमा प्रत्यक्ष वसूल होण्याची खात्री देता येत नाही. म्हणून त्यांना ख-या अर्थाने मत्ता म्हणणे योग्य होणार नाही.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या कर्ज विवरण पत्रानुसार रु.104.88 कोटीचे कर्ज असल्याचे दिसून येते. त्यापैकी फक्त जेएनएनयुआरएम योजनेच्या कर्जाची परत फेड सुरु असून उर्वरीत 3 कर्जाची परत फेड बंद आहे. त्यामुळे त्या कर्जावर व्याजांची रक्कम वाढत असून त्यावर रु.32.89 कोटीची शास्ती लागलेली आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या ताळेबंदावरुन क्रेडीटर्स रु.275.13 कोटी असल्याचे दिसून येते. वेळच्या वेळी देणे रकमा अदा न केल्यामुळे यामध्ये वाढ झालेली दिसते.

ताळेबंदावरुन मत्ते पेक्षा दायित्व रु.63.95 कोटी जास्त असल्याचे दिसते. म्हणजेच उत्पन्नापेक्षा जास्त दायित्व निर्माण केल्याचे दिसून येते.

पाणी पुरवठा योजना ना नफा तोटा या तत्वावर राबविणे आवश्यक असताना 11-12 मध्ये उल्हासनगर महानगरपालिकेची पाणी पुरवठा योजना रु. 26.32 कोटी तोटयात आहे. तसेच उल्हासनगर महानगरपालिका एमआयडीसी कडून रु.7 प्रति हजार लिटर या दराने पाणी खरेदी करुन शहरास पुरवठा करते. यावर्षी एमआयडीसीने हा दर रु.14 प्रति हजार लिटर केल्याने पाणी पुरवठयांच्या महसुली खर्चात मोठया प्रमाणावर वाढ होणार आहे. पाणी पट्टी वसूली 11-12 मध्ये 46.12 % असून त्यात सुधारणा केली नाही तर तोटयात मोठया प्रमाणत वाढ होणार आहे.

उपरोक्त बाबी विचारात घेता महानगरपालिकेची आर्थिक स्थिती ही असमाधानकारक असल्याचे दिसून येते महानगरपालिकेने आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी खालील उपाययोजना अत्यंत तातडीने करण्याची आवश्यकता आहे.

1. अनुत्पादक व महसुली खर्चात काटकसर करणे.
2. प्रशासकीय खर्च कमी करणे, आस्थापना खर्चात काटकसर करणे.
3. मालमत्ता कराची व पाणीपट्टीची थकबाकी वसूल करणे आवश्यक आहे.
4. महानगरपालिका आकारु शकते असे सर्व कर आकारणी करुन वसूल करणे. त्यासाठी करदात्या नागरीकांचा असंतोष होवू नये, म्हणून दिल्या जाणा-या सर्व सुविधांचा दर्जा अत्यंत समाधानकारक होईल, यादृष्टीने प्रशासनात कार्यक्षमता व व्यावसायिकता निर्माण करणे.
5. महानगरपालिकेने घेतलेली कर्जे व त्यावरील व्याज यांचे नियमितपणे हप्ते फेडणे आवश्यक आहे. म्हणजेच कर्जावरील व्याज व दंडनीय व्याजाचे नुकसान टाळता येईल.
6. भांडवली स्वरुपाच्या विकास योजना राबविण्यासाठी राज्य व केंद्र शासनाच्या विविध नागरी विकास कार्यक्रमांमध्ये पुरेपूर सहभाग घेणे.
7. मालमत्ता कर आकारणी करताना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 267 (अ) नुसार अवैध बांधकामांवर मालमत्ता कराची दुप्पट एवढी शास्ती आकारण्यात यावी.
8. मालमत्ता कराची आकारणी भोगवटा प्रमाणपत्र प्रदान केल्यांनंतर त्वरीत करणे आवश्यक असून अशी आकारणी भोगवटा प्रमाणपत्राच्या दिनांकापासून करणे आवश्यक आहे.
9. पाणीपुरीवठा योजनेमध्ये पाण्यचा अपव्यव टाळावा. पाण्यची गळती, चोरी न होईल याकडे लक्ष देणे

आवश्यक आहे. पाणीपुरवठा योजना स्वयंपूर्ण होणा-या दृष्टीने उपाययोजना कराव्यात.

10. वाहनाचा वापर व प्रवास काटकसरीने करावा. अतितातडीच्या प्रसंगी विमान प्रवासाचा अवलंब करावा.

11. म.न.पा.चे मालमत्तेपासून मिळणा-या उत्पन्नाकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

12. निरुपयोगी साहित्य जसे वाहनांचे जुने सुटे भाग, लोखंडी/ लाकडी फर्निचर, वर्तमानपत्र रद्दी, जुनी यंत्रसामुग्री व औजारे, जुनी वाहने इची. किमान किंमत ठरवून जाहिर लिलावाद्वारे विक्री करणे.

13. चांगल्या आर्थिक व्यवस्थापनाचे निकष उदाहरणार्थ –

अ) महसूली शिल्लक ही महसूली उत्पन्नाचे 30 ते 40 टक्के असावी.

ब) भांडवली कामांवरील खर्च हा एकूण उत्पन्नाच्या 40 टक्केपेक्षा अधिक असावा.

क) आस्थापना खर्च हा म.न.पा. च्या एकूण उत्पन्नाच्या 40 टक्केपेक्षा कमी असावा.

ड) कर्ज परतफेडीचा वार्षिक हप्ता हा एकूण महसूली शिलकेचे 50 टक्केपेक्षा अधिक असू नये.

वरील निकषांचे जास्तीत जास्त पालन करणे आवश्यक आहे.

अंदाजपत्रकातील तरतूदी व कायदेशीर तरतूदींचे पालन करावे.

DATDSAM7301 (Ref No : 1, Hmm No : 24)

## *2 उल्हासनगर महानगरपालिकेचे लेखे द्विनोंद पध्दतीत न ठेवलेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

| *उल्हासनगर महानगरपालिकेने द्विनोंद पध्दतीत लेखे ठेवलेले नाहीत.* |
| --- |

उल्हासनगर मनपाच्या लेखा विभागातील रोखवही व इतर तत्सम लेख्यांची तपासणी केली असतां उपलब्ध लेख्यासंदर्भात खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

शासन निर्णय ,नगरविकास विभाग ,मंत्रालय, क्र.लेखास-10200/प्रक्र 5/नवि 31 दि.06.07.2005 नुसार महानगरपालिकेने दि.01.04.2005 पासून लेखे द्विनोंद पध्दतीने ठेवण्याबाबत आदेशित केले आहे.

अर्धसमास ज्ञापन क्र .19 दि.23.10.2013 नूसार राष्ट्रीय लेखा संहिता (NMAM) मधील नमून्यातील उपर्जित व दुहेरी नोंद पध्दतीने ताळेबंद ,जमा व खर्च इ.वार्षिक वित्तीय लेख्यांची मागणी केली असता त्याप्रमाणे लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत. त्यामुळे त्यावरील अभिप्राय नमूद

करता आले नाही.

मनपा निधीची रोखवही तसेच इतर रोखवहया एकेरी नोंद पध्दतीने ठेवल्याचे दिसून आले आहे. नागरी प्रशासनात सुधारणा घडवून आणणे व स्थानिक स्वराज्य संस्थांना आर्थिकदृष्टया सक्षम बनविणे व त्यांची बाजारातील पत सुधारण्यासाठी स्थानिक स्व राज्य संस्थांना केंद्र शासनाने ज्या सुधारणा करणे बंधनकारक केले आहे . त्यातील अनिवार्य सुधारणांमध्ये महापालिकांनी आधुनिक द्विनोंद पध्दतीने लेखे ठेवणे हि बाब अंतर्भूत आहे.परंतू उल्हासनगर महापालिकेने दिवनोंद पध्दतीने लेखे ठेवल्याचे दिसून आले नाही.

DATDSAM7301 (Ref No : 2, Hmm No : 127)

### *3 सुरक्षा अनामत रकमेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*अनियमितता कलम : 9अ*

***उल्हासनगर महानगरपालिकेने सुरक्षा अनामत नोंदवही लेखापरीक्षण पथकास लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. सबब 2011-2012 या वित्तीय वर्षाच्या सुरुवातीची शिल्लक, सदर वर्षामध्ये प्राप्त झालेली रक्कम व 31 मार्च, 2012 अखेर शिल्लक असलेल्या रक्कमेचे लेखापरीक्षण करता आले नाही.***

उल्हासनगर महानगरपालिकेकडे 2011-2012 या वितीय वर्षामधील सुरक्षा अनामत रकमेच्या लेखापरीक्षणाकरीता लेखापरीक्षण पथकाने अर्धसमास ज्ञापन क्रमांक : 36, दिनांक 21.11.2013 अन्वये खालील प्रमाणे माहिती व अभिलेख उपलब्ध् करुन देण्याबाबत कळविण्यात आले होते.

1) सुरक्षा अनामत नोंदवही.
2) दिनांक 31.03.2011 अखेर सुरक्षा अनामत रक्क्म व त्याच्या कालावधीबाबत तपशिलवार माहिती.
3) 2011-2012 मध्ये प्राप्त् सुरक्षा अनामत रकमेची तपाशिलवार माहिती.
4) सुरक्षा अनामत रकमेच्या अनुषंगाने ठेवण्यात आलेले अभिलेख.

उपरोक्त् अर्धसमास ज्ञापनाच्या अनुषंगाने लेखा विभागाने त्यांचे पत्र जा. क्र./उमपा/लेवि /456/13, दिनांक 23.01.2014 अन्वये अनुपालन सादर केले आहे. सदर अनुपालनामध्ये अर्धसमास ज्ञापनामध्ये मागविण्यात आलेली सर्व माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध् करुन देण्यात आलेली असल्याचे

नमुद आहे. परंतु लेखा विभागाने 2011-2012 या वित्तीय वर्षामधील सुरक्षा अनामत रकमेबाबत फक्त संगणकीय प्रत उपलब्ध् करुन देण्यात आलेली आहे. त्यामध्ये 2011-2012 मध्ये प्राप्त सुरक्षा अनामत रकमेची माहिती देण्यात आली होती. परंतु उपरोक्त अनुक्रमांक : 1, 2 बाबत माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे लेखा विभागाने सादर केलेले अनुपालन अमान्य असुन सुरक्षा अनामत रकमेबाबत लेखापरीक्षण करता आले नाही.

DMASGDM7201 (Ref No : 72, Hmm No : 36)

## *4 न वटलेल्या (Dishonered Cheque) धनादेशाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 21464904.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 21464904.00/-

***उल्हासनगर महानगरपालिकेच्या कर विभागात मालमत्ता करापोटी भरण्यात आलेले धनादेश न वटल्याने रुपये 2,14,64,904/- वसुलपात्र असुन सदर रक्कम वसुलीबाबत महानगरपालिकेने कार्यवाही केलेली नाही.***

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 129 ते 133 अ तसेच वेळोवेळी स्थायी समितीने मंजुरी दिल्यानुसार विहित दराने मालमत्ताधारकाकडून मालमत्ता कराची रक्कम वसुल केली जाते.

उल्हासनगर महानगरपालिकेतील कर संकलन विभागाने मालमत्ताधारकाकडून रोख व धनादेश स्वरुपात मालमत्ता कराची रक्कम वसुल केली आहे. सन 2011-2012 चे लेखापरीक्षणात असे आढळुन आले की, कर संकलन विभागाने रुपये 13,53,58,974/- इतक्या रकमेचे धनादेश स्विकृत केले होते. त्यापैकी रुपये 2,14,64,904/- इतक्या रकमेचे एकूण 396 धनादेश बँकेतुन (Dishonered Cheque) अनादरीत झाले.

उल्हासनगर महानगरपालिकेकडे संगणकीय प्रणाली विकसीत असल्यामुळे करापोटी न वटलेल्या धनादेशाची रक्कम संबंधीतांच्या खाती प्रलंबित दाखविण्याची तरतुद आहे.

न वटलेल्या धनादेशाची रक्कम वसुल करण्यासाठी विभागाने कोणती कार्यवाही केली याबाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक : 164, दिनांक 12.02.2014 रोजी निर्गमित करण्यात आले असुन लेखापरीक्षण पथकास अनुपालन सादर करण्यात आलेले नाही.

DMASGDM7201 (Ref No : 73, Hmm No : 164)

### *5 शहरातील सांडपाण्या पैकी किमान 20 % सांडपाण्याचे पुन:चक्रीकरण व पुनर्वापर होत नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***सांडपाण्याचे पुन: चक्रीकरणाची कार्यवाही करण्यात येत असल्याबाबतची तपासणी करता आली नाही.***

नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण - 2010/1015/प्र.क्र. 121/नवि. 20, दि. 15/10/2010 नुसार शहरातील सांडपाण्यापैकी किमान 20 % सांडपाण्याचे पुन:चक्रीकरण व पुनर्वापर करणे आवश्यक आहे. उपरोक्त बाबत अर्धसमास ज्ञापन क्र .155 दि.11.02.2014 दिले असता अनुपालन अप्राप्त् आहे. त्यामुळे उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील सांडपाण्याचे पुन :चक्रीकरण होत असलेबाबतची तपासणी करता आली नाही.

DATDSAM7301 (Ref No : 6, Hmm No : 155)

### *6 उल्हासनगर महानगरपालिकेने माहे मार्च 2012 अखेरपर्यंत साध्य करावयाच्या सेवांची मानकानूसार उदिदष्ट साध्य न केलेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***राज्य शासनाने महानगरपालिकेद्वारे पुरविण्यात येणा-या सेवांबाबत मानके निश्चित केली असून त्याप्रमाणात***

***उदिदष्टे साध्य् करण्यात येत नाहीत.***

तेराव्या वित्त् आयोगाच्या शिफारशीमधील प्रकरण 10 मधील क्र.10.161 नूसार 9 अटींची पुर्तता केल्यास तेराव्या वित्त् आयोगाची Performance Grant राज्य शासनास व पर्यायाने महानगरपालिकेस मिळणार आहे. त्यापैकी 8 वी अट सर्व्हिस लेवल बेंच मार्क्स बाबत आहे.

महानगरपालिकेकडे निधीच्या कमतरतेमुळे त्यांनी पुरविलेल्या सेवांवर विपरीत परिणाम होत आहे. महानगरपालिकेद्वारे पुरविण्यात येणा-या सेवांबाबत राज्य शासनाने मानके निश्चित केली आहेत. सेवानिहाय उद्दिष्टे साध्य झालेबाबतची माहिती अर्धसमास ज्ञापन क्र .126 दि.28/01/2014 अन्वये मागविली असता प्राप्त् अनुपालनानुसार मानकांच्या अनुषंगाने साध्याबाबत स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | सर्विस लेवल बेंच मार्किंग | अपेक्षित कार्यक्षमता | नगरपरीषदेची सध्याची सेवा मानकांनूसार क्षमता | मार्च 2012 पर्यंत प्रगती करण्यासाठीचे उदिदष्ट | मार्च 2012 पर्यंत साध्य झालेले उदिदष्ट |
|---|---|---|---|---|---|
| | **पाणी पुरवठा विभाग** | | | | |
| 1 | नळाद्वारे पाणीपुरवठा होत असलेला शहराचा भाग | 100% | 80% | 100% | 90% |
| 2 | ग्राहकाला प्राप्त् होणारा दरडोई पाणी पुरवठा (लि.) | 135 प्रती माणसी प्रतीदिन | 140 प्रती माणसी प्रतीदिन | ------------------ | 140 प्रती माणसी प्रतीदिन |
| 3 | नळावर पाण्याचे मिटर बसविणे | 100% | 5% | 100% | 20% |
| 4 | पाणी कर आकारणी न मिळणा -या पाण्याचे प्रमाण | 20% | 30% | 20% | 30% |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 5 | पाणी पुरवठा सातत्य | 24 x 7 | 1 ते 3 तास | 6 तास | 1 ते 3 तास |
| 6 | पाण्याचा दर्जा | 100% | 90% | 100% | 80% |
| 7 | ग्राहक तक्रार निवारणाची सक्षमता | 80% | 70% | 80% | 80% |
| 8 | पाणी पुरवठा सेवेच्या खर्चाची वसुली | 100% | 50% | 100% | 50% |
| 9 | पाणी पुरवठा संबंधित आकार वसुलीची टक्केवारी | 90% | 60% | 90% | 70% |
| | **मल:निसारण विभाग** | | | | |
| 10 | शौचालय उपलब्धतेची टक्केवारी | 100% | 60% | 100% | 80% |
| 11 | मल:निसारण सेवेची उपलब्धता | 100% | 60% | 80% | 60% |
| 12 | मल:निसारण जमा करण्याची क्षमता | 100% | 30% | 80% | 40% |
| 13 | मल:निसारण पाण्यावर प्रक्रीया करण्याची क्षमता | 100% | 50% | 80% | 60% |
| 14 | मल:निसारण प्रक्रियेची गुणवत्ता | 100% | 50% | 80% | 50% |
| 15 | मल:निसारण प्रक्रियेनंतर पाण्याचा पुर्नवापर | 200% | नाही. | 10% | नाही. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 16 | ग्राहक तक्रार निवारण्याची सक्षमता | 80% | 60% | 80% | 80% |
| 17 | सांडपाणी व्यवस्थापनातील खर्चाची वसुली | 100% | 50% | 80% | 50% |
| 18 | सांडपाणी आकार वसुलीची टक्केवारी | 90% | 50% | 80% | 60% |
| | **घनकचरा व्यवस्थापन** | | | | |
| 19 | घरोघरी घनकचरा गोळा करण्याचे प्रमाण | 100% | 80% | 100% | 80% |
| 20 | नगरपरिषदेची घनकचरा गोळा करण्याची कार्यक्षमता | 100% | 80% | 100% | 90% |
| 21 | नगरपरीषदेची घनकचरा वर्गीकरणाचे प्रमाण | 100% | 10% | 80% | 10% |
| 22 | नगरपरीषदेने गोळा केलेल्या कच -याचे पुर्नघटन (पुर्नवापर) करण्याचे प्रमाण | 80% | 10% | 80% | 10% |
| 23 | नगरपरीषदेचे शास्त्रशुध्द पध्दतीने घनकचरा विल्हेवाटीचे प्रमाण | 100% | 20% | 100% | 20% |
| 24 | ग्राहक तक्रार निवारणातील सक्षमता | 100% | 90% | 100% | 90% |
| 25 | घनकचरा सेवा खर्चाची | 100% | 50% | 90% | 50% |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | वसुली | | | | |
| 26 | घनकचरा आकार वसुलीची टक्केवारी | 90% | 60% | 90% | 60% |
| | **पावसाळी पाण्याचा निचरा** | | | | |
| 27 | पावसाळी पाणी निचरा करणा-या व्यवस्थेची शहरातील टक्केवारी | 100% | 60% | 100% | 70% |
| 28 | पावसाळी पाणी साचून राहणे /पुरस्थितीच्या घटना | 0% | 10% | 0% | 5% |

तेराव्या वित्त् आयोगाच्या शिफारशीमधील प्रकरण 10 मधील क्र.10.161 नूसार 9 अटींपैकी 8 वी अट सर्व्हिस लेवल बेंच मार्क्स ची पुर्तता करणे आवश्यक होते. तथापि वरीलपैकी अनुक्रमांक 2,4, 7, 16 वगळता उर्वरित सर्व्हिस लेवल बेंच मार्क्स ची पुर्तता झालेली नाही.त्यामुळे तेराव्या वित्त् आयोगाची Performance Grant महानगरपालिकेस मिळणार नाही.

DATDSAM7301 (Ref No : 8, Hmm No : 116)

## *7 पाणी पुरवठा योजना तोटयात असलेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

| |
|---|
| ***पाणी पुरवठा विभागाच्या जमा व खर्चाचे अवलोकन केले असता ही योजना 2011-12 मध्ये रु. 26.32 कोटी तोटयात आहे.*** |

नगरविकास विभाग ,मंत्रालय,शा.नि.क्र.Misc-2009/CR 207/01 UD-20 दि.02.08.2010 अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थेने त्यांचेमार्फत राबविण्यात येत असलेली पाणी पुरवठा योजना स्वयंपूर्ण ना - नफा, ना-तोटा या तत्वावर चालविणे आवश्यक आहे , अशा सुचना देण्यात आलेल्या आहेत . पाणी पुरवठा विभागांतर्गत झालेल्या प्रत्यक्ष जमा-खर्च रकमेचे 2013-14 च्या अर्थसंकल्पावरून अवलोकन केले असता तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**(रुपये हजारात)**

| **जमा** | रुपये | | **खर्च** | रुपये | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | पाणी बिल वसुली (कर) | 175620 | 1 | सामान्य प्रशासन वेतन | 53672 |
| 2 | नळ जोडणी शुल्क | 633 | 2 | अन्य भत्ते व सवलती | 634 |
| 3 | प्लंबर परवाना शुल्क | 23 | 3 | अन्य प्रशासकीय खर्च | 1333 |
| 4 | इतर जमा | 290 | 4 | महसुली खर्च | 360209 |
| 5 | निविदा फॉर्म विक्री | 67 | 5 | भांडवली खर्च | 24049 |
| | एकूण जमा | **176633** | | एकुण खर्च | **439897** |

उपरोक्त तपशिलावरून वित्तीय वर्ष 2011-12 मध्ये रु.2632.64 लक्ष इतक्या रक्कमेचा पाणी पुरवठा योजनेस तोटा झाल्याचे दिसून येते.

उपरोक्तबाबत अर्धसमास ज्ञापन क्र .156 दि.11.02.2014 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त् आहे. सबब,आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATDSAM7301 (Ref No : 11, Hmm No : 156)

## *8 अग्निशामन विभागासाठी विविध प्रकारची आधुनिक व उपयुक्त उपकरणे खरेदीमध्ये झालेल्या अनियमितते बाबत..*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :B-2(4)Part-II मनपानिधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 3164580.00/-

***अग्निशमन विभागासाठी खरेदी करण्यात आलेल्या साहित्याची खरेदी करतांना 2.01.1992 मधील शासन निर्णयातील तरतुदीचे उल्लंघन करणे, अग्निशमन साहित्याची खरेदी करण्यासाठी शासनाची मंजुरी न घेता खरेदी करणे, अधिकृत पुरवठादारांकडून निविदा न मागविता स्टेशनरी पुरवठादारांकडील निविदा तांत्रिकदृष्टया वैध ठरवून दरनिश्चिती करणे इ.अनियमितते बाबत.***

उल्हासनगर महानगरपालिकेच्या भांडार विभागाने सन 2011-12 मध्ये अग्निशमन विभागासाठी खरेदी केलेल्या विविध प्रकारच्या उपकरणांची खरेदी नस्तीचे लेखापरीक्षण करण्यात आले. खरेदीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्. | लेखाशिर्ष | पुरवठा आदेश क्रंमांक व दिनांक | निविदा क्रमांक व दिनांक | कंत्राटदाराचे नांव | खरेदीची रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | B-2(3)Part-II | उमनपा/भांवि/265/2011, दि.31.12.2011 | 05/28.02.2011 | गायत्री फायर सर्व्हीसेस उल्हासनगर | 1065100 |
| 2 | B-2(3) | उमनपा/भांवि/205/2011, दि.12.12.2011 | 02/25.05.2011 | गायत्री फायर सर्व्हीसेस उल्हासनगर | 1032710 |
| 3. | B-2(3) | उमनपा/भांवि/315/2011, दि.31.03.2012 | 6/28.02.2011 | गायत्री फायर सर्व्हीसेस उल्हासनगर | 1066770 |

वरील खरेदी निविदा मागवून केली असून, निविदा नस्ती व खरेदी कार्यपध्दतीचे लेखापरीक्षणामध्ये खालील बाबी आढळून आल्या आहेत.

1. अग्निशामन विभागाने अग्निशमन साहित्याची मागणी करतांना एकाच दिनांकास 24.10.2010 रोजी स्वतंत्रपणे वेगवेगळी टिप्पणी सादर केली आहे व सादर केलेल्या टिप्पणी मध्ये मागील शिल्लक साठा, आवश्यक असलेला साठा इत्यादीचा उल्लेख करण्यात आलेला नाही. खरेदीपध्दतीच्या नियमाप्रमाणे सदरचा तपशिल नमुद करुन एकत्रित मागणी करणे आवश्यक होते.

2. अग्निशमन विभागाने असा तपशिल नमुद न करता एकाच तारखेस वेगवेगळया स्वतंत्र टिप्पण्या प्रस्तावित करुन मागणी करण्याचे प्रयोजन स्पष्ट केले नसल्याचे दिसून येते. . तसेच सदरच्या मागणीमध्ये पूर्वीचा शिल्लक साठा, व आवश्यक असलेल्या साहित्याबाबत कारणमीमांसा स्पस्ट करण्यात आली नसल्याने खरेदी करण्यात आलेल्या साहित्याची विभागास आवश्यकता असल्याची बाब पडताळता आली नाही.

3. उदयोग, उर्जा व कामगार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं.भांखस.1088/(2512)/उदयोग-6,

दि.2 जानेवारी 1992 मधीलपरि.8.1 नुसार वस्तू खरेदी संबंधी खरेदी समिती स्थापन करणे आवश्यक असतांना अशी खरेदी समिती स्थापन न करता खरेदी करण्यात आली आहे.

4. शासन निर्णय दि.2.01.1992 मधील तरतूद व उदयोग संचालनालय नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय मुंबई यांचेकडील परिपत्रकक्रं.उसं/शा.निम.शा.वख./परिपत्रक/2009/बी-15279 दि.3 जून, 2009 मधील तरतुदी नुसार एकूण वार्षीक खरेदी रु.50000/ किंवा त्यापेक्षा अधिक असेल अशावेळी निविदा चौकशी राजपत्रात प्रसिध्द करणे बंधनकारक आहे. तथापि अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

5. वरील खरेदी साठी अग्निशामन साहित्य खरेदी लेखाशिर्ष B-2(3) अंतर्गत रु.30.00 लाख तरतुद असतांना मनपाच्या भांडार विभागातून एकाच लेखाशिर्षांतर्गत एकाच वित्तीय वर्षाकरीता तीन निविदा प्रसिध्द करुन एकूण रु.3164580/- इतक्या रक्कमेचे साहित्य खरेदी केले आहे. तरतुदीपेक्षा जास्त रु. १६४५८०/- खर्च करण्यात आलेला आहे. रु. 164580 इतकी तरतूद कमी असताना रु.3164580/- इतक्या रक्कमेचे साहित्य कोणत्या तरतुदी मधून खरेदी करण्यात आले याबाबत योग्य खुलासा होणे आवश्यक आहे..

6. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रं.अशस-1407/360/प्र.क्रं.211/नवि-20, दिनांक 31.08.2009 मधील परिच्छेद 5 नुसार संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा, यांच्याकडून शासन मान्यतेने महानगरपालिका /नगरपरिषदा यांचेकरीता आवश्यक असलेले अग्निशमन वाहने, अग्निशमन उपकरणे संयत्रे यांचा दर्जा व तपशिल विहीत केला आहे. सदर शासन निर्णयातील परि.6 नुसार सदरची अग्निशमन उपकरणे व संयत्रे खरेदी करण्यासाठी शासन मार्फत संचालक अग्निशमन सेवा यांच्या अध्यक्षते खाली नियुक्त केलेल्या तांत्रिक समितीच्या मदतीने शासन स्तरावरुन दरकरार करुन घेणे आवश्यक आहे. त्यानुसारच अग्निशमन उपकरणे व संयत्रे खरेदी करणे आवश्यक असतांना महानगरपालीकेने निविदा मागवून खरेदी केली आहे. सदरचे साहित्य खरेदीस संचालक अग्निशमनसेवा यांचे स्तरावरील तांत्रिक समितीची मान्यता घेण्यात आलेली नाही. तसेच खरेदी केलेले साहित्य गरजेनुसार व तांत्रिकदृष्ट्या योग्य असल्याची मान्यता न घेता खरेदी केले आहे. त्यामुळे खरेदी करण्यात आलेले साहित्याचा दर्जा व किमंत याबाबत खात्री करता आली नाही.

7. मनपाचे भांडार विभागामार्फत मागविलेल्या निविदांपैकी अमरज्योत एन्टरप्रायझेस यांचे नोंदणी दाखल्यानुसार त्यांचे व्यवसायाचे स्वरुप ऑफीस असे नमूद केले आहे. तसेच सदरचे निविदाकार हे प्रिन्टर्स व सर्व प्रकारची स्टेशनरीचे पुरवठादार असल्याचे दिसून येते. असे असतांना अमरज्योत एन्टरप्रायझेस यांची निविदा ग्राहय धरण्यात आली व दरनिश्चीती करण्यात आली आहे. शासन निर्णय दिनांक 2 जानेवारी 1992 मधील तरतुदी नुसार निविदा मागविताना सदरचे पुरवठादार हे अग्निशमन साहित्याचे उत्पादक असल्याबाबत अट नमूद करणे आवश्यक असताना तसा उल्लेख करण्यात आला नाही.

8. अगिनशमन विभागाची दि.24.10.2010 ची प्रस्तावित केलेली टिपणी व पुरवठा आदेश क्रमांक उमपा/भा.वि/207/2011, दिनांक 12.12.2011 नुसार खरेदी केलेले साहित्य Co2Cartriage 60mm,

120mm, 180mm हे ISI मार्क असणे आवश्यक आहे. तसेच 35 फुट ॲल्युमिनियम लॅडर, ॲनलाईजहोज, शॉवेल, कंन्ट्रोल डीव्हायडींग ब्रीचींग कनेक्टींग ब्रीचींग, Co2 Fire Extingusher, DCP Co2 Type Cartirage Fire Extingusher etc.व इतर साहित्य हे ISI मार्क असणे आवश्यक आहे. शासन निर्णयातील तरतुदी नुसार सदर पुरवठादाराकडे सदर साहित्याचे उत्पादकास मिळालेली भारतीय मानक संस्थेची ग्राहय अनुज्ञप्तीची प्रत असणे आवश्यक आहे. तथापी वरील साहित्याचे निविदाधारकाकडून अशी अनुज्ञप्तीची प्रत घेण्यात आलेली नाही. त्यामुळे पुर्वाथाधार्काने पुरवठा केलेले साहित्य ISI MARK योग्य गुणवत्ता असल्याचे सिद्ध होत नाही.

9. निविदेतील अट क्रमांक 10 नुसार उत्पादकाकडून खरेदी केलेल्या मालाच्या मुळ चलनाच्या प्रती महापालिकेस सादर करणे बंधनकारक आहे. तथापी चलनाच्या प्रती नस्ती सोबत आढळून आल्या नाहीत. त्यामुळे पुरवठा करण्यात आलेले साहित्य हे उत्पादक कंपनी कडून खरेदी केल्याची खात्री होत नाही.

10. वरील साहित्य पुरवठा झाल्याबाबत पुरवठाधारकाकडील चलनाच्या प्रती नस्तीसोबत आढळून आल्या नाहीत त्यामुळे साहित्य प्राप्त झाल्याची खात्री देता येत नाही.

11. अग्निशमन विभागाने भांडारातून प्राप्त केलेल्या साहित्याची साठानोंदवही मध्ये मागील शिल्लक साठा व प्राप्त साठा याबाबतचा बाब निहाय तपशिल नमुद केलेला नाही त्यामुळे अग्निशमन विभागातपूर्वी चे शिल्लक साहित्य खरेदी केलेले नवीन साहित्य वापरलेले साहित्य वर्षा अखेर शिल्लक साहित्याचा ताळमेळ घेता आला नाही.

12. सदरचे साहित्य तांत्रिकदृष्टया वापरण्यास योग्य असल्याबाबत साहित्य स्वीकारतांना मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी तपासणी केल्याबाबतचे प्रमाणपत्र नस्ती सोबत आढळून आले नाही.

सदर अनियमितते बाबत विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 93, दि.20.01.2014 नुसार निर्गमित केले असता त्याबाबत अनुपालन प्राप्त झाले नाही.तरी सदर बाबीवर झालेल्या खर्चाची रक्कम रुपये 3164580/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATVCSM6501 (Ref No : 27, Hmm No : 93)

## *9 वृक्ष लागवड निधीमधील जमा रक्कमांची नोंदवही उपलब्ध करुन न दिल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*अनियमितता कलम : 9अ*

***नगररचना विभागामार्फत वसूल करण्यात आलेल्या वृक्ष लागवड निधी बाबतची नोंदवही व अभिलेखे लेखापरिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात आले नाहीत***

नगररचना विभागाकडील आदेश क्रं.35 दिनांक 3/2000, वृक्ष प्राधिकरणाचा दिनांक 7.11.1999 चा ठराव क्रमांक 63 नुसार बांधकामाचे प्रारंभ प्रमाणपत्र देण्यापूर्वी विहीत दरानुसार अनामत ठेव घेवून वृक्ष निधीमध्ये जमा करणे आवश्यक आहे. जागा मालकाने विहीत संख्येप्रमाणे झाडांची लागवड केल्याबाबत महानगरपालिकेतील वृक्ष प्राधिकरणाची खात्री झाल्यानंतर सदरच्या ठेवी च्या रक्कमा परत केल्या जातात. अनामत ठेवीच्या रक्कमा परत मिळण्यासाठी पूर्णत्वाचा दाखला दिल्यापासून जास्तीत जास्त दिड वर्षापर्यन्त भोगवटादारास अर्ज सादर करणे आवश्यक आहे. विहीत कालावधीत अर्जदाराकडून रक्कम परत मिळण्याबाबत अर्ज न आल्यास सदरच्या ठेवी जप्त करणे आवश्यक आहे. अशा ठेवी ठेवणे व परत करणे यासाठी स्वतंत्र खाते असणे आवश्यक आहे.

उल्हासनगर येथील वृक्ष लागवड ठेवीबाबतच्या अभिलेख्यांचे लेखापरिक्षण केले असता, मनपाने वृक्ष निधीमध्ये जमा होणा-या रक्कमा व परत केलेल्या रक्कमांची स्वतंत्र नोंदवही ठेवलेली नाही. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 176 दि.13.02.2014 अन्वये विभागाकडून खालील माहिती मागविली असता, लेखापरिक्षणाचे अंतीम दिनांकापर्यन्त नगररचना विभागाकडून माहिती उपलब्ध झाली नाही.

1. 2011-12 मध्ये वसूल केलेल्या वृक्ष लागवड ठेवी व परत केलेल्या ठेवींच्या रक्कमा तसेच ठेवीबाबतची नोंदवही.

2. तीन वर्षाच्या कालावधीत ठेवी परत मिळण्यासाठी अर्ज न केलेल्या ठेवीदारांच्या किती ठेवी जप्त केल्या व किती रक्कम जप्त केली याबाबतची माहिती.

3. जप्त न केलेल्या ठेवीबाबत ची कारणे

4. सदरच्या ठेवी ठेवण्यासाठी व परत करण्यासाठी विभागाने ठेवलेले ठेवखात्याचे अदययावत केलेल्या पासबुकाची छायांकित प्रत.

DATVCSM6501 (Ref No : 33, Hmm No : 176)

## *10 आरोग्य विभागाकडील अभिलेख उपलब्ध करुन न दिल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :P6172520 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***आरोग्य विभागाकडील औषधे व रसायने खरेदी, कुटुंब नियोजन कार्यक्रम खर्च, वेडे व कुष्ठरोगी कल्याणकारी कार्यक्रम, अपंग व्यक्तिसाठी कल्याणकारी योजना याबाबीवर झालेल्या खर्चाच्या नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आल्या नाहीत.***

**उल्हासनगर महानगरपालिकेतील आरोग्य विभागाकडील खालील खर्चाच्या नस्ती लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाही.**

1.**औषधे व रसायने खरेदी खर्च रु.**1000

2.**कुटुंब नियोजन कार्यक्रम खर्च रु.**166000

3.**वेडे व कुष्ठरोगी कल्याणकारी कार्यक्रम खर्च रु.**1004000

4.**अपंग व्यक्तिसाठी कल्याणकारी योजना खर्च रु.**937000

**उपरोक्त खर्चाच्या नस्ती अर्धसमास पत्र क्रमांक 91, दि.20.01.2014 नुसार मागणी केली असता लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाहीत.त्यामुळे याबाबीवर झालेल्या खर्चाचे लेखापरीक्षण करणे शक्य झालेले नाही.**

DVESMBM7301 (Ref No : 44, Hmm No : 91)

## *11 अरुणकुमार वैद्य सभागृह, टाऊन हॉल व तरण तलावाच्या भाडयाच्या रकमेवरील व्याज व सेवाकराची रक्क्म वसुल करणेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*अनियमितता कलम : 9अ*

वसूलपात्र रक्कम रु. 241721.00/-

***अरुणकुमार वैद्य सभागृह टाऊन हॉल व तरण तलावाच्या भाडयाच्या रकमेवरील सेवाकर व व्याजाची रक्क्म उल्हासनगर महानगरपालिकेने वसुल न केल्यामुळे महानगरपालिकेचे रुपये 2,41,721/- चे आर्थिक नुकसान झाले आहे.***

उल्हासनगर महानगरपालिकेने कार्यादेश क्रमांक : उमपा/मालमत्ता/39/2002, दिनांक 20.08.2002 अन्वये अरुणकुमार वैद्य सभागृह टाऊन हॉलचे नुतनीकरण करुन बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर 30 वर्षाच्या कालावधीकरीता श्री. कुमार पी चेनानी, उल्हासनगर यांना

देण्यात आलेले आहे. महानगरपालिकेने केलेल्या अटी व शर्तीनुसार वित्तीय वर्षाचे पहिल्या दिवशी म्हणजेच 1 एप्रिल रोजी वार्षिक भाडे अदा करावयाचे आहे. 2011-2012 या वर्षाचे वार्षिक भाडे रुपये 3,30,000/- असुन दिनांक 23.03.2011 रोजी पावतीपुस्तक क्रमांक : 72/007160 अन्वये रुपये 3,30,000/- (रुपये तीन लाख तीस हजार फक्त) प्राप्त् झाले आहे. परंतु सदर भाडयाच्या रकमेवर रुपये 33,990/- इतका सेवाकर वसुल करण्यात आलेला नाही.

Finance Act 1994, Section 75 अन्वये भाडयाच्या रकमेवर 10.30% दराने सेवाकर वसुल करणे आवश्यक होते. तसेच शासन अधिसुचना क्रमांक 14/0211 सेवाकर, दिनांक 01.03.2011 अन्वये दिनांक 01.04.2011 पासुन सेवाकर न भरल्यास त्यावर व्याज 18% द.सा.द.शे. दराने वसुल करणे आवश्यक आहे. त्यामुळे रुपये 3,30,000/- या रकमेवर 10.30% दराने रुपये 33,990/- अधिक थकीत सेवाकराच्या रक्क्मेवर लेखापरीक्षणाच्या दिनांकापर्यंतचे व्याज 18% द.सा.द.शे. दराने रुपये 17,844/- असे एकूण रुपये 51,834/- वसुल करुन शासन जमा करण्यात यावे.

( रुपये 51,834/- वसुलपात्र )

उल्हासनगर महानगरपालिकेने कार्यादेश क्रमांक : उमपा/मालमत्ता/91/63, दिनांक 25.09.2003 अन्वये तरण तलावाचे नुतनीकरण करुन बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर 10 वर्षाच्या कालावधीकरीता जय अंबे कंस्ट्रकशन्स् कंपनी यांना देण्यात आलेले आहे. 2011-2012 या वर्षाचे वार्षिक भाडे रुपये रुपये 5,49,999/- (रुपये पाच लाख एकोणपन्नास हजार नऊशे नव्यण्व फक्त) असुन दिनांक 31.03.2011 रोजी पावतीपुस्तक क्रमांक : 72/007165 अन्वये रुपये 2,49,999/- व दिनांक 02.02.2013 रोजी पावतीपुस्तक क्रमांक : 1442/144129 अन्वये रुपये 3,00,000/- प्राप्त् झाले आहे.

भाडयाच्या करारनाम्यातील अटी व शर्तीतील अट क्रमांक : 8 एफ(i) अन्वये तरण तलावाचे वार्षिक भाडे वर्षाच्या सुरुवातीच्या दिनांकास अदा करण्याबाबत नमुद असुन जय अंबे कंस्ट्रकशन्स् कंपनीने रुपये 3,00,000/- दिनांक 02.02.2013 रोजी अदा केल्याने अटी व शर्तीतील अट क्रमांक : 8 एफ(ii) अन्वये सदर रकमेवर वर्षाच्या सुरुवातीच्या दिनांकापासुन 18% द.सा.द.शे. या दराने व्याज वसुल करणे आवश्यक आहे. त्यानुसार लेखापरीक्षणाच्या दिनांकापर्यंत होणा-या व्याजाची रक्क्म रुपये 1,03,500/- वसुल करणे आवश्यक आहे.

( रुपये 1,03,500/- वसुलपात्र )

तसेच तरण तलावाच्या भाडयाच्या रकमेवर सेवाकर आकारण्यात आलेना नाही. Finance Act 1994, Section 75 अन्वये भाडयाच्या रकमेवर 10.30% दराने सेवाकर वसुल करणे आवश्यक होते. तसेच शासन अधिसुचना क्रमांक 14/0211 सेवाकर, दिनांक 01.03.2011 अन्वये दिनांक 01.04.2011 पासुन सेवाकर न भरल्यास त्यावर व्याज 18% द.सा.द.शे. दराने वसुल करणे आवश्यक आहे. त्यामुळे रुपये 5,49,999/- या रकमेवर 10.30% दराने रुपये 56,650/- अधिक सेवाकराच्या थकीत रक्क्मेवर लेखापरीक्षणाच्या दिनांकापर्यंतचे व्याज 18% द.सा.द.शे. दराने रुपये 29,737/- असे एकूण रुपये 86,387/- वसुल करुन शासन जमा करण्यात यावे.

( रुपये 86,387/- वसुलपात्र )

उपरोक्त् बाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक : 196, दिनांक 17.02.2014 रोजी निर्गमित करण्यात आले असुन लेखापरीक्षण पथकास अनुपालन सादर करण्यात आलेले नाही. सबब उक्त् नमुद रककम वसुलपात्र आहे.

(एकूण वसुलपात्र रक्कम रुपये 2,41,721/-)

DMASGDM7201 (Ref No : 64, Hmm No : 196)

## *12 अरुणकुमार वैद्य सभागृह (टाऊन हॉल) व तरण तलाव या भाडयाने दिलेल्या मालमत्तेवर मालमत्ता कराची रक्कम वसुल करणेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*अनियमितता कलम : 9अ*

***अरुणकुमार वैद्य सभागृह (टाऊन हॉल) व तरण तलाव या भाडयाने दिलेल्या मालमत्तेची करनिर्धारणा केली नसल्यामुळे मालमत्ता कराची रक्कम संबंधीतांकडून वसुल न केल्याने उल्हासनगर महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.***

उल्हासनगर महानगरपालिकेने कार्यादेश क्रमांक : उमपा/मालमत्ता/39/2002, दिनांक 20.08.2002 अन्वये अरुणकुमार वैद्य सभागृहाचे (टाऊन हॉल) नुतनीकरण करुन बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर 30 वर्षाच्या कालावधीकरीता श्री. कुमार पी चेनानी, उल्हासनगर यांना देण्यात आलेले आहे. तसेच कार्यादेश क्रमांक : उमपा/मालमत्ता/91/63, दिनांक 25.09.2003 अन्वये तरण तलावाचे नुतनीकरण करुन बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर 10 वर्षाच्या कालावधीकरीता जय अंबे कंस्ट्रकशन्स् कंपनी यांना देण्यात आलेले आहे.

1) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 139 (1)(अ) नुसार जागा प्रत्यक्ष (शासनाकडून) किंवा महानगरपालिकेकडून धारण केली असल्यास मालमत्ता कराची रक्कम प्रत्यक्ष भोगवटादाराकडून वसुल करण्याबाबत तरतुद आहे. परंतु टाऊन हॉल तसेच तरण तलावाच्या मालमत्तेची करनिर्धारणा करण्यात आली नसल्यामुळे मालमत्ता कराची रक्कम भोगवटादाराकडून वसुल न केल्याचे निदर्शनास आले आहे.
2) अरुणकुमार वैद्य सभागृह (टाऊन हॉल) माहे सप्टेंबर, 2006 पासुन 30 वर्षाच्या

कालावधीकरीता बांधा, वापरा व हस्तांरित करा या तत्वावर देण्यात आला असुन सदर जागा 1906.98 चौ.मी. आहे.  तसेच तरण तलाव माहे डिसेंबर, 2002 पासुन 10 वर्षाच्या कालावधीकरीता बांधा, वापरा व हस्तांरित करा या तत्वावर देण्यात आली असुन सदर जागा 2227.2 चौ.मी. असल्याने सदर मालमत्तेची करनिर्धारणा करुन वाणिज्यिक दराने मालमत्ता कराची दंडात्मक कारवाईसह रक्कम भोगवटादाराकडून वसुल करणे आवश्यक आहे.

उपरोक्त् बाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक : 197, दिनांक 17.02.2014 रोजी निर्गमित करण्यात आले असुन लेखापरीक्षण पथकास अनुपालन सादर करण्यात आलेले नाही.

DMASGDM7201 (Ref No : 65, Hmm No : 197)

## *13 कर आकारणी नोंदवही न ठेवल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***उल्हासनगर महानगरपालिकेने कर आकारणी नोंदवही लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन न दिल्यामुळे महानगरपालिकेच्या हद्दितील एकूण मालमत्ता व त्याचे करयोग्य मुल्य तसेच वसुल केलेला कर याबाबतचे लेखापरीक्षण करता आले नाही.***

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण-8, नियम 9 नुसार महानगरपालिकेने स्थायी समितीच्या मान्यतेने विहित नमुन्यात मालमत्ता कराची आकारणी पुस्तके ठेवली पाहिजेत.  सदर मालमत्ता पुस्तकात खालील बाबींचा समावेश असणे आवश्यक आहे.

1) शहरातील सर्व इमारतींची व जमिनींची यादी.

2) प्रत्येक इमारतीचे व जमिनीचे करयोग्य् मुल्य्.

3) प्रत्येक इमारतीवर / जमिनीवर बसविण्यायोग्य् असलेला मालमत्ता कर व कर देण्यास प्रथकत: जबाबदार असलेल्या व्यक्तीचे नांव.

4) अशी इमारत संपूर्णत: किंवा तिच्या काही भागाकरीता सुट दिली असल्यास त्याबाबतची कारणे.

5) कलम 134, 135 अन्वये कोणत्याही इमारतीस / जमिनीस पुरविलेल्या पाण्याबद्दल मोजणी करुन आकार बसविण्यात आला असेल तर अशा पाणीपट्टीची रक्कम.

कर आकारणी मागणी नोंदवहीत वरील माहिती समाविष्ट असणे आवश्यक आहे.  सदरची

मागणी पुस्तके प्रभागनिहाय स्वतंत्र ठेवुन सर्वांचे मिळुन एक आकारणी पुस्तक ठेवण्यात यावे.

नियम क्रमांक 14 नुसार सदरचे आकारणी पुस्तक जागेचा मालक, भोगवटादार किंवा भोगवटादाराच्या अभिकर्त्यास पहाण्यासाठी खुले ठेवणे आवश्यक आहे. कर विभागाकडे अर्धसमास ज्ञापन क्रमांक : 195, दिनांक 17.02.2014 अन्वये कर आकारणी पुस्तकाची मागणी केली असता आकारणी पुस्तक लेखापरीक्षणाच्या अंतिम तारखेपर्यंत उपलब्ध् करुन दिले नाही . त्यामुळे महानगरपालिका हद्दीतील एकूण मालमत्ता, त्यांचे भोगवटादार व त्या मालमत्तेचे करयोग्य् मुल्य्, वसुल केलेला कर इत्यादींचे लेखापरीक्षण करता आले नाही.

उपरोक्त् बाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक : 195, दिनांक 17.02.2014 रोजी निर्गमित करण्यात आले असुन लेखापरीक्षण पथकास अनुपालन सादर करण्यात आलेले नाही.

DMASGDM7201 (Ref No : 70, Hmm No : 195)

## *14 मजूर कामगार सहकारी संस्था यांना वाटप केलेल्या कामांबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :124-4300 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***मजूर कामगार सहकारी संस्थांना प्राकलन दराने काम न देता 10% जादा दराने प्रदान केलेबाबत.***

उल्हासनगर मनपाने 2011-2012 या वित्तीय वर्षामध्ये उपनिबंधक (जिल्हा) यांच्या वाटप समितीने वाटप केलेल्या मजूर कामगार सहकारी संस्था यांना रस्ते दुरूस्ती नाला कलव्हर्ट ड्रेनेज बांधकामे इत्यादी कामाबाबत कामाचे कार्यादेश देऊन कामे केलेली असल्याचे प्राप्त माहिती वरून निदर्शनास आले. याबाबत निवडक एकूण 17 नस्ती यांची छाननी केली असता बहूतांश मजूर कामगार सहकारी संस्थांना प्राक्कलन दराने कामाचे प्रदान न करता मोजमाप नोंदवहितील मोजमापानुसार सरसकट 10 % जादा दराने प्रदान करण्यात आल्याचे लेखा परीक्षणात निदर्शनास आले. याबाबत जिल्हा उपनिबंधक यांचे शिफारशीनुसार अशा संस्थांना शासकिय दरानेच (जिल्हा दर सुचीनुसार) कामाचे प्रदान करावयाचे असतांना 10 % जादा दराची संबंधितांना मान्यता असल्याचे नमूद करून अशा सर्व मजूर कामगार सहकारी संस्थांना कामाचे प्रदान करणेत झालेले आहे. अशाप्रकारे जादा प्रदान (10 % प्रमाणे) करणेबाबतची प्राधिकार कोणते आहेत ते लेखा परीक्षणास दाखवावे. अन्यथा 2011-2012 मध्ये प्राक्कलन दराच्या 10 % एवढ्या जादा दराने अदा केलेली सर्व मजूर कामगार संस्थांना अदा केलेली रक्कम संबंधितांकडून वसूल करून तसे अनुपालन लेखा परीक्षणास दाखवावे. याबाबत 2011-2012 मध्ये मजूर

कामगार संस्थांना अदा केलेल्या रक्कमांबाबत माहिती अर्धसमास पत्र क्र. 192 दि. 17.02.2014 अन्वये मागविणेत आली होती. परंतु अर्धसमासाचे अनुपालन प्राप्त झाले नाही.

DATNDMM5801 (Ref No : 80, Hmm No : 192)

# कलम ९ ब खालील आक्षेप

## *15 सेवानिवृत्ती लाभातील अतिप्रदान रु.161753*

**निवृत्ती वेतन फंड**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :462-2151 म.न.पां. निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 161753.00/-

***2011-2012 या आर्थिक वर्षात सेवानिवृत्त झालेल्या आठ प्रकरणात अतिप्रदान झाल्याचे दिसून आले.***

2011-12 मध्ये सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांच्या निवडक देयकांची तपासणी केली असता खाली दर्शविल्या प्रमाणे अतिप्रदान झाल्याचे दिसून आले. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्रमाण क्रमांक व दिनांक | सेवानिवृत्त कर्मचा-याचे नाव | पदनाम | मागणीचा तपशिल | देय रक्कम | दिलेली रक्कम | फरक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 59/19.09. 2011 | सुभाष चिंतागण मोकाळे | मिस्त्री | सेवा उपदान | 118440 | 119640 | 1200 | अर्हता काला 11 वर्ष आवश्यक. |
| 2 | 61/20.09 2011 | अर्जुन के धरमपाल | लिपीक | सेवा उपदान | 75200 | -- | 75200 | कार्यालयीलन आदेश क्र 273, दि.04.05.20 अन्वये उपदान देण्यांचे साम प्रशासन विभागाचे अ असतांना रव अदा करण आली. उपर |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | आदेशाची प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध केली नाही. सेवापुस्तकात देखील तशी नोंद असताना ति चुकीची असल्याचे अनुपालनात नमूद केले आहे. सदर विसंगतीचा खुलासा केलेला नाही. |
| 3 | 38/16.07.2011 | सुदाम सदाशिव नन्नावरे | बिल सर्व्हेअर | सेवा उपदान | 139965 | 148995 | 9030 | |
| 4 | 48/17.08.201 | भिमसेन अेस. निकम | फायरमन | सेवा उपदान अंशराशीकरण | 182542, 181317 | 197335, 195968 | 14793, 14651 | दिनांक 01.01.96 रोजी 4390 वेतन देय असताना 4475 आणि दिनांक 01.01.2006 9280+2000 ग्रेड वेतन असे वेतन आवश्यक असतांना तसेच सेवानिवृत्तीच्या वेळी 9970+2000 ग्रेड वेतन ऐवजी 10940+2000 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | या वेतनावर निवृत्ती वेतनाचे लाभ दिल्याने अतिप्रदान |
| 5 | 52/20.08. 2011 | आनंदराव शंकर जाधव | मजदूर | सेवा उपदान | 72010 | 90960 | 18950 | 9.5 वर्ष अर्हताकरी सेवा झाल्याने त्य प्रमाणात मृत्यू-नि-सेवाउपदान देय. |
| 6 | 8/ 25.04. 2011 | व्हि.टी. पगारे | फायरमन | सेवा उपदान अंशराशीकरण | 203288 , 209442 | 205888 , 212054 | 2600 , 2612 | सेवानिवृत्तीचे लाभ 10510+2000 ग्रेड वेतन या प्रमाणे आवश्यक असतांना रु.10670+2000 याप्रमाणे देण्यांत आले. |
| 7 | 19/27.05. 2011 | हरदास सितलानी | | सेवा उपदान अंशराशीकरण | 142928 , 141986 | 147353 , 143657 | 4425 , 1671 | 7790+1900 या ग्रेड वेतनाऐवजी 8890+1900 या प्रमाणे निवृत्तीवेतन लाभ देण्यांत आले. |
| 8 | 28/13.06. 2011 | वसंत सुपडू खेडेकर | गवंडी | सेवा उपदान अंशराशीकरण | 143500 , 230638 | 149875 , 240884 | 6375 , 10246 | |

. या बाबत अर्ध समास ज्ञापन क्रमांक 28 दिनांक 20/11/2013 अन्वये विचारणा करण्यात आली होती. त्यास संबंधित विभागाने दिनांक 23-12-2013 अन्वये उत्तर सदर केले असून त्याचे तपासणी केली असता सुभाष चिंतागण मोकाळे मिस्त्री यांचा अर्हता कालावधी 11 वर्ष घेणे आवश्यक होते, मात्र तो 12 वर्ष घेतल्याने

अतिप्रदान झाले आहे. अर्जुन के धरमपाल लिपिक यांना सेवाउपदान देण्यात येवू नये असे आस्थापना विभागाचे आदेश असताना देखील सेवा उपदान अदा करण्यात आले. सेवापुस्तकात देखील सदरील नोंद असताना उपरोक्त नोंद चुकीची असल्याचे वाटते असे उत्तरात नमूद केलेले आहे. सदर विसंगती बाबत कोणताही खुलासा म.न.पां.ने केलेला नाही. इतर प्रकरणात प्रत्येक प्रकरणी शेरा या रकान्यात दर्शविल्या प्रमाणे कार्यवाही न केल्याने अनुपालन स्वीकारता येत नाही.
आक्षेपाधीन रक्कम रु. 161753

DATDBWM5801 (Ref No : 130, Hmm No : 28)

### *16 भ.नि.नि. लेख्यातील त्रुटी आणि संकीर्ण अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :482-2155 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

***भविष्य निर्वाह निधीमधून तात्पुरते आणि ना परतावा अग्रिम मंजूर करताना त्यामध्ये त्रुटी असल्याचे आढळून आले. सेवा निवृत्ती नंतर काही प्रकरणात वेतन काढण्यात आल्याचे दिसून आले.तसेच सेवानिवृत्ती पर्यंत व भ.नि.नि. वर्गणी वसुल करण्यात येत असल्याचे दिसून आले.***

महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 नियम क्रमांक 13 (3) अन्वये एकदा अग्रिम दिल्यानंतर 12 महिने झाल्याशिवाय किवा घेतलेल्या अग्रीमाचा शेवटचा हप्ता वसुल झाल्या शिवाय दुसरे अग्रिम देय नाही. तथापि खालील प्रकरणी एक वर्षात अनेक वेळा अग्रिम देण्यात आल्याचे दिसून आले.

1 श्री मोहन झामनानी शिपाई यांना 2011-2012 मध्ये खालील प्रमाणे अग्रिम देण्यात आला.

| अ.क्र. | महिना/वर्ष | अग्रिम रक्कम (रु.) |
|---|---|---|
| 1 | एप्रिल 2011 | 3500 |
| 2. | जुलै 2011 | 5000 |
| 3. | सप्टेंबर 2011 | 19250 |
| 4. | मार्च 2012 | 22000 |

2. श्री रमेश मानवानी यांना 2011-2012मध्ये अनेक वेळा अग्रिम देण्यात आला. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | महिना/वर्ष | अग्रिम रक्कम (रु.) |
|---|---|---|
| 1 | एप्रिल 2011 | 6400 |
| 2 | जुलै 2011 | 10200 |
| 3 | सप्टेंबर 2011 | 7300 |
| 4 | नोव्हेंबर 2011 | 5550 |
| 5 | जानेवारी2012 | 5410 |

वरील कर्मचा-यांव्यतिरिक्त श्री भगवान मोरे भ.नि.नि.लेखा क्रमांक 1633 तसेच लक्ष्मी मणिलाल आणि इतर कर्मच्यारयाना एका वर्षात एका पेक्षा अनेक वेळा अग्रिम देण्यात आलेला आहे. उल्हासनगर महानगरपालिकेची सदरील कार्यवाही वर नमूद केलेल्या नियमाच्या विरूद्ध आहे. सबब एकदा अग्रिम दिल्या नंतर 12 महिने झाल्याशिवाय आणि पूर्वी दिलेल्या अग्रीमाची पूर्ण फेड झाल्याशिवाय दुसरा अग्रिम देय नाही.

3. शासन निर्णय क्रमांक 1185प्र.52 /तेरा अ दिनांक 28/5/86 परीच्छेद क्रमांक 3(2 ) अन्वये सेवानिवृत्ती पूर्वीच्या तीन महिन्यात भ.नि.नि वर्गणी वसुल न करणे बंधन कारक आहे मात्र अशा प्रकारे कार्यवाही उल्हासनगर म.न.पां.मध्ये होत नसल्याचे दिसून आले उदा. मुक्ता संकपाळ पी.एफ. क्रमांक 837

4. एच,के.भालकर पी.एफ.क्रमांक 1323 दिनांक 30-11-2011 रोजी सेवानिवृत्त झाले परंतु भ.नि.नि वर्गणी डिसेंबर 2011 ते फेब्रुवारी 2012 पर्यंत वसुल करण्यात आली. सेवानिवृतीनंतर वर्गणी कशा प्रकारे वसुल करण्यात आली आणि डिसेंबर 2011 ते फेब्रुवारी 2012 चे वेतन कशा प्रकारे आहरण केले या बाबत कोणतीही माहिती देण्यात आली नाही.

5. भ.नि.नि. बृहतपत्रकानुसार उल्हासनगर म.न.पां.ची भ.नि.नि. लेख्यातील शिल्लक रु. 180562751 आहे. मात्र रोख पुस्तकानुसार शिल्लक रु. 172944710 आहे. दोन्ही शिल्लक रकमेत रु. 7618041 ची तफावत आहे. सदर तफावत साठी आवश्यक ति तरतूद न करण्याचे स्पष्टीकरण लेखापरीक्षणास देण्यात आले नाही.

या बाबत संबंधित विभागास अर्ध समास ज्ञापन क्रमांक 32 दिनांक 19-11-2013 अन्वये विचारणा करण्यात आली होती .विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.

DATDBWM5801 (Ref No : 140, Hmm No : 32)

## *17 कुटुंब निवृत्ती वेतनातील अतिप्रदाना बाबत.*

**निवृत्ती वेतन फंड**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :462-2151 म.न.पां.निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 691373.00/-

***अनुकंपा तत्वावर वारसदारांना नियुक्त केल्यानंतर कुटुंब निवृतीवेताना सह महागाई वेतन अदा केल्याने पाच कुटुंबनिवृत्तीवेतन प्रकरणात रु.691373 अतिप्रदान झालेले आहे.***

काही निवडक निवृत्तीवेतन प्रकरणांची तपासणी केली असता त्याबाबत लेखापरीक्षणाचे खालील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

1. मयत कर्मचारी श्री.किसन छगन उमाप निवृत्ती वेतन लेखा क्रमांक A- 1485 यांच्या ठिकाणी त्यांची पत्नी श्रीमती ललित के उमाप यांना दिनांक 23.09.2011 पासून उल्हासनगर म.न.पा.मध्ये सेवेत रुजु करुन घेण्यांत आलेले आहे. तथापी त्यांना नोव्हेंबर-2013 पर्यंत कुटुंब निवृत्तीवेतनासह महागाई भत्ता अदा करण्यांत येत असल्याचे दिसून आले. सेवेत नियुक्त केल्यानंतर त्यांचा महागाई भत्ता कमी करणे आवश्यक होते. मात्र तो न केल्याने त्यांना रुपये 69717 चे अती प्रदान झालेले आहे. सदर रकमेची वसुली करणे आवश्यक आहे.

2. मयत कर्मचारी श्री. नानासाहेब देविदास यांची पत्नी श्रीमती शितल नानासाहेब यांना म.न.पा.सेवेत दिनांक 23.09.2011 पासून नियुक्त करण्यांत आलेले आहे. तरी देखिल त्यांना नोव्हेंबर 2013 पर्यंत कुटुंब निवृत्ती वेतनावर महागाई भत्ता अदा करण्यांत येत असल्याने त्यांना आता पर्यंत रुपये 77228 चे अतिप्रदान झालेले असून त्याची वसुली होणे आवश्यक आहे.

3. श्रीमती रुक्मिणी बी.कांबळे यांचा दिनांक 24.11.2008 रोजी मृत्यू झाला असल्याचे वैदयकिय विभागाने दिलेल्या माहितीवरुन दिसून आले. मात्र त्यांना रुपये 2882 दरमहा या प्रमाणे कुटुंब निवृत्ती वेतन अदा करण्यांत येत असल्याचे दिसून आले, परिणामी त्यांना नोव्हेंबर-2013 पर्यंत रुपये 1,73,596 अदा झाल्याचे दिसून येते. वैदयकिय विभागाने दिलेल्या माहितीनुसार जर त्यांचा मृत्यू दिनांक 24.11.2008 रोजी झालेला होता, तर सदरील निवृत्तीवेतनाची रक्कम कोणास अदा करण्यांत येत होती याबाबत माहिती लेखापरिक्षणस देण्यांत आली नाही..

4. कै.ब्रिजपाल चावला टाक निवृत्ती वेतन लेखा क्रमांक A- 1272 यांचे कुटुंब निवृत्ती वेतन त्यांची पत्नी राजवती ब्रिजपाल टाक यांना देण्यांत येते मात्र त्यांना दिनांक 05.11.2009 पासून म.न.पा.सेवेत नियुक्त केल्याचे दिसून आले. तथापि त्यांना नोव्हेंबर-2013 पर्यंत महागाई भत्ता अदा करण्यांत येत आहे. यामध्ये

उल्हासनगर महानगरपालिकेने रुपये 1,10,000 चे अतिप्रदान केलेले आहे. सदर रक्कमची वसुली करणे आवश्यक आहे.

5. कै.मोहन सुर्यवंशी यांच्या ठिकाणी माया मोहन सुर्यवंशी यांना दिनांक 18.04.2000 पासून अनुकंपा तत्वावर म.न.पा. सेवेत नियुक्त करण्यांत आले. उपलब्ध अभिलेख्यावरुन मोहन सुर्यवंशी यांना निवृत्ती वेतन देण्यांत येत असल्याचे दिसून आले. सबब त्यांचे नोव्हेंबर-2011 मध्ये प्राप्त केलेले हयातीचे प्रमाणपत्र लेखापरिक्षणास सादर केले नाही. तसेच श्रीमती माया मोहन सुर्यवंशी यांना दिनांक 18.04.2004 पासून म.न.पा.सेवेत नियुक्त केल्याचे आस्थापना विभागाने दिलेल्या माहिती वरून दिसून आले. त्यांना कुटुंब निवृत्ती वेतनावर महागाई भत्ता नियुक्तीच्या तारखेपासून देय व अनुज्ञेय नाही. मात्र त्यांना कुटुंब निवृत्ती वेतनावर महागाई भत्ता अदा केल्याने रुपये 2,60,832 चे अतिप्रदान झालेले दिसून येते. याबाबत पूर्ण परिगणणा करुन वसुलीची रक्कम संबंधींकडून वसुल करणे आवश्यक आहे. या बाबत संबंधित विभागास अर्ध समास ज्ञापन क्रमांक 29 दिनांक 20-11-2013 अन्वये विचारणा करण्यात आली होती. विभागाने त्यांचे पत्र क्रमांक 390 दिनांक 13/12/2013 अन्वये उत्तर दिले असून श्रीमती उमप, श्रीमती कांबळे ,श्रीमती टाक यांची वसुली करण्यात येईल असे कळविले आहे. श्रीमती सूर्यवंशी यांना नोव्हेंबर 2000 पासून म.न.पां.सेवेत घेतले नसल्याचे त्यांनी दिलेल्या माहितीमध्ये नमूद केले आहे. मात्र आस्थापना विभागाने श्रीमती सूर्यवंशी यांना दिनांक 18/04/2000 पासून अनुकंपा तत्वावर नियुक्त केल्याची माहिती दिली आहे. त्यामुळे आस्थापना आणि लेखा विभागाच्या माहिती मध्ये तफावत आढळून येते. हयातीचा दाखला देखील लेखा विभागाने सादर केलेला नाही आस्थापना आणि लेखा विभागाच्या माहितीमध्ये तफावत असल्याने अनुपालन स्विकारता येत नाही.

वसुलपात्र रक्कम रु. 691373

DATDBWM5801 (Ref No : 141, Hmm No : 29)

## *18 वेगवेगळया गुंतवणुकीमधून कमी प्राप्त झालेल्या व्याजा बाबत*

**गुंतवणुकीवरील व्याज**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :411-1710 म.न.पां. निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***लेखा विभागातील वेगवेगळ्या गुंतवणुकीचे लेखापरीक्षण केले असता 2011-2012 मध्ये प्राप्त झालेल्या उच्च व्याज दरा ऐवजी कमी व्याजाच्या दराने गुंतवणूक केल्याचे दिसून आले.***

***निवृत्तीवेतन,भ. नि. नि, जे. एन. एन. यु. आर. एम., घसारा निधी मधील रकमाची गुंतवणूक वेगवेगळ्या बँकामध्ये***

***फिक्स ठेवी मध्ये उल्हासनगर म.न.पां.ने.केली होती. वेगवेगळ्या ठेवीवर 6.25 ते 9.75 या दराने व्याज प्राप्त झाल्याचे दिसून आले. 2011-2012 मध्ये ओरीएनटल बँकेच्या गुंतवणुकीचा दर 9.75% प्राप्त झाला असल्याचे सदर बँकेच्या गुंतवणूक प्रमाणपत्र वरून दिसून आले. त्याप्रमाणे जुन्या गुंतवणुका सुधारित करणे आवश्यक आहे.***

लेखा विभागातील वेगवेगळ्या गुंतवणुकीचे लेखापरीक्षण केले असता अर्ध समास ज्ञापन क्रमांक 27 दिनांक 19-11-2013 अन्वये निवृत्तीवेतन निधी,वेतन राखीव निधी,घसारा निधी,सिंकिग फंड आणि भविष्य निर्वाह निधी यांच्या ऐकून 52 गुंतवणुकी बाबत कमी व्याजाच्या दराने गुंतवणूक केल्याबाबत उल्हासनगर महानगरपालिकेस विचारणा करण्यात आली होती. म.न.पां.ने या बाबत दोन पत्रान्वये ( दिनांक 23-01-204 आणि दिनांक 26-02-2014) खुलासा सादर केलेला असून त्यामध्ये मूळ अर्ध समासात नमूद केलेल्या 9 गुंतवणुका सन 2010,2011 मध्ये मुदत पूर्ण करीत असल्याने सदरील गुंतवणुका सुधारित करता येणार नसल्याचे नमूद केलेले आहे. सदर अनुपालन मान्य करण्यात येत आहे. शिवाय म.न.पां.च्या दिनांक 26-02-2014 च्या अतिरिक्त खुलाश्या मध्ये मुदतपूर्व गुंतवणुकाचे रोखीकरण केल्यास 1% रक्कम दंड म्हणून संबंधित बँकेकडून वसुल करण्यात येत असल्याने मूळ अर्ध समासात नमूद असलेल्या ज्या गुंतवणुकावर 8.75 किवा जादा व्याज प्राप्त झाले असेल तर अश्या गुंतवणुका देखील सुधारित करावयास गेल्यास त्यात लाभ होण्याची शक्यता नसल्याचे म्हटलेले आहे. सदर खुलासा देखील योग्य व संयुक्तिक असल्याने मूळ अर्ध समासातील अश्या प्रकारच्या 19 गुंतवणुका सुधारित करणे योग्य ठरणार नाही. मात्र उर्वरित गुंतवणुका सुधारित करणे आवश्यक वाटते. उदाहरणादाखल दिनांक 15-07-2010 रोजी म.न.पां.ने आय.डी.बि.आय. बँकेत रु 7300000/-रक्कम 7.50% या दराने गुंतविली होती. 2011-2012 मध्ये ती सुधारित केली असती तर 1 वर्ष पूर्ण होत असल्याने 1% दंडाची रक्कम विचारात घेउंन सुद्धा सन 2011-2012 मध्ये 9.75 % व्याजाचा दर प्राप्त झालेला असल्याने 9.75 - 7.50 =2.25 - 1% ( दंड)=1.25 लाभ झाला असता. सबब अश्या प्रकारच्या गुंतवणुकाचे विवरण खालील प्रमाणे देण्यात येत आहे..

| **अ.क्र.** | **बँकेचे नाव** | **गुंतवणुकीची तारीख** | **व्याजाचा दर** | **मुदत संपल्याची तारीख** | **गुंतवलेली रक्कम** | **व्याजाची रक्कम एक वर्षाची** | **उच्च व्याजाचा दर 9.75% =.** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. निवृत्ती वेतन निधी - | | | | | | | |
| 1 | आई.डी.बी.आय . | 15.7.2010 | 7.50 | 15.7.2013 | 7300000 | 547500 | 9.75 |
| 2. | आई.डी.बी.आय . | 15.7.2010 | 7.50 | 15.7.2010 | 7300000 | 547500 | 9.75 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2. वेतन राखीव निधी - | | | | | | | | |
| 1. | आई.डी.बी.आय . | 5.6.2010 | 7.50 | 9.6.2013 | 2500000 | 187500 | 9.75 | 243750 |
| 3. घसारा निधी - | | | | | | | | |
| 1.. | युको बँक | 23.11.2009 | 7.50 | 23.11.2014 | 900000 | 67500 | 9.75 | 87750 |
| 2.. | आई.डी.बी.आय | 29.5.2010 | ---- | 2.6.2013 | 1400000 | 105000 | 9.75 | 136500 |
| 4. सिंकींग फंड - | | | | | | | | |
| 1.. | युको बँक | 23.11.2009 | 7.50 | 23.11.2014 | 900000 | 67500 | 9.75 | 87750 |
| 2. | आई.डी.बी.आय | 29.5.2010 | 7.50 | 2.6.2013 | 1400000 | 105000 | 9.75 | 136500 |
| 5.भविष्य निर्वाह निधी - | | | | | | | | |
| 1. | बँक ऑफ इंडिया | 20.4.2007 | 8 | 23.6.2012 | 3029211 | 242336 | 9.75 | 295348 |
| 2. | ---“----- | 23.3.2010 | 7.25 | 23.3.2013 | 3875094 | 280944 | 9.75 | 377821 |
| 3. | ---“----- | 23.3.2010 | 7.25 | 23.3.2013 | 3536102 | 256367 | 9.75 | 344770 |
| 4. | क्यानरा बँक | 8.3.2010 | 6.75 | 8.3.2013 | 2440782 | 164753 | 9.75 | 237976 |
| 5. | ओरिएनटल बँक | 17.9.2009 | 7.50 | 17.9.2012 | 7500000 | 562500 | 9.75 | 731250 |
| 6 | एस.बी.आय . | 20.11.2009 | 7.50 | 17.9.2012 | 10000000 | 750000 | 9.75 | 975000 |
| 7. | ---“----- | 11.2.2009 | 7.50 | 11.2.2014 | 5000000 | 375000 | 9.75 | 487500 |
| 8 | विजया बँक | 22.9.2009 | 7.25 | 22.9.2012 | 9430101 | 683682 | 9.75 | 919434 |
| 9 | इंडियन बँक | 11.1.2010 | 6.75 | 11.11.2015 | 2693710 | 181825 | 9.75 | 262637 |
| 10 | ओरिएनटल बँक | 4.10.2009 | 7.50 | 4.10.2012 | 2186132 | 163960 | 9.75 | 213148 |
| 11. | आई.डी.बी.आय | 28.5.2010 | 7.50 | 1.6.2013 | 10000000 | 750000 | 9.75 | 975000 |
| 12. | ---“----- | ---“---- | --“--- | 30.5.2013 | 10000000 | 750000 | 9.75 | 975000 |
| 13 | इंडियन बँक | 21.8.2010 | 7.75 | 21.8.2015 | 30000000 | 2325000 | 9.75 | 2925000 |
| 14 | युनिअन बँक | 24.7.2010 | 7.50 | 24.7.2015 | 5000000 | 375000 | 9.75 | 487500 |
| 15 | आई.डी.बी.आय | 4.12.2012 | 8.25 | 8.12.2013 | 3000000 | 247500 | 9.75 | 292500 |
| 16 | एस.बी.आय .1 | 4.12.2010 | 7.50 | 1.12.2010 | 5000000 | 375000 | 9.75 | 487500 |
| 17 | ----“------ | -“-- | -“-- | -“---- | 5000000 | 375000 | 9.75 | 487500 |
| | | | | | | 10486367 | | 13366384/- |

वरील गुंतवणुका रु.134389000 या रकमेच्या असून त्यावर 1% दंडाची रक्कम रु. 1343890/- वजा जाता वरील विवरणपत्रात दाखविल्या प्रमाणे जुन्या आणि नवीन उच्च 9.75 च्या व्याजाच्या रकमेत रु.2880017 रकमेचा फरक असून त्यातून 1343890 वजा जाता म.न.पां.चे रु.1536127 नुकसान झाले असे दिसून येते.

---

सदर प्रकरणी वरील गुंतवणुकीचा आढावा घेवून उपरोक्त रकमा सुधारित करणे आवश्यक होते..
राष्ट्रीय नगरपालिका लेखासंहिता परिच्छेद क्रमांक – 5.3 प्रमाणे गुंतवणुकीची रोख पुस्तके ठेवण्यात आलेली नाहित. निवृत्तीवेतन निधी या रोखपुस्तकातील शिल्लक रुपये (-) 9068701 असुन बॅकेच्या पासबुकाप्रमाणे शिल्लक रुपये 773642 एवढी आहे. म्हणजेच दिनांक 31.3.2012 रोजी दोन्ही रकमेत रुपये 9842343 एवढी तफावत असल्याचे दिसुन आले. सदर रकमेचा ताळमेळ घालण्यात आलेला नाही. रोख पुस्तकात आरंभीची शिल्ल्क वजा दाखविलेली आहे. सदर बाबत अर्ध समास ज्ञापन क्रमांक 27 दिनांक 19-11-2013 अन्वये लेखा विभागास विचारणा करण्यात आली होती. विभागाने दिनांक 23-01-2014 च्या पत्राअन्वये उत्तर दिलेले असून सदरील फरक ताळमेळ न घातल्याने झाला असल्याचे विभागाने त्यांच्या उत्तरात नमूद केलेले आहे. सबब निवृत्ती वेतन रोख पुस्तकातील ( -) आरंभीच्या शिल्लक रकमेबाबत दिलेले अनुपालन योग्य व संयुक्तिक नाही. प्रत्यक्षात फरकाच्या रकमेचा ताळमेळ घालून अनुपालन सादर करावयास हवे होते. सबब म.न.पां.चे अनुपालन स्वीकारता येत नाही.

DATDBWM5801 (Ref No : 170, Hmm No : 27)

## *19 मोठया प्रमाणात थकीत असलेल्या पाणी पटटी,पाणी पुरवठा लाभ कर व मलप्रवाह सुविधा लाभ कराबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***पाणीपटटी, पाणी लाभ कर व मलप्रवाह सुविधा लाभ कराची रु. 600356002 रक्कम नागरिकांकडून वसूल करणे प्रलंबित आहे.***

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ,1949 च्या कलम 130 नूसार ज्या जागांना कोणत्याही नगरपालिका जल व्यवस्था केंद्रातून खाजगीरीत्या पाणी पुरवठा होत असेल किंवा त्या जागा कोणत्याही नगरपालिका जलव्यवस्था केंद्राशी पाणी वाहून नेणा -या नळांच्या सहा य्याने जोडल्या असती ल अशा जागा बाबतीत पाणीपटटी किंवा पाणी पुरवठा लाभ कर बसविण्यात येतो. तसेच कलम 131 नूसार साफसफाई, मलप्रवाह सुविधा लाभ कर बसविण्यात येतो .

या कराची मागणी रक्कम व प्रत्यक्ष वसुल करण्यात आलेली रक्कम खालीलप्रमाणे आहे .

उल्हासनगर महानगरपालिका

( आकडे लाखात )

| अ.क्र | कराचा तपशिल | 2010-11 | | | | 2011-12 | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **मागणी** | | **वसुली** | | **मागणी** | | **वसुली** | |
| | | मागील थकीत | चालू | मागील थकीत | चालू | मागील थकीत | चालू | मागील थकीत | चालू |
| 1 | पाणी पुरवठा लाभ कर | 321.82 | 228.50 | 99.91 | 114.01 | 345.02 | 236.53 | 90.25 | 129.05 |
| 2 | मल प्रवाह सुविधा लाभ कर | 137.37 | 114.26 | 3.63 | 57.05 | 16.09 | 118.28 | 39.82 | 64.38 |
| 3 | पाणी पटटी | 4551.13 | 1469.91 | 942.76 | 611.40 | 4566.25 | 1484.27 | 703.58 | 623.65 |
| 4 | मल प्रवाह कर | 738.03 | 342.70 | 179.20 | 172.64 | 744.74 | 354.76 | 151.75 | 194.72 |
| | **एकूण** | 5748.37 | 2155.39 | 1258.24 | 955.12 | 5816.93 | 2193.86 | 985.41 | 1011.82 |
| | **वसुलीची टक्केवारी** | | | 21.88% | 44.31% | | | 16.94% | 46.12% |

उपरोक्तसंदर्भात खालीलप्रमाणे अभिप्राय आहे.

पाणीपटटी,पाणी लाभ कर ,मलप्रवाह कर व मलप्रवाह सुविधा लाभ कराची मागणी केलेल्या रकमेच्या वित्तीय वर्ष 2010-11 करीता केलेली वसुली पाहता मागील थकीत रकमेपैकी वसुली फक्त 21.88% असून चालू वर्षाच्या करा च्या वसुलीची रक्कम 44.31% आहे. तर वित्तीय वर्ष 2011-12 करीता अनुक्रमे 16.94% व 46.12% आहे. वित्तीय वर्ष 2011-12 अखेरपर्यंत रु.60,03,56,002/- इतकी रक्कम थकीत आहे. थकबाकी वसुलीसाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

उपरोक्तबाबत अर्धसमास ज्ञापन क्र .191 दि.17.02.2014 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त् आहे.

DATDSAM7301 (Ref No : 3, Hmm No : 191)

## *20 वाणिज्य नळ जोडणी धारकांकडे पाणीपट्टीच्या थकीत असलेल्या मोठया रकमांच्या वसुलीबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसूची ड प्रकरण10 मधील12(1)(अ)नुसार पाणीपट्टीची नोटीस बजावण्यात आल्या नंतर एक महिन्याचे आत रक्कम देण्यास कसूर करण्यात आली तर नळ तोडून टाकण्यात येईल वा अशा जागांचे पाणी बंद करण्यात येइल. अशी तरतूद आहे. अशी कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने वाणिज्य,औदयोगिक व विशेष ग्राहकांकडून पाणीकराची रक्कम रुपये 670177000/- वसुल न झाल्याने थकीत आहे.***

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ,1949 च्या कलम 130 नूसार ज्या जागांना कोणत्याही नगरपालिका जल व्यवस्था केंद्रातून खाजगीरीत्या पाणी पुरवठा होत असेल किंवा त्या जागा कोणत्याही नगरपालिका जलव्यवस्था केंद्राशी पाणी वाहून नेणा -या नळांच्या सहा य्याने जोडल्या असतील अशा जागा बाबतीत पाणी पटटी किंवा पाणी पुरवठा लाभ कर बसविण्यात येईल . उमपा स्थायी समिती ठराव क्र.36 दि.30.07.2007 अन्वये मीटरद्वारे पाणी पुरवठा करणेचे दरास खालीलप्रमाणे मंजूरी देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | वापराचा प्रकार | दर रुपये (प्रती हजार लि.) |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| 1 | वाणिज्य व औद्योगिक | 26 |
| 2 | सार्वजनिक संस्था | 15 |

**चालू स्थितीतील मिटरसाठी प्रती महा किमान आकारणी**

| अ.क्र. | नळ जोडणीचा व्यास (मी.मी.) | वाणिज्य वापराकरीता दर रुपये | विशेष वापराकरीता (जसे शाळा ,सार्व .संस्था इ.) दर रुपये |
|---|---|---|---|
| 1 | 15 | 468 | 203 |
| 2 | 20 | 861 | 375 |
| 3 | 25 | 1248 | 540 |
| 4 | 32 | 1872 | 810 |
| 5 | 40 | 3276 | 1425 |
| 6 | 50 | 4137 | 1800 |
| 7 | 65 | 5073 | 2190 |

**मिटर नादुरूस्त् स्थितीत प्रती महा किमान आकारणी**

| अ.क्र. | नळ जोडणीचा व्यास (मी.मी.) | वाणिज्य वापराकरीता दर रुपये | विशेष वापराकरीता (जसे शाळा ,सार्व .संस्था इ.) दर रुपये |
|---|---|---|---|
| 1 | 15 | 702 | 315 |
| 2 | 20 | 1300 | 578 |
| 3 | 25 | 1872 | 840 |
| 4 | 32 | 3380 | 1530 |
| 5 | 40 | 4940 | 2240 |
| 6 | 50 | 6058 | 2475 |
| 7 | 65 | 6760 | 3048 |

उल्हासनगर महानगरपालिकेकडून उपरोक्त नियमानूसार आकारण्यात आलेल्या वाणिज्य व विशेष पाणीकराची मागणी रक्कम व प्रत्यक्ष वसुल करण्यात आलेली रक्कम खालीलप्रमाणे आहे.

**(रुपये लाखात)**

| अ.क्र. | सन | आरंभिची शिल्लक रक्कम रु. | थकित रकमेवर विलंब शुल्काची रक्कम रु. | चालू वर्षाची पाणीकराची रक्कम रुपये | मीटर भाडे | पाणीकराची जमा रक्कम रुपये | निर्भय योजनेद्वारे वसुली रक्कम रु. | शिल्लक रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2010-11 | 4525.13 | 886.69 | 363.48 | 0.14 | 282.68 | 28.17 | 5464.87 |
| 2 | 2011-12 | 5464.87 | 1043.34 | 356.15 | 0.14 | 162.57 | 0.16 | 6701.77 |

उपरोक्तप्रमाणे पाणीकराची रक्कम वाणिज्य ,औदयोगिक व विशेष ग्राहकांकडून वसुल न झाल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात एकूण 3011 ग्राहकांना मीटरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो . परंतू वित्तीय वर्ष 2011-12 अखेर पाणीकराची वरीलप्रमाणे मोठया प्रमाणात थकीत रक्कम रु . 6701.77 लक्ष इतकी असल्याचे दिसून येते . त्याचप्रमाणे एकूण 3011 ग्राहकांच्या मीटरपैकी फक्त 979 ग्राहकांचे मीटर चालू स्थितीतील असल्याने त्यांना मीटर रिडींगद्वारे बिल आकारण्या त येते, परंतू 2032 ग्राहकांचे मीटर नादुरूस्त् असल्याने त्यांना किमान आकारणी करण्यात येते . सदर मीटर दुरूस्ती करण्याचे अनुषंगाने कोणतीही कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास येते.

नगरविकास विभाग ,शासन निर्णय क्र . Misc.2009/CR 207/01 UD-20 दि.02.08.2010 अन्वय सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी पाणी पुरवठा योजना “ना-नफा, ना-तोटा” तत्वावर राबविणे आवश्यक असल्याचे नमूद आहे . परंतू उपरोक्तप्रमाणे रकमा थकीत असल्याने आर्थिक वर्ष 11 -12 मध्ये पाणी पुरवठा योजना तोट्यात आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसूची ड प्रकरण10 मधील12(1)(अ )नुसार पाणीपट्टीची नोटीस बजावण्यात आल्या नंतर एक महिन्याचे आत रक्कम देण्यास कसूर करण्यात आली तर नळ तोडून टाकण्यात येईल वा अशा जागांचे पाणी बंद करण्यात येइल. अशी तरतूद आहे. अशी कार्यवाही करण्यात आलेली दिसून आली नाही.

याबाबत अर्धसमा स ज्ञापन क्र .199 दि.20.02.2014 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त् आहे.सबब,वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATDSAM7301 (Ref No : 4, Hmm No : 199)

## *21 JNNURM अंतर्गत पाणीपुरवठा योजनेच्या कामातील अनियमिततांबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*JNNURM निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1980296313.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 635100.00/-

***केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियांनातर्गत (JNNURM) उल्हासनगर मधील पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेतर्गंत केलेल्या कामाच्या प्रदानातून मुद्रांक शुल्कापोटी रु535100 कमी वसुल केले आहे. तसेच निविदा संचाची किंमत रु.100000 कमी घेतली आहे. एकूण रु635100 वसुली केलेली नाही.***

केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियांनातर्गत ( JNNURM) उल्हासनगर मधील पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेचे काम हाती घेण्यात आले आहे. या प्रकल्पाचा डी.पी.आर. रु.127.65 कोटी रक्कमेचा आहे. केंद्र शासनाने दिनांक 19.12.08 रोजी झालेल्या CSMC मिटींगमध्ये त्यास मान्यता दिली आहे. तसेच राज्य शासनाच्या सुकाणू समितीने ( State Level Steering Committee) दि.26.12.08 रोजी झालेल्या बैठकीत प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. सदर कामाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अंदाजपत्रकीय रक्कम रु.127.65 कोटी (मजिप्रा जिल्हा दरसूची 2008-09)

35 टक्के केंद्र शासनाचा हिस्सा रु.44.68 कोटी

15 टक्के राज्य शासनाचा हिस्सा रु.19.14 कोटी

50 टक्के मनपाचा हिस्सा रु.63.83 कोटी

डी.पी.आर.मधील जलकुंभाच्या दुरुस्तीची कामे वगळून रु.121.19 कोटी ची निविदा दि.27.02.2009 रोजी मागविण्यात आल्या. पंरतु 59.70 टक्के जादा दर प्राप्त झाल्याने दुस-या वेळी निविदा दि.17.05.2009 रोजी मागविण्यात आल्या. यावेळी 37 टक्के जादा दर प्राप्त झाल्याने निविदा रदद करण्यात आली. तिस-या वेळी निविदा मागविण्यात आल्या. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

को-या निविदा उपलब्ध करण्याचा दिनांक 31.07.2009 ते 07.08.200

निविदा स्विकारण्याचा दिनांक 12.08.2009

निविदा पूर्व अर्हतेमध्ये 04 पात्र निविदाकारांपैकी 03 निविदाकारांनी निविदा सादर केल्या.

निविदा उघडण्याचा दिनांक 25.11.2009

प्राप्त निविदांपैकी मे.कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर ( J.V.) यांचा दर न्यूनतम म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 35.73 टक्के जादा होता. तो वाटाघाटीअंती 32.04 टक्के जादा इतका मान्य करण्यात आला.

2009-10 दरसूचीचे दर व इतर बाबींचा विचार करता, हा दर 06.014 टक्के जादा असल्याचे विभागाने नमूद केले आहे. स्थायी समितीने ठराव क्रमांक 112 दिनांक 07.12.2009 नुसार 32.04 टक्के जादा देकार म्हणजेच रु.160.02 कोटीस मान्यता दिली आहे. मे.कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर ( J.V.) यांचेसोबत दि.18.12.2009 रोजी करारनामा करुन दिनांक 21.12.2009 रोजी कार्यादेश UMC/WSSD/CE/3718 देण्यात आला. या कामाची लेखापरिक्षणाचे दिनांकापर्यंत 24 धावती देयके खर्च पडली असून रु.198,09,31,413 खर्च झालेला आहे. या कामाचे उपलब्ध केलेल्या लेख्यांचे लेखापरिक्षण केले असता, खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. प्रथम व व्दितीय वेळेस मागविलेल्या निविदेच्या नस्ती, वृतपत्रात दिलेली जाहीरात, प्राप्त निविदा या

बाबतची माहिति लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

2. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.टंडन ॲण्ड असोसिएटस मुंबई यांचे सोबत रु.3.62 कोटी च्या कामासाठी रु.100/- च्या मुद्रांक शुल्कावर करारनामा केला आहे. मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 मधील कलम 63 नुसार रु.10 लाख पर्यन्त रु.100 व त्यावरील प्रत्येक लाखाकरीता रु.100 मुद्रांक शुल्क कमाल रु.5 लाखाच्या मर्यादेत भरणे आवश्यक आहे. यासाठी रु.35300 मुद्रांकशुल्कापोटी संबंधितांकडून भरणे आवश्यक होते. परंतू मुद्रांक शुल्कापोटी फक्त रु.100 ची वसुली केली आहे.तरी रु. 100 वगळता रु.35200 संबंधितांकडून वसुल करुन शासन सदरी भरणे आवश्यक आहे.

3. सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्रमांक सीएटी-09/05/प्र.कं.-381/इमारत-2, दिनांक 15.05.2007 नुसार 50 कोटी रक्कमेवरील कंत्राटासाठी निविदा संचाची किमत रु.50 हजार वसुल करणे आवश्यक असतांना रु.25 हजार वसुल केलेली आहे. चार निविदाधारकांकडून रु.25 हजार प्रत्येकी प्रमाणे रु.100000 वसुल करणे आवश्यक आहे.

4. मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 मधील कलम 63 नुसार रु.10 लाख पर्यन्त रु.100 व त्यावरील प्रत्येक लाखाकरीता रु.100 मुद्रांक शुल्क कमाल रु.5 लाखाच्या मर्यादेत भरणे आवश्यक आहे. तथापि, मे.कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर ( J.V.) यांचेसोबत झालेला करारनामा रु.100 चे मुद्रांकशुल्कावर करण्यात आलेला आहे. कमी भरणा मुद्रांक शुल्क रु.4,99,900/- संबंधितांकडून वसूल करुन मुद्रांक शुल्क या सदरी शासन जमा करणे आवश्यक आहे.

5. 24 व्या धावत्या देयका अखेर मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर ( J.V.) यांचे लेजर अकाऊंट नुसार रु.198,09,31,413 इतके प्रदान झाले आहे. तर 24 व्या धावत्या देयकावर " Up to date expenditure '
रु.198,36,06,432 इतका नमुद आहे. देयकावर व लेजर अकाउंट यामध्ये फरक रु.26,75,019 इतका असून त्याबाबत विभागाने खुलासा केलेला नाही.

6. 24 व्या धावत्या देयका अखेर एकूण प्रदान रु.198,09,31,413 पैकी कपातीची रक्कम (आयकर, मुल्यवर्धीत कर, सुरक्षा अनामत व कामगार कल्याण उपकर) रु.13,01,53,411 इतकी आहे. तथापि, या कपातीसाठी मनपा निधीमध्ये वळती केलेली रक्कम रु.7,57,20,253 इतकी असल्याचे बँक विवरणपत्रानुसार दिसून येते. म्हणजेच कपातीची रक्कम रु.5,44,33,158 कमी भरणा केली आहे.

7. मनपा निधीचा हिस्सा मनपा खात्यातून JNNURM खात्यात वर्ग करुन खर्च केला गेला आहे. तथापि, 5 व्या धावत्या देयकाचे भागश: प्रदान रु.2,63,20,000 मनपा निधीमधून केले गेले आहे. या संपूर्ण योजनेचा लेखा वेगळा ठेवणे आवश्यक असतांना असे प्रदान करणे अनियमित आहे..

8. प्रकल्पाचा मनपा हिस्सा म्हणून 13 व्या वित्त आयोगाची रक्कम वापरण्यात आली आहे. तथापि 13 व्या वित्त आयोगाचा निधी यासाठी वापराचा प्राधिकार लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिला नाही.

9. बँक विवरणपत्र तपासले असता, दि.3.09.2013 रोजी ( Special Grant Account for Development of Primary) रु.2 कोटी विशेष अनुदान जमा करुन खर्च करण्यात आलेले आहे. याबाबतचा प्राधिकार लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही.

10. सदर योजना पूर्ण करण्याची मुळ मुदत कार्यादेशानंतर 24 महिने होती, तथापि 45 महिन्यानंतरही काम अपूर्ण असून दि.31 मार्च 2014 पर्यंत कामास मुदतवाढ दिली आहे. कामास विलंब झाल्यामुळे महानगरपालिकेस भाववाढ फरकापोटी प्रदान करावे लागत आहे.

11. भाववाढ फरकांच्या देयकांचे प्रदान करण्यापूर्वी त्याची तपासणी लेखा किंवा लेखापरिक्षण विभागाने केलेली नाही.

12. कामासाठी वापरलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही.

13. डी.पी.आर मधील 14.6.1 नुसार सध्या एम.आय.डी.सी.कडून 120एमएलडी पाणी उचलले जाते. प्रकल्प पूर्ण झाल्यावर 2012-13 मध्ये ते 105 एमएलडी होईल. व 15 एमएलडी पाण्याची बचत होईल. प्राप्त माहितीनुसार काम अंतिम टप्प्यात असून वितरण व्यवस्थेचा बराच भाग सेवेत घेतला आहे. असे असूनही पाणी वापरात कोणतीही बचत झाल्याचे दिसून येत नाही.

14. उदयोग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रं. बीसीए-2009/प्र.क्रं108/कामगार-7-अ, दि.17 जून 2010 मधील मुददा क्रमांक 5 नुसार 01.07.2010 पासून इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर जमा करावा असे नमुद आहे. परंतु, मुददा क्रमांक 6 नुसार ज्याचे काम घेण्यासाठीचा करार दि.1.7.2010 वा तदनंतर करण्यात येईल अशा इमारत व इतर बांधकामांना वरील पध्दत लागू राहील असे नमूद आहे. सदर कामाचा करारनामा दि.18.12.2009 रोजी करण्यात आलेला आहे . परंतू देयकातून इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर कपात केलेला आहे.

15. डी.पी.आर मधील अंदाजपत्रकातील बाबींची सरमिसळ करुन निविदा प्रसिध्द करतांना कामाचे उप विभाग पाडलेले आहेत. त्यामुळे मंजूर डी.पी.आर नुसार काम झाल्याची पडताळणी करता आली नाही.

16. वितरण व्यवस्थेचे काम पूर्ण होण्याच्या मार्गावर असले तरी पाण्याच्या स्त्रोताबाबत मनपा एम आय डी सी वर अवलंबून आहे. उल्हासनगर मनपा पाणी शुध्दीकरण करत नसून एम आय डी सी कडून रु.7 प्रति हजार लिटर या दराने पाणीखरेदी करुन पुरवठा करत आहे. एम आय डी सी व मनपा यांच्यात पाण्याच्या पुरवठा केलेल्या प्रमाणावरुन वाद असून त्यामुळे एम आय डी सी ची मनपाकडे मोठया प्रमाणावर थकबाकी आहे. यावर्षी पासून एम आय डी सी ने पाण्याचा दर वाढवून रु.14 प्रति हजार लिटर असा केला आहे. त्यामुळे 2011-12 मध्ये रु. 26.32 कोटी असलेला पाणी पुरवठा योजनेचा तोटा मोठया प्रमाणावर वाढणार आहे. मनपाने केलेल्या वितरण व्यवस्थेसाठी किफायतशीर पाण्याचा स्त्रोत निर्माण करण्याबाबत गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे.

17. सदर कामाच्या मोजमाप पुस्तिका लेखापरिक्षणास उपलब्ध झाल्या नाहीत.

एकूण वासुल्पत्र रक्कम :

मुद्रांक शुल्क – रु. 35200

निविदा संचाची रक्कम – रु.100000

मुद्रांक शुल्क – रु. 499900

एकूण - रु. 635100

## *22 पाणी शुध्दिकरण रसायन खरेदीमध्ये झालेल्या अतिप्रदानाबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :564-2520 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 48000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 14000.00/-

***शासन नियमानूसार दरपत्रके/निविदा मागवून खरेदी प्रक्रिया झालेली नाही. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दरसुचीतील दरापेक्षा जादा दराने खरेदी करण्यात आलेली आहे. जंतुनाशक पावडरचे गुणवत्ता प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही. खरेदी व वितरण केलेल्या जंतुनाशक पावडरची साठा नोंदवही प्राप्त झालेली नाही.***

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात पाणी पुरवठा व जल-मल नि:सारण विभागामार्फत पाणी शुध्दीकरण रसायन खरेदी लेखाशिर्षातर्गत झालेल्या खर्चासंदर्भात माहे मार्च 2012मध्ये खालीलप्रमाणे खर्च करण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्र, दिनांक | तपशिल | देयकाची स्थुल रक्कम (रु.) | सुरक्षा रक्कम (रु.) | आयकर वजाती (रु.) | मुल्यवर्धित कर (रु.) | कामाचा विमा (रु.) | उपकर (रु.) | निव्वळ देय रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 5637/ 21.03.12 | टी.सी.एल.पावडर ग्रेड-1 पुरवठा करणेबाबत (**मे.अमोल एन्टरप्रायझेज**) | 48000 | ----- | 960 | ----- | ----- | ----- | 47040 |

| **अ.क्र.** | **कामाचा तपशिल** | |
|---|---|---|
| 1 | ठेकेदाराचे नाव | मे.अमोल इंटरप्रायझेज |
| 2 | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | 48000/- |
| 3 | कार्यादेश क्र. | 1548 दि.27/09/2011 |
| 4 | बिलाचा प्रकार | प्रथम व अंतिम देयक |
| 5 | काम पुर्ण दिनांक | 01/10/2011 |

उपरोक्त विषयांकीत खरेदीसंदर्भात उपलब्ध झालेल्या लेख्यावरून निदर्शनास आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास ज्ञापन क्र. 88 दि.20.01.2014 रोजी दिले असता प्राप्त् अनुपालनात सदर त्रुटींबाबत यापुढे दक्षता घेणेत येईल,असे अनुपालन आहे. सबब, खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. उदयोग.उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भाखंस/1088/2512/उदयोग/6 दि.02/01/1992 नुसार दरपत्रके /निविदा मागवून खरेदी प्रक्रिया होणे आवश्यक असतांना पुर्वी ज्या कंत्राटदाराकडून खरेदी करण्यात आली होती त्याच कंत्राटदाराला कार्यादेश देवून खरेदी करण्यात आलेली आहे.

2. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,कोकण विभाग यांच्या सन 2009-10 च्या दरसुचीनूसार टिसीएल पावडरचे दर रु.17/- प्रती कि.ग्रॅ. असतांना रु.24/- प्रती कि.ग्रॅ.दराने पावडरची खरेदी करण्यात आल्यामूळे 2 मे.टन खरेदीपोटी रु.14000/- चा जादा खर्च करण्यात आलेला आहे.

3. खरेदी केलेल्या टिसीएल पावडरचा गुणवत्ता अहवाल लेखा परीक्षणाकरीता उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे खरेदी केलेल्या जंतुनाशक पावडरचा गणवत्तेबाबत सत्यता पडताळणी करता आलेली नाही.

4. खरेदी केलेल्या टिसीएल पावडरची नोंद साठा नोंदवहीत घेणे आवश्यक आहे. तशी नोंद घेण्यात आलेली साठा नोंदवही तपासणीकरीता उपलबध करुन दिलेली नाही. त्यामुळे खरेदी केलेल्या व वापराकरीता वितरीत केलेल्या जंतुनाशक पावडरच्या साठयाबाबत सत्यता पडताळणी करता आलेली नाही.

5. राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहितेमधील नियम क्र.12.82 (डी) नूसार कंत्राटदाराकडून प्राप्त झालेल्या बिल / इनव्हाईसची नोंद Journalise केल्यानंतरच कंत्राटदारास प्रदान करणे आवश्यक आहे. याबाबत चलन तपासले असता टिसीएल पावडरचा पुरवठा मे.अमोल एन्टरप्रायझेज ,इलेक्ट्रॉनिक मटेरीअल सप्लायर्सद्वारे करण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर पुरवठादार शासनमान्य परवानाधारक असल्याचे कागदपत्रे तपासणीकरीता उपलब्ध झाले नाही.

6. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहीता,2011 मधील नियम 134 अन्वये कंत्राटी पध्दतीने काम करण्यात आले असतील त्याबाबतीत,अंदाजित खर्च रु.20000/- पेक्षा अधिक असेल तर , कंत्राटदारास ,मुंबई मुद्रांक अधिनियम,1958 अन्वये आवश्यक असलेल्या मुद्रांक कागदावर ,कंत्राटाच्या अटी व शर्ती नमूद करून आणि तो त्या अनुसरण्यास कसूर करील तर तो दंडास पात्र ठरेल व अशा दंडाच्या शर्ती असलेला करारनामा करणे आवश्यक असेल. अशा सुचना कंत्राटदाराबरोबर करारनामा करण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले आहे.

DATPVWM7501 (Ref No : 96, Hmm No : 88)

## *23 पाणी पुरवठा साहित्य खरेदी (दुरूस्ती) अंतर्गत केलेल्या कामातील अनियमितता...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :316-2440 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 487699.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 147248.00/-

***कामाचा स्थळ पाहणी अहवाल बनविण्यात आलेला नाही.मजीप्रा च्या दरसुचीपेक्षा जादा दराने रक्कम अदा केल्यामुळे कंत्राटदारास अतिप्रदान झाले आहे.हॉयर्डोलिक चाचणी अहवाल प्राप्त न करता प्रदान केल्याने अतिप्रदान झाले आहे.स्वामित्वधनाची रक्कम कंत्राटदाराच्या देयकातून कपात करण्यात आलेली नाही.जोडणी बदलणेकरीता अंदाजपत्रकीय मापापेक्षा जादा लांबीची पाईप लाईन Shifting केली आहे.मोजमाप पुस्तिका नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध केलेली नाही.देयकातून सुरक्षा रक्कम,व्हॅट,उपकर व विम्याची रक्कम कपात केलेली नाही.***

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात पाणी पुरवठा व जल-मल नि:सारण विभागामार्फत पाणी पुरवठा साहित्य खरेदी (दुरूस्ती) लेखाशिर्षांतर्गत माहे सप्टे.2011 मध्ये खालीलप्रमाणे रक्कम खर्च करण्यात आलेल्या कामांचे अवलोकनांती निदर्शनास आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.116 दि.23.01.2014 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त् आहे.सबब, पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

| अ.क्र. | प्रमाणक क्र, दिनांक | तपशिल | देयकाची स्थुल रक्कम (रु.) | सुरक्षा रक्कम (रु.) | आयकर वजाती (रु.) | VAT (रु.) | कामाचा विमा (रु.) | उपकर (रु.) | निव्वळ देय रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2643/ 03.09.11 | उल्हासनगर 1 मधील मधुबन चौक ते शांतीसागर अपार्ट. व गुप्ता बंगला पर्यंतच्या नळजोडण्या जमिनीखाली टाकणे (मे.मुंब्रादेवी म.स.सं.) | 49376 | ---- | 988 | ----- | --- | ---- | 48388 |

| अ.क्र. | कामाचा तपशिल | |
|---|---|---|
| 1 | ठेकेदाराचे नाव | मे.मुंब्रादेवी मजूर सह.संस्था |
| 2 | अंदाजपत्रकीय रक्कम | रु.49957/- |
| 3 | तांत्रिक मान्यता क्र. | 347 दि.16/02/2010 |
| 4 | प्रशासकीय मान्यता क्र. | मा.आयुक्त यांची मान्यता |
| 5 | जिल्हा उपनिबंधकाची मान्यता क्र. | |
| 6 | कार्यादेश क्र. | 544 दि.18/03/2010 |

| | | |
|---|---|---|
| 7 | कामाचा कालावधी | 15 दिवस |
| 8 | बिलाचा प्रकार | प्रथम व अंतिम देयक |
| 9 | मोजमाप पुस्तिका क्रमांक | 50 बी पृष्ठ क्र.193 |
| 10 | काम पुर्ण दिनांक | 31/03/2010 |

| अ.क्र. | प्रमाणक क्र, दिनांक | तपशिल | देयकाची स्थुल रक्कम (रु.) | सुरक्षा रक्कम (रु.) | आयकर वजाती (रु.) | VAT (रु.) | कामाचा विमा (रु.) | उपकर (रु.) | निव्वळ देय रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 2659/ 07.09.11 | उल्हासनगर 1 ते 3 पाणीपुरवठा देखभाल व दुरूस्तीकरीता मजूर व मेस्त्री यांचा पुरवठा करणे (मे.श्री इंद्र म.स.सं.) | 438323 | --- | 8766 | 4383 | --- | 4383 | 420791 |

| **अ.क्र.** | **कामाचा तपशिल** | |
|---|---|---|
| 1 | ठेकेदाराचे नाव | मे. श्री इंद्र मजूर सह.संस्था |
| 2 | अंदाजपत्रकीय रक्कम | रु.438525/- |
| 3 | तांत्रिक मान्यता क्र. | 246 दि.04/01/2011 |
| 4 | प्रशासकीय मान्यता क्र. | मा.आयुक्त यांची मान्यता |
| 5 | जिल्हा उपनिबंधकाची मान्यता क्र. | 4826 दि.13/01/2011 |
| 6 | कार्यादेश क्र. | 137 दि.02/02/2011 |
| 7 | कामाचा कालावधी | 90 दिवस |
| 8 | बिलाचा प्रकार | प्रथम व अंतिम देयक |
| 9 | मोजमाप पुस्तिका क्रमांक | 49 बी |
| 10 | काम पुर्ण दिनांक | 30/04/2011 |

1. उपरोक्त अ.क्र.1 च्या कामासंदर्भात महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 158 अन्वये नगरपालिकेच्या बांधकामांचे सर्व अंदाज , नगरपालिका अभियंता यांच्या कडून (अ) प्रशासनिक मंजुरीसाठी रेखांकित नकाशे व जोते क्षेत्रफळासह प्राथमिक अंदाज (ब) तांत्रिक मंजुरीसाठी अंतिम तपशिलवार नकाशे व अंदाज यांचेसह असणे आवश्यक आहे. परंतू उपरोक्त नियमाप्रमाणे रेखांकीत नकाशासह कार्यवाही झाली असल्याचे निदर्शनास आले नाही. त्याचप्रमाणे History Register उपलब्ध झालेले नाही.

2. उपरोक्त अ.क्र.1 च्या कामासंदर्भात महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 165 अन्वये कामाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष जागेच्या संबंधात स्थानिक निरीक्षण अंतिम तपशिलवार

अंदाज तयार करण्याअगोदर केले पाहीजे. परंतू उपरोक्त नियमाप्रमाणे अनुसरणेत आलेली कार्यवाहीबाबत अहवाल आढळून आले नाहीत.

3. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,1949 मधील प्रकरण क्र.73 ड नुसार मा.आयुक्तांनी तसेच तत्सम अधिकारी यांनी त्यांच्या अधिकाराच्या मर्यादेत मंजूरी दिलेल्या कामासंदर्भात मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजूरी घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास येते.

4. उपरोक्त अ.क्र.1 च्या कामाच्या अनुषंगाने कंत्राटदाराबरोबर करारनामा करण्यात आलेला नाही.

5. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची सन 2009-10 ची जिल्हा दर सुचीमधील सर्वसाधारण सुचना अ.क्र.7(a) नुसार नगरपालिका क्षेत्रातील कामाकरीता दर सुचीतील दरापेक्षा अतिरीक्त 5% दरवाढ अनुज्ञेय असतांना उपरोक्त कामांचे अंदाजपत्रक तयार करतांना तसेच प्रत्यक्ष खर्चाची रक्कम अदा करतांना 10% अतिरीक्त दरवाढ दिल्याने कंत्राटदारास अ.क्र. 1,च्या कामांत रु.1235/- इतके अतिप्रदान झाले आहे.

6. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दरसूची सर्वसाधारण सुचना क्र.13 अन्वये पाईपचा पुरवठा ठेकेदाराने केल्यास 85% रक्कम अदा करून उर्वरित 15% रक्कम हायड्रोलीक चाचणी समाधानकारक झालेनंतर करणे आवश्यक आहे. लेखापरीक्षणाकरीता हॉयड्रोलीक चाचणी अहवाल उपलब्ध झाला नाही. तो उपलब्ध करावा अन्यथा अ.क्र.1 च्या कामातील 15% पाईपची रक्कम रु.1485/- ठेकेदाराकडून वसूल करावे.

7. महसूल व वनविभाग शा.नि.क्र.गौण खनीज/10/2009/सीआर/309/ख/ दि.11/2/2010 अन्वये रु.70.67/-घ.मी. दराने देयकातून रॉयल्टी कपात करणे आवश्यक आहे. सदर कामासाठी खडी/वाळू/रबल इत्यादी साहित्याचा अ.क्र. च्या कामात 113.55 घ.मी. वापर झाल्याने रॉयल्टीपोटी एकूण रक्कम रु.8025/- ठेकेदाराकडून वसूल करणे आवश्यक आहे.

8. उपरोक्त अ 1 .क्र.च्या कामासंदर्भात खालील बाबींच्या कामासाठी ठोक रक्कम अदा करण्यात आली आहे.तरी सदर बाबीमधील रकमेचे दर विश्लेषण पत्रक उपलब्ध करून देणेत आले नाही.

3) Prov. & Supply CI/MS Special Rs.9900/-

4) Shifting of connection Rs.12300/-

9. उपरोक्त अ.क्र.1 च्या कामासंदर्भात अंदाजपत्रकातील Shifting of Connection साठी पाईपची लांबी 30 Rmt घेण्यात आले असल्याचे निदर्शनास येते. परंतू कामाच्या अनुषंगाने प्रदान रक्कमेतील पाईपची लांबी 60 Rmt असून त्याप्रमाणे प्रदान केल्यामूळे रु.6150/- इतकी रक्कम जादा अदा करण्यात आली आहे.

10. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 172 अन्वये नगरपालिका अभियंता काम चालू असतांना सर्व प्रकारच्या कामातील जितक्या कामाची तपासणी करणे शक्य होईल तितक्या कामांची तपासणी करील. तसेच त्याबाबतचे निरीक्षण अहवाल लेखापरीक्षणासाठी त्यांनी उपलब्ध केले पाहीजेत. अशी तरतूद आहे. परंतू उपरोक्त सर्व कामांबाबतचे नगरपालिका अभियंता यांचे निरीक्षण अहवाल लेखा परीक्षणाकरीता उपलब्ध करून देण्यात आले नाहीत. त्यामुळे कामाच्या सत्यतेची पडताळणी करता आलेली नाही.

11. राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहितेमधील नियम क्र.12.82 (डी) नूसार कंत्राटदाराकडून प्राप्त

झालेल्या बिल / इनव्हाईसची नोंद Journalise केल्यानंतरच कंत्राटदारास प्रदान करणेचे आवश्यक असतांना उपरोक्त कामासंदर्भात (बिजके)Invoice / चलन त्याचप्रमाणे नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. त्यामूळे प्रदानाच्या योग्यतेबाबत पडताळणी करता आलेली नाही.

12. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 183 अन्वये कामाची नोंदवही नमुना क्रमांक 139 प्रमाणे ठेवणे आवश्यक आहे. परंतु कामाची नोंदवही क्र.49 B लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झालेली नाही.त्यामुळे झालेले काम तसेच प्रदान योग्य झालेबाबत पडताळणी करता आलेली नाही. त्याचप्रमाणे महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 180(3) नुसार रक्कम प्रदान करतांना मोजमाप पुस्तिकेतील नोंदी लाल शाईने फुली मारणे आवश्यक असतांना मोजमाप पुस्तिका क्र.50 बी वर त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्याचप्रमाणे मोजमाप पुस्तिकेमधील नोंदी कामाच्या प्रगतीनूसार व दिनांकानूसार घेण्यात आल्याचे निदर्शनास आले नाही.

13. उपरोक्त अ.क्र.1व 2 च्या कामासंदर्भात प्रदान रकमेच्या स्थुल रकमेमधून सुरक्षा ठेव रक्कम अनुक्रमे रु.2468.80/- (2469/-) व रु.21916/- इतकी रक्कम कपात करण्यात आलेली नाही.

2. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 165 अन्वये कामाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष जागेच्या संबंधात स्थानिक निरीक्षण अंतिम तपशिलवार अंदाज तयार करण्याअगोदर केले पाहीजे. परंतू उपरोक्त नियमाप्रमाणे अनुसरणेत आलेली कार्यवाहीबाबत अहवाल आढळून आले नाहीत.

अंदाजपत्रकात 0.60x0.45x0.90 मी. मापाचे 8 चेंबर व 0.90x0.45x1.2 मी.मापाचे 2 चेंबर तयार करावयाचे असतांना प्रत्यक्षात अनुक्रमे 30 व 3 चेंबर तयार करण्यात आल्यामुळे एकूण 23 जादा चेंबर तयार केल्यामुळे जादा खर्च रु.91367/- झालेला आहे.

3. मुळ अंदाजपत्रकानूसार 200 mm चे 92 Rmt व 150mm चे 52 Rmt S.W. पाईप टाकणे तसेच उपरोक्त अभिप्राय क्र.3 नुसार एकूण 10 चेंबर टाकणे आवश्यक होते. त्यानुसार एकूण 146.97 Rmt खोदाई करणे आवश्यक असतांना एकूण 164.11 Rmt खोदाई करण्यात आल्यामूळे खोदाईकरीता रु.2812/-इतका जादा खर्च झालेला आहे.

4. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 180(3) नुसार रक्कम प्रदान करतांना मोजमाप पुस्तिकेतील नोंदी लाल शाईने फुली मारणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

5. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची सन 2009-10 ची जिल्हा दर सुचीमधील सर्वसाधारण सुचना अ.क्र.7(a) नुसार नगरपालिका क्षेत्रातील कामाकरीता दर सुचीतील दरापेक्षा अतिरीक्त 5% दरवाढ अनुज्ञेय असतांना उपरोक्त कामांचे अंदाजपत्रक तयार करतांना तसेच प्रत्यक्ष खर्चाची रक्कम अदा करतांना 10% अतिरीक्त दरवाढ दिल्याने तसेच जिल्हा दर सुचीपेक्षा जादा दर घेतल्याने व दरसुचीतील सुचना क्र.9 नूसार पुरवठा केलेल्या पाईप,व्हॉल,स्पेशल इ.साहीत्यांवर अतिरीक्त वाढ अनुज्ञेय नसतांना कंत्राटदारास रु.9356/- इतके अतिप्रदान झाले आहे.

6. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दरसूची सर्वसाधारण सुचना क्र 13.अन्वये पाईपचा पुरवठा ठेकेदाराने केल्यास 85% रक्कम अदा करून उर्वरित 15% रक्कम हायड्रॉलीक चाचणी समाधानकारक झालेनंतर करणे आवश्यक आहे. लेखापरीक्षणास हायड्रोलीक चाचणी अहवाल उपलब्ध झाला नाही. तो उपलब्ध करावा अन्यथा पाईपची रक्कम रु.6174/- ठेकेदाराकडून वसूल करावी.

7. महसूल व वनविभाग शा.नि.क्र. गौण खनिज/10/1009/सीआर/309/ख दि.11/02/2010 अन्वये रु.70.67 घ.मी. दराने देयकातून रॉयल्टी कपात करणे आवश्यक आहे. सदर कामासाठी उत्खननातून निघालेले साहित्याचा 35.06 घ.मी. वापर झाल्याने रॉयल्टीपोटी रु.2478/- ठेकेदाराकडून वसूल करणे आवश्यक आहे.

8. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 172 अन्वये नगरपालिका अभियंता काम चालू असतांना सर्व प्रकारच्या कामातील जितक्या कामाची तपासणी करणे शक्य होईल तितक्या

कामांची तपासणी करील. तसेच त्याबाबतचे निरीक्षण अहवाल लेखापरीक्षणासाठी त्यांनी उपलब्ध केले पाहीजेत. अशी तरतूद आहे. परंतू सदर पर्यवेक्षण अहवाल लेखापरीक्षणाकरीता उपलबध न झाल्याने कामाचे योग्यरित्या पर्यवेक्षण झाले असल्याची पडताळणी करता आली नाही.

9. राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहितेमधील नियम क्र.12.82 (डी) नूसार कंत्राटदाराकडून प्राप्त झालेल्या बिल / इनव्हाईसची नोंद Journalise केल्यानंतरच कंत्राटदारास प्रदान करणेचे आवश्यक असतांना उपरोक्त कामासंदर्भात (बिजके)Invoice / चलन त्याचप्रमाणे नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. त्यामूळे कामाची सत्यता पडताळणी करता आली नाही.

DATPVWM7501 (Ref No : 106, Hmm No : 136)

## *31 प्रभाग क्षेत्रात पाणी पुरवठा व मल नि:सारण सेवा(प्र.2)दुर्बल घटक अंतर्गत केलेल्या कामासंदर्भात अभिप्राय...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :310-2440 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 490001.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 135927.00/-

***कामाचा स्थळ पाहणी अहवाल तयार करण्यात आलेला नाही.स्थायी समितीची मान्यता घेणेत आलेली नाही.महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे दरसुचीतील दरापेक्षा जादा दराने अंदाजपत्रक तयार करण्यात आल्याने कंत्राटदारास अतिप्रदान झाले आहे.कामाचा हायड्रोलिक चाचणी अहवाल प्राप्त न करता पुर्ण रक्कम अदा करण्यात आली आहे.स्वामित्वधनाची रक्कम देयकातून कपात करून शासन जमा करण्यात आलेली नाही.सक्षम प्राधिकारी यांचेकडून कामाचे पर्यवेक्षण झाले नाही.मोजमाप नोंदवही लेखापरीक्षणाकरीता प्राप्त झाली नाही.अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा जादा रक्कम खर्च झाली आहे.***

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात पाणी पुरवठा व जल-मल नि:सारण विभागामार्फत प्रभाग क्षेत्रात पाणी पुरवठा व मल नि:सारण सेवा(प्र.1)दुर्बल घटक अंतर्गत केलेल्या कामाच्या लेखाशिर्षांतर्गत माहे सप्टे.2011 मध्ये खालीलप्रमाणे रक्कम खर्च करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्र, दिनांक | तपशिल | देयकाची स्थुल रक्कम (रु.) | सुरक्षा रक्कम (रु.) | आयकर वजाती (रु.) | (VAT) (रु.) | कामाचा विमा (रु.) | उपकर (रु.) | निव्वळ देय रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2662/ | उल्हासनगर 2 मधील वॉर्ड | 79531 | 3977 | 1591 | 3181 | 795 | 795 | 69192 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 07.09.11 | क्र.41 येथील एटीपी शाळेजवळ नवीन 100 mm व्यासाची जलवाहीनी टाकणे (मे.वैशाली म.स.सं.) | | | | | | | |

| **अ.क्र.** | **कामाचा तपशिल** | |
|---|---|---|
| 1 | ठेकेदाराचे नाव | मे. वैशाली मजूर सह.संस्था |
| 2 | अंदाजपत्रकीय रक्कम | रु.79540/- |
| 3 | तांत्रिक मान्यता क्र. | 32 दि.13/05/2011 |
| 4 | प्रशासकीय मान्यता क्र. | मा.आयुक्त यांची मान्यता |
| 5 | जिल्हा उपनिबंधकाची मान्यता क्र. | 618 दि.26/05/2011 |
| 6 | कार्यादेश क्र. | 896 दि.09/06/2011 |
| 7 | कामाचा कालावधी | 30 दिवस |
| 8 | बिलाचा प्रकार | प्रथम व अंतिम देयक |
| 9 | मोजमाप पुस्तिका क्रमांक | 84 बी |
| 10 | काम पुर्ण दिनांक | 21/06/2011 |

| अ.क्र. | प्रमाणक क्र, दिनांक | तपशिल | देयकाची स्थुल रक्कम (रु.) | सुरक्षा रक्कम (रु.) | आयकर वजाती (रु.) | (VAT) (रु.) | कामाचा विमा (रु.) | उपकर (रु.) | निव्वळ देय रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 3069/ 30.09.2011 | उल्हासनगर 3 मधील येथील बॅ.क्र.1075 ते वडोजगावापर्यंत 100 mm व्यासाची जलवाहीनी टाकणे (मे.गुरूनानक म.स.सं.) | 198957 | 9948 | 3979 | 7958 | विमा Policy | 1990 | 175082 |

| **अ.क्र.** | **कामाचा तपशिल** | |
|---|---|---|
| 1 | ठेकेदाराचे नाव | मे. गुरूनानक मजूर सह.संस्था |
| 2 | अंदाजपत्रकीय रक्कम | रु.199000/- |
| 3 | तांत्रिक मान्यता क्र. | 11 दि.21/04/2011 |
| 4 | प्रशासकीय मान्यता क्र. | मा.आयुक्त यांची मान्यता |
| 5 | जिल्हा उपनिबंधकाची मान्यता क्र. | 375 दि.13/05/2011 |

| | | |
|---|---|---|
| 6 | कार्यादेश क्र. | 852 दि.06/06/2011 |
| 7 | कामाचा कालावधी | 30 दिवस |
| 8 | बिलाचा प्रकार | प्रथम व अंतिम देयक |
| 9 | मोजमाप पुस्तिका क्रमांक | 05 पृष्ठ क्र. 75-77 |
| 10 | काम पुर्ण दिनांक | 01/07/2011 |

| अ.क्र. | प्रमाणक क्र, दिनांक | तपशिल | देयकाची स्थुल रक्कम (रु.) | सुरक्षा रक्कम (रु.) | आयकर वजाती (रु.) | (VAT) (रु.) | कामाचा विमा (रु.) | उपकर (रु.) | निव्वळ देय रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 3070/ 30.09.11 | उल्हासनगर 3 मधील वॉर्ड क्र.54 मधील त्रिवेदी यांच्या घरापासून वडोलगावापर्यंत नवीन 100 mm व्यासाची जलवाहीनी टाकणे (मे.गुरूनानक म.स.सं.) | 211513 | 10576 | 4230 | 8461 | विमा Policy | 2115 | 186131 |

| **अ.क्र.** | **कामाचा तपशिल** | |
|---|---|---|
| 1 | ठेकेदाराचे नाव | मे. गुरूनानक मजूर सह.संस्था |
| 2 | अंदाजपत्रकीय रक्कम | रु.198630/- |
| 3 | तांत्रिक मान्यता क्र. | 12 दि.21/04/2011 |
| 4 | प्रशासकीय मान्यता क्र. | मा.आयुक्त यांची मान्यता |
| 5 | जिल्हा उपनिबंधकाची मान्यता क्र. | 374 दि.13/05/2011 |
| 6 | कार्यादेश क्र. | 856 दि.06/06/2011 |
| 7 | कामाचा कालावधी | 30 दिवस |
| 8 | बिलाचा प्रकार | प्रथम व अंतिम देयक |
| 9 | मोजमाप पुस्तिका क्रमांक | सी/2/3 पृष्ठ क्र. 108-110 |
| 10 | काम पुर्ण दिनांक | 21/06/2011 |

उपरोक्त कामाच्या अनुषंगाने उपलब्ध झालेल्या अभिलेख्यांच्या लेखापरीक्षणांती निदर्शनास आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.147 दि.10.02.2011 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त् आहे.सबब,पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 158 अन्वये नगरपालिकेच्या बांधकामांचे सर्व अंदाज , नगरपालिका अभियंता यांच्या कडून (अ) प्रशासनिक मंजुरीसाठी रेखांकित

नकाशे व जोते क्षेत्रफळासह प्राथमिक अंदाज (ब) तांत्रिक मंजुरीसाठी अंतिम तपशिलवार नकाशे व अंदाज यांचेसह असणे आवश्यक आहे. परंतू उपरोक्त नियमाप्रमाणे रेखांकीत नकाशासह कार्यवाही झाली असल्याचे निदर्शनास आले नाही. त्याचप्रमाणे History Register उपलब्ध झालेले नाही.

2. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 165 अन्वये कामाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष जागेच्या संबंधात स्थानिक निरीक्षण अंतिम तपशिलवार अंदाज तयार करण्याअगोदर केले पाहीजे. परंतू उपरोक्त नियमाप्रमाणे अनुसरणेत आलेली कार्यवाहीबाबत अहवाल आढळून आले नाहीत.

3. मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम,1949 मधील कलम 73(ड) नूसार मा.आयुक्तांनी त्यांच्या अधिकारात केलेल्या संविदा तदनंतर 15 दिवसात स्थायी समितीसमोर सादर करणे आवश्यक असतांना उपरोक्त कामासंदर्भात त्याप्रमाणे कार्यवाही अनुसरणेत आलेली नाही.

4. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची सन 2009-10 ची जिल्हा दर सुचीमधील सर्वसाधारण सुचना अ.क्र.7(a) नुसार नगरपालिका क्षेत्रातील कामाकरीता दर सुचीतील दरापेक्षा अतिरीक्त 5% दरवाढ अनुज्ञेय असतांना उपरोक्त कामांचे अंदाजपत्रक तयार करतांना तसेच प्रत्यक्ष खर्चाची रक्कम अदा करतांना 10% अतिरीक्त दरवाढ दिल्याने व दरसुचीपेक्षा जास्त दर दिल्याने , दरसुची सुचना क्र.9 नूसार पुरवठा करण्यात आलेल्या पाईप,व्हॉल,स्पेशल इ.साहीत्यांवर अतिरीक्त वाढ अनुज्ञेय नसतांना कंत्राटदारास अ.क्र. 1,2,3 च्या कामांत अनुक्रमे रु.8021/-,रु.19758/-,रु.21814/- असे एकूण रु.49593/- इतके अतिप्रदान झाले आहे.

5. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दरसूची सर्वसाधारण सुचना क्र 13.अन्वये पाईपचा पुरवठा ठेकेदाराने केल्यास 85% रक्कम अदा करून उर्वरित 15% रक्कम हायड्रॉलीक चाचणी समाधानकारक झालेनंतर करणे आवश्यक आहे.लेखापरीक्षणाकरीता हायड्रोलीक चाचणी अहवाल उपलब्ध झाला नाही. तो उपलब्ध करावा अन्यथा अ.क्र. 1,2,3, च्या कामातील 15% पाईपची व जलवाहीनी जोडणीच्या इतर साहित्याची रक्कम अनुक्रमे रु.11327/-,रु.28005/-,रु.29961/- असे एकूण रु.69293/- ठेकेदाराकडून वसूल करावे.

6. महसूल व वनविभाग शा.नि.क्र. गौण खनिज/10/1009/सीआर/309/ख दि.11/02/2010 अन्वये रु.70.67 घ.मी. दराने देयकातून रॉयल्टी कपात करणे आवश्यक आहे. सदर कामासाठी उत्खननातून निघालेले साहित्याचा अ.क्र. 1,2 व 3 च्या कामात अनुक्रमे 6.98, 24.16 व 27.71 घ.मी. वापर झाल्याने रॉयल्टीपोटी एकूण रु.4158/- ठेकेदाराकडून वसूल करणे आवश्यक आहे.

7. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 172 अन्वये नगरपालिका अभियंता काम चालू असतांना सर्व प्रकारच्या कामातील जितक्या कामाची तपासणी करणे शक्य होईल तितक्या कामांची तपासणी करील. तसेच त्याबाबतचे निरीक्षण अहवाल लेखापरीक्षणासाठी त्यांनी उपलब्ध केले पाहीजेत, अशी तरतूद आहे. परंतू सदर पर्यवेक्षण अहवाल लेखापरीक्षणाकरीता उपलबध न झाल्याने कामाचे योग्यरित्या पर्यवेक्षण झाले असल्याची पडताळणी करता आली नाही.

8. राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहितेमधील नियम क्र.12.82 (डी) नूसार कंत्राटदाराकडून प्राप्त झालेल्या बिल / इनव्हाईसची नोंद Journalise केल्यानंतरच कंत्राटदारास प्रदान करणेचे आवश्यक असतांना उपरोक्त कामासंदर्भात (बिजके)Invoice / चलन त्याचप्रमाणे नोंदवही लेखापरीक्षणाकरीता

उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. त्यामूळे प्रदानाच्या योग्यतेबाबत खात्री होत नाही.

9. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 183 अन्वये कामाची नोंदवही नमुना क्रमांक 139 प्रमाणे ठेवणे आवश्यक आहे. परंतु अ.क्र.1 व 2 च्या कामाची मोजमाप नोंदवही अ.क्र. क्र.84 B व 05 लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झालेली नाही.त्यामुळे झालेले काम तसेच प्रदान योग्य झालेबाबत खात्री करता येत नाही. तसेच अ.क्र.3 च्या कामाची मोजमाप पुस्तिका क्र. सी/2/3 उपलब्ध झालेली आहे. परंतू सदर मोजमाप नोंदवहीत कामाच्या प्रगतीनूसार दैनिक नोंदविण्यात आलेली नसून एकाचवेळी सर्व कामाची नोंद घेण्यात आलेली आहे.

10. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 180(3) नुसार रक्कम प्रदान करतांना मोजमाप पुस्तिकेतील नोंदी लाल शाईने फुली मारणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही. त्याचप्रमाणे मोजमाप पुस्तिकेत कामाच्या प्रगतीनूसार व दिनांकानूसार नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

11. खालील बाबींबाबत खर्चाची रक्कम ठोक स्वरूपात प्रदान करण्यात आलेली आहे. परंतू सदर रकमेचे दर विश्लेषण लेखापरीक्षणाकरीता प्राप्त झालेले नाही.

| कामाची बाब | प्रमाणक क्र.2662 | प्रमाणक क्र.3069 | प्रमाणक क्र.3070 |
|---|---|---|---|
| Prov.& Supply S & S Special | Rs.3285 | रु.10200 | रु.8000 |

12. उपरोक्त अ.क्र.1 च्या तात्रिक मंजूरीवर व त्यासोबत कामाच्या संकल्पचित्रावर कार्यकारी अभियंता यांनी स्वाक्षरी केली नसल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे सदर कामाच्या मंजूरीबाबत सत्यता पडताळणी करता येत नाही.

13. अंदाजपत्रकीय रक्कमेएवढीच रक्कम मजूर सहकारी संस्थेला प्रदान होणे आवश्यक असतांना उपरोक्त अ.क्र.3च्या कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु.198630/- इतकी असतांना सदर कामासाठी रु.211513/- इतका खर्च केल्याने रु.12883/- इतकी जादा रक्कम कंत्राटदारास प्रदान झालेली आहे.सदर रक्कम वसुलपात्र आहे.

<u>वसुलपात्र रक्कम</u> 1. दरसुचीपेक्षा 5% जादा दरवाढ दिलयाने रु.49593/-

2. हायड्रोलीक चाचणी अहवाल न घेतल्याने रु.69293/-

3. रॉयल्टी रु.4158/-

4. मजूर सह. संस्थेस अंदाजपत्रकापेक्षा जादा दराने प्रदान <u>रु.12883/-</u>

एकूण रु.135927/-

## *32 प्रभाग क्षेत्रात पाणी पुरवठा व मल नि:सारण सेवा(प्र.4)दुर्बल घटक अंतर्गत केलेल्या कामातील अनियमिततेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :310-2440 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 199376.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 72337.00/-

***कामाचा स्थळ पाहणी अहवाल तयार करण्यात आलेला नाही.स्थायी समितीची मान्यता घेणेत आलेली नाही.महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे दरसुचीतील दरापेक्षा जादा दराने अंदाजपत्रक तयार करण्यात आल्याने कंत्राटदारास अतिप्रदान झाले आहे.कामाचा हायड्रोलिक चाचणी अहवाल प्राप्त न करता पुर्ण रक्कम अदा करण्यात आली आहे.स्वामित्वधनाची रक्कम देयकातून कपात करून शासन जमा करण्यात आलेली नाही.सक्षम प्राधिकारी यांचेकडून कामाचे पर्यवेक्षण झाले नाही.मोजमाप नोंदवही लेखापरीक्षणाकरीता प्राप्त् झाली नाही.***

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात पाणी पुरवठा व जल-मल नि:सारण विभागामार्फत प्रभाग क्षेत्रात पाणी पुरवठा व मल नि:सारण सेवा(प्र.4)दुर्बल घटक अंतर्गत केलेल्या कामाकरीता खालीलप्रमाणे रक्कम अदा करण्यात आली आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्र ,दिनांक व चेक क्र. | तपशिल | देयकाची स्थुल रक्कम (रु.) | सुरक्षा रक्कम (रु.) | आयकर वजाती (रु.) | (VAT) (रु.) | विमा (रु.) | उपकर (रु.) | निव्वळ दे रक्कम (रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1074/ 07.06.2011 | उल्हासनगर 4 मधील वॉर्ड क्र.64 येथील भारतनगर,नागसेन नगर व कुर्ला कॅम्प येथे 100 mm व्यासाची जलवाहीनी टाकणे (मे.श्रध्दा म.स.सं.) | 199376 | 9969 | 3988 | 7975 | 1994 | 1994 | 173456 |

| अ.क्र. | कामाचा तपशिल | |
|---|---|---|
| 1 | ठेकेदाराचे नाव | मे. श्रध्दा मजूर सह.संस्था |
| 2 | अंदाजपत्रकीय रक्कम | रु.198944/- |

| | | |
|---|---|---|
| 3 | तांत्रिक मान्यता क्र. | 159 दि.06/10/2010 |
| 4 | प्रशासकीय मान्यता क्र. | मा.आयुक्त यांची मान्यता |
| 5 | जिल्हा उपनिबंधकाची मान्यता क्र. | 3861 दि.06/12/2010 |
| 6 | कार्यादेश क्र. | 4476 दि.18/12/2010 |
| 7 | कामाचा कालावधी | 30 दिवस |
| 8 | बिलाचा प्रकार | प्रथम व अंतिम देयक |
| 9 | मोजमाप पुस्तिका क्रमांक | 06 पृष्ठ क्र. 28-31 |
| 10 | काम पुर्ण दिनांक | 03/01/2011 |

उपरोक्त कामाच्या अनुषंगाने उपलब्ध झालेल्या अभिलेख्यांच्या लेखापरीक्षणांती निदर्शनास आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.146 दि.10.02.2014 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त् आहे.सबब,पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 158 अन्वये नगरपालिकेच्या बांधकामांचे सर्व अंदाज , नगरपालिका अभियंता यांच्या कडून (अ) प्रशासनिक मंजुरीसाठी रेखांकित नकाशे व जोते क्षेत्रफळासह प्राथमिक अंदाज (ब) तांत्रिक मंजुरीसाठी अंतिम तपशिलवार नकाशे व अंदाज यांचेसह असणे आवश्यक आहे. परंतू उपरोक्त नियमाप्रमाणे रेखांकीत नकाशासह कार्यवाही झाली असल्याचे निदर्शनास आले नाही. त्याचप्रमाणे History Register उपलब्ध झालेले नाही.

2. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 165 अन्वये कामाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष जागेच्या संबंधात स्थानिक निरीक्षण अंतिम तपशिलवार अंदाज तयार करण्याअगोदर केले पाहीजे. परंतू उपरोक्त नियमाप्रमाणे अनुसरणेत आलेली कार्यवाहीबाबत अहवाल आढळून आले नाहीत.

3. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची सन 2009-10 ची जिल्हा दर सुचीमधील सर्वसाधारण सुचना अ.क्र.7(a) नुसार नगरपालिका क्षेत्रातील कामाकरीता दर सुचीतील दरापेक्षा अतिरीक्त 5% दरवाढ अनुज्ञेय असतांना उपरोक्त कामांचे अंदाजपत्रक तयार करतांना तसेच प्रत्यक्ष खर्चाची रक्कम अदा करतांना 10% अतिरीक्त दरवाढ दिल्याने व दरसुचीपेक्षा जास्त दर दिल्याने, दरसुची सुचना क्र.9 नूसार पुरवठा करण्यात आलेल्या पाईप,व्हॉल,स्पेशल इ.साहीत्यांवर अतिरीक्त वाढ अनुज्ञेय नसतांना कंत्राटदारास रु.37174/- इतके अतिप्रदान झाले आहे.

4. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दरसूची सर्वसाधारण सुचना क्र 13.अन्वये पाईपचा पुरवठा ठेकेदाराने केल्यास 85% रक्कम अदा करून उर्वरित 15% रक्कम हायड्रोलीक चाचणी समाधानकारक झालेनंतर करणे आवश्यक आहे. लेखापरीक्षणाकरीता हायड्रॉलिक चाचणी अहवाल उपलब्ध झाला नाही. तो उपलब्ध करावा अन्यथा पाईपची व जलवाहीनी जोडणीच्या इतर साहित्याची15 % रक्कम असे एकूण रु.24393/- ठेकेदाराकडून वसूल करावे.

5. महसूल व वनविभाग शा.नि.क्र. गौण खनिज/10/1009/सीआर/309/ख दि.11/02/2010 अन्वये रु.70.67 घ.मी. दराने देयकातून रॉयल्टी कपात करणे आवश्यक आहे. सदर कामासाठी उत्खननातून निघालेले खडी/वाळू/रबल इत्यादी साहित्याचा 59.43 घ.मी. वापर झाल्याने रॉयल्टीपोटी एकूण रक्कम रु.4200/-

ठेकेदाराकडून वसूल करणे आवश्यक आहे.

6. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 172 अन्वये नगरपालिका अभियंता काम चालू असतांना सर्व प्रकारच्या कामातील जितक्या कामाची तपासणी करणे शक्य होईल तितक्या कामांची तपासणी करील. तसेच त्याबाबतचे निरीक्षण अहवाल लेखापरीक्षणासाठी त्यांनी उपलब्ध केले पाहीजेत, अशी तरतूद आहे. परंतू सदर पर्यवेक्षण अहवाल लेखापरीक्षणाकरीता उपलबध न झाल्याने कामाचे योग्यरित्या पर्यवेक्षण झाले असल्याची पडताळणी करता आली नाही.

7.राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहितेमधील नियम क्र.12.82 (डी) नूसार कंत्राटदाराकडून प्राप्त झालेल्या बिल / इनव्हाईसची नोंद Journalise केल्यानंतरच कंत्राटदारास प्रदान करणेचे आवश्यक असतांना उपरोक्त कामासंदर्भात (बिजके)Invoice / चलन त्याचप्रमाणे नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. त्यामूळे प्रदानाच्या योग्यतेबाबत खात्री होत नाही.

8. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 183 अन्वये कामाची नोंदवही नमुना क्रमांक 139 प्रमाणे ठेवणे आवश्यक आहे. परंतु मोजमाप नोंदवही क्र.06 लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झालेली नाही.त्यामुळे झालेले काम तसेच प्रदान योग्य झालेबाबत खात्री करता येत नाही.

9. खालील बाबींबाबत खर्चाची रक्कम ठोक स्वरूपात प्रदान करण्यात आलेली आहे. परंतू सदर रकमेचे दर विश्लेषण लेखापरीक्षणाकरीता प्राप्त झालेले नाही.

| कामाची बाब | |
|---|---|
| Prov.& Supply S & S Special | रु.13784.36 |

10. उपरोक्त कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु.198944/- इतकी असतांना सदर कामासाठी रु.199376/- इतका खर्च केल्याने रु.432/- इतकी जादा रक्कम कंत्राटदारास प्रदान झालेली आहे.

11. सदर कामाकरीता बाब क्र.6 - उत्खननातून खनिज काढणे करीता 18 घनमीटरसाठी रु.341/- प्रमाणे रु.6138/- प्रदान केले आहे. परंतू बाब क्र.4 व 5 अन्वये उत्खनन करणे व माती काढणे यातील प्रदान रकमेत सदर रक्कम अंतर्भुत असतांना बाब क्र.6 करीता रुपये 6479/-अतिप्रदान झाले आहे.

12. सदर कामाच्या प्रस्तावित नकाशामध्ये ज्याप्रमाणे काम निश्चित करण्यात आले आहे, त्याप्रमाणे काम करणे आवश्यक असतांना सक्षम प्राधिका-याची मंजूरी न घेता कामात बदल करण्यात आला असल्याचे दिसून आले आहे.

DATPVWM7501 (Ref No : 109, Hmm No : 146)

## *33 उल्हासनगर नं.3 वॉर्ड क्र.41 मधील पंजाबी कॉलनी येथे शास्त्रीनगरकरीता लाईन बुस्टरसाठी खोली बांधण्याबाबत कामातील अनियमितता..*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :310-4340 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 90974.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 13037.00/-

***कामाचा स्थळ पाहणी अहवाल तांत्रिक मंजूरीकरीता सादर करण्यात आलेला नाही. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे दरसुचीतील दरापेक्षा जादा दराने अंदाजपत्रक तयार करण्यात आल्याने कंत्राटदारास अतिप्रदान झाले आहे. सक्षम प्राधिकारी यांचेकडून कामाचे पर्यवेक्षण झाले नाही.स्वामित्वधनाची रक्कम देय रक्कमेमधून कपात करून शासन जमा करण्यात आली नाही.***

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात उल्हासनगर नं.3 वॉर्ड क्र.41 मधील पंजाबी कॉलनी येथे शास्त्रीनगरकरीता लाईन बुस्टरसाठी खोली बांधण्याबाबत कामाकरीता खालीलप्रमाणे रक्कम खर्च करण्यात आलेली आहे.

| **अ.क्र.** | प्रमाणक क्र., दिनांक व **चेक क्र.** | **कामाचा तपशिल** | **देयकाची स्थुल रक्कम (रु.)** | **सुरक्षा रक्कम (रु.)** | **आय कर वजाती (रु.)** | **VAT** (रु.) | **विमा (रु.)** | **उपकर (रु.)** | **निव्वळ देय रक्कम रुपये** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | 2630 / 03/09/ 2011- 843728 | उल्हासनगर नं.3 वॉर्ड क्र.41 मधील पंजाबी कॉलनी येथे शास्त्रीनगरकरीता लाईन बुस्टरसाठी खोली बांधण्याबाबत. | 90974 | 4549 | 1819 | 3639 | 910 | 910 | 79147 |

| **अ.क्र.** | **कामाचा तपशिल** | |
|---|---|---|
| 1 | ठेकेदाराचे नाव | मे. भिमरतन मजूर सह.संस्था |
| 2 | अंदाजपत्रकीय रक्कम | रु.88030/- |
| 3 | तांत्रिक मान्यता क्र. | 146 दि.01/10/2010 |

| | | |
|---|---|---|
| 4 | प्रशासकीय मान्यता क्र. | मा.आयुक्त यांची मान्यता |
| 5 | जिल्हा उपनिबंधकाची मान्यता क्र. | 3857 दि.06/12/2010 |
| 6 | कार्यादेश क्र. | 4548 दि.28/12/2010 |
| 7 | कामाचा कालावधी | 30 दिवस |
| 8 | बिलाचा प्रकार | प्रथम व अंतिम देयक |
| 9 | मोजमाप पुस्तिका क्रमांक | 80 सी पृष्ठ क्र. 103-108 |
| 10 | काम पुर्ण दिनांक | 27/01/2011 |

उपरोक्त कामाच्या अनुषंगाने उपलब्ध झालेल्या अभिलेख्यांच्या लेखापरीक्षणांती निदर्शनास आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.148 दि.10.02.2014 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त् आहे.सबब,पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 165 अन्वये कामाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष जागेच्या संबंधात स्थानिक निरीक्षण अंतिम तपशिलवार अंदाज तयार करण्याअगोदर केले पाहीजे. परंतू उपरोक्त नियमाप्रमाणे अनुसरणेत आलेल्या कार्यवाहीबाबत स्थळ पाहणी निरीक्षण अहवाल आढळून आलेला नाही.

2. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 172 अन्वये नगरपालिका अभियंता काम चालू असतांना सर्व प्रकारच्या कामातील जितक्या कामाची तपासणी करणे शक्य होईल, तितक्या कामांची तपासणी करील. तसेच त्याबाबतचे निरीक्षण अहवाल लेखापरीक्षणासाठी त्यांनी उपलब्ध केले पाहीजेत. अशी तरतूद आहे. परंतू सदर पर्यवेक्षण अहवाल लेखापरीक्षणाकरीता उपलबध न झाल्याने कामाचे योग्यरित्या पर्यवेक्षण झाले असल्याची पडताळणी करता आली नाही.

3. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची सन 2009-10 ची जिल्हा दर सुचीमधील सर्वसाधारण सुचना अ.क्र.7(a) नुसार नगरपालिका क्षेत्रातील कामाकरीता दर सुचीतील दरापेक्षा अतिरीक्त 5% दरवाढ अनुज्ञेय असतांना उपरोक्त कामांचे अंदाजपत्रक तयार करतांना तसेच प्रत्यक्ष खर्चाची रक्कम अदा करतांना 10% अतिरीक्त दरवाढ दिल्याने व दरसुचीपेक्षा जास्त दर दिल्याने कंत्राटदारास रु.11953/- इतके अतिप्रदान झाले आहे.

4. महसूल व वनविभाग शा.नि.क्र. गौण खनिज/10/1009/सीआर/309/ख दि.11/02/2010 अन्वये रु.70.67 घ.मी. दराने देयकातून रॉयल्टी कपात करणे आवश्यक आहे. सदर कामासाठी उत्खननातून निघालेले खडी/वाळू/रबल इत्यादी साहित्याचा 15.34 घ.मी. वापर झाल्याने रॉयल्टीपोटी एकूण रक्कम रु.1084/- ठेकेदाराकडून वसूल करणे आवश्यक आहे.

5. राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहितेमधील नियम क्र.12.82 (डी) नूसार कंत्राटदाराकडून प्राप्त झालेल्या बिल / इनव्हाईसची नोंद Journalise केल्यानंतरच कंत्राटदारास प्रदान करणेचे आवश्यक असतांना उपरोक्त कामासंदर्भात (बिजके)Invoice / चलन त्याचप्रमाणे नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. त्यामूळे प्रदानाच्या योग्यतेबाबत खात्री होत नाही.

6. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 183 अन्वये कामाची नोंदवही नमुना क्रमांक 139 प्रमाणे ठेवणे आवश्यक आहे. परंतु मोजमाप नोंदवही क्र.80-सी मधील कामाच्या नोंदी दररोज कामाच्या प्रगतीनूसार नोंदविणे आवश्यक असताना पुर्ण कामाची एकच नोंद घेण्यात आलेली आहे. त्यामुळे झालेले काम तसेच प्रदान योग्य झालेबाबत पडताळणी करता येत नाही.

त्याचप्रमाणे महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 180(3) नुसार रक्कम प्रदान करतांना मोजमाप पुस्तिकेतील नोंदी लाल शाईने फुली मारणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

7. नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 155 नुसार स्थावर मालमत्ता नोंदवही ठेवून त्यामध्ये कामाची नोंद करणे आवश्यक आहे. ही नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलबध न झाल्याने सदर कामाची नोंद नोंदवहीत करण्यात आल्याची पडताळणी करता आली नाही.

8. खालील बाबींबाबत खर्चाची रक्कम ठोक स्वरूपात प्रदान करण्यात आलेली आहे. परंतू सदर रकमेचे दर विश्लेषण लेखापरीक्षणाकरीता प्राप्त झालेले नाही. तरी साधार अनुपालन करावे.

| कामाची बाब | |
|---|---|
| पाईपलाईन | रु.10000 |

9. महसूल व वनविभाग शा.नि.क्र. गौण खनिज/10/1009/सीआर/309/ख दि.11/02/2010 अन्वये रु.70.67 घ.मी. दराने देयकातून रॉयल्टी कपात करणे आवश्यक आहे. सदर कामासाठी उत्खननातून निघालेले खडी/वाळू/रबल इत्यादी साहित्याचा वापर झाल्याने रॉयल्टीपोटी एकूण रक्कम रु.1084/-ठेकेदाराकडून वसूल करून शासन जमा करणे आवश्यक आहे.

DATPVWM7501 (Ref No : 111, Hmm No : 148)

## *34 नवीन नळ जोडणीच्या अनुषंगाने आकारण्यात आलेल्या रस्ता खोदाई शुल्काच्या कमी आकारणीबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 56554.00/-

***नवीन नळ जोडणीच्या खोदाई शुल्काची कमी आकारणी केल्यामुळे संबंधित ग्राहकांकडून कमी रक्कम मनपा निधीत जमा करण्यात आली आहे. पाणी पटटी देयकाची रक्कम मालमत्ता कराच्या देयकात एकत्र असल्यामुळे नोंदणीकृत मालमत्तेनूसार पाणी पटटी आकारलेली जाते. परंतू एकाच मालमत्तेकरीता दोन नळ जोडणी मंजूर करण्यात आल्याच्या प्रकरणी एका जोडणीची पाणीपटटी आकारणी केलेली नाही.***

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात नवीन नळ जोडणी करणे किंवा खंडीत करण्यात आलेल्या नळ जोडणीची पुनर्जोडणी करणे यासाठी खालीलप्रमाणे शुल्क आकारण्यास महासभा ठराव क्र.36

दि.30.07.2007 अन्वये मान्यता दिलेली आहे.

| अ.क्र. | नळ जोडणी आकार (मी.मी.) | रस्ता खोदाई खर्च | |
|---|---|---|---|
| 1 | 15 मी.मी. | रु.1000/- किमान | |
| 2 | 20 मी.मी. | रु.1000/ किमान | **1.**कच्च्या रस्त्यासाठी प्र.मीटर रु.350/- |
| 3 | 25 मी.मी. | रु.1000/-किमान | **2.** डांबरी रस्त्यासाठी प्र. मीटर रु.700 |
| 4 | 40 मी.मी. | रु.1000/-किमान | **3.**कॉंक्रिट रस्त्यासाठी प्र.मीटर रु.1500/- |
| 5 | 50 मी.मी. | रु.1000/-किमान | |

उमपा क्षेत्रातील नवीन नळ जोडणीच्या अनुषंगाने प्रकरणांची तपासणी केली असता खालील प्रकरणांत रस्ता खोदाई शुल्काची कमी आकारणी करण्यात आली असल्याचे दिसून आले आहे. **(खोदाई करण्यात आलेला रस्त्याचा प्रकार नस्तीत नमूद न केल्यामुळे (किमान) कच्च्या रस्त्यासाठीचे शुल्क रु.350/- प्रती मीटर प्रमाणे गृहीत धरून सुधारीत परिगणना करण्यात आलेली आहे.)**

| **अ.क्र** | **ग्राहकाचे नाव** | **प्रकरण क्र.** | **नळ जोडणी व्यास व लांबी** | **आकारलेले खोदाई शुल्क रुपये** | **आकारणे आवश्यक खोदाई शुल्क रु.** | **कमी घेतलेली रक्कम रु.** |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती सुलोचना जे. वालेचा | यु/5(1)/11/2011 | 15 mm 3 मी. | 1000 | 1050 | 50 |
| 2 | श्री.शाम टेकचंदानी | 015(1)/12/2011 | 15 mm 6 m | 1000 | 2100 | 1100 |
| 3 | श्री.शाम टेकचंदानी | 015(1)/12/2011 | 15 mm 6 m | 1000 | 2100 | 1100 |
| 4 | नरेश जे. दुलानी | 013/21/2011 | 15 mm 30 m | 1000 | 10500 | 9500 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 5 | श्रीमती इंदिरा आशापाल | 013/20/2011 | 15mm<br>20 m | 2400 | 7000 | 4600 |
| 6 | श्रीमती पदमिनी बलदेव | 015/08/2011 | 15mm<br>6 m | 1000 | 2100 | 1100 |
| 7 | साई कमल पॅरडाईज्ड | Add/P/3/26/11 | 15mm<br>18 m | 1000 | 6300 | 5300 |
| 8 | श्री.नानिक अहूजा | 012/23/2011 | 15mm<br>60 m | 1000 | 22750 | 21750 |
| 9 | गुलराज टॉवर | ॲडीशन पी/03/83 | 15mm<br>10 m | 1000 | 3500 | 2500 |
| | | | | | **एकूण** | **47000/-** |

त्याचप्रमाणे खालीलप्रमाणे इतर अनियमितता निदर्शनास आलेल्या आहेत.

1. उपरोक्त अ.क्र.1ची मालमत्ता श्री.रमेशलाल नागदेव यांची असतांना श्रीमती सुलोचना वालेचा यांचे नावे नळ जोडणी मंजूर करण्यात आली.

2. उपरोक्त अ.क्र.2 व 3 नूसार एकाच ग्राहकास दोन नळ जोडणी मंजूर करण्यात आली आहे. पाणी पटटीची रक्कम मालमत्ता कराच्या बिलात समाविष्ट असल्यामुळे एका निवासासाठी दोन जोडणी दिल्यामूळे एकाच जोडणीचे पाणी पटटीचे देयक आकारले आहे. त्यामुळे दुस-या जोडणीचे पाणी पटटीपोटी रक्कम संबंधित मालकाकडून वसुल होणे आवश्यक आहे.

3. उल्हासनगर महानगरपालिका शाळा क्र.30 मधील सहा खोल्या आरोग्य जीवन धाम संस्थेस शिक्षण मंडळ ठराव क्र.87 दि.22/02/2011 अन्वये भाडयाने देण्यात आलेल्या होत्या. दोघांमधील करारातील अट क्र.9 नूसार पाणी पुरवठा व नळ जोडणीची कामे संस्थेने स्वखर्चाने करावीत त्याचप्रमाणे पाणी बिल व विज बिल भरण्याची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. असे नमूद आहे. उमपा शाळेकरीता पाणी शुल्क माफ असल्यामूळे आरोग्य जीवन संस्थेसही पाणी बिल आकारण्यात येत नसल्याची शक्यता आहे. याबाबत अपु-या लेख्याअभावी लेखापरीक्षणात पडताळणी करता आली

नाही.

4. उपरोक्त अ.क्र.5 नूसार नळ जोडणी मंजूर केलेल्या मालमत्तेचे मालक श्री.गोपालदास धर्मादास असतांना श्रीमती इंदिरा आशापाल यांचे अर्जानूसार नळ जोडणी मंजूर करण्यात आली आहे.

5. उपरोक्त अ.क्र.7 ची मालमत्ता श्री.हिरालाल कलानी यांचे नावे असतांना श्री अहूजा यांचे नावे नवीन नळ जोडणी मंजूर करण्यात आली आहे.

6. मे.साईबाबा शैक्षणिक संस्था यांनी त्यांच्या दि.21.06.2011 च्या अर्जान्वये नळ जोडणी बिलावरील नाव बदली करणेबाबत विनंती अर्ज केला होता. सदर मालमत्तेचे अगोदरचे मालक मे. देवास यांच्या कालावधीतील मार्च 2000 पर्यंत रु.18562/- , सन 2000 ते 31.05.2011 पर्यंतची रु.84617/- व विलंब आकार रु.9554/- असे एकूण रु.1,12,733/- इतकी रक्कम प्रलंबित असतांना मे. देवास यांनी रु.103179/- इतकी रक्कम भरणा केल्याचे दिसून आले आहे. तरी उर्वरीत रक्कम रु.9554/- वसुलपात्र आहे.

7. मे.मेहतर समाज रोजगार कल्याण समिती यांनी नवीन नळ जोडणीपोटी रु.7300/- इतकी रक्कम भरणा केलेल्या पावतीची नोंद पाणी पुरवठा विभागामार्फत ठेवण्यात आलेल्या नोंदवहीत केलेली नाही. त्याचप्रमाणे जमा पावतीची स्थळ प्रत लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून न दिल्यामुळे पडताळणी करता आली नाही.

8. जया माणिक जेसवाणी यांनी नवीन नळ जोडणीपोटी रु.11600/- इतकी रक्कम भरणा केलेल्या पावतीची नोंद पाणी पुरवठा विभागामार्फत ठेवण्यात आलेल्या नोंदवहीत केलेली नाही. त्याचप्रमाणे जमा पावतीची स्थळ प्रत लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून न दिल्यामुळे पडताळणी करता आली नाही.

उपरोक्तबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.187 दि.14.02.2014 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त् आहे.सबब,आक्षेप कायम करण्यात येत आहेत.

DATPVWM7501 (Ref No : 116, Hmm No : 187)

## *35 निर्मल अभियान अंतर्गत केलेल्या कामाच्या देयकातून खोदकाम केलेल्या परीमाणापेक्षा जादा सामग्रीचे परिमाण वाहतूक केल्याचे दाखविल्याने झालेले अतिप्रदान रु.112291*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 112291.00/-

***निर्मल एम.एम.आर. योजनेखालील काही निवडक प्रमाणकांची तपासणी केली असता संबंधित कामाच्या प्राकलनात खोदकाम परिमाना पेक्षा जास्त परिमाणाची वाहतुक दर्शविलेली आहे.तसेच त्याप्रमाणे मक्तेदारास प्रदान करण्यात आल्यामुळे मक्तेदाराना अतिप्रदान झालेले आहे.***

निर्मल एम.एम.आर. योजनेखालील काही निवडक प्रमाणकांची तपासणी केली असता संबंधित कामाच्या अंदाजपत्रकात खोदकाम केलेल्या परिमाणापेक्षा वाहतुक केल्याचे परिमाण जादा दाखविण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे मक्तेदाराना प्रदान करण्यात आलेले असल्याने अतिप्रदान झालेले आहे.. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| **अ.क्र** | **कामाचे नाव** | **मक्तेदाराचे नाव** | **कार्यादेश क्रमांक व दिनांक** | **खोदकाम केलेले परिमान** | **वाहतुक केलेले परिमान** | **फरक** | **दर** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1 | गोळी कारखाना 10 सिटसचे टॉयलेट | जागरूक महिला मंडळ | 43/ 21.2.2009 | 180.49 प्र.घ.मि.. | 321.03 प्र.घ.मि | 140.54 प्र.घ.मि | 82.10 | 11538 |
| 2 | जय जनता कॉलनी 14 सिटसचे बांधकाम | जागरूक महिला मंडळ | 83/ 29.2.2009 | 115.45 प्र.घ.मि | 331.51 प्र.घ.मि | 216.06 प्र.घ.मि | --“-- | 17739 |
| 3 | आझादनगर 10 सिटसचे टॉयलेट | जागरूक महिला मंडळ | 43/ 21.2.2009 | 159.62 प्र.घ.मि | 240.59 प्र.घ.मि | 80.97 प्र.घ.मि | --“-- | 6647 |
| 4 | 14 सिटस टॉयलेट बांधणे सी.एच.एस. कॉलेज | जागरूक महिला मंडळ | 42/ 21.2.2009 | 178.50 प्र.घ.मि | 318.08 प्र.घ.मि | 139.52 प्र.घ.मि | --“-- | 11454 |
| 5 | नेहरू नगर 12 सिटसचे टॉयलेट | जागरूक महिला मंडळ | 120/ 6.6.2010 | 15.04 प्र.घ.मि | 32.01 प्र.घ.मि | 16.87 प्र.घ.मि | --“-- | 1385 |
| 6 | सूभाषनगर 16 सिटसचे टॉयलेट | जागरूक महिला मंडळ | 157/ 21.2.2009 | 214.31 प्र.घ.मि | 275.52 प्र.घ.मि | 61.21 प्र.घ.मि | --“-- | 5025 |
| 7 | कमला नेहरू नगर 10 सिटसचे टॉयलेट | जागरूक महिला मंडळ | 3/ 21.2.2009 | 41.93 प्र.घ.मि | 288 प्र.घ.मि | 246.07 प्र.घ.मि | --“-- | 20202 |
| 8 | प्रभाग 36 येथे 12 | जागरूक | 92/ 21.2.2009 | 131.80 | 373.70 | 241.90 | --“-- | 19860 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सिटसचे टॉयलेट | महिला मंडळ | | प्र.घ.मि | प्र.घ.मि | प्र.घ.मि | | |
| 9 | गोपाळ समाज मंदिर 16 सिटसचे टॉयलेट | जागरूक महिला मंडळ | 68/ 21.2.2009 | 158.55 प्र.घ.मि | 383.17 प्र.घ.मि | 224.62 प्र.घ.मि | --"-- | 18441 |
| | | | | | | | **एकूण** | **112291** |

वरील कामाच्या देयकातून खोदकाम केलेल्या परिमाणापेक्षा जादा वाहतुक केल्याचे दाखविण्यात आल्याने रूपये 112291 चे अतिप्रदान झाल्याचे दिसून येते. तसेच निर्मल एम.एम.आर. खाली पारित झालेल्या सर्व देयकाची पुन:तपासणी करून खोदकामापेक्षा जादा परिमाणाची वाहतुक करण्यात आलेली आहे किवा कसे याची तपासणी करून तसे अनुपालन लेखा परिक्षणास सादर केलेले नाही. सदर बाबत संबंधित विभागास अर्ध समास क्रमांक 183 दिनांक 14/02/14 अन्वये विचारणा करण्यात आली होती. विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.
वसुलपात्र रक्कम रु.112291

DATDBWM5801 (Ref No : 144, Hmm No : 183)

## *36 करारनाम्यावरील मुद्रांक शुल्काची रक्कम वसुल न केल्यामुळे शासनाच्या महसुलाचे झालेले नुकसान*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :9511150 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1268527460.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 2542540.00/-

***मे.कोणार्क इन्फ्रास्टक्चर्स लिमिटेड यांचेसोबत जकात ठेका करारनामा करतांना मुद्रांक शुल्काची रककम रु.2542540 कमी वसुल केल्यामुळे शासन महसुलाचे नुकसान झाले.***

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 35 अन्वये स्थायी समितीच्या मंजुरीने खाजगी अभिकर्ता नेमण्याचे अधिकार आयुक्तांना आहेत. त्यानुसार महासभा ठराव क्रमांक 69 दि.10.02.2011 अन्वये खाजगी अभिकर्त्यामार्फत जकात वसुली करण्याचा ठराव पारित करण्यात आला आहे. 2010-11 ची मान्य केलेली निविदा रक्कम रु.114,61,46,071/- होती. त्यामध्ये 10 टक्के नैसर्गिक वाढ रु.11,46,14,607/- करुन 2011-12 साठीची किमान देकार रक्कम रु.126,07,60,678/- निश्चित करण्यात आली.

त्यासाठी दै.लोकसता, दै.नवभारत व D.N.A. या वृतपत्रामध्ये जाहीर निविदा सूचना क्रमांक

UMC/PRO/402/2011 दिनांक 11/03/2011 रोजी प्रसिध्द करण्यात आली. को-या निविदा विक्रीचा कालावधी दिनांक 11/03/11 ते 22/03/11 असा होता. निविदा सादर करण्याचा शेवटचा दिनांक 24/03/11 असा होता. निविदेच्या अखेरच्या दिनांकापर्यन्त एकूण चार निविदा प्राप्त झाल्या निविदा पाकीट क्रमांक ( तांत्रिक लिफाफा) 1 दि.24/03/11 रोजी उघडल्या असता, दोन निविदा पात्र ठरल्या. दिनांक 25/03/2011 रोजी पात्र निविदांचे (दरपत्रकांचे पाकीट) क्र.2 उघडले. त्यामध्ये मे.कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर्स लिमिटेड यांची देकार रक्कमेची बोली रु.127,10,70,000/- ही सर्वाधिक व किमान देकार रक्कमेपेक्षा जास्त असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 73 (क) नुसार आयुक्त, यांना निविदाकारांशी करार करण्यास मंजुरी मिळण्यासाठी प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवण्यात आला. स्थायी समितीने त्यास ठराव क्रमांक 149 दिनांक 28.03.2011 नुसार मान्यता दिली. महापालिकेने दि.29.03.2011 रोजी मे.कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर्स लिमिटेड यांचेशी करारनामा केला. कराराचा कालावधी 1.04.11 ते 31.03.12 असा होता. उपायुक्त(जकात) यांचेकडील आदेश क्रमांक उमपा/जकात विभाग/146/11, दिनांक 29/03/11 नुसार कार्यादेश देण्यात आला.

वरील जकात ठेका नस्तीचे लेखापरिक्षण केले असता, खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1. मे.कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर्स लिमिटेड यांचेशी जकात ठेक्याचा केलेला करारनामा रु.100/- च्या मुद्रांक शुल्कावर करण्यात आला आहे. करारनाम्यातील कराराची रक्कम रु. 127,10,70,000/- एवढी होती. करारनाम्यातील रक्कमेवर मुद्रांक शुल्काची रक्कम निश्चित करण्याकरीता मे.कोणार्क इन्फ्रास्टक्चर्स लिमिटेड यांनी मुद्रांक जिल्हाधिकारी, ठाणे ( ग्रामीण) यांचेकडे मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे अंतर्गत कलम 31 पोटनियम (1) मधील तरतुदीनुसार दि.08.04.2011 रोजी अभिनिर्णयाकरीता अर्ज दाखल करुन संलेखातील मुद्रांकाबाबत अभिनिर्णय मिळण्यासाठी विनंती केली. त्यावर मुद्रांक जिल्हाधिकारी, ठाणे ( ग्रामीण) यांनी सदर दस्तास मुंबई मुद्राक अधिनियम 1958 चे अनुसूची 1 मधील अनुच्छेद 5(h) a iv नुसार करार मूल्य रक्कम रु.127,10,70,000/- यावर रु.25,42,140/- व 54(ii) नुसार गॅरंटी मुल्य रु.20,17,21,708/- यावर रु.400/- व 48 ड नुसार जकात वसुलीच्या अधिकाराबाबत रक्कम रु.100/- असे एकूण रु.25,42,640/- इतके मुद्रांक शुल्क आकारणेबाबत आदेश देण्यात आला आहे. त्यानुसार संबंधित जकात अभिकर्त्याकडून रु.100/- वगळून रु.2542540/- इतकी रक्कम मुद्रांक शुल्कापोटी वसूल करुन शासन सदरी जमा करणे आवश्यक होते. तथापि, अशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही. याबाबत

अर्धसमास पत्र कंमांक 186 दिनांक 14/02/2014 नुसार विभागास विचारणा केली असता, विभागाने लेखापरिक्षणाचे अंतिम तारखेपर्यंत कोणतेही उत्तर दिले नाही.

DATDSAM7301 (Ref No : 10, Hmm No : 186)

## *37 प्रभाग समिती नं.4 येथील सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयाची रंगरंगोटी करण्यासाठी केलेल्या खर्चामधील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 37319.00/-

***मनपाच्या प्रभाग समिती-4 च्या कार्यालयाकरीता फर्निचर खरेदी करतांना शासन निर्णय 2.01.1992 मधील तरतुदीनुसार विहीत पध्दतीचा अवलंब न करता खरेदी केली. आयुक्तांची मंजुरी रंगरंगोटी साठी असताना फर्निचर खरेदी केले. अधिकृत फर्निचर विक्रेत्याकडून दरपत्रके न मागविता बांधकाम व्यावसायिकांकडून दरपत्रके मागवून खरेदी केली.***

प्रमाणक क्रं. 2792 दि. 15.09.11

प्रभाग समिती क्रमांक 4 येथील सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयाची रंगरंगोटी करण्यासाठी आयुक्त यांनी दि.1.07.2011 रोजीच्या टिप्पणीव्दारे रु.49900/-च्या खर्चास प्रशासकीय मान्यता दिली आहे. त्यानुसार कार्यकारी अभीयंता यांनी दिनांक 02.07.2011 रोजी दरपत्रके मागविण्याकरीता सूचना पत्रे दिल्याचे दिसून येते. खालील पुरवठाधारकांनी दिनांक नसलेली दरपत्रके सादर केली आहेत.

1. जंकुश कन्स्ट्रक्शन इंजिनिअर्स .
2. शिवाजी मजूर कामगार सहकारी संस्था
3. मुंब्रादेवी मजुर कामगार सहकारी संस्था मर्यादित

कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्रमांक 6.07.2011 नुसार मे. जंकुश कन्स्ट्रक्शन इंजिनिअर्स यांना खालील पुरवठा आदेश दिले आहेत.

| अ.क्र. | साहित्याचे नांव | नग | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| 1 | Chairs | 02 | 19300 |
| 2 | Table | 01 | 8943 |
| 3 | Wooden Door | 01 | 9076 |
| | | | 37319 |

वरील साहित्य खरेदी नस्तीचे लेखा परीक्षण केले असता खालील अनियमितता झाल्याचे आढळून आले आहे.

1. प्रभाग समिती क्र. 4 येथील सार्वजनिक बांधकाम कार्यालयाचे फर्निचर खरेदीची मान्यता नसतांना फर्निचर खरेदी केले आहे. ही बाब नियमबाहय आहे. सदर फर्निचर खरेदीस मान्यता नसल्यामुळे

फर्निचर खरेदी पोटी केलेल्या खर्चाची रक्कम रु. 37319/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

2. उदयोग, उर्जा व कामगार विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रं.भांखस.1088/(2512)/उदयोग-6, दि.2 जानेवारी 1992 मधील परि. 8.1 नुसार वस्तू खरेदी संबंधी एक खरेदी समिती स्थापन करणे आवश्यक असतांना अशी खरेदी समिती स्थापन न करता कार्यकारी अभीयंता यांनी त्यांचे स्तरावर खरेदी केली आहे.

3. उदयोग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक भांखस-1088/(2512)/उदयोग-6, दिनांक 2/1/1992 अन्वये तसेच शासन निर्णय क्रमांक भाखंस-2002/(2990) उदयोग-6 दिनांक 4.02.2003 नुसार शासकीय विभाग / निमशासकीय विभाग/ मंडळे/ महामंडळे/ शासकीय उपक्रम/ संस्था/ स्वायत्त संस्था/ जिल्हापरिषदा/ नगरपरिषदा/ महानगरपालीका/ नगरपालीका/ इ. मध्ये वस्तू खरेदीसाठी शासनाने दिनांक 2/1/1992 च्या शासन निर्णयान्वये आणि वेळोवेळी विहीत केलली कार्यपध्दती बंधनकारक केली आहे. सदर शासन निर्णयातील परि-2 नुसार उदयोग, उर्जा व कामगार विभाग, दि.2/1/1992 च्या परिच्छेद-5, परिशिष्ट-तीन अनुसार लाकडी फर्निचर महाराष्ट्र लघु उदयोग विकास महामंडळासाठी आरक्षित आहे. त्यामुळे लाकडी फर्निचर ची खरेदी सदरच्या महामंडळाकडून करणे बंधनकारक आहे. तसेच उदयोग उर्जा व कामगार विभाग यांचेकडील पुरक शासन निर्णय क्रमांक भांखस- 2000/ (2883)/ उदयोग-6, दि.16.10.2001 नुसार नवीन लाकडी फर्निचर खरेदी ही बाब मे.अम्बीशियसब्लांईड इंडस्ट्रीयल को.ऑप प्रोडयुसर्स सोसायटी विक्रोळी (पूर्व) मुंबई-400083 यांचे करीता राखीव ठेवण्यात आलेली आहे असे असतांना कार्यकारी अभीयंता यांनी त्यांचे स्तरावर दरपत्रके मागवून खरेदी केली आहे.

4. जंकुश कंन्स्ट्रक्शन इंजिनिअर्स यांचा बांधकामाचा व्यवसाय असतांना त्यांचे कडुन लाकडी फर्निचर खरेदी केली आहे.

सदरचे फर्निचर प्राप्त झाल्याबाबत पुरवठादाराकडील चलनाची प्रत व साठा नोंदवही प्राप्त झाली नाही त्यामुळे प्रत्यक्षात खरेदी केलेले साहित्य पुरवठा झाल्याची खात्री देता येत नाही. संबंधीत पुरवठादाराकडुन नोंदणी प्रमाणपत्र, व्हॅट दाखला, आयकर प्रमाणपत्र इ. न घेता दरपत्रक मान्य करुन पुरवठा आदेश देण्यात आले आहेत.

वरील अनियमितते बाबत अर्धसमास क्रमांक 103 दिनांक 20.01.2014 अन्वये विभागास कळविले असता विभागाकडून लेखापरिक्षणाचे अंतिम तारखेपर्यंत अनुपालन प्राप्त झाले नाही.

DATVCSM6501 (Ref No : 19, Hmm No : 103)

## *38 उल्हासनगर महानगरपालिकेतील पदाधिकारी व अधिकाऱ्यांना वाहन प्रतिपूर्ती योजना लागू केल्याबाबत..*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : अ-2(9) इतर भत्ते मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1586077.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 181294.00/-

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 19-अ(1) नुसार शासनाची पूर्व मंजुरी न घेता महानगरपालिका पदाधिका-यांच्या वाहन प्रतिपूर्तीवर रु.1586077/- नियमबाह्य खर्च केला आहे.***

महाराष्ट्र शासन, वित्त् विभाग, शासन निर्णय क्रं.वाहन-1000/प्र.क्रं.65/2001 विनिमय, दिनांक 10.9.2001 शासन निर्णय दि.25 मे 2005, 31.07.2008 अन्वये शासकीय कार्यालयामध्ये शासकीय वाहनांचे वापराऐवजी स्वत:चे खाजगी वाहन वापरण्यास परवानगी देवून त्यापोटी अधिकाऱ्यांना वाहन प्रतिपूर्ती योजना लागू करण्यात केली आहे. परंतु सदरची तरतूद ही केवळ शासकीय अधिकाऱ्यांनाच लागू असतांना उल्हासनगर महानगरपालिकेत शासन निर्णयातील तरतुदीचे योग्य प्रकारे अवलोकन न करता दिनांक 28.05.2003 रोजी ठराव पारीत करुन सदरची योजना मनपा मधील अधिकाऱ्यांना लागू केली आहे. मात्र सदरची योजना पदाधिकाऱ्यांना लागू करण्याबाबत सदरच्या ठरावात उल्लेख नसतांना 2011-12 मध्ये सदरच्या योजनेचा लाभ मनपातील महापौर, उपमहापौर, व सर्व सभापती यांना देण्यात आलेला आहे. सदरची योजना लागू करीत असतांना दिनांक 25 मे 2005 चे शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे शासकीय कामकाजाकरीता जे अधिकारी खाजगी वाहन वापर करण्याचा पर्याय स्विकारणार आहेत अशा अधिकाऱ्यांकरीता वाहन वापराचे दरमहा खर्चाचे प्रतिपूर्ती रक्कम निश्चित केली आहे. 2011-12 मध्ये सदर योजनेंतर्गत महापालीकेतील पदाधिकारी व अधिकाऱ्यांना वाहन खर्चाच्या प्रतिपूर्तीचा लाभ मंजूर केल्यामुळे मनपाचे लेखाशिर्ष अ-2(9) इतर भत्ते व सवलती या योजनेतंर्गत खालीलप्रमाणे खर्च करण्यात आला आहे.

| अ.क्र. | खर्चाचा तपशिल | खर्चाची रक्कम.रु. |
|---|---|---|
| 1 | महानगरपालिका पदाधिकारी | 1586077 |
| 2. | महानगरपालिका अधिकारी | 1591079 |
| एकूण खर्च | | **3177156** |

1. सदरची योजना महापालिका पदाधिकारी यांना लागू करण्याबाबत शासन निर्णयात तरतुद

नसतांना प्रत्यक्षात महापालिका पदाधिकाऱ्यांना लाभ मंजूर केल्यामुळे 2011-12 मध्ये महापालिकेस रु.1586077/-आर्थिक भार सोसावा लागला. तसेच दिनांक 29.02.2012 च्या शासन निर्णयान्वये वाहन प्रतिपूर्ती 1 एप्रील 2012 पासून पूर्णता बंद केलेली असतांनाही सदर शासन निर्णयाचे अनुपालन न करता सदर योजनेचा लाभ अदयापपर्यंत चालू ठेवलेला आहे. या संदर्भात अर्धसमास पत्र क्रमांक उमपा/वाहन/302, दि.17/02/2014 नुसार विचारणा केली असता, वाहन विभाग प्रमुख यांनी त्यांचे दिनांक 17/02/2014 चे उत्तरामध्ये पदाधिका-यांना व विशेष समिती सभापती यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 19(अ) अन्वयें वाहनभत्ता,बैठक भत्ता व इतर पुरक भत्ते अदा करणे आवश्यक असल्याचे नमुद केले आहे. तथापि, मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 19-अ (1) नुसार राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने, महानगरपालिकेस या कलमान्वयें मानधन, फी किंवा अन्य भत्ते प्रत्येक पालिका सदस्याला देता येतील असे नमुद केले असतांना शासनाची पूर्व मंजुरी न घेता वाहन भत्ता दिला आहे. त्यामुळे सदर बाबीवर झालेल्या खर्चाची रक्कम रु.1586077/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

2. दिनांक 25 मे 2005 च्या वित्त विभागाचे शासन निर्णयान्वयें सचिव दर्जाच्या खालील वाहन अनुज्ञेय असलेल्या अधिकाऱ्यांकरीता वाहनाची निश्चित किंमत, देखभाल दुरुस्ती, विमा,इंधन व वाहनचालकाचा पगार अशी एकूण डिझेल वाहनाकरीता रु.14875/- व पेट्रोल वाहनांकरीता रु.16375/-इतकी रक्कम निश्चित केलेली आहे. त्यामधून रु.1000/- सरसकट वजावट केल्यानंतर ही प्रतिपूर्ती अनुज्ञेय ठरेल अशी अट आहे. तथापि,महानगरपालिकेने महापौर यांना रु.21000/- उपमहापौर यांना रु.20000/- व स्थायी समिती सभापती यांना रु.20000/- दरमहा प्रमाणे रक्क्म अदा केली आहे. तसेच इतर पदाधिकारी व अधिकाऱ्यांना रु.18000/- अदा केले आहेत. तसेच सदरची योजना 1 एप्रील 2012 पासून शासनाने बंद केलेली असतांना पुढे चालू ठेवण्यात आली आहे. या संदर्भात अर्धसमासाव्दारे विचारणा केली असता, वाहन विभाग प्रमुख यांनी त्यांचे दि.17/02/14 चे उत्तरात शासन निर्णयानुसार अधिका-यांना व पदाधिका-यांना वाहनभत्ता देण्यास शासनाने योग्य प्रतिसाद न मिळाल्यामुळे वाहनभत्ता बंद केलेला आहे. परंतु मनपाच्या फायदयामुळेच सदरचा वाहन भत्ता अदा करण्यात येत असल्याचे नमुद केले आहे. सदरचे उत्तर संयुक्तीक नसून, शासनाने दि.1.4.12 पासून वाहन भत्ता बंद केलेला असतांना मनपाने मात्र आपल्या अधिका-यांना सदरचा वाहन भत्ता चालू ठेवलेला आहे.

3. खालील कर्मचारी हे वर्ग-3 चे संवर्गात कार्यरत असतांना सदर योजनेचा लाभ मंजूर करण्यात आला आहे. शासन निर्णयातील तरतुदीनुसार महापालिकेतील अधिकाऱ्यांनाच सदर योजना लागू असतांना संबंधित कर्मचाऱ्यांना 2011-12 मध्ये खालील प्रमाणे रक्कम अदा केली आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | प्रतिपूर्तीची रक्कम रु. |
|---|---|---|
| 1. | श्री.भगवान य.कुमावत, व.लिपीक | 106698 |
| 2. | श्री.एन.एस. सन्तानी, व. लिपीक | 43846 |
| 3. | श्री.किरण अ. शानबाग, सहा.अभियंता | 30750 |
| | | 181294 |

त्यामुळे सदरची रक्कम उपरोक्त कर्मचाऱ्यांकडून वसुल होणे आवश्यक आहे.

याबाबत अर्धसमास क्रमांक 112 दि.22.01.2014 अन्वये विचारणा केली असता, उक्त कर्मचा-यांकडे प्रभाग अधिकारी या पदाचा कार्यभार असल्यामुळे त्यांना वाहन भत्ता देणे आवश्यक आहे. वाहन विभागाचे उत्तर स्विकारार्ह नाही, कारण अतिरिक्त कार्यभारामध्ये कर्मचा-यांना त्यांच्या वेतनाच्या (मुळ वेतन व ग्रेड पे) 5 टक्के इतके अतिरिक्त वेतन अनुज्ञेय असून इतर कोणतेही अतिरिक्त भत्ते देय होत नाही. त्यामुळे संबंधित कर्मचा-यांना दिलेली वाहन प्रतिपूर्तीची रक्कम रु.181294/- वसुलपात्र आहे. तसेच मनपा पदाधिका-यांना वाहन भत्ता प्रतिपुर्तीची अदा केलेली रक्कम रु.1586077/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATVCSM6501 (Ref No : 31, Hmm No : 112)

## *39 भाडयाने दिलेल्या समाज मंदिराच्या थकीत भाडयाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :4501426 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 249854.00/-

***उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीचे समाज मंदीराचे थकीत भाडे, मुद्रांक शुल्क , दंड व सेवाकर असे एकूण रु.273732 वसुली केली आहे.***

**उल्हासनगर महानगरपालीका मालकीचे गुरुनानक शाळेजवळील विकास मतिमंद विदयालय, उल्हासनगर-4 येथील कुर्ला कॅम्प ही मालमत्ता भाडयाने देण्यांत आलेली आहे.सदर मालमत्ता स्थायी समिती ठराव क्रमांक 103, दिनांक 10.12.2007 नुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने रु.45960 प्रती वर्ष इतके भाडे निश्चित केलेले आहे. त्यानुसार उपआयुक्त (मालमत्ता) यांचे पत्र क्रमांक उमपा मालमत्ता 614 / 07, दिनांक 06.04.2007 अन्वये 11 महिन्यासाठी भाडयाने दिलेले आहेत. या संचिकेची तपासणी केली असता पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.**

**जागेचे ठिकाण - गुरुनानक शाळेजवळील समाजमंदीर उल्हासनगर-4.**

**1) विकास मतिमंद विदयालय, उल्हासनगर-4 या मालमत्तेचे क्षेत्र व मूल्य किती आहे ? ही मालमत्ता भाडयाने देतांना कोणत्या पध्दतीचा अवलंब करण्यात आला तसेच ही मालमत्ता भाडयाने देतांना या जागेच्या भाडयाचे मुल्य किती होते? याबाबतची परिगणणा शिघ्रगणक प्रपत्रानुसार सार्वजनिक बांधकाम खात्याकडून परिगणणा करण्यांत आली होती किंवा कसे याबाबतची माहिती प्राप्त**

संचिकेत आढळून आलेली नाही. त्यामुळे उक्त मालमत्तेबाबतच्या भाडयाच्या वसुलीबाबत संपूर्ण लेखापरीक्षण करणे शक्य झाले नाही.

2) सदर मालमत्ता 11 महिने भाडयाने देण्याचा करारनाम्यामध्ये कालावधी नमूद करण्यांत आलेला नसून साक्षिदारांच्या स्वाक्ष-या घेण्यांत आलेल्या नाहीत. त्यामुळे सदर करारनाम्याची पूर्णता सिध्द होवू शकली नाही.

3) अट क्रमांक 9 नुसार उपरोक्त संस्थेने पाणी बील व अनुक्रमांक 14 नुसार वीज बील भरणे बंधनकारक असल्याने सदर संस्थेने पाणी व वीज भरल्याचे पृष्ठयर्थचे दस्ताऐवज लेखापरीक्षणास प्राप्त झाले नाही.

4) या मालमत्तेचे उक्त संस्थेने माहे डिसेंबर-2007 चे मासिक भाडे रु.3830 अदा केलेले आहे. तदनंतर स्थायी समिती ठराव क्रमांक 20, दिनांक 20.06.2010 नुसार वरील संस्थेस 15 वर्षासाठी नाममात्र रु.500 प्रती माह भाडे करण्याबाबत ठराव संमत करण्यांत आलेला आहे. वास्तावीक या संस्थेस स्थायी समिती ठराव क्रमांक 103 दि.10.12.2007 पासून 11 महिन्यानंतर हा करारनामा संपुष्ठात आणून लिलाव पध्दतीने भाडेकरार करणे उचीत ठरले असते. परंतू असे न करता स्थायी समिती ठराव क्रमांक 20,दि. 20.06.2010 अन्वये नाममात्र भाडयाने केलेला ठराव हा महानगरपालिका हिताचा केलेला नसल्याचे दिसून येते. सबब सदर संस्थेकडून रु.3830 प्रती महिना वसुली करुन महापालिका फंडात जमा करावी व सदरच्या मालमत्तेचे लिलावाद्वारे भाडे ठरवून भाडयाचा करारनामा करण्याचे प्रस्तावीत करण्यात येत आहे.तसेच या भाडयाच्या रकमेवर सेवा कर आकारण्यांत आलेला नाही. तरी डिसेंबर-2007 पासून मार्च-12 पर्यंत आकारणी होत असलेल्या एकूण भाडयावर 10.30% प्रमाणे हा कर आकारुन खालील प्रमाणे रु19265 महापालिका फंडात जमा करावेत.

| वर्ष | भाडयाची रक्कम वार्षिक | अनुज्ञेय सेवा कर वार्षिक भाडयावर 10.30% |
|---|---|---|
| डिसेंबर-07 | 3830 | =3830x10.30%/12x1=33 रु. |
| 2008 ते 2011 | 45960x4= 183840 | =183840x10.30% =18936 रु. |
| मार्च-2012 पर्यंत | 3830x3=11490 | = 11490x10.30%/12x3=296 रु. |
| एकूण वसुलपात्र सेवा कर | | = रु. 19265 |

निविदा शुल्क रु.100 वसुल करण्यात आलेले नसल्यामुळे रु.100 वसुल करण्यात यावे.

उपआयुक्त (मालमत्ता) यांचे पत्र क्रमांक उमपा मालमत्ता 614 / 07, दिनांक 06.04.2007 नुसार प्रस्तावीत भाडे वसुली.

| कालावधी | भाडे रु. |
|---|---|
| जानेवारी-08 ते मार्च-2012 | 3830X51=195330 |
| व्याज(करारनाम्यातील अट क्रमांक 2 नुसार) | 18%X195330=35159 |
| सेवा कर 10.30% | 19265 |

| | |
|---|---|
| **मुद्रांक शुल्क** | 100 |
| **वसूलपात्र रक्कम रुपये** | **रु.**249854 |

**उपरोक्त माहिती मिळण्यासंदर्भात अर्धसमास क्रमांक** 169 /13.02.2014 **नुसार संबंधीत विभागांना कळविण्यांत आले होते. परंतु याबाबत कोणतेही उत्तर प्राप्त झालेले नाही.**

DVESMBM7301 (Ref No : 46, Hmm No : 169)

## *40 उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील जाहिरात फलकाचे दर निश्चित करणे याकामाच्या उणींवाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :4601429 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 278807.00/-

| |
|---|
| ***उल्हासनगर महानगरपालिकने शहरात कॅम्प क्रमांक1 ते5 साठी होर्डींग, खांब व फुग्यासाठी जाहिरात दिलेली होती. सदर निविदेमध्ये अधिकतम निविदाकारांनी माघार घेतल्यामुळे किमान दरधारकास निविदा रद्द न करताच किमान दरधारकास ठेका दिल्याचे दिसून येते.*** |

**उल्हासनगर महापालिकेने शहराचे दोन भागात म्हणजे कॅम्प नं.**1,2**व**3 **आणि कॅम्प नं.**4**व**5 **मध्ये होर्डींग**, **खांब व फुग्याव्दारे जाहिरात प्रसिध्द करणेकामी वृत्तपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली होती. अंतिम दिनांकापर्यंत कॅम्प नं**1,2**व**3**साठी तसेच** 4**व**5 **प्रत्येकी** 5 **निविदाधारकांनी निविदा भरल्यानंतर** 3 **पात्र निविदाकारांमधून कॅम्प नं**1,2**व** 3 **साठी मे.लक्ष्मी ॲडव्हर्टाइझिंग एजन्सी, उल्हासनगर व कॅम्प नं.**4**व**5**साठी मे.किंग्ज एंटरप्रायजेस,उल्हासनगर**-3 **यांना कार्यादेश देण्यांत आलेला होता.मे.लक्ष्मी ॲड यांच्या कराराची मुदत दि.**06.10.2010 **तर मे.किंग्ज एंटरप्रायजेस यांच्या कराराची मुदत दि.**11.07.2010 **रोजी संपल्यामुळे दोघांना पुढील** 3 **वर्षासाठी प्रती वर्षी मागील दराच्या** 10 **टक्के वाढीव दराने मुदतवाढ देण्यात आलेली आहे. या संदर्भात मालमत्ता विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या उल्हासनगर शहरातील महानगरपालिका हद्दीतील जाहिरातील फलकाचे दर निश्चित करणेबाबतच्या प्राप्त नस्तीचे लेखापरीक्षणांती पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.**

| | | |
|---|---|---|
| कामाचे नाव | : | उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील जाहिरातील फलकाचे दर निश्चितीबाबत. कॅम्प नंबर1,2,3 व 4 आणि 5 साठी. |
| निविदा सुचना | : | जा.क्र.उमपा/ करवी /25 /614 of 7, दिनांक 23.03.2007 |
| तांत्रिक मान्यता | : | आढळून आली नाही. |
| प्रशासकिय मान्यता | : | स्थायी समिती ठराव क्रमांक 22 , दि.18.05.2007 मुदतवाढ-136, दि.31.03.2010 |
| कार्यारंभ आदेश क्रमांक | : | 1,2 व 3 साठी - उमपा /करविभाग /746 of 7, दि.23.08.2007 आणि कॅम्प 4व5 साठी उमपा /करविभाग /747 of 7,दि.31.05.2007. |
| काम पुर्ण केल्याचा दिनांक | : | कार्यादेशामध्ये कालावधी नमूद करण्यांत आलेला नाही. |
| वर्तमान पत्राचे नाव | : | दै.जनादेश(क वर्ग), दै.खबरे आज तक(ब वर्ग हिंदी क) दि.28.03.2007 (कात्रणे आढळून आली नाही.) |
| निविदा कालावधी | : | दि.02.04.2007 ते दि.05.04.2007 |
| निविदा शुल्क | : | रु.2500 |
| अनामत रक्कम | : | रु.25000 |
| मुद्रांक शुल्क | : | आढळून आले नाही. |
| सेवा शुल्क | : | घेण्यांत आलेले आढळून आले नाही. |

1) या निविदेबाबतची संपूर्ण नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यांत आलेली नाही. त्यामुळे या निविदेमध्ये तांत्रिक बाबी काय होत्या, जाहिरातीचे निकष, दर निश्चिती व इतर आवश्यक बाबींची तपासणी करणे शक्य झाले नाही. त्याच बरोबर या निविदेतील 2 निविदाकार मे.डॉट डिझाईन, डोंबिवली व मे.लिओ मिडीया मार्केटिंग, प्रा.लि.डोंबिवली यांना तांत्रिकबाबी पूर्ण न केल्यामुळे अपात्र करण्यांत आल्याचे नमूद आहे. सदर निविदाकारांना कोणत्या तांत्रिक कारणासाठी अपात्र करण्यांत आले याबाबतची कारणे व दस्ताऐवज अप्राप्त असल्यामुळे मे.डॉट व मे.लिओ यांच्या अपात्रतेची तपासणी करणे शक्य झाले नाही.

2) उपरोक्त निविदेसाठी शा.नि. दि.02.01.92 मधील 8.3(ब) नुसार निविदा कालावधी किमान 3 आठवडे आवश्यक असतांना कालावधी हा दि.02.04.2007 ते दि.05.04.2007 असा अल्पावधीचा देण्यांत आलेला आहे. यामुळे या शासन निर्णयाचे उल्लंघन झाले असून हा कालावधी कमी असल्यामुळे पुरेशी स्पर्धा न झाल्याचे दिसून येते.

3) आवश्यक निविदा शुल्काची रकम व अनामत रक्कम कशाच्या आधारावर निश्चित करण्यांत आली याबाबत साधार स्पष्टता झालेली नाही.

4) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक जाहिरात क्रमांक 209/प्र.क्र.137/का-34, दिनांक

31/09/2009.नुसार कार्यवाही करण्यांत आली आहे किंवा कसे ? याबाबत साधार स्पष्टता करण्यात आलेली नाही. त्यामुळे उपरोक्त शासन निर्णयाचे पालन झाल्याचे दिसून येत नाही.

5) मुद्रांक शुल्क व सेवाकर भरल्याच्या पृष्ठयर्थ आवश्यक दस्ताऐजव प्राप्त संचिकेसह आढळून आले नाही.

6) कॅम्प 1,2 व 3 साठी खालील प्रमाणे पात्र निविदाकार होते.

| निविदाकाराचे नाव | खांब (एकूण150 खांब) दर प्रति खांब | होर्डींग (1200चौमी) दर प्रति चौ.मी. | फुगा (25 मि.उंची) दर प्रती मि. | शेरा |
|---|---|---|---|---|
| मे.किंग्ज एंटर. | 150 | 120 | 100 | माघार |
| मे.लक्ष्मी ॲड | 110 | 75 | 20 | |
| मे.पवन ॲड | 200 | 150 | 100 | माघार |

7) उपरोक्त दोनही उच्चतम निविदाकारांनी निविदा स्विकारण्यास असमर्थता दर्शविल्याचे नस्तीमध्ये नमूद आहे.त्यानुसार सर्वात किमान दर असलेले निविदाधारक मे.लक्ष्मी ॲड यांना या जाहिरातीसाठी ठेका देण्यांत आलेला आहे. अधिकतम दर असलेल्या निविदाकारांनी असहमती दर्शविल्यानंतर त्यांचे अनामत रक्कम जप्त करणे आवश्क आहे. त्यानुसार उपरोक्त म्हणजे मे.पवन व किंग्ज ॲड यांची अनामत रक्कम जप्त केल्याचे आढळून आले नाही. तसेच निविदा प्रक्रियेतील जास्तीचे दर असलेल्या निविदाधाराकांनी माघार घेतल्यामुळे सदर जाहिरातीसाठी उचीत स्पर्धा होवू न शकल्यामुळे ही प्रक्रिया रद्द करुन नविन प्रक्रिया होणे आवश्यक होते. परंतू याच निविदेतील किमान दर असलेल्या निविदाधारकास म्हणजे मे. लक्ष्मी ॲड यांना सदरचा ठेका देण्यांत आला. तसेच मे.लक्ष्मी ॲडव्हर्टाईझिंग यांची मुदत 06.10.2010 रोजी संपलेली असल्यामुळे त्यांना स्थायी समिती ठराव क्रमांक 136, दिनांक 31.03.2010 व कार्या.पत्र क्रमांक उमपा/मालमत्ताविभाग /362/10, दि.08.04.2010 नुसार 3 वर्षासाठी मागील दराच्या 10 टक्के वाढीव दराने मंजुरी देण्यांत आलेली आहे.उपरोक्त ठेका व ही मुदतवाढ ही साशंकता दर्शविणारी असून महानगरपालिकेच्या आर्थिक हिताची नसल्याचे निदर्शनास येते.

8) करारनाम्यातील अट क्रमांक 6 नुसार वार्षीक भाडे पहिल्या सहा महिन्याच्या पहिल्या दिवशी व दुस-या सहामाहिचे भाडे पाहिल्या दिवशी भरणे आवश्यक आहे तदनंतर 18 टक्के द.सा.द.शे. दंडाची आकारणी करण्याची तरतूद आहे.त्यानुसार 2011-2012 या वर्षामध्ये दिनांक 08.04.2011 पासून च्या अर्धवर्षाच्या सुरुवातीस या दिनांकास खालील रक्कम भरणे आवश्यक होते.

| खांब (एकूण खांब 150) दर रु.121(प्रती खांब) | होर्डीग (एकूण 1200) दर रु.82.5 (प्रती होर्डीग) | फुगा (25 मिटर) दर रु.22(प्रती मिटर) |
|---|---|---|
| 121x150x6=108900 | 82.5x1200x6=594000 | 22x25x6=3300 |
| = 706200 | | |
| विलंब शुल्क 13 दिवस 706200x18%/365x13=4527 | | |
| 706200(आवश्यक शुल्क)-597368(भरणा केलेली रक्कम) =108832(कमी भरलेली रक्कम) | | |

**एकूण वसुलपात्र रक्कम रुपये** 108832+4527=113359.

**उक्त रक्कम रुपये** 706200 **दि.**08.04.2011 **रोजी देय होते परंतू सदर ठेकेदाराने ही रक्कम पावती क्रमांक** 7176, **दिनांक** 21.04.2011 **रोजी रुपये** 5,97,368 **भरणा केलेली आहे. करारनाम्यातील अट क्रमांक** 6 D **नुसार सदर रक्कम अर्धवर्षाच्या सुरुवातीस भरणे आवश्यक होते अन्यथा** 18 **टक्के व्याज द.सा.द.शे.व्याज आकारणी आहे. त्यानुसार मे.लक्ष्मी यांनी या रकमेची भरणा** 13 **दिवस उशिराने केल्यामुळे रक्कम रुपये4527दंड वसुली व आवश्यकतेपेक्षा कमी भरलेली रक्कम रु.108832 वसुल करण्यात यावी.**

9) **दि.**08.10.2011 **ते** 07.04.2012 **या अर्धवर्षासाठीची भाडयाची गणणा-**

| अर्धवार्षिक देय दिनांक | खांब (एकूण150 खांब) दर रु.133.1प्रति खांब | होर्डीग (1200चौमी) दर रु. 90.75प्रति चौ.मी. | फुगा (25 मि.उंची) दर रु.24.2प्रती मि. | एकूण देय रक्कम |
|---|---|---|---|---|
| 08.10. 11 ते 07.04.12 | 133.1x150x6 =119790 | 90.75x1200x6 =653400 | 24.2x25x6 =3630 | 776820 |

**उक्त रक्कम रुपये** 776820 **दि.**08.10.2011 **रोजी देय होते परंतू सदर ठेकेदाराने ही रक्कम पावती क्रमांक** 31858, **दिनांक** 14.10.2011 **रोजी रुपये** 6,31,842 **भरणा केलेली आहे. करारनाम्यातील अट क्रमांक** 6 D **नुसार सदर रक्कम अर्धवर्षाच्या सुरुवातीस भरणे आवश्यक होते अन्यथा** 18 **टक्के व्याज द.सा.द.शे.व्याज आकारणी आहे. त्यानुसार मे.लक्ष्मी यांनी या रकमेची भरणा** 06 **दिवस उशिराने केल्यामुळे पुढील प्रमाणे दंड वसुली व आवश्यकतेपेक्षा कमी भरलेली रक्कम प्रस्तावीत करण्यांत येत आहे.**

776820x18%/365x06=2299 (**विलंब शुल्क**)

776820(**आवश्यक शुल्क**) - 631842 (**भरणा केलेली रक्कम**)

=144978 (**कमी भरलेली रक्कम**)

**तसेच मागील सहामाहीत रुपये** 108832 **कमी भरणा केलेले असल्याने त्यावरील दि.**14.10.2011**पर्यंतचा दंड** 108832x18%/365x176=9446

**एकूण वसुलपात्र रक्कम रुपये** = 144978(**कमी भरलेली रक्कम**)+2299(**चालू रकमेवरील दंड**) +9446(**मागिल रकमेवरील दंड**) = 156723.

**कॅम्प** 1,2**व** 3 **साठी एकूण वसुली** 113359(**अनु.8 नुसार** ) +156723(**अनु.9नुसार**)=270082

**कॅम्प** 4 **व** 5 **साठी खालील प्रमाणे पात्र निविदाकार होते.**

| निविदाकाराचे नाव | खांब (एकूण186 खांब) दर प्रति खांब | होर्डीग (400चौमी) दर प्रति चौ.मी. | फुगा (10 मि.उंची) दर प्रती मि. | शेरा |
|---|---|---|---|---|
| मे.किंग्ज एंटर. | 30 | 45 | 100 | |
| मे.लक्ष्मी ॲड | 50 | 50 | 70 | माघार |
| मे.पवन ॲड | 60 | 55 | 50 | माघार |

10) **उपरोक्त दोनही उच्चतम निविदाकारांनी निविदा स्विकारण्यास असमर्थता दर्शविल्याचे नस्तीमध्ये नमूद आहे. सदर निविदाधारकाने असमर्थता दर्शविण्याचे कारण नस्तीत नमूद करण्यात आलेले नाही. त्यानुसार सर्वात किमान दर असलेले निविदाधारक मे.किंग्ज एंटरप्रायजेस यांना या जाहिरातीसाठी ठेका देण्यांत आलेला आहे. अधिकतम दर असलेल्या निविदाकारांनी असहमती दर्शविल्यानंतर त्यांचे अनामत रक्कम जप्त करणे आवश्क आहे. त्यानुसार उपरोक्त म्हणजे मे.पवन व मे.लक्ष्मी ॲड यांची अनामत रक्कम जप्त केल्याचे आढळून आली नाही. तसेच निविदा प्रक्रियेतील जास्तीचे दर असलेल्या निविदाधाराकांनी माघार घेतल्यामुळे सदर जाहिरातीसाठी उचीत स्पर्धा होवू न शकल्यामुळे ही प्रक्रिया रद्द होऊन नविन प्रक्रिया होणे आवश्यक होते. परंतू याच निविदेतील किमान निविदाधारकास म्हणजे मे. लक्ष्मी ॲड यांना सदरचा ठेका हा साशंकता निर्माण करणारा असून महानगरपालिकेच्या आर्थीक नुकसानीचा असल्याचे निदर्शनास येते.**

11) **मे.किंग्ज एंटरप्राईजेस**, **उल्हासनगर**-3 **यांची मुदत** 11.07.2010 **रोजी संपलेली असल्यामुळे त्यांना स्थायी समिती ठराव क्रमांक** 136, **दिनांक** 31.03.2010 **नुसार** 3 **वर्षासाठी मागील वर्षाच्या** 10 **टक्के वाढीव दराने मंजुरी देण्यांत आलेली आहे. त्यानुसार सन** 20011-12**साठी गणणा खालील प्रमाणे आहे.**

| वर्ष | खांब (एकूण186 खांब) दर प्रति खांब | होर्डीग (400चौमी) दर प्रति चौ.मी. | फुगा (10 मि.उंची) दर प्रती मि. |
|---|---|---|---|
| पहिले | 33 | 49 | 110 |
| दुसरे | 36.3 | 54.5 | 121 |

**दि.**12.07.2011 **ते** 11.07.2012 **या वर्षासाठी**, **दिनांक** 12.01.2012 **रोजी देय होणारी रक्कम रुपये**

178451/-**भरणे आवश्यक होते. त्यानुसार पावती क्रमांक** 45393, **दिनांक** 06.03.2012, **रक्कम रुपये** 178451 **भरलेली आहे. म्हणजे ही रक्कम** 54 **दिवस उशिराने भरल्यामुळे पुढील प्रमाणे दंड वसुल होणे आवश्यक आहे.**

$\frac{178451}{365} \times 18\% \times 54 = 4752$

12) **त्याचप्रमाणे मे.लक्ष्मी यांनी कॅम्प क्रमांक** 4**व**5**साठी तर मे.किंग्ज यांनी** 1,2**व**3**साठी जाहिरात निविदेतून माघार घेतल्यामुळे त्यांनाच याच निविदेतील दुस-या विभागाचा म्हणजे मे. लक्ष्मी यांना** 1,2**व**3 **या कॅम्पचा तर मे.किंग्ज यांना कॅम्प** 4 **व**5 **यांचा** (**किमान दरधारक असल्यानंतरही**) **ठेका देण्यांत आलेला आहे.एकाच निविदेतील उच्चतम दर असल्यानंतरही निविदा नाकारुन साखळी करणे यास्तव उक्त दोन्ही ठेकेदाराना या निविदेतून बाद करणे आवश्यक असतांना ही कार्यवाही करण्यांत आल्याचे दिसून येत नाही.**

**उपरोक्त निविदाप्रक्रिया साशंक असतांना याच निविदाकारांना** 3 **वर्षे** 10 **टक्के वाढीव दराने मुदतवाढ देण्यांत आलेली आहे.सदर दराची निश्चिती कशी करण्यांत आली या पृष्ठयर्थ कोणतेही दस्ताऐवज लेखापरीक्षणास आढळून आले नाहीत.**

**एकूण वसुलपात्र रक्कम----**

| | |
|---|---|
| **मे.लक्ष्मी एंटरप्रायजेस** | 270082+3775(**मुद्रांक शुल्क**)= **रु.** 273857 |
| **मे.किंग्ज एंटरप्रायजेस** | 4752+200(**मुद्रांक शुल्क**)= **रु.**4950 |
| **एकूण** | =278807 |

**उपरोक्त माहिती मिळण्यासंदर्भात अर्धसमास क्रमांक** 172 /13.02.2014 **नुसार संबंधीत विभागास कळविण्यांत आले होते. परंतु याबाबत कोणतेही उत्तर प्राप्त झालेले नाही.**

DVESMBM7301 (Ref No : 49, Hmm No : 172)

## *41 बांधकाम विभागाकडून बगीच्यांच्या सुरक्षिततेसाठी खाजगी सुरक्षा रक्षक नियुक्तीतील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :7822110 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 63000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 41174.00/-

***शासन निर्णय क्रमांक एसजीए-1506 प्र.क्र.12 /का, दिनांक 08.11.2006 नुसार सुरक्षा मंडळाकडून सुरक्षा रक्षकांची नेमणुक करण्यांची तरतूद असतांना या नियमाचे उल्लघंन करुन सुरक्षा रक्षकांचा परवाना असलेल्या संस्थेकडून नियुक्ती केलेली आहे.***

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागासाठी महानगरपालिका क्षेत्रातील बगीच्यांच्या सुरक्षिततेसाठी सुरक्षारक्षकांच्या परवाना असलेल्या संस्थेकडून सुरक्षा रक्षक पुरविण्याबाबत दै.नगर न्युज व दै.अमृत कलश या वृत्तपत्रात दिनांक** 01.01.2010 **रोजी निविदा प्रसिध्द करण्यांत आली होती. खालील निविदाकारांनी निविदा सादर केल्या होत्या.**

1.**मे.साईनाथ इंटरप्रायजेस,ठाणे दर - प्राकलनापेक्षा** 5 % **जास्त.**

2.**मे.बॉम्बे इंडस्ट्रिज गाईड प्रा.लि. दर - प्राकलनापेक्षा** 3 % **जास्त.**

3.**सेफ टेकर सिक्युरिटी फोर्स,ठाणे दर - निविदेतील दराप्रमाणे.**

**या निविदेसाठी निविदेतील दराप्रमाणे रु.**7000/-**प्रती सुरक्षा रक्षक** (26 **दिवस त्यामध्ये** 6000 **प्रती सुरक्षा रक्षक** + 5% **संस्थेचा सेवाकर ) या दरावर मे.सेफ टेकर सिक्युरिटी फोर्स, ठाणे या किमान दर असलेल्या निविदाधारकास स्थायी समिती क्र.**131, **दि.**31.03.2010 **नुसार मान्यता देण्यांत आलेली होती. या संदर्भात उपलब्ध करुन दिलेल्या संचिकेच्या आधारे पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.**

| | | |
|---|---|---|
| **कामाचे नाव** | .. | **उल्हासनगर महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागासाठी महानगरपालिका क्षेत्रातील बगीच्यांच्या सुरक्षिततेकरीता सुरक्षारक्षकांचा परवाना असलेल्या संस्थेकडून सुरक्षारक्षक पुरविणेबाबत.** |
| **अंदाजपत्रकिय रक्कम** | - | **आढळून आली नाही.** |
| **प्रशासकिय मान्यता क्रमांक व दिनांक** | - | **स्थाथीसमिती ठराव** 131, **दिनांक** 31.03.2010 |
| **वर्तमानपत्र** | - | **दै.नगरन्युज,दै.अमृत कलश** |
| **निविदा कालावधी** | | 02.01.2010 **ते** 11.01.2010 |
| **प्राप्त निविदा** | | 1.**मे.साईनाथ इंटरप्रायजेस,ठाणे.**<br>2.**मे.बॉम्बे इंडस्ट्रियल गार्डस प्रा.लि.**<br>3.**मे.सेफ टेकर सिक्युरिटी फोर्स, ठाणे.** |
| **मुदतवाढ** | - | **स्थायी समिती ठराव** 6, **दिनांक** 28.04.2011 |
| **ठेकेदाराचे नाव** | - | **मे.सेफ टेकर फोर्स ठाणे** |

| | | |
|---|---|---|
| दर | - | रु.7000 प्रति महिना प्रति सुरक्षा रक्षक (एकूण 15 सुरक्षा रक्षक) |
| कार्यादेश क्रमांक | - | PWD:CE:04, Dt.02.05.2011 |
| कामाचा कालावधी | - | 1 वर्ष. |
| लेखाशिर्ष | - | ए (27) रोजंदारी / मानधन इत्यादी. |

1) **प्राप्त संचिकेतील फेब्रुवारी** 2012 **रोजी सादर केलेल्या टिप्पणीनुसार सामान्य प्रशासनाने गृहीत धरलेल्या रु.**7000 **प्रति सुरक्षा रक्षक प्रतिमाह** (26 **दिवस रु.**6000/-**प्रति सुरक्षारक्षक** + 12.36 **टक्के केंद्र शासनाचा सेवाकर** +5 **टक्के संस्थेचा सेवाकर**) **या दरावर सार्वजनिक बांधकाम विभागाने निविदा कार्यवाही केली होती. या मध्ये तीन निविदाकारांच्या छाननीनंतर मे.सेफ टेकर सिक्युरीटी फोर्स, ठाणे या किमान निविदाकारास पाचारण करण्यांत आले होते. परंतु शासन निर्णय क्रमांक एसजीए-**1506 **प्र.क्र.**12 \ **का-**5 , **दिनांक** 08.11.2006 **नुसार सुरक्षा रक्षकांची नेमणुक सुरक्षा मंडळाकडून करण्याबाबत तरतूद असतांना खाजगी संस्थेकडून केल्याने या शासन निर्णयाचे उल्लंघन झाल्याचे आढळून येते.**
2) **स्थायी समिती ठराव** 131, **दिनांक** 31.03.2010 **कार्यादेश क्रमांक उमपा / साबांवि / रोअ, दिनांक** 07.04.2010 **अन्वये मे.सेफ सेक्युरिटी फोर्स या संस्थेस एक वर्षासाठी** 15 **सुरक्षा रक्षक पुरविण्याबाबत कळविण्यांत आलेले होते. त्यासाठी मुद्रांक नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांचे पत्र क्रमांक** 12 / **कलम** 34 / **चू.मू.शू.मं**133 / 09, **दिनांक** 20.07.2009 **नुसार प्रति माह** 7000 **प्रति सुरक्षा रक्षक याप्रमाणे** 7000x15x12=12,60,000/- **वर रुपये** 360 /- **मुद्रांक शुल्क आवश्यक असतांना हे शुल्क वसुल करण्यांत आलेले नाही. त्यामुळे रुपये** 360/- **वसुल करण्यांत यावे. त्याचप्रमाणे स्थायी समिती ठराव क्रमांक** 6, **दिनांक** 28.04.2011 **नुसार** 1 **वर्षासाठी मुदत वाढ दिल्यामुळे उपरोक्त रक्कमेसाठी** 2011-2012 **साठी रु.**360/- **वसुल करण्यात यावे.**
3) **डिव्ही.क्रमांक** 579 / 06.05.2011 **रुपये** 304604 /-**या देयकाची तपासणी केली असता प्राकलनातील समाविष्ट केंद्र शासनाचा सेवाकर** 12.36 **टक्के याची कपात न केल्याने सदर सेवाकराची वसुली करण्यांचे प्रस्तावीत करण्यांत येत आहे. प्रस्तावीत वसुली** 304604x12.36%=37649.
4) **या बाबतचे देयके पुढील प्रमाणे----**

D.V. NO.579 / 06.05.2011

| प्रमाणक क्रमांक | रक्कम रु. | कालावधी |
|---|---|---|
| PWD/12,Dt.30.03.2011 | 104774-2096 =102678 | 21.12.10 ते 20.01.11 |
| PWD/13,Dt.30.03.2011 | 105000-2100=102900 | 21.01.11 ते |

| | | |
|---|---|---|
| | | 20.02.11 |
| PWD/14,Dt.30.03.2011 | 94830-1897=102678 | 21.02.11 ते 20.03.11 |

5) **प्रस्तुत देयकांची तपासणी केली असता उपस्थित सुरक्षा रक्षकांचे स्वाक्षरी असलेले उपस्थिती पत्रक आढळून आले नाही.त्यामुळे किती सुरक्षा रक्षक संबंधीत ठिकाणी उपस्थित होते याची पडताळणी करणे शक्य झाले नाही.**

a)**देयक प्रमाणक क्रमांक** PWD/12,Dt.30.03.2011 **या देयकात श्री. रामदास गौड हे सुरक्षा रक्षक गौल मैदान व सपना गार्डन या ठिकाणी एकाच दिवशी म्हणजे दि**.27.12.2010, 3,10 **व** 17.01.2011 **या दिनांकास बदली रक्षक म्हणून दुस-या पाळीत हजर होते. त्यामुळे श्री.गौड यांचे दि**.27.12.2010, 3,10 **व** 17.01.2011 **या** 04 **दिवसांचे** (7000/31=225.8x4=903) **रुपये** 903/- **दुहेरी प्रदान झाल्याचे निदर्शनास येते.**

b)**देयक प्रमाणक क्रमांक** PWD/13,Dt.30.03.2011 **या देयकात श्री. रामदास गौड हे सुरक्षा रक्षक अेम.आय.डी.सी.व दसरा मैदान या ठिकाणी एकाच दिवशी म्हणजे दि**.27/01,03/02,10/02,17/02**या दिनांकास अनुक्रमे श्री.विनायक सकाराम व श्री.नरेंद्रसिंग बदली रक्षक म्हणून दुस-या पाळीत हजर होते. त्यामुळे श्री.गौड यांचे दि**.27.01, 03,10,17.02.2010**या** 04**दिवसांचे** (7000/31=225+7000/28x3=750) **एकूण रुपये** 225+750=975 **एकाच दिवशी दोन वेगवेगळया ठिकाणी उपस्थित असल्यामुळे दुहेरीप्रदान झाल्याचे निदर्शनास येते.**

c)**त्याचप्रमाणे श्री.स्वामी बोधराज,त्रिलोकदास व लाल लाही उदयान प्रत्येकी** 2 **सुरक्षा रक्षकांच्या** 3 **दिवस उपस्थितीवर कनिष्ठ अभियंता या पर्यवेक्षकीय कर्मचा-यांची स्वाक्षरी नाही. त्यामुळे सदर दिवशी हे सुरक्षा रक्षक उपस्थित होते किंवा नाही याची स्पष्टता होत नाही. म्हणून** 7000X6=42000 **ही रक्कम आक्षेपाधीन ठेवण्याचे प्रस्तावीत करण्यात येत आहे.**

d)**देयक प्रमाणक क्रमांक** PWD/14,Dt.30.03.2011 **या देयकात श्री. रामदास गौड हे सुरक्षा रक्षक अेम.आय.डी.सी.व दसरा मैदान या ठिकाणी दुस-या पाळीत एकाच दिवशी म्हणजे दि**.27/02,06/03,13/03,20/03**या दिनांकास अनुक्रमे श्री.विनायक सकाराम व श्री.नरेंद्रसिंग बदली रक्षक म्हणून हजर होते. त्यामुळे श्री.गौड यांचे दि**.27.02, 06,13,20.03.2010**या** 04**दिवसांचे** (7000/28=250+7000/31x3=677) **एकूण रुपये** 250+677=927 **दुहेरी प्रदान झाल्याचे निदर्शनास येते.**

e)**जिजामाता उदयान** 01 **सुरक्षा रक्षक व दसरा मैदान** 02 **सुरक्षा रक्षक यांच्या उपस्थितीवर कनिष्ठ अभियंता या पर्यवेक्षकीय कर्मचा-यांची स्वाक्षरी नाही. त्यामुळे सदर दिवशी हे सुरक्षा रक्षक उपस्थित होते किंवा नाही याची स्पष्टता होत नाही. म्हणून** 7000X3=21000 **ही रक्कम**

**आक्षेपाधीन ठेवण्याचे प्रस्तावीत करण्यात येत आहे.**

| एकूण वसुलपात्र रक्कम | एकूण आक्षेपाधीन रक्कम |
|---|---|
| 37649+360+360+903+975+927=41174 | 42000+21000=63000 |

**उपरोक्त अभिप्रायांबाबत अर्धसमास क्रमांक** 149 **व** 90, **दिनांक** 10.02.2014 **निर्गमित करण्यांत आले होते, परंतु या संदर्भात कोणताही खुलासा प्राप्त न झाल्याने उपरोक्त आक्षेप कायम करण्यांत येत आहे.**

DVESMBM7301 (Ref No : 53, Hmm No : 149)

## *42 प्रभाग समिती - 1 मधील खड्डे डांबराने भरणे व पॅचवर्क करणे*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :210-2433 केंद्र/राज्य/मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 3538114.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 490984.00/-

***बी.बी.एम.डांबरीकरणानंतर रस्ता सिलकोट न केल्यामुळे दर्जाहीन झालेले काम. तसेच प्राकलनापेक्षा जादा खर्च झालेला असून गौण खनिज स्वामित्वधनाची रक्कम वसुल केलेली नाही.***

| | |
|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम : | रु. 5052940/- |
| तांत्रिक मंजूरी : | शहर अभियंता पत्र क्र. 4412 दि. 21.09.10 |
| प्रशासकिय मंजूरी व वित्तीय मंजूरी : | प्राकलन दराने स्थायी समिती ठराव क्र. 145 दि. 25.10.2010 |
| ठेकेदाराचे नाव : | मे. ए एम रामचंदानी |
| तरतुद : | जे.एन.एन.यु.आर.एम. रू. 2 कोटी |

कार्यादेश : यु.एम.सी. पत्र क्र. 2661 दि. 28.02.2011

कामाची मुदत : 90 दिवस

काम पुर्ण दिनांक : 25.05.2011

मोजमाप नोंदवही क्र. : 3431 पान क्र. 1 ते 3

एकूण झालेला खर्च : रू.5532088/- (अंतिम देयक)
प्रमाणक क्र. 3498 दि. 12.12.2012

जिल्हादर सुची : सन 2008-2009

---

प्रभाग समिती – 1 मधील खड्डे डांबराने भरणे व पॅचवर्क करणे या कामाची प्राप्त नस्ती व अभिलेख तपासणी अंती लेखा परीक्षणात खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. प्रस्तुत कामाचा ठेका मे. ए.एम रामचंदानी यांना प्राक्कलन दराने देण्यात आला असून दि. 28.02.2011 रोजी कार्यादेश देणेत आलेला आहे. काम विहीत मुदतीत पुर्ण झाले आहे. परंतु सदर कामाची निविदा स्विकृती नस्ती तपासणीस सादर केली नाही. या कामाच्या मोजमाप नोंदवहीतील मोजमापे तपासली असता बाब क्र. 1 नुसार रस्त्यावरील खड्डे भरणेसाठी एकूण 334.91 घनमीटर खडी 75 ते 100 मी. मी. आकाराची पुरवठा करून पसरविणेत आली आहे. तसेच बाब क्र. 2 नुसार एकूण तेवढ्याच क्षेत्रामध्ये डांबराने टॅक कोट करून बाब क्र. 3 नुसार हॉट मिक्स हॉट लेड ( 3.5% डांबर अंतर्भुत) चा एक थर डांबर पुरवून पसरविणेत आले असल्याचे मोजमापावरून दिसून आले (एकूण वापरलेले परिमाण 704.11 घनमीटर). तदनंतर सदरचा रस्ता वाहतुकीसाठी खुला करणेत आलेला आहे. मिनीस्ट्री ऑफ रोड ट्रान्सपोर्ट ॲण्ड हायवे (MORT & H) च्या रोड स्पेसीफिकेशन 504.5 या नियमानुसार हॉट मिक्स लेड या दिलेल्या डांबराच्या थराची सुरक्षा करणेसाठी पुढील डांबराचा थर देणेत येणार नाही. अशावेळी पहिला घेणेत आलेला डांबराचा थर सिलकोट करणे आवश्यक आहे. परंतु प्राकलनात अशी तरतुद केली नसल्यामुळे सदर प्राकलन सदोष आहे. एकूण 11542.75 चौ.मी.चे क्षेत्र सिलकोट न करण्यात आल्यामुळे एकंदरीत खड्डे बुजविण्याचे काम तांत्रिक दृष्ट्या विहित दर्जाचे झाले नाही. याबाबतचे समर्थनिय अनुपालन लेखा परिक्षणात सादर करणे बाबत अर्धसमास पत्र क्र. 125/28.1.2014 अन्वये कळविणेत आले होते. परंतु असे अनुपालन लेखा परिक्षण कालावधीत प्राप्त झाले नाही. सबब खालील प्रमाणे झालेला खर्च लेखा परिक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

बाब क्र. 1 = 75 ते 100 एम.एम खडी पुरवठा करणे व पसरविणे

= 334.91 घ.मी. X 809.90 दर = रू.271244/-

बाब क्र. २ = खडीकरणावरील टॅक कोट (डांबराने)

= 11542.75 चौ.मी. X 50.65 दर = रू.584640 /-

बाब क्र. ३ = हॉट मिक्स हॉट लेड डांबर थर

= 704.11 घ.मी. X 3809.39 दर = रू. 2682230/-

**एकूण आक्षेपाधिन खर्च रू. 3538114/-**

2] प्रस्तुत कामाचा ठेका मे ए.एम. रामचंदानी यांना प्राक्कलन दराने देणेत आला असून प्राकलनाची एकूण किंमत रू. 5052940/- एवढ्या रक्कमेस तांत्रीक मंजूरी देण्यात आली असून या कामावर एकूण प्रत्यक्ष रू. 5532044/- एवढा खर्च झालेला आहे. म्हणजेच प्राक्कलनापेक्षा रू. 479148/- एवढा जादा खर्च झाला आहे. या जादा झालेल्या खर्चाबाबत अंतिम देयकाचे प्रदान करतेवेळी 10% जादा खर्चाचे अधिकार कार्यकारी अभियंता / शहर अभियंता यांना असल्याचे नमूद केले आहे. परंतु 10% जादा खर्चाची कारणे नमुद केली नाहीत. याबाबत सार्वजनिक बांधकाम नियमावली परिच्छेद क्र. 220 परिशिष्ट 42 अनुक्रमांक 21 ची तपासणी केली असता यामध्ये निविदेतील कोणत्याही एका बाबीसाठी 10% दरामध्ये वाढ देण्याचे अथवा रू. 5000/- च्या मर्यादेपर्यंत यामधील जी रक्कम कमी असेल एवढी वाढ देण्याचे अधिकार संबंधित अभियंता यांना असल्याचे नमूद केले आहे. तथापी या कामामध्ये सरसकट निविदेच्या संपूर्ण रक्कमेच्या 10% वाढ ठेकेदाराला प्रदान केलेली असून अशी जादा दिलेली वाढीची रक्कम नियमाबाह्यपणे अदा केल्याचे दिसून आले त्यामुळे जादा खर्चाची रक्कम खालीलप्रमाणे वसूलपात्र ठरते.

**वसूलपात्र रक्कम रू. 479148/-**

3] महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग शासन निर्णय दि.15.12.2006 नुसार ठेकेदाराने बांधकामासाठी वापरलेली वाळू खडी मुरूम इत्यादी गौण खनिजांचे स्वामित्व धन (रॉयल्टी) ची रक्कम शासन सदरी भरणे बंधनकारक आहे. परंतु अशी गौण खनिज स्वामित्व धनाची रक्कम ठेकेदराच्या देयकातून वसूल करून मनपाने शासन सदरी भरणा न केल्याने शासनाचे नुकसान झालेले आहे ते खालीलप्रमाणे वसूल पात्र ठरते.

बाब क्र. – 1 = 75 ते 100 मीमी खडी पुरवठा (एकूण साहित्य 334.91 घ.मी.)

= 334.91 घनमीटर X 35.34 दर.

= रू. 11836/- (वसूल पात्र रक्कम)

4] प्रस्तुत कामामध्ये रस्त्यावरील खड्डे बुजविणेसाठी डांबराचा टॅक कोट हॉटमिक्स हॉट लेड थर देणेसाठी डांबराचा वापर करण्यात आल्याचे दिसून आले. तसेच वापरणेत आलेले डांबर चेंबूर येथील रिफायनरी

मधून मागविणेत आले असून सदरचे डांबर ट्रकने (ब्राउझर) मागविणेत आले असून प्रथम रिकाम्या ट्रकचे वजन डांबर भरलेनंतरचे वजन व डांबर उतरवीले नंतरचे वजन याबाबतची चलने लेखा परीक्षणात उपलब्ध करणेत आली नाहीत त्यामुळे प्रत्यक्ष किती डांबर या कामासाठी वापरणेत आले याचा मेळ लेखा परीक्षणास घेता आला नाही.

**एकूण आक्षेपाधीन रक्कम = रू. 35,38,114/-**

वसूलपात्र रक्कम (ब+ क) = रू. 4,90,984/-

DATNDMM5801 (Ref No : 74, Hmm No : 125)

### *43 उल्हासनगर -3 डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेश व्दाराचे विस्तारीकरण करणे*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :C-4(4)-2 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 6758421.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 336332.00/-

***जिल्हा दरसुचीमध्ये दर उपलब्ध नसल्याने बाजारभावाप्रमाणे दर पृथकरण न करणे तसेच सुधारीत अंदाजपत्रक तयार न करणे व प्राकलनापेक्षा जादा खर्च करणे तसेच मुद्रांक शुल्क वसुल न केलेबाबत...***

| | | |
|---|---|---|
| 1 | कामाचे नाव | उल्हासनगर - 3 डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेश व्दाराचे विस्तारीकरण करणे |
| 2 | प्रशसकिय मान्यता क्रमांक | स्थायी समिती ठराव क्र. 34 दि. 15.07.2009 |
| 3 | तांत्रिक मान्यता क्रमांक | शहर अभियंता पत्र क्र. 2745 दि. 30.05.2009 |

| | | |
|---|---|---|
| 4 | अंदाजपत्रकीय रक्कम रूपये | रू. 4709050/- सुधारीत अंदाजपत्रक<br>9845731 + 14 % =1,12,24,133/- |
| 5 | लेखाशिर्ष | मनपा विधी अर्थसंकल्प C-4(4) P-II |
| 6 | निविदा / दरपत्रक प्रकार | B - 2 |
| 7 | जाहिरात प्रसिध्दी (वृत्तपत्र कालावधी) | नगर न्युज, दै एशियन एज, अमृत कलश,<br>दि. 31.07.2009 |
| 8 | निविदा विक्री कालावधी | 3/7/2009 ते 24/8/2009 |
| 9 | निविदा उघडण्याचा दिनांक व प्राप्त दिनांक | दि. 16.09.2009 निविदा विक्री – 6<br>प्राप्त निविदा - 4 |
| 10 | न्युनतम निविदा | 4 |
| 11 | मक्तेदाराचे नांव व स्विकृती निविदा दर | मे. डी. एस. कंस्ट्रक्शन 14 % जादा |
| 12 | कार्यारंभ आदेश क्रमांक व दिनांक | UMC 1780 दि. 6.3.2010 |

| | | |
|---|---|---|
| 13 | कामाची मुदत | 6 म. |
| 14 | मुदतवाढ | 20.11.2011 |
| 15 | काम पूर्ण दिनांक | 31.5.2011 |
| 16 | मोजमाप पुस्तिका क्रमांक व पान क्रमांक | 1494 पान क्र. 26 ते 34 |
| 17 | कामावर झालेला एकूण खर्च (रूपये) | 10086295/- |
| 18 | अंतिम प्रमाणक क्रमांक, दिनांक व रक्कम रूपये | 3127 दि. 06.11.2013 |
| 19 | इतर तपशिल, मुद्रांक शुल्क, करारनामा | रू 100/-<br>29.03.2010 |

उल्हासनगर 3 येथील डॉ .बाबासाहेब आंबेडकर प्रवेशव्दाराचे विस्तारीकरण करणे या कामाची नस्ती व अभिलेख यांची तपासणी केली असता लेखा परीक्षणात खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

प्रस्तुत कामासाठी दि .31.07.2009 च्या दै .नगरन्यूज ,दै .एशियन एज ,अमृतकलश या वृत्तपत्रात जाहिर प्रसिध्दी करून सिलबंद निविदा मागविण्यात आल्या आहेत .या कामासाठी चार निविदा प्राप्त झाल्या असून सर्वात न्युनतम दराची म्हणजेच 14 %जादा दराची मे .डी.एस .कंस्ट्रक्शन यांची निविदा अंतिमत :

स्विकारणेत येऊन त्यांना यु.एम.सी .पत्र क्र .1780/दि .29.03.2010 अन्वये कामाचे कार्यादेश देणेत आले आहेत . कामाची मुदत 6 महिने होती परंतु त्यांना 20-11-2011 पर्यंत मुदतवाढ देऊन सदरचे काम दि .31/05/2011 रोजी पुर्ण झाले आहे .या रस्त्याच्या अर्ध्या भागात पुर्वी सदर प्रवेशव्दाराचे आर.सी.सी .काम झालेले होते .नविन प्रस्तावित आंबेडकर प्रवेशव्दाराचे विस्तारीकरण करणे साठी रक्कम रू.47,09,050/- चे अंदाजपत्रक तयार करून त्यास तांत्रीक व प्रशासकिय मंजूरी घेऊन काम सुरू करणेत आले असून पुर्ण करण्यात आले .प्रस्तुत कामाची नस्ती व कागदपत्रे तपासणीअंती खालील प्रमाणे तुटी निदर्शनास आल्या.

1) प्रस्तुत कामाचे मुळ रेखाचित्र )डिझाईन (नस्तीसोबत जोडलेले नाही .तसेच कामाचे क्रॉस सेक्शन दर्शविण्यात आलेले नाहीत त्यामुळे मुळ संकल्पचित्रे व रेखाचित्रे यांच्यानुसारच मुळ व विस्तारीत कामे झाली आहेत किंवा नाही याबाबत लेखा परीक्षणास खात्री करता आली नाही.

2) प्रस्तुत कामाचे प्राक्कलन तपासले असता यामधील बाबक्र .21,23,24,31,32 या बाबींचे बांधकाम विभागाच्या 2004-2005 च्या दर सूचीमध्ये दर उपलब्ध नसल्याने बाजारातुन सदर बाबींचे दर मागवून न्युनतम दरपत्रकाचे दर पृथ्यकरण करून व त्याप्रमाणे दर निश्चित करणेत आले असून मोजमाप नोंदवहीतील मोजमापानुसार ठेकेदारास कामाचे प्रदान करणेत आल्याचे निदर्शनास आले .परंतु प्रत्यक्षात बाजारामधून प्राप्त करून घेणेत आलेली दरपत्रके व केलेले दर पृथ्थकरण नस्तीसोबत जोडणेत आलेले नाही. त्यामुळे देयकाव्दारे वरील बाबींचे ठेकेदारास प्रदान केलेल्या रक्कमांच्या दरांबाबत लेखा परीक्षणास खात्री करता आली नाही . ठेकेदारास खालील प्रमाणे बाबनिहाय प्रदान करणेत आलेली रक्कम आक्षेपाधिन ठेवणेत येत आहे

| | **एकूण वापरलेले साहित्य** | **दर रू.** | **प्रदान रक्कम रू.** |
|---|---|---|---|
| बाब क्र. 21 | 1097.179 चौमी. | 4400.84 | 4828509/- |
| बाब क्र. 23 | 2076 इंच | 56.00 | 116256/- |
| बाब क्र. 24 | 624 इंच | 88.30 | 55099/- |
| बाब क्र. 31 | 171.23 चौमी. | 155.33 | 26597/- |
| बाब क्र. 32 | 2 | 865980 | 1731960/- |
| | | | 6758421/- |

3) प्रस्तुत प्रवेशव्दाराचे विस्तारीकरणात उभे केलेले आर.सी.सी .बीम तसेच आर.सी.सी .प्लॅटफॉर्म यांचे क्यूब रिपोर्ट )टेस्टींग अहवाल (मान्यता प्राप्त गुणनियंत्रण व दक्षता विभाग यांचेकडून समाधानकारक

असलेबाबतचे अहवाल घेणेत आलेले नाहीत. या कामाचे निविदेतील अटी व शर्तीनुसार असा अहवाल घेणे आवश्यक असतांना चाचणी अहवालाशिवाय झालेला खर्च रू.67,58,421/- आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

4) कल्याण अंबरनाथ रस्त्यावरील साईबाबा मंदीर फर्स्ट गेट येथील प्रवेश व्दाराचे बांधकाम करण्याचे काम सुरू करण्याचे काम यापुर्वी कार्यारंभ आवेश क्र.उमपा/सा.बां.वि/.21अ/361/दि .10.03.2003 अन्वये मे डी.एस .कंस्ट्रक्शन यांना 14 %जादा दराने करणेचे सोपविले होते .परंतु वहातूक विभागाने या कामाकरिता रस्ता बंद करण्यास विलंबाने परवानगी दिल्याने काम सुरू करण्यास विलंब झाला .तसेच डी.सी .कंस्ट्रक्शन यांनी कामास प्रत्यक्षात सुरूवात केल्यानंतर आर्थिक कारणास्तव त्यांची प्रगती संथगतीने सुरू ठेवली होती .तसेच त्यांना संथ गतीने काम करीत असल्याबाबत वेळेवेळी पत्रे देऊनही त्यांनी कामात प्रगती न आणल्याने स्थायी समिती ठराव क्र .161 दिनांक 19/03/2008 अन्वये सदरहू ठेकेदाराची संविदा रद्द करून त्यांची अनामत रक्कम जप्त करणे बाबत निर्देश देणेत आले .त्यानंतर प्रवेशव्दाराचे अर्धवट काम पुर्ण करण्यासाठी महापालिकेने रक्म रू. 9845731 +14 %जादा असे एकूण रक्कम रू .1,12,24,133/- चे सुधारीत अंदाज तयार करून सदरचा ठेका पुन्हा डी.एस .कंस्ट्रक्शन यांना देऊ केला आहे .परंतु प्रत्यक्षात सुधारीत अंदाज केलेनंतर अशा अंदाजास तांत्रीक मान्यता घेण्यात आल्याचे दिसून आले नाही .तसेच मे .डी.एस .कंस्ट्रक्शन यांचे यापुर्वीचे काम रद्द करून सुरक्षा अनामत जप्त केल्यानंतरही त्यांनाच पुन्हा कामाचा ठेका देण्याचे प्रयोजन समजू शकले नाही .सदरच्या विसंगतीबाबत समर्थनिय अनुपालन होणे आवश्यक आहे .तसेच सदर ठेकेदाराने या प्रवेशव्दाराचे यापुर्वी किती प्रमाणात काम केले होते व त्यानुसार त्यांना किती रक्कम प्रदान करणेत आली होती. या विषयीची मोजमाप नोंदवही व संदर्भिय कागदपत्रे लेखा परीक्षणात उपलब्ध करून देणेत यावी .

5) मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 मधील कलम 63 ची दुरुस्ती /सुधारणा क्र .12 दि .01/05/2006 नुसार करारनामा करतांना कराराच्या रक्कमेच्या प्रथम 10 लाखापर्यंत रू .100 /- व त्यापुढील प्रत्येक 1 लाखाकरिता रू .100/- प्रमाणे मुद्रांक शुल्क कमाल रू 5.00 लाखाच्या मर्यादेपर्यंत भरणे बंधनकारक आहे .करारनाम्याची रक्कम रू. 4709050 -/तसेच सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू. 9845731 /- (सुधारीत अंदाजपत्रकानुसार करारनामा केलेला नाही)असल्याने निविदा धारकाने रू .8800 -/मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक होते .नस्तीत उपलब्ध करारनाम्याच्या प्रकरणी रू .100/- मुद्रांक पेपरवर करारनामा करण्यात आल्याचे दिसते त्यामुळे शासनाचे रू .8700/- चे नुकसान झाले आहे .तरी रूपये 8700/- रक्कम निविदा धारकाकडून वसूल करून शासन सदरी भरणा करावी.

वसूलपात्र रक्कम रू .8700 /-

6) प्रस्तुत कामाचे तांत्रीक मंजूरी मिळालेले मुळ अंदाजपत्रक रक्कम रू. 4709050/- एवढे असून नविन सुधारीत अंदाजपत्रक तांत्रीक मंजूरी विना रक्कम रू. 9845731/- अधिक 14 %जादा दर मिळून रू.1,12,24,133/- एवढे तयार करणेत आले असून या कामावरती एकूण रक्कम रू .1,00,86,292/- एवढा खर्च झाल्याचे दिसून येते .या एकूण खर्चाच्या रक्कमेपैकी रक्कम रू .81,89,483/- रक्कमेवर ठेकेदारास 14% जादा दराने रू .11,46,527/- अदा केली आहे .महाराष्ट्र लेखा संहिता 1971 नियम 167(2) नुसार जेव्हा मुळ

अंदाजामध्ये 10 %पेक्षा अधिक वाढ संभव असेल संकल्प चित्रातल्या योजनेत फेरबदल केला असेल अथवा अंशत :काम केल्यावर सोडून देण्यात आलेल्या कामाचे नुतनीकरण करावयाचे असेल तर सुधारित अंदाजपत्रक तयार केले पाहिजे .परंतु सदर कामामध्ये रू. 81,89,483/- रकमेवर 10 %पेक्षा जादा खर्च झाला आहे .तसेच सुधारित अंदाज तयार करून त्यास मंजूरी घेतली नसल्याने रक्कम रू .8189483 एवढ्या रक्कमेच्या 10 = %रू . 818895(रू 1146527 – 818895) = रू .327632/- वसूल करावी.

**एकूण वसूल पात्र रक्कम रू .327632/-**

**एकूण वसूल पात्र रक्कम (3 +4) = 8700 +327632 =रू.336332/-**

**एकूण आक्षेपाधीन रक्कम = (1 ब) =रू .6758421/-**

DATNDMM5801 (Ref No : 75, Hmm No : 54)

## *44 चांदीबाई कॉलेजसमोरील पुलापासून आर.ओ.बी. पर्यंत एका बाजूने संरक्षक भिंत बांधणे*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :413-3229 राज्य् व मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 9561474.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 251518.00/-

***मोजमाप नोंदवहीत जादा मोजमापे नोंदविल्याने जादा झालेले प्रदान , प्राकलनापेक्षा जादा झालेला खर्च, गौण खनिजाची रक्कम वसुल करून शासन जमा केली नाही.***

| | | |
|---|---|---|
| 1 | कामाचे नाव | चांदीबाई कॉलेजसमोरील पुलापासून आर.ओ.बी. पर्यंत एका बाजूने संरक्षक भिंत बांधणे |
| 2 | प्रशसकिय मान्यता क्रमांक | स्थायी समिती ठराव क्र. 67 दि. 20.08.2009 |
| 3 | तांत्रिक मान्यता क्रमांक | शहर अभियंता |
| 4 | अंदाजपत्रकीय रक्कम रूपये | रू. 86,51,400/- |
| 5 | लेखाशिर्ष | शासन निधी व मनपा निधी |
| 6 | निविदा / दरपत्रक प्रकार | B - 1 |
| 7 | जाहिरात प्रसिध्दी (वृत्तपत्र कालावधी) | एकूण 12 वर्तमानपत्रे दि. 21.04.2009 |
| 8 | निविदा विक्री कालावधी | दि. 8.05.2009 वाढविलेला कालावधी |
| 9 | निविदा उघडण्याचा दिनांक व प्राप्त दिनांक | दि. 12.05.2009 |
| 10 | निविदा स्विकृती | एकूण 9 |
| 11 | मक्तेदाराचे नांव व स्विकृती निविदा दर | मे. जय भारत कंस्ट्रक्शन 15.23 % जादा दराने (तडजोडीने) जिल्हा दरसूची 2008.2009 |
| 12 | कार्यारंभ आदेश क्रमांक व दिनांक | क्र. 1432 / दि. 26.8.2009 |
| 13 | कामाची मुदत | 6 म. |
| 14 | मुदतवाढ | 25.05.2012 |
| 15 | काम पूर्ण दिनांक | 25.05.2012 |

| | | |
|---|---|---|
| 16 | मोजमाप पुस्तिका क्रमांक व पान क्रमांक | 1374 / पान क्र. 1 ते 15 |
| 17 | कामावर झालेला एकूण खर्च (रूपये) | 9561474/- |
| 18 | इतर तपशिल, मुद्रांक शुल्क | रू 100/- |

चांदीबाई कॉलेज समोरील पुलापासून आर.ओ.बी .पर्यंत एका बाजूला संरक्षक भिंत बांधणे या कामाची उपलब्ध केलेली नस्ती व अभिलेखे तपासले असता आढळून आलेल्या त्रुटी व उणीवांबाबत लेखा परीक्षणात खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

प्रस्तुत संरक्षक भिंत बांधणे या कामासाठी दि .21.04.2009 च्या एकूण 12 वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्धी करून सिलबंद निविदा मागविण्यात आल्या आहेत .तसेच या प्रसिद्धीच्या अनुशंगाने या कामासाठी एकूण 9 निविदा प्राप्त झाल्या असून यापैकी सर्वात न्युनतम दराची म्हणजेच तडजोडीने 15.23 %निविदा दरापेक्षा जादा दराची मे .भारत कंस्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेत आली असून त्यांना दि .26.8.2009 रोजी कामाचे कार्यारंभ आदेश देणेत आले आहेत सदरचे कामासाठी मुदतवाढ देऊन काम पुर्ण करून घेणेत आले आहे.

1) सदर कामासाठी एकूण 12 वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्दी देण्यात आली आहे .परंतु अशा वृत्तपत्रांची कात्रणे अथवा वृत्तपत्रे अभिलेखा सोबत जोडणेत आलेली नाहीत तसेच प्राप्त झालेल्या निविदा धारकांच्या मुळ निविदा नस्ती तपासणीस प्राप्त झाल्या नाहीत त्यामुळे प्राप्त झालेल्या दरांबाबत खात्री करता आली नाही.

2) या कामाचे तांत्रीक अधिकारी यांनी तांत्रीक मान्यता दिलेले प्राक्कलन तपासले असता या कामाची संरक्षक भिंत बांधणेसाठी जमीनीमध्ये खोदाई करणे ,मऊ व कठिण खडकात खोदाई ,23 से.मी .चे रबल सोलिंग बेडींगसाठी पल्म कॉक्रीट एम .15 चा एक थर ,एम .25 कॉक्रीटचा राफ्ट तयार करणे ,राफ्टवरती संरक्षक भिंत )रिटेलिंग वॉल (बांधणे अशा बाबी प्रस्तिवित केलेल्या आहेत .याबाबत या कामाची प्रत्यक्षात मोजमाप नोंदवही वरील मोजमापे तपासण्यात आली असता )तिसर्या धावत्या देयकापर्यंत (खालील प्रमाणे जादा मोजमापे घेण्यात आल्याचे दिसून आले.

एम .15 चे पल्म कॉक्रीट पुरवठा करणे व पसरविणे मोजमाप नोंदवही पान क्र .2

15 X 3.10 X 0.70 = 32.55 घनमीटर

(लांबी X रूंदी X उंची)

15 X 3.10 X 0.70 = 32.55 घनमीटर

3.80 X 3.10 X 0.70 = 8.25 घनमीटर

एकूण 73.35 घनमीटर

वजाती 33.80 X 0.70 X 0.50 = 11.93 ( - )

61.42 घ.मी.

15 X 3.10 X 0.70 = 32.55 घनमीटर

15 X 3.10 X 0.70 = 32.55 घनमीटर

4 X 3.10 X 0.70 = 8.68 घनमीटर

एकूण साहित्य = 135.30 घ.मी.

(मोजमाप नोंदवही पान क्र .7)

15 X 3.10 X 0.70 = 32.55 घनमीटर

15 X 3.10 X 0.70 = 32.55 घनमीटर

15 X 3.10 X 0.70 = 32.55 घनमीटर

12.70 X 3.10 X 0.70 = 27.56 घनमीटर

वजाती 57.70 X 0.70 X 0.70= 28.27 ( - )घनमीटर

एकूण साहित्य = 96.94 घ.मी.

एकूण एकंदर वापरलेले साहित्य = 135.30 घ.मी + .96.94 घ.मी.

= 232.24 घ.मी.

वरील प्रमाणे तिसर्या धावत्या देयकामध्ये ठेकेदारास एकूण 232.24 घ.मी .एवढ्या साहित्याचे प्रतिघनमिटर रू .2513.59 या दराप्रमाणे एकूण रूपये 5,83,756/- एवढे प्रदान करणे आवश्यक होते . परंतु मोजमाप नोंदवहीमध्ये (पान क्र .13)वर खालीलप्रमाणे जादा मोजमापे खालील साखळीमध्ये नोंदविली आहेत.

1 X 15 X 3.10 X 0.70 = 32.55 घनमीटर

1 X 15 X 3.10 X 0.70 = 32.55 घनमीटर

1 X 4 X 3.10 X 0.70 = 08.68 घनमीटर

वजाती 1 X 34 X 0.70 X 0.70 = 16.66 ( - )घनमीटर

जादा साहित्य एकूण =57.12 घ.मी.

उपरोक्त जादा मोजमापे मोजमाप नोंदवहीत नोंदविल्यामुळे एकूण 232.24 घ.मी .एवढ्या साहित्याचे प्रदान करण्याऐवजी 232.24 घमी. + 57.12 घमी. = 289.36 घमी .साहित्याचे प्रदान रू .7,27,332/-( 289.36 X 2513.59 दर) करणेत आल्याचे निदर्शनास आले त्यामुळे ठेकेदारास (727332 – 583756) रू .1,43,756/- एवढ्या रक्कमेचे जादा प्रदान झालेले आहे .सदरची रक्कम तपासणीत वसूलपात्र ठेवणेत येत आहे.

वसूलपात्र रक्कम रू .1,43,756/-

3) प्रस्तुत कामाच्या मोजमाप नोंदवहीवरील पान क्र .7 वरील मोजमापे तपासली असता वरील जागेवरील संरक्षक भिंत बांधकामी बाब क्र .2 नुसार 57.70 या साखळीमध्ये एकूण 3.65 मीटर सरासरी रूंदीमध्ये कठिण खडकात खोदाई केलेली आहे .अशी खोदाईची मापे घेतल्यानंतर बाब क्र .3 नुसार वरील साखळीमध्ये एकूण 3.75 सरासरी रूंदीमध्ये रबल सोलींग केली आहे .प्रत्यक्षात कठिण खडकात 3.65 सरासरी रूंदीमध्ये खोदाईची मापे नोंदविण्यात आलेली असतांना तेवढ्याच सरासरी रूंदीमध्ये रबल सोलींग घेणे तांत्रीकदृष्ट्या आवश्यक होते .परंतु 0.10 सेमी .ची रबल सोलींगची जादा मोजमापे नोंदविल्यामुळे झालेले एकूण काम योग्य झाले असल्याचे लेखा परीक्षणात म्हणता येणार नाही . यावरून असे निदर्शनास येते की, तांत्रिक अधिकारी यांनी मंजूर केलेल्या प्राकलनानुसार सदरचे काम झाल्याचे दिसून आले नाही. सदरच्या झालेल्या विसंगतीबाबत आवश्यक ते अनुपालन तपासणीत सादर करणेबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 109 दिनांक 21.1.2014 अन्वये कळविणेत आले होते. परंतु लेखा परिक्षण कालावधित अनुपालन प्राप्त झाले नाही.

4) प्रस्तुत कामाचे प्राक्कलन रू .86,51,400/- 2008-2009 च्या जिल्हा दर सूचीनुसार तयार करण्यात आले असून दरवर्षी नविन दरसूचीमध्ये 12 ते 15 टक्के दरवाढ होत असल्याने इतकी दरवाढ गृहित धरून उर्वरीत कामाचे मे .जयभारत कंस्ट्रक्शन यांना वाटाघाटी करून दिलेले 15.23 %जास्त दर वाजवी असल्याने त्यांना सदरचे काम देण्याचे प्रस्तावित केलेले आहे .व सदरचा प्रस्ताव स्थायी समितीकडे मान्यता मिळण्यास सादर केल्याचे नमूद आहे .परंतु स्थायी समितीची अंतिम मंजूरी मिळालेबाबत कागदपत्रे सादर केली नाहीत .महाराष्ट्र लेखा संहिता 1971 चे नियम 167(2) नुसार जेव्हा मुळ अंदाजामध्ये 10 %पेक्षा अधिक वाट संभव असेल अथवा संकल्प चित्रातल्या योजनेत फेरबदल केला असेल अथवा अंशत :काम केल्यावर सोडून देण्यात आलेल्या कामाचे नुतनीकरण करावयाचे असेल तर सुधारित अंदाजपत्रक तयार केले पाहिजेत व ते मुळ अंदाज असल्याप्रमाणे मान्यतेसाठी सादर केले पाहिजेत .प्रस्तुत कामामध्ये एकूण रक्कम रू .95,51,474/- एवढा खर्च झाला असून मुळ निविदा रक्कम रू .8651400 X 10 = %रू .8,65,140/- अशाप्रकारे (8651400 +865140) = रू .95,16,540/- च्या मर्यादेत खर्च करणे अपेक्षित होते परंतु सदर कामाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार न करण्यात

आल्यामुळे (9551474 – 9516540) = रू .34934/- जादा खर्च झाल्याचे दिसून आले .सदरची रक्कम लेखा परीक्षणात वसूल पात्र ठेवण्यात येत आहे.

वसूलपात्र रक्कम रू .34939/-

5) महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग शासन निर्णय दि .15-12-2006 नुसार ठेकेदाराने बांधकामासाठी वापरलेली वाळू ,खडी ,मुरूम इत्यादी गौण खनिजांचे स्वामीत्व धन (रॉयल्टी) रक्कम शासन सदरी भरणे बंधनकारक आहे .परंतु अशी गौण खनिज स्वामीत्व धनाची रक्कम ठेकेदाराच्या देयकातून वसूल करून मनपाने शासन सदरी भरणा न केल्याने शासनाचे नुकसान झाले आहे .ते खालील प्रमाणे वसूलपात्र ठरते.

दर प्रति घनमिटर रू ,35.34

मोजमाप नोंदवहीप्रमाणे पुरवठा झालेले साहित्य

बाब क्र .3 – रबल सोलींग (15 ते 20 सेमी.) पुरवठा व पसरविणे

= 181.26 घमी .X 35.34 = रू .6406/-

बाब क्र .4 – पल्म कॉक्रीट (एम – 15) पुरवठा व पसरविणे

(एकूण वापरलेले साहित्य 392.49 घमी.)

रेती(वाळू) 392.49 X .40 = 156.99 घमी .X 35.34 दर

= रू .5611/-

खडी(40 एमएम) 392.49 X .55 = 215.86 X 35.34 दर

= रू .7715/-

खडी(20 एमएम) 392.49 X .24 = 94.19 X 35.34 दर

= रू .3329/-

खडी(12/10 एमएम) 392.49 X .15= 58.82 X 35.34 दर

= रू .2079/-

एकूण 18,734/-

3) बाब क्र .5 :राफ्ट साठी (एम-25) कॉक्रीट पुरवठा करणे पसरविणे

(एकूण वापरलेले साहित्य 251.88 घमीटर)

वाळू रेती 251.88 X .455 =114.60 X 35.34 दर =रू .4050/-

खडी (20 एमएम) 251.88 X .67 =168.75 X 35.34 दर =रू .6085/-

खडी (12/10 एमएम) 251.88 X .22 =55.41 X 35.34 दर =रू .1958/-

एकूण 12,073/-

4) बाब क्र .6 :रिटेनिंग वॉल (एम-25) कॉक्रीट पुरवठा व पसरविणे

(एकूण वापरलेले साहित्य 577.91 घनमीटर)

वाळू रेती 577.91 X .455 =262.94 X 35.34 दर =रू .9293/-

खडी (20 एमएम) 577.91 X .67 =387.19 X 35.34 दर =रू .13684/-

खडी (12/10 एमएम) 577.91 X .22 =127.14 X 35.34 दर =रू .4493/-

एकूण 27,470/-

एकूण वसूलपात्र रक्कम (1+2+3+4) = 6406 +18734 +12073 +27470

= रू .64,323 /- वसूलपात्र

6) मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 मधील कलम 63 ची दुरूस्ती /सुधारणा क्र .12 दि .1/5/2006 नुसार करारनामा करतांना कराराच्या रक्कमेच्या प्रथम 10 लाखापर्यंत रू. 100/- व त्यापुढील प्रत्येक एक लाखाकरीता रू .100/- प्रमाणे मुद्रांक शुल्क कमाल पाच लाखाच्या मर्यादेत भरणे बंधनकारक आहे . करारनाम्याची रक्कम रू .86,51,400/- असल्याने निविदाधारकाने रू .8600/- मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक होते .नस्तीत उपलब्ध करारनाम्याच्या प्रकरणी रू .100/- च्या मुद्रांक पेपरवर करारनामा करण्यात आल्याचे दिसते त्यामुळे शासनाचे रू .8500/- नुकसान झाले आहे .अशी रक्कम निविदा धारकाकडून वसूल करून शासन सदरी भरणा करावी.

वसूलपात्र रक्कम रू .8500/-

7) 1) प्रस्तुत कामाचे मुळ प्राक्कलन लेखा परीक्षणात नस्तीसोबत जोडणेत आलेले नाही.

2) प्रस्तुत कामाची मोजमाप नोंदवही तपासणी अंती असेही निदर्शनास आले की ,मोजमाप नोंदवहीमध्ये प्रत्यक्ष ज्या दिवशी काम करण्यात आले त्या दिवसांच्या तारखांची नोंद घेण्यात आलेली नाही .तसेच शेवटच्या अंतिम देयकापर्यंत कोणत्याही तारखा नोंदविण्यात येत नाहीत त्यामुळे

बाबनिहाय कोणते काम कोणत्या दिवशी हाती घेण्यात आले ,कामाची सुरूवात केव्हा करण्यात आली व सदरचे काम अंतिमत :केव्हा पुर्ण झाले याचा अचूक मेळ लेखा परीक्षणात घेता आला नाही .याबाबत आवश्यक ते अनुपालन दाखवावे.

3) सदरच्या कामामध्ये पल्म कॉंक्रीट ,राफ्ट तयार करणे ,रिटेनिंग वॉल बांधणे इत्यादी संपूर्णत : कॉंक्रीटचा वापर करण्यात आल्याचे दिसून येते .परंतु प्रस्तुत कामाचे क्यूब रिपोर्ट (टेस्टींग अहवाल) गुणनियंत्रण व दक्षता विभाग यांचेकडून घेण्यात आलेले चाचणी रिपोर्ट नस्तीसोबत जोडलेले नाहीत अथवा सादर केलेले नाहीत .त्यामुळे एकूण झालेले काम विहीत दर्जाचे झालेबाबत तपासणी करता आली नाही .याबाबतचे अनुपालन लेखा परिक्षणात सादर केलेले नाही तरी या कामावरती झालेला एकूण खर्च रू .95,61,474/- लेखा परीक्षणात आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधीन रक्कम रू .95,61,474/-

एकूण वसूलपात्र रक्कम (अ+ब+ड+इ)

= 143756 +34939 +64323 +8500

= रू .2,51,518/-

आक्षेपाधीन रक्कम (फ) = रू .95,61,474/-

DATNDMM5801 (Ref No : 76, Hmm No : 109)

## *45 कल्याण अंबरनाथ रस्ता वालधूनी पुलापासून राजीव गांधी चौक शांतीनगर पुलापर्यंत एका बाजूने संरक्षक भिंत बांधणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

उल्हासनगर महानगरपालिका

*लेखा शीर्ष :413-3269 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 13938802.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1290000.00/-

***प्राकलनानूसार संरक्षक भिंत न बांधता कमी उंचीची भिंत बांधणेत आलेने तांत्रिक मंजुरीप्रमाणे काम न होणे, निविदा रकमेपेक्षा जादा दराच्या निविदा स्विकारल्याने झालेले आर्थिक नुकसान, गौण खनिज रक्कम वसुल करून शासन जमा न करणे, मिक्स डिझाईन चित्र न घेता बांधकाम करणे, चुकीच्या दर पृथक्करणामुळे झालेले जादा प्रदानाबाबत..***

| | | |
|---|---|---|
| 1 | कामाचे नाव | कल्याण अंबरनाथ रस्ता वालधूनी पुलापासून राजीव गांधी चौक शांतीनगर पुलापर्यंत एका बाजूने संरक्षक भिंत बांधणे. |
| 2 | निविदा सुचना क्रमांक | निविदा सूचना उपलब्ध नाही.<br>एकूण बारा वृत्तपत्रे दि. 24/4/2009 |
| 3 | अर्थसंकल्पिय तरतुद | शासन निधी रू. 121.76 लक्ष |
| 4 | अंदाजपत्रकीय रक्कम | रू. 1,21,76,850/- |
| 5 | तांत्रिक मान्यता क्रमांक व दिनांक | शहर अभियंता पत्रक 2737 दि. 31.3.09 |
| 6 | प्रशासकीय मान्यता क्रमांक व दिनांक | स्थायी समिती ठराव क्र. 69 दि. 20.08.2009 |
| 7 | मागणी कशाच्या आधारे तयार केली | अतिवृष्टी व महापूर |
| 8 | ठेकेदाराचे नाव | मे. शंकर ट्रेडर्स 14.14 % जादा दराने |
| 9 | कार्यारंभ आदेश क्रमांक | दि. 25.08.2009 |
| 10 | दराची निश्चिती | सन 2008.2009 ची जिल्हा दरसूची |

| | | |
|---|---|---|
| 11 | कामाचा कालावधी | 6 महिने |
| 12 | काम पुर्ण दिनांक | दि. 31.3.2012 मुदत वाढीने |
| 13 | मोजमाप क्रमांक व पृष्ठ क्रमांक | 2613 पान क्र. 1 ते 09<br>2500 पान क्र. 1 ते 09 |
| 14 | प्रमाणक क्रमांक व दिनांक | D V No. 867,5754,1341<br>एकूण झालेला खर्च रू. 1,39,38,802/- |
| 15 | देयकाचा प्रकार | बी – 1 |
| 16 | सुरक्षा रक्कम | रू. 2,45,000/- व 4,51,400/- |
| 17 | मुद्रांक नोंदणी शुल्क | निरंक |

उल्हासनगर कल्याण अंबरनाथ रस्ता वालधूनी पुलापासून राजीव गांधी चौक शांतीनगर पुलापर्यंत एका बाजूने संरक्षक भिंत बांधणे या कामाची उपलब्ध नस्ती व अभिलेख यांची तपासणी करण्यात आली . तपासणीत आढळून आलेल्या त्रुटीबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) प्रस्तुत कामासाठी दि .24.04.2009 च्या एकूण बारा वृत्तपत्रात जाहिर प्रसिध्दी करून सिलबंद निविदा मागविणेत आल्या असून (वृत्तपत्राची कात्रणे उपलब्ध झाली नाहीत) एकूण प्राप्त व पात्र ठरलेल्या एकूण 6 निविदांपैकी मे .शंकर ट्रेडर्स यांची 14.14 %जादा दराची सर्वात कमी दर असलेली निविदा स्विकारणेत आली असून त्यांना दि .25.08.2009 रोजी सदर कामाचे कार्यादेश देणेत आले आहेत .तसेच मुदतवाढ देऊन काम पुर्ण करण्यात आल्याचे दिसून आले .

सदर कामाचे प्राक्कलनास शहर अभियंता यांचे पत्र क्र .2692 दि .27.02.2009 अन्वये तांत्रीक मान्यता दिली असून वालधूनी नदीच्या एका बाजूस एकूण 610 मीटर लांबीमध्ये 4.55 मीटर उंचीची संरक्षक भिंत प्रस्तावित केलेली आहे .प्रत्यक्ष या कामाची मोजमाप नोंदवही तपासली असता सदर संरक्षक भिंत 120 मीटर लांबीमध्ये बांधणेत आलेचे मोजमाप नोंदवहीवरील नोंदीवरून दिसून आले .या कामाची मोजमाप नोंदवहीतील विस्तृत मोजमापे खालीलप्रमाणे घेण्यात आली आहेत.

बाब क्र .1 =स्लश मधील खोदाई = 5.50 मीटर रूंदी X 4.00 मीटर खोली

बाब क्र .2 =जमीनीमधील (अर्थसॉईल) खोदाई = 5.50 मीटर रूंदी X 3.00 मीटर खोली

बाब क्र .5 =रबल सोलींग (15 सेमी) = 5.50 मीटर रूंदी X 0.30 सेमी मीटर उंची

बाब क्र .6 =सोलिंगवरील बेडींग (1:3:6) = 5.50 मीटर रूंदी X 0.15 सेमी मीटर उंची

बाब क्र .8 =बेडींगवरील घट्ट (सॉलीड)कॉक्रीट = 5.10 मीटर X 1.10 मीटर उंची

बाब क्र .9 =सॉलीड कॉक्रीटवरील पल्म कॉक्रीट = 5.10 मीटर रूंदी X 0.60 सेमीटर खोली

बाब क्र.10 =पल्म कॉक्रीटवरील घट्ट सॉलीड कॉक्रीट = 5.10 मीटर रूंदी X 1.10 मीटर उंची

बाब क्र.11 =सॉलीड कॉक्रीट (एम२०)वरील पल्म सॉलीड = 3.10 मीटर रूंदी X 0.70 सेमी उंची

बाब क्र.12 =पल्म कॉक्रीटवरील सॉलीड कॉक्रीट = 1.30 मीटर रूंदी X 1 मीटर उंची

बाब क्र.13 =सॉलीड कॉक्रीटवरील पल्म कॉक्रीट= 1.30 मीटर रूंदी X 0.60 सेमी उंची

बाब क्र.14 =पल्म कॉक्रीटवरील सॉलीड कॉक्रीट =0.82 सेमी X 0.70 सेमी उंची

वरीलप्रमाणे मोजमाप नोंदवहीतील नोंदविलेली मोजमापे पाहता बाब क्र .5 ते 14 नुसार (0.30 + 0.15 + 1.10 + 0.60 +1.10 + 0.70 +1 + 0.60 + 0.70) = 6.25 मीटर एवढ्या उंचीची संरक्षक भिंत बांधणेत आल्याचे मोजमापावरून दिसून येते .तथापि बाब क्र .1 व 2 नुसार (4 मीटर +3 मीटर ) = 7 मीटर उंचीची खोदाई स्लश व जमिनीमध्ये झालेली मोजमापे नोंदविल्यामुळे जमिनीच्या पृष्ठभागावरती (7 मीटर – 6.25 मीटर) = 75 सेमी उंचीची भिंत उभारण्यात आल्याचे सकृतदर्शनी मोजमाप नोंदवहीवरील मोजमापावरून दिसून येते .याबाबत प्राक्कलनामध्ये बाब क्र .1 नुसार सॉफ्ट व हार्ड रॉकमध्ये 2 मीटर एवढी खोदाई प्रस्तावित होती .प्रत्यक्षात जागेवरती काम करतांना 7 मीटर उंचीच्या खोदाईची आवश्यकता होती .मग अशावेळी संरक्षक भिंतीची उंची जमिनीच्या पृष्ठभागावरती प्राक्कलनाप्रमाणे 4.55 मीटर वाढविणे तांत्रिक नियमानुसार वाढविणे आवश्यक होते .शासनाकडून या कामासाठी प्राप्त झालेला निधी हा पुरनियंत्रणासाठी प्राप्त झाला असल्याने त्या अनुषंगाने संरक्षक भिंत बांधणेचे काम हाती घेणे क्रमप्राप्त होते .परंतु एकंदरीत मोजमापे पाहता सदरचे काम प्राक्कलनानुसार उच्च दर्जाचे झाले असल्याबाबतची खात्री लेखा परीक्षणात देता येत नाही .याबाबतचे अनुपालन लेखा परीक्षणास दाखवावे तोपर्यंत झालेला एकूण खर्च रू .1,39,38,802/- लेखा परीक्षणास आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे .

आक्षेपाधीन खर्च रू .1,39,38,802/-

2) प्रस्तुत कामाचे प्राक्कलन हे सन 2008.2009 च्या दरसूचीनुसार तयार करणेत आले असून या कामाचे मंजूर निविदाधारक मे .शंकर ट्रेडर्स यांनी मुळ निविदेत 18.18 %जादा दर भरलेले आहेत .मा .आयुक्त

यांनी मंजूर केलेली टी .6 टिपण्णीचे अवलोकन केले असता दरवर्षी नविन दरसूचीमध्ये 12 ते 15 टक्के दरवाढ होत असते इतकी दरवाढ गृहीत धरून उक्त कामाचे मे .शंकर ट्रेडर्स यांचेशी वाटाघाटी करून अंतिमत :कमी करून दिलेले 14.14 %टक्के जास्त दर वाजवी असल्याने त्यांना ठेका मंजूरीसाठी शिफारस केली आहे .याबाबत महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र . डीपीडब्ल्यू/1996/16(ब) लेखा मंत्रालय दि .20 सप्टेंबर 1997 नुसार निविदा मंजूरीबाबत अधिकार प्रदान केले आहेत .त्या अनुषंगाने रू .125 लक्ष किमंती पर्यंतच्या निविदांसाठी मंजूरी देण्याचे अधिकार (निविदेच्या अंदाजपत्रकाच्या चालू दरसुचीच्या आधारे येणाऱ्या किमंतीवर) 5 %पर्यंत मर्यादित असल्याचे नमूद केले आहे .असे असतांना मे .शंकर ट्रेडर्स यांची 14.14 %जादा दराची निविदा स्विकारणेत आल्यामुळे ठेकेदारास (14.14 - %5 ) = 9.14 %एवढे जादा प्रदान खालीलप्रमाणे झाले आहे .व असे प्रदान लेखा परीक्षणात वसूलपात्र ठरते.

मोजमाप नोंदवहीप्रमाणे या कामावरती एकूण झालेला खर्च रू .1,22,12,022.74/-

ठेकेदारास 9.14 %प्रमाणे जादा झालेले प्रदान रू .11,16,179/-

वसूलपात्र रक्कम =11,16,179/-

3) महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग निर्णय क्र .गौखनी/10/1001/प्र.क्र.24/29/मंत्रालय दि . 15.12.2006 नुसार ठेकेदाराने बांधकामासाठी वापरलेली वाळू ,खडी ,मुरूम इत्यादी गौण खनिजांचे स्वामित्व धन (रॉयल्टी) ची रक्कम शासन सदरी भरणे बंधनकारक आहे .परंतु अशी गौण खनिज स्वामीत्व धनाची रक्कम ठेकेदाराच्या देयकातून वसूल करून मनपाने शासन सदरी भरणा न केल्याने शासनाचे नुकसान झाले आहे .ते खालील प्रमाणे वसूलपात्र ठरते.

वसूल करावयाचा दर प्रति घनमीटर रू .35.34

अंतिम देयकाप्रमाणे पुरवठा झालेले साहित्य

| | | | | |
|---|---|---|---|---|
| बाब क्र .5 | = | हाय ट्रॅप रबल सोलींग पुरवठा | | |
| | | (एकूण पुरवठा साहित्य 211.52 घनमीटर) | | |
| | = | 211.52 घ.मी. X 35.34 दर | = | रू .7475/- |
| बाब क्र .6 | = | सिटू सिमेंट कॉक्रीट (1:3:6) बेडींग | | |
| | | (एकूण पुरवठा केलेले साहित्य 105.73 घ.मी.) | | |
| रेती (वाळू) | = | 105.73 X 35.34 दर | = | रू .3736/- |
| खडी (40 एमएम) | = | 105.73 X .47 =49.69 X 35.34 दर =रू .1756/- | | |
| खडी (20 एमएम) | = | 105.73 X .24 =25.37 X 35.34 दर =रू .896/- | | |
| बाब क्र .8 | = | एम.20 सॉलीड कॉक्रीट ॲब्युटमेंटसाठी (भिंत) | | |
| | | (एकूण वापरलेले साहित्य 12758.17 घनमीटर) | | |

1) रेती (वाळू) =1758.17 घमी X .47 =826.33 घमी X 35.34 दर =रू 29202/-

2) खडी(40 एमएम) =1758.17 घमी X .70 =1230.71 घमी X 35.34 दर =रू .43492/-

3) खडी(20 एमएम) =1758.17 घमी X .24 =421.96 घमी X 35.34 दर =रू .14912/-

बाब क्र .9 = एम-20 पल्म कॉक्रीट पुरवठा
(एकूण वापरलेले साहित्य 796.28 घनमीटर)

1) रेती (वाळू) =796.28 घमी X .40 =318.51 घमी X 35.34 दर =रू 11256/-
2) खडी(40 एमएम) =796.28 घमी X .55 =437.95 घमी X 35.34 दर =रू .15477/-
3) खडी(20 एमएम) =796.28 घमी X .24 =191.10 घमी X 35.34 दर =रू .6754/-

बाब क्र .11 = भरावासाठी रबलमेटल पुरवठा
(एकूण वापरलेले साहित्य 214.54 घमी.)
= 214.54 X 35.34 दर = रू .7582/-

एकूण वसूलपात्र रक्कम (7475 +3736 +1756 +896 +29202 +43495 +14912 +11256 + 15477 +6754 +7582)
= रू .142541/- (वसूलपात्र)

4) प्रस्तुत कामाचा ठेका मे .शंकर ट्रेडर्स यांना 14.14 %जादा दराने एकूण निविदा रक्कम रू .1,21,76,850/- नुसार देण्यात आला आहे .परंतु निविदा धारकाबरोबर केलेला करारनामा नस्तीसोबत जोडणेत आलेला नाही .मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 मधील कलम 63 ची दुरूस्ती /सुधारणा क्र .12 दि .01-05-2006 नुसार सरारनामा प्रथम 10 लाखापर्यंत रू. 100 व त्यापुढील एक लाखाकरीता रू .100/- प्रमाणे मुद्रांक शुल्क कमाल ५ लाखाच्या मर्यादेत भरणे बंधनकारक आहे .सदर करारनामा न उपलब्ध झाल्याने निविदा रक्कमेच्या आधारे रू .12100/- चे मुद्रांक शुल्क पोटी शासन जमा झालेचे तपासता आले नाही.

5) प्रस्तुत कामाची मोजमाप नोंदवहीतील अंतिम देयकाची मोजमापे तपासणी अंती निदर्शनास आले की , बाब क्र .3 नुसार स्लशमधील व जमिनीतील खोदाई मधून काढलेल्या एकूण साहित्यापैकी 6169.61 घ.मी .उपयोगी नसलेल्या साहित्याच्या वहातुकीसाठी (2 कि.मी .अंतरावर नेऊन टाकणे) ठेकेदारास प्रति घ.मी .रू .67.57 प्रमाणे रक्कम रू .4,16,880/ -एवढी रक्कम अदा केली आहे .परंतु अदा दराबाबत दर पृथक्करणाची तपासणी केली असता जिल्हा दरसूची (सन 2008-2009) पान क्र .106 नुसार 2 कि.मी .साठी प्रति घ.मी .रू .75.70/ -एवढा दर निश्चित केला असून दरसूची जिल्हा दरसूची पान क्र . 107 नुसार 50 मीटरचा इनिशियल लिड प्रति घ.मी.रू .13.20 प्रमाणे मुळ लिड यामधून वजाती करून खालील प्रमाणे दर देणे आवश्यक होते.

मुळ वहातूक दर (2 कि.मी .साठी) रू .75.70 – 13.20 =रू .62.50 प्रती घमी.

परंतु ठेकेदारास 67.57 एवढा दर केल्यामुळे प्रति घमी.(67.57 – 62.50) रू .5.07 प्रमाणे ठेकेदारास जादा प्रदान झाल्याचे निदर्शनास आले असे प्रदान वसूलपात्र ठरते.

एकूण वहातूक साहित्य 6169.71 X 5.07 दर जादा

= रू .31280/- (वसूलपात्र रक्कम)

6) 1 .प्रस्तुत काम हे पुरनियंत्रणासाठी नदीच्या काठाशी संरक्षक भिंत बांधणेचे असलेने निविदेतील तांत्रीक स्पेसिफिकेशन अट क्र .10.5 नुसार भिंत बांधणे कामी वापरणेत आलेले मिक्स कॉंक्रीटचे डिझाईन हे व्ही.जे.टी.आय .महाविद्यालयाकडून घेणेत आल्याचे निदर्शनास आले नाही .याबाबतचे आवश्यक अनुपालन लेखा परीक्षणात दाखवावे.

2 .निविदा शर्तीतील तांत्रिक स्पेसिफिकेशन अट क्र .10.1 नुसार प्रस्तुत कामासाठी वापरावयाचे सिमेंट हे आय.एस 8112-1971 ग्रेडचे व लार्सन ॲण्ड टुब्रो ,केसोराम ,वासवदत्ता ,गुजरात आहूजा ,बिर्ला सूपर या नामांकीत कंपनीचे असणे आवश्यक आहे .परंतु सदर कामासाठी वापरलेले सिमेंट स्पेसिफिकेशन नुसार असल्याचे प्रमाणपत्र अथवा नोंद नस्तीत आढळले नाही .

3. प्रस्तुत कामाच्या आर.सी.सी .कामाचे क्यूब रिपोर्ट (टेस्टींग अहवाल) गुण नियंत्रण व दक्षता विभाग यांचेकडून तपासून ते स्पेसिफिकेशन नुसार आहेत असे प्रमाणपत्र संबंधित संस्थेकडून घेण्यात आल्याचे दिसून आले नाही त्यामुळे आर.सी.सी .कामाच्या उच्च दर्जाबाबत तपासणीत खात्री झाली नाही .याबाबतचे अनुपालन दाखवावे.

4. प्रस्तुत कामाच्या मोजमाप नोंदवहीमध्ये काम सुरू झालेनंतर कोणत्या तारखेस किती काम पुर्ण झाले त्याबाबत तारखांची नोंद घेणेत आलेली नाही .त्यामुळे एकूण झालेल्या कामाबाबत खात्री करता आली नाही .याबाबत आवश्यक असे अनुपालन लेखा परीक्षणास दाखवावे.

वरील 1 ते 4 बाबींची पुर्तता होईपर्यंत सदर कामावरती एकूण झालेला खर्च लेखा परीक्षणात आक्षेपाधिन ठेवणेत येत आहे. आक्षेपाधिन खर्च रू . 1,39,38,802/-

एकूण वसूलपात्र रक्कम (ब +क +ड +ई) = 1116179+142541+12100+31280

= रू .13,02,100/-

आक्षेपाधीन रक्कम = रू .1,39,38,802/-

DATNDMM5801 (Ref No : 77, Hmm No : 111)

## *46 उल्हासनगर 2 निरंकारी हॉल ते भारत चौक या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे कामातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :139-4300 मनपा निधी*

उल्हासनगर महानगरपालिका

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 19217989.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 639346.00/-

***नियमबाहयपणे दिलेला ठेका, प्राकलन दरापेक्षा जादा दराने प्रदान केल्याने झालेले आर्थिक नुकसान, जादा वाहतूकीची मापे नोंदविलेने झालेले अतिप्रदान, गौणखनिजाची रक्कम वसुल करुन शासन जमा न केलेबाबत...***

| | | |
|---|---|---|
| 1 | कामाचे नाव | उल्हासनगर 2 निरंकारी हॉल ते भारत चौक या रस्त्याचे सिमेंट कॉक्रीटीकरण करणे. |
| 2 | अर्थसंकल्पिय तरतुद | 9.37 कोटी |
| 3 | अंदाजपत्रकीय रक्कम | रू. 2,16,12,112/- |
| 4 | तांत्रिक मान्यता क्रमांक व दिनांक | शहर अभियंता पत्र क्र. 1705/दि. 23/07/2008 सुधारीत अंजपत्रक शहर अभियंता पत्रक 4813 दि. 13-01-2011 |
| 5 | प्रशासकीय मान्यता क्रमांक व दिनांक | स्थायी समिती ठराव क्र. 37/दि. 22.08.2008 |
| 6 | ठेकेदाराचे नाव | मे. कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लिमीटेड |
| 7 | कार्यारंभ आदेश क्रमांक | यु.एम.सी./पी.डब्ल्यू.डी. पत्र क्र. 1107 दि. 27.02.2009 |
| 8 | दराची निश्चिती | 16.50 % जादा दराने |
| 9 | कामाचा कालावधी | 12 महिने |
| 10 | काम पुर्ण दिनांक | मोजमाप नोंदवहित तारखा नमूद नाहीत. |
| 11 | मोजमाप क्रमांक व पृष्ठ क्रमांक | 1103 पान क्र. 1 ते 95<br>357 पान क्र. 51 ते 55 |

| | | |
|---|---|---|
| 12 | अनुदान संकेतांक | लेखाशिर्ष – अ अंदाजपत्रक भाग 2 क्र. 4 पायाभूत सुविधा |
| 13 | प्रमाणक क्रमांक व दिनांक व एकूण झालेला खर्च | रू. 1,92,17,989/- |
| 14 | देयकाचा प्रकार | बी – 1 |
| 15 | वर्तमानपत्राचे नाव व निविदा कालावधी | फ्रि प्रेस जनरल, दैनिक लोकसत्ता दि. 06/09/2008 |
| 16 | सुरक्षा रक्कम | रू. 2,87,800/- + 5,50,300/- |
| 17 | मुद्रांक नोंदणी शुल्क | रू. 100/- |
| 18 | Inv. No. & Date | 2365 दि. 11.09.2013 |

उल्हासनगर-2 निरंकारी हॉल ते भारत चौक या रस्त्याचे सिमेंट कॉक्रीटीकरण करणे या कामाचे उपलब्ध केलेले अभिलेख व नस्ती तपासली असता या कामासाठी एकूण झालेल्या खर्चाबाबत लेखा परीक्षणात खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) प्रस्तुत रस्ता सिमेंट कॉक्रीटीकरण करणे या कामासाठी दि .06.09.2008 च्या दैनिक फ्रि .प्रेस जनरल व दैनिक लोकसत्ता या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करून सिलबंद निविदा मागविण्यात आलेल्या असून एकूण पाच निविदा प्राप्त झालेल्या आहेत .प्राप्त निविदा दि .22.10.2008 रोजी उघडणेत आल्या असून यापैकी तीन निविदा खालीलप्रमाणे पात्र ठरल्या आहेत.

1 .मे .इगल कंस्ट्रक्शन – 18 %जादा दराने

2 .मे .कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर – 20.70 %जादा दराने

3 .मे .सह्याद्री कंस्ट्रक्शन – 27 %जादा दराने

वरील प्राप्त निविदांपैकी मे .इगल कंस्ट्रक्शन याची सर्वात कमी दराची म्हणजेच निविदेच्या 18 %जादा दराची असून सदर कामाचे प्राक्कलन सन 2007-2008 च्या जिल्हा दरसूची नुसार तयार करण्यात आलेले आहे .सदर कामाचे कार्यादेश दि .27.02.2009 रोजी देण्यात आलेले असल्याने सन 2007-2008 च्या जिल्हा दर सूचीशी सन 2008-2009 ची जिल्हा दरसूचीशी दरांबाबत तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला असून प्राक्कलनीय तुलना करता येणारी निविदा 6.19 %जादा दराची होत असल्याने

आणखी दर कमी करण्यासाठी मे .कोनार्क इंफ्रास्ट्रक्चर दोन नंबरचा कमी निविदाधारक यांना आमंत्रीत केलेनंतर त्यांनी 4.85 %जादा दराने काम करण्यास संमती दर्शविली आहे .व त्यानुसार मे .कोनार्क इंन्फ्रास्ट्रक्चर यांना कार्यादेश देणेत आले आहेत .याबाबत लेखा परीक्षणात अभिप्राय देण्यात येत आहे की ,दराबाबत वाटाघाटी करणेसाठी प्रथम किमान दर असलेले निविदाधारक मे .इगल कंस्ट्रक्शन यांना आमंत्रीत करणे आवश्यक होते .परंतु अशी कार्यवाही मनपाने केल्याचे दिसून आले नाही .प्रस्तुत बाबत नस्तीमधील कागदपत्रांची छाननी केली असता सदरचा प्रस्ताव स्थायी समिती ठराव क्र .91 दि . 24.11.2008 च्या सभेत ठेवण्यात आला असून मे .इगल कंस्ट्रक्शन यांचे दर कमी असले तरी या एजन्सी बाबत उल्हासनगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागात सुरू असलेल्या चौकशी बाबत शासनाकडून पत्र क्र .2327/418/प्र.क्र .11/07/नवि/21/नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई दि . 20.08.2008 च्या प्राप्त झालेल्या आदेशान्वये मे .इगल कंस्ट्रक्शन यांना महापालिकेत कामे देण्यात येऊ नयेत असे नमूद असल्याने त्यांची निविदा स्विकारणे योग्य होणार नाही .याबाबत स्थायी समितीकडून निर्णय होणे कामी विषय स्थायी समितीकडे ठेवण्यात आला व त्या अनुषंगाने स्थायी समितीने वरील ठरावानुसार मे .इगल कंस्ट्रक्शन कंपनी यांना यापुढे उल्हासनगर महापालिकेत काम देऊ नये अशा कोणत्याही प्रकारची कारणे दाखवा नोटीस शासन किंवा महानगरपालिकेमार्फत जारी करण्यात आलेली नसल्याने तसेच त्यांना सुनावणीची संधी न दिल्याने सध्यस्थितीत मे .इगल कंस्ट्रक्शन कंपनी यांचेवर कोणत्याही प्रकारची बंदी घालणे उचित वाटत नसल्याचे म्हटले आहे .असे असतांना मनपाने मे .इगल कंस्ट्रक्शन या सर्वात कमी दराच्या ठेकेदाराला ठेका न देता अथवा त्यांना वाटाघाटीला आमंत्रीत न करता परस्पर दुसऱ्या कमी दराच्या ठेकेदाराला बोलावून त्यांना ठेका वाटप केला आहे .त्यामुळे स्पर्धात्मक दराचा आर्थीक फायदा मनपाला प्राप्त झाला असे म्हणता येणार नाही . तसेच मे .कोनार्क इंफ्रास्ट्रक्चर यांना नियमबाह्यपणे या कामाचा ठेका दिल्यामुळे मनपाचे मोठ्या प्रमाणात आर्थीक नुकसान झाल्याचे मत लेखा परीक्षणात नोंदविण्यात येत आहे .याबाबतचे आवश्यक ते अनुपालन सादर करावे .तोपर्यंत झालेला खर्च तपासणीत आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे .

आक्षेपाधीन रक्कम रू .1,92,17,989/-

2) प्रस्तुत कामाची मोजमाप नोंदवही तपासणीअंती निदर्शनास आले की ,या कामाचे चौथे धावते देयक (मोजमाप नोंदवही क्र .1103 पान क्र .39) बाब क्र .22 नुसार एकूण 200.74 चौरस मीटर ,आठवे धावते देयक मोजमाप नोंदवही पान क्र .79 बाब क्रमांक 28 नुसार 308.01 चौरस मीटर तसेच नववे धावते देयक पान क्र .91 नुसार 91.37 चौ .मी .असे एकूण एकंदर 600.12 चौ.मी .क्षेत्रामध्ये 60 मीमी जाडीचे पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या नोंदी घेण्यात आल्या असून प्रति चौरस मीटर रू .1050/- प्रमाणे एकूण रक्कम रू .630126/ -ठेकेदारास प्रदान करणेत आलेले आहेत .प्रस्तुत अदा केलेल्या दराबाबत प्रत्यक्षात मुळ प्राक्कलनानुसार तसेच सुधारीत प्राक्कलनानुसार असा दर रू .849/ -प्रति चौरस मिटर अंतिमत :मंजूर केलेला असतांना ठेकेदारास रू .1050/- प्रति चौ.मी .या दराने देयक अदा केले असल्याचे निदर्शनास त्यामुळे सदर पेव्हर ब्लॉक बसविणे पोटी खालील प्रमाणे जादा रक्कम अदा केलेली असून ती

वसूलपात्र ठरते.

प्रत्यक्षात अदा केलेला दर रू .1050 – 849 अनुज्ञेय दर

= जादा अदा दर 201 चौ.मी.

एकूण वापरलेले परिमाण =600.12 चौ.मी .X 201 चौ.मी.

=रू .1,20,624/- (वसूलपात्र रक्कम)

3) प्रस्तुत कामाचे 10 वे अंतिम देयकाचा गोषवारा पडताळला असता एकूण संपुर्ण कामामध्ये 3 ते 7 नुसार एकूण 6243.43 घनमिटर एवढी मऊ मुरुम ,कठिण मुरुम ,सॉफ्ट रॉक व स्लश यामध्ये खोदाई करून साहित्य काढलेले आहे .त्यामुळे तेवढ्याच साहित्याची वहातूक करून (2 किमी अंतरावर) ठेकेदारास डंपींग करणेकामी ठेकेदारास रक्कम प्रदान करणे आवश्यक होते .परंतु उपरोक्त गोषवारा मधील अनुक्रमांक 84 नुसार ठेकेदारास एकूण 7971.46 घनमिटर निरूपयोगी साहित्य वाहून डंपींग करणेचे प्रदान करणेत आलेले आहे .त्यामुळे एकूण खोदाई केलेल्या साहित्यापेक्षा खालीलप्रमाणे साहित्य वाहून नेण्याचे जादा प्रदान करणेत आलेले आहे .त्यामुळे असे जादा प्रदान वसूलपात्र ठरते.

एकूण जादा वहातूक केलेले साहित्य =7971.46 – 6243.43 घमी .खोदाईतील साहित्य

जादा वहातूक केलेले साहित्य =1728.23 घ.मी.

=1728.23 X 67.56 दर घनमीटर

=रू .1,16,759/- (वसूलपात्र रक्कम)

4) महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग निर्णय क्र .गौखनी/10/1001/प्र.क्र.24/ख/मंत्रालय दि . 15/12/2006 नुसार ठेकेदाराने बांधकामासाठी वापरलेली वाळू ,खडे ,मुरूम इत्यादी गौण खनिजांचे स्वामित्व धन (रॉयल्टी) रक्कम शासन सदरी भरणे बंधनकारक आहे .परंतु अशी गौण खनिज स्वामित्व धनाची रक्कम ठेकेदाराच्या देयकातून वसूल करून मनपाने शासन सदरी भरणा न केल्याने शासनाचे नुकसान झालेले आहे .ते खालीलप्रमाणे

दर प्रति घनमिटर रू .35.34

अंतिम देयकाप्रमाणे (10 वे) पुरवठा झालेले साहित्य

अ.क्र .11 – बेडींग फाऊंडेशन 1.3.6 पुरवठा व पसरविणे

(एकूण पुरवठा केलेले साहित्य 537.35 घ.मी.)

रेती वाळू =537.35 X .47 =252.55 X 35.34 दर

= रू.8925/-

खडी (40एमएम) = 537.35 X .70 =376.14 X 35.34 दर

= रू.13293/-

खडी (२०एमएम) = 537.35 X .24 =128.96 X 35.34 दर

= रू.4558/-

अ.क्र.12 – कॉंक्रीट 1.2.4 पुरवठा व पसरविणे

(एकूण वापरलेले साहित्य 351.21 घ.मी.)

रेती वाळू =351.21 X .44 =154.53 X 35.34 दर

= रू.5461/-

खडी (20एमएम) = 351.21 X .67 =235.31 X 35.34 दर

= रू.3316/-

खडी (१२/१०एमएम) = 351.21 X .22 =77.26 X 35.34 दर

= रू.2730/-

अ.क्र.14 – एम-20 ट्रॅपमेटल पुरविणे (स्लॅबसाठी)

(एकूण पुरवठा साहित्य 119.51 घ.मी.)

रेती वाळू =119.51 X .44 =52.58 X 35.34 दर

= रू.1858/-

खडी (20एमएम) = 119.51 X .67 =80.07 X 35.34 दर

= रू.2820/-

खडी (12/10एमएम) = 119.51 X .22 =26.29 X 35.34 दर

= रू.929/-

अ.क्र .33 – रबल सोलींग(15 ते 20 सेमी) पुरवठा

(एकूण वापरलेले साहित्य 1563.67 घ.मी.)

खडी (15 ते 20 सेमी) = 1553.67 X 35.34 दर

= रू .54907/-

अ.क्र .34 – 80 मीमी .खडी पुरवठा

(एकूण साहित्य 376.84 घ.मी.)

=376.84 X 35.34 दर

= रू .13318/-

अ.क्र .35 – 80 मीमी .खडी पुरवठा

(एकूण साहित्य 376.84 घ.मी.)

=376.84 X 35.34 दर

= रू .13318/-

अ.क्र .36 – एम-10 सीटू सिमेंट कॉक्रीट

(एकूण पुरवठा साहित्य 436.55 घ.मी.)

रेती वाळू =436.55 X .47 =205.17 X 35.34 दर

= रू .7251/-

खडी (40एमएम) = 436.55 X .70 =305.58 X 35.34 दर

= रू .10494/-

खडी (20एमएम) = 436.55 X .57 =248.83 X 35.34 दर

= रू .8545/-

अ.क्र .37 – एम-15 सीटू सिमेंट कॉक्रीट

(एकूण वापरलेले साहित्य 32.84 घ.मी.)

वाळू =32.84 X .47 =15.43 X 35.34 दर

= रू .545/-

खडी (40एमएम) = 32.84 X .70 =22.98 X 35.34 दर

= रू .824/-

खडी (20एमएम) = 32.84 X .24 =7.88 X 35.34 दर

= रू .282/-

अ.क्र .38 – एम-35 सीटू सिमेंट कॉक्रीट

(एकूण वापरलेले साहित्य 483.88 घ.मी.)

रेती वाळू =483.88 X .42 =203.03 X 35.34 दर

= रू .7175/-

खडी (20एमएम) = 483.88 X .57 =275.63 X 35.34 दर

= रू .9741/-

खडी (12/10एमएम) = 483.88 X .28 =135.48 X 35.34 दर

= रू .4788/-

एकूण रक्कम (8925 +13293 +4558 +5461 +3316 +2730 +1858 +2820 +929 +54907 + 13318 +7251 +10494 +8545 +545 +824 +282 +7175 +9741 +4788)

= रू .1,75,078/- (एकूण वसूलपात्र रक्कम)

5) प्रस्तुत कामाच्या मोजमाप नोंदवहीतील नोंदी तपासल्या असता अस्तित्वात असलेला मुळ रस्ता खोदाई करून नविन .35 सेमी. (350 मीमी) चा कॉक्रीटीकरणाचा रस्ता प्राक्कलनामध्ये प्रस्तावित असून सदरच्या कॉक्रीटीकरणासाठी मऊ मुरुमामध्ये एकूण 728.66 घनमिटर कठिण मुरुमामध्ये 3710.85 घनमीटर तसेच सॉफ्ट रॉकमध्ये 138.88 घ.मी .साहित्य रोड कटींग मधून प्राप्त असून ठेकेदारास खोदाईचे प्रदान करणेत आलेले आहे .सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील स्टॅण्डर्ड स्पेसिफिकेशन (रस्ते) खंड एक मधील पान क्र .188 मधील आर डी क्र .11 नुसार रोड कटिंग करतेवेळी उपलब्ध झालेले साहित्य हे दुसऱ्या कामासाठी उपयोगात आणले पाहिजे तसेच अशा साहित्याची स्टॅग मोजमापे घेऊन एकूण खोदाईच्या साहित्याच्या खाली नमूद केलेल्या टक्केवारीनुसार

वजाती करून उर्वरीत साहित्याचे प्रदान ठेकेदारास देयकामध्ये प्रदान करणे आवश्यक आहे .परंतु उक्त स्फेसिफिकेशन नुसार अशी टक्केवारी वजाती न करता ठेकेदारास संपुर्ण खोदाईचे प्रदान करणेत आले आहे .व असे प्रदान खालील प्रमाणे वसूलपात्र ठरते.

| | | |
|---|---|---|
| जमीनीतील खोदाई वाळू ,ग्रॅव्हलस ,मऊ मुरुम इत्यादी | - | 16 % |
| कठिण मुरुमातील खोदाई | - | 16 % |
| बोल्डर इत्यादी | - | 40 % |
| सॉफ्ट रॉक | - | 40 % |
| हार्ड रॉक | - | 40 % |

1) मोजमाप नोंदवहीनुसार मऊ मुरूमात केलेली खोदाई एकूण 728.66 घ.मी.

करावयाची वजाती 16 = %116.58 घ.मी.

प्रत्यक्षात अदा करावयाचे =728.66 घमी .– 116.58 घमी = .612.08 घ.मी.

अदा केलेले एकूण परिमाण =728.66 घ.मी.

जादा अदा केलेले परिमाण =116.58 X 86.10 दर

= रू .10037/- (वसूलपात्र)

2. मोजमाप नोंदवहीनुसार कठिण मुरुमात केलेली एकूण खोदाई 3710.85 घ.मी.

करावयाची वजाती 16 = %593.73 घ.मी.

प्रत्यक्षात अदा करावयाचे साहित्य परिमाण =3710.85 – 593.73 =3117.12 घ.मी.

अदा केलेले एकूण परिमाण =3710.85 घ.मी.

जादा अदा केलेले परिमाण =593.73 घ.मी .X 113.40 दर

= रू .67328/- (वसूलपात्र)

3. मोजमाप नोंदवहीनुसार सॉफ्ट रॉकमध्ये केलेली खोदाई एकूण 1380.88 घ.मी.

करावयाची वजाती परिमाण =40 = %552.35 घ.मी.

प्रत्यक्षात अदा करावयाचे साहित्य परिमाण =1380.88 – 552.35 =828.53 घ.मी.

अदा केलेले एकूण परिमाण =1380.88 घ.मी.

जादा अदा साहित्य परिमाण =552.35 घ.मी .X 231.05 दर रूपये

= रू .1,27,620/- (वसूलपात्र)

एकूण वसूलपात्र रक्कम (1+2+3) =10037 +67328 +127620

= रू .204985/-

6) मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 मधील कलम 63 ची दुरुस्ती/सुधारणा क्र .12 दि .1/5/2006 नुसार करारनामा करतांना कराराच्या रक्कमेच्या प्रथम 10 लाखापर्यंत रू. 100 व त्यापुढील प्रत्येक एक लाखाकरीता रू .100/ -प्रमाणे मुद्रांक शुल्क कमाल पाच लाखाच्या मर्यादेत भरणे बंधनकारक आहे . करारनाम्याची रक्कम रू .2,16,12,112/ -असल्याने निविदा धारकाने रू .22000/ -मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक होते .नस्तीत उपलब्ध करारनाम्याच्या प्रकरणी रू .100/- च्या मुद्रांक पेपरवर करारनामा करणेत आल्याचे दिसते .त्यामुळे शासनाचे रू .21900/ -चे नुकसान झाले आहे .अशी रक्कम निविदा धारकाकडून वसूल करून शासन सदरी भरणा करावी .

वसूलपात्र रक्कम रू .21900/-

एकूण वसूलपात्र रक्कम (ब +क +ड +ड +इ +फ)

=12024 +116759 +175078 +204985 +21900

=रू .6,39,346/-

एकूण आक्षेपाधीन रक्कम (अ) = रू .1,92,17,989/-

DATNDMM5801 (Ref No : 78, Hmm No : 110)

### *47 उल्हासनगर - 5 येथील कैलाश कॉलनी ते श्रीराम सिनेमा, कालीमाता मंदिर चौक, नेताजी चौक डांबराने ट्रेंच पट्टी टाकणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :210-2433 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 10929212.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 719330.00/-

***रस्त्यावरती डांबराचा थर दिल्यानंतर अशा थराला संरक्षण देणेकरीता रस्ता सिलकोट न करणे, डांबरीकरणाचा उच्च दर्जा प्राप्त न हेणे, स्पेसिफिकेशन नुसार काम न करणे तसेच स्वमित्व धनाची रक्कम वसूल करून शासनाकडे भरणा न केलेबाबत.***

| | |
|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम : | रु. 10061200/- |
| तांत्रीक मंजूरी : | शहर अभियंता पत्र क्र. 4879 दि. 07.02.2011 |
| प्रशासकिय मंजूरी : | स्थायी समिती ठराव क्र. 133 दि. 21.02.2011 |
| निविदा मंजूरी : | निविदा न मागविता प्राक्कलन दराने |
| ठेकेदाराचे नाव : | मे. जयभारत कंस्ट्रक्शन प्राक्कलन दराने |
| डी.डी. र नं. : | पत्र क्र. 145 दि. 21.02.2011 |
| कार्यादेश : | पत्र क्र. 2664 दि. 28.02.2011 |
| कामाची मुदत : 90 | दिवस |
| काम पुर्ण दिनांक : 03.11.2011 | |
| निविदा स्त्रोत्र : | मनपा निधी (रस्ते दुरूस्ती सी-5) |
| निविदा दर सुची : 2010.2011 | |
| मोजमाप नोंदवही क्र. : | क्र. 2664 पान क्र. 1 ते 46 |
| प्रमाणक क्र. : | डी. व्ही. नं. 4199 दि. 16.12.2011 |
| एकूण झालेला खर्च : | रू. 10929212/- (अंतिम देयक)<br>प्रमाणक क्र. 2574 दि. 04.10.2012 |

1] प्रस्तुत रस्ता ट्रेंच पट्टीने डांबरीकरण करणे कामाचा ठेका उपरोक्त डी.डी.आर यांचे शिफारशीनुसार प्राक्कलन दराने मे. जुभारत कंस्ट्रक्शन यांना देणेत आला असून याबाबत या कामाची नस्ती व मोजमाप नोंदवही यांचे लेखापरीक्षण केले असता यावरील अभिप्राय पुढील प्रमाणे देणेत येत आहेत.

1. सदर कामाच्या प्राक्कलनानध्ये अर्थ सॉईल ( जमीनीमध्ये) खोदाई, रबल सोलिंग, खडीकरण, फलगाअर डांबरीकरण, टॅककोट, हॉटमिक्स हॉट लेड (बी.एम.) डांबराचा थर तसेच अस्फाल्टीक कॉक्रीट करणे इत्यादी बाबी या कामासाठी प्रस्तावित केलेल्या आहेत. याबाबत या कामाचे पहिले धावते देयकाच्या अनुषंगाने मोजमाप नोंदवही क्र. 2664 पान क्र. 43 वरील घेतलेली मोजमापे तपासणी अंती निदर्शनास आले की (बाब क्र. 5) नुसार एकूण 439.10 मीटर एवढ्या क्षेत्रामध्ये डांबराचा टॅककोट देऊन त्यावरती हॉट मिक्स हॉट लेड (3.30 % डांबर बी.म.) चा एक थर घेणेत आला असून सदर क्षेत्र वहातुकीसाठी खुले करण्यात आले आहे. याबाबत मिनीस्ट्री ऑफ रोड ट्रान्सपोर्ट ॲण्ड हायवे (MORT & H) मधील स्पेसिफिकेशन 502.4.2 नुसार मुळ रस्त्यावरती डांबराचा टॅक देणेपूर्वी सदरचा रस्ता क्षेत्र घुळीपासून मुक्त होणेसाठी पॉवर ब्रुम अथवा तांत्रीक स्वीपर्स व्दारे योग्य सफाई होणे आवश्यक असून तदनंतरच डांबराचा टॅक कोट टाकणेची तरतुद आहे. परंतु प्राक्कलनात अशी तरतुद न करता तशीच मोजमाप नोंदवहीत मापे नोंदवली आहेत. त्यामुळे या कामाचे योग्य मुल्यमापन झाले असे तपासणीत म्हणता येत नाही. तसेच उक्त स्पेसिफिकेशन कलम 504.5 नुसार रस्तेवरती डांबराचा एक थर देणेत आलेनंतर दुसरा थर देणेत येणार नसेल अशावेळी अशा थराला संरक्षण देणेसाठी असे रस्त्यांचे डांबरीकरण क्षेत्र सिलकोट करण्याची तरतुद आहे. परंतु वरील नमूद केलेले क्षेत्र बी.एम. च्या थरानंतर सिलकोट करणेत आलेले नाही. त्यामुळे पुढील होणाऱ्या वहातुकीमुळे सदरचा रस्ता थोड्याच कालावधीमध्ये वाहून गेल्याची शक्यता तपासणीत नोंदविण्यात येत आहे. त्यामुळे नमूद क्षेत्रामध्ये झालेला डांबरी करणावरचा खर्च निष्फळ झाला आहे. असा खर्च खालीलप्रमाणे

बाब क्र. 5 नुसार टॅक कोट क्षेत्र = 1676.64 चौ.मी. X 50.65 दर

(एकूण लांबी 439.10 मीटर) = रू. 84921/-

बाब क्र. 6 नुसार हॉट मिक्स हॉट

लेड (बी.म) डांबराचे थराचे क्षेत्र = 83.84 घनमीटर X 3809.31 दर

= रू. 3,19,373/-

एकूण वसूलपात्र (84921 + 319373) = रू. 404294/-

2. प्रस्तुत कामाच्या मोजमाप नोंदवहीतील एकूण मोजमापांचे अवलोकन केले असता सदरचा रस्ता ट्रेंच पट्टी डांबरीकरण करणे या कामासाठी बाब क्र. 1 नुसार .75 से.मी. एवढ्या खोलीमध्ये मातीमध्ये खोदाई केली आहे. बाब क्र. 2 नुसार .30 से.मी. जाडीचे रबल सोलिंग, बाब क्र. 3 नुसार .15 से.मी. जाडीचे दोन थरांचे खडीकरण (दबाई सकट), बाब क्र. 4 नुसार .5 से.मी. जाडीचे फुलग्राअर अशी मोजमापे नोंदवून तदनंतर टॅक कोट, हॉट मिक्स हॉट लेडचा डांबरी करणाचा थर तसेच अस्फाल्टीक कॉक्रीट टाकणेत आले आहे. याबाबत तपासणीत आक्षेप नोंदविण्यात येत आहे की, एकूण .75 से.मी. खोलीची जमिनीमध्ये खोदाई केलेनंतर वरील प्रमाणे (030 से.मी. + .15 से.मी. + 015 से.मी. + 05 से.मी.) डांबरीकरणासाठी एकूण .65 से.मी. एवढ्या जाडीचे क्रश थिकनेस तांत्रीकदृष्ट्या प्राप्त झाल्याचे मोजमापावरून दिसून येते. ज्याअर्थी एकूण खोदाई .75 से.मी. दर्शविली असतांना पृष्ठभागापासून डांबरीकरण कमीतकमी .25 से.मी. वर असणे आवश्यक आहे. परंतु एकंदरीत मोजमापावरून झालेले डांबरीकरण जमिनीच्या पृष्ठभागाच्या खाली करण्यात आल्याचे दिसते. त्यामुळे डांबरीकरणाच्या कामाचा उच्च दर्जा प्राप्त झाला असे तपासणीत म्हणता येणार नाही. याबाबत समर्पक अनुपालन लेखा परीक्षणात दाखवावे तोपर्यंत या कामावरती एकूण झालेला खर्च लेखा परीक्षणात आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

आक्षेपाधीन रक्कम रू. 10929212/-

2] महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग शासन निर्णय क्र. गौ.ख./10/1001/प्रकरण क्र. 309/29/दि. 11.02.2010 नुसार ठेकेदाराने बांधकामासाठी वापरलेली वाळू, खडी, मुरूम इत्यादी गौणखनिजांचे स्वामित्व धन (रॉयल्टी) रक्कम शासनसदरी भरणे बंधनकारक आहे. परंतु अशी गौणखनिज स्वामित्व धनाची रक्कम ठेकेदाराच्या देयकातून वसूल करून मनपाने शासन सदरी भरणा न केल्याने शासनाचे नुकसान झाले ते खालीलप्रमाणे वसूलपात्र ठरते

दर प्रति घनमीटर रू. 70.67

मोजमाप नोंदवहीप्रमाणे पुरवठा झालेले साहित्य

बाब क्र. 2 नुसार – रबल सोलिंग खडी (15 ते 20 से.मी.)

= 1825.74 X 70.67 दर = रू. 129025/-

बाब क्र. 3 नुसार – 75 एमएम ते 100 एममी खडी पुरवठा

= 1938.60 घ.मी. X 70.67 दर = रू. 137000/-

बाब क्र. 4 नुसार – फुलग्राअर डांबरीकरणासाठी खडी पुरवठा

( एकूण वापरलेले साहित्य 6749.24 चौरस मीटर)

खडी 40 एम.एम. = 6749.24 / 100 X 6.00 घ.मी.

= 404.95 घ.मी. X 70.67 दर = रू. 28618/-

खडी 12 एम.एम. = 6749.24 / 100 X 1.5 घ.मी.

= 67.49 घ.मी. X 70.67 दर = रू. 4770/-

खडी 10 एम.एम. = 6749.24 / 100 X 1.2 घ.मी.

= 80.99 घ.मी. X 70.67 दर = रू. 5724/-

एकूण वसूलपात्र रक्कम रू. 305137/-

3] मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 मधील कलम 63 ची दुरूस्ती / सुधारणा क्र. 12 दि. 01.05.2006 नुसार करारनामा करतांना कराराच्या रक्कमेच्या प्रथम 10 लाखापर्यंत रू. 100 व त्यापुढील प्रत्येक 1 लाखाकरीता रू. 100/- प्रमाणे मुद्रांक शुल्क कमाल पाच लाखाच्या मर्यादेत भरणे बंधनकारक आहे. करारनाम्याची रक्कम रू. 10929212/- असल्याने निविदाधारकाने रू. 9999/- भरणे आवश्यक होते. नस्तीत उपलब्ध करारनाम्याच्या प्रकरणी रू. 100/- च्या मुद्रांक पेपरवर करारनामा करण्यात आल्याचे दिसते. त्यामुळे शासनाचे रू. 9899/- चे नुकसान झाले आहे. अशी रक्कम ठेकेदाराकडून वसूल करून शासन सदरी भरणा करावी.

वसूलपात्र रक्कम रू. 9899/-

4] प्रस्तुत कामाची एकूण मोजमाप नोंदवहीतील मोजमापे तपासली असता बाबक्र. 2 नुसार रस्तेवरील ट्रेंच पट्टी भरणे व डांबरीकरण करणे या कामासाठी 15 ते 23 से.मी. जाडीचे एकूण

1825.74 घनमीटर सोलिंग साठी रबल पुरवठा केला असून सदर रबल पसरविणेत आला आहे. सदर रबल पसरविलेनंतर त्यामधील पोकळी ( voids) भरणेसाठी ६ एमएम क्रश खडीचा पुरवठा करून व पसरवून नंतरच दबाई करणे आवश्यक होते. याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम यांचेकडील स्पेसिफिकेशन खंड – 1 मधील पान नं. 205 वरील आर-डी क्र. 28, 28-1, 28-2 अन्वये तरतुद करणेत आलेली आहे. परंतु सोलिंग वरील पोकळी (voids) भरणेसाठी ६ एमएम क्रश खडीचा पुरवठा न करताच रबल सोलिंग करणेत आलेले आहे. त्यामुळे एकूण झालेले रबल सोलिंगचे काम दर्जेहिन झाल्याचे आक्षेप लेखा परीक्षणात नोंदविण्यात येत आहे. याबाबतचे साधार अनुपालन दाखवावे.

5] प्रस्तुत रस्ता डांबरीकरणासाठी हॉटमिक्स हॉट लेड ( बी.म.) डांबर 720.77 घनमीटर व अस्फाल्टीक कॉंक्रीट 311.39 घनमीटर पुरवठा करून पसरविणेत आले आहे. परंतु रिफायनरीमधून आणलेल्या डांबराची चलने, ब्राऊझर ( ट्रक) चे रिकामे वजन, भरलेल्या ब्राउझरचे वजन खाली केलेनंतरचे वजन याबाबतच्या पावत्या घेण्यात आल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे या कामात प्रत्यक्ष किती डांबर वापरणेत आले तसेच दर्जा याबाबतची खात्री तपासणीत करता आली नाही. सबब सदरची कागदपत्रे अनुपालन लेखा तपासणीत करता आली नाही. सबब सदरची कागदपत्रे अनुपालन लेखा परीक्षणास दाखवावे.

एकूण आक्षेपाधीन रक्कम रू. 10929212/-

एकूण वसूलपात्र रक्कम ( अ + ब+ क)

= 404294 + 305137 + 9899) = रू. 719330/-

DATNDMM5801 (Ref No : 79, Hmm No : 153)

## *48 बॅरेक नं 2058 ते टॅकर पॉईंट, गायकवाड पाडा येथे सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता तयार करणे*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :210-4331 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 487534.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 43255.00/-

***रस्त्यावरील खोदाईमधून प्राप्त झालेल्या साहित्यापेक्षा जादा साहित्याच्या वाहतुकीमुळे झालेले आर्थिक नुकसान तसेच जादा बाबीकरीता ॲट पार दराने रक्कम अदा न करता जादा दराने प्रदान केलेबाबत गौण खनिजाच्या स्वामित्व धनाची रक्कम वसूल करून शासनाकडे भरणा न केलेबाबत.***

| | |
|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम : | रु. 4515700/- |
| तांत्रीक मंजूरी : | शहर अभियंता पत्र क्र. 1715 दि. 31.07.2008 |
| प्रशासकिय मंजूरी व वित्तीय मान्यता : | स्थायी समिती ठराव क्र. 92 दि. 24.11.2008 |
| निविदा प्रसिध्दी : | फ्री. प्रेस जनरल दैनिक लोकसत्ता दि. 06.09.2008 |
| प्राप्त निविदा : | एकूण चार |
| निविदा स्त्रोत्र : | शासकिय निधी |
| लेखा शिर्ष : ‘ | अ’ अंदाजपत्रक भाग 2 क्र. 4(ii) नविन रस्ते |
| ठेकेदाराचे नाव : | मे. इगल कंस्ट्रक्शन 17% जादा दराने |
| कार्यादेश : 1108 | दि. 27.07.2009 |
| कामाची मुदत : 12 | महिने |
| काम पुर्ण दिनांक : | विहित मुदतीत (मुदत वाढीने) |
| मोजमाप नोंदवही क्र. : | क्र. 1047 पान क्र. 1 ते 49 पान क्र. 1 ते 3 |
| एकूण झालेला खर्च : | रू.4113007/-<br>प्रमाणक क्र. 2574 दि. 04.10.2012 |

---

1] प्रस्तुत कामासाठी दि. 06.09.2008 च्या दैनिक फ्रि. प्रेस जनरल व दैनिक लोकसत्ता या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्दी देऊन निविदा मागविणेत आल्या असून या कामासाठी एकूण चार सिलबंद निविदा प्राप्त झाल्या असून सर्वात कमी दराची मे. इगल कंस्ट्रक्शन यांची सर्वात कमी दराची

म्हणजेच प्राक्कलनाच्या 17% जादा दराची निविदा स्विकारणेत आली असून त्यांना दि. 27.07.2009 रोजी कार्यादेश देणेत आले आहेत. काम विहित मुदतीत मुदतवाढीने पूर्ण करणेत आले असून सदर कामावरती एकूण झालेल्या खर्चाबाबत लेखा परीक्षणात खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. सदर कामाची मोजमाप नोंदवहीतील मोजमापे तपासली असता अंतिम देयकानुसार गोषावारामधील अ.क्र. 3,4,5,7 नुसार सिमेंट कॉक्रीट रस्ता तयार करणेसाठी मऊ मुरूमात, कठिण मुरूमामध्ये, सॉफ्ट रॉकव हार्ड रॉकमध्ये जुन्या रस्त्यावर एकूण १४९५.४३ घनमीटर खोदाई करून प्राप्त साहित्याचे स्टॉग करून तदनंतर सदरचे साहित्य वहातूक करून (2 किमी अंतरावर) डिस्पोज केलेले आहे. व त्यानुसार जेवढे साहित्य खोदाईमधून प्राप्त झाले तेवढेच साहित्य वहातूक करून डिस्पोज करणे आवश्यक असतांना गोषावारातील अनुक्रमांक 74 नुसार एकूण 1934.23 घनमीटर एवढे साहित्य वहातूक केल्याचे मोजमाप नोंदविण्यात आल्याचे दिसून आले. म्हणजेच (1934.23 – 1495.43) = 423.80 घनमीटर एवढी जादा वहातूकीची मोजमापे नोंदविल्यामुळे ठेकेदारास खालीलप्रमाणे जादा प्रदान झाले आहे.

एकूण जादा वहातूक 423.80 घमी. X 67.56 वहातूक दर = रू. 29645/-

वसूलपात्र रक्कम रू. 29645/-

2. प्रस्तुत कामाच्या मोजमाप नोंदवहितील पान क्र. 43 वरील मोजमापे तपासली असता जादा बाब क्र. 1 नुसार साईडपट्टी पी.सी.सी. करणेसाठी एकूण 2.13 घनमीटर M 20 सिमेंट कॉक्रीट पुरवठा करून पसरविले आहे. जादा बाब क्र. 2 एकूण 14 नग आर.सी.सी. कव्हर्स पुरवठा करून बसविले आहेत तसेच जादा बाब क्र. 3 नुसार एकूण 15.36 चौ.मी. कडप्पा स्टोन पुरवठा केलेले आहेत परंतु ह्या सर्व जादा बाबी असल्यामुळे प्राक्कलन दरानेच प्रदान होणे आवश्यक असतांना 17 % जादा दराने ठेकेदारास या बाबींचे जादा प्रदान करणेत आलेले आहे ते खालीलप्रमाणे

जादा बाब क्र. 1 = 2.13 घमी. X 3297.78 दर = रू. 7024.27

जादा बाब क्र. 2 = 14 X 3841 दर = रू. 53774

जादा बाब क्र. 3 = 15.36 चौ.मी. X 450 दर = रू. 6912

एकूण रू. 67710.27

17 % जादा दर = रू. 11510

वसूलपात्र रक्कम = 11510/-

2) महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग निर्णय क्र. गौखनि/10/1001/प्र.क्र.24/29/मंत्रालय दि. 15.12.2006 नुसार ठेकेदाराने बांधकामासाठी वापरलेली वाळू, खडी, मुरूम इत्यादी गौण खनिजांचे स्वामित्व धनाची (रॉयल्टी) रक्कम शासन सदरी भरणे बंधनकारक आहे. परंतु असी गौण खनिज स्वामीत्व धनाची रक्कम ठेकेदाराच्या देयकातून वसूल करून मनपाने शासन सदरी भरणा न केल्याने शासनाचे नुकसान झाले आहे ते खालीलप्रमाणे वसूलपात्र ठरते.

वसूलपात्र करावयाचा दर प्रति घनमीटर रू. 35.34

अंतिम गोषावाऱ्याप्रमाणे पुरवठा झालेले साहित्य

अ.क्र. 9 – कॉक्रीट 1:3:6 बेडींगसाठी (एकूण वापरलेले साहित्य 38.31 घ.मी)

वाळू – 38.31 X .47 = 18.14 X 35.34 दर = रू. 641/-

खडी (40एमएम) – 38.31 X .70 = 26.81 X 35.34 दर = रू. 948/-

खडी (20एमएम) – 38.31 X .24 = 9.19 X 35.34 दर = रू. 325/-

अ क्र. 30 – 80 मी.मी. खडी पुरवठा [ एकूण वापरलेले साहित्य 147.72 घ.मी.]

= 147.72 घ.मी. X 35.34 दर = रू. 5220/-

अ क्र. 31 – 50 एम.एम. खडी पुरवठा [ एकूण वापरलेले साहित्य 147.72 घ.मी.]

= 147.72 घ.मी. X 35.34 दर = रू. 5220/-

अ क्र. 32 – M-10 सी.सी.कॉक्रीट [ एकूण वापरलेले साहित्य 196.49 घ.मी.]

वापरलेली वाळू = 196.49 X .47 = 92.35 X 35.34 दर = रू. 3264/-

खडी (40 एम.एम.) = 196.49 X .70 = 137.54 X 35.34 दर = रू. 4861/-

खडी (20 एम.एम.) = 196.49 X .24 = 47.15 X 35.34 दर = रू. 1665/-

अ क्र. 36 – M-35 ग्रेड कॉक्रीट [ एकूण वापरलेले साहित्य 228.92 घ.मी.]

वापरलेली वाळू = 228.92 X .47 = 107.59 X 35.34 दर = रू. 3802/-

खडी (40 एम.एम.) = 228.92 X .57 = 130.48 X 35.34 दर = रू. 4611/-

खडी (20 एम.एम.) = 228.92 X .28 = 64.08 X 35.34 दर = रू. 2265/-

एकूण वसूलपात्र रक्कम रू. 32822/-

3] सदर कामाची मोजमाप नोंदवहीनुसार या कामासाठी 80 मी.मी. सॉलीड प्रीकास्ट पेव्हमेंट ब्लॉक एकूण 453.52 चौरस मीटर पुरवठा करून बसविणेत आलेले आहेत व यासाठी ठेकेदारास रू. 1075 प्रति चौरस मीटर प्रमाणे एकूण रक्कम रू. 487534/- अदा करणेत आलेली आहे. परंतु जिल्हा दरसूचीमध्ये सदर बाबीचे दर उपलब्ध नसल्याने दर पृथक्करण करून दर निश्चित केले आहेत. परंतु सदरचे दर पृथक्करण नस्तीसोबत जोडलेले नाहीत अथवा तपासणीत सादर केले नाहीत त्यामुळे प्रदान केलेल्या दराबाबत खात्री करता आली नाही. याबाबतचे अनुपालन लेखा परीक्षणास दाखवावे तोपर्यंत झालेला खर्च आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

आक्षेपाधीन रक्कम रू. 487534/-

4] मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 मधील कलम 63 ची दुरुस्ती सुधारणा क्र. 12 दि. 01.05.2006 नुसार करारनामा करतांना रक्कमेच्या प्रथम 10 लाखापर्यंत रू. 100 व पुढील प्रत्येक एक लाखाकरीता रू. 100/- प्रमाणे मुद्रांक शुल्क कमाल पाच लाखाच्या मर्यादेत भरणे बंधनकारक आहे. करारनाम्याची रक्कम रू. 3317338/- असल्याने निविदा धारकाने रू. 2300/- भरणे आवश्यक होते. नस्तीत उपलब्ध करारनाम्याच्या प्रकरणी रू. 100/- च्या मुद्रांक पेपरवर करारनामा करण्यात आल्याचे दिसते. त्यामुळे शासनाचे रू. 2100/- चे नुकसान झाले आहे. अशी रक्कम ठेकेदाराकडून वसूल करून शासन सदरी भरणा करावी.

वसूलपात्र रक्कम रू. 2100/-

एकूण आक्षेपाधीन रक्कम (क) = रू. 487534/-

एकूण वसूलपात्र रक्कम (अ + ब+ ड) = 43255/-

## *49 निर्मल एम.एम.आर.अभियाना अंतर्गत (वस्ती स्वच्छतागृह) कामाच्या करारनाम्या मध्ये कमी मुद्रांक घेतल्याबाबत.*

**निर्मल एम.एम.आर. अभियान (वस्ती स्वच्छतागृह)**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 385177.00/-

***निर्मल एम.आर.आर. अभियान अंतर्गत टप्पा क्र. 1 खाली 82 टॉयलेट ब्लॉक एकूण 1402 सिटस शौचालये बांधण्याची कामे मे. स्पार्क, जनसेवा, युवक प्रतिष्ठान या तीन अशासकीय संस्थाना (NGO) देण्यात आली होती. तसेच टप्पा क्र. 2 खाली 81 टॉयलेट ब्लॉक 1231 सिटस बांधण्याची कामे 13 संस्थाना देण्यात आली होती. सदरील अशासकीय तसेच, स्थानिक मक्तेदाराना कार्यादेश देण्यापूर्वी त्यांना दिलेल्या कामांचे करारनामे रूपये 100/- च्या मुद्रांकावर केल्याचे दिसून आले. मुंबई मुद्रांक अधिनियम 1957 कलम 63 अनुसार प्रत्येक कामाचा करारनामा रूपये 10,00,000/- पर्यंत रूपये 100/- या मुद्रांकावर आणि त्यापुढे प्रत्येक रूपये 1,00,000/- साठी रूपये 100/- मुद्रांकावर करणे आवश्यक आहे. निर्मल एम.एम.आर. योजनेखाली रु. 385177/- चे कमी मुद्रांक घेण्यात आले.***

निर्मल एम.आर.आर. अभियान अंतर्गत टप्पा क्र. 1 खाली 82 टॉयलेट ब्लॉक एकूण 1402 सिटस शौचालये बांधण्याची कामे मे. स्पार्क, जनसेवा, युवक प्रतिष्ठान या तीन अशासकीय संस्थाना (NGO) देण्यात आली होती. तसेच टप्पा क्र. 2 खाली 81 टॉयलेट ब्लॉक 1231 सिटस बांधण्याची कामे 13 संस्थाना देण्यात आली होती. सदरील अशासकीय तसेच, स्थानिक मक्तेदाराना कार्यादेश देण्यापूर्वी त्यांना दिलेल्या कामांचे काारनामे रूपये 100 च्या मुद्रांकावर केल्याचे दिसून आले. मुंबई मुद्रांक अधिनियम 1957 कलम 63 अनुसार प्रत्येक कामाचा करारनामा रूपये 10,00,000/- पर्यंत रूपये 100 या मुद्रांकावर आणि त्यापुढे प्रत्येक रूपये 1,00,000 साठी रूपये 100 मुद्रांकावर करणे आवश्यक आहे. निर्मल एम.एम.आर. योजनेखाली खालील प्रपत्रात दाखविण्यात आल्याप्रमाणे कमी मुद्रांक घेतल्याचे दिसून येते.

| अ.क्र | मक्तेदाराचे नाव | कार्यकरार रक्कम | आवश्यक मुद्रांक | प्रत्यक्षात लावलेले मुद्रांक | कमी रकमेचे मुद्रांक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मे.स्पार्क | 108756782 | 107856 | 100 | 107756 |
| 2 | मे.जनसेवा | 51937229 | 51037 | 100 | 50937 |
| 3 | मे.युवक प्रतिष्ठान | 40506605 | 39606 | 100 | 39506 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 4 | मे.जनसेवा | 65661892 | 64761 | 100 | 64661 |
| 5 | मे.जागरूक म.म. | 102657843 | 101758 | 100 | 101658 |
| 6 | मे.साईनाथ सेवा | 2472716 | 1572 | 100 | 1472 |
| 7 | मे.तेजस्विनी महिला मंडळ | 3284428 | 2384 | 100 | 2284 |
| 8 | मे.सावली ठाणे | 4103340 | 3203 | 100 | 3103 |
| 9 | मे.लोकसेवा वेलवेफअर | 44225003 | 3525 | 100 | 3425 |
| 10 | मे.सप्रेम | 3591176 | 2691 | 100 | 2591 |
| 11 | मे.सिंधुदुर्ग | 1229364 | 329 | 100 | 229 |
| 12 | मे.युनिटी सोशल | 2398412 | 1498 | 100 | 1398 |
| 13 | मे.जयदुर्गा | 3946743 | 3046 | 100 | 2946 |
| 14 | मे.प्रज्ञाज्योती म.म. | 2383692 | 1483 | 100 | 1383 |
| 15 | मे.आकांक्षा सा.प्र. | 2034750 | 1134 | 100 | 1034 |
| 16 | मे.मंगलसाई सा.स | 1794994 | 894 | 100 | 794 |
| | | | **एकूण रक्कम -** | | **385177** |

वर दाखविण्यात आल्याप्रमाणे रूपये 3,85,177 चे मुद्रांक कमी स्विकारण्यात आल्याने त्याची वसुली संबंधित मक्तेदाराकडून करणे आवश्यक आहे. ती न केल्याने शासनाचे नुकसान झालेले आहे. या बाबत संबंधित विभागास अर्ध समास ज्ञापन क्रमांक 131 दिनांक 4-12-2014 अन्वये विचारणा करण्यात आली होती. विभागाचे उत्तर अप्राप्त आहे .

वसूलपात्र रक्कम रु. 385177

DATDBWM5801 (Ref No : 122, Hmm No : 131)

## *50 निर्मल एम.एम.आर.वस्ती स्वच्छतागृहे बांधण्याच्या कामातून गौण खनिज वापरल्याबद्दल राज्य शासनाचे स्वामित्वधन रक्कम वसुल केली नसल्याबाबत.*

**निर्मल एम.एम.आर. (वस्ती स्वच्छतागृहे)**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 473122.00/-

***निर्मल एम.आर.आर. अभियान अंतर्गत उल्हासनगर महानगरपालिकेने टप्पा क्र. 1 आणि टप्पा क्र. 2 मध्ये अनुक्रमे 82 आणि 81 अशी एकूण 163 स्वच्छतागृहे (TOILET BLOCKS) बांधण्याचे कार्यादेश मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी प्राधिकृत केलेल्या अशासकीय संस्था (NGO) तसेच उल्हासनगर महानगरपालिकेने निश्चित केलेल्या 13 मक्तेदाराना देण्यात आले होते. सदरील 163 कामापैकी काही निवडक कामाची तपासणी केली असता महाराष्ट्र शासनाकडील महसूल आणि वन विभागाच्या दिनांक 15/12/2006 च्या अधिसूचनेनुसार रूपये 35.34 प्रति घ.मि. या दराने आणि दिनांक 11/02/2010 या अधिसूचनेनुसार रूपये 70.67 प्र.घ.मि. या दराने गौण खनिजासाठी स्वामित्वधन रक्कम संबंधित मक्तेदाराच्या देयकातून वसूल करणे आवश्यक असताना ती केली नसल्याचे आढळून आले.***

निर्मल एम.आर.आर. अभियान अंतर्गत उल्हासनगर महानगरपालिकेने टप्पा क्र. 1 आणि टप्पा क्र. 2 मध्ये अनुक्रमे 82 आणि 81 अशी एकूण 163 स्वच्छतागृहे ( TOILET BLOCKS) बांधण्याचे कार्यादेश मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी प्राधिकृत केलेल्या अशासकीय संस्था (NGO) तसेच उल्हासनगर महानगरपालिकेने निश्चित केलेल्या 13 मक्तेदाराना देण्यात आले होते. सदरील 161 कामापैकी काही निवडक कामाची तपासणी केली असता महाराष्ट्र शासनाकडील महसूल आणि वन विभागाच्या दिनांक 15/12/2006 च्या अधिसूचनेनुसार रूपये 35.34 प्रति घ.मि. या दराने आणि दिनांक 11/02/2010 या अधिसूचनेनुसार रूपये 70.67 प्र.घ.मि. या दराने गौण खनिजासाठी स्वामित्वधन रक्कम संबंधित मक्तेदाराच्या देयकातून वसूल करणे आवश्यक असताना ती केली नसल्याचे आढळून आले. त्याचा तपशिल खाली दाखविल्याप्रमाणे आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रक | मक्तेदाराचे नाव | कार्यादेश क्रमांक /दिनांक | वाळू / खडी /रबल मेटल इ. परिमाण | दर | प्रमाणक क्रमांक व दिनांक | स्वामित्वधन रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1 | गोळी कारखाना जवळ 10 सिटचे टॉयलेट | 3292567 | जागरूक महिला मंडळ | 43/21.2.2009 | 522.53 सी.एम.टी | 35.34 | 1022 3.6.11 169262 | 18466 |
| 2 | भैया आंबेडकर नगर 22 सिटचे टॉयलेट | 2220600 | जागरूक महिला मंडळ | 90/14.7.2010 | 419.51 सी.एम.टी | 70.67 | 1023 3.6.11 594810 | 29647 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 28 सिटचे टॉयलेट | 1561250 | जागरूक महिला मंडळ | 91/ 27.1.2009 | 467.75 सी.एम.टी | 35.34 | 1112 9.6.11 688361 | 16530 |
| 4 | शहाड फाटक जवळ 10 सिटचे टॉयलेट | 1750868 | जयदुर्गा महिला मंडळ | 06/ 14.7.2010 | 228.22 सी.एम.टी | 70.67 | 1113 9.6.11 375992 | 16125 |
| 5 | जय जनता कॉलनी येथे 14 सिटचे टॉयलेट | 2403428 | जागरूक महिला मंडळ | 83/ 29.2.2009 | 509.82 सी.एम.टी | 35.34 | 1114 9.6.11 192597 | 18017 |
| 6 | आझादनगर 10 टॉयलेट | 1921021 | जागरूक महिला मंडळ | 43/21.2.2009 | 666.52 सी.एम.टी | 35.34 | 1019 3.6.11 515256 | 23554 |
| 7 | 16 सिटचे टॉयलेट | 3287775 | जागरूक महिला मंडळ | 40/ 21.2.2009 | 576.774 सी.एम.टी | 35.34 | 1021 3.6.11 135502 | 20383 |
| 8 | 14 सिटचे टॉयलेट | 3292568 | जागरूक महिला मंडळ | 42/ 21.2.2009 | 646.08 सी.एम.टी | 35.34 | 1018 3.6.11 306625 | 22833 |
| 9 | 14 सिटचे टॉयलेट | 2316899 | जागरूक महिला मंडळ | 41/ 21.2.2009 | 646.08 | 35.34 | 1016 3.6.11 180696 | 22833 |
| 10 | शुक्ला हाउस 24 सिट | 3277771 | जागरूक महिला मंडळ | 15/ 21.2.2009 | 467.75 | 35.34 | 1014 3.6.11 179392 | 16530 |
| 11 | हनुमान नगर 22 सिट | 3471668 | जागरूक महिला मंडळ | 39/ 21.2.2009 | 622.413 | 35.34 | 1015 3.6.11 143186 | 21996 |
| 12 | वडल गाव 16 | 2950300 | जागरूक महिला | 68/ 21.2.2009 | 646.08 | 35.34 | 1013 | 22833 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सिट टॉयलेट | | मंडळ | | | | 3.6.11<br>269705 | |
| 13 | कमला नेहरू नगर 24 सिटस टॉयलेट बांधणे | 4042800 | जागरूक महिला मंडळ | 34/ 22.1.2009 | 467.75 | 35.34 | 2041<br>8.8.11<br>123272 | 16530 |
| 14 | 10 सिटचे टॉयलेट बांधणे | 1597300 | सप्रेम कल्याण | 120/30.11.2007 | 436.63 | 35.34 | 2039<br>8.8.11<br>526130 | 15430 |
| 15 | सिएसएम कॉलेज 12 सिटचे टॉयलेट बांधणे | 1097400 | सप्रेम कल्याण | 120/6.6.2010 | 83.61 | 70.67 | 2038<br>8.8.11<br>147629 | 5409 |
| 16 | सुभाषनगर 16 सिटचे टॉयलेट बांधणे | 2737000 | सप्रेम कल्याण | 157/21.2.2009 | 476.298 | 35.34 | 2035<br>8.8.11<br>1072562 | 16832 |
| 17 | कमला नेहरू नगर 10 सिटचे टॉयलेट बांधणे | 1888000 | सप्रेम कल्याण | 3/ 21.2.2009 | 306.84 | 35.34 | 2032<br>8.8.11<br>776303 | 10844 |
| 18 | चीलेकर पाडा 23 सिटचे टॉयलेट बांधणे | 3126300 | सप्रेम कल्याण | 153/19.4.2010 | 489.654 | 70.67 | | 34604 |
| 19 | 16 सिटचे टॉयलेट गायकवाड चाळ | 2672601 | सप्रेम कल्याण | 34/24.6.2008 | 332.64 | 35.34 | 1484<br>5.7.11<br>941527 | 11755 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 20 | विवेकानंद शाळा 24 सिटचे टॉयलेट | 3228875 | जागरूक महिला मंडळ | 13/ 21.2.2009 | 253.477 | 35.34 | 1769 21.9.11 188083 | 8958 |
| 21 | प्रभाग 36 येथे 12 सिटचे टॉयलेट बांधणे | 2544440 | जागरूक महिला मंडळ | 92/ 21.2.2009 | 282.12 | 35.34 | 1768 21.7.11 556155 | 9970 |
| 22 | 16 सिटचे टॉयलेट | 2690105 | जागरूक महिला मंडळ | 68/ 21.2.2009 | 356.49 | 35.34 | 1483 5.7.11 208085 | 12599 |
| 23 | राजीव गांधी चौक 10 सिटचे टॉयलेट | 2532820 | जागरूक महिला मंडळ | 10/ 21.2.2009 | 319.90 | 35.34 | 1481 5.7.11 428985 | 11164 |
| 24 | प्रभाग क्र 50 येथे 10 सिटचे टॉयलेट | 2407064 | जागरूक महिला मंडळ | 12/ 21.2.2009 | 306.84 | 35.34 | 1479 5.7.11 428960 | 10844 |
| 25 | पंचशिल नगर येथे 20 सिटचे बांधकाम | 2574825 | मंगलसाई सा.संस्था | 105/26.2.2010 | 591.83 | 35.34 | 1770 21.7.11 624943 | 20915 |
| 26 | 28 सिटचे टॉयलेट | 2204000 | जागरूक महिला मंडळ | 168/12.8.2010 | 530.946 | 70.67 | 5295 2.2.12 216009 | 37521 |
| | | | | | | एकूण | | 473122 |

वरील कामातील वाळू, खडी, रबल इ. गौण खनिज वापरल्याबद्दल रूपये 473122 ची रॉयल्टी संबंधित मक्तेदाराच्या देयकातून वसूल करण्यात आलेली नाही. किंवा संबंधित मक्तेदाराने ती शासनास अदा केली किंवा कसे या बाबत पावती महानगरपालिकेस सादर केल्याचे आढळून आले नाही. या बाबत विभागाने खुलासा केला नाही. स्वामित्वधन रक्कम (royalty) वसुल झाल्याची खात्री करून प्रदान करण्याच्या अटीचे पालन

केलेले नाही. अशाप्रकारे निर्मल एम.एम.आर. खाली खर्ची पडलेल्या सर्व प्रमाणकातून रॉयल्टीच्या रकमेची परिगणना करून ती शासन सदरी जमा करण्यात यावी. या बाबत संबंधित विभागास अर्ध समास ज्ञापन क्रमांक 132 दिनांक 4/2/2014 अन्वये विचारणा करण्यात आली होती. विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.
वसूलपात्र रक्कम रु. 473122

DATDBWM5801 (Ref No : 123, Hmm No : 132)

## *51 निर्मल एम.एम.आर अभियान अंतर्गत केलेल्या कामाच्या देयकातून शासकीय विमा निधीची रक्कम वसुल केली नसल्याबाबत.*

**निर्मल एम.एम.आर. अभियान (वस्तीस्वच्छतागृह)**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 334157.00/-

***निर्मल एम.एम.आर. अभियानाच्या 2011-2012 मध्ये पारित झालेल्या काही निवडक प्रमाणकांची तपासणी केली असता प्रमाणकातून कामाच्या मुल्या एवढा विमा शासकीय विमा निधी कडून उतरविण्यात आला नसल्याचे दिसून आले. महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाचे परिपत्रक क्रमांक जी.ई. एन. 1098/1357/प्र.क्र. 166/98 नवि-25, दिनांक 3.11.2003 अन्वये कामाचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे बंधनकारक आहे. याप्रमाणे मक्तेदाराने विमा उतरविला नसल्यास देयकाच्या रक्कमेतून 1 टक्के विमा रक्कम वसुल करून ती राज्य शासनाकडे जमा करणे आवश्यक आहे.***

निर्मल एम.एम.आर. अभियानाच्या 2011-2012 मध्ये पारित झालेल्या काही निवडक प्रमाणकांची तपासणी केली असता खालील नमुद केलेल्या प्रमाणकातून कामाच्या मुल्या एवढा विमा शासकीय विमा निधी कडून उतरविण्यात आला नसल्याचे दिसून आले. महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाचे परिपत्रक क्रमांकजी.ई.एन.1098/1357/प्र.क्र. 166/98 नवि-25, दिनांक 3.11.2003 अन्वये कामाचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे बंधनकारक आहे. याप्रमाणे मक्तेदाराने विमा उतरविला नसल्याने देयकाच्या रक्कमेतून 1 टक्के विमा रक्कम वसुल करून ती राज्य शासनाकडे जमा करणे आवश्यक आहे. सदरील रक्कमेचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | प्राकलनाची रक्कम | मक्तेदाराचे नाव | कार्यादेश क्रमांक /दिनांक | प्रमाणक क्रमांक | रक्कम |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |

| | | | | | /दिनांक | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 16 सिटचे टॉयलेट बांधणे | 3287775 | जागरूक महिला मंडळ | 40<br>21.2.2009 | 1021<br>3.6.11<br>135502 | 32878 |
| 2 | 14 सिटचे टॉयलेट बांधणे | 3292568 | जागरूक महिला मंडळ | 42<br>21.2.2009 | 1018<br>3.6.11<br>306625 | 32925 |
| 3 | 14 सिटचे टॉयलेट बांधणे | 1971085 | जागरूक महिला मंडळ | 41<br>21.2.2009 | 1016<br>3.6.11<br>180696 | 19710 |
| 4 | शुक्ला हाउस 24 सिटचे टॉयलेट | 3277771 | जागरूक महिला मंडळ | 15<br>21.2.2009 | 1014<br>3.6.11<br>179392 | 32777 |
| 5 | हनुमान नगर 22 सिटचे टॉयलेट | 3471068 | जागरूक महिला मंडळ | 39<br>21.2.2009 | 1015<br>03/06/2011<br>143186 | 34710 |
| 6 | वडोल गाव 16 सिटचे टॉयलेट | 2667171 | जागरूक महिला मंडळ | 68<br>21.2.2009 | 1013<br>3.6.11<br>269705 | 26671 |
| 7 | आझादनगर 10 सिटचे बांधकाम | 2869033 | जागरूक महिला मंडळ | 43<br>21.2.2009 | 1019<br>3.6.11<br>515256 | 28690 |
| 8 | कमला नेहरू नगर 10 सिटचे टॉयलेट | 1564371 | सप्रेम महिला मंडळ | 3<br>21.2.2009 | 2032<br>8.8.11<br>776303 | 15647 |
| 9 | विवेकानंद शाळा 24 सिटचे टॉयलेट | 2814240 | जागरूक महिला मंडळ | 13<br>21.2.2009 | 1769<br>21.9.11<br>188083 | 28142 |
| 10 | प्रभाग 50 येथे 10 सिटचे टॉयलेट | 1992042 | जागरूक महिला मंडळ | 12<br>21.2.2009 | 1479<br>5.7.11<br>428960 | 19920 |
| 11 | प्रभाग 59 येथे 14 सिटचे टॉयलेट | 2386153 | जागरूक महिला मंडळ | 74<br>21.2.2009 | 1114<br>09/06/2011<br>192597 | 23862 |
| 12 | गोपाळ समाज मंदिर 16 सिटचे टॉयलेट | 2589380 | जागरूक महिला मंडळ | 68<br>21.2.2009 | 1483<br>05/07/2011<br>208085 | 25893 |
| 13 | प्रभाग 60 येथे 24 सिटचे टॉयलेट | 1233206 | जागरूक महिला मंडळ | 168<br>12.8.2010 | 5295<br>2.2.12<br>216009 | 12332 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **एकूण** | | **334157** |

वरील कामाच्या देयकातून रूपये 334157 विमा निधीची रक्कम वसुल करण्यात आलेली नसल्याने ती संबंधीत मक्तेदाराच्या देयकातून वसुल करून संचालक, शासकीय विमा निधी यांच्याकडे जमा करावी. तसेच निर्मल एम.एम.आर. च्या सर्व देयकातून विमा निधीची रक्कम वसुल केल्याची खात्री करावी. या बाबत संबंधित विभागास अर्ध समास ज्ञापन क्रमांक 133 दिनांक 4/2/2014 अन्वये विचारणा करण्यात आली होती. विभागाचे उत्तर अप्राप्त आहे

वसुलपात्र रक्कम रु. 334157

DATDBWM5801 (Ref No : 124, Hmm No : 133)

## *52 निर्मल एम.एम.आर योजनेंतर्गत केलेल्या कामाची प्रमाणके उपलब्ध न केल्या बाबत*

**निर्मल एम.एम.आर अभियान (वस्तीस्वच्छतागृहाचे बांधकाम)**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 2780282.00/-

***निर्मल एम.एम.आर. ( वस्तीस्वच्छतागृहाचे बांधकाम) या लेखाशिर्षा योजनेखाली खर्ची टाकलेली प्रमाणके लेखा परिक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाहीत. त्यामुळे सदर बाबीवर झालेला खर्च आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे***

सन 2011-2012 मध्ये निर्मल एम.एम.आर.(वस्तीस्वच्छतागृहाचे बांधकाम) या लेखाशिर्षा /योजने खाली खर्ची टाकलेली खालील प्रमाणके लेखा परिक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाहीत.

| **अ.क्र** | **प्रमाणक क्रमांक** | **दिनांक** | **रककम** |
|---|---|---|---|
| 1 | 1016 | 03/06/2011 | 159012 |
| 2 | 1115 | 09/06/2011 | 243546 |
| 3 | 1116 | 09/06/2011 | 303715 |
| 4 | 2033 | 08/08/2011 | 59431 |
| 5 | 3208 | 12/10/2011 | 59003 |
| 6 | 1770 | 21/07/2011 | 624943 |
| 7 | 1338 | 22/06/2011 | 80585 |
| 8 | 1687 | 16/07/2011 | 56759 |
| 9 | 2138 | 12/08/2011 | 78525 |

| | | | |
|---|---|---|---|
| 10 | 2138 | 12/08/2011 | 566486 |
| 11 | 2713 | 12/09/2011 | 267252 |
| 12 | 2793 | 15/09/2011 | 38918 |
| 13 | 3208 | 12/10/2011 | 59003 |
| 14 | 3694 | 15/11/2011 | 20669 |
| 15 | 3694 | 15/11/2011 | 2953 |
| 16 | 5223 | 21/02/2012 | 20504 |
| 17 | 5223 | 21/02/2012 | 123858 |
| 18 | 5653 | 26/03/2012 | 12960 |
| 19 | 5653 | 26/03/2012 | 2160 |
| | | **एकूण -** | **2780282** |

अनुक्रमांक 9,10,आणि 14 ते 18 वर नमूद केलेली प्रमाणके एका क्रमांकाची दोन वेळा म.न.पां.ने सादर केलेल्या रोख पुस्तकाच्या गोषवाऱ्या वरून दाखविण्यात आलेली आहेत. सदरील प्रमाणके एकाच क्रमांकाची असली तरी वेगवेगळ्या वजाती (DEDUCTIONS) प्रमाणे घेतलेली असल्याचे दिसून आले. वर नमूद केलेली प्रमाणके उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागास अर्ध समास ज्ञापन क्रमांक 130 दिनांक 4/2/2014 अन्वये विचारणा करण्यात आली होती. मात्र त्या प्रमाणे विभागाने प्रमाणके लेखापरीक्षणास उपलब्ध केली नाहीत.

आक्षेपाधीन रक्कम रु. 2780282

DATDBWM5801 (Ref No : 125, Hmm No : 130)

## *53 प्रभाग क्रमांक 64 मध्ये पेवरब्लॉक टाकणे या कामातील अतिप्रदाना बाबत.*

**दलित वस्ती सुधारणा अंतर्गत विकास कामे.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*केंद्र/राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 65428.00/-

***दलित वस्ती सुधारणा या योजनेंतर्गत प्रभाग क्रमांक 64 मध्ये पेवरब्लॉक टाकणे या कामाच्या देयकाची तपासणी केली असता अंदाजपत्रकात नमूद केलेल्या दराचे दर पृथक्करण उपलब्ध न केल्याने त्याची तपासणी करता आलेली नाही. सबब 2008-2009 च्या जिल्हा दरसूचितील दरापेक्षा जादा दर लावल्याने अतिप्रदान झालेले आहे. शिवाय मोजमाप पुस्तकातील त्रुटी, व इतर अनियमितता निदर्शनास आलेल्या आहेत.***

दलित वस्ती सुधारणा अंतर्गत प्रभाग क्रमांक 64 मध्ये पेवर ब्लॉक टाकणे या कामाच्या देयकाची तपासणी केली असता खालील प्रमाणे लेखा परीक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत.

कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

कामाचे नाव - प्रभाग क्रमांक 64 मध्ये पेवर टाकणे:-

कामाचे अंदाजपत्रक - रु. 999800

मक्तेदाराचे नाव - मे मोनाली कामगार सहकारी संस्था.

तांत्रिक मंजुरी - 3675दिनांक 17/03-/2010

कार्यादेश क्रमांक - उमपा/साबावि/काअ/2282 दिनांक 6/9/2010

मोजमाप पुस्तक क्रमांक - 2018

देयकाचा तपशील - प्रमाणक क्रमांक 1012 दिनांक 03-6-2011 रु. 999800

करारनाम्याची तारीख - 6/9/2010

काम सुरु केल्याची तारीख - 6/9/2010

काम समाप्तीची तारीख - 14/12/2010

डी.डी.आर - 2357 दिनांक 26/08/2010

1. सदर कामावर वापरलेल्या गौण खनिजा साठी मक्तेदाराच्या देयकातून स्वामित्वधन रक्कम वसुल करण्यात आलेले नाही. दलितवस्ती सुधारणा अंतर्गत केलेल्या विकास कामावरील वापरलेल्या गौण खनिजाचा परीच्छेद स्वतंत्र घेण्यात आलेला आहे. 2011-2012 या वर्षाच्या दरसूची प्रमाणे कामासाठी वापरण्यात आलेल्या सामग्रीच्या चाचणी अहवालासाठी 0.50% प्रमाणे वसुली करणे आवश्यक होते. सबब 4999 रक्कम वसुल करण्यात आलेली नाही.

2.सदर कामाच्या प्राकलनासोबत दर पृथक्करण दिलेले नसल्याने त्याची तपासणी करता आली नाही. सन 2008-2009 च्या जिल्हा दरसूचीतील दरापेक्षा (5% अधिक दर घेवून सुद्धा) खाली दर्शविल्या प्रमाणे अधिक रक्कम मक्तेदारास अदा केल्याचे दिसून आले. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | सामग्रीचे नाव | डी.एस.आर2008-2009 चे दर +5%वाढ | अंदाजपत्रकात दिलेले दर | फरक | परिमाण | रक्क |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पी.सी.सी.1:3:6 बेडिंग पाया | 2928 प्र.घ..मी. | 3397 प्र.घ.मी. | 469 | 105.12 | 493( |
| 2 | डब्लू बियेम 75/100 | 682 प्र.घ.मी. | 794 प्र.घ.मी. | 112 | 99.36 | 111: |
| ऐकून रक्कम रु 60429 | | | | | | |

वर दर्शविण्यात आल्याप्रमाणे मक्तेदारास रु 65428 जादा अदा झाल्याचे दिसून येते. सदर रकमेची वसुली संबधित मक्तेदाराकडून होणे आवश्यक आहे.

3. सदर कामाची नोंद महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम क्रमांक 182 नुसार नमुना 139 या विहित प्रपत्रात घेण्यात आलेली नाही.

4. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखासंहिता परीच्छेद क्रमांक 10:1:04 अन्वये मोजमाप पुस्तकातील नोंदी कामाच्या प्रगती प्रमाणे प्रथम कनिष्ट अभियंता आणि त्यानंतर उप अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांनी तारखेनिशी घेवून त्यानंतरच पहिले व त्यापुढील धावत्या देयका प्रमाणे प्रदान करणे आवश्यक आहे. नियंत्रक अभियंत्याने मोजमाप पुस्तकाची नियतकाळाने तपासणी करून त्यात नोंदविण्यात आलेली सर्व बांधकामे बरोबर असल्याची खात्री करून त्यानंतरच मक्तेदारास प्रदान करणे आवश्यक आहे. मात्र या प्रमाणे तारखेनिशी नोंदी घेतल्या नसल्याचे दिसून आले.

5. महाराष्ट्र लेखा संहिता 1971 नियम क्रमांक167(2)) नुसार मूळ अंदाजा पेक्षा 10%पेक्षा अधिक वाढ झाल्यास त्या साठी सुधारित अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक आहे. सदर कामाच्या प्रत्यक्ष काम केल्याच्या विवरण पत्रात अंदाजपत्रकातील बाब क्रमांक 1 आणि 9 मध्ये अंदाजपत्रकातील प्रस्तावित आणि प्रत्यक्ष केलेले काम यातील तफावत 44% पेक्षा जादा दिसून आली. सदर फरकाचे कोणतेही स्पष्टीकरण करण्यात आलेले नाही. सदर बाबत अर्ध समास ज्ञापन क्रमांक 56 दिनांक 19/12/2013 अन्वये संबंधित विभागास विचारणा करण्यात आली. विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु 65428

DATDBWM5801 (Ref No : 132, Hmm No : 56)

## *54 राहुलनगर आणि वाल्मिकी वसाहत येथे काम सुरु न झाल्याने केंद्र तसेच राज्य शासनाचे अनुदान वाया गेल्या बाबत..*

**शहरी गरिबासाठी मुलभूत सोयी सुविधा योजना.( बी.एस.यू.पी )**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*केंद्र/राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 46464207.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 213700.00/-

***बी.एस.यू.पी योजनेसाठी केंद्र तसेच राज्य शासनाकडून उल्हासनगर महानगरपालिकेस रु.6.25 कोटी चे अनुदान प्राप्त झाले होते .त्या प्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेने राहुलनगर झोपडपट्टी आणि वाल्मिकी वसाहत या ठिकाणी घरकुले बांधण्याची योजना प्रस्तावित केली होती. मात्र म.न.पां.स. उपरोक्त काम पूर्ण करता आले नाही. त्यामुळे केंद्र तसेच राज्य शासनाचे अनुदान वाया गेले आहे.***

उल्हास नगर शहारामध्ये 139 झोपडपट्ट्या महानगरपालिकेच्या आरक्षित भुखंड ग्रीन झोन व रहिवास क्षेत्र यामध्ये विखूरलेल्या आहेत. बी.एस.यू.पी. या योजनेअंतर्गत उल्हासनगर महानगरपालिकेने गणेश नगर,

शिवाजी नगर, आयोध्या नगर, राहूल नगर, महात्माफुले नगर, बाळकृष्ण नगर, राजीवगांधी नगर या झोपडपट्टयामध्ये सर्व्हेक्षण केल्यानंतर स्थानिक नागरिकांनी सहकार्य दिलेल्या राहूलनगर व वाल्मीकी वसाहत या दोन वस्त्यांमध्ये डी.पी.आर. 1 अन्वये 600 घरकुला करीता आणि डी.पी.आर.2 अन्वये राजीव गांधी, बाळकृष्ण नगर येथे 792 घरकुले बांधण्याचा रूपये 35.38 कोटी रक्कमेचा प्रस्ताव राज्य तसेच केंद्र शासनाने मंजूर केला. त्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेने आवश्यक ती निविदा प्रक्रिया पूर्ण करून दिनांक 25/08/2009 रोजी कार्यादेश निर्गमित केले. तथापि सदर योजनेच्या सदोष निविदा प्रक्रिये विषयी मे.माधव कन्स्ट्रक्शन यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे तक्रार केल्यामुळे शासनाने दिनांक 20/01/2010 च्या पत्रान्वये त्यास स्थगिती दिली. सदर स्थगिती दिनांक 25/05/2010 च्या शासनाच्या पत्रानुसार उठविण्यात आली. सदर योजनेबाबत लेखा परिक्षणाचे खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. राहूल नगरची जागा शासनाच्या मालकीची असून सदर जमीन अद्याप उल्हासनगर महानगरपालिकेकडे हस्तांतरित झालेली नसल्याने सदर प्रकल्पाचे काम आजपर्यंत होवू शकलेले नाही. सदरील प्रकल्पास सन 2008-2009 मध्ये केंद्र शासनाने मंजूरी देवून सुध्दा अद्याप त्याची अंमलबजावणी उल्हासनगर महानगरपालिकेला करता आलेली नाही. तरी देखील सदरील ठिकाणी घरकुले बांधण्यासाठी मे.कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांना रूपये 1,31,24,773 चे प्रदान 2010/2011 मध्ये करण्यात आले.(प्रमाणक क्रमांक 854 दिनांक 7/6/2010 रक्कम रु.9498638 आणि प्रमाणक क्रमांक 2094 दिनांक 21/8/2010 अन्वये रु. 3626136)

2. वाल्मीकी वसाहतीमध्ये 71 चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांकरीता आणि राहुलनगर मधील लाभार्थी यांच्याकरिता चार इमारतीमध्ये 213 घरकूले निर्माण करण्याचे उद्दीष्टे ठेवण्यात आले. चार इमारती तयार करण्याच्या प्रस्तावाप्रमाणे अदयाप एक देखील इमारत पूर्ण झालेली नाही.

3. वर नमुद केलेल्या डी.पी.आर.1 मधील राहूल नगर येथील कामकाज उल्हासनगर महानगरपालिकेस करता न आल्याने सदर प्रकल्प रद्द करण्याचा उल्हासनगर महानगरपालिकेकडून निर्णय घेण्यात आला व तसा प्रस्ताव म्हाडा मार्फत गृहनिर्माण विभागास पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. परिणामी केंद्र तसेच राज्य शासनाने सदरील योजनेखाली दिलेले अनुदान रूपये 6.26 कोटी विनावापर राहिले असल्याने गरीब वस्त्यातील नागरिक मूलभूत सोयी सुविधा पासून वंचित राहिलेले आहेत.

4. 2011 - 2012 मध्ये मे.कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांना निविदा पूर्व बैठकीतील मुद्दा क्रमांक 34 नुसार खालील प्रमाणे मोबिलायझेशन अग्रीम देण्यात आला.

| अ.क्र | प्रमाणक क्रमांक /दिनांक | रक्कम | कामांचे नाव |
|---|---|---|---|
| 1 | 2094 /21.08.2010 | 36,26,136 | रवूणी खाडा उल्हासनगर येथे बी.एस.यु.पी. अंतर्गत काम |
| 2 | 3433 / 01.11.2010 | 107,35,031 | राहूलनगर येथे बी.एस.यु.पी. काम |
| 3 | 3434 / 01.11.2010 | 56,79,077 | वाल्मीकी वसाहत येथे बी.एस.यु.पी. अंतर्गत काम |

| | | | |
|---|---|---|---|
| | एकूण | 2,00,40,234 | |

वरील अग्रीम सव्याज परत करण्याच्या अटी व शर्तीस अधिन राहून देण्यात आले. मात्र त्याचे समायोजन कोणत्या देयकातून करण्यात आले या बाबतची बाबतची माहिती संचिकेत आढळून आली नाही. अ.क्र. 1, 2 वरील कामे सुरू न होता 5 टक्के मोबिलायझेशन अग्रीम कशाच्या आधारे देण्यात आले याबाबतची माहिती लेखा परीक्षणास देण्यात आली नाही.

5. स्थायी समिती ठराव क्रमांक 145, दिनांक 27/02/2009 अन्वये झोपडपट्टयांचे सर्वेक्षण करण्यासाठी मे.विस्तार आर्किटेक्ट आणि प्लानर्स यांची एकूण प्रकल्प खर्चाच्या 2.5 टक्के दराने सल्ला आकार अदा करण्याच्या करारावर नेमणूक करण्यात आली. त्यांना रूपये 1,10,85,570 रक्कम खालील प्रमाणे अदा केलेली दिसून आली.

मेसर्स विस्तार आर्किटेक्ट्स आणि प्लानर्स

| प्रमाणक क्रमांक | प्रमाणक दिनांक | रक्कम |
|---|---|---|
| 928 | 1/6/2012 | 5954810 |
| 3677 | 15/11/2010 | 2136779 |
| 1785 | 29/07/2010 | 1254226 |
| 855 | 7/06/2010 | 1739715 |

6. शासन निर्णय क्रमांक भाखस/1088(2512)/उदयोग-6, दिनांक 02/01/1992 अन्वये परिच्छेद क्र.8.3 (फ) अन्वये, रूपये 50,000/- पेक्षा जादा खर्चासाठी निविदा प्रक्रिया राबवून त्यातून सल्लागाराची निवड करणे आवश्यक होते. मात्र अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही पार पाडल्याचे संचिकेत दिसून आले नाही. परिणामी उल्हासनगर महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा लाभ झालेला नाही. सदर प्रकरणी मुंबई वित्तीय नियम 1959 नियम क्रमांक 57 या वित्तीय औचित्याचा भंग झालेला आहे. तसेच मे.विस्तार आर्किटेक्ट आणि प्लानर्स यांनी राजीव गांधी नगर, मिनाताई ठाकरे, कौशलनगर, आणि दत्तवाडी येथे सर्वेक्षण केलेले असून त्याप्रमाणे त्यांना सल्ला रक्कम अदा करण्यात आलेली आहे. प्रत्यक्षात वरील ठिकाणी बी.एस.यु.पी. अंतर्गत कोणतेही काम सुरू झालेले नसल्याने मे.विस्तार आर्किटेक्ट यांना अदा केलेली रक्कम रूपये 1,10,85,570 पूर्णपणे वाया गेलेली आहे.

7. बी.एस.यु.पी. साठी AXIS बॅकेत खाते उघडलेले असून सदर खात्यामध्ये दिनांक 31 मार्च 2011 रोजी रूपये 84,49,366 शिल्लक होती. सन 2011 - 2012 मध्ये रूपये 2,00,00,000 उल्हासनगर महानगरपालिकेस प्राप्त झाले. अशा प्रकारे दिनांक 31/03/2012 रोजी सदर खात्यामध्ये रूपये 3,20,87,256 रक्कम शिल्लक असल्याचे दिसून आले. म्हणजेच संपूर्ण वर्षभरात कोणताही खर्च न झाल्याने सदरील रक्कम अल्प मुदतीच्या योजनेत उच्च व्याज दराने गुंतविण्यात आली असती तर जादा व्याज प्राप्त झाले असते. अल्पमूदतीसाठी गूंतवणूक न केल्याने महानगरपालिकेस रूपये 20,00,000 चे नुकसान झालेले आहे.

8. सदर खात्यातून रूपये 2,00,00,000 दिनांक 16/11/2011 रोजी ऑपरेटीव्ह अकौटंला वर्ग केल्याचे दिसून आले. उपरोक्त रक्कम दिनांक 31/12/2011 रोजी पुनः खात्यात वर्ग करण्यात आली. सदरील 46 दिवसासाठी उल्हासनगर महानगरपालिकेचे रूपये 2,33,950 इतके व्याजाचे नुकसान झाले.

9. केंद्र तसेच राज्य शासनाकडून बी.एस.यु.पी. अंतर्गत रूपये 6,25,77,000 चे अनुदान प्राप्त झाल्याचे रोख पुस्तकात दिसून आले. मात्र सदर योजनेची अंमलबजावणी झालेली नसल्याने सदरील अनुदान केंद्र तसेच राज्य शासनास सव्याज परत करणे आवश्यक होते. मात्र 31-3-2012 पर्यंत सदर रक्कम परत केलेली नाही.वरील अनुक्रमांकातील 4 आणि 5 वरील खर्च प्रत्यक्षात योजनेशी संबंधित नसल्याने आणि तो 2010-2011 या वित्तीय वर्षात खर्ची पडल्याने 2010-2011 या वर्षासाठी आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

10. राहूल नगर येथे जवाहरलाल नेहरू नागरी पुनरूत्थान योजनेअंतर्गत करावयाच्या बांधकामासाठी मे.कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांच्या बरोबर रूपये 100 च्या मुद्रांकावर करारनामा केलेला असून सदर बांधकामाची एकूण किंमत रूपये 21,47,00,768 अशी दाखविण्यात आलेली आहे. मात्र सदरील करारनाम्यावर मुंबई मुदांक अधिनियम 1958 चे कलम 63 अनुसार रूपये 2,13,700 चे मुदांक कमी घेतलेले आहे. सदरची रक्कम रु.213700 वसुल करून शासन सदरी जमा करण्यात यावी.

11. बी.एस.यु.पी.या योजनेखाली रूपये 35.38 कोटीच्या प्रकल्पापैकी पहिला हप्ता केंद्र तसेच राज्य शासनाकडून अनुक्रमे रूपये 4.02 आणि 2.23 कोटी प्राप्त झालेला सदर प्रकल्प 2010-2011 पर्यंत पूर्ण करणे आवश्यक होते. तथापि सदर योजनेखाली कोणताही खर्च झालेला नसल्याने दिनांक 25-07-2007 च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचना नुसार सदरील शिल्लक रक्कम रूपये 6.26 कोटी शासनास सव्याज परत करावी.

दिनांक 25/07/2007 च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 21 अन्वये लाभार्थ्याचे किती अशदान प्राप्त झाले याची कोणतीही माहिती लेखा परीक्षणास प्राप्त झाली नाही. सदर बाबत अर्ध समास ज्ञापन क्रमांक 81 दिनांक 17/01/2014 अन्वये संबंधित विभागास विचारणा करण्यात आली होती. विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु. 46464207

वसुलपात्र रक्कम रु. 213700

DATDBWM5801 (Ref No : 133, Hmm No : 81)

## *55 खासदार निधी अंतर्गत प्रभाग क्रमांक 10 मिनाताई ठाकरे नगर येथे समाज मंदिर तयार करण्याच्या कामाच्या मोजमाप पुस्तकातील अपूर्ण नोंदी बाबत.*

**खासदार निधीतील विकास कामे.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :413-3224 केंद्र शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 469770.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 4568.00/-

***मोजमाप पुस्तकात रु. 443957 रकमेच्या सदर कामाच्या नोंदी घेण्यात आल्याचे दिसून आले. मात्र मक्तेदारास रु. 649113आणि रु264614 असे मिळून एकूण रु. 913727 चे प्रदान करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखासंहिता परीच्छेद क्रमांक 10.1.04 अन्वये मोजमाप पुस्तकातील नोंदी कामाच्या प्रगती प्रमाणे प्रथम कनिष्ट अभियंता आणि त्यानंतर उप अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांनी तारखेनिशी घेवून त्यानंतरच पहिले व त्यापुढील धावत्या देयका प्रमाणे प्रदान करणे आवश्यक आहे मात्र या प्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. महाराष्ट्र लेखा संहिता 1971 नियम क्रमांक 167 (2) नुसार मूळअंदाजा पेक्षा 10% पेक्षा अधिक वाढ झाल्यास त्या साठी सुधारित अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक आहे. सदर कामाच्या प्रत्यक्ष काम केल्याच्या विवरणपत्रात अंदाजपत्रकातील कामाच्या बाबीत फरक दिसून दिसून आला. सदर वाढीचे कोणतेही कारण देण्यात आलेले नाही.***

खासदार निधी अंतर्गत प्रभाग क्रमांक 10 मिनाताई ठाकरे नगर येथे समाज मंदिर तयार करण्याच्या कामाच्या देयकाची तपासणी केली असता खालील प्रमाणे लेखा परीक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत.

कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1.कामाचे नाव :- प्रभाग क्रमांक 10 मिनाताई ठाकरे नगर येथे समाज मंदिर तयार करणे

2.कामाचे अंदाजपत्रक :- रु. 1000000

3.मक्तेदाराचे नाव:- मे. राजदीप कामगार सहकारी संस्था.

4.तांत्रिक मंजुरी:- 5919/13/6/2011

5.कार्यादेश क्रमांक :- उमपा/साबावि/काअ/3316 दिनांक 5/10/2011

6.मोजमाप पुस्तक क्रमांक :- 2352

7.देयकाचा तपशील :- पहिले धावते देयक प्रमाणक क्रमांक 4326 दिनांक 22-12-2011;- रु649113/- आणि दुसरे धावते देयक प्रमाणक 263 दिनांक23-4-2012.264614

8.करारनाम्याची तारीख :- 5/10/2011

9.काम सुरु केल्याची तारीख 5/10/2011

10.समाप्तीची तारीख :- 23/12/2011

1. .सदर कामावर वापरलेल्या गौण खनिजा साठी मक्तेदाराच्या देयकातून स्वामित्वधन रक्कम वसुल करण्यात आलेली नाही. खासदार निधी अंतर्गत केलेल्या विकास कामावरील वापरलेल्या गौण खनिजाचा परीच्छेद स्वतंत्र घेण्यात आलेला आहे. सन 2011-2012 या वर्षाच्या दरसूची प्रमाणे कामासाठी वापरण्यात

आलेल्या सामग्रीच्या चाचणी अहवालासाठी 0.50.% प्रमाणे वसुली करणे आवश्यक होते. सबब रु 4568 रक्कम वसुल करण्यात आलेली नाही.

2. महाराष्ट्र नगर परिषद लेख संहिता 1971 नियम क्रमांक 182 नुसार नमुना 139 या विहित प्रपत्रात कामाची नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

3. मोजमाप पुस्तकात खालील प्रमाणे कामाच्या नोंदी घेतल्याचे दिसून आले. मात्र मक्तेदारास दोन धावत्या देयकावर रु. 913727 चे प्रदान करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | बाब क्रमांक | वर्णन | परिमाण | दर | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 16 | वाळू प्लास्टर | 158.68 | 315.94 | 50121 |
| 2 | 18 | तीन कोट रंग | 158.64 | 29.40 | 4664 |
| 3 | 15 | सिमेंट प्लास्टर | 180.84 | 142.71 | 25808 |
| 4 | 26 | कोटा स्टोन | 61.11 | 768.95 | 46.991 |
| 5 | 23 | वाटर प्रुफ ट्रीटमेंट | 65.66 | 464.11 | 30473 |
| 6 | 24 | डोअर फ्रेम | 0.247 | 96889.80 | 23932 |
| 7 | 19 | डबल लीफ | 2.46 | 3796.80 | 9340 |
| 8 | 20 | टिकवूड | 5.67 | 2382.45 | 13508 |
| 9 | 21 | एम एस ग्रील | 5.67 | 1814.40 | 10288 |
| 10 | 14 | बि बि | 26.65 | 3846.40 | 102506 |
| 11 | 1 | खोदकाम | 135.25 | 110.25 | 14911 |
| 12 | 2 | ड्राय रबल | 51.09 | 558.64 | 28541 |
| 13 | 3 | 1:3:6 | 22.71 | 3649.23 | 82874 |

एकूण रक्कम रु. 443957

4. वर दाखविण्यात आल्याप्रमाणे मोजमाप पुस्तकात रु. 443957 रकमेच्या कामाच्या नोंदी घेण्यात आल्याचे दिसून आले. मात्र मक्तेदारास रु. 649113 आणि रु 264614 असे मिळून एकूण रु. 913727 चे प्रदान केल्याचे दिसून आले. मोजमाप पुस्तकात रु. 469770 एवढया रकमेच्या कामाच्या नोंदी नसल्याने सदर रक्कम आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग लेखासंहिता परीच्छेद क्रमांक 10.01.04 अन्वये मोजमाप पुस्तकातील नोंदी कामाच्या प्रगती प्रमाणे प्रथम कनिष्ट अभियंता आणि त्यानंतर उप अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांनी तारखेनिशी घेवून त्यानंतरच पहिले व त्यापुढील धावत्या देयका प्रमाणे करणे आवशक आहे. नियंत्रक अभियंत्याने मोजमाप पुस्तकाची नियत काळाने तपासणी करून त्यात नोंदविण्यात आलेली सर्व बांधकामे बरोबर असल्याची खात्री करून त्या नंतरच मक्तेदारास प्रदान करणे आवश्यक आहे. मात्र या प्रमाणे तारखेनिशी नोंदी घेतल्या नसल्याचे दिसून आले.

5. महाराष्ट्र लेखा संहिता 1971 नियम क्रमांक 167(2) नुसार मूळअंदाजा पेक्षा 10% पेक्षा अधिक वाढ झाल्यास त्या साठी सुधारित अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक आहे. सदर कामाच्या प्रत्यक्ष काम केल्याच्या विवरणपत्रात अंदाजपत्रकातील बाब निहाय फरक दाखविल्यात आला आहे. काही बाबी मध्ये जादा तर काही बाबीमध्ये बचत दिसून आली. सदर वाढ किवा घट चे कोणतेही कारण देण्यात आलेले नाही. अंदाजपत्रकाची रक्कम तीच ठेवण्यात आली असली तरी बाब निहाय स्पष्टीकरण आवश्यक आहे

सदर कामाबाबत संबंधित विभागास अर्ध समास ज्ञापन क्रमांक 45 दिनांक 3/12/2013 अन्वये विचारणा करण्यात आली होती. विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु. 469770

वसुलपात्र रक्कम रु. 4568

DATDBWM5801 (Ref No : 134, Hmm No : 45)

## *56 प्रभाग क्रमांक 20 फुट पाथ तयार करणे या कामात झालेले अतिप्रदान रु. 79449*

**खासदार निधी अंतर्गत विकास कामे.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :413-3224 केंद्र शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 79449.00/-

***खासदार निधी अंतर्गत प्रभाग क्रमांक 20 मध्ये फुटपाथ तयार करणे या कामाचे अंदाजपत्रका मध्ये सन 2010-2011 च्या जिल्हा दरसूची पेक्षा जादा दर लावल्याने मक्तेदारास जादा प्रदान झाले. सदर कामाच्या देयकासोबत दर पृथक्करण लेखा परीक्षणास प्राप्त झाले नाही. मोजमाप पुस्तकात नोंदी मक्तेदारास कार्यादेश निर्गमित केल्यानंतर झालेल्या कामाच्या प्रगतीप्रमाणे करणे आवश्यक असताना त्या तशा घेण्यात येत नसल्याचे दिसून आले. सदर कामाच्या सामग्रीसाठी चाचणी अहवाल शुल्क मक्तेदाराकडून वसुल कलेले नाही.***

खासदार निधी अंतर्गत प्रभाग क्रमांक 20 मध्ये फूटपाथ तयार करणे या कामाच्या देयकाची तपासणी करण्यात आली. त्या बाबतचे लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे देण्यात येत आहेत.

कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1.कामाचे नाव - प्रभाग क्रमांक 20 फूट पाथ तयार करणे

2.कामाचे अंदाजपत्रक - 999995

3.प्रमाणक क्रमांक 4417 दिनांक 27-12-2011 रु.999995,निव्वळ रक्कम रु. 879830

4.मक्तेदाराचे नाव:- मे वनदेवी मजूर कामगार सहकारी संस्था.

5.तांत्रिक मंजुरी 6022 दिनांक 27-6-2011

7.कार्यादेश क्रमांक :- उमपा/साबावि/काअ/3348 दिनांक 13-10-2011

8.मोजमाप पुस्तक क्रमांक 3323 पाने क्रमांक 1 to 8

9.करारनाम्याची तारीख 13-10-2011

10.काम सुरु केल्याची तारीख 13-10-2011

11.काम समाप्तीची तारीख 28-11-2011

12.डी.डी.आर. क्रमांक 3232 दिनांक 10-10-2011

1. सदर कामावर वापरलेल्या गौण खनिजासाठी मक्तेदाराच्या देयकातून स्वामित्वधन रक्कम वसुल करण्यात आलेले नाही. खासदार निधी अंतर्गत केलेल्या विकास कामावरील वापरलेल्या गौण खनिजाचा परीच्छेद स्वतंत्र घेण्यात आलेला आहे. सन 2011-2012या वर्षाच्या दरसूची प्रमाणे कामासाठी वापरण्यात आलेल्या सामग्रीच्या चाचणी अहवालासाठी 0.50% प्रमाणे वसुली करणे आवशक होते. सबब रु.4999 रक्कम वसुल करण्यात आलेली नाही.

2. खालील सामग्री चे दर सन 2010-2011या वर्षाच्या दरसूची पेक्षा (महानगरपालिका क्षेत्रात 5% जादा) जादा असल्याचे दिसून आले. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | सामग्रीचे नाव | डी.एस.आर.2010-2011चे दर +5%वाढ | अंदाजपत्रकात दिलेले दर | फरक | परिमाण | रक्क |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | पी.सी.सी.1:3:6 पाया | 3213 प्र.घ.मी. | 3649 प्र.घ.मी. | 436 | 31.54 | 1375 |
| 2. | पी.सी.सी .एम 10 | 3213 चौ.घ.मी. | 3685 प्र.घ.मी. | 472 | 81.06 | 3826 |
| 3. | वाहतूक करणे | 68.51 प्र.घ.मी. | 82.47 प्र.घ.मी. | 13.96 | 241.50 | 3371 |
| 4. | ऐच.वाय.एस.डी. पांईप | 39864 मे.टन | 43491.75 मे.टन | 3627.75 | 2.59 | 9396 |
| 5. | ड्राय रबलर२० से.मी. | 448 प्र.घ.मी. | 457.25 प्र.घ.मी. | 9.25 | 150.34 | 1390 |
| 6. | एम -२० | 6867 प्र.घ.मी. | 7222 प्र.घ.मी. | 355 | 23.33 | 8282 |
| | | | | एकूण रक्कम | | 7445 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | रु. | | |

वर दाखविण्यात आल्याप्रमाणे सदर कामात मक्तेदारास रु 79449 चे जादा प्रदान झाले असल्याचे दिसून येते.

3. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखासंहिता परीच्छेद क्रमांक 10.1.04 अन्वये मोजमाप पुस्तकातील नोंदी कामाच्या प्रगती प्रमाणे प्रथम कनिष्ट अभियंता आणि त्यानंतर उप अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांनी तारखेनिशी घेवून त्यानंतरच पहिले व त्यापुढील धावत्या देयका प्रमाणे काम करणे आवश्यक आहे. नियंत्रक अभियंत्याने मोजमाप पुस्तकाची नियत काळाने तपासणी करून त्यात नोंदविण्यात आलेली सर्व बांधकामे बरोबर असल्याची खात्री करून त्या नंतरच मक्तेदारास प्रदान करणे आवश्यक आहे. मात्र या प्रमाणे तारखेनिशी नोंदी घेतल्या जात नसल्याचे दिसून आले.

4. महाराष्ट्र लेखा संहिता 1971 नियम क्रमांक 167(२) नुसार मूळ अंदाजा पेक्षा 10% पेक्षा अधिक वाढ झाल्यास त्या साठी सुधारित अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक आहे. सदर कामाच्या प्रत्यक्ष काम केल्याच्या विवरण पत्रात (EXECUTION OF WORK) अंदाजपत्रकातील बाब निहाय फरक दाखविण्यात आला आहे. सदर वाढीचे कोणतेही कारण देण्यात आलेले नाही. जरी अंदाजपत्रकाची रक्कम तीच ठेवण्यात आलेली असली तरी बाब निहाय स्पष्टीकरण आवश्यक आहे.

5. सदर कामाची नोंद महाराष्ट्र नगर परिषद लेख संहिता 1971 मधील नियम क्रमांक् 182 नुसार नमुना 139 या विहित प्रपत्रात ठेवण्यात आलेली दिसून आलेली नाही. सदर बाबत संबंधित विभागास अर्ध समास ज्ञापन क्रमांक 46 दिनांक 3/12/2013अन्वये विचारणा करण्यात आली होती. विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु.79449

DATDBWM5801 (Ref No : 135, Hmm No : 46)

## *57 दलित वस्ती सुधारणा अंतर्गत केलेल्या कामाच्या देयकातून गौण खनिज वापरल्याबद्दल स्वामित्व धन रक्कम रु. 67423*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*केंद्र शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 67423.00/-

***दलित वस्ती सुधारणा अंतर्गत केलेल्या विकास कामाच्या देयकातून गौणखनिज म्हणजेच वाळू, खडी, मुरूम, रबल, इत्यादी सामग्रीसाठी स्वामित्वधनाची रक्कम संबंधित मक्तेदाराने रक्कम भरणा केल्याची खात्री न***

***करता प्रदान केले आहे.***

दलित वस्ती सुधारणा अंतर्गत केलेल्या विकास कामाच्या देयकातून गौण खनिज म्हणजेच वाळू, खडी, मुरूम, रबल, इ त्यादी सामग्री साठी स्वामित्वधनाची रक्कम संबंधित मक्तेदाराने रक्कम भरणा केल्याची खात्री न करता प्रदान केले आहे. . संबंधित मक्तेदाराने उपरोक्त गौणखनिजा साठी स्वामित्वधनाची रक्कम राज्य शासनास अदा केल्याची पावती सादर केलेली नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्रमा. क्र. दिनांक | मक्तेदाराचे नाव | आदेश क्रमांक | दिनांक | गौण खनिज परिमाण चौ..घन.मी. | दर प्र.. घन.मी.(रु.) | रक्क (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | प्रभाग 64 मध्ये पेवर टाकणे | 1012 3/6/2011 | मोनाली कामगार सह.संस्था. | 2282 | 6/9/2010 | 347.17 | 70.67 | 245 |
| 2. | प्रभाग क्रमांक 48 मिलिंद नगर येथे पेवर बसविणे. | 434/3-4-2011 | जय भवानी मजूर कामगार सह.संस्था. | 2253 | 3/9/2010 | 169.413 | 70.67 | 119 |
| 3. | प्रभाग 68 पटेल नगर येथे नाला बांधणे | 435 3/4/2011 | हरे राम मजूर कामगार सह.संस्था. | 2305 | 27/7/2010 | 204.930 | 70.67 | 144 |
| 4. | शिवसेना कार्यालय ते आझादनगर पेवर बसविणे | 1011/3/6/2011, 3206/12/10/2011 | महालक्ष्मी मजूर कामगार सह.संस्था | 2296 | 2/9/2010 | 132.25 | 70.67 | 934 |
| 5. | प्रभाग क्रमांक 8 पेवर बसविणे | 2047/8/8/2011 | प्रभा मजूर कामगार सह.संस्था. | 2303 | 27/9/2010 | 100.03 | 70.67 | 708 |
| | | | | | | | एकूण रक्कम रु. | 674 |

वरील कामासाठी वापरण्यात आलेल्या वाळू, मुरूम, खडी, इत्यादी गौणखनिजासाठी स्वामित्वधन रक्कम रु.67423 राज्यशासनाकडे 0853 गौणखनिज या लेखा शिर्षाखाली जमा केल्याचे चलन लेखा परीक्षणास सादर केले नाही. सदर बाबत संबंधित विभागास अर्ध समास ज्ञापन क्रमांक, 51,53,55,57 दिनांक 19/12/2013 अन्वये विचारणा करण्यात आली होती. विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.

वसुलपात्र रक्कम रु. 67423

DATDBWM5801 (Ref No : 136, Hmm No : 57)

## *58 निर्मल एम.एम.आर (वस्तीस्वच्छतागृह) योजनेतील त्रुटी बाबत*

**निर्मल एम.एम.आर.अभियान अंतर्गत बांधलेली वस्तीस्वच्छतागृहे**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 46864155.00/-

***निर्मल एम.एम.आर. अभियान अंतर्गत 163 वस्ती स्वच्छता गृहे बांधण्याची कामे 2008-2009 पासून सुरू करण्यात आली होती. उल्हासनगर महानगरपालिकेस निर्मल एम.एम.आर. अभियानाअंतर्गत करावयाच्या कामाचा टप्पा 1 आणि 2 साठी रूपये 34,41,23,873 अनुदान दिले होते. सदरील दोन टप्प्यातील 161 टॉयलेट ब्लॉक बांधण्याचे उद्ष्टि 2008-2009 मध्ये पूर्ण करण्याचे निर्देश उल्हासनगर महानगरपालिकेस देण्यात आले होते. मात्र दोन टप्प्यातील कामे पूर्ण न झाल्याने शासनाने दिलेल्या अनुदानाचा योग्य तो वापर केलेला नसल्याचे दिसून आले. महानगरपालिकेने अशासकीय संस्थाना रूपये 30,65,03,399 चे प्रदान केल्याचे संबंधित विभागाने दिलेल्या विवरणपत्रावरून दिसून आले. म्हणजेच रूपये 3,76,20,474 रक्कम अद्याप महानगरपालिकेकडे शिल्लक राहिलेली आहे. तथापि रोख पुस्तकाची अंतिम शिल्लक रूपये 1,42,56,375 आहे..***

निर्मल एम.एम.आर. (वस्तीस्वच्छतागृह) अभियानाअंतर्गत 2011-2012 मध्ये झालेल्या खर्चाची लेखापरीक्षा केली असता टप्पा क्रमांक 1 आणि 2 मध्ये अनुक्रमे 82 आणि 081 अशी एकूण 163 वस्ती स्वच्छतागृहे बांधण्याची कामे 2008-2009 पासून सुरू करण्यात आली होती. सदरील कामाच्या देयकांची तपासणी केली असता खालील प्रमाणे लेखा परिक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) निर्मल एम.एम.आर. अभियान अंतर्गत प्राप्त झालेल्या अनुदानातून झालेल्या खर्चासाठी ठेवण्यात आलेले

रोख पुस्तक राष्ट्रीय नगरपालिका लेखांश परिच्छेद क्रमांक 5.3 प्रमाणे विहीत प्रपत्रात ठेवण्यात आलेले नाही. सदरील रोखवही दर दिवशी बंद करून विहीत पध्दतीने शिल्लक काढलेली नसून ती सक्षम अधिकाऱ्याने स्वाक्षरीत केलेली नाही. दिनांक 31/03/2012 रोजी सदर रोख पुस्तकातील अंतिम शिल्लक रूपये 1,42,56,375 असल्याचे दिसून आले. मात्र खात्यावर रू.1,42,13,297 शिल्लक असल्याचे दिसून आले. सबब रु.43,078/- या फरकाच्या रकमेचा बॅकेबरोबर ताळमेळ घातला गेला नसल्याचे आढळून आले.

2) दिनांक 16/11/2011 रोजी सदरच्या खात्यातून रूपये 100,00,000 ऑपरेटीव्ह अकाउंट मध्ये वर्ग करण्यात आले व त्यानंतर दिनांक 31/12/2011 रोजी उपरोक्त रक्कम पुनः खात्यामध्ये जमा करण्यात आली. म्हणजेच 46 दिवस रूपये 100,00,000 ची रक्कम खात्याबाहेर ठेवण्यात आली. परिणामी रूपये 1,22,876 व्याज सदर खात्यावर जमा होवू शकले नाही.

3) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी उल्हासनगर महानगरपालिकेस निर्मल एम.एम.आर. अभियानाअंतर्गत करावयाच्या कामासाठी रूपये 34,41,23,873 अनुदान दिले होते. सदरील दोन टप्प्यातील 161 टॉयलेट ब्लॉक बांधण्याचे उद्दिष्ट 2008-2009 मध्ये पूर्ण करण्याचे निर्देश उल्हासनगर महानगरपालिकेस देण्यात आले होते. मात्र अद्याप दोन टप्प्यातील कामे पूर्ण न झाल्याने शासनाने दिलेल्या अनुदानाचा योग्य तो वापर केलेला नसल्याचे दिसून आले. महानगरपालिकेने अशासकीय संस्थाना रूपये 30,65,03,399 चे प्रदान केल्याचे संबंधित विभागाने दिलेल्या विवरणपत्रावरून दिसून आले. म्हणजेच रूपये 3,76,20,474 रक्कम अद्याप महानगरपालिकेकडे शिल्लक राहिलेली आहे. तथापि रोख पुस्तकाची अंतिम शिल्लक रूपये 1,42,56,375 आहे. या बाबत योग्य तो खुलासा करण्यात आला नाही.

4) उल्हासनगर महानगरपालिकेने सदरील दोन टप्प्यातील कामासाठी सुधारित खर्चाचे विवरणपत्र तयार केलेले असून त्याप्रमाणे टप्पा क्रमांक 1 आणि 2 साठी रूपये 40,11,84,971 खर्च अपेक्षित असल्याचे त्यात दाखविण्यात आलेले असून उर्वरित रक्कम रूपये 5,53,41,026 ची मागणी महाराष्ट्र महानगर विकास प्राधिकरण यांचेकडे करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. प्रत्यक्षात एन.जी.ओ.नी कामाचे आदेश महानगरपालिकेकडून प्राप्त करून मूळ प्राकलनाच्या 25 टक्के रक्कम अग्रीम म्हणून प्राप्त केली त्यानंतर वेळोवेळी धावती देयके महानगरपालिकेस सादर करून त्यांचे प्रदान स्विकारले. मात्र त्यांनि कामाच्या आदेशान्वये नेमून दिलेली कामे वेळीच पूर्ण न केल्याने सदरील कामे स्थानिक मक्तेदाराकडून पूर्ण करून घ्यावी लागली. पर्यायाने सदरील कामावर जादा खर्च झालेला दिसून येतो. निर्मल एम.एम.आर. योजनेअंतर्गत वेळीच कामे पूर्ण न झाल्याने शासनाने दिलेल्या अनुदानाचा योग्य तो वापर महानगरपालिकेने केलेला नाही हे यावरून स्पष्ट होते. करारनाम्यात चार ते सहा महिन्यात काम पूर्ण करणे आवश्यक असल्याचे नमुद केलेले असताना, मागील तीन ते चार वर्षाचा कालावधी होउन सुध्दा सदर कामे पूर्ण झालेली नाहीत. 10 सिटच्या टॉयलेटसाठी काही ठिकाणी रूपये 15,97,300, 28,69,000 आणि रूपये 32,92,567 17,50,868 असा वेगवेगळा खर्च झाला असल्याचे दिसून आले सदर तफावतीबाबत योग्य ती स्पष्टता करण्यात आली नाही. 2011-2012 मध्ये पारित झालेल्या प्रमाणका सोबत जोडलेल्या मोजमाप पुस्तकात थेट चौथ्या रंनिग देयकाची नोंद केलेली असून त्यापूर्वी मोठया प्रमाणात अग्रीम मक्तेदारांना अदा झालेला असून त्याचा कोणताही तपशील

उपलब्ध झालेला नाही. निर्मल एम.एम.आर.च्या कामासाठी अशाप्रकारे रूपये 4,68,64,155 अग्रीम संबंधित मक्तेदाराना अदा झालेले आहे. मात्र त्या बाबतच्या कामाची नोंद मोजमाप पुस्तकात करण्यात आलेली नाही. 2011-12 च्या प्रमाणका सोबत जोडलेल्या मोजमाप पुस्तकात केवळ ADVANCE PAYMENT असा उल्लेख करण्यात आलेला आहे. तरी सदरील आगावू रक्कमेची नोंद कोणत्या मोजमाप पुस्तकात घेण्यात आलेली आहे, त्याची माहिती मोजमाप पुस्तकासह देण्यात आली नाही.. सदरील त्रुटीची पूर्तता होई पर्यंत सदरील खर्च रूपये 46864155 आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

5) महासभेचा ठराव क्र. 60, दिनांक 28/12/2010 अन्वये ज्या मक्तेदारानी अर्धवट कामे सोडली व उपरोक्त कामे पर्यायी मक्तेदारांकडून पूर्ण भरून घ्यावी लागली. त्याची वसुली मूळ मक्तेदारांच्या अंतिम देयकातून करण्याचा निर्णय घेण्यात आला. आतापर्यत किती मक्तेदारांकडून अंतिम देयकातून वसुली करण्यात आली, याची माहिती देण्यात आली नाही. तसेच जुलै 2011 पासून प्रति टॉयलेट ब्लॉक रूपये 2000 याप्रमाणे किती रक्कम सी.बी.ओ.ला अदा करण्यात आली, या बाबतची माहिती देण्यात आली नाही

6) निर्मल एम.एम.आर. अभियान अंतर्गत टप्पा क्र.1 आणि 2 अन्वये बांधण्यात आलेल्या 163 शौचालय बांधकामापैकी सी.बि.ओ. कडे हस्तांतरित करण्यात आलेली शौचालये तसेच बंद अवस्थेत असलेल्या शौचालयाची माहिती आणि त्यावर झालेला खर्च लेखा परिक्षणास सादर करण्यात आला नाही. सदर बाबत संबंधित विभागास अर्ध समास ज्ञापन क्रमांक 134 दिनांक 4/2/2014 अन्वये विचारणा करण्यात आली होती. विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु. 46864155

DATDBWM5801 (Ref No : 137, Hmm No : 134)

## *59 खासदार निधी अतर्गत प्रभाग क्रमांक 64 मध्ये कंपाउंड भिंत तयार करणे या कामाच्या देयकातून विलंब आकार, चाचणी अहवालाची रक्कम वसुल न केल्याने झालेले नुकसान रु. 25546*

**खासदार निधी अंतर्गत विकास कामे.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :413-3224 केंद्र शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 599200.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 25546.00/-

***सदर काम दिनांक 24-7-2010 रोजी पूर्ण होणे आवश्यक होते. तथापि, ते दिनांक 18-08-2011 रोजी पूर्ण***

***झाल्याने ते 451 दिवस विलंबाने पूर्ण केल्याने करारनाम्यातील अटी व शर्ती प्रमाणे प्रति दिवसाला रु.50 या प्रमाणे रु 22550 दंड वसुल करणे आवश्यक आहे. सदरील कामाच्या अंदाजपत्रकात प्रीकास्ट हेवी ड्युटी इन इंटर लॉक पेवर ब्लॉक बसविण्याच्या कामाचा समावेश असून सदर बाबीचे दराचा जिल्हा दरसूची मध्ये समावेश नसल्याचे दिसून आले. या साठी तयार केलेल्या दर पृथक्करणाचा समावेश सदर कामाच्या संचिकेत दिसून आला नाही. त्यामुळे सदर बाबीचे दर कसे निश्चित केले याची कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. त्याच बरोबर 2008-2009 च्या जिल्हा दरसूची च्या दरापेक्षा जादा दर अंदाजपत्रकात नमूद केल्याने मक्तेदारास जादा प्रदान झाले आहे. कामाच्या देयकासोबत दर पृथक्करण जोडलेले नसल्याने दराची तपासणी करता आली नाही.***

खासदार निधी अंतर्गत प्रभाग क्रमांक 64 मध्ये कम्पाउंड भिंत तयार करणे या कामाच्या देयकाची तपासणी केली असता खालील प्रमाणे लेखा परीक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत.

कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1. कामाचे नाव :- प्रभाग क्रमांक 64 मध्ये कम्पाउंड भिंत तयार करणे
2. कामाचे अंदाजपत्रक :- 599200/-
3. मक्तेदाराचे नाव:- मे. जवाहर मजूर कामगार सहकारी संस्था.
4. तांत्रिक मंजुरी -:3105 दिनांक 4-8-2009कार्यादेश क्रमांक /काअ/साबावि/उमपा -:1653 दिनांक 25-1-2010
5. मोजमाप पुस्तक क्रमांक 3165 पाने 1 ते 8
6. देयकाचा तपशील - प्रमाणक क्रमांक 3698 दिनांक 15-11-2011 रु .599200
7. करारनाम्याची तारीख -: 4-8-2009
8. काम सुरु केल्याची तारीख 4-8-2009
9. काम समाप्तीची तारीख 18-8-2011

1. सन 2011-2012 या वर्षाच्या दरसूची प्रमाणे कामासाठी वापरण्यात आलेल्या सामग्रीच्या चाचणी अहवालासाठी 0.50% प्रमाणे वसुली करणे आवश्यक होते. सबब रु.2996 रक्कम मक्तेदाराकडून वसुल केलेली नाही.

2. सदरील काम दिनांक 24-7-2010 रोजी पूर्ण होणे आवश्यक होते. तथापि ते दिनांक 18-8-2011 रोजी पूर्ण झाल्याने ते 451 दिवस विलंबाने पूर्ण करण्यात आले. करारनाम्यातील अटी व शर्ती प्रमाणे प्रति दिवसाला रु.50 या प्रमाणे रु. 22550 दंड वसुल करणे आवश्यक आहे. मक्तेदाराने 2-8-2011 च्या पत्रान्वये विलंब आकार माफ करण्यासाठी म.न.पां.स विनंती केली. प्रत्यक्षात कामाचे आदेश दिनांक 25-01-2010 रोजी दिलेले असताना दिनांक 02-08-2011 रोजी विलंब आकार माफ करण्यासाठी जलवाहिन्या टाकण्याचे काम सुरु होते, आणि वाळू व इतर सामग्री चे दर वाढले होते इत्यादी मक्तेदाराने दिलेली कारणे योग्य व संयुक्तिक नव्हती.

3. सदरील कामाच्या अंदाजपत्रकात प्रीकास्ट हेवी ड्यूटी इन इंटर लॉक पेवर ब्लॉक बसविण्याच्या कामाचा समावेश असून सदर बाबीचे दराचा जिल्हा दरसूची मध्ये समावेश नसल्याचे दिसून आले. या साठी तयार केलेले दर पृथक्करण संचिकेमध्ये तपासणीसाठी उपलब्ध झाले नाही. त्याचबरोबर 2008-2009 च्या जिल्हा दरसूची पेक्षा जादा दर अंदाजपत्रकात दाखविल्याचे दिसून आले. मात्र कामाच्या देयकासोबत दर पृथक्करण उपलब्ध न झाल्याने सदर दराची तपासणी करता आली नाही. त्यामुळे सदर कामावर झालेल्या खर्चाची रक्कम रु.599200 आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

4. सदर कामाची नोंद महाराष्ट्र नगर पालिका लेखा संहिता 1971 नियम क्रमांक 182 नुसार नमुना 139 या विहित प्रपत्रात घेण्यात आलेली नाही.

5. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखासंहिता परीच्छेद क्रमांक 10.01.04 अन्वये मोजमाप पुस्तकातील नोंदी कामाच्या प्रगती प्रमाणे कनिष्ठ अभियंता, उपअभियंता आणि कार्यकारी अभियंता यांनी तारखेनिशी घेवून त्यानंतरच पहिले व त्यापुढील धावत्या देयकाचे प्रदान करणे आवश्यक आहे. नियंत्रक अभियंत्याने मोजमाप पुस्तकाची नियत काळाने तपासणी करून त्यात नोंदविण्यात आलेली सर्व बांधकामे बरोबर असल्याची खात्री करून त्यानंतरच मक्तेदारास प्रदान करणे आवश्यक आहे. मात्र या प्रमाणे तारखेनिशी नोंदी घेतल्या जात नसल्याचे दिसून आले.

6. महाराष्ट्र लेखासंहिता 1971 नियम क्रमांक 167(2) नुसार मूळ अंदाजा पेक्षा 10% पेक्षा अधिक वाढ झाल्यास त्यासाठी सुधारित अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक आहे. सदर कामाच्या प्रत्यक्ष काम केल्याच्या विवरणपत्रात बाब निहाय फरक दिसून आला. सदर वाढीचे कोणतेही कारण देण्यात आलेले नाही.

सदर बाबत अर्ध समास ज्ञापन क्रमांक 52 दिनांक 19/12/2013 अन्वये विचारणा करण्यात आली होती . विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.

वसुलपात्र रक्कम रु .25546

आक्षेपाधीन रक्कम रु. 599200

DATDBWM5801 (Ref No : 142, Hmm No : 52)

## *60 खासदार निधी अंतर्गत प्रभाग क्रमांक 10 मध्ये नाला तयार करणे आणि दुरुस्ती करणे या कामात झालेले रु.84699 चे अतिप्रदान*

**खासदार निधी मधील विकास कामे.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :413-3224 केंद्र शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 84699.00/-

***खासदार निधी अंतर्गत प्रभाग क्रमांक 10 मध्ये नाला तयार करणे आणि दुरुस्ती करणे या कामाच्या देयकातून सामग्री चाचणी अहवाल शुल्क वसुल केलेले नाही. 2010-2011 सालच्या जिल्हा दरसूची नुसार दर पृथक्करण सदर कामाच्या अंदाजपत्रका सोबत प्राप्त झाले नाही. सबब 2010-2011 सालच्या जिल्हा दरसूची नुसार दराची अंदाजपत्रकातील दराबरोबर तुलना केली असता ते जादा असल्याचे दिसून आले. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखासंहिता परीच्छेद क्रमांक 10:01:04 अन्वये मोजमाप पुस्तकातील नोंदी कामाच्या प्रगती प्रमाणे प्रथम कनिष्ट अभियंता आणि त्यानंतर उप अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांनी तारखेनिशी घेवून त्यानंतरच पहिले व त्यापुढील धावत्या देयकावर प्रदान प्रमाणे करणे आवश्यक आहे. नियंत्रक अभियंत्याने मोजमाप पुस्तकाची नियत काळाने तपासणी करून त्यात नोंदविण्यात आलेली सर्व बांधकामे बरोबर असल्याची खात्री करून त्या नंतरच मक्तेदारास प्रदान करणे आवश्यक आहे. मात्र या प्रमाणे तारखेनिशी नोंदी घेतल्या नसल्याचे लेखा परीक्षणात आढळून आले.***

खासदार निधी अंतर्गत प्रभाग क्रमांक 10 नाला तयार करणे आणि दुरुस्ती करणे या कामाच्या देयकाची तपासणी केली असता खालील प्रमाणे लेखा परीक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत.

कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1 कामाचे नाव - प्रभाग क्रमांक 10 नाला तयार करणे आणि दुरुस्ती करणे

2 कामाचे अंदाजपत्रक - रु1000000

3 मक्तेदाराचे नाव - मे महादेव कृपां मजूर कामगार सहकारी संस्था

4 तांत्रिक मंजुरी - 5920दिनांक 13-6-2011

5 कार्यादेश क्रमांक - उमपा/साबावि/काअ/3305 दिनांक 29-09-2011

6 मोजमाप पुस्तक क्रमांक - 3436 पाने क्रमांक 1 ते 9

7 देयकाचा तपशील - प्रमाणक क्रमांक 5009 दिनांक 31 जानेवारी 2012 रु.1000000/-

8 करारनाम्याची तारीख - 29-09-2011

9 काम सुरु केल्याची तारीख - 29-09-2011

10 काम समाप्तीची तारीख - 06-01-2012

11 डी.डी.आर. क्रमांक - 2870 दिनांक 22-09-2011

1. .सदर कामावर वापरलेल्या गौण खनिजा साठी मक्तेदाराच्या देयकातून स्वामित्वधन रक्कम वसुल करण्यात आलेली नाही. खासदार निधी अंतर्गत केलेल्या विकास कामावरील वापरलेल्या गौण खनिजाचा परीच्छेद स्वतंत्र घेण्यात आलेला आहे. 2011-2012 या वर्षाच्या दरसूची प्रमाणे कामासाठी वापरण्यात आलेल्या सामग्रीच्या चाचणी अहवालासाठी ०.50% प्रमाणे वसुली करणे आवश्यक होते. तथापि रु.5000 रक्कम वसुल करण्यात आलेली नाही.

2. खालील सामग्री चे दर 2010-2011 या वर्षाच्या जिल्हा दरसूची पेक्षा (महानगरपालिका क्षेत्रात 5% जादा) अधिक घेतल्याचे दिसून आले. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे. सदर कामाचे दर पृथक्करण लेखा

परीक्षणास प्राप्त झाले नाही.

| अ.क्र. | सामग्रीचे नाव | डी.एस.आर.2010-2011 चे दर +5%वाढ | अंदाजपत्रकात दिलेले दर | फरक | परिमाण | रक्क |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | खोदकाम नरम मुरूम | 94.50 प्र.घ.मी. | 116.50 प्र.घ.मी. | 22 | 88.03 | 1936 |
| 2. | सिटू सिमेंट 1:3:6 बेडिंग | 3213 प्र.घ.मी. | 3649 . प्र.घ.मी. | 436 | 103.24 | 4501 |
| 3. | सिटू सिमेंट एम - 10 | 3213 प्र.घ.मी. | 3685 प्र.घ.मी. | 472 | 66.440 | 3135 |
| 4. | एच.वाय.एस.डी. | 39864 . प्र.घ.मी. | 43491 प्र.घ.मी. | 3627 | 0.212 | 768 |
| | | | | | | |
| 5. | एम - 20आर.सी.सी चथ | 6867 . प्र.घ.मी. | 7222 प्र.घ.मी. | 355 | 1.760 | 624 |

वर दर्शविण्यात आल्याप्रमाणे अचूक दराने प्रदान न केल्याने सदर कामात मक्तेदारास रु.84699 चे जादा प्रदान झाले असल्याचे दिसून येते. सबब सदर रकमेची वसुली होणे आवश्यक आहे.

3. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखासंहिता परीच्छेद क्रमांक 10:01:04 अन्वये मोजमाप पुस्तकातील नोंदी कामाच्या प्रगती प्रमाणे प्रथम कनिष्ट अभियंता आणि त्यानंतर उप अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांनी तारखेनिशी घेवून त्यानंतरच पहिले व त्यापुढील धावत्या देयका प्रमाणे करणे आवश्यक आहे नियंत्रक अभियंत्याने मोजमाप पुस्तकाची नियत काळाने तपासणी करून त्यात नोंदविण्यात आलेली सर्व बांधकामे बरोबर असल्याची खात्री करून त्या नंतरच मक्तेदारास प्रदान करणे आवश्यक आहे. मात्र या प्रमाणे तारखेनिशी नोंदी घेतल्या नसल्याचे दिसून आले.

सदर कामाबाबत संबंधित विभागास अर्ध समास ज्ञापन क्रमांक 39 दिनांक 03/12/2013 अन्वये विचारणा करण्यात आली होती. तथापि संबंधित विभागाने कोणतेही उत्तर लेखा परीक्षणास सदर केले नाही.

DATDBWM5801 (Ref No : 146, Hmm No : 39)

## *61 प्रभाग क्रमांक 68 मध्ये नाला बांधणे या कामात जिल्हा दर सूची पेक्षा जादा दर लावल्याने झालेले रु.88298 चे अतिप्रदान*

**दलित वस्ती सुधारणा अंतर्गत विकास कामे**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*केंद्र शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 88298.00/-

***दलित वस्ती सुधारणा अंतर्गत प्रभाग क्रमांक 68 मध्ये नाला बांधणे या कामाच्या दर पृथक्करणाची तपासणी ते उपलब्ध न केल्याने करता आली नाही. 2008-2009 च्या जिल्हा दर सूची मध्ये दिलेल्या दरापेक्षा सदरील कामाच्या अंदाजपत्रकात जादा दर नमूद केल्याने मक्तेदारास जादा रक्कम अदा करण्यात आल्याचे दिसून आले.***

दलित वस्ती सुधारणा अंतर्गत प्रभाग क्रमांक 68 मध्ये पटेल नगर मध्ये नाला बांधणे या कामाच्या देयकाची तपासणी केली असता खालील प्रमाणे लेखा परीक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत.

कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1. कामाचे नाव - प्रभाग क्रमांक 68 मध्ये पटेल नगर मध्ये नाला बांधणे.
2. कामाचे अंदाजपत्रक - रु. 500000
3. मक्तेदाराचे नाव - मे हरे राम मजूर कामगार सहकारी संस्था.
4. तांत्रिक मंजुरी - 2079 दिनांक 3-11-200
5. कार्यादेश क्रमांक - उमपा/साबावि/काअ/2305 दिनांक 27-9-2010
6. मोजमाप पुस्तक क्रमांक -1815 पान क्रमांक 1 ते 6
7. देयकाचा तपशील - प्रमाणक क्रमांक 435 दिनांक 30-04-2011 रु.497897
8. करारनाम्याची तारीख - 27-9-2010
9. काम सुरु केल्याची तारीख 27-9-2010
10. काम समाप्तीची तारीख - 14-01-2011

1. सदर कामावर वापरलेल्या गौण खनिजा साठी मक्तेदाराच्या देयकातून स्वामित्वधन रक्कम वसुल करण्यात आलेली नाही. दलितवस्ती सुधारणाअंतर्गत केलेल्या विकास कामावरील वापरलेल्या गौण खनिजाचा परीच्छेद स्वतंत्र घेण्यात आलेला आहे. सन 2011-2012 या वर्षाच्या डी.एस.आर. प्रमाणे कामासाठी वापरण्यात आलेल्या सामग्रीच्या चाचणी अहवालासाठी ०.50% प्रमाणे वसुली करणे आवश्यक होते. सबब 2500 रक्कम वसुल करण्यात आलेली नाही.

2. सदर कामाच्या प्राकलनासोबत दर पृथक्करण दिलेले नसल्याने त्याची तपासणी करता आली नाही. 2008-2009 च्या जिल्हा दर सूचीतील दरापेक्षा (5% अधिक दर घेवून सुद्धा) खाली दर्शविल्या प्रमाणे अधिक रक्कम मक्तेदारास अदा केल्याचे दिसून आले. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | सामग्रीचे नाव | डी.एस.आर.2008 - 2009 चे दर +5%वाढ | अंदाजपत्रकात दिलेले दर | फरक | परिमाण | रक्क |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पी.सी.सी.1:3:4 बेडिंग पाया | 2928 प्र.घ.मी. | 3397 प्र.घ.मी. | 469 प्र.घ.मी. | 28.79 प्र.घ.मी. | 135 |
| 2 | आर.सी.सी. येच आर पांईप 450एमएम. | 101 प्र.घ.मी. | 310 प्र.घ.मी. | 209 प्र.घ.मी. | 76 प्र.घ.मी. | 158 |
| 3. | पी.सी.सी.एम 10 | 2928 प्र.घ.मी. | 3464.90 प्र.घ.मी. | 536.90 प्र.घ.मी. | 93.47 प्र.घ.मी. | 501 |
| 4. | सिमेंट प्लास्टर | 66 प्र.घ.मी. | 91.39 प्र.घ.मी. | 25.39 प्र.घ.मी. | 245.27 प्र.घ.मी. | 622 |
| एकूण रक्कम रु.85798 | | | | | | |

वर दाखविण्यात आल्याप्रमाणे मक्तेदारास रु.88298 जादा प्रदान झाल्याचे दिसून येते. सदर रकमेची वसुली संबधित मक्तेदाराकडून होणे आवश्यक आहे.

3. सदर कामाची नोंद महाराष्ट्र नगर पालिका लेखा संहिता 1971 नियम क्रमांक 182 नुसार नमुना 139 या विहित प्रपत्रात घेण्यात आलेली नाही.

4. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग लेखासंहिता परीच्छेद क्रमांक 10:01:04 अन्वये मोजमाप पुस्तकातील नोंदी कामाच्या प्रगती प्रमाणे प्रथम कनिष्ट अभियंता आणि त्यानंतर उप अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांनी तारखेनिशी घेवून त्यानंतरच पहिले व त्यापुढील धावत्या देयका प्रमाणे प्रदान करणे आवश्यक आहे. नियंत्रक अभियंत्याने मोजमाप पुस्तकाची नियत काळाने तपासणी करून त्यात नोंदविण्यात आलेली सर्व बांधकामे बरोबर असल्याची खात्री करून त्या नंतरच मक्तेदारास प्रदान करणे आवश्यक आहे. मात्र या प्रमाणे तारखेनिशी नोंदी घेतल्या जात नसल्याचे दिसून आले.

5. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम क्रमांक 167(2) नुसार मूळ अंदाजा पेक्षा 10% पेक्षा अधिक वाढ झाल्यास त्यासाठी सुधारित अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक आहे. सदर कामाच्या प्रत्यक्ष काम केल्याच्या विवरण पत्रात अंदाजपत्रकात नमूद केलेल्या प्रत्येक बाबींमध्ये फरक दाखविण्यात आला आहे. काही बाबी मध्ये बचत तर काही बाबी मध्ये आधिक्य झालेले आहे. सदर वाढ/घट चे कोणतेही कारण देण्यात आलेले नाही. अंदाजपत्रकाची रक्कम तीच ठेवण्यात आलेली असली, तरी बाब निहाय वाढ किवा घट चे स्पष्टीकरण

आवश्यक आहे.

सदर बाबत अर्ध समास ज्ञापन क्रमांक 57 दिनांक 19/12/2013 अन्वये संबंधित विभागास विचारणा करण्यात आली होती. विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.

वसुलपात्र रक्कम रु. 88298

DATDBWM5801 (Ref No : 147, Hmm No : 57)

## *62 प्रभाग क्रमांक 71 तानाजी नगर येथे 22 सिट्सच्या शौचालयाचे शिल्लक राहिलेले काम करण्याच्या कामात झालेले अतिप्रदान रु. 121912*

**महाराष्ट्र महानगर प्रादेशिक विभागाअंतर्गत (एम.एम.आर.) वस्तीस्वछतागृह बांधणे. एम.एम.आर अभियान**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1815901.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 121912.00/-

***सदर कामावर तीन धावत्या देयकावर रु.1721883 खर्च झालेला दाखविण्यात आला आहे. मात्र त्याचा तपशील चौथ्या देयकाच्या मोजमाप पुस्तकात उपलब्ध झाला नाही. सदर देयकात रु.1815901 या रकमेतून रु.1721883 अग्रिम म्हणून वजा केलेले आहेत. 2008-2009 च्या जिल्हा दरसूची अन्वये तयार केलेल्या दर पृथक्करण व प्रत्यक्षात दिलेल्या दरात तफावत असल्याचे दिसून आले. मक्तेदाराने स्वामित्वधन भरल्याची खात्री न करता प्रदान करण्यात आले आहे. . खोदकाम केल्यापेक्षा जादा परिमाण वाहतूक केल्याचे लेखापरीक्षणात दिसून आले.***

एम.एम.आर.(वस्ती स्वच्छतागृह) अभियानअंतर्गत तानाजी नगर येथे 22 सिटसचे टॉयलेट बांधण्याच्या शिल्लक कामाच्या देयकाचे लेखापरिक्षण केले असता खालील प्रमाणे लेखा परिक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत.

कामाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

1) कामाचे नाव : प्रभाग क्रमांक 71, तानाजी नगर येथे 22 सिटसचे टॉयलेटचे शिल्लक राहिलेले काम करणे

2) अंदाजपत्रक : रूपये 20,54,376

3) मक्तेदाराचे नाव : जय दुर्गा माँ महिला ग्राहक सहकारी संस्था लिमिटेड

4) प्रशासकीय मंजूरी : 407:34, दिनांक 30.11.2007

5) तांत्रिक मंजूरी : 395, दिनांक 20.05.2010

6) कार्यादेश क्रमांक : युएमसी/सवावि/निर्मल/156, दिनांक 19.04.2010 आब

7) प्रमाणक क्रमांक व दिनांक : 1323 दिनांक 21.06.2011 रूपये 8,17,957

8) मोजमाप पुस्तक क्रमांक : 1554

1) सदर कामावर तिन धावत्या देयकावर रूपये 17,21,883 खर्च दाखविण्यात आला आहे. त्याचा तपशिल मोजमाप पुस्तकात उपलब्ध नसल्याचे दिसून आले. चौथ्या धावत्या देयकामध्ये एकूण देय रक्कम रूपये 18,15,901 दाखविण्यात येवून रूपये 17,21,883 अग्रीम प्रदान असे नमुद केले आहे. सदर खर्चाचा तपशिल लेखा परिक्षणास उपलब्ध करण्यात आला नाही.

2) पूर्वीची वस्तीशौचालये पाया पर्यंत पाडणे असे अंदाजपत्रकातील बाब क्रमांक 2 मध्ये नमुद केलेले आहे. सबब खोदकाम करण्याचे प्रयोजन स्पष्ट करण्यात आले नाही. त्यामुळे सदर बाबीवरील प्रत्येक काम निहाय रूपये 4501 जादा झाल्याचे दिसून येते. याबाबत प्रत्येक प्रकरणी तपासणी करून अतिप्रदान रक्मेची वसुली संबंधित मक्तेदाराकडून करण्यात यावी.

3) प्रमाणक क्रमांक 1323, दिनांक 21.06.2011 रूपये 8,17,957 आहे. प्रत्यक्षात देयक रूपये 94,462 चे असल्याचे दिसून आले. मक्तेदारास रूपये 7,23,495 ने प्रदान जादा झाले किंवा कसे याबाबत योग्य तो खुलासा करण्यात आला नाही.

4) पाण्याच्या जोडणीसाठी अंदाजपत्रकात रूपये 69,500 तरतुद करण्यात आली आहे. प्रत्यक्षात मक्तेदारास रूपये 95,874 चे प्रदान करण्यात आले आहे. रूपये 26,304 चे जादा प्रदान करण्याचे प्रयोजन स्पष्ट करण्यात आले नाही.

5) सदर कामाच्या अंदाजपत्रकातील बाब क्रमांक 1,34,49,68,70,71,72,73,74,75 चे दर जिल्हा दर सूचीमध्ये समाविष्ट नसल्याने त्यासाठी निविदा किंवा दरपत्रके प्राप्त करून दर करार तयार करणे आवश्यक होते. मात्र अशा प्रकारे निविदा किंवा दर पत्रके प्राप्त केल्याचे दिसून आले नाही.

6) 2008-2009 च्या जिल्हा दर सूची अन्वये तयार केलेल्या दर पृथक्करण व अंदाजपत्रकातील दरामध्ये खालील प्रमाणे तफावत असल्याचे दिसून आले.

| **अ.क्र** | **कामाचे नाव** | **जिल्हादर सूची दर** | **अंदाजपत्रकातील दर** | **फरक** | **परिमान** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कडक मुरूमात खोदकाम | 553.35 प्र.घ.मि. | 563.35 प्र.घ.मि. | 10 | 4.21 | 42 |
| 2 | दगड विटाचे तुकडे पुरविणे | 453.23 प्र.घ.मि. | 465.30 प्र.घ.मि. | 12.07 | 14.16 | 171 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 3 | सिटू सिमेंट एम-25 | 3817.00 प्र.घ.मि. | 3884.50 प्र.घ.मि. | 67.07 | 36.73 | 2479 |
| 4 | सिटू सिमेंट कॉलम | 5235.00 प्र.घ.मि. | 5391.10 प्र.घ.मि. | 156.10 | 3.11 | 485 |
| 5 | सिटू सिमेंट बिम | 5343.96 प्र.घ.मि. | 5500.70 प्र.घ.मि. | 156.74 | 3.89 | 152 |
| 6 | सिट सिमेंट स्लॅब | 5680.96 प्र.घ.मि. | 5902.10 प्र.घ.मि. | 229.14 | 4.71 | 1012 |
| 7 | सेकंड बी मेशनरी 1.4 | 3138.41 प्र.चौ.मी. | 3220.80 प्र.चौ.मी. | 82.39 चौ.मी | 57.66 चौ.मी. | 4751 |
| 8 | रिइन्फोर्स जाळी 50 एम.एम | 407.11 प्र.चौ.मी. | 415.10 प्र.चौ.मी. | 7.99 चौ.मी | 43.09 चौ.मी | 350 |
| 09 | वॉटर प्रुफ प्लास्टर | 176.95 प्र.चौ.मी. | 185.35 प्र.चौ.मी. | 8.40 | 154.59 | 1297 |
| 10 | 6 एम.एम.जाडी | 68.15 प्र.चौ.मी. | 95.90 प्र.चौ.मी. | 29.75 | 111.90 | 3329 |
| 11 | 12 एम.एम.जाडी | 99.51 प्र.चौ.मी. | 125.00 प्र.चौ.मी. | 25.49 | 203.92 | 5198 |
| 12 | वाळू प्लास्टर | 264.37 प्र.चौ.मी. | 277.65 प्र.चौ.मी. | 13.28 | 477.91 | 6347 |
| 13 | सिरॅमिक टाईल्स | 770.68 प्र.चौ.मी. | 779.82 प्र.चौ.मी. | 9.14 | 240.22 | 2195 |
| | | | | | **एकूण** | **27838** |

वरील प्रमाणे सर्व कामाच्या देयकाची पून: तपासणी करून अतिप्रदान रक्कमेची परिगणना करून त्याची वसुली संबंधितांकडून करण्यात यावी.

7) सदर कामाचे खोदकामाचे परिमाण 28.94.घ.मि.असतांना वाहतुक 340.74 घ.मि. दाखविण्यात आलेले आहे. सबब जादा वाहतुक केलेल्या 311.80 घ.मि. चे रूपये 82.10 चौ.घ.मि. प्रमाणे रूपये 25,598 चे जादा प्रदान झालेले आहे.

8) सदर कामावर 596.753 घनमिटर वाळू, खडी, इत्यादी गौण खनिजाचा वापर करण्यात आलेला आहे. फेब्रुवारी 2010 नंतरच्या कार्यादेशावर महसुल आणि वन विभागाच्या दिनांक 10.02.2012 च्या

अधिसूचनेनुसार रूपये 70.67 प्रति घनमिटर प्रमाणे रूपये 42,172 स्वामित्वधन रक्कम मक्तेदाराकडून वसुल करण्यात आलेली नाही.

सदर बाबत संबंधित विभागास अर्ध समास ज्ञापन क्रमांक 184 दिनांक 14/02/2014 अन्वये विचारणा करण्यात आले होती. विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.

वसुलपात्र रक्कम रु. 121912

आक्षेपाधीन रक्कम रु.1815901

DATDBWM5801 (Ref No : 155, Hmm No : 184)

## *63 कम्पाउंड भिंत तयार करणे या कामातील त्रुटी आणि त्यात झालेले अतिप्रदान रु.90634*

**खासदार निधी अंतर्गत करण्यात आलेली विकास कामे.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :413-3224 केंद्र शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 90634.00/-

| |
|---|
| ***खासदार निधी अंतर्गत कम्पाउंड भिंत तयार करणे या कामासाठी मक्तेदाराने विलंब केल्याने त्याच्या कडून करारनाम्या मध्ये नमूद केल्या प्रमाणे दंडाची रक्कम मक्तेदाराच्या देयकातून वसुल करण्यात आली नाही. या कामात एकूण 625 दिवस विलंब झालेला आहे. मात्र त्यापोटी दंडाची रक्कम रु. 31250 मक्तेदाराच्या देयकातून वसुल करण्यात आलेली नाही. करारनामा दिनांक 04-08-2009 रोजी झालेला असताना मक्तेदाराने दिनांक 2-8-2011 च्या पत्राने विलंब माफ करण्याबाबत विनंती केल्याचे आणि त्याप्रमाणे म.न.पां. ने विलंब माफ केल्याचे दिसून आले. पाणी पुरवठ्याच्या जोडण्या टाकावयाच्या होत्या आणि काही सामग्रीचे दर वाढलेले होते ही मक्तेदाराने दिलेली करणे समर्थनीय दिसून येत नाहीत. कामाचे आदेश देण्यापूर्वी या सर्व बाबीचा विचार होणे आवश्यक होते. सबब मक्तेदाराकडून रु. 31250 ची वसुली होणे आवश्यक आहे तसेच सदर कामाचे दर पृथक्करण लेखा परीक्षणास प्राप्त झाले नाही. 2009-2010 च्या जिल्हा दर सूची पेक्षा जादा दर अंदाजपत्रकात लावल्याने मक्तेदारास जादा प्रदान झाले आहे.*** |

खासदार निधी अंतर्गत कम्पाउंड भिंत तयार करणे या कामाच्या देयकाची तपासणी केली असता खालील

प्रमाणे लेखा परीक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत. कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1. कामाचे नाव - कम्पाउंड भिंत तयार करणे
2. कामाचे अंदाजपत्रक - रु. 599200
3. मक्तेदाराचे नाव - मे. जवाहर मजूर कामगार सहकारी संस्था.
4. तांत्रिक मंजुरी - 3105, दिनांक 4-8-09
5. कार्यादेश क्रमांक - उमपा/साबावि/काअ/1653, दिनांक 21-12200
6. मोजमाप पुस्तक क्रमांक - 3165 पाने 1 ते 8
7. करारनाम्याची तारीख - 04-08-2009
8. काम सुरु केल्याची तारीख- 04-08-20
9. काम समाप्तीची तारीख - 18-08-2011
10. देयकाचा तपशील - प्रमाणक क्रमांक 4325 दिनांक 22/12/2011 रु.599200

1. सदर कामावर वापरलेल्या गौण खनिजा साठी मक्तेदाराच्या देयकातून स्वामित्वधन रक्कम वसुल करण्यात आलेली नाही. खासदार निधी अंतर्गत केलेल्या विकास कामावरील वापरलेल्या गौण खनिजाचा परीच्छेद स्वतंत्र घेण्यात आलेला आहे. 2011-2012 या वर्षाच्या दरसूची प्रमाणे कामासाठी वापरण्यात आलेल्या सामग्रीच्या चाचणी अहवालासाठी 0.50% प्रमाणे वसुली करणे आवश्यक होते. परंतु रु.2996 रक्कम वसुल करण्यात आलेली नाही.

2. सदरील कामाचा करारनामा दिनांक 4-8-2009 रोजी करण्यात आलेला असून त्यातील अटीप्रमाणे सदर काम दिनांक 1/12/2009 रोजी पूर्ण होणे आवश्यक होते. मात्र ते दिनांक 18-8-2011 रोजी पूर्ण झाले. म्हणजेच या कामात एकूण 625 दिवस विलंब झालेला आहे. मात्र त्यापोटी दंडाची रक्कम रु. 31250 मक्तेदाराच्या देयकातून वसुल करण्यात आलेली नाही. करारनामा दिनांक 04-08-2009 रोजो झालेला असताना मक्तेदाराने दिनांक 2-8-2011 च्या पत्राने विलंब माफ करण्याबाबत विनंती केल्याचे आणि त्याप्रमाणे म.न.पां. ने विलंब माफ केल्याचे दिसून आले. पाणी पुरवठ्याच्या जोडण्या टाकावयाच्या होत्या आणि काही सामग्रीचे दर वाढलेले होते ही त्याने दिलेली करणे समर्थनीय दिसून येत नाहीत. कामाचे आदेश देण्यापूर्वी या सर्व बाबीचा विचार होणे आवश्यक होते. सबब मक्तेदाराकडून रु.31250 ची वसुली होणे आवश्यक आहे

3. खालील सामग्री चे दर 2010-2011 या वर्षाच्या दरसूची पेक्षा (महानगरपालिका क्षेत्रात 5% जादा घेवून सुद्धा) जादा घेतल्याचे दिसून आले. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे. सदर कामाचे दर पृथक्करण लेखा परीक्षणास प्राप्त झाले नाही.त्यामुळे सदर कामाच्या प्रत्येक बाबीच्या लीड बाबत माहिती प्राप्त झाली नाही.

| अ.क्र. | सामग्रीचे नाव | डी.एस.आर.2010-2011 चे दर +5%वाढ | अंदाजपत्रकात दिलेले दर | फरक | परिमाण | रक्क |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सिटू सिमेंट 1:3:6 | 2928 प्र.घ.मी. | 3397 प्र.घ.मी. | 469 | 9.165 | 429 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 2.. | एम -15 | 3744.30 प्र.घ.मी. | 4143.50 प्र.घ.मी. . | 399.20 | 60.72 | 24239 |
| 3. | वाळू प्लास्टर | 215.25 चौ.फु. | 274.90 चौ.फु. | 59.65 | 466.95 | 27853 |
| | | | | | | |
| | | | | | एकूण रक्कम रु. | 56388 |

वर दाखविण्यात आल्याप्रमाणे सदर कामात मक्तेदारास रु.90634चे जादा प्रदान झाले आहे. सदर रकमेची वसुली होणे आवश्यक आहे.

4. सदर कामाची नोंद महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम क्रमांक 182 नुसार नमुना 139 या विहित प्रपत्रात घेण्यात आलेली नाही.

5.. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखासंहिता परीच्छेद क्रमांक 10:01:04 अन्वये मोजमाप पुस्तकातील नोंदी कामाच्या प्रगती प्रमाणे प्रथम कनिष्ट अभियंता आणि त्यानंतर उप अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांनी तारखेनिशी घेवून त्यानंतरच पहिले व त्यापुढील धावत्या देयका प्रमाणे प्रदान करणे आवश्यक आहे. नियंत्रक अभियंत्याने मोजमाप पुस्तकाची नियत काळाने तपासणी करून त्यात नोंदविण्यात आलेली सर्व बांधकामे बरोबर असल्याची खात्री करून त्या नंतरच मक्तेदारास प्रदान करणे आवश्यक आहे. मात्र याप्रमाणे तारखेनिशी नोंदी घेतल्या जात नसल्याचे दिसून आले

सदर बाबत अर्ध समास ज्ञापन क्रमांक 42 दिनांक 3/12/2013 अन्वये संबंधित विभागास विचारणा करण्यात आली होते. विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.

वसुल पात्र रक्कम 90634

DATDBWM5801 (Ref No : 156, Hmm No : 42)

## *64 खासदार निधी अंतर्गत प्रभाग क्रमांक 60 मध्ये फूट पाथ रस्ता तयार करण्याच्या कामामध्ये झालेले रु. 72707 चे नुकसान*

**खासदार निधी अंतर्गत विकास कामे.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :413-3224 केंद्र शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 72707.00/-

***खासदार निधी अंतर्गत प्रभाग क्रमांक 60 मध्ये फूट पाथ रस्ता तयार करणे या कामाची सुरुवात दिनांक 25-01-2010 रोजी झालेली असून ते 120 दिवस म्हणजेच दिनांक 25-5-2010 रोजो पूर्ण होणे आवश्यक होते. तथापि ते दिनांक 26-6-2011 रोजो पूर्ण झाल्याने करारनाम्यातील अटी व शर्ती नुसार प्रति दिन रु.50 प्रमाणे दंड मक्तेदाराच्या देयकातून वसुल करणे आवश्यक होते. 489 दिवस विलंब केल्याने त्याच्या कडून रु.24450 वसुल केले नाही. 2009-2010 या वर्षाच्या दर सूची पेक्षा जादा दर लावल्याने अतिप्रदान झाले आहे.***

खासदार निधी अंतर्गत प्रभाग क्रमांक 60 फूट पाथ रस्ता तयार करणे या कामाच्या देयकाची तपासणी केली असता खालील प्रमाणे लेखा परीक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत.

कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1. कामाचे नाव - प्रभाग क्रमांक 60 फूट पाथ रस्ता तयार करणे.
2. कामाचे अंदाजपत्रक - रु. 800000
3. प्रमाणक क्रमांक - 4327 दिनांक 2-12-2011
4. मक्तेदाराचे नाव - मे राहुल मजूर कामगार सहकारी संस्था
5. तांत्रिक मंजुरी - 3180 दिनांक 21/08/2009
6. कार्यादेश क्रमांक - उमपा/साबावि/काअ/1654 दिनांक 25-1-2010
7. मोजमाप पुस्तक क्रमांक - 3164
8 .करारनाम्याची तारीख - 25-1-2010
9. काम सुरु केल्याची तारीख - 25-1-2010
10. काम समाप्तीची तारीख - 26-09-201

डी.डी.आर. क्रमांक - 4298 दिनांक 21-12-2009

1) सदर कामावर वापरलेल्या गौण खनिजा साठी मक्तेदाराच्या देयकातून स्वामित्वधन रक्कम वसुल करण्यात आलेली नाही. खासदार निधी अंतर्गत केलेल्या विकास कामावरील वापरलेल्या गौण खनिजाचा परीच्छेद स्वतंत्र घेण्यात आलेला आहे. सन 2011-2012या वर्षाच्या दरसूची प्रमाणे कामासाठी वापरण्यात आलेल्या सामग्रीच्या चाचणी अहवालासाठी 0.50% प्रमाणे वसुली करणे आवशक होते. परंतु रु.3988 रक्कम वसुल करण्यात आलेली नाही.

2) सदर कामाची सुरुवात दिनांक 25-01-2010 रोजी झालेली असून ते 120 दिवस म्हणजेच दिनांक 25-05-2010 रोजो पूर्ण होणे आवश्यक होते तथापि ते दिनांक 26-06-2011 रोजो पूर्ण झाल्याने करारनाम्यातील अटी व शर्थी नुसार प्रति दिन रु.50 या प्रमाणे दंड मक्तेदाराच्या देयकातून वसुल करणे आवश्यक होते. ठेकेदाराने एकूण 489 दिवस विलंब केल्याने त्याच्याकडून रु. 24450 वसुल करावयास हवे होते. परंतु ते न केल्याने सदरील वसुली करणे आवश्यक आहे.

3) खालील सामग्री चे दर 2009-2010 या वर्षाच्या दरसूची पेक्षा (महानगरपालिका क्षेत्रात 5% जादा) जादा

घेतल्याचे दिसून आले. सदर कामाचे दर पृथक्करण लेखा परीक्षणास सादर केले नाही. कामाच्या बाब निहाय किती लीड देण्यात आला, याची तपासणी करता आली नाही. मात्र वाळू चे दर पृथक्करण करताना ती महाड वरून आणण्यात येत असल्याचे मौखिक अवगत केले. मात्र सामग्री ज्या ठिकाणावरून आणली जात आहे त्या ठिकाणा ची संबंधित कागदपत्रे, चलने किवा इतर कोणताही अभिलेख लेखा परीक्षणास उपलब्ध करण्यात आला नाही. त्यामुळे 2009-2010 च्या जिल्हा दरसूची तील दर आणि कामाचे अंदाजपत्रक यांची तुलना करून खाली दाखविल्याप्रमाणे जादा दर आकारून अंदाजपत्रक तयार केल्याचे दिसून आले. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | सामग्रीचे नाव | डी.एस.आर.2009 2010 चे दर +5वाढ | अंदाजपत्रकात दिलेले दर | फरक | परिमाण | रक्क |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | खोदकाम कडक मुरूम | 105 प्र.घ.मी. | 232.05 प्र.घ.मी. | 127.05 | 175.06 | 222 |
| 2 | 15 ते 25से.मी. रबल | 448 . प्र.घ.मी. | 457.25 प्र.घ.मी. | 9.25 | 150.34 | 139 |
| 3. | पी.सी.सी.1:3:6 एम -10 | 3074 . प्र.घ.मी. | 3397 . प्र.घ.मी. | 323 | 46.22 | 149 |
| 4 | येच.वायएस डी | 4518 मे.टन | 56382 मे.टन . | 11195 | 0.51 | 570 |
| एकूण रक्कम :- 44269 | | | | | | |

वर दाखविण्यात आल्याप्रमाणे सदर कामात मक्तेदारास 72707 चे जादा प्रदान झाले असल्याचे दिसून येते. सबब सदर रकमेची वसुली होणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखासंहिता परीच्छेद क्रमांक 10:01:04 अन्वये मोजमाप पुस्तकातील नोंदी कामाच्या प्रगती प्रमाणे प्रथम कनिष्ट अभियंता आणि त्यानंतर उप अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांनी तारखेनिशी घेवून त्यानंतरच पहिले व त्यापुढील धावत्या देयका प्रमाणे प्रदान करणे आवश्यक आहे. नियंत्रक अभियंत्याने मोजमाप पुस्तकाची नियत काळाने तपासणी करून त्यात नोंदविण्यात आलेली सर्व बांधकामे बरोबर असल्याची खात्री करून त्या नंतरच मक्तेदारास प्रदान करणे आवश्यक आहे. मात्र या प्रमाणे तारखेनिशी नोंदी घेतल्या जात नसल्याचे दिसून आले

5) सदर कामाची नोंद महाराष्ट्र नगर परिषद लेख संहिता 1971 मधील नियम क्रमांक् 182 नुसार नमुना 139 या विहित प्रपत्रात ठेवण्यात आलेली दिसून आलेली नाही.

6) पेवर ब्लॉक च्या दराचे दर पृथक्करण उपलब्ध झाले नाही. त्यामुळे सदर बाबीच्या दाराची तपासणी करता आली नाही.

सदर बाबत संबंधित विभागास अर्ध समास ज्ञापन क्रमांक 45 दिनांक 03/12/2013 अन्वये विचारणा करण्यात आली होती. विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.
वसुलपात्र रक्कम रु. 72707

DATDBWM5801 (Ref No : 157, Hmm No : 45)

### *65 प्रभाग क्रमांक 40 शिवसेना कार्यालय ते आझादनगर मध्ये पेवर ब्लॉक बसविण्याच्या कामावर झालेले अतिप्रदान रु. 76344*

**दलित वस्ती सुधारणा**
**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*केंद्र शासन निधी*
*अनियमितता कलम : 9ब*
आक्षेपाधीन रक्कम रु. 76344.00/-

***दलित वस्ती योजने अंतर्गत प्रभाग क्रमांक 40 शिवसेना कार्यालय ते आझादनगर मध्ये पेवर ब्लॉक बसविण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकात 2008-2009 च्या जिल्हा दरसूची पेक्षा जादा दर लावल्याने उल्हास नगर महानगरपालिकेस मक्तेदारास जादा रक्कम अदा करावी लागली. त्याच प्रमाणे सदरील कामाच्या सामग्री साठी गुणवत्ता अहवाल चे शुल्क मक्तेदाराच्या देयकातून वसुल केलेले नाही. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखासंहिता परीच्छेद क्रमांक 10:01:04 अन्वये मोजमाप पुस्तकातील नोंदी कामाच्या प्रगती प्रमाणे प्रथम कनिष्ट अभियंता आणि त्यानंतर उप अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांनी तारखेनिशी घेवून त्यानंतरच पहिले व त्यापुढील धावत्या देयकाप्रमाणे प्रमाणे प्रदान करणे आवश्यक आहे नियंत्रक अभियंत्याने मोजमाप पुस्तकाची नियत काळाने तपासणी करून त्यात नोंदविण्यात आलेली सर्व बांधकामे बरोबर असल्याची खात्री करून त्या नंतरच मक्तेदारास प्रदान करणे आवश्यक आहे. मात्र या प्रमाणे तारखेनिशी नोंदी घेतल्या जात नसल्याचे दिसून आले.***

दलित वस्ती योजने अंतर्गत प्रभाग क्रमांक 40 शिवसेना कार्यालय ते आझादनगर मध्ये पेवर ब्लॉक बसविण्याच्या कामाच्या देयकाची तपासणी केली असता खालील प्रमाणे लेखा परीक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत.

कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1. कामाचे नाव : प्रभाग क्रमांक 40 शिवसेना कार्यालय ते आझादनगर मध्ये पेवर ब्लॉक

बसविणे . .

2. कामाचे अंदाजपत्रक : रु.999500

3. मक्तेदाराचे नाव: मे. महालक्ष्मी मजूर कामगार सहकारी संस्था.

4. तांत्रिक मंजुरी: 3494 दिनांक 17/02/2010

5. कार्यादेश क्रमांक :- उमपा/साबावि/काअ/2296 दिनांक 20/09/2010

6. मोजमाप पुस्तक क्रमांक 3068 पाने 01 ते 09

7. देयकाचा तपशील :- प्रमाणक क्रमांक 1011 दिनांक 03/06/2011 रु.653955

दुसरे धावते देयक प्रमाणक क्रमांक 3206 दिनांक 12-10-2011 रु.351187

. 8. करारनाम्याची तारीख :- 20/09/2010

9. काम सुरु केल्याची तारीख :- 20/09/2010

10. काम समाप्तीची तारीख :- 29/03/2011

11. डी.डी.आर. क्रमांक 3494 दिनांक 07/09/2010

1 सदर कामावर वापरलेल्या गौण खनिजा साठी मक्तेदाराच्या देयकातून स्वामित्वधन रक्कम वसुल करण्यात आलेली नाही. दलितवस्ती सुधारणा अंतर्गत केलेल्या विकास कामावरील वापरलेल्या गौण खनिजाचा परीच्छेद स्वतंत्र घेण्यात आलेला आहे. सन 2011-2012 या वर्षाच्या दरसूची प्रमाणे कामासाठी वापरण्यात आलेल्या सामग्रीच्या चाचणी अहवालासाठी 0.50.% प्रमाणे वसुली करणे आवश्यक होते.परंतु रु 4998 रक्कम वसुल करण्यात आलेली नाही.

2 सदर कामाच्या प्राकलनासोबत दर पृथक्करण दिलेले नसल्याने 2008-2009 च्या जिल्हा दर सूचीतील दरापेक्षा (5% अधिक दर घेवून सुद्धा) खाली दाखविल्या प्रमाणे अधिक रक्कम मक्तेदारास अदा केल्याचे दिसून आले. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | सामग्रीचे नाव | डी.एस.आर.2008 2009 चे दर +5%वाढ | अंदाजपत्रकात दिलेले दर रुपये | फरक | परिमाण | रक्क |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पी.सी.सी.1:3:6 बेडिंग पाया | 2928 प्र.घ.मी. | 3397 प्र.घ.मी. | 469 | 54.26 | 2544 |
| 2.. | पी.सी.सी. येच आर पाईप 300 एम एम डाया | 101 प्र.चौ.मी. | 205 प्र.चौ.मी. | 104 | 240 | 2496 |
| | | | | | | |
| 3. | पी.सी.सी. एम 10 | 2928 | 3464 | 536 | 132.20 | 7085 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | .प्र.घ.मी. | प्र.घ.मी. | | | |
| | | | | | ऐकूण रक्कम | 71346 |

मक्तेदारास वर दाखविण्यात आल्याप्रमाणे दोन धावत्या देयकाअन्वये रु 1005142 चे प्रदान करण्यात आलेले आहे. अंदाजपत्रकात प्रस्तावित केलेल्या बाबनिहाय परीमाणापेक्षा त्यातील बाब क्रमांक 4,5,7,8 मध्ये अनुक्रमे 23,,60,21,104% जादा काम झालेले असून त्याबाबत कोणतेही स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 167(2) अन्वये प्रत्येक कामाच्या बाबीमध्ये 10% पेक्षा जादा फरक पडल्यास त्या साठी योग्य ते स्पष्टीकरण आणि सुधारित अंदाज तयार करणे आवश्यक आहे. मात्र त्याप्रमाणे सुधारित अंदाजपत्रक तयार केल्याचे दिसून आले नाही.

3 वर दाखविण्यात आल्याप्रमाणे सदर कामावर ऐकून रु.76344 रकमेचे जादा प्रदान मक्तेदारास झाले आहे. त्याची वसुली करणे आवश्यक आहे.

4 सदर कामाची नोंद महाराष्ट्र नगर पालिका लेखा संहिता 1971 नियम क्रमांक 182 नुसार नमुना 139 या विहित प्रपत्रात घेण्यात आलेली नाही.

5 महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखासंहिता परीच्छेद क्रमांक 10:01:04 अन्वये मोजमाप पुस्तकातील नोंदी कामाच्या प्रगती प्रमाणे प्रथम कनिष्ट अभियंता आणि त्यानंतर उप अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांनी तारखेनिशी घेवून त्यानंतरच पहिले व त्यापुढील धावत्या देयका प्रमाणे करणे आवश्यक आहे. नियंत्रक अभियंत्याने मोजमाप पुस्तकाची नियतकाळाने तपासणी करून त्यात नोंदविण्यात आलेली सर्व बांधकामे बरोबर असल्याची खात्री करून त्या नंतरच मक्तेदारास प्रदान करणे आवश्यक आहे. मात्र या प्रमाणे तारखेनिशी नोंदी घेतल्या जात नसल्याचे दिसून आले. सदर बाबत संबंधित विभागास अर्ध समास ज्ञापन क्रमांक 55 दिनांक 19-12-2013 अन्वये विचारणा करण्यात आली होती. विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु 76344

DATDBWM5801 (Ref No : 159, Hmm No : 55)

## *66 प्रभाग क्रमांक 8 मध्ये सी.सी. PASSAGE पेवर ब्लॉक टाकणे या कामात झालेले अतिप्रदान रु.46021*

**दलितवस्ती सुधारणा**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*केंद्र शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 667355.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 46021.00/-

***दलित वस्ती सुधारणा अंतर्गत प्रभाग क्रमांक 8 मध्ये सी.सी .passage , पेवर ब्लॉक टाकणे या कामाच्या देयकाची तपासणी केली असता सदर कामाचे दर पृथक्करण लेखा परीक्षणास उपलब्ध झालेले नाही. 2008-2009 च्या जिल्हा दरसूचीतील दरापेक्षा जादा दाराचे अंदाजपत्रक तयार करण्यात आल्याचे दिसून आले. परिणामी उल्हासनगर महानगरपालिकेस जादा रक्कम अदा करावी लागली. 60 एम एम जाडीच्या हेवी ड्यूटी इंटर लॉक पेवर ब्लॉक चे दर पृथक्करण प्राप्त झाले नसल्याने सदर बाबीच्या दराची तपासणी करता आली नाही. मोजमाप पुस्तकातील नोंदी कार्यादेश दिल्यानंतर तारखेनिशी घेण्यात आलेल्या नाहीत.***

दलित वस्ती सुधारणा अंतर्गत प्रभाग क्रमांक 8 मध्ये सी.सी. pyePASSAGE, पेवर ब्लॉक टाकणे या कामाच्या देयकाची तपासणी केली असता खालील प्रमाणे लेखा परीक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत.

कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

कामाचे नाव - प्रभाग प्रभाग क्रमांक 8 मध्ये सी.सी. PASSAGE पेवर ब्लॉक टाकणे
कामाचे अंदाजपत्रक - रु. 998900
मक्तेदाराचे नाव - मे प्रभा मजूर कामगार सहकारी संस्था.
तांत्रिक मंजुरी - 2049 दिनांक 03/11/2008
कार्यादेश क्रमांक : उमपा/साबावी/काअ/2303 दिनांक 27/09/2010
मोजमाप पुस्तक क्रमांक 2031 पान क्रमांक 1 ते 12
देयकाचा तपशील :- प्रमाणक क्रमांक 2047 दिनांक 8/8/2011 रु.244883
करारनाम्याची तारीख :- 27/9/2010
काम सुरु केल्याची तारीख 27/09/2010
समाप्तीची तारीख :- 05/03/2011
डी.डी.आर. क्रमांक आणि दिनांक 2359/26/08/2010

1.सदर कामावर वापरलेल्या गौण खनिजा साठी मक्तेदाराच्या देयकातून स्वामित्वधन रक्कम वसुल करण्यात आलेली नाही. दलितवस्ती सुधारणा अंतर्गत केलेल्या विकास कामावरील वापरलेल्या गौण खनिजाचा परीच्छेद स्वतंत्र घेण्यात आलेला आहे. सन 2011-2012 या वर्षाच्या दरसूची प्रमाणे कामासाठी वापरण्यात आलेल्या सामग्रीच्या चाचणी अहवालासाठी 0.50% प्रमाणे वसुली करणे आवश्यक होते. परंतु रु.4995 रक्कम वसुल करण्यात आलेली नाही.

2. सदर कामाच्या प्राकलनासोबत दर पृथक्करण दिलेले नसल्याने सन 2008-2009 च्या जिल्हा दर सूचीतील दरापेक्षा (5% अधिक दर घेवून सुद्धा) खाली दर्शविल्या प्रमाणे अधिक रक्कम मक्तेदारास अदा केल्याचे दिसून आले. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | सामग्रीचे नाव | डी.एस.आर.2008 2009 चे दर +5%वाढ | अंदाजपत्रकात दिलेले दर | फरक | परिमाण | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पी.सी.सी.1:3:6 बेडिंग पाया | 2928 .चौ.घ.मी. | 3235 चौ.घ.मी. | 307 | 74.66 | 22920 |
| 2 | आर.सी.सी. येच आर पांईप 450एम एम. | 101 चौ..घ.मी. | 195 चौ.घ.मी. | 94 | 134 | 12596 |
| 3 | पी.सी.सी.एम 10 | 2928 चौ.घ.मी | 3307 चौ.घ.मी | 379 | 13.61 | 5158 |
| 4. | 80/100एम.एम. मेटल चा PURVATHAQ पुरवठा | 261 चौ.घ.मी | 280.53 चौ.घ.मी - | 19.53 | 18 | 352 |
| ऐकून रक्कम 41026 | | | | | | |

वर दाखविण्यात आल्याप्रमाणे मक्तेदारास रु 46021 जादा अदा झाल्याचे दिसून येते. सदर रकमेची वसुली संबधित मक्तेदाराकडून होणे आवश्यक आहे.

3. सदर कामाची नोंद महाराष्ट्र नगर पालिका लेखा संहिता 1971 नियम क्रमांक 182 नुसार नमुना 139 या विहित प्रपत्रात घेण्यात आलेली नाही.

4 महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखासंहिता परीच्छेद क्रमांक 10:01:04 अन्वये मोजमाप पुस्तकातील नोंदी कामाच्या प्रगती प्रमाणे प्रथम कनिष्ट अभियंता आणि त्यानंतर उप अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांनी तारखेनिशी घेवून त्यानंतरच पहिले व त्यापुढील धावत्या देयका प्रमाणे प्रदान करणे आवश्यक आहे नियंत्रक अभियंत्याने मोजमाप पुस्तकाची नियत काळाने तपासणी करून त्यात नोंदविण्यात आलेली सर्व बांधकामे बरोबर असल्याची खात्री करून त्या नंतरच मक्तेदारास प्रदान करणे आवश्यक आहे. मात्र या प्रमाणे तारखेनिशी नोंदी घेतल्या नसल्याचे दिसून आले.

5. ६० एम एम जाडी हेवी ड्यूटी इंटर लॉक पेवर ब्लॉक चे दर 2008-2009 च्या जिल्हा दर सूची मध्ये नमूद नसल्याने त्यासाठी निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक होते. सबब सदर बाबीचे दर पृथक्करण प्राप्त झाले नसल्याने सदर बाबीच्या दराची तपासणी करता आली नाही.

6 मोजमाप पुस्तकातील नोंदी अपूर्ण असल्याचे दिसून आले. सदर कामाचे अंदाजपत्रक रु. 998900 चे होते मात्र मोजमाप पुस्तकात रु. 331545 च्या कामाची नोंद घेतल्याचे दिसून आले. सदर बाबत योग्य तो खुलासा करण्यात आला नाही.

सदर बाबत संबंधित विभागास अर्ध समास ज्ञापन क्रमांक 51 दिनांक 19/12/2013 अन्वये विचारणा करण्यात आली होती. विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.

वसुलपात्र रक्कम रु.46021

आक्षेपाधीन रक्कम रु.667355

DATDBWM5801 (Ref No : 160, Hmm No : 51)

## *67 प्रभाग क्रमांक 64 मध्ये आंबेडकर उद्यानात विकास कामात झालेले अतिप्रदान रु.112916.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :413-3224 केंद्र शासनं निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 112916.00/-

***खासदार निधी अंतर्गत प्रभाग क्रमांक 64 मध्ये आंबेडकर उद्यानात विकास कामे करण्याच्या कामाच्या देयकातून सदरील काम विलंबाने केल्याने करारनाम्याच्या अटी व शर्ती प्रमाणे दंडाची रक्कम वसुल केलेली नाही. 2008-2009 च्या जिल्हा दरसूची मध्ये दिलेल्या दरापेक्षा जादा दराचे अंदाजपत्रक तयार केल्याने संबंधित मक्तेदारास अतिप्रदान झालेले आहे. सदर कामाची नोंद नगरपालिका लेखा संहिता प्रमाणे विहित प्रपत्रात घेतलेली नाही. मोजमाप पुस्तकात तारखेनिशी नोंदी घेतलेल्या नाहीत.***

खासदार निधी अंतर्गत प्रभाग क्रमांक 64 मधील आंबेडकर उद्यान मध्ये विकासकामे करण्याच्या कामाच्या देयकाची तपासणी केली असता खालील प्रमाणे लेखा परीक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत.

कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

कामाचे नाव क्रमांक प्रभाग -:64 मधील आंबेडकर उद्यान मध्ये विकासकामे करणे .

कामाचे अंदाजपत्रक रु -:1000000

मक्तेदाराचे नाव.संस्था सहकारी कामगार मयूर .मे -:

तांत्रिक मंजुरी -:3104 दिनांक 4/8/2009

कार्यादेश क्रमांक /काअ/साबावि/उमपा -:1655 दिनांक 25/01/2010

मोजमाप पुस्तक क्रमांक 3168

देयकाचा तपशील प्रमा -:णक क्रमांक 4323 दिनांक 22/12/2011 रु .1000000

करारनाम्याची तारीख -:4/8/2009

काम सुरु केल्याची तारीख -:4/8/2009

काम समाप्तीची तारीख -:26/9/2011

1. सदर कामावर वापरलेल्या गौण खनिजा साठी मक्तेदाराने स्वामित्वधन रक्कम भरणा केल्याची खात्री न करताच प्रदान केले आहे. सन 2011-2012 या वर्षाच्या दरसूची प्रमाणे कामासाठी वापरण्यात आलेल्या सामग्रीच्या चाचणी अहवालासाठी 0.50% प्रमाणे वसुली करणे आवशक होते .परंतु रु 5000 रक्कम मक्तेदाराच्या देयकातून वसुल करण्यात आलेली नाही.

2. सदरील काम दिनांक 23-7-2010 रोजी पूर्ण होने आवश्यक होते. तथापि ते दिनांक 26-09-2011 रोजी पूर्ण झाल्याने ते 430 दिवस विलंबाने पूर्ण करण्यात आले. करारनाम्यातील अटी व शर्तीप्रमाणे प्रतीदिवासाला रु. 50 या प्रमाणे रु. 21500 दंड वसुल करणे आवश्यक होते. मक्तेदाराने दिनांक 2/08/2011 च्या पत्रान्वये म.न.पा स विलंब माफ करण्याची विनंती केली. कार्यादेश दिनांक 25/012010 चे असताना प्रत्यक्ष कामाची सुरुवात त्याप्रमाणे न करता दिनांक 2/08/2011 च्या पत्राने कळविले की पाण्याच्या वाहिन्या टाकण्याचे काम सुरु होते. आणि आवश्यक त्या सामुग्रीचे दर वाढले होते. हि कारणे योग्य व सयुक्तिक नाही.

3. सदर कामाच्या प्राकलनासोबत दर पृथक्करण दिलेले नसल्याने अंदाजपत्रकातील दराची तपासणी करता आली नाही. तथापि, जिल्हा दर सूचीतील दरापेक्षा ( म न पा साठी चे 5% अधिक दर विचारात घेवून सुद्धा ) खाली दाखविल्याप्रमाणे अधिक रक्कम अंदाजपत्रकात दाखवून मक्तेदारास जादा प्रदान केल्याचे दिसून आले.त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे

| अ.क्र. | सामग्रीचे नाव | डी.एस.आर.2008 -09 चे दर +5 % वाढ. | अंदाजपत्रकात दिलेले दर | फरक | परिमाण | रक्क रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पी.सी.सी.1:3:6 बेडिंग पाया | 2928 प्रती घ.मी. | 3397 प्रती घ.मी. | 469 प्रती घ.मी. | 36.73 | 172 |
| 2 | पी.सी.सी. एम.-15 | 3464 प्रती.घ.मी. | 4143.50 प्रती घ.मी. | 679.50 प्रती घ.मी. | 90.39 | 614 |
| 3.. | वाळू प्लास्टर | 243 प्रती घ.मी. | 274.90 प्रती घ.मी. | 31.90 प्रती घ.मी. | 210.37 | 671 |
| 4.. | सिमेंट प्लास्टर | 66.15 प्रती घ.मी. | 91.39 प्रती घ. मी. | 25.24 प्रती घ.मी. | 42.01 | 106 |
| एकूण रक्कम रु 86416 | | | | | | |

वर दाखविण्यात आल्याप्रमाणे मक्तेदारास रु 112916 जादा अदा झाल्याचे दिसून येते.सदर रकमेची वसुली संबंधित मक्तेदाराकडून होणे आवश्यक आहे.

4. सदर कामाची नोंद महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 नियम क्रमांक 182 नुसार नमुना 139 या विहित प्रपत्रात घेण्यात आलेली नाही.

5.महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग लेखासंहिता परिच्छेद क्रमांक 10.1.4 अन्वये मोजमाप पुस्तकातील नोंदी कामाच्या प्रगतीप्रमाणे प्रथम कनिष्ठ अभियंता आणि त्यानंतर उपअभियंता आणि कार्यकारी अभियंता यांनी तारखेनिशी घेऊन त्यानंतरच पहिले व त्यापुढील धावत्या देयकाप्रमाणे प्रदान करणे आवश्यक आहे.नियंत्रक अभियंत्याने मोजमाप पुस्तकाची नियतकाळाने तपासणी करून त्यात नोंदविण्यात आलेली सर्व बांधकामे बरोबर असल्याची खात्री करून त्यानंतरच मक्तेदारास प्रदान करणे आवश्यक आहे.मात्र याप्रमाणे तारखेनिशी नोंदी घेतल्या जात नसल्याचे दिसून आले.सदर कामावर वापरलेले गौण खनिजासाठी स्वामित्वधन रक्कम भरल्याची खात्री न करता प्रदान केले आहे.

सदर बाबत अर्ध समास ज्ञापन क्रमांक 58 दिनांक 19/12/2013 अन्वये संबंधित विभागास विचारणा करण्यात् आली होती. विभगाचे उत्तर अप्राप्त आहे.

वसुल पात्र रु .112916

DATDBWM5801 (Ref No : 161, Hmm No : 58)

## *68 खासदार निधी अंतर्गत शिवसेना कार्यालयासमोर समाज मंदिर तयार करण्याच्या कामात अदा केलेली जादा रक्कम रु. 55193 बाबत.*

**खासदार निधी अंतर्गत विकास कामे.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :413-3224 केंद्र शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 55193.00/-

| |
|---|
| ***खासदार निधी अंतर्गत शिवसेना कार्यालयासमोर समाज मंदिर तयार करण्याच्य कामाची तपासणी केली असता सदर कामाच्या अंदाजपत्रका सोबत दर पृथक्करण (RATE ANALYSIS) दिलेले नसल्याने दराची तपासणी करता आली नाही. परिणामी सन 2010-2011 च्या जिल्हा दरसूची प्रमाणे अंदाजपत्रकातील दराची तपासणी आणि पडताळणी केली असता ते जादा असल्याचे दिसून आले. मोजमाप पुस्तकातील नोंदी तारखेनिशी कनिष्ठ अभियंता ते कार्यकारी अभियंता या प्रमाणे घेतल्या नसल्याचे दिसून आले*** |

खासदार निधी अंतर्गत शिवसेना कार्यालय समोर समाज मंदिर तयार करण्याच्या कामाच्या देयकाची तपासणी केली असता खालील प्रमाणे लेखा परीक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत.

कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1. कामाचे नाव - शिवसेना कार्यालया समोर समाज मंदिर तयार करणे
2. कामाचे अंदाजपत्रक रु.999860
3. मक्तेदाराचे नाव - मे. शिवानी मजूर कामगार सहकारी संस्था.
4. तांत्रिक मंजुरी - 6133/05-09-2011
5. कार्यादेश क्रमांक - उमपा/साबावि/काअ/3500 दिनांक 28-12-2011
6. मोजमाप पुस्तक क्रमांक - 2332 पाने 1ते 6
7. देयकाचा तपशील - पहिले धावते देयक प्रमाणक क्रमांक 5010 आणि दिनांक 31-01-2012 रु.746142 आणि दुसरे धावते देयक प्रमाणक क्रमांक 532 दिनांक 10-05-2012 रु 257895
8. करारनाम्याची तारीख - 28-12-2011
9. काम सुरु केल्याची तारीख - 28-12-2011
10. काम समाप्तीची तारीख - 25-06-2012

1 सदर कामावर वापरलेल्या गौण खनिजा साठी मक्तेदाराच्या देयकातून स्वामित्वधन रक्कम वसुल करण्यात आलेली नाही. खासदार निधी अंतर्गत केलेल्या विकास कामावरील वापरलेल्या गौण खनिजाचा परीच्छेद स्वतंत्र घेण्यात आलेला आहे. सन 2011-2012 या वर्षाच्या दरसूची प्रमाणे कामासाठी वापरण्यात आलेल्या सामग्रीच्या चाचणी अहवालासाठी ०.50% प्रमाणे वसुली करणे आवश्यक होते. तथापि रु 5000 रक्कम मक्तेदाराकडून वसुल करण्यात आलेली नाही.

2 सदर कामाच्या अंदाजपत्रका सोबत दर पृथक्करण लेखा परीक्षणास प्राप्त झाले नाही. खालील सामग्रीचे दर सन 2010-2011 या वर्षाच्या दरसूची पेक्षा जादा असल्याचे दिसून आले. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | सामग्रीचे नाव | डी.एस.आर.2010 2011 चे दर +5%वाढ | अंदाजपत्रकात दिलेले दर | फरक | परिमाण | रक्क |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ड्राय रबल | 438 प्र.घ.मी. | 558.64 प्र.घ.मी. | 120.64 | 7.61 | 918 |
| 2. | एम -25 | 4284 प्र.घ.मी. | 4632 प्र.घ.मी. | 348 | 16.60 | 577 |
| 3. | कास्टिंग मेटल एम | 5348 . प्र.घ.मी. | .5696.34 . प्र.घ.मी. | 348.34 | 5.21 | 181 |
| 4 | कास्टिंग आर.सी.सी. बीम | 5555 प्र.घ.मी. | 5903 . प्र.घ.मी. | 348 | 17.08 | 594 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 5 | आर.सी.सी. एम 25 | 7048 प्र.घ.मी. | 7222 . प्र.घ.मी. | 174 | 11.12 | 1935 |
| 6. | सेकंडक्लास बि.बि.मेसनरी | 3271 . प्र.घ.मी. | 3504 . प्र.घ.मी. | 233 | 1.44 | 335 |
| 7.. | सिमेंट प्लास्टर 1:3 | 117 प्र.घ.मी. | 141.46 प्र.घ.मी. | 24.46 | 148.92 | 3643 |
| 8 | वाळू प्लास्टर | 291 प्र.घ.मी. | 315.94 प्र.घ.मी. | 24.94 | 170.56 | 4254 |
| 9 | मुरूम भरनी | 94.50 . प्र.घ.मी. | 148.05 प्र.घ.मी. | 5355 | 260.10 | 13928 |
| 10 | ANNODIZED ALLUMINIUM | 3317 प्र.घ.मी. | 4131.75 प्र.घ.मी. | 814.75 | 4.32 | 3520 |
| 11.. | खोदकाम वाहतूक | 68.01 प्र.घ.मी. | 150.98 प्र.घ.मी. | 82.47 | 21.35 | 1761 |
| 12 | किंग पोस्ट | 70001 . प्र.घ.मी. | 96889 प्र.घ.मी. | 26888 | 0.05 | 1344 |
| 13. | डबललिफ्ट शटर | 410 प्र.चौ.फु. | 464 प्र.चौ.फु. | 54.18 | 92.66 | 5020 |

वर दाखविण्यात आल्याप्रमाणे सदर कामात मक्तेदारास रु. 55193 चे जादा प्रदान झाले असल्याचे दिसून येते. सबब सदर रकमेची वसुली होणे आवश्यक आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक रु.999860 होते. मक्तेदारास रु.1004051 अदा करण्यात आले. सबब रु. 4176 जादा अदा झाले आहेत. सदर कामाची नोंद महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम क्रमांक 182 नुसार नमुना 139 या विहित प्रपत्रात ठेवण्यात आलेली नाही.

3 महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखासंहिता परीच्छेद क्रमांक 10:01:04 अन्वये मोजमाप पुस्तकातील नोंदी कामाच्या प्रगती प्रमाणे प्रथम कनिष्ट अभियंता आणि त्यानंतर उप अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांनी तारखेनिशी घेवून त्यानंतरच पहिले व त्यापुढील धावत्या देयका प्रमाणे प्रदान करणे आवशक आहे नियंत्रक अभियंत्याने मोजमाप पुस्तकाची नियत काळाने तपासणी करून त्यात नोंदविण्यात आलेली सर्व बांधकामे बरोबर असल्याची खात्री करून त्या नंतरच मक्तेदारास प्रदान करणे आवश्यक आहे. मात्र या प्रमाणे तारखेनिशी नोंदी घेतल्या जात नसल्याचे दिसून आले सदर बाबत संबंधित विभागास अर्ध समास ज्ञापन क्रमांक 40 दिनांक 3/12/2013 अन्वये विचारणा करण्यात आली होती. विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.

वसुल पात्र रु.55193



## *69 दलित वस्ती सुधारणा अंतर्गत प्रभाग क्रमांक 48 मध्ये मिलिंद नगर येथे पेवर ब्लॉक बसविणे या कामाच्या देयकातून आवश्यक त्या रकमा वसुल न केल्याने झालेले नुकसान रु. 89145*

**दलित वस्ती सुधारणा अंतर्गत विकास कामे.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*केंद्र शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 89145.00/-

***दलित वस्ती सुधारणा अंतर्गत प्रभाग क्रमांक 48 मध्ये मिलिंद नगर येथे पेवर ब्लॉक बसविणे या कामाच्या देयकाची तपासणी केली असता देयकातून कामासाठी वापरलेल्या सामग्री साठी गुणवत्ता शुल्क वसुल केलेले नाही. सदर कामाचे दर पृथक्करण लेखा परीक्षणास उपलब्ध करण्यात आलेले नाही. त्यामुळे सन 2008-2009 च्या जिल्हा दरसूची पेक्षा जादा दर लावल्याने उल्हासनगर महानगरपालिकेचे नुकसान झालेले आहे.***

दलित वस्ती सुधारणा अंतर्गत प्रभाग क्रमांक 48 मध्ये मिलिंद नगर येथे पेवर ब्लॉक बसविण्याच्या कामाच्या देयकाची तपासणी केली असता खालील प्रमाणे लेखा परीक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत.

कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

कामाचे नाव - प्रभाग क्रमांक 48 मध्ये मिलिंद नगर येथे पेवर ब्लॉक बसविणे.

कामाचे अंदाजपत्रक - रु. 998400

मक्तेदाराचे नाव - मे जय भवानी मजूर कामगार सहकारी संस्था.

तांत्रिक मंजुरी - 3600 दिनांक 12-3-2010

कार्यादेश क्रमांक - उमपा/साबावि/काअ/2253 दिनांक 3-9-2010

मोजमाप पुस्तक क्रमांक - 1897 पान क्रमांक 1ते 29

देयकाचा तपशील - प्रमाणक क्रमांक 434 दिनांक 30-4-2011 रु. 1019218

करारनाम्याची तारीख - 03-9-2010

काम सुरु केल्याची तारीख - 03-09-2010

काम समाप्तीची तारीख - 7-02-2011

डी.डी.आर. क्रमांक आणि दिनांक - 2355 /26-08-2010.

1. सदर कामावर वापरलेल्या गौण खनिजा साठी मक्तेदाराच्या देयकातून स्वामित्वधन रक्कम वसुल करण्यात आलेली नाही. दलितवस्ती सुधारणा अंतर्गत केलेल्या विकास कामावरील वापरलेल्या गौण खनिजाचा परीच्छेद स्वतंत्र घेण्यात आलेला आहे. सन 2011-2012 या वर्षाच्या दरसूची प्रमाणे कामासाठी वापरण्यात आलेल्या सामग्रीच्या चाचणी अहवालासाठी 0.50% प्रमाणे वसुली करणे आवश्यक होते. तथापि 5000 रक्कम वसुल करण्यात आलेली नाही.

2.सदर कामाच्या प्राकलनासोबत दर पृथक्करण दिलेले नसल्याने सन 2008-2009 च्या जिल्हा दर सूचीतील दरापेक्षा (5% अधिक दर घेवून सुद्धा) खाली दर्शविल्या प्रमाणे अधिक रक्कम मक्तेदारास अदा केल्याचे दिसून आले. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | सामग्रीचे नाव | डी.एस.आर.2008-2009 चे दर +5%वाढ | अंदाजपत्रकात दिलेले दर | फरक | परिमाण | रक्क |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पी.सी.सी.1:3:6 बेडिंग पाया | 2928 प्र.घ.मी. | 3397 प्र.घ.मी. | 469 | 55.50 | 2603 |
| 2.. | आर.सी.सी. येच आर पांईप 300एम एम. | 101 प्र.घ.मी. | 205 प्र.घ.मी. | 104 | 204 | 2127 |
| 3. | पी.सी.सी.एम 10 | 2928 प्र.घ.मी. | 3464.95 प्र.घ.मी. | 536.95 | 26.63 | 1429 |
| 4. | 80/100एम.एम. मेटल चा PURVATHAQ पुरवठा | 261 प्र.घ.मी. | 280.53 प्र.घ.मी. | 19.53 | 70 | 1367 |
| 5. | सिमेंट प्लास्टर | 66 . प्र.घ.मी. | 91.80 प्र.घ.मी. | 25.80 | 112.74 | 2909 |
| 6 | 1:4:8 बेडिंग | 2604 प्र.घ.मी. | 3085 - | 481 | 33.07 | 1590 |
| 7. | शहाबादी लादी | 261 चौ.फु. | 286 चौ.फु | 25 | 96.75 | 2418 |
| | | | | | एकूण रक्कम | 8414 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | रु. | |

वर दाखविण्यात आल्याप्रमाणे मक्तेदारास रु 8914 चे प्रदान जादा झाल्याचे दिसून येते. सदर रकमेची वसुली संबधित मक्तेदाराकडून होणे आवश्यक आहे.

3. सदर कामाची नोंद महाराष्ट्र नगर पालिका लेखा संहिता 1971 नियम क्रमांक 182 नुसार नमुना 139 या विहित प्रपत्रात घेण्यात आलेली नाही.

4. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखासंहिता परीच्छेद क्रमांक 10:01:04 अन्वये मोजमाप पुस्तकातील नोंदी कामाच्या प्रगती प्रमाणे प्रथम कनिष्ट अभियंता आणि त्यानंतर उप अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांनी तारखेनिशी घेवून त्यानंतरच पहिले व त्यापुढील धावत्या देयका प्रमाणे प्रदान करणे आवश्यक आहे. नियंत्रक अभियंत्याने मोजमाप पुस्तकाची नियत काळाने तपासणी करून त्यात नोंदविण्यात आलेली सर्व बांधकामे बरोबर असल्याची खात्री करून त्या नंतरच मक्तेदारास प्रदान करणे आवश्यक आहे. मात्र या प्रमाणे तारखेनिशी नोंदी घेतल्या नसल्याचे दिसून आले.

5. महाराष्ट्र लेखा संहिता 1971 नियम क्रमांक 167(2) नुसार मूळ अंदाजा पेक्षा 10% पेक्षा अधिक वाढ झाल्यास त्या साठी सुधारित अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक आहे. सदर कामाच्या प्रत्यक्ष काम केल्याच्या विवरण पत्रात (EXECUTION OF WORK) खालील कामाच्या बाबीमध्ये फरक दिसून आला. सदर वाढीचे कोणतेही कारण देण्यात आलेले नाही. मात्र अंदाजपत्रकातील काही बाबी मध्ये बचत दाखविण्यात आली आहे. त्यामुळे अंदाजपत्रकीय रक्कम तीच ठेवण्यात आलेली असली तरी बाब निहाय स्पष्टीकरण आवश्यक आहे.

| अ.क्र. | बाब क्रमांक | वाढ |
|---|---|---|
| 1. | 2 | 54%जादा |
| 2. | 3 | 35% जादा |
| 3. | 4 | 35% जादा |
| 4. | 5 | 413% जादा |
| 5 | 6 | 204% जादा |
| 6. | 11 | 93% जादा |

6 60 एम एमडी HEAVY DUTY INTERLOCK PAVER BLOCK चे दर पृथक्करण प्राप्त झाले नसल्याने सदर बाबीच्या दराची तपासणी करता आली नाही. सदर बाबत अर्ध समास ज्ञापन क्रमांक 53 दिनांक 19/12/2013 अन्वये संबंधित विभागास विचारणा करण्यात आली होती. उत्तर अप्राप्त आहे.

वसुल पात्र रक्कम 89145

DATDBWM5801 (Ref No : 163, Hmm No : 53)

## *70 खासदार निधीच्या खर्चाची प्रमाणके लेखापरीक्षणास उपलब्ध केली नसल्या बाबत*

**खासदार निधी अंतर्गत विकास कामे**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :413-3224 केंद्र शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 150712.00/-

***2011 – 2012 या वित्तीय वर्षात खासदार निधी अंतर्गत प्राप्त झालेल्या अनुदानातून खर्च केलेल्या प्रमाणकांची तपासणी केली असता रु.150712 रकमेची प्रमाणके तपासणीसाठी प्राप्त झाली नाहीत.***

2011-2012 या वित्तीय वर्षात खासदार निधी अंतर्गत प्राप्त झालेल्या अनुदानातून खर्च केलेल्या प्रमाणकांची तपासणी केली असता खालील प्रमाणके तपासणीसाठी प्राप्त झाली नाहीत.

| **अ.क्र** | **प्रमाणक क्रमांक** | **दिनांक** | **मक्तेदाराचे नाव** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|
| 1 | 1831 | 26/07/2011 | गीता मजूर सह.संस्था . | 24995 |
| 2 | 1832 | 26/07/2011 | पंचशील सह.संस्था | 13317 |
| 3 | 1833 | 26/07/2011 | डहाणू रोड सह.संस्था | 12527 |
| 4 | 2294 | 26/08/2011 | निळकंठ सह.संस्था . | 24994 |
| 5 | 3733 | 16/11/2011 | मयूर सह.संस्था . | 50000 |
| 6 | 4810 | 17/01/2012 | राहूल सह.संस्था | 24879 |
| | | **एकूण रक्कम** | | **150712** |

सदर बाबत संबंधित विभागास अर्ध समास ज्ञापन क्रमांक 65 दिनांक 27/12/2013 अन्वये विचारणा करण्यात आली होती. विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.

DATDBWM5801 (Ref No : 167, Hmm No : 65)

## *71 दलित वस्ती सुधारणा खर्चाची प्रमाणके उपलब्ध न केल्या बाबत*

**दलित वस्ती सुधारणा**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*केंद्र राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 707081.00/-

***दलित वस्ती योजनेची प्रमाणके उपलब्ध न केल्याने खर्च रु707081 आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.***

. दलित वस्ती योजनेअंतर्गत प्रमाणकांची तपासणी केली असता खालील प्रमाणके तपासणीसाठी उपलब्ध झालेली नाहीत.

| **अ.क्र** | **प्रमाणक क्रमांक** | **दिनांक** | **मक्तेदाराचे नाव** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|
| 1 | 537 | 05/05/2011 | जयंत मजूर का.स.स | 54995 |
| 2 | 538 | 05/05/2011 | धिरज मजूर का.स.स | 49750 |
| 3 | 543 | 05/05/2011 | कलश मजूर का.स.स | 17445 |
| 4 | 621 | 10/05/2011 | मयूर मजूर का.स.स | 27500 |
| 5 | 1963 | 02/08/2011 | पीतांबर मजूर का.स.स | 49734 |
| 6 | 1964 | 02/08/2011 | राजलक्ष्मी मजूर का.स.स | 28512 |
| 7 | 2103 | 10/08/2011 | मोनाली मजूर का.स.स | 27500 |
| 8 | 2134 | 12/08/2011 | जय मजूर का.स.स | 35250 |
| 9 | 2284 | 26/08/2011 | हरिहरेश्वर मजूर का.स.स | 27362 |
| 10 | 3749 | 18/11/2011 | महालक्ष्मी का.स.स | 50257 |
| 11 | 4158 | 15/12/2011 | हरे रामा मजूर का.स.स | 54513 |
| 12 | 4319 | 21/12/2011 | जवाहर मजूर का.स.स | 52157 |
| 13 | 4811 | 17/01/2012 | मयूर मजूर का.स.स | 27500 |
| 14 | 4893 | 20/01/2012 | प्रभा मजूर का.स.स | 49708 |
| 15 | 4948 | 24/01/2012 | गुरूराज मजूर का.स.स | 50454 |
| 16 | 4949 | 24/01/2012 | कलश मजूर का.स.स | 54994 |
| 17 | 5249 | 22/02/2012 | रविराज मजूर का.स.स | 49750 |
| | | | **एकूण रककम** | **7,07,081** |

या शिवाय वाल्मीकि वसाहतीच्या संबंधात मे.कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर यांना अदा केलेली 3 (तीन) देयके रक्कम

रूपये 5212175 ची प्रमाणके लेखा परिक्षणास उपलब्ध करण्यात आलेली नाहीत.
वरील उपप्रमाणके लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करण्यात न आल्याने सदरील खर्च आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. सदर बाबत अर्ध समास ज्ञापन क्रमांक 66 दिनांक 27/12/2013 अन्वये संबंधित विभागास विचारणा कण्यात आली होती. विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.
आक्षेपाधीन रक्कम रु. 707081

DATDBWM5801 (Ref No : 168, Hmm No : 66)

## *72 राजीव गांधी नगरप्रभाग क्रमांक 10 मध्ये नाला तयार करणे आणि दुरुस्ती करणे या कामात झालेले अतिप्रदान रु.72114 आणि मोजमाप पुस्तकातील त्रुटी बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :412-3224 केंद्र शासन निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 72114.00/-

***प्रभाग क्रमांक 10 राजीव गांधी नगर मध्ये नाला तयार करणे आणि दुरुस्ती करणे या कामाच्या अंदाजपत्रकातील दर जिल्हा दरसूची पेक्षा जादा असल्याचे दिसून आले. सदर कामाचे दर पृथक्करण लेखा परीक्षणास प्राप्त झाले नाही. त्यामुळे प्रत्येक कामाच्या बाबीवरील लीड बाबत माहिति प्राप्त झाली नाही. त्यामुळे 2011-2012 च्या जिल्हा दरसूची पेक्षा जादा दर कामाच्या अंदाजपत्रकात लावल्याने मक्तेदारास जादा प्रदान झाले आहे. मोजमाप पुस्तकातील नोंदी कामाच्या प्रगती प्रमाणे प्रथम कनिष्ट अभियंता आणि त्यानंतर उप अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांनी तारखेनिशी नोंदविण्यात आलेली नाहीत. नियंत्रक अभियंत्याने मोजमाप पुस्तकाची नियत काळाने तपासणी करून त्यात नोंदविण्यात आलेली सर्व बांधकामे बरोबर असल्याची खात्री करून त्या नंतरच मक्तेदारास प्रदान करणे आवश्यक आहे. मात्र या प्रमाणे तारखेनिशी नोंदी घेतल्या जात नसल्याचे दिसून आले***

खासदार निधी अंतर्गत प्रभाग क्रमांक 10 राजीव गांधी नगर येथे नाला तयार करणे आणि दुरुस्ती करणे या कामाच्या देयकाची तपासणी केली असता खालील प्रमाणे लेखा परीक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत.

कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1 कामाचे नाव :- प्रभाग क्रमांक 10 राजीव गांधी नगर येथे नाला तयार करणे आणि दुरुस्ती करणे

2 कामाचे अंदाजपत्रक :- रु1000000/- प्रमाणक क्रमांक 4789 दिनांक 16/01/2012

3. मक्तेदाराचे नाव:- मे शंकर महादेव मजूर कामगार सहकारी संस्था.
4. तांत्रिक मंजुरी :- 5918 दिनांक 13/06-/2011
5. कार्यादेश क्रमांक :- उमपा/साबावि/काअ/3329दिनांक 07/10/2011
6. मोजमाप पुस्तक क्रमांक :- 3438 पाने क्रमांक 1 ते 7
7. करारनाम्याची तारीख :- 7/10/2011
8. काम सुरु केल्याची तारीख :- 7/10/2011
9. काम समाप्तीची तारीख :- 3/01/2012
10. डी.डी.आर. क्रमांक :- 2902 दिनांक 22/9/2011

1. सदर कामावर वापरलेल्या गौण खनिजा साठी मक्तेदाराच्या देयकातून स्वामित्वधन रक्कम वसुल करण्यात आलेली नाही. खासदार निधी अंतर्गत केलेल्या विकास कामावरील वापरलेल्या गौण खनिजाचा परीच्छेद स्वतंत्र घेण्यात आलेला आहे. 2011-2012 या वर्षाच्या दरसूची प्रमाणे कामासाठी वापरण्यात आलेल्या सामग्रीच्या चाचणी अहवालासाठी 0.50% प्रमाणे वसुली करणे आवश्यक होते. सबब रु. 5000 रक्कम वसुल करण्यात आलेली नाही.

2. खालील सामग्री चे दर 2010-2011 या वर्षाच्या दरसूची पेक्षा (महानगरपालिका क्षेत्रात 5%) जादा घेवून सुद्धा अधिक घेतल्याचे दिसून आले. त्याचा तपशील खालील प्रमाणेआहे.

| अ.क्र. | सामग्रीचे नाव | डी.एस.आर.20102011चे दर +5%वाढ | अंदाजपत्रकात दिलेले दर | फरक | परिमाण | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | खोदकाम नरम मुरूम /ओली माती | 94.50प्र.घ.मी. | 116.50 प्र घ.मी. | 22 | 245.28 | 5396 |
| 2. | सिटू सिमेंट 1:3:6 बेडिंग | 3213 प्र.घ.मी. | 3649 प्र.घ.मी. | 436 | 70.07 | 30550 |
| 3 | सिटू सिमेंट एम -10 | 3213 प्र.घ.मी. | 3685 प्र.घ.मी. | 472 | 57.47 | 27125 |
| 4. | एम 20 | 6867प्र.घ.मी. | 7222 प्र.घ.मी. | 355 | 11.39 | 4043 |

एकून रक्कम रु. 67114

वर दाखविण्यात आल्याप्रमाणे सदर कामात मक्तेदारास रु. 72114 (चाचणी अहवालाच्या रकमेसह) चे जादा प्रदान झाले असल्याचे दिसून येते. सबब सदर रकमेची वसुली होणे आवश्यक आहे. देयकासोबत दर पृथक्करण आढळून आले नाही.

3. सदर कामाची नोंद महाराष्ट्र नगर परिषद लेख संहिता 1971 मधील नियम क्रमांक् 182 नुसार नमुना 139 या विहित प्रपत्रात ठेवण्यात आलेली दिसून आलेली नाही

4. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखासंहिता परीच्छेद क्रमांक 10:01:04 अन्वये मोजमाप पुस्तकातील नोंदी कामाच्या प्रगती प्रमाणे प्रथम कनिष्ट अभियंता आणि त्यानंतर उप अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांनी तारखेनिशी घेवून त्यानंतरच पहिले व त्यापुढील धावत्या देयका प्रमाणे प्रदान करणे आवश्यक आहे. नियंत्रक अभियंत्याने मोजमाप पुस्तकाची नियत काळाने तपासणी करून त्यात नोंदविण्यात आलेली सर्व बांधकामे बरोबर असल्याची खात्री करून त्या नंतरच मक्तेदारास प्रदान करणे आवश्यक आहे. मात्र या प्रमाणे तारखेनिशी नोंदी घेतल्या जात नसल्याचे दिसून आले

या बाबत संबंधित विभागास अर्ध समास ज्ञापन क्रमांक 44 दिनांक 03/12/2013 अन्वये विचारणा करण्यात आली होती. विभागाने कोणतेही उत्तर दिले नाही.

वसुलपात्र रक्कम रु.72114

DATDBWM5801 (Ref No : 169, Hmm No : 44)

## *73 उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दितील मोबाईल टॉवरवरील कराच्या वसुलीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 5623622.00/-

***2011-2012 मध्ये उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दितील मोबाईल टॉवरवरील रुपये 56,23,622/- इतक्या थकीत कराची व दंडात्मक कार्यवाहीसह वसुल केली नाही.***

उल्हासनगर महानगरपालिकेच्या 2011-2012 च्या लेखापरीक्षणाचे दरम्यान कर विभागास अर्धसमास ज्ञापन क्रमांक : 15, दिनांक 15.10.2013 व क्रमांक : 62, दिनांक 21.12.2013 अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दितील मोबाईल टॉवरबाबत सर्वे झाला असल्यास एकूण मोबाईल ऑवर किती आहेत, त्याची तपशिलवार माहिती व मोबाईल टॉवर बाबतीत वसुल करण्यात आलेल्या कराची माहिती मागितली असता विभागाने त्यांचेकडील दिनांक 7.2.2014 च्या पत्रान्वये एकूण 76 मोबाईल टॉवरची माहिती दिली आहे. सदर माहितीच्या अनुषंगाने 2011-2012 मध्ये रुपये 5623622/- थकीत असल्याचे दिसुन येते.

सदर माहितीच्या अनुषंगाने लेखापरीक्षणासाठी आवश्यक असलेले खालील अभिलेखे उपलब्ध करुन देण्याबाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक : 163, दिनांक 12.02.2014 निर्गमित करण्यात आलेले आहे.

1) मोबाईल टॉवर कंपनी व जागा मालक यामध्ये झालेले नोंदणीकृत भाडेकरारनामा.

2) थकीत कराची रक्क्म वसुलीबाबत उल्हासनगर महानगरपालिकेने कोणती कार्यवाही केली त्याबाबतचे पत्र व्यवहार, नोटीस इत्यादीची संचिका.

3) मोबाईल टॉवरची कर आकारणी करण्याच्या दृष्टिने संबंधीत निरिक्षकाचा स्थळपहाणी अहवाल व कर निर्धारण नस्ती, कराची दरपत्रके.

परंतु कर विभागाने उपरोक्तबाबत अनुपालन लेखापरीक्षणास सादर केले नाही.

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : टिपीएस-1890/1975/प्र.क्र.2417/10/नवि-13, दिनांक 26.07.2011 अन्वये मोबाईल टॉवर उभारणी संदर्भात धोरणाबाबत नमुद आहे. महानगरपालिकेच्या हद्दित मोबाईल टॉवर उभारणीकरीता नगर रचना विभागाच्या परवानगीची आवश्यकता आहे. उल्हासनगर महानगरपालिकेच्या नगर रचना विभाचे पत्र क्रमांक : उमपा/नरवि/सा/273/13, दिनांक 14.02.2014 अन्वये कोणत्याही मोबाईल टॉवरला परवानगी देण्यात आली नसल्याचे कळविलेले आहे. त्यामुळे सदर 76 मोबाईल टॉवर हे अनाधिकृत असल्याने त्यांचेकडून दंडात्मक रकमेसह थकीत कराची रक्क्म रुपये रुपये 5623622/- वसुलपात्र आहे.

( रुपये 5623622/- वसुलपालत्र )

DMASGDM7201 (Ref No : 68, Hmm No : 163)

## *74 महिला व बालविकास विभागातील खरेदीमधील अनियमितता*

**महिला व बाल कल्याण**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :WC 721-2749 म.न.पां.निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 2678000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 72144.00/-

***सन 2011-2012 मध्ये महिला व बालविकास विभागाने उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात असलेल्या उद्यानात तसेच अंगणवाडी साठी वेगवेगळी खेळणी खरेदी केली. तथापि शासन निर्णय क्रमांक भाखस -1088/(1512)/उद्योग 6 दिनांक 02/01/1992 परीच्छेद क्रमांक 8.3 (फ) अन्वये सदरील खरेदी निविदा प्रक्रीये द्वारे करणे आवश्यक होते. सदरील खरेदी विहित पध्दत पार न पाडता केलेली आहे. तसेच खरेदी केलेल्या सामग्रीची संग्रह नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्याने संपूर्ण खर्च रु.2678000/-आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.***

महिला व बाल विकास विभागाचा 2011-2012 मध्ये रु 2678000 खर्च झाल्याचे म.न.पां.च्या सन 2011-2012 च्या लेख्यावरून दिसून आले. खाली नमूद केलेल्या प्रमाणकाची तपासणी केली असता खालील प्रमाणे लेखापरिक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहे.

1. प्रमाणक क्रमांक 573 दिनांक 06/05/2011 रु. 517500
2. प्रमाणक क्रमांक 1007 दिनांक 02/06/2011 रु. 327456
3. प्रमाणक क्रमांक 1006 दिनांक 02/06/2011 रु. 375244

1. महापालिका क्षेत्रातील उद्यानात खेळण्यांचे साहित्य पुरविण्यासाठी स्थायी समिति ठराव क्रमांक 86 दिनांक 25/10/2010 अन्वये मे.अमर ज्योत एन्टरप्राईझेस यांना दिनांक 24/12/2010 रोजी उपरोक्त साहित्य पुरविण्याचे कार्यादेश निर्गमित करण्यात आले. त्याप्रमाणे पुरवठाकाराने दिनांक 24/01/2011 रोजी पुरवठा केल्याचे संबंधित प्रमाणकातील कागदपत्रावरून दिसून आले. तथापि सदरील खरेदी रु. 50000 पेक्षा जादा असल्याने शासन निर्णय क्रमांक भाखस -1088/(1512)/उद्योग -6 दिनांक 02/01/1992 परीच्छेद क्रमांक 8.3 (फ ) अन्वये सदरील खरेदी निविदा प्रक्रियेद्वारे करणे आवश्यक होते. सदर प्रमाणकामध्ये निविदा प्रक्रिया पार पाडल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र त्यात खालील त्रुटी आढळून आल्या आहेत.

i. शासन निर्णय क्रमांक भाखस - 1088/(1512)/ उद्योग-6 दिनांक 02-01-1992 परीच्छेद क्रमांक 8.1 अन्वये सदर खरेदीसाठी कोणतीही खरेदी समिती नेमलेली नाही.

ii. शासन निर्णय क्रमांक भाखस - 1088/(1512)/उद्योग 6 दिनांक 02-01-1992 परीच्छेद क्रमांक 8.३ (अ) अन्वये निविदा भरण्यासाठी तीन आठवड्याचा कालावधी दिलेला नाही. केवळ सात दिवसाचा कालावधी देण्यात आला. परिणामी जादा निविदाकाराना त्यात भाग घेता आला नाही. त्यामुळे स्पर्धात्मक दराचा लाभ म.न.पां.स झाला नाही.

iii. दिनांक 2/7/2010 रोजी दैनिक उल्हास विकास आणि दैनिक अमृत कलश मध्ये जाहिरात देण्यात आली. तथापि जाहिरातीची कात्रणे उपलब्ध झाली नाहीत.

iv. निविदा प्रपत्राची किंमत, किती निविदा प्रपत्रे विकली गेली,त्यापैकी किती निविदाकाराणी दोन लिफाफा

पध्दतीने ती सादर केली याची कोणतीही माहिती उपलब्धी झाली नाही.

v. तांत्रिक लीफाफ्यातील कोणतीही कागदपत्रे, लिफाफे लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

vi. व्यापारी लिफाफा किंवा दर लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

vii. सदरील सामग्री जड संग्रह नोंदवहीत नोंदविण्यात आलेली नाही. तसेच ते कोणत्या प्रभागातील उद्यानासाठी आणि कोणाकडे सुपूर्द केले याची कोणतीही नोंद आढळून आली नाही.

viii. सदरील खर्च खरेदीची विहित पद्धत पार पाडून न केल्याने सदरील खर्च आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे

ix. तुलनात्मक विवरणपत्र तयार करण्यात आलेले नाही. त्यावर संबंधित सक्षम अधिका-याच्या स्वाक्ष-या नाहीत. खालील सामग्री वेगवेगळया दराने खरेदी केल्याचे दिसून आले.

| अ.क्र. | सामग्रीचे वर्णन | दर (जादा)(रु.) | दर (कमी) (रु.) | फरक (रु.) | परिमाण | रक्कम (रु.) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Double Sea-Saw. | 19008 | 11750 | 7258 | 6 | 43548 | मे.अमर ज एन्टरप्राईझेस दिनांक 21/01/2 च्या चलना म रु.19008 दर होते |
| 2. | Double swing | 31200- | 24900 | 6300 | 3 | 18900 | वरील प्र वेगवेगळे दर |
| | Rocking Boat | 13500 | 12288 | 1212 | 8 | 9696 | मे. गणेश फाब्रीके यांचे दर रु. 12 असून सदर ठिक रु. 13500 |
| | | | | | | 72144 | |

वर दाखविण्यात आल्याप्रमाणे रु. 72144 जादा अदा झाले आहेत; तरी रक्कम रु.72144 वसुल करावी.

2 प्रमाणक क्रमांक 573 दिनांक 6/5/2011 रु. 517500 अन्वये अंगणवाडीसाठी खेळणी घेण्यात आली. दिनांक 2-7-2010 रोजी दैनिक उल्हास विकास, दैनिक अमृत कलश मध्ये जाहिरात देण्यात आली. मात्र जाहिरातीची कात्रणे उपलब्ध झाली नाहीत. सदरील खरेदी विहित पद्धत पार पाडून न केल्याने सदरील खर्च आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे अंगणवाडी साठी खरेदी केलेल्या सामग्रीची नोंद संग्रह नोंदवहीत घेण्यात आलेली नाही. तसेच ती कोणत्या अंगणवाडीकेंद्रांना दिली याची कोणतीही नोंद लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. शिवाय मक्तेदाराच्या चलनातील आणि देयकातील परिमाणात तफावत असल्याचे दिसून आले. त्यामुळे प्रत्यक्षात किती सामग्री पुरविण्यात आली याची साधार खात्री पटविण्यात आली नाही.

3. प्रमाणक क्रमांक 1007 दिनांक 2-6-2011रु. 327456 आणि प्रमाणक क्रमांक 1006 दिनांक 2-6-2011 रु. 375244 यांची जाहिरातीची कात्रणे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत. तसेच दोन्ही प्रकरणी खरेदी विहित पद्धत पार न पाडल्याने सदरील खर्च देखील आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

4 वर दाखविण्यात आल्या प्रमाणे रु.2061400 ची प्रमाणके तपासणी साठी उपलब्ध झालीत. तथापि विभागाचा एकूण खर्च रु. 2678000 झालेला असल्याने उर्वरित रु.616600 ची प्रमाणके उपलब्ध करून देण्यात आली नाहीत. सदर बाबत संबंधित विभागास अर्ध समास ज्ञापणाद्वारे विचारणा करण्यात आली होती. विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु. 2678000

वसुलपात्र रक्कम रु. 72144

DATDBWM5801 (Ref No : 117, Hmm No : 201)

## *75 सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेच्या स्वयंरोजगार या घटकाखाली केलेले चुकीचे अनुदान वाटप*

**सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*केंद्र शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 131730.00/-

***नगर परिषद प्रशासन संचालनालय यांचे परिपत्रक क्रमांक सुजयो/102003/प्र.क्र. 83/03/13, दिनांक 10/09/2004 परिच्छेद 10 अन्वये ज्या दारिद्रय रेषेखालील कुटुंबाना/ सदस्यांना स्वयं सहायता गटामध्ये सामावून घेता येणार नाही. त्यांच्यासाठी वैयक्तीक स्वंय रोजगार अंतर्गत कमाल रूपये 50,000 पर्यत कर्ज पुरवठा करण्यात येतो. कर्जाच्या रक्कमेच्या 25 टक्के एवढी रक्कम अनुदान म्हणून देय आहे. मात्र उपरोक्त परिपत्रकाच्या परिच्छेद क्रमांक 45 अन्वये या घटकाचा लाभ घेण्यासाठी लाभार्थीचे इयत्ता 9 वी पर्यत शिक्षण झालेले असणे आवश्यक आहे. उल्हासनगर महानगरपालिकेने सदर प्रकरणी विहित शैक्षणिक अर्हता प्राप्त नसताना 2011-2012 मध्ये 05 लाभार्थीना स्वयंरोजगार अनुदान अपात्र लाभार्थ्यांना दिल्याचे दिसून आले.***

सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेच्या स्वयंरोजगार या घटकाखाली आर्थिक लाभ देण्यासाठी सात घटकातील स्वयंरोजगार या घटकाचे लेखा परिक्षण करण्यात आले. सदर बाबत खालील प्रमाणे लेखा परिक्षणाचे अभिप्राय

देण्यात येत आहेत.

1) नगर परिषद प्रशासन संचलनालय यांचे परिपत्रक क्रमांक सुजयो/102003/प्र.क्र. 83/03/13, दिनांक 10/09/2004 परिच्छेद 10 अन्वये ज्या दारिद्रय रेषेखालील कुटुंबाना/सदस्यांना स्वयं सहायता गटामध्ये सामावून घेता येणार नाही. त्यांच्यासाठी वैयक्तीक स्वंय रोजगार अंतर्गत कमाल रूपये 50,000 पर्यत कर्ज पुरवठा करण्यात येतो. कर्जाच्या रक्कमेच्या 25 टक्के एवढी रक्कम अनुदान म्हणून देय आहे. मात्र उपरोक्त परिपत्रकाच्या परिच्छेद क्रमांक 45 अन्वये या घटकाचा लाभ घेण्यासाठी लाभार्थीचे इयत्ता 9 वी पर्यत शिक्षण झालेले असणे आवश्यक आहे. उल्हासनगर महानगरपालिकेने 2011-2012 मध्ये खालील लाभार्थीना स्वयंरोजगार अनुदान दिल्याचे दिसून आले.

| **अ.क्र** | **लाभार्थीचे नाव** | **कर्जाची रक्कम** | **अनुदान** | **शिक्षण** | **कर्जाचे कारण** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ज्ञानेश्वर पुंडलिक सूखतडे | 3,13,570 | 50,000 | 7 वी पास | टेम्पो खरेदी |
| 2 | शिलाबाई आनंद राजगुरू | 50,000 | 12,500 | 7 वी पास | रेडीमेड साडी विक्री |
| 3 | जमूना शिवाजी लबडे | 50,000 | 12,500 | 10 वी पास मात्र प्रमाणपत्र नाही | साडी विक्री |
| 4 | आरती विष्णू थोरात | 40,000 | 10,000 | 1 ली | साडी विक्री |
| 5 | संतोष हरेश महाले | 1,86,917 | 46,730 | 8 वी | तिन चाकी वाहन घेणे |
| | **एकूण** | | **1,31,730** | | |

वरील लाभार्थ्यांना रूपये 131730 चे अनुदान देण्यात आले. मात्र अनुक्रमांक 1,2,4 आणि 5 वरील लाभार्थीनी शैक्षणिक अर्हता पात्र केलेली नाही. आणि अनुक्रमांक 3 वरील लाभार्थी 10 वी उत्तीर्ण असल्याचे नमुद केलेले आहे. मात्र 10वी पास प्रमाणपत्राची साक्षांकित छायांकित प्रत प्राप्त केलेली नाही. सदर लाभार्थीच्या अर्जाची व्यवस्थित छाननी न करता सरसकट अनुदान अदा केल्याने अपात्र लाभार्थीना अनुदान अदा केले गेले आहे. वरील लाभार्थी शैक्षणिक पात्रता (9 वी उत्तीर्ण) धारण करीत नसल्याने सदर रक्कम वसुलपात्र आहे.

2) वरील लाभार्थीनी टेम्पो खरेदी, वाहन खरेदी करण्यासाठी कर्ज घेतलेले आहे. मात्र सदरील वाहन खरेदीची कोणतीही कागदपत्रे दारिद्रय निर्मुलन कक्षाला सादर केलेली नाहीत. परिणामी संबंधित लाभार्थीनी कर्जाचा उपयोग प्रत्यक्षात त्याच्या रोजगारासाठी केला किंवा कसे हे स्पष्ट होत नाही. अनुक्रमांक 2,3,4 वरील लाभार्थीनीं रेडीमेड साडी विक्री करण्यासाठी कर्जाची व अनुदानाची मागणी केलेली आहे. त्यांनी स्थानिक विक्रेत्याचे दरपत्रक आणि स्थानिक जागेचा करारनामा याच्या प्रती महानगरपालिकेच्या दारिद्रय निर्मुलन कक्षास सादर केल्याचे दिसून आले. नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या दिनांक 10.09.2004 च्या परिपत्रकातील मार्गदर्शक सूचना प्रमाणे या बाबतची कर्ज व अनुदान प्राप्त केल्यानंतर अदयाप ते स्वयंरोजगार

करीत आहेत किंवा कसे याची कोणतीही तपासणी समुह संघटक, प्रकल्प अधिकारी यांच्याकडून करण्यात आली नाही. अनुदानाचा योग्य तो वापर झाला किंवा कसे याची कोणतीही तपासणी करण्याची यंत्रणा महानगरपालिकेकडे नाही सदरील अनुदानाचा गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच समुह संघटक यांनी संबंधीत विभागात जावून लाभार्थी उपरोक्त रोजगार करीत आहे किंवा कसे याचा कोणताही अहवाल दारिद्रय निर्मुलन कक्षात वर्षभरात कधीही सादर केल्याचे दिसून आले नाही. शिवाय उपरोक्त लाभार्थीचे जीवनमान दारिद्रय रेषेच्या वर आले किंवा कसे याची कोणतीही पहाणी व त्या संबंधीचा अहवाल समुहसंघटक यांनी दारिद्रय निर्मुलन कक्षास वर्षभरात कधीही सादर केलेला नाही. त्यामुळे सदर घटकावर करण्यात आलेला खर्च योग्य व आवश्यक त्या तपासणीसह करण्यात न आल्याने केंद्र तसेच राज्य शासनाने दिलेल्या अनुदानाचा योग्य विनियोग झाला नसल्याचे दिसून येते. सदर बाबत संबंधित विभागास अर्ध समास ज्ञापन क्रमांक 181 दिनांक 14/02/2014 अन्वये विचारणा करण्यात आली होती विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.,

आक्षेपाधीन रक्कम रु.131730

DATDBWM5801 (Ref No : 145, Hmm No : 181)

## *76 सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना अंतर्गत प्रशिक्षण (STEP-UP) या घटकातील खर्चातील अनियमितता .*

**सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*केंद्र शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 274000.00/-

***शासन निर्णय क्रमांक जीईएन 1099/302/प्र.क्र.2/99 नवि- 33, दिनांक 2/7/1999 अन्वये प्रत्येक प्रशिक्षणाचा कालावधी किमान 300 तास आवश्यक असून एकूण कालावधी दोन महिन्यापासून सहा महिन्यापर्यंत आवश्यक आहे. तसेच प्रत्येक प्रशिक्षण वर्गाला किमान 25 प्रशिक्षणार्थी असले पाहिजेत. प्रशिक्षणामधील प्रशिक्षणार्थी किमान संख्ये पेक्षा कमी असतांना प्राशिक्षण देवून प्रति प्रशिक्षणार्थी रूपये 200/- याप्रमाणे मे.सिध्दांत समाज विकास संस्था यांना रक्कम अदा करण्यात आली आहे. सदरील प्रशिक्षण 57 दिवसाचे असून ते 171 तासांचे झालेले आहे. म्हणजेच कालावधी, तास आणि प्रशिक्षणार्थी किमान संख्या या बाबी पूर्ण केलेल्या नसतांना संस्थेस रक्कम अदा करण्यात आली. प्रशिक्षण (STEP-UP) या घटकातील इतर बाबीची देखील पूर्तता झालेली नाही.***

सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना अंतर्गत प्रशिक्षण (STEP-UP) खर्चाचे लेखा परीक्षण केले असता खालील प्रमाणे लेखा परिक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत.

सिध्दान्त समाज विकास संस्था या खाजगी संस्थेने खालील प्रमाणे प्रशिक्षण प्रशिक्षणार्थीना दिले.

| अ.क्र | प्रशिक्षण प्रवर्ग | प्रशिक्षणार्थी संख्या |
|---|---|---|
| 1 | शिवणकला | 55 |
| 2 | वाहन चालक | 51 |
| 3 | संगणक | 17 |
| 4 | ब्युटी पार्लर | 14 |
| | एकूण | 137 |

1) शासन निर्णय क्रमांक जीईएन 1099/302/ प्र.क्र.2/99 नवि- 33, दिनांक 2/7/1999 अन्वये प्रत्येक प्रशिक्षणाचा कालावधी किमान 300 तास आवश्यक असून एकूण कालावधी दोन महिन्यापासून सहा महिन्यापर्यत आवश्यक आहे. तसेच प्रत्येक प्रशिक्षण वर्गाला किमान 25 प्रशिक्षणार्थी असले पाहिजेत. वरील प्रशिक्षणामधील अ.क्र. 3 आणि 4 वरील प्रशिक्षणार्थी किमान संख्ये पेक्षा कमी असतांना प्रशिक्षण देवून प्रति प्रशिक्षणार्थी रूपये 2000 याप्रमाणे मे.सिध्दांत समाज विकास संस्था यांना रक्कम अदा करण्यात आली आहे. सदरील प्रशिक्षण 57 दिवसाचे असून ते 171 तासांचे झालेले आहे. म्हणजेच कालावधी, तास आणि प्रशिक्षणार्थी किमान संख्या या बाबी पूर्ण केलेल्या नसतांना संस्थेस रक्कम अदा करण्यात आली.

2) नगर परिषद प्रशासन संचालनालयाच्या दिनांक 10/09/2004 च्या परिपत्रकातील परिच्छेद क्रमांक 37 अन्वये सदरील प्रशिक्षण प्राधान्याने शासकीय संस्था, आयटीआय किंवा इतर शासकीय प्रशिक्षण देणा-या संस्थेमार्फत देणे आवश्यक आहे. शासकीय संस्था उपलब्ध नसल्यास, खाजगी संस्था निवडण्याचे अधिकार जिल्हा नागरी विकास यंत्रणा यांना देण्यात आलेले आहे. मात्र प्रशिक्षण संस्थेची निवड करण्यासाठी प्रथमतः प्रकल्प अधिकारी यांनी प्रशिक्षण संस्थेची जागा, अनुभव, क्षमता, कामाचा अनुभव याची पडताळणी करणे आवश्यक आहे व तसा प्रस्ताव द्रारिद्रयनिर्मुलन कक्षामार्फत जिल्हा नागरी विकास यंत्रणाकडे करणे आवश्यक आहे. याप्रमाणे सदरील प्रशिक्षणबाबत कार्यवाही पार पाडण्यात आलेली नाही.

3) शासन निर्णय क्रमांक सूजयो 2010/ प्र.क्र. 02/ नवि -16, दिनांक 25/01/2010 परिच्छेद क्रमांक 1 अन्वये समांतर शिक्षण व प्रशिक्षण तसेच जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांनी मे.सिध्दांत समाज विकास संस्थेस सदर प्रशिक्षण देण्यासाठी प्राधिकृत केल्याचे दिसून आले नाही.

4) प्रशिक्षणार्थीचे प्रशिक्षण सुरू झाल्यानंतर प्रकल्प अधिकारी आणि समूह संघटक यांनी त्यावर नियमित देखरेख करणे आवश्यक असून आठवडयातून एकदा भेट देणे आवश्यक आहे. मात्र अशाप्रकारे प्रकल्प अधिकारी आणि समूह संघटक यांनी प्रशिक्षण संस्थेस भेटी दिल्याचे आढळून आले नाही. संगणक प्रशिक्षण निरक्षरास देवू नये तसेच प्रशिक्षणार्थीची निवड करताना योग्य ते प्रशिक्षण देणे आवश्यक असतांना कोणतीही तपासणी पडताळणी न करता प्रशिक्षण संस्थेस प्रमाणक क्रमांक 192, दिनांक 19/12/2011 अन्वये प्रति

प्रशिक्षणार्थी रूपये 2000 याप्रमाणे रूपये 2,74,000 अदा करण्यात आले. सदर प्रशिक्षणा साठी आवश्यक त्या बाबींची तपासणी न करता रक्कम अदा केली गेल्याने सदरील खर्च आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. सदर बाबत संबंधित विभागास अर्ध समास ज्ञापन क्रमांक 180 दिनांक 14/02/2014 अन्वये विचारणा करण्यात आले होती. विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु.274000

DATDBWM5801 (Ref No : 148, Hmm No : 180)

## *77 सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेच्या रोख पुस्तकातील त्रुटी व अनियमितते बाबत.*

**सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*केंद्र शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत सूवर्णजयंती शहरी रोजगार योजनेसाठी केंद्र तसेच राज्य शासनाने दिलेले अनुदान व त्यातून करण्यात आलेल्या खर्चासाठी रोख पुस्तक राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहिता परिच्छेद क्रमांक 5.3 या प्रपत्रात ठेवण्यात आलेले नाही. सदरील रोख पुस्तक रोजच्या रोज नोंदी घेवून बंद करणे व त्या दिवसाची अंतिम शिल्लक काढून ती खाते प्रमुखाने स्वाक्षरीत करणे आवश्यक आहे. तथापि याप्रमाणे सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेच्या रोख पुस्तकात रोजच्या रोज नोंदी घेण्यात येत नसल्याचे दिसून आले. ही गंभीर अनियमितता आहे. प्रत्यक्षात ज्या दिवशी खर्च होईल त्याच दिवशी ती रोखपुस्तकात नोंदविणे आवश्यक आहे. मात्र असे न करता बॅंकेच्या विवरणपत्राप्रमाणे रोख पुस्तकात नोंदी घेणे ही गंभीर अनियमितता आहे. त्यामुळे रोख पुस्तकात बॅंकेतील शिल्लक रक्कमेबरोबर ताळमेळ घालण्याचा प्रश्न उदभवलेला नसल्याचे दिसून आले. शिवाय काही प्रमाणकाच्या नोंदी रोख पुस्तकात घेण्यात आल्या नसल्याचे दिसून आले.***

सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना विभागाच्या रोखपुस्तका बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत सूवर्णजयंती शहरी रोजगार योजनेसाठी केंद्र तसेच राज्य शासनाने दिलेले अनुदान व त्यातून करण्यात आलेल्या खर्चासाठी रोख पुस्तक राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहिता परिच्छेद क्रमांक 5.3 या प्रपत्रात ठेवण्यात आलेले नाही.

2) सदरील रोख पुस्तक रोजच्या रोज नोंदी घेवून बंद करणे व त्या दिवसाची अंतिम शिल्लक काढून ती खाते प्रमुखाने स्वाक्षरीत करणे आवश्यक आहे. तथापि याप्रमाणे सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेच्या रोख पुस्तकात रोजच्या रोज नोंदी घेण्यात येत नसल्याचे दिसून आले. ही गंभीर अनियमितता आहे. प्रत्यक्षात ज्या दिवशी खर्च होईल त्याच दिवशी ती उपरोक्त रोखपुस्तकात नोंदविणे आवश्यक आहे. मात्र असे न करता बॅकेच्या विवरणपत्राप्रमाणे रोख पुस्तकात नोंदी घेणे ही गंभीर अनियमितता आहे. त्यामुळे रोख पुस्तकात बॅकेतील शिल्लक रक्कमेबरोबर ताळमेळ घालण्याचा प्रश्न उदभवलेला नसल्याचे दिसून आले.

3) 2011-2012 मध्ये उल्हासनगर महानगरपालिकेस सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनाअंतर्गत दिनांक 05/04/2011 रोजी रूपये 7,26,000 आणि दिनांक 2/2/2012 रोजी रूपये 16,06,000 असे एकूण रूपये 23,32,000 चे अनुदान प्राप्त झाले. आरंभिची शिल्लक रूपये 70,56,286 होती. मात्र वर्षभरात रूपये 28,11,000 खर्च झाल्याचे दिसून आले. वर्षाखेरीस रूपये 65,77,286 रक्कम शिल्लक राहिल्याचे दिसून आले. नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या दिनांक 10.9.2004 च्या परिपत्रकातील मार्गदर्शक सूचनानुसार आर्थिक वर्षअखेर शिल्लक रक्कम शासनास परत करणे आवश्यक आहे. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत सात घटकावर केंद्र / राज्य शासनाने दिलेले अनुदान पूर्णपणे खर्च करणे आवश्यक असून प्रत्येक घटकावरील भौतिक साध्य उद्दिष्टे हे दारिद्रय निर्मुलन कक्षाचे प्राथमिक कर्तव्य आहे. मात्र त्या प्रमाणे उद्दिष्टे साध्य न केल्याने संबंधित दारिद्रय रेषे खालील लाभार्थी लाभापासून वंचित राहिलेले आहेत. अखर्चित रक्कम शासनास परत करण्यात आलेली नाही.

4) काही प्रमाणकांच्या नोंदी रोख पुस्तकात घेण्यात आलेल्या नाहीत, किवा त्या अचूक घेतलेल्या नाहीत. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| **अ.क्र** | **प्रमाणक क्रमांक व दिनांक** | **रक्कम** | **शेरा** |
|---|---|---|---|
| 1 | 204, 12.3.2012 | 2748 | प्रत्यक्षात प्रमाणकाची रक्कम रूपये 1286 आहे. |
| 2 | 213, 31.3.2012 | 237000 | रोख पुस्तकात नोंद नाही |

5) प्रमाणक क्रमांक 179, दिनांक 16/09/2011 रूपये 60,000 मध्ये खालील प्रमाणे त्रुटी आढळून आल्या.

| **अ.क्र** | **संस्थेचे नाव** | **दिनांक** | **रोख पुस्तकात नोंद घेतल्याची तारीख** |
|---|---|---|---|
| 1 | जयभिम महिला बचत गट | 31.8.2010 | रोख पुस्तकात दिनांक 2.12.2011 रोजी नोंद घेण्यात आली. |
| 2 | ज्ञानज्योत महिला बचत गट | तारीख नाही | रोख पुस्तकात दिनांक 12.11.2011 रोजी नोंद घेण्यात आली. |
| 3 | ज्योतीबा महिला बचत गट | 30.3.2010 | तपशिल उपलब्ध नाही. |
| 4 | साक्षी महिला बचत गट | 26.3.2012 | रोख पुस्तकात दिनांक 12.11.2011 |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | रोजी नोंद घेण्यात आली. |
| 5 | संस्कार महिला बचत गट | 30.9.2010 | रोख पुस्तकात दिनांक 5.11.2011 रोजी नोंद घेण्यात आली. |
| 6 | पूर्वा महिला बचत गट | 26.8.2010 | रोख पुस्तकात दिनांक 5.11.2011 रोजी नोंद घेण्यात आली. |

6) प्रमाणक क्रमांक 158 दिनांक 21.5.2011 रूपये 15,000 या प्रमाणका सोबत कोणतीही कागदपत्रे उपलब्ध झाली नाहीत.

7) खालील 2010-2011 चा खर्च 2011-2012 मध्ये रोख पुस्तकात घेण्यात आलेला आहे.

| **अ.क्र** | **तारीख** | **प्रमाणक क्रमांक** | **रक्कम** | **रोख पुस्तकात नोंद करण्यात आलेली तारीख** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 14.3.2011 | 146 | 24600 | 28.4.2011 | 24600 |
| 2 | 14.3.2011 | 150 | 26700 | 6.5.2011 | 26700 |
| 3 | 14.3.2011 | 149 | 55200 | 8.4.2011 | 55200 |
| 4 | 14.3.2011 | 147 | 49800 | 20.8.2011 | 49800 |
| 5 | 29.3.2011 | | 13500 | 2.4.2011 | 13500 |

8) नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या दिनांक 10.9.2004 च्या परिपत्रकातील परिच्छेद क्रमांक 37 अन्वये बॅकेतील रवर मिळालेल्या व्याजाचा हिशोब महानगरपालिका व जिल्हा नागरी विकास यंत्रणानी स्वतंत्र ठेवणे आवश्यक आहे. मात्र उल्हासनगर महानगरपालिकेने याप्रमाणे व्याजाचा हिशोब स्वतंत्रपणे न ठेवता त्याच खात्यावर व्याजाची रक्कम समाविष्ट करून ठेवलेली आहे. सदर रक्कमेतून खर्च करावयाचा झाल्यास राज्य नागरी विकास योजनेच्या मान्यतेशिवाय तो करता येत नाही. मात्र उल्हासनगर महानगरपालिकेच्या सुवर्ण जयंती शहरी नागरी योजनेत अशाप्रकारे व्याजाच्या रक्कमेचा स्वतंत्र हिशोब ठेवलेला नाही. त्यामुळे उपरोक्त परिपत्रकाचे उल्लंघन झालेले आहे. सदर बाबत अर्ध समास ज्ञापन क्रमांक 179 दिनांक 14/02/2014 अन्वये संबंधित विभागास विचारणा करण्यात आले होते. विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.

DATDBWM5801 (Ref No : 149, Hmm No : 179)

## *78 सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेंतर्गत शहरी मूलभूत सोयी सुविधा या घटकातील खर्चातील त्रुटी व अनियमितते बाबत.*

**सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*केंद्र शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 498820.00/-

***नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या दिनांक 10.09.2004 च्या परिपत्रकातील परिच्छेद क्रमांक 51 अन्वये योजनेच्या लाभार्थींना प्रशिक्षण, स्वंय रोजगार, महिला व बालके विकास या अंतर्गत काम देण्यात आल्यावर त्यांना व्यवसाय करणे सुलभ जावे यासाठी मुलभूत सोईसुविधा या घटकामध्ये सहाय्य देण्यासाठी सेवा केंद्र /समाज केंद्र संस्थेस, तिथे फर्निचर उपलब्ध करून देणे लाभार्थींना कामाचे ठिकाण किंवा पणन केंद्र बांधणे, महिला व बालके विकास गट (डवाका) गटाना दुकानाचे गाळे बांधणे, शहर जिल्हा आणि राज्य पातळीवर वस्तुंचे प्रदर्शन तसेच, प्रशिक्ष्ाणयोजनेत लाभ दिलेल्या लाभार्थींना रूपये 600 पर्यत टुलकिट देणे अशा बाबींचा समावेश आहे. तथापि उल्हासनगर महानगरपालिकेने सुवर्ण जयंती विभागाच्या दुरूस्तीवर सुवर्णजयंती शहरी रोजगार योनेच्या निधीतून खर्च केल्याचे लेखा परीक्षणात दिसून आले. सदरील खर्च नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या दिनांक 10.09.2004 च्या परिपत्रकातील परिच्छेद क्रमांक 51 अन्वये कार्यालयाच्या सुशोभीकरणा साठी वापरणे पूर्णपणे अयोग्य व चुकीचे असून सदर घटका खालील संपूर्ण खर्च रु.498820 आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे***

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना अंतर्गत शहरी मूलभूत सोयी सुविधा या घटनाचे लेखा परीक्षण केले असता खालील प्रमाणे लेखा परिक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत..

नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या दिनांक 10.09.2004 च्या परिपत्रकातील परिच्छेद क्रमांक 51 अन्वये योजनेच्या लाभार्थींना प्रशिक्षण, स्वंय रोजगार, महिला व बालके विकास या अंतर्गत काम देण्यात आल्यावर त्यांना व्यवसाय करणे सुलभ जावे यासाठी मुलभूत सोई सुविधा या घटकामध्ये सहाय्य देण्यासाठी सेवा केंद्र /समाज केंद्र संस्थेस, तिथे फर्निचर उपलब्ध करून देणे लाभार्थींना कामाचे ठिकाण किंवा पणन केंद्र बांधणे, महिला व बालके विकास गट डवाका गटाना दुकानाचे गाळे बांधणे, शहर जिल्हा आणि राज्य पातळीवर वस्तुंचे प्रदर्शन तसेच, प्रशिक्ष्ाणयोजनेत लाभ दिलेल्या लाभार्थींना रूपये 600/- पर्यत टुलकिट देणे अशा बाबींचा समावेश आहे. उल्हासनगर महानगरपालिका सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेच्या विभागाने खालील प्रमाणे सुवर्ण जयंती विभागाचे दुरूस्तीवर खर्च केलेला आहे.

1) कामाचे नाव - सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना कार्यालयाची दुरूस्ती

2) अंदाजपत्रक - रूपये 3,00,000

3) मक्तेदारांचे नाव आदर्श मजूर कामगार सह. संस्था

4) कार्यादेश क्रमांक 2493, दिनांक 17/12/2010

5) तांत्रिक मंजूरी 3738, दिनांक 23/03/2010

कामाचे अंदाजपत्रक रूपये 300000/- चे असतांना प्रत्यक्ष काम रूपये 329670 चे झाल्याचे दिसून आले. सदर कामाची मोजमाप पुस्तिका व इतर अभिलेख लेखा परिक्षणास उपलब्ध झाला नाही. प्रत्यक्षात सदरील बाबी साठी या घटकाखाली खर्च करणे अनुज्ञेय नसल्याने सदरील खर्च आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.
या शिवाय ओम मनिष एन्टरप्रायझेस यांच्या कडून दिनांक 16/11/2011 रोजी खालील खरेदी करण्यात आली.

| **अ.क्र** | **सामग्री** | **परिमाण** | **दर** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|
| 1 | EXECUTIVE CHAIR | 6 | 4200 | 25200 |
| 2 | लोखंडी मांडणी | 2 | 12000 | 24000 |
| 3 | ग्लास दरवाजा | 144 | 345 | 49680 |
| 4 | पिण्याचे कुलर | 1 | 16000 | 16000 |
| 5 | पडदे रॉड सहित | 6 | 6900 | 26900 |
| 6 | स्टिल कपाटे | 3 | 7150 | 21450 |
| 7 | प्लास्टिक चेअर | 38 | 650 | 24700 |
| 8 | सुचना फलक | 2 | 1500 | 3000 |

वरील सामग्रीची जड संग्रह नोंद वहीत नोंद करण्यात आलेली नाही. त्यामुळे त्याचा दुरूपयोग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर सामग्रीची चलने लेखा परिक्षणास उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे उपरोक्त सामग्री प्रत्यक्षात प्राप्त झाली किंवा कसे याची तपासणी करता आली नाही. वरील सामग्री पैकी अ.क्र. 1,2,4,6,7 यासाठी शासन निर्णय क्रमांक/भाखंस-1088/(2512)/उद्योग-6, दिनांक 2.1.1992 मधील परिच्छेद क्रमांक 5 परिशिष्ट 03 अन्वये महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ यांच्या साठी राखीव असल्याने सदर शासन निर्णयातील परिशिष्ट क्र. 3 मध्ये नमुद केल्याप्रमाणे उपरोक्त पुरवठा महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळामार्फत खरेदी करणे आवश्यक होते. मात्र तसे न करता स्थानिक पुरवठादाराकडून खरेदी करण्यात आल्याने सदर खरेदी मध्ये अनियमितता झालेली आहे.
प्रत्यक्षात सदर घटकावर अशा प्रकारचा खर्च करता येत नसल्याने 2011-2012 मध्ये मुलभूत सोयीसाठी सहाय्य या घटकाखाली झालेला खर्च रूपये 498820 अमान्य करण्यात येत आहे. सदर खर्च आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. सदर बाबत संबंधित विभागास अर्ध समास ज्ञापन क्रमांक 178 दिनांक 14/02/2014 अन्वये विचारणा करण्यात आली होती, विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.
आक्षेपाधीन रक्कम रु. 498820

## *79 बालके व विकास गट (डवाका) (UWSP) या घटका खाली दिलेल्या अनुदाना बाबत.*

**सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*केंद्र शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 459076.00/-

***नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या पत्र क्रमांक सुजयो/उद्दिष्ट धोरण/2011/का.16 दिनांक 29/08/2011 परिच्छेद क्रमांक 02 (ब) अन्वये प्रत्येक बचत गटाला नवीन मार्गदर्शक सूचनेनुसार प्रकल्प किंमतीच्या 35 टक्के किंवा प्रती सदस्य कमाल रूपये 60,000/- पर्यत अनुदान देय आहे. तथापि उल्हासनगर महानगरपालिकेच्या सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना विभागाने प्रकल्प किंमतीच्या 50 टक्के अनुदान अदा केल्याने 15 टक्के अनुदान जादा अदा केले आहे. शिवाय नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या दिनांक 10.09.2004 च्या परिपत्रकातील परिच्छेद क्रमांक 29 अ, ब, क, ड आणि ग मध्ये नमुद केलेल्या व्यवसायाच्या यादीमध्ये रेडीमेड कपडे, किरणामाल या व्यवसायाचा समावेश नाही. मात्र सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना विभागाने सन 2011-2012 मध्ये महिला बालके व विकास गट या घटकाखाली 2011-2012 मध्ये मंजूर केलेली प्रकरणे केवळ रेडीमेड कपडे विक्री व किरणा मालाची दुकाने या व्यवसायासाठी अनुदान दिल्याचे दिसून आले.***

सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत महिला बालके व विकास गट (डवाका) (UWSPUWSP) घटकाची 2011-2012 च्या प्रकरणांची लेखापरिक्षा करण्यात आली. सदर बाबतीत खालील प्रमाणे लेखा परिक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या पत्र क्रमांक सुजयो/उद्दिष्ट धोरण/2011/का.16 दिनांक 29/08/2011 परिच्छेद क्रमांक 02 ( ब) अन्वये प्रत्येक बचत गटाला नवीन मार्गदर्शक सूचनेनुसार प्रकल्प किंमतीच्या 35 टक्के किवा रु.71000 इतके अनुदान देय व अनुज्ञेय आहे.. तथापि उल्हासनगर महानगरपालिकेच्या सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना विभागाने प्रकल्प किंमतीच्या 50 टक्के अनुदान अदा केल्याने 15 टक्के अनुदान जादा अदा केले आहे.

| अ.क्र | महिला बचत गटाचे नाव | सदस्य संख्या | प्रकल्पाची किंमत रु. | देय अनुदान रु. | दिलेले अनुदान रु. | फरक रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मदर टेरेसा महिला व बचत गट | 5 | 250000 | 71,000 | 125000 | 54,000 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 2 | मोहटा देवी महिला बचत गट | 5 | 237500 | 71,000 | 118750 | 47,750 |
| 3 | आधार महिला बचत गट | 5 | 250000 | 71,000 | 125000 | 54,000 |
| 4 | जयश्री महिला बचत गट | 5 | 250000 | 71,000 | 125000 | 54,000 |
| 5 | मानव महिला बचत गट | 5 | 250000 | 71,000 | 125000 | 54,000 |
| 6 | एकविरा महिला बचत गट | 5 | 250000 | 71,000 | 125000 | 54,000 |
| 7 | गावदेवी महिला बचत गट | 5 | 250000 | 71,000 | 125000 | 54,000 |
| 8 | अभिलाशा महिला बचत गट | 5 | 200000 | 71,000 | 100000 | 29,000 |
| 9 | धम्मदिप महिला बचत गट | 5 | 258652 | 71,000 | 129326 | 58,326 |
| | | | | | एकूण | 459076 |

वर दर्शविल्या प्रमाणे रूपये 459076 चे प्रदान लाभार्थींना जादा झालेले आहे. वर दाखविण्यात आलेल्या बचत गटा व्यतिरिक्त आणखी बचत गटास सदर घटकाखाली अनुदान दिले असल्यास त्याची परिगणना करून उपरोक्त रक्कमेची वसुली करणे आवश्यक आहे.

2) याशिवाय सदर प्रकल्पातील संकिर्ण त्रुटी खालील प्रमाणे आहेत.

i) मदर टेरेसा महिला व बचत गट यांनी केवळ 11 महिन्याचा भाडे करारनामा केलेला दिसून आला. सदर महिला गटाला रेडीमेड कपडे विक्रीसाठी सहाय्य दिल्याचे दिसून आले नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या दिनांक 10.09.2004 परिपत्रकातील परिच्छेद क्रमांक 29 अ, ब, क, ड आणि ग मध्ये नमुद केलेला व्यवसायाच्या यादीमध्ये रेडीमेड कपडे, किरणामाल या व्यवसायाचा समावेश नाही. मात्र सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना विभागाने 2011-2012 मध्ये महिला बालके व विकास गट या घटकाखाली 2011-2012 मध्ये मंजूर केलेली प्रकरणे केवळ रेडीमेड कपडे विक्री व किरणा मालाची दुकाने या व्यवसायासाठी अनुदान दिल्याचे दिसून आले

ii) नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या दिनांक 10.09.2004 परिपत्रकातील परिच्छेद क्रमांक 29 अन्वये प्रत्यक्षात उपरोक्त घटकाखाली दिलेल्या अनुदानाच्या लाभार्थी योग्य प्रकारे विनियोग करतात किंवा कसे याची कोणतीही तपासणी सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेच्या विभागातून करण्यात आली नसल्याचे आणि समूह संघटना, प्रकल्प अधिकारी यांनी या बाबत कोणताही अहवाल सदर कक्षाला वर्षभरात कधीही सादर केलेला नाही.

iii) डवाका घटका खाली अनुदान देण्यापूर्वी संबंधित महिला बचत गटाला किती निधी दिला किंवा कसे याची कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही.

iv) एकविरा बचत गट यांना भाजी पोळी केंद्र सुरू करण्यासाठी अनुदान दिले होते. मात्र त्यांना महानगरपांलिकेच्या आरोग्य विभागाचा परवाना दिला आहे किंवा कसे याची कोणतीही कागदपत्रे उपलब्ध झालेली नाहीत.

v) मोहटा देवी महिला बचत गट यांना रूपये 237500 चे कर्ज देण्यात आले. सदर कर्ज रक्कमेच्या 5 टक्के रक्कम संबंधित महिला बचत गटाने बिज भांडवल म्हणून उभे करणे आवश्यक होते. अर्जाच्या तारखेस

सदर महिला बचत गटाच्या सेव्हींग खात्यामध्ये केवळ रूपये 1946 होते. संस्थेने केवळ रु.1946 भांडवल उभे केलेले दिसून आले. प्रत्यक्षात ते रूपये 11875 असावयास हवे. मात्र तरी देखील त्यांना अनुदान देण्यात आले.

vi) गावदेवी महिला बचत गट, अभिलाशा, धम्मदिप महिला बचत गट यांच्या संचिका लेखा परिक्षणास उपलब्ध केलेल्या नाहीत. सदर बाबत संबंधित विभागास अर्ध समास ज्ञापन क्रमांक 182 दिनांक 14/02/2014 अन्वये विचारणा करणात आली होती, विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु.459076

DATDBWM5801 (Ref No : 153, Hmm No : 182)

## *80 निर्मल एम.एम.आर.(वस्तीस्वछतागृह) अभियान अंतर्गत पहिल्या आणि दुस-या टप्प्यातील एकूण 163 वस्तीस्वछतागृहे बांधण्याच्या खर्चातील अनियमितता*

**निर्मल एम.एम.आर.वस्तीस्वछतागृह अभियान**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 948012.00/-

***निर्मल एम.एम.आर. अभियान अंतर्गत पहिल्या टप्प्यातील 82 आणि दुस- या टप्प्यातील 81 अशा एकूण 163 वस्ती स्वच्छता गृहे बांधण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यानी उल्हासनगर महानगरपालिकेस रूपये 34,41,23,873 चे अनुदान दिलेले असून सदरील कामे 2008-2009 पर्यत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी नेमलेल्या अशासकीय संस्था कडून पूर्ण करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले होते. अशासकीय संस्थांनी सर्व कामे अर्धवट सोडल्याने उल्हासनगर महानगरपालिकेस सदरील कामे 2011-2012 पर्यंत स्थानिक मक्तेदाराकडून पूर्ण करून घ्यावी लागली. मात्र यामध्ये उल्हासनगर म.न.पां.स मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागला.***

निर्मल एम.एम.आर. अभियान अंतर्गत पहिल्या टप्प्यातील 82 आणि दुस-या टप्प्यातील 81 अशा एकूण 163 वस्ती स्वच्छतागृहे बांधण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यानी उल्हासनगर महानगरपालिकेस रूपये 34,41,23,873 चे अनुदान दिलेले असून सदरील कामे 2008-2009 पर्यत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट उल्हासनगर महानगरपालिकेस देण्यात आले होते. सदरील कामे मुंबईमहानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी प्राधिकृत केलेल्या अशासकीय संस्थाकडून (NGO) करून घ्यावयाची होती. त्याप्रमाणे संबंधीत अशासकीय संस्थाना उल्हासनगर महानगरपालिकेने कार्यादेश दिले. करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार

संबंधित संस्थांना कार्यादेश दिल्यानंतर संबंधित कामाच्या प्राकलनच्या 25 टक्के रक्कमा अग्रीम म्हणून संबंधितांना अदा करण्यात आल्या. त्यांना 2011-2012 मध्ये पारित केलेल्या प्रमाणकासोबत जोडलेल्या मोजणी पुस्तकात केवळ आगावू रक्कम प्रदान केल्याचे दाखविण्यात आले. तथापि त्यांची मोजमाप पुस्तके तपासणीसाठी प्राप्त झाली नाहीत, शिवाय मुळ अशासकीय संस्थानी निर्मल एम.एम.आर. योजनेअंतर्गत कामे अर्धवट सोडून दिल्याने ती स्थानिक मक्तेदाराकडून पूर्ण करून घेण्यात आल्याचे दिसून आले. त्यामुळे अशासकीय संस्थाना आगावू रक्कमा दिल्या होत्या त्याची पूर्णपणे वसुली /समायोजन त्यांच्याकडून झाले किंवा कसे याची संपूर्ण तपासणी मोजमाप पुस्तकात सदरील अशासकीय संस्थाना केलेल्या प्रदानाची तपशीलवार नोंद केलेली नसल्याने करता आली नाही. याबाबत उल्हासनगर महानगरपालिकेने निर्मल एम.एम.आर. खाली झालेल्या खर्चातील प्रत्येक काम आणि मक्तेदारानिहाय संपूर्ण तपासणी करून कोणत्याही रक्कमेचे अतिप्रदान झालेले नाही याची पडताळणी करणे आवश्यक आहे. निर्मल एम.एम.आर. ची कामे ज्या मक्तेदारास देण्यात आली होती त्या प्रत्येक मक्तेदाराने केलेल्या कामाचे मुल्य, त्यास अदा केलेली रक्कम याचे विवरणपत्र लेखा परिक्षणास सादर करण्यात आले नाही.

आझादनगर येथे 10 सिटसचे टॉयलेट बांधणे या कामाचे अंदाजपत्रक रूपये 19,21,021 मंजूर करण्यात आले होते त्याप्रमाणे जागरूक महिला मंडळ यांना कामाचे आदेश क्रमांक 43 दिनांक 21/02/2009 देण्यात आले. मात्र सदर कामावर रूपये 28,69,033 खर्च झाला म्हणजेच मुळ अंदाजापेक्षा रूपये 9,48,012 जादा खर्च झाला. सदर जादा खर्चासाठी नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम क्रमांक 167 (2) नुसार सुधारित अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक आहे. वरील कामाचे सुधारित अंदाजपत्रक लेखा परिक्षणास सादर केले नाही.

सादर बाबत अर्ध समास ज्ञापन क्रमांक 185 दिनांक 14/02/2014 अन्वये विचारणा करण्यात आली होती. विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु.948012

DATDBWM5801 (Ref No : 154, Hmm No : 185)

## *81 वकिलांच्या फी च्या प्रदानातील अनियमितता*

**विधी विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :762-2272 म.न.पां. निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 433348.00/-

| |
|---|
| ***सन 2011-2012 मध्ये उल्हासनगर महानगरपालिकेची न्यायालयीन प्रकरणे जिल्हा,उच्च,सर्वोच्च*** |

***न्यायालयात काम करण्यासाठी नियुक्त केलेल्या वकिलांची नावे, त्यांची फी या बाबतचा महासभेचा ठराव केलेला नसल्याचे दिसून आले. उल्हासनगर नगरपालिकेचा 274 दिनांक 26-07-1993 चा जुना ठराव लेखापरीक्षणास देण्यात आला.. सबब सन 2011-2012 मध्ये निवड केलेला खर्चाच्या संपूर्ण प्रमाणका वरील खर्च रु.433348 आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.***

1. उल्हासनगर महानगरपालिकेची दिनांक 31-03-2012 अखेर ऐकून 80 प्रकरणे न्याय प्रविष्ठ असल्याचे दिसून आले. त्यापैकी केवळ 3 प्रकरणे निकाली निघालेली असून 77 प्रकरणे प्रलंबित असल्याचे विधी विभागाने त्यांच्या दिनांक 10-02-2014 च्या पत्रान्वये लेखा परीक्षणास कळविले आहे. प्रकरणे निकाली काढण्याचे प्रमाण अत्यंत नगण्य असल्याचे दिसून येते.

2. सन 2011-2012 मध्ये उल्हासनगर महानगरपालिकेची प्रकरणे, जिल्हा,उच्च,सर्वोच्च न्यायालयात काम करण्यासाठी नियुक्त केलेल्या वकिलांची नावे, त्यांची फी या बाबतचा महासभेचा ठराव केलेला नसल्याचे दिसून आले. उल्हासनगर नगरपालिकेचा 274 दिनांक 26-07-1993 चा जुना ठराव लेखापरीक्षनास देण्यात आला. आता महानगरपालिका झाल्याने सुधारित ठराव करणे आवश्यक आहे.

3. उच्च तसेच सर्वोच्च (HIGH COURT AND SUPREME COURT) न्यायालयात म.न.पां. ची बाजू मांडण्यासाठी नेमलेल्या वकिलाचे कोणतेही आदेश काढलेले नसल्याने आणि त्यांना प्रदान करावयाच्या फी बाबत कोणताही ठराव महासभेने पारित केलेला नसल्याने सन 2011-2012 मध्ये लेखा परीक्षणासाठी निवडलेल्या खालील प्रमाणका चा खर्च आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

प्रमाणक क्रमांक 1716 दिनांक 19/07/2011 रु. 95329

प्रमाणक क्रमांक 1717 दिनांक 19/07/2011 रु 242709

प्रमानक क्रमांक 1718 दिनांक 19/07/2011 रु. 62370

प्रमाणक क्रमांक 1719 दिनांक 19/07/2011 रु 69000

प्रमाणक क्रमांक 1720 दिनांक 19/07/2011 रु . 23940

सदर बाबत संबंधित विभागास अर्ध समास ज्ञापन क्रमांक 119 दिनांक 27-01-2014 अन्वये विचारणा करण्यात आली होती. विभागाने दिनांक 10-02-2014 च्या पत्रान्वये उत्तर दिलेले आहे. तथापि वर नमूद केल्या प्रमाणे सदर पत्रा सोबत वकिलांची नावे आणि त्यांना द्यावयाच्या फी बाबतचे ठराव दिलेले नसल्याने आणि दिलेले ठराव जुन्या नगर पालिकेचे असल्याने अनुपालन स्वीकारता येत नाही.

आक्षेपाधीन रक्कम 433348

DATDBWM5801 (Ref No : 164, Hmm No : 119)

## *82 खर्चाची प्रमाणके उपलब्ध न केल्या बाबत.*

**नाव क्रीडा विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :540-2573 म.न.पां. निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1349000.00/-

***सन 2011-2012 मध्ये केलेल्या क्रिडा विभागासाठी खरेदी केलेल्या खर्चाची प्रमाणके, व इतर अभिलेख लेखा परीक्षणास दिला नसल्याने खर्च रु. 1349000/-आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.***

सन 2011-2012 मध्ये उल्हासनगर महानगरपालिकेने क्रिडा विभागावर रु.1349000 चा खर्च केलेला आहे. सदर खर्चाची प्रमाणके लेखा परीक्षणास अर्ध समास ज्ञापन क्रमांक 202 दिनांक 15-02-2014 अन्वये संबंधित विभागाकडे मागविण्यात आली होती. तथापि त्यांनी दिनांक 24-02-2014 च्या पत्रामध्ये सदरील खरेदी भांडार विभागाकडून करण्यात आल्याने खर्चाची प्रमाणके, अभिलेख लेखा परीक्षणास दिला नाही. सदरील खरेदी भांडार विभागाने केल्याने कोणताही अभिलेख देण्यात येत नसल्याचे अनुपालानात नमूद केले. मात्र सदर अनुपालन योग्य नसून क्रीडा विभागाने सर्व अभिलेख उपलब्ध करणे आवश्यक होते. परिणामी सदर खर्चाची तपासणी करता आली नाही. सबब सदर बाबीवरील खर्च रु.1349000 आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु. 1349000

DATDBWM5801 (Ref No : 165, Hmm No : 202)

## *83 अग्निशमन सेवा विभागाने ना हरकत दाखल्याची कमी रक्कम स्वीकारल्या बाबत तसेच थकीत रक्कम आणि इतर अनियमितता बाबत*

**अग्निशमन सेवा**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :811-2420811-1517 म.न.पां निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 2240695.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 138517.00/-

***2011-2012 मध्ये महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 अन्वये देण्यात आलेल्या ना हरकत प्रमाणपत्राची तपासणी केली असता रु. 63260 रक्कम कमी स्वीकारल्याचे दिसून आले.***

***2011-2012 मध्ये रु. 29750 आग विझविण्याची थकबाकी असल्याचे अग्निशमन विभागाने त्यांच्या अनुपालन पत्रात नमूद कलेले आहे. सदर थकबाकी संबंधिता कडून वसुल केलेली नाही. 2011-2012 मध्ये खरेदी केलेल्या सामग्रीची चलने उपलब्ध झाली नाहीत. 41 फायरमनची पदे रिक्त ठेवल्याने अग्निशमन सेवा सक्षम राहिली नाही. अग्निशमन स्थानकाची दुरुस्ती रु.2370000 असताना सदरील ठेका तीन वेगवेगळ्या मजूर सह. संस्था यांना देण्यात आली. सदरील काम कामाचे भाग पाडून करण्यात आली आहेत. त्यामुळे त्यात अनियमितता झालेली आहे.***

1 2011-2012 मध्ये महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 अन्वये देण्यात आलेल्या ना हरकत प्रमाणपत्राची तपासणी केली असता खाली दाखविल्या प्रमाणे कमी रक्कम स्वीकारल्याचे दिसून आले.

| अ.क्र. | नाव | ना हरकत दाखला क्रमांक | दिनांक | देय रक्कम | स्वीकारलेली रक्कम | फरकाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री धर्मो वाधवानी | 239 | 01-08-2011 | 15000 | 10000 | 5000 |
| 2 | द्वारीबाई ह.सुदराणी | 240 | 05-08-2011 | 15000 | 10000 | 5000 |
| 3 | नानिक आहुजा | 245 | 31-10-2011 | 15000 | 10000 | 5000 |
| 4 | नरेश दुलानी | 204 | 18-10-2011 | 15000 | 10000 | 5000 |
| 5 | एम.गणेश मुरगन | 241 | 25-08-2011 | 15000 | 10000 | 5000 |
| 6 | नरेश सभादासनी | 249 | 03-12-2011 | 60000 | 31740 | 28260 |
| 7 | नारायण काळानी | 250 | 02-02-2012 | 40000 | 30000 | 10000 |

एकूण रक्कम 63260

वर दाखविण्यात आलेली रक्कम रु.63260 संबंधिता कडून वसुल करणे आवश्यक आहे.

2. 2011-2012 मध्ये आग विझविण्याची थकबाकी रु.29750 असल्याचे अग्निशाम विभागाने त्यांच्य अनुपालन पत्रात नमूद कलेले आहे. सदर थकबाकी संबंधिता कडून त्वरित वसुल होणे आवश्यक आहे.

3 2011-2012 मध्ये रु.3089150 ची खरेदी केलेल्या सामग्रीची चलने लेखापरिक्षणास उपलब्ध केलेल नाही. केवळ संग्रह नोंदवहीत नोंद घेतल्याचे दिसून आले. सदर बाबीवर झालेला खर्च जरी पुढील वित्तीय वर्षात खर्ची पडलेला असला असला तरी रक्कम रु.3089150 चलने उपलब्ध करेपर्यंत आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

4 स्थायी समिती ठराव क्रमांक 65 दिनांक 08-09-2011 अन्वये मंजूर 60 फायरमन पदा पैकी केवळ 1९ पदे कर्यरत असून 41 पदे रिक्त आहेत. शासन निर्णय क्रमांक अशसे/1407/360/pr.kr.211/नवि/20 दिनांक 31 08-2009 परिच्छेद क्रमांक 3 अन्वये सर्व मंजूर पदे तात्काळ भरून अग्निशमन विभाग कार्यक्षम ठेवायचा आहे मात्र उल्हासनगर महानगरपालिकेने 41 पदे रिक्त ठेवून उपरोक्त शासन निर्णयाचे उल्लंघन केलेले आहे

उपलब्ध झालेल्या माहिती नुसार 15 फायरमनची नियुक्ती मजूर कामगार सहकारी संस्था यांच्या मार्फत केल्याचे दिसून आले. फायरमन या पदासाठी महाराष्ट्र शासनाचा संचालक राज्य अग्निशमन सेवा यांनी मान्य केलेला प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण केलेल्या कर्मचारी यांना नियुक्त करणे आवश्यक असताना सदरील मजूर कामगार सहकारी संस्था यांच्याकडून प्रशिक्षित कर्मचारी कसे उपलब्ध झाले या बाबत कोणतीही माहिती लेखापरीक्षणास देण्यात आलेली नाही. नियुक्त केलेल्या कर्मचा-यांनी आवश्यक ते प्रशिक्षण सेवेत रुजू झाल्यानंतर केल्याचे लेखापरीक्षणास अवगत केले.वर नमूद केल्या प्रमाणे 41 पदे रिक्त ठेवून उल्हासनगर महानगरपालिकेने अग्निशमन विभाग सक्षम करण्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केलेले आहे, असे दिसून आले.

5 दिनांक 31-08-2009 च्या शासन निर्णयान्वये अग्निशमन विभाग पूर्णपणे कार्यान्वित न केल्याने आणि त्याप्रमाणे प्रस्ताव राज्य शासनास विहित वेळेत सादर न झाल्याने म.न.पां.ने 2011-2012 मध्ये कोणतेही अनुदान राज्य शासनाकडून प्राप्त केले नाही.

6 अग्निशमन विभागाच्या खालील प्रमाणकाची तपासणी करण्यात आली

1 प्रमाणक क्रमांक 2286 दिनांक 26-08-2011 750081

2. प्रमाणक क्रमांक 1636 दिनांक 14-07-2011 774092

3. प्रमाणक क्रमांक 3692 दिनांक 14-11-2011 716522

वरील तीन प्रमाणके REPAIR WORK OF FIRE STATION AT PLOT NO 451 ULHASNAGAR 5 येथील कामाची असून त्या साठी तीन मजूर कामगार सहकारी संस्था यांना वेगवेगळ्या कार्यादेश अन्वये कामे देण्यात आलेली आहेत. वरील तीन कामे रु.2240695 या रकमेची असून शासन निर्णय क्रमांक सीएटी 01/05/प्र.क्र.26/इमारती 2 दिनांक 31/05/2005 अन्वये मजूर कामगार सह.संस्था यांना केवळ रु.1500000 पर्यंतची कामे देता येतात. त्यामुळे सदर प्रकरणी निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक होते. मात्र तसे ने केल्याने स्पर्धात्मक दराचा लाभ म.न.पां.स झाला नाही. उपरोक्त तीन देयकातून कोणतीही स्वामित्वधन् शुल्क रक्कम वसुल केलेली नाही. सदरील कामावर 643.93 चौ.घ.मी. गौण खनिज वापरल्याने महसूल आणि वन विभागाच्या दिनांक 10-02-2010 च्या अधिसूचने नुसार रु.70.67 PER CM.T .या प्रमाणे रु.45507 रक्कम वसुल करणे आवश्यक होते. परंतु सदर रक्कम वसुल केलेली नाही.

7 2011-2012 मध्ये ना हरकत दाखला या बाबी खाली रु. 452000 प्राप्त झाल्याचे दिसून आले. मात्र महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 चे कलम 25(3) नुसार स्थापन केलेल्या आग सुरक्षा निधीमध्ये वर्षभरात रु 4105237 जमा झाल्याचे दिसून आले. सदरील रु.3653237 च्या आधिक्य बाबत कोणतीही माहिती देण्यात आली नाही. ना हरकत दाखल्या व्यतिरिक्त उल्हासनगर म.न.पां.ने दिनांक 21-09-2011 रोजी रु. 3850997 जमा केलेली रक्कम विचारात न घेतल्यास उर्वरित रक्कम रु. 197760 या रकमेची तफावत दिसून आली त्या बाबत कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. त्याच बरोबर सदरील खात्यामधून कोणतीही रक्कम काढलेली नसल्याचे विभागाचे दिनांक 11,14/02/2014 च्या पत्रान्वये अनुपालन अग्निशमन विभागाने दिलेले आहे, मात्र बँकेच्या विवरण पत्रात रु.3546100 रक्कम काढल्याचे दिसून आले. सदर बाबत विभागाचे स्पष्टीकरण प्राप्त झाले नाही.

अर्धसमास क्रमांक 68 दिनांक 06/01/2014 माहिती व अभिलेख प्राप्त करण्याचा असून त्याची माहिती व अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध केला आहे.

सदर बाबत अग्निशमन विभागास अर्ध समास ज्ञापन क्रमांक 68,82,139 दिनांक अनुक्रमे 9, 17-01-2014, 05-02-2014 अन्वये विचारणा करण्यात आली होती. विभागाने दिनांक 11-02-2014 , 14-02-2014 रोजीच्या पत्रान्वये उत्तर दिलेले असून केवळ ना हरकत दाखला शुल्क आणि अग्निशमन सेवेची थकीत रक्कम यांची माहिती देण्यात आली आहे. तथापि 2011-2012 मध्ये खरेदी केलेली सामग्री त्याची चलने, आग प्रतिबंधक निधीच्या शिल्लक रकमेतील तफावत, अग्निशाम विभाग सक्षम न करणे आणि अग्निशमन केंद्राच्या दुरुस्तीचे काम विभागून मजूर कामगार सहकारी संस्थाना देणे व इतर आक्षेपां बाबत कोणतेही स्पष्टीकरण त्यांच्या अनुपालात केलेले नाही. सबब विभागाचे अनुपालन स्वीकारता येत नाही.

वसुलपात्र रक्कम रु. 138517

आक्षेपाधीन रक्कम रु.2240695

DATDBWM5801 (Ref No : 171, Hmm No : 139)

# कलम ९ क खालील आक्षेप

**-------------------- निरंक -------------------**

# भाग दोन

# सर्वसाधारण अनियमितता

# कलम ९ ड खालील आक्षेप

## *84 जमा होणा-या महसुलाच्या पावती पुस्तकांच्या साठा नोंदवहया अप्राप्ती बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***उल्हासनगर महानगरपालिकेतील विविध खात्यांकडून जमा होणा- या महसुलाच्या पावती पुस्तकांच्या साठा नोंदवहया लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिल्या नाहीत.***

**उल्हासनगर महानगरपालीकेच्या कर विभाग,नागरी आरोग्य केंद्र,प्रभाग समिती** 1 **ते** 4, **वाहन विभाग,आरोग्य विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग,महिला बालकल्याण समिती,पाणी पुरवठा विभाग, जकात विभाग,सार्वजनिक बांधकाम विभाग, मालमत्ता विभाग, अग्निशमन विभाग, भांडार विभाग,निवडणूक विभाग या विभागातील जमा रकमेचे लेखापरीक्षण केले असता पुढील प्रमाणे माहिती मागितली असता प्राप्त झालेली नाही. त्यामुळे या बाबतचे लेखापरीक्षणास करणे शक्य झाले नाही.**

**अर्धसमासाव्दारे मागितलेली माहिती----**

**1.विभागाने वापरलेल्या महसुल जमा केल्याच्या पावती पुस्तकाची साठा नोंदवही.**

**2.भाडांराकडून प्राप्त झालेली महसुल जमा करण्याची पावती पुस्तके.**

**3.उपरोक्त विभागाने छापलेली महसुल जमा करण्याची पावती पुस्तके.**

**4.**2011-2012 **या वित्तीय वर्षात महसुल जमा करण्यांसाठी वापरण्यांत आलेली पावती पुस्तके.**

**5.**2011-2012 **या वित्तीय वर्षात शिल्लक राहिलेली पावती पुस्तके.**

**उपरोक्तबाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक** 190 **दिनांक**17/02/2014 **रोजी निर्गमित करण्यात आलेले आहे. परंतु त्याबाबत कोणतेही अभिप्राय लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत.**

DVESMBM7301 (Ref No : 58, Hmm No : 190)

## *85 रोख वहीतील उणीवांबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***नमुन्या प्रमाणे रोखवही ठेवण्यांत आलेली नसून त्यावर पदनामाचे व महापालिकेचे शिक्के उमटविण्यांत आलेले नाहीत.***

**उल्हासनगर महानगरपालिका रोखवहीची तपासणी केली असता पुढील प्रमाणे उणीवा आढळून आलेल्या आहेत.**

1) **सदर रोखवही बांधणी करुन तसेच प्रत्येक पानांवर महानगरपालिकेची मोहर उमटवून व्यवस्थीत ठेवणे आवश्यक असतांना ही रोखवही दिवसागणीक स्वतंत्र संगणक छापीत्यांच्या** (Computer Prints) **स्वरुपात लेखापरीक्षणास सादर करण्यांत आली. तसेच रोखवहीस पृष्ठांकन केलेले आढळून आलेले नाही.** NMAM (Nation Municipal Account Mannual) **मधील नियम क्रमांक** 5.3 **अे नुसार नमुना** Exhibit 5.1 **या नमुन्यात आवश्यक असतांना या नमुन्यात ठेवण्यांत आलेली आढळून आलेली नाही.**

2) **दिवसाच्या गोषवा-यावर स्वाक्षरी केलेल्या कर्मचारी / अधिकारी यांच्या पदनामाचे ठसे उमटविण्यांत आलेले आढळून आलेले नाही.तसेच महिन्याच्या शेवटच्या दिवशी गोषवारा लिहीण्यांत आलेला आढळून आला नाही. संपूर्ण रोखवहीतील छापीत्यांमध्ये अखेरची शिल्लक अक्षरी लिहीण्यांत आलेली नाही.**

3) **विविध आस्थापनांकडून भरण्यात आलेली रक्कम प्रमाणक क्रमांक** (D.V.) **नोंदीने रोखवहीच्या पानांमध्ये नमुद आहे. सदर प्रमाणक क्रमांक** (D.V.**क्रमांक** ) **कसे देण्यांत आलेले आहेत याबाबत साधार खुलासा करण्यांत आलेला नाही. तसेच याबाबतची नोंदवही लेखापरीक्षणास सादर करण्यांत आली नाही. या प्रमाणक क्रमांकानुसार** (D.V. **क्रमांक**) **किती आस्थापनांकडून कोणत्या दिवशी किती प्रमाणक क्रमांक कसे आले याबाबतची खात्री लेखापरीक्षणास पटवण्यांत आलेली नाही. त्यामुळे रोज आलेल्या प्रमाणक क्रमांकांचा** (Daily Voucher **चा**) **रोखवहीतील नोंदशी मेळ बसू शकला नाही.याबाबतचा आवश्यक तो खुलासा करण्यांत आलेला नाही.**

4) **माहे मार्च**-2012 **च्या जमाखर्चामध्ये एकूण खर्च रु.**181641549/- **इतका दर्शविण्यांत आलेला असून रोखवहीतील छापीत्यांमध्ये सदर खर्च रु.**181740582/- **इतका दर्शविण्यांत आलेला आहे. उपरोक्त फरकाबाबत आवश्यकतो खुलासा सादर केलेला आढळून आला नाही.**

5) **माहे सप्टेबर**-2011 **या महिन्यातील प्रत्यक्ष बँकेत जमा झालेल्या धनादेशाच्या रकमेचा ताळमेळ घेतला असता ज्या तारखेला बँकेत धनादेश वटलेले आहे त्या तारखेला किंवा त्या तारखेपूर्वी रोखवहीत खर्च दाखविणे आवश्यक असतांना बरेच धनादेश बँक विवरणपत्रात धनादेश वटविलेल्या तारखेनंतर रोखवहीत खर्च दाखविण्यांत आलेले आढळून आलेले आहेत. याबाबत साधार खुलासा**

**करण्यांत आलेला नाही.** (**उदा.धनादेश क्रमांक** 847602 **व** 847600 **हे धनादेश बँकेत दि.**20.09.2011 **या दिवशी खर्च दाखविण्यांत आलेले असून सदरचा खर्च रोखवहीत दिनांक** 19.09.2011 **रोजी दर्शविण्यांत आलेला दिसून येतो.**)

6) **महानगरपालिका अनुदाना व्यतिरिक्त विशेष अनुदान असलेली रोखवहींची तपासणी केली असता या रोखवहयांमध्ये अखेरची शिल्लक अक्षरी लिहीण्यांत आलेली नसून स्वाक्षरीखाली संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांच्या पदनामाचे ठसे नाहीत. तसेच विहीत नमुन्यात रोखवही ठेवण्यांत आलेली आढळून आलेली नाही. सर्व रोखवहया त्रोटक स्वरुपात लिहण्यांत आलेल्या आहेत. याबाबत आवश्यक तो साधार खुलासा करण्यात आलेला नाही.**

7) 2011-12 **या वित्तिय वर्षातील रोखवहीतील जमा खर्चाची तपासणी केली कोष्टकात नमूद तारखांना प्रत्यक्ष जमा व रोखवहीतील शेवटच्या पानावर घेतलेली रक्कम यात तफावत आढळून आली.**

| अ.क्र. | दिनांक | रोखवहीतील रक्कम रु. | रोखवहीत शेवटी घेतलेली रक्कम रु. |
|---|---|---|---|
| 1 | 30.04.2011 | **जमा** 23770282 | 23770550 |
| | 30.04.2011 | **खर्च** 32378336 | 32383712 |
| 2 | 09.05.2011 | **खर्च** 2523137 | 2512137 |
| 3 | 20.05.2011 | **खर्च** 16042657 | 15750941 |
| 4 | 21.05.2011 | **खर्च** 4120550 | 3820550 |
| 5 | 31.05.2011 | **जमा** 5859495 | 5867779 |
| | 31.05.2011 | **खर्च** 28824260 | 28835260 |
| 6 | 30.06.2011 | **खर्च** 29514309 | 30114309 |
| 7 | 02.08.2011 | **खर्च** 465486 | 493026 |
| 8 | 06.08.2011 | **जमा** 1233809 | 1608752 |
| 9 | 19.10.2011 | **खर्च** 5437872 | 5437932 |
| 10 | 29.11.2011 | **खर्च** 25860824 | 25860830 |
| 11 | 30.11.2011 | **जमा** 6565115 | 6565235 |
| 12 | 09.12.2011 | **खर्च** 1566855 | 1566856 |

**उपरोक्त बाबीसंदर्भात अर्धसमास ज्ञापन क्रमांक** 20, **दिनांक** 28.10.2013 **नुसार निर्गमित करण्यांत आले होते. या संदर्भात उपमुख्य लेखा अधिकारी**, **उल्हासनगर महानगरपालिका**, **उल्हासनगर यांचे पत्र क्रमांक उमपा /लेवि/**493/14, **दिनांक** 24.02.2014 **अन्वये देण्यांत आलेला आहे. सदर खुलाश्यामध्ये मुद्दा क्रमांक 1,2,5,6 यांना यापुढे दक्षता घेण्यात येईल असा खुलासा नमूद आहे. तसेच अनुक्रमांक 3 या मुदयांसाठी वही ठेवण्यात आल्याचे पत्रात नमूद आहे परंतू सदर वही लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात**

**आलेली नाही.अनुक्रमांक 4 साठी खुलासा करण्यात आल्याचे नमूद आहे परंतू हा खुलासा लेखापरीक्षणास अप्राप्त आहे. मुद्दा क्रमांक 7 च्या अनुषंगाने तफावतीची रक्कमेची नोंद खाली घेण्यात आली असून त्यानुसार जमा व खर्चाची बाजु बरोबर आहे असे नमूद आहे. परंतू हा मेळ प्रत्यक्षात रोखवहीत दिसून येत नाही. अशा प्रकारे उपरोक्त मुदयांचा खुलासा पूर्णतः समाधानकारक नसल्यामुळे सदर आक्षेप कायम करण्यात येत आहे**.

DVESMBM7301 (Ref No : 60, Hmm No : 20)

### *86 उल्हासनगर महानगरपालिकेने निर्गमित केलेल्या धनादेशाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***धनादेश प्रदान नोंदवहीची तपासणी केली असता धनादेश सिरियल नंबर प्रमाणे निर्गमित केलेले नाहीत. तसेच धनादेश प्रदान नोंदवहीमध्ये सक्षम प्राधिका-याची स्वाक्षरी नाही.***

उल्हासनगर महानगरपालिकेने 2011-2012 या वितीय वर्षामध्ये निर्गमित केलेल्या धनादेशांबाबत धनादेश साठा नोंदवही उपलब्ध् करुन दिली नाही. धनादेश प्रदान नोंदवही तपासली असता खालील प्रमाणे उणिवा आढळुन आल्या आहेत.

1) निर्गमित केलेले धनादेश सिरियल नंबर प्रमाणे निर्गमित करण्यात आले नसल्याचे निर्दशनास आले आहेत. तसेच खालील प्रमाणे धनादेश निर्गमित करण्यात आल्याबाबतची नोंद धनादेश प्रदान नोंदवहीमध्ये आढळुन आली नाही.

उदा. माहे सप्टेंबर, 2011 मध्ये निर्गमित केलेल्या धनादेशांमध्ये खालील धनादेश नोंदवहीमध्ये नोंदविण्यात आलेले नाहीत.

धनादेश क्रमांक : 842001 ते 842003, 842006 ते 84018, 848225, 848227, 848271 ते 848274, 847456, 847460, 847461, 847537, 847538, 847553, 847554, 847559, 847579 ते 847588, 847593 ते 847600, 847606 ते 847623, 847630 ते 847639, 847647, 847653 ते 847698, 847701 ते 847705, 847707 ते 847729, 847768 ते 847776, 847784, 847785, 847793 ते 847800, 848155 ते 848161.

2) धनादेश क्रमवार निर्गमित करण्यात आले नसुन खालील प्रमाणे दुस-या धनादेश पुस्तिकेमधील धनादेश Self म्हणून निर्गमित करण्यात आले असल्याचे आढळुन आले.

उदा. माहे सप्टेंबर, 2013 मध्ये खालील धनादेश निर्गमित केलेले आहेत.

धनादेश क्रमांक : 816063 / 2.9.2011 रुपये 29,541/-

816086 / 15.9.2011 रुपये 1,21,732/-

816087 / 28.9.2011 रुपये 57,551/-

3) धनादेश प्रदान नोंदवहीमधील घेण्यात आलेल्या नोंदी सक्षम प्राधिकारी यांचेकडुन प्रमाणित करण्यात आल्या नसल्याचे आढळुन आले.

4) धनादेश नोंदवहीची तपासणी केली असता धनादेशांची अचुक नोंद घेण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

उदा. माहे सप्टेंबर, 2011 मध्ये खालील क्रमांकाचा धनादेश निर्गमित केलेला आहे.

धनादेश क्रमांक : 847551 / 13.9.2011 रुपये 41,700/- श्री. सुधाकर क्षिरसागर.

847551 / 13.9.2011 रुपये 45,000/- श्री. किशोर केशवानी.

उपरोक्तबाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक : 21, दिनांक 28.10.2013 रोजी निर्गमित करण्यात आलेले आहे. परंतु त्याबाबत कोणतेही अभिप्राय लेखापरीक्षणास उपलब्ध् झालेले नाहीत.

DMASGDM7201 (Ref No : 61, Hmm No : 21)

## *87 उल्हासनगर महानगरपालिकेने घेतलेल्या कर्जाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 328900000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 32890000.00/-

***उल्हासनगर महानगरपालिकेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व एमएमआरडीए यांचेकडून घेतलेल्या कर्जाबाबत विहित कालावधीत कर्जाची परतफेड न केल्याने रुपये 3289 लक्ष शास्ती आकारण्यात आलेली आहे.***

उल्हासनगर महानगरपालिकेच्या 2013-2014 च्या अर्थसंकल्पीय पुस्तिकेनुसार कर्जाची माहिती खालील प्रमाणे आहे.

(आकडे लाखात)

| प्राधिकरणाचे नांव | कर्ज घेतल्याचे वर्ष व उद्देश | कर्जाची रक्कम | 31.3.2012 अखेर परतफेड केलेली रक्कम | | | | 31.3.2012 अखेर थकीत रक्कम | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | कर्ज | व्याज | शास्ती | एकूण | कर्ज | व्याज | शास्ती | एकूण |
| महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (ओएमबी) | भुयारी गटार 1979-86 | 1184 | 0 | 0 | 0 | 0 | 920 | 433 | 1211 | 2564 |
| महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (ओएमबी) | पा.पु.यो. 1997-98 | 850 | 0 | 0 | 0 | 0 | 765 | 558 | 1831 | 3154 |
| महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (एलआयसी) | पा.पु.यो. 1999-02 | 518 | 70 | 105 | 0 | 175 | 42 | 173 | 247 | 462 |
| एम.एम.आर.डि.ए. | रस्ते व उड्डाण पुल. 2000 | 1927 | 120 | 109 | 0 | 229 | 0 | 0 | 0 | 0 |
| एम.एम.आर.डि.ए. | जे.एन.यु.आर. एम. अतर्गत 2011 | 3536 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| एकूण | | 8015 | 190 | 214 | 0 | 404 | 1727 | 1164 | 3289 | 6180 |

उपरोक्त् तक्त्याचे अवलोकन केले असता, लेखापरीक्षणाचे खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कर्जाच्या थकीत रकमेकरीता रुपये 3289 लक्ष इतकी शास्ती आकारण्यात आलेली आहे. तसेच महानगरपालिकेने शास्तीची रक्कम भरलेली नाही.

2) महाराष्ट्र जीवन प्राधिकारण व एमएमआरडिए यांचेकडून एकूण घेतलेले कर्ज रुपये 8015 लक्ष, दिनांक 31.3.2012 अखेर परतफेड केलेले एकूण कर्ज रक्कम रुपये 190 लक्ष व दिनांक 31.3.2012 अखेर प्रलंबित कर्जाची रक्कम रुपये 1727 लक्ष दर्शविण्यात आलेली आहे. प्रत्यक्षात कर्जाची मुळ रक्कम व परतफेड केलेली वजा जाता (8015 – 190) रुपये 7825 लक्ष प्रलंबित असणे आवश्यक आहे. तथापि रुपये 1727 लक्ष प्रलंबित असल्याचे नमुद केलेले आहे. याबाबत विभागाने कोणतेही अनुपालन सादर केलेले नाही. .

3) कर्जाच्या परतफेडीची मुळ प्रमाणके व बँकेचे विवरणपत्र लेखापरीक्षणास सादर केले नाही.

उपरोक्तबाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक : 22, दिनांक 28.10.2013 रोजी निर्गमित करण्यात आलेले आहे. परंतु त्याबाबत कोणतेही अभिप्राय लेखापरीक्षणास उपलब्ध् झालेले नाहीत.

DMASGDM7201 (Ref No : 62, Hmm No : 22)

## *88 निवृत्तीवेतन धारकांचे हयातीचे दाखले लेखा परीक्षणास उपलब्ध न केल्याबाबत.*

**निवृतीवेतन निधी**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :462-2151 म.न.पां निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| ***मार्च 2012 च्या देयकाप्रमाणे सर्व निवृत्तीवेतन धारकांचे हयातीचे दाखले लेखा परिक्षणास सादर करण्यात आले नाहीत. परिणामी त्या बाबतची तपासणी करता आली नाही.*** |

सर्व निवृत्ती वेतन धारकाचे ऑक्टोबर 2011 मध्ये घेतलेले हयातीचे दाखले (LIFE CERTIFICATE) मार्च 2012 च्या देयकातील अनुक्रमांका प्रमाणे दाखविण्यास सांगण्यात आले होते. लेखापरीक्षणास दिलेल्या माहिती प्रमाणे उल्हासनगर महानगर पालिकेमध्ये साधारणपणे 1500 ते 2000 निवृतीवेतन धारक असल्याचे अवगत करण्यात आले. त्याप्रमाणे त्यांचे हयातीचे दाखले तपासण्यासाठी म.न.पां.स खाली नमूद केलेल्या अर्धसमास ज्ञापणा द्वारे विचारणा करण्यात आली होती. मात्र एक विस्कळीत नस्ती ज्यात बरेचशे कागद सुटया स्वरूपात होते ती देण्यात आली होती. सदरील संचिकेवरून सर्व निवृत्तीवेतनधारकाचे हयातीचे दाखले तपासता आले नाहीत. त्यामुळे ऐकून निवृत्तीवेतनधारी आणि प्राप्त केलेले हयातीचे दाखले यांची पडताळणी करता आली नाही. मार्च 2012 च्या देयकाप्रमाणे सर्व निवृत्तीवेतन धारकांचे हयातीचे दाखले क्रमाने लावून ते लेखा परिक्षणास सादर करण्यात आलेले नाहीत. सदर बाबत संबंधित विभागास अर्ध समास ज्ञापन क्रमांक 144 दिनांक 10/02/2014 अन्वये विचारणा करण्यात आली होती. विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.

DATDBWM5801 (Ref No : 120, Hmm No : 144)

## *89 रजा लेख्यातील त्रुटी आणि अनियमितते बाबत*

**निवृतीवेतानाचे लाभ (अर्जित रजेचे सममूल्य रोखीकरण)**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*म.न.पां. निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| ***शासन निर्णय क्रमांक अरजा/1488/395/सेवा 9 दिनांक 9-11-1990 च्या अन्वये रजा लेखा ठेवण्याच्या पद्धतीमध्ये सुधारणा करण्यात आली असून विनावेतन रजा कालावधी पुढील सहामाही रजा जमा करताना विनावेतन रजा कालावधी विचारात घेवून त्या प्रमाणात रजा कमी करणे आवश्यक आहे. तथापि काही प्रकरणी या प्रमाणे कार्यवाही झाली नसल्याचे दिसून आले..*** |

2011-2012मध्ये सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याच्या सेवा पुस्तकाची तपासणी केली असता खालील प्रमाणे लेखा परीक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत..

शासन निर्णय क्रमांक अरजा/1488/395/सेवा 9 दिनांक 9/11/1990 अन्वये दिनांक 01/01/1991 पासून राज्य शासनाने रजा खाती दिनांक 1 जानेवारी आणि 1 जुलै रोजी अग्रिम रजा दाखविणे आवश्यक आहे. मात्र अशा प्रकारे आग्रीम रजा देताना मागील सहामाही कालावधीत विना वेतन रजा कालावधीसाठी 10 दिवसाला एक या प्रमाणे अर्जित रजा तसेच 18 दिवसाला एक या प्रमाणे अर्धवेतनी रजा संबधित कर्मचाऱ्याच्या रजा लेख्यातून वजा करणे आवश्यक आहे. काही निवडक सेवा पुस्तकातील रजा लेख्याची तपासणी केली असता खालील प्रकरणी विना वेतन कालावधीसाठी यथा प्रमाण रजा वजा करण्यात आलेल्या नसल्याचे दिसून आले.

1.संतोष रामपाल लोट सफाई कामगार हे दिनांक 10/09/2004 रोजी दिवंगत झाले. त्यांच्या रजा लेख्याची तपासणी केली असता त्यांच्या नियुक्तीच्या तारखेपासून म्हणजेच दिनांक 26/02/1993 पासून दिनांक 04/08/2002 पर्यंत 571 विनावेतन रजा झाल्याचे दिसून आले. मात्र त्यासाठी वर नमूद केल्याप्रमाणे रजा वजा केल्याचे दिसून आले नाही. तरी या प्रमाणे रजा वजा न केल्याने त्यांच्या कुटुंबास रजा सममूल्य वेतनाचे अतिप्रदान झालेले आहे. त्याची परीगणना करून रक्कम संबंधिताकडून वसुल करावी.

2.कचरू लक्ष्मण भालेराव सफाई कामगार हे दिनांक 16/03/2010 रोजी दिवंगत झाले त्यांना 22 शिल्लक दिवसाचे प्रदान करण्यात आले. मात्र जुलै 1998 पासून जून 2007 या कालावधीत 134 दिवस विना वेतन रजा झालेली असल्याने 13 दिवस अर्जित रजा वजा करून त्यांना केवळ 9 दिवसांचे अर्जित रजा सम मूल्य अदा करणे आवश्यक होते. तथापि त्यांना 22 दिवसाचे सम मूल्य प्रदान केल्याने रु.4298 चे अति प्रदान झालेले आहे.

3.केलाबाई मापचंद दाबोलीया सफाई कामगार यांचा दिनांक 20/6/1999 ते डिसेंबर 2003 या कालावधीत 42 दिवस विना वेतन रजा झाल्याने 5 दिवस रजा कमी न केल्याने रु.1489 चे अधिक प्रदान झालेले आहे.

या बाबत संबंधित विभागास अर्ध समास ज्ञापन क्रमांक 30 दिनांक 20/11/2013 अन्वये विचारणा करण्यात आली होती. विभागाने कोणतेही उत्तर दिले नाही'

DATDBWM5801 (Ref No : 131, Hmm No : 30)

## *90 परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना विलंबाने सुरु करण्याबाबत.*

**अंशदान निवृत्ती वेतन योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*म.न.पां.निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***शासन निर्णय क्रमांक अनियो/1005/126/सेवा-4 दिनांक 31-5-2005 अन्वये राज्य शासनाने नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना दिनांक 1-11-20058 नंतर सेवेत लागलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना सदरील योजना लागू करणे आवश्यक असताना उल्हास नगर महानगर पालिकेने ती 2011-2012 पर्यंत लागू न केल्याने संबंधित कर्मचारी सदर योजनेच्या लाभा पासून वंचित राहिलेले आहेत.***

शासन निर्णय क्रमांक अनियो/1005/126/सेवा-4, दिनांक 31.05.2005 अन्वये राज्यशासनाने दिनांक 01.11.2005 रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यांसाठी नविन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना अंमलात आणली आहे त्याप्रमाणे नोव्हेंबर-2005 नंतर नियुक्त केलेल्या कर्मचा-यांना सदरील परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू करणे आवश्यक होते. तथापी उल्हासनगर महानगरपालिकेने सदरील योजना 2011-2012 पर्यंत लागू केलेली नाही. सदर बाब कर्मचारी तसेच मनपाच्या दृय्टीने योग्य व हितावह नाही. केंद्रशासनाने तसेच राज्यशासनाने सदरील योजना राबविणे बंधनकारक केले असल्याने ती वेळीच राबविणे आवश्यक होते मात्र ती त्याप्रमाणे न केल्याने शासनाच्या वरील शासन निर्णयाचे उल्लंघन झालेले आहे. त्याचप्रमाणे उपरोक्त शासन निर्णयाच्या परिच्छेद क्रमांक 6 ड अन्वये कर्मचा-यांच्या नियुक्तीच्या पुढच्या महिन्यापासून त्यांच्या वेतनातून वेतन अधिक महागाई वेतन यांच्या 10 % रक्कम व तेवढीच मनापाची रक्कम संबंधीत कर्मचा-याच्या खाती जमा होणे आवश्यक आहे. मात्र याप्रमाणे कार्यवाही न केल्याने यात कर्मचा-यांचे नुकसान झालेले आहे.संबंधित कर्मचारी योजनेच्या लाभापासून वंचित राहिले आहेत. सदर योजना 2011-12 पर्यंत लागू न करण्याचे स्पष्टीकरण लेखा परीक्षणास सादर करण्याबाबत अर्ध समास ज्ञापन क्रमांक 31 दिनांक 20/11/2013अन्वये विचारणा करण्यात आली होती. लेखा विभागाने पत्र क्रमांक 293 दिनांक 30/11/2013 अन्वये अनुपालन दिलेले असून विलंबाबाबत कोणतेही समर्पक स्पष्टीकरण त्यात दिलेले नाही.

DATDBWM5801 (Ref No : 138, Hmm No : 31)

## *91 जेएनएनयुआरएम योजनेंतर्गत उल्हासनगर शहरात पाणी पुरवठा योजना कामाच्या अंदाजपत्रकातील बाबींचा दर व म.जी.प्रा. च्या जिल्हा दर सुचीमधील दरातील तफावत त्याचप्रमाणे इतर बाबींबाबत..*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*केंद्र/राज्य/मनपा निधी*

*अनियमितता कलम : ९ड*

***जेएनएनयुआरएम योजनेंतर्गत उल्हासनगर शहरात पाणी पुरवठा योजना कामाच्या अंदाजपत्रकातील बाबींचा दर व म.जी.प्रा. च्या जिल्हा दर सुचीतील दरात तफावत आहे. बाजारभावाप्रमाणे निश्चित केलेल्या बाबी, पंप हाऊसचे दर विश्लेषण प्राप्त् झाले नाही. पंपिंग मशिनरी, स्टोरेज रिझर्व्ह, वितरण योजना, हाऊस कनेक्शन , मिटरींग सिस्टम व शिफटींग युटिलिटीज इ. कामाच्या अंदाजपत्रकीय रकमेबाबत लेखे अप्राप्त् आहेत.***

1. जेएनएनयुआरएम योजनेंतर्गत उल्हासनगर शहरात पाणी पुरवठा योजना कामाच्या अंदाजपत्रकातील बाबींचा दर व म.जी.प्रा. च्या जिल्हा दर सुचीमधील दरात खालीलप्रमाणे तफावत आहे.

| **अ.क्र.** | **बाबीचा तपशिल** | **अंदाजपत्रकातील दर रुपये** | **जिल्हा दर सुचीतील दर रुपये** |
|---|---|---|---|
| **1.** | **Providing,erecting,connecting CI D/F Sluice Values without bypass** | | |
| | 450 mm | 119152 | 112652 |
| | 200 mm | 26007 | 23007 |
| | 250 mm | 39717 | 35717 |
| | 500 mm | 154041 | 145541 |
| | 400 mm | 97540 | 91040 |
| **2.** | **Lowering ,laying MS Special** | | |
| | 250 mm to 500 mm | 504.90 | 382+10%38.2=420.2 |
| | 500 mm to 750 mm | 580.80 | 441+10%44.1=485.1 |
| **3.** | **Lowering,laying Kinetic air valves** | | |
| | 100 mm dia | 302.50 | 287+10%28.7=315.7 |
| | 50 mm dia | 207.90 | 217+10%21.7=238.7 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **4.** | **Field wielding in all position** | | | |
| | But Joint | 471.90 | 385+10%38.5=423.5 | |
| | Lap Joint | 281.60 | 194+10%19.4=213.4 | |
| **5.** | **Providing and applying Lining** | | | |
| | 9mm thick for pipes upto 700mm dia | 268.40 | 244+10%24.4=248.4 | |
| **6.** | **Providing and Supplying BWSC pipes** | | | |
| | 800 mm | 6893 | 6092 | |
| | 700 mm | 5846 | 5131 | |
| | 600 mm | 4823 | 4213 | |
| | 500 mm | 3673 | 3212 | |
| | 450 mm | 3245 | 2849 | |
| | 400 mm | 2973 | 2609 | |
| **7.** | **Hydraulic Testing of MS pipeline** | 33913 | 33862 | |
| **8.** | **Providing Cement Plaster in 20mm thick in a single coats in cement mortar 1:3** | 116.105 | 110.25+10%11.0=121.25 | |

त्याचप्रमाणे खालील मुदयांबाबत माहीती प्राप्त् झालेली नाही.

**2.** Designing and Pushing of Steel casting pipe of 273.1 mm OD dia चे पाईप रु.75000/- प्रती मीटर बाजारभावाप्रमाणे निश्चित केले आहेत. जिल्हा दरसुचीत सदर बाबीचा दर उपलब्ध नसलेबाबत उल्लेख केलेला नाही. बाजारभावाप्रमाणे दर निश्चित करण्याबाबतचा प्राधिकर उपलब्ध केला नाही.

3. Designing,constructing RCC over head Pump house चे दर विश्लेषण प्राप्त् झाले नाही..

4. Providing and applying waterproof plastic emulsion paint चा प्रती चौ .फुट दर रु.27.5/- जिल्हा दरसुचीत आढळत नाही.

5. पंपिंग मशिनरी, स्टोरेज रिझर्व्ह , वितरण योजना, हाऊस कनेक्शन ,मिटरींग सिस्टम व शिफटींग युटिलिटीज कामाच्या अंदाजपत्रकीय रकमेची ज्या लेख्याच्या आधारे निश्चिती करण्यात आली होती. ते लेखे/ माहीती उपलब्ध् झालेली नाही.

उपरोक्त अ.क्र.2 ते 5 बाबतची माहीती/लेखे उपलब्ध न झाल्याने प्रदानाबाबत साधार व परीपुर्ण पडताळणी करता आलेली नाही. अर्धसमास ज्ञापन क्र.205 दि.26.02.2014 मध्ये वरील मुद्द्यांची विचारणा केली असता अनुपालन अप्राप्त् आहे.

## *92 पाणी पुरवठा विभागामार्फत टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याच्या निविदा प्रक्रियेतील तसेच मुदतीअंती कंत्राटदार नेमणूकीतील त्याचप्रमाणे प्रदान केलेल्या रकमेबाबत अनियमितता...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :321-2510 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 14256000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 9380.00/-

***टँकरद्वारे पाणी पुरवठा करणेकरीता आवश्यक असलेल्या ठिकाणाचे सक्षम प्राधिका-याने केलेले निरीक्षण अहवाल लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून दिले नाही. अंदाजपत्रकीय रकमेची निश्चिती करण्यात आलेली कागदपत्रे तपासणीकरीता उपलब्ध करून देणेत आली नाहीत. नवीन निविदा निवड कार्यवाही न करता मुदतवाढ दिलेली आहे. नवीन ठेकेदारांना विहीत मंजूरीविना कार्यादेश देण्यात आले आहेत. टँकरद्वारे पुरविण्यात आलेल्या पाण्याचे कोणतेही शुल्क संबंधिताकडून आकारले जात नसल्याने मोठी रक्कम टँकर भाडयापोटी तसेच विकत घेण्यात आलेल्या पाण्यासाठी मनपाकडून अदा झाली आहे. तसेच ठेकेदाराची मागणी बिजके व उल्हासनगर महानगरपालिकेचे प्रदान आदेशावरील फेरी केलेल्या कॅम्प यामध्ये तफावत आहे.***

कामाचे नाव: उल्हासनगर कॅम्प क्र.1 ते 5 पाणी टंचाईग्रस्त् परिक्षेत्रात कमीतकमी 7000 लि. क्षमता असलेल्या टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे..

निविदा सुचना क्र.01 /2008-09

अंदाजपत्रकीय रक्कम रु.79,18,118/-

अनामत रक्कम रु.79,181/-

कामाची मुदत:- 6 महीने

प्रशासकीय मंजूरी क्रमांक:- स्थायी समिती ठराव क्र.55 दि.28/08/2008

कार्यादेश क्र. युएमसी/डब्लुएसएसडी/ईएफ-2961 दि.18/11/2008

ठेकेदाराचे नाव:- मे.हरदिप रोडवेज,कल्याण(प.)

माहे सप्टेंबर 2011 मध्ये टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात आल्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक | दिनांक | धनादेश क्र. | कंत्राटदाराचे नाव | निव्वळ अद |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | केलेली रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2653 | 05/09/2011 | 843756 | मे.गायत्री वॉटर सप्ला. | 419588/- |
| 2 | 2898 | 20/09/2011 | 847621 | मे.हरदिप रोडवेज | 437667/- |
| 3 | 2913 | 21/09/2011 | 847619 | मे.हरदिप रोडवेज | 739740/- |
| 4 | 2914 | 21/09/2011 | 847622 | मे.हरदिप रोडवेज | 595106/- |
| 5 | 2926 | 21/09/2011 | 847618 | मे.गायत्री वॉटर सप्ला. | 371628/- |
| 6 | 2940 | 22/09/2011 | 847619 | मे.शुभम कंस्ट्र. | 403731/- |
| | | | | एकूण | 2967460/- |

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात उंच सखल भाग असल्यामूळे जलवाहीनीद्वारे पाण्याचा पुरेसा पुरवठा होत नसल्यामूळे पाणी पुरवठा विभागामार्फत टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो. त्या अनुषंगाने उपलब्ध झालेल्या अभिलेख्यांचे अवलोकन केले असता निदर्शनास आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.25 व 26 दि.07/11/2013 दिले असता अनुपालन प्राप्त झालेले नाही.तरी खालीलप्रमाणे अभिप्राय कायम ठेवण्यात येत आहेत.

1. टँकरद्वारे पाणी पुरवठा करणेकरीता कॅम्प क्रमांक 1 ते 5 अंतर्गत असलेल्या क्षेत्राची निवड करण्याकरीता विचारात घेण्यात आलेली माहीती त्याचप्रमाणे टॅकरद्वारे पाणी पुरवठा करणेसाठी सक्षम प्राधिका-याचा स्थळ पाहणी अहवाल लेखा परीक्षणाकरीता उपलबध करून देण्यात आलेला नाही. त्यामुळे टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे अत्यावश्यक असल्याबाबत खात्री होत नाही.

2. टँकरद्वारे पाणी पुरवठा करणेकरीता निविदा सुचना क्र.01 For 2008-09 द्वारे वृत्तपत्रात प्रकाशित करण्यात आलेल्या जाहीरातीचे मुळ पृष्ठ लेखापरीक्षणाकरीता प्राप्त झाले नाही. त्यामुळे निविदेची प्रसिध्दी जाहीरातीद्वारे शासनाच्या विहीत नियमानूसार करण्यात आलेची खात्री करणे शक्य झाले नाही.

3. अंदाजपत्रकीय रक्कम परीगणीत करतांना टँकरच्या 31110 फे-या(अंदाजीत) रु.254.52 प्रती फेरी याप्रमाणे सहा महीन्याकरीता एकूण रु.79,18,118/- इतकी अंदाजपत्रकीय रक्कमेची निश्चिती करण्यात आलेली आहे. सदर अंदाजपत्रकीय रक्कम ज्या प्राधिकारानूसार निश्चित करण्यात आली, त्याबाबतचा अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्यामूळे अंदाजपत्रकीय रक्कम,फे-या व दराबाबत खात्री करणे शक्य झाले नाही.

4. उपरोक्त निविदेच्या अनुषंगाने निवीदा नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देणेत आलेली नाही.त्यामुळे निविदा प्रक्रियेची नोंद नोंदवहीत घेण्यात आलेची सत्यता पडताळणी करता आली नाही.

5.उपरोक्त निविदा निश्चितीकरीता निवड समिती स्थापन करण्यात आली होती किंवा कसे? याबाबत माहीती लेखे उपलब्ध करून दिले नाही.त्यामुळे निविदा प्रक्रिया शासनाच्या निकषाप्रमाणे झाली असल्याची खात्री होत नाही.

6. Detailed Tender Notice मधील (बी) नूसार शासकीय / निमशासकीय संस्थेचा नोंदणीकृत परवाना किंवा प्राकलनेच्या 20% रकमेचा कोणत्याही शेडयुल्ड बँक / राष्ट्रीयकृत बँकेचा पतदारीचा दाखला (Solvency Certificate) निविदाकाराकडून घेणे आवश्यक आहे. सदर दाखला लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने निविदेतील अटी व शर्तीनूसार निविदा प्रक्रिया झाल्याची खात्री होत नाही.

7. Detailed Tender Notice मधील (ए) नूसार कार्यकारी अभियंता यांनी प्रमाणित केलेले शासकीय / निमशासकीय संस्थेकडील किंमान एक वर्षाचा टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याच्या कामाचा अनुभवाचे प्रमाणपत्राची मुळ प्रत लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून दिलेली नाही. त्यामुळे अनुभवी कंत्राटदारास काम देण्यात आलेची खात्री होत नाही.

8.टँकर भरण्यात येत असलेल्या स्थळी नियुक्त करण्यात येत असलेल्या पर्यवेक्षक व सुरक्षा रक्षकांच्या नावाची यादी, पाणी पुरवठा करणेकरीता वापरण्यात येणा-या टँकरचे आर.टी.ओ.कडील नोंदणी प्रमाणपत्र (आर.सी.) ची साक्षांकीत प्रत व संबंधित टँकर चालक व वाहकांच्या नावाची यादी निविदाकाराने तांत्रिक कागदपत्रांसोबत सादर करणे आवश्यक असतांना सदर लेखे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देणेत आलेले नाही.त्यामुळे टँकर पॉईंट येथील सुरक्षा व त्यांचेवरील नियंत्रण , वापरण्यात येणा-या टँकरची वैधता , टँकर चालक व वाहकांचे Identification इत्यादी बाबींसंदर्भात कार्यवाही होत असलेबाबत खात्री होत नाही.

9. मे.हरदिप रोडवेज यांचे निविदा मंजूरीनंतर एकूण 31110 फे-यांकरीता रु.270/- प्रमाणे एकूण रु.83,99,700/- इतक्या रकमेचा करारनामा रु.8400/- चे मुद्रांक शुल्क आकारून करणे आवश्यक असतांना करारनामा रु.100/- च्या मुद्रांक पेपरवर करण्यात आलेला आहे. तरी उर्वरीत रु.8300/- इतके कमी भरणा केलेले मुद्रांक शुल्क 0030- मुद्रांक व नोंदणी या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावे.

10.मे.हरदिप रोडवेज यांना कार्यादेश क्र.2961 दि.18.11.2008 नूसार सहा महिन्याकरीता ठेका देण्यात आला होता.सदर ठेक्याचा कालावधी दि.24.05.2009 पर्यंत आहे हे निश्चित असतांना त्यापुर्वी नवीन निविदा कार्यवाही होणे आवश्यक होते. परंतू त्याप्रमाणे कार्यवाही न होता दि.24.05.2009 ते दि. 15.04.2010 कालावधीकरीता मे.हरदिप रोडवेज यांचे ठेक्यास मुदतवाढ दिल्याने अनियमितता झालेली आहे.

11. मे.हरदिप रोडवेज यांना उपरोक्त क्र.11 नूसार मुदतवाढ देण्यात आली होती. तदनंतर सदर ठेकेदार टँकरद्वारे पाणी पुरवठा करणेकामी दुर्लक्ष करत असल्यामुळे खालील कंत्राटदारांना टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याबाबतचे अतिरीक्त आदेश प्रशासकीय मंजूरीविना निविदा प्रक्रिया न राबविता देण्यात आले आहेत.

अ. मे.शुभम कंस्ट्रक्शन,उल्हासनगर -कार्यादेश क्र. उमपा/पापु/काअ/1749 दि.12.07.2010

ब. मे.गायत्री वॉटर सप्लायर्स, उल्हासनगर-- कार्यादेश क्र.उमपा/पापु/काअ/1486 दि.01.06.2010

क. मे. जयराम वॉटर सप्लायर्स,उल्हासनगर-- कार्यादेश क्र. उमपा/पापु/काअ/1467 दि.28.05.2010

ड. मे.श्वेता ट्रान्सपोर्ट,कल्याण-- कार्यादेश क्र. उमपा/पापु/काअ/1467 दि.28.05.2010

12. पाणी पुरवठा योजना स्वयंपूर्ण होण्यासाठी नगरविकास विभाग,शासन नि. क्र.Misc.2009/CR207/01UD-20 दि.02.08.2010 अन्वये सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी पाणी पुरवठा योजनेंतर्गत पुरवठा करण्यात आलेल्या पाण्याच्या दरात सुधारणा करणे आवश्यक आहे,ज्यामुळे पाणी पुरवठा योजना "ना-नफा, ना-तोटा" तत्वावर राबविता येईल.अशा सुचना देण्यात आलेल्या आहेत.

उल्हासनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागामार्फत महानगरपालिका क्षेत्रात उंच -सखल भागात जलवाहीनीद्वारे कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्यामुळे टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याकरीता टँकर मालकास भाडेपोटी प्रती फेरी रु.270/ प्रमाणे रक्कम अदा केल्यामूळे महानगरपालिकेस वित्तीय वर्ष2011-12 मध्ये टँकर भाडयापोटी एकूण रु.142.56 लक्ष इतकी रक्कम अदा करण्यात आलेली आहे. परंतू टँकरद्वारे पुरवठा करण्यात आलेल्या पाण्याचे नि:शुल्क आकारणी महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे. पाणी पुरवठा योजना तोटयात असण्यास हे एक कारण आहे. पाणी पुरवठा योजना स्वयंपुर्ण होणेकरीता टँकरद्वारे पुरवठा करण्यात येत असलेल्या पाण्यावर शुल्क आकारणे आवश्यक आहे.

13. टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याबाबतचे कार्यादेशातील अट क्र.16 अन्वये पर्यवेक्षकीय अभियंता(पाणी पुरवठा) यांनी टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याबाबत लेखी आदेश देणे आवश्यक आहे. सदर आदेशांच्या स्थळप्रती लेखा परीक्षणाकरीता उपलब्ध न करुन दिल्यामुळे झालेल्या फे-या सक्षम प्राधिका-याच्या मंजूरीनूसारच झाल्या असल्याची खात्री झालेली नाही.

14. Details Specification of Tender मधील अट क्र. 4 नुसार टँकरमध्ये पाणी भरणेच्या ठिकाणी नोंदवही(वेळ,वार्ड क्रमांक व नाव,वाहन क्रमांक व इतर माहीतीसह) ठेवणे आवश्यक आहे. सदर नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्यामुळे टँकरच्या फे-यांची तसेच उचलण्यात आलेल्या पाण्याच्या परिमाणाची,पाणी पुरवठा करणेकरीता निर्गमित झालेल्या टँकरच्या स्थळाची पडताळणी झालेली नाही.

15. Details Specification of Tender मधील अट क्र. 5 नुसार जेथे टँकरद्वारे पाणी पुरविण्यात आले आहेत. तेथील जास्तीत जास्त नागरिकांची / नगरसेवकांची पाणी पुरविलेबाबत पोच् घेणे आवश्यक आहे. परंतू सदर पोच पावत्या लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्यामुळे टँकर पॉईंटवरून निघालेले टँकरद्वारे सक्षम प्राधिका-याच्या आदेशाप्रमाणेच विहीत ठिकाणी पाणी पुरविल्याची पडताळणी झालेली नाही.

16. General Condition of Tender मधील अट क्र.1 अन्वये दिवसभरात टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात आलेल्या फेरी,वार्डनिहाय तसेच इतर माहीती पाणी पुरवठा विभागास सादर करणे आवश्यक आहे. सदर अहवाल लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्यामुळे पाणी पुरवठा विभागातील संबंधित प्राधिका-यांचे सदर पाणी पुरवठयावर नियंत्रण असलेची खात्री होत नाही.

17. प्रमाणक क्रमांक 2898 च्या अनुषंगाने वार्डनिहाय विवरणपत्रक तपासले असता एकूण 1741 टँकर फेरी झाली असल्याची नोंद असतांना 1743 फेरींचे प्रदान करण्यात आले आहे. अतिरीक्त 2 फेरींचे रु.540/- ठेकेदाराकडून वसुलपात्र आहे.

18. प्रमाणक क्रमांक 2913 च्या वार्डनिहाय विवरणपत्रकानूसार वार्ड क्रमांक 0 (शुन्य) क्षेत्रात दिनांक

01/01/2011 व दिनांक 02/01/2011 रोजी प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण दोन वेळा टँकरद्वारे पाणी पुरवठा केल्याचे निदर्शनास आले आहे.तरी सदर 2 फेरींचे रु.540/- ठेकेदाराकडून वसुलपात्र आहे.

19. प्रमाणक क्र..2913 सोबत असलेल्या कंत्राटदाराच्या बिजकावर (Invoice No.183) जाने.11कॅम्प क्र.1ते3 ला पाणी पुरवठा केल्याची नोंद असून त्याप्रमाणे रकमेची मागणी केली आहे. उल्हासनगर म.पा.यांचे प्रदान आदेशावर कँम्प क्र.4 व 5 ला पाणी पुरवठा केल्याची नोंद असून त्याचप्रमाणे वार्डनिहाय विवरणपत्रावर कॅम्प क्र.3 व 4 ला पाणी पुरवठा केल्याची नोंद आहे. अशाप्रकारे सर्व कागदपत्रकांत विसंगती असतांनादेखील कोणतीही खात्री न करता ठेकेदारास रक्कम अदा करण्यात आली आहे.

20. प्रमाणक क्र.2913 सोबत असलेल्या कंत्राटदाराच्या बिजकावर (Invoice No.181) डिसें.10कॅम्प क्र.1ते3 ला पाणी पुरवठा केल्याची नोंद असून त्याप्रमाणे रकमेची मागणी केली आहे. उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रदान आदेशावर कँम्प क्र.4 व 5 ला पाणी पुरवठा केल्याची नोंद असून त्याचप्रमाणे वार्डनिहाय विवरणपत्रावर कॅम्प क्र.4 व 5 ला पाणी पुरवठा केल्याची नोंद आहे. अशाप्रकारे सर्व कागदपत्रकांत विसंगती असतांनादेखील कोणतीही खात्री न करता ठेकेदारास रक्कम अदा करण्यात आली आहे.

21. प्रमाणक क्र.2940 चे लेखापरीक्षण केले असता मे.शुभम कंस्ट्र. यांनी विहीत नमून्यात बिजके (Invoice) सादर केलेली नसतांनादेखील टँकर भाडे प्रदान करण्यात आले आहे.

DATPVWM7501 (Ref No : 82, Hmm No : 25)

## *93 महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ यांचेकडून खरेदी करण्यात आलेल्या पाणी देयकाबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :312-2510 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ यांचेकडून खरेदी केलेल्या पाणी शुल्क व विलंब आकाराची रु.26079.43 लक्ष इतकी मोठी रक्कम देणे थकीत आहे. पाणी लेखापरीक्षण करण्यात आलेले नाही.***

माहे सप्टेंबर 2011 मध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ यांचेकडून पाणी पुरवठा करण्यात

आल्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्र | धना. क्र. | कंत्राटदाराचे नाव | निव्वळ अदा केलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | 3079 | 847628 | महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ | 500000/- |
| 2 | 3080 | 848212 | महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ | 25000000/- |
| | | | एकूण | 25500000/- |

त्यानुषंगाने अर्धसमास ज्ञापन क्र.35 दि.21/11/2013 रोजी देण्यात आले असता प्राप्त् अनुपालनात थकीत पाणी बिलाबाबत तपशिल सादर करण्यात येत असल्याचे व पाणी लेखापरीक्षण झाले नसल्याचे नमूद आहे. उपरोक्तप्रमाणे उपलब्ध लेख्यांच्या लेखापरीक्षणांती खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

उल्हासनगर महानगरपालिका महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ यांचेकडून सन 1994 पासून रु.7/- प्रती हजार लि. (रु.7000/- Per MLD) पाणी खरेदी करुन महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांना पुरवठा करते. महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ यांचेकडून खरेदी केलेल्या पाण्याचे शुल्क विहीत कालावधीत महामंडळास अदा न केल्यामुळे खालीलप्रमाणे रक्कम अदा करणे प्रलंबित आहे.

A) डिसेंबर 1994 ते जून 2002 पर्यंत खालीलप्रमाणे थकबाकी होती.

6) निव्वळ पाणी पुरवठा देयक थकबाकी रु.3400.94/- लक्ष

7) विलंब आकार रु.3680.80/- लक्ष

एकूण रु.7081.74/- लक्ष

B) महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ यांचे पत्र क्र. काअ/स्वीस 4/ 6430/सन 2011 दि.19/09/2011 अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेकडे माहे ऑगस्ट 2011 अखेर पर्यंत

5) निव्वळ पाणी पुरवठा देयक थकबाकी रु.8652.247/- लक्ष

6) मीटर नादुरुस्तीचा दंडनिय आकार रु. 200.704/- लक्ष

7) मंजूर कोटयापेक्षा जास्त पाणी वापरावरील दंडात्मक आकार रु.1352.310/- लक्ष

8) विलंब आकार रु.8762.432/- लक्ष

एकूण रु.18997.694/- लक्ष

उपरोक्त (A)प्रमाणे निव्वळ पाणी पुरवठा देयक थकबाकीची रक्कम रु.3400.94 लक्ष अदा करणेकरीता रु.85

लक्षप्रमाणे 41 हप्त्यात थकबाकीची पुर्ण रक्कम अदा केल्यास विलंब आकाराची रक्कम रु.3680.80 लक्ष माफ करण्यात येणार होती. परंतू प्राप्त विवरणपत्रानूसार माहे सप्टें.2013 पर्यंत एकूण रु.1300.00लक्ष इतकीच रक्कम महामंडळास अदा करण्यात आली असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे विलंब आकार माफ करण्याच्या सवलतीचा लाभ महानगरपालिकेने घेतला नाही.

त्याचप्रमाणे वित्तीय वर्ष 2011-12 मध्ये महाराष्ट्र औदयागिक विकास महामंडळाच्या पाणी शुल्क मागणी देयकानूसार उल्हासनगर महानगरपालिकेला पुरवठा करण्यात आलेल्या पाण्याचे परिमाण 1821.899 MLD आहे, तर उल्हासनगर महानगरपालिकेच्या रेकॉर्डनूसार महामंडळाकडून घेण्यात आलेल्या पाण्याचे परिमाण 1325.166 MLD आहे,ज्यामुळे 496.733 MLD इतक्या परिमाणाची तफावत आहे. सदर तफावत जेथून पाणी महामंडळाकडून उचलण्यात येते तेथे बसविण्यात आलेले पाण्याचे मीटर खराब असल्यामूळे होत असल्याचे निदर्शनास येते. खराब झालेले पाण्याचे मीटर दुरूस्त करणेची जबाबदारी महानगरपालिकेची असल्याने सदर खराब मीटर तात्काळ दुरूस्त करणे आवश्यक होते. परंतू सदर मीटर तात्काळ दुरूस्त न केल्यामूळे महामंडळाकडून रु.200.704 लक्ष इतकी दंडनिय रक्कम आकारण्यात आलेली आहे. त्यामुळे उल्हासनगर महानगरपालिकेवर अनावश्यकपणे आर्थिक भार पडलेला आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेस महामंडळाकडून 120 MLD पाण्याचे परिमाण मंजूर असतांना वित्तीय वर्ष 2011-12 मध्ये खालीलप्रमाणे मंजूर कोटयापेक्षा जादा पाणी महामंडळाकडून घेण्यात आले आहे. त्यामुळे मंजूर कोटयापेक्षा जास्त पाण्याची उचल केल्यामुळे MIDC कडून दंडाची रक्कम रु.1352.310/- लक्ष इतकी आकारणी करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | महिना | परिमाण MLD मध्ये (As Per MIDC) | परिमाण MLD मध (As Per UMC) |
|---|---|---|---|
| 1 | एप्रिल 2011 | 147.631 | 113.450 |
| 2 | मे 2011 | 144.635 | 112.792 |
| 3 | जुन 2011 | 149.956 | 111.595 |
| 4 | जुलै 2011 | 145.384 | 107.847 |
| 5 | ऑगस्ट 2011 | 150.983 | 108.115 |
| 6 | सप्टेंबर 2011 | 150.092 | 112.105 |
| 7 | ऑक्टोबर 2011 | 152.726 | 112.447 |
| 8 | नोव्हेंबर 2011 | 150.000 | 105.091 |

| | | | |
|---|---|---|---|
| 9 | डिसेंबर 2011 | 159.425 | 110.431 |
| 10 | जानेवारी 2012 | 161.677 | 110.431 |
| 11 | फेब्रुवारी 2012 | 157.706 | 110.431 |
| 12 | मार्च 2012 | 151.684 | 110.431 |
| | एकूण | 1821.899 | 1325.166 |

MIDC कडून उचल करण्यात आलेल्या पाण्याचे परिमाणाच्या शुल्क व विलंब दंडाची रक्कम विहित कालावधीत अदा न केल्यामुळे महामंडळाकडून महानगरपालिकेस पाण्याचा पुरवठा कमी किंवा बंद करणेबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. महानगरपालिकेकडून नागरिकांना पुरवठा करण्यात आलेल्या पाण्याचे शुल्क घराच्या बांधकामानूसार व वापरानूसार खालीलप्रमाणे आकारण्यात येते.

| अ.क्र. | बांधकामाचे स्वरुप | पाण्याचे दर प्रती महा |
|---|---|---|
| 1 | आर सी सी व टिअर गर्डर बांधकाम | रु. 150/- |
| 2 | पत्र्याचे छत व विट बांधकाम | रु. 75/- |
| 3 | झोपडपटटीधारक | रु. 60/- |

| अ.क्र. | वापराचा प्रकार | पाण्याचे दर प्रती महा |
|---|---|---|
| 1 | वाणिज्य | रु. 26/- |
| 2 | सामाजिक संस्था (विशेष) | रु. 15/- |

वित्तीय वर्ष 2011-12 अखेरपर्यंत महानगरपालिकेने पाण्याच्या शुल्कात वाढ केलेली नाही. त्यामुळे पाणी पुरवठा योजनेतून वित्तीय वर्ष 2011-12 मध्ये रु.1766.33 लक्ष इतकी वसुलीची रक्कम जमा झाली असून रु.4398.97 इतकी रक्कम पाणी पुरवठा योजना राबविण्याकरीता खर्च करण्यात आली आहे. त्यामुळे रु.2632.64 लक्ष इतक्या रकमेचा पाणी पुरवठा योजनेस तोटा झाल्याचे दिसून येते. ज्यामुळे पाणी पुरवठा योजना स्वयंपुर्ण होणेचे उदिदष्ट साध्य करण्यास महानगरपालिकेस अडचणी निर्माण होत आहेत.

मा.आयुक्त,उल्हासनगर महानगरपालिका यांचे कार्यालयीन आदेश क्र.उमपा/आका/581

दि.30.12.2011 अन्वये MIDC व उल्हासनगर महानगरपालिका यांचेमध्ये पाणी खरेदीच्या अनुषंगाने प्रलंबित रकमेच्या तफावतीबाबत परीमाणावर व रक्कमेवर एकमत होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे पाणी पुरवठा विभागाचे पाणी खरेदी -खर्च व इतर बाबींचे पाणी लेखापरीक्षण होणे आवश्यक आहे.

DATPVWM7501 (Ref No : 83, Hmm No : 35)

### *94 महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळास अदा करण्यात आलेल्या विज देयकांतील अनियमिततेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :840-2212 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 2796585.00/-

***मुंबई विज शुल्क अधिनियम 1956 च्या नियम 2(क)(1)(क) नूसार शासकीय, निमशासकीय कार्यालयांना विज शुल्क माफ करण्यात आलेले असतांना पंपिग स्टेशन व इतर ठिकाणच्या विज देयकात विदयुत वितरण कं.कडून रु.2794975/- इतकी विज शुल्काची आकारणी केल्यामुळे विज मंडळास जादा रक्कम अदा करण्यात आलेली आहे.***

1) उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये असलेल्या पाणी पुरवठा विभागाच्या अधिनस्त पंपिग स्टेशन व इतर ठिकाणच्या विज देयकापोटी खालीलप्रमाणे रक्कम विज मंडळास अदा करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक | दिनांक | धनादेश क्रमांक | कंत्राटदाराचे नाव | निव्वळ अदा केलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2416 | 02/09/2011 | 843888 | महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळ | 72350/- |
| 2 | 2633 | 03/09/2011 | 843819 | महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळ | 700/- |
| 3 | 2634 | 03/09/2011 | 843817 | महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळ | 630/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 4 | 2692 | 09/09/2011 | 842021 | महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळ | 1210/- |
| 5 | 2736 | 13/09/2011 | 848228 | महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळ | 8580/- |
| 6 | 2737 | 13/09/2011 | 848229 | महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळ | 7870/- |
| 7 | 2740 | 13/09/2011 | 848230 | महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळ | 11140/- |
| 8 | 2850 | 17/09/2011 | 847589 | महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळ | 710/- |
| 9 | 2851 | 17/09/2011 | 847590 | महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळ | 640/- |
| 10 | 2959 | 23/09/2011 | 847641 | महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळ | 630/- |
| 11 | 2960 | 23/09/2011 | 847640 | महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळ | 4496/- |
| 12 | 3045 | 29/09/2011 | 847761 | महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळ | 41530/- |
| 13 | 3046 | 29/09/2011 | 847759 | महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळ | 430300/- |
| 14 | 3047 | 29/09/2011 | 847760 | महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळ | 31980/- |
| 15 | 3048 | 29/09/2011 | 847765 | महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळ | 2280/- |
| 16 | 3049 | 29/09/2011 | 847752 | महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळ | 513200/- |
| 17 | 3054 | 29/09/2011 | 847781 | महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळ | 11420/- |
| | | | | एकूण | 1139666/- |

उपरोक्त प्रदानाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे माहीती/लेखे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झालेले नाहीत. अ.क्र. 1,2,3,8,9,11 ते 17 च्या विदयुत देयकाच्या मुळ प्रती भरणा केलेल्या विज मंडळाच्या पावतीसह लेखा परीक्षणाकरीता उपलब्ध झाल्या नाहीत. त्यामुळे सदर वीज देयकांच्या खर्चाचे लेखापरीक्षण करता आले नाही. याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.34 दि.21/11/2013 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे.

2) मुंबई विज शुल्क अधिनियम 1956 च्या नियम 2(क)(1)(क) नूसार शासकीय, निमशासकीय कार्यालयांना विज शुल्क माफ करण्यात आलेले आहे.उल्हासनगर पाणी पुरवठा विभागांतर्गत पंपिंग स्टेशनवरील विज देयकात विज शुल्काची आकारणी केल्याने खालीलप्रमाणे जादा रकमा प्रदान करण्यात आल्या असल्याचे निदर्शनास आले आहे.

| Sr. No. | Consumer No. | Name of Pumping Station | Bills for the Periods | Total Electricity Duty Paid Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | 21519011813 | Shantinagar Pumping Stn. | Dec.09 To Jan-12 | 378971 |
| 2 | 20219011661 | Nehrunagar Pumping Stn. | Apr-10 To Mar-12 | 20607 |
| 3 | 21519021166 | Dasera (South) Pumping Stn. | Apr-10 To Mar-12 | 156677 |
| 4 | 21519012038 | Sub-Div. Netaji Pumping Stn | Apr-10 To Mar-12 | 807741 |
| 5 | 21519021950 | Chopda Maidan Pumping St. | Apr-10 To Mar-12 | 133853 |
| 6 | 21519003888 | Anandnagar Pumping Stn. | Apr-10 To Mar-12 | 803630 |
| 7 | 21519021650 | Dasera (North) Pumping Stn. | Apr-10 To Mar-12 | 211777 |
| 8 | 21519021670 | Takshashila Pumping Stn. | Apr-10 To Feb-12 | 210193 |
| 9 | 21519021810 | Birla Garden Pumping Stn. | Apr-10 To Mar-12 | 70025 |
| | | **Total Electricity Duty Paid** | | **27,93,474** |

| अ.क्र. | प्रमाणक क्र. | ग्राहक क्र. | बिलाचा महीना | बिलाची रक्कम रु. | Electricity duty Paid Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2737 | 021513071199 | ऑग.2011 | 790 | 125.80 |
| 2 | 2737 | 021513043349 | ऑग.2011 | 6930 | 900.86 |
| 3 | 2740 | 021513064451 | ऑग.2011 | 380 | 50.70 |
| 4 | 2740 | 021513071849 | ऑग.2011 | 5140 | 395.86 |
| 5 | 2692 | 021510334016 | ऑग.2011 | 210 | 27.99 |
| | | | | | 1501.21 i.e.1501) |

याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.115 दि.23.01.2014 रोजी दिले असता विद्युत वितरण कं.सोबत झालेल्या पत्रव्यवहाराच्या साक्षांकीत प्रती अनुपालनास्तव सादर केलेल्या आहेत. सदर कागदपत्रांच्या अवलोकनांती महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी यांनी विज शुल्क माफ केले असल्याचे दिसून येते परंतू तरीही विदयूत बिलात विज कंपनीकडून विज शुल्क आकारण्यात येत असल्याचे निदर्शनास आले.

**उपरोक्तप्रमाणे विज शुल्क अदा केल्यामूळे वरील कालावधीत रु.27,94,975/- इतकी जादा रक्कम विदयूत वितरण कं.मर्या. यांना अदा करण्यात आली आहे. तरी** उपरोक्तप्रमाणे तसेच इतर कालावधीतील विज शुल्काची यापुर्वी झालेल्या जादा प्रदान रकमेची परीगणना करून सदर रक्कम आगामी विज बिलात समायोजित करणेची कार्यवाही करावी.

**2)** खालील विज देयकांचा भरणा विलंबाने केल्यामूळे विलंब शुल्क आकारण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्र. | ग्राहक क्र. | विज बिल रक्कम | देयकाचा अपेक्षित भरणा दिनांक | देयकाचा प्रत्यक्ष भरणा दिनांक | विलंबाने भरणा केल्यामुळे प्रदान रक्कम(रु.) | जादा प्रदान रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2736 | 021510652395 | 4230/- | 02/09/2011 | 15/09/2011 | 4360/- | 130/- |
| 2 | 2736 | 021512016941 | 3570/- | 31/08/2011 | 15/09/2011 | 3680/- | 110/- |
| 3 | 2737 | 021513042130 | 40/- | 31/08/2011 | 15/09/2011 | 50/- | 10/- |
| 4 | 2737 | 021513071199 | 790/- | 31/08/2011 | 15/09/2011 | 830/- | 40/- |
| 5 | 2737 | 021513043349 | 6930/- | 31/08/2011 | 15/09/2011 | 7260/- | 330/- |
| 6 | 2740 | 021514001119 | 3770/- | 31/08/2011 | 15/09/2011 | 3800/- | 230/- |
| 7 | 2740 | 021510819125 | 1760/- | 31/08/2011 | 15/09/2011 | 1820/- | 40/- |
| 8 | 2740 | 021513064451 | 380/- | 31/08/2011 | 15/09/2011 | 400/- | 20/- |
| 9 | 2959 | 021514455250 | 1250/- | 12/09/2011 | 23/09/2011 | 1270/- | 20/- |
| 10 | | 021514468173 | 31860/ | 22/09/2011 | 28/09/2011 | 32240/- | 380/- |
| 11 | 2740 | 021513071849 | 5140/- | 31/08/2011 | 15/09/2011 | 5300/- | 160/- |
| 12 | 2692 | 021510123406 | 990/- | 29/08/2011 | 08/09/2011 | 1020/- | 130/- |
| 13 | 2692 | 021510334016 | 210/- | 31/08/2011 | 08/09/2011 | 220/- | 10/- |
| | | | | | | एकूण | 1610/- |

विज देयकांचा विहीत कालावधीत भरणा न केल्याने जादा रक्कम विज मंडळास अदा केल्याने मनपाचे आर्थिक नूकसान झाले आहे. तरी विलंब शुल्कावरील खर्च रु.1610/-आक्षेपाधिन करण्यात येत आहे.

**3)**

| अ.क्र. | प्रमाणक क्र. | तपशिल | धनादेश क्र. | दुरध्वनी देयकाची अदा रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| 1 | 2760 | BSNL | 847763 | 8904/- |
| 2 | 3044 | BSNL | 842041 | 6992/- |
| | | | | 15896/- |

उपरोक्तबाबत दुरध्वनी बीलाच्या मुळ प्रती लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाल्या नाहीत.

सबब,सदर लेख्यांचे लेखापरीक्षण होवू शकले नाही.

DATPVWM7501 (Ref No : 84, Hmm No : 34)

## *95 भुयारी गटार निगा अंतर्गत केलेल्या कामातील त्रुटींबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :332-2432 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 570561.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 128191.00/-

***निविदा नस्ती व हिस्ट्री नोंदवही लेखापरीक्षणकरीता उपलब्ध करण्यात आली नाही. मजूरांना दरसुचीपेक्षा जादा दराने दैनिक मजूरी प्रदान करण्यात आलेली आहे. नगरपालिका अभियंता यांनी केलेल्या कामाचा निरिक्षण अहवाल अप्राप्त आहे. मजूरांचे हजेरीपुस्तक प्राप्त झाले नाही. कंत्राटदाराने सादर केलेले इनव्हॉईस प्राप्त झाले नाहीत. भुयारी गटार 2010-11 साठी उल्हासनगर कॅ. क्र.4 साठी वार्षिक तत्वावर दुरुस्ती व देखभाल करणे कामातून सुरक्षा ठेव व मुल्यवर्धित कर कपात केलेला नाही.***

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात पाणी पुरवठा व जल-मल नि:सारण विभागामार्फत भुयारी गटार निगा लेखाशिर्षांतर्गत माहे सप्टे.2011 मध्ये खालीलप्रमाणे रक्कम खर्च करण्यात आलेली आहे.निदर्शनास आलेल्या त्रुटींसंदर्भात अर्धसमास ज्ञापन क्र.74 दि.16.01.2014 अन्वये अनुपालन मागविले असता उत्तर अप्राप्त आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्र., दिनांक व चेक क्र. | तपशिल | देयकाची स्थुल रक्कम (रु.) | सुरक्षा रक्कम (रु.) | आयकर वजाती (रु.) | VAT (रु.) | कामाचा विमा (रु.) | उपकर (रु.) | निव्वळ देय रक्क (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2650/ 5.9.2011- 842011 | भुयारी गटार 2010-11 साठी उल्हासनगर कॅ. क्र.4साठी वार्षिक तत्वावर दुरुस्ती व देखभाल करणे-IIRA | 251549 | 12578 | 5031 | --- | ---- | 2516 | 231424 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **(मे.गुरुनानक म.स.संस्था)** | | | | | | | |

| **अ.क्र.** | **कामाचा तपशिल** | |
|---|---|---|
| 1 | ठेकेदाराचे नाव | मे.गुरूनानक मजूर सह.संस्था |
| 2 | अंदाजपत्रकीय रक्कम | रु.690876/- |
| 3 | तांत्रिक मान्यता क्र. | 18 दि.04/07/2010 |
| 4 | प्रशासकीय मान्यता क्र. | मा.आयुक्त यांची मान्यता |
| 5 | कार्यादेश क्र. | 1958 दि.16/08/2010 |
| 6 | कामाचा कालावधी | 1 वर्ष (365 दिवस) |
| 7 | बिलाचा प्रकार | दुसरे धावते देयक |
| 8 | मोजमाप पुस्तिका क्रमांक | 11/95 पृष्ठ क्र.161 ते 168 |

| अ.क्र. | प्रमाणक क्र., दिनांक व चेक क्र. | तपशिल | देयकाची स्थुल रक्कम (रु.) | सुरक्षा रक्कम (रु.) | आयकर वजाती (रु.) | VAT (रु.) | कामाचा विमा (रु.) | उपकर (रु.) | निव्वळ देय रक्क (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 2695/ 9.9.2011-843796 | भुयारी गटार 2010-11 साठी उल्हासनगर शहर कॅम्प क्र.2 साठी वार्षिक तत्वावर दुरुस्ती व देखभाल करणे **(मे.विनायक म.स.संस्था)** | 319012 | ----- | 6380 | ----- | ----- | 3190 | 309442 |

| **अ.क्र.** | **कामाचा तपशिल** | |
|---|---|---|
| 1 | ठेकेदाराचे नाव | मे.विनायक मजूर सह.संस्था |
| 2 | अंदाजपत्रकीय रक्कम | रु.322444/- |
| 3 | तांत्रिक मान्यता क्र. | 24 दि.05/07/2010 |
| 4 | प्रशासकीय मान्यता क्र. | मा.आयुक्त यांची मान्यता |
| 5 | जिल्हा उपनिबंधकाची मान्यता क्र. | 630 दि.24/06/2010 |

| | | |
|---|---|---|
| 6 | कार्यादेश क्र. | 1766 दि.13/07/2010 |
| 7 | कामाचा कालावधी | 1 वर्ष (365 दिवस) |
| 8 | बिलाचा प्रकार | प्रथम व अंतिम देयक |
| 9 | मोजमाप पुस्तिका क्रमांक | 31-बी पृष्ठ क्र.161 ते 168 |
| 10 | काम पुर्ण दिनांक | 25/07/2011 |

उपरोक्त खर्चाबाबत उपलब्ध अभिलेख्यांवरुन खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. उपरोक्त कामांच्या संदर्भात निविदा नस्ती लेखापरीक्षणाकरीता उपलबध करून देण्यात आलेली नाही. त्यामुळे निविदा प्रक्रिया विहीत नियमानूसार झाली असलेबाबत पडताळणी करता आलेली नाही. त्याचप्रमाणे History Register उपलब्ध न झाल्याने ठेकेदाराने पुर्वी केलेल्या कामाची माहीती प्राप्त झालेली नाही.

2. सार्व.बांधकाम विभागाच्या वित्तीय वर्ष 2009-10 च्या जिल्हा दर सुचीनूसार कुशल मजूरांचा प्रती दिन दर रु.224/- प्रती मजूर असतांना अ.क्र. 1 च्या कामासंदर्भात रु.264/- प्रती दिन प्रती मजूर याप्रमाणे 1707 दिवसांचे रु.450648/- इतकी रक्कम अदा केल्यामुळे रु.68280/- इतक्या रकमेचे अतिप्रदान झाले आहे. त्याचप्रमाणे अ.क्र.2च्या कामासंदर्भात 1099 दिवसांचे रु.290136/- इतकी रक्कम अदा केल्यामुळे रु.43960/-इतक्या रकमेचे अतिप्रदान झाले आहे.

3. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 172 अन्वये नगरपालिका अभियंता काम चालू असतांना सर्व प्रकारच्या कामातील जितक्या कामाची तपासणी करणे शक्य होईल तितक्या कामांची तपासणी करील. तसेच त्याबाबतचे निरीक्षण अहवाल लेखापरीक्षणासाठी त्यांनी उपलब्ध केले पाहीजेत. अशी तरतूद आहे. उपरोक्त सर्व कामांबाबतचे नगरपालिका अभियंता यांचे निरीक्षण अहवाल लेखा परीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाहीत.

4. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 183 अन्वये कामाची नोंदवही नमुना क्रमांक 139 प्रमाणे ठेवणे आवश्यक आहे. परंतु सदर नोंदवही क्र.11/95 लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झालेली नाही.त्यामुळे झालेले काम तसेच प्रदान योग्य् प्रकारे करण्यात आल्याची खात्री करता येत नाही. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 180(3) नुसार रक्कम प्रदान करतांना मोजमाप पुस्तिकेतील नोंदीवर लाल शाईने फुली मारणे आवश्यक असतांना अ.क्र..2 च्या कामाची मोजमाप नोंदवहीत त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

5. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 179 अन्वये जेव्हा कोणतेही काम कामगाराकडून करण्यात येईल तेव्हा, नमुना क्रमांक 134 प्रमाणे त्या कामाच्या प्रभारी अधिका-याने हजेरीपट ठेवून त्यात रोजच्या रोज नोंदी केल्या पाहीजेत. परंतू उपरोक्त कामासंदर्भात ठेवण्यात आलेले हजेरीपट लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देण्यात आले नाही. त्यामुळे मजूरीच्या अनुषंगाने योग्य प्रदान झाल्याची खात्री होत नाही.

6. राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहितेमधील नियम क्र.12.82 (डी) नूसार कंत्राटदाराकडून प्राप्त झालेल्या

बिल / इनव्हाईसची नोंद Journalise केल्यानंतरच कंत्राटदारास प्रदान करणेचे आवश्यक असतांना उपरोक्त कामासंदर्भात (बिजके)Invoice / चलन त्याचप्रमाणे नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. ज्यामूळे प्रदानाच्या योग्यतेबाबत खातरजमा होत नाही.

7. उपरोक्त अ.क्र.1 च्या कामासंदर्भात प्रदान रकमेच्या स्थुल रकमेमधून सुरक्षा ठेव रक्कम रु.15950.6 (15951/-) इतकी कपात करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

DATPVWM7501 (Ref No : 85, Hmm No : 74)

## *96 मलप्रवाह वाहनाच्या दुरूस्तीच्या अनुषंगाने प्रदानातील त्रुटींबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :362-2460 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 44998.00/-

***दरपत्रके जाहीरातीस विस्तृत प्रसिध्दी दिलेली नाही.होस पाईपचे दरपत्रकातील मान्य केलेले दर वाजवी असल्याबाबत विभागाकडून खात्री करण्यात आलेली नाही.वाहनाची हिस्ट्री नोंदवही प्राप्त झालेली नाही. जेटींग होस पाईप बसविलेबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला Installation अहवाल प्राप्त झाला नाही. जुना होस पाईप भांडार कक्षात जमा करणे/ निर्लेखन करणेची कार्यवाही झालेबाबत नोंदवही प्राप्त न झाल्याने खात्री झालेली नाही.***

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात पाणी पुरवठा व जल-मल नि:सारण विभागामार्फत मलप्रवाह वाहन निगा लेखाशिर्षांतर्गत माहे सप्टे.2011 मध्ये खालीलप्रमाणे रक्कम प्रदान करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्र., दिनांक व चेक क्र. | तपशिल | देयकाची स्थुल रक्कम (रु.) | सुरक्षा रक्कम (रु.) | आयकर वजाती (रु.) | मुल्यवर्धित कर (रु.) | कामाचा विमा (रु.) | उपकर (रु.) | निव्वळ देय रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 3062 / 29/09/ | सिव्हरेज संक्शन वाहन क्र. MH-05-N-53 वाहनाचे ¾” | 44998 | ---- | 900 | ----- | ----- | ------- | 44098 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 2011-847785 | जेटींग होस पाईप बसविणेबाबत (60 मीटर) | | | | | | | |

| अ.क्र. | कामाचा तपशिल | |
|---|---|---|
| 1 | ठेकेदाराचे नाव | मे.एन.डी.ट्रेडींग कं. |
| 2 | दरपत्रक सुचना क्र. | 75 दि.21.06.2011 |
| 3 | कार्यादेश क्र. | 139 दि.12/09/2011 |
| 4 | बिलाचा प्रकार | प्रथम व अंतिम देयक |

उपरोक्त खर्चाच्या संबंधात उपलब्ध लेख्यावरून निदर्शनास आलेल्या त्रुटींसंदर्भात अर्धसमास ज्ञापन क्रमांक 73 दि.16.01.2014 रोजी दिले असता अर्धसमास ज्ञापनातील अभिप्रायाप्रमाणे भविष्यात कार्यवाही करण्यात येईल,असे अनुपालनात नमूद आहे. सबब, पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. संबंधित वाहनाची हिस्ट्री नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध् झालेली नाही. त्यामुळे होस पाईप संबंधात यापुर्वी झालेल्या खर्चाबाबतची पडताळणी करता आली नाही.

2. जेटींग होस पाईप बसविलेबाबत सक्षम प्राधिका-याने Installation अहवाल दिल्यानंतरच रक्कमेचे प्रदान होणे आवश्यक होते. परंतू तसा अहवाल प्राप्त न करता रक्कम अदा करण्यात आली आहे.

3. नवीन होस पाईप वाहनास बसविण्यात आल्यानंतर जुना होस पाईप वाहन विभागाच्या भांडार विभागात जमा केलेबाबत किंवा भंगारात विक्री केले किंवा कसे याबाबत खात्री करणेकरीता भंगार सामानाची नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.

DATPVWM7501 (Ref No : 86, Hmm No : 73)

## *97 भुयारी गटार जोडणी साहीत्य निगा अंतर्गत केलेल्या कामातील त्रुटींबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :332-2432 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 67751.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 6432.00/-

| |
|---|
| ***महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 अन्वये रेखांकीत नकाशासह कार्यवाही झाली असल्याचे निदर्शनास*** |

***आले नाही. त्याचप्रमाणे History Register उपलब्ध झालेले नाही. कामाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष जागेच्या संबंधात स्थानिक निरीक्षण अंतिम तपशिलवार अंदाज आढळून आले नाहीत.दरसुचीपेक्षा अतिरीक्त वाढ देण्यात आलेली आहे. पाईपांची हायड्रोलिक चाचणी न करता पुर्ण प्रदान केले आहे. स्वामित्वधनाची रक्कम शासन जमा केलेली नाही.नगरपालिका अभियंता यांचे तपासणी अहवाल प्राप्त झाले नाही.***

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात पाणी पुरवठा व जल-मल नि:सारण विभागामार्फत भुयारी गटार जोडणी साहित्य निगा लेखाशिर्षांतर्गत माहे सप्टे.2011 मध्ये खालीलप्रमाणे रक्कम प्रदान करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्र., दिनांक | तपशिल | देयकाची स्थुल रक्कम (रु.) | सुरक्षा रक्कम (रु.) | आयकर वजाती (रु.) | मुल्यवर्धित कर (रु.) | कामाचा विमा (रु.) | उपकर (रु.) | निव्वळ देय रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2628/ 03.09.11 | उल्हासनगर कॅम्प क्र.3 मधील वार्ड क्र.29 येथील बॅरॅक क्र.1190 सरस्वती सागर अपार्ट.जवळ 200 MM व्यासाची S.W. मलवाहीनी टाकणे (**कलश म.का.स.संस्था**) | 67751 | 3388 | 1355 | 2710 | 678 | 678 | 58942 |

| **अ.क्र.** | **कामाचा तपशिल** | |
|---|---|---|
| 1 | ठेकेदाराचे नाव | मे.कलश मजूर सह.संस्था |
| 2 | अंदाजपत्रकीय रक्कम | रु.67751/- |
| 3 | तांत्रिक मान्यता क्र. | 147 दि.01/10/2010 |
| 4 | प्रशासकीय मान्यता क्र. | मा.आयुक्त यांची मान्यता |
| 5 | जिल्हा उपनिबंधकाची मान्यता क्र. | 3422 दि.14/10/2010 |
| 6 | कार्यादेश क्र. | 4217 दि.22/10/2010 |
| 7 | कामाचा कालावधी | 30 दिवस |
| 8 | बिलाचा प्रकार | प्रथम व अंतिम देयक |
| 9 | मोजमाप पुस्तिका क्रमांक | 23 पृष्ठ क्र.198 ते 200 |

| | | |
|---|---|---|
| 10 | काम पुर्ण दिनांक | 18/11/2010 |

उपरोक्त खर्चाच्या संबंधात उपलब्ध अभिलेख्याच्या लेखापरीक्षणांती निदर्शनास आलेल्या त्रुटींसंदर्भात अर्धसमास ज्ञापन क्र.72 दि.16.01.2014 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे.सबब,खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.त्याचप्रमाणे देयकाची रक्कम रु.67751/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

1. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 158 अन्वये नगरपालिकेच्या बांधकामांचे सर्व अंदाज , नगरपालिका अभियंता यांच्या कडून (अ) प्रशासनिक मंजुरीसाठी रेखांकित नकाशे व जोते क्षेत्रफळासह प्राथमिक अंदाज (ब) तांत्रिक मंजुरीसाठी अंतिम तपशिलवार नकाशे व अंदाज यांचेसह असणे आवश्यक आहे. परंतू उपरोक्त नियमाप्रमाणे रेखांकीत नकाशासह कार्यवाही झाली असल्याचे निदर्शनास आले नाही. त्याचप्रमाणे History Register उपलब्ध झालेले नाही.

2. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 165 अन्वये कामाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष जागेच्या संबंधात स्थानिक निरीक्षण अंतिम तपशिलवार अंदाज तयार करण्याअगोदर केले पाहीजे. परंतू उपरोक्त नियमाप्रमाणे अनुसरणेत आलेल्या कार्यवाहीबाबत अहवाल आढळून आले नाहीत.

3. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची सन 2009-10 ची जिल्हा दर सुचीमधील सर्वसाधारण सुचना अ.क्र.7(a) नुसार नगरपालिका क्षेत्रातील कामाकरीता दर सुचीतील दरापेक्षा अतिरीक्त 5% दरवाढ अनुज्ञेय असतांना सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करतांना तसेच प्रत्यक्ष खर्चाची रक्कम अदा करतांना 10% अतिरीक्त दरवाढ दिल्याने त्याचप्रमाणे दरसुचीतील अ.क्र. 9 नूसार पुरवठा करण्यात आलेल्या पाईप,व्हॉल व इतर साहित्यावर 5% वाढ अनुज्ञेय नसतांना प्रदान झाल्याने कंत्राटदारास एकूण् रु.3360/- अतिप्रदान झाले आहे.

4. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दरसूची सर्वसाधारण सुचना क्र 13.अन्वये पाईपचा पुरवठा ठेकेदाराने केल्यास 85% रक्कम अदा करून उर्वरित 15% रक्कम हायड्रोलीक चाचणी समाधानकारक झालेनंतर करणे आवश्यक आहे. लेखापरीक्षणाकरीता हॉयड्रोलीक चाचणी अहवाल उपलब्ध झाला नाही. 15% पाईपची रक्कम रु. 1306/-ठेकेदाराकडून सत्वर वसूल करावी.

5. महसूल व वनविभाग शा.नि.क्र.गौण खनीज/10/1009/सीआर/309/ख दि.11/2/2010 अन्वये रु.70.67 घ.मी.दराने देयकातून रॉयल्टी कपात करणे आवश्यक आहे. सदर कामासाठी खडी/वाळू/रबल इत्यादी साहित्याचा 24.99 घ.मी. वापर झाल्याने रॉयल्टीपोटी रक्कम रु.1766/-ठेकेदाराकडून वसुल करणे आवश्यक आहे.

6. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 172 अन्वये नगरपालिका अभियंता काम चालू असतांना सर्व प्रकारच्या कामातील जितक्या कामाची तपासणी करणे शक्य होईल तितक्या कामांची तपासणी करील. तसेच त्याबाबतचे निरीक्षण अहवाल लेखापरीक्षणासाठी त्यांनी उपलब्ध केले पाहीजेत, अशी तरतूद आहे. तरी उपरोक्त सर्व कामांबाबतचे नगरपालिका अभियंता यांचे निरीक्षण अहवाल लेखा परीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने कामाबाबतची सत्यता पडताळणी होत नाही.

7. राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहितेमधील नियम क्र.12.82 (डी) नूसार कंत्राटदाराकडून प्राप्त झालेल्या बिल / इनव्हाईसची नोंद Journalise केल्यानंतरच कंत्राटदारास प्रदान करणेचे आवश्यक असतांना उपरोक्त कामासंदर्भात (बिजके)Invoice / चलन त्याचप्रमाणे नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध

करून देण्यात आलेले नाही. त्यामूळे प्रदानाच्या योग्यतेबाबत खात्री होत नाही.
8. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 180(3) नुसार रक्कम प्रदान करतांना मोजमाप पुस्तिकेतील नोंदीवर लाल शाईने फुली मारणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही. त्याचप्रमाणे मोजमाप पुस्तिकेमधील नोंदी कामाच्या प्रगतीनूसार व दिनांकानूसार घेण्यात आल्याचे निदर्शनास आले नाही.

DATPVWM7501 (Ref No : 87, Hmm No : 72)

### *98 पावर पंप व पाणी पुरवठा साहित्य खरेदी व बसविणे अंतर्गत केलेल्या कामातील त्रुटींबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :316-3440 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1998493.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 435497.00/-

***महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 अन्वये रेखांकीत नकाशासह कार्यवाही झाली असल्याचे निदर्शनास आले नाही. त्याचप्रमाणे History Register उपलब्ध झालेले नाही. कामाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष जागेच्या संबंधात स्थानिक निरीक्षण अंतिम तपशिलवार अंदाज आढळून आले नाहीत.दरसुचीपेक्षा अतिरीक्त वाढ देण्यात आलेली आहे. पाईपांची हायड्रोलिक चाचण न करता पुर्ण प्रदान केले आहे. स्वामित्वधनाची रक्कम शासन जमा केलेली नाही.नगरपालिका अभियंता यांचे तपासणी अहवाल प्रापत् झाले नाही.***

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात पाणी पुरवठा व जल-मल नि:सारण विभागामार्फत पावर पंप व पाणी पुरवठा साहित्य खरेदी व बसविणे लेखाशिर्षांतर्गत माहे सप्टे.2011 मध्ये खालीलप्रमाणे रक्कम खर्च करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्र ,दिनांक व चेक क्र. | तपशिल | देयकाची स्थुल रक्कम (रु.) | सुरक्षा रक्कम (रु.) | आयकर वजाती (रु.) | (VAT) (रु.) | कामाचा विमा (रु.) | उपकर (रु.) | निव्वळ देय रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2641/ | उल्हासनगर 5 मधील वॉर्ड क्र.66 मध्ये | 22694 | ---- | 454 | ----- | ----- | ---- | 22240 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 03.09.2011 | गणेश नगर सेक्शन 39 जवळील नाल्याचा कलर्व्हट बांधकामाचे ठिकाणी 80 MM व्यासाची G.I. जलवाहीनी टाकणे व नळजोडण्या स्थलांतरीत करणे | | | | | | | | |

| **अ.क्र.** | **कामाचा तपशिल** | |
|---|---|---|
| 1 | ठेकेदाराचे नाव | श्री.जी.बी.माने |
| 2 | अंदाजपत्रकीय रक्कम | रु.29760/- |
| 3 | निविदेचा प्रकार | दरपत्रक |
| 4 | तांत्रिक मान्यता क्र. | 206 दि.04/03/2011 |
| 5 | प्रशासकीय मान्यता क्र. | मा.आयुक्त यांची मान्यता |
| 6 | कार्यादेश क्र. | 317 दि.05/03/2011 |
| 7 | कामाचा कालावधी | 15 दिवस |
| 8 | बिलाचा प्रकार | प्रथम व अंतिम देयक |
| 9 | मोजमाप पुस्तिका क्रमांक | 03/2009 पृष्ठ क्र.51 ते 53 |
| 10 | काम पुर्ण दिनांक | 19/03/2011 |

| अ.क्र. | प्रमाणक क्र ,दिनांक व चेक क्र. | तपशिल | देयकाची स्थुल रक्कम (रु.) | सुरक्षा रक्कम (रु.) | आयकर वजाती (रु.) | VAT (रु.) | कामाचा विमा | उपकर (रु.) | निव्वळ देय रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 2649/05.09.2011-843743 | उल्हासनगर 4 सेक्शन 29 येथे महावीर अपार्ट. ते हरीजनपाडा वाल्मिकीनगर येथे 80mm व्यासाची G.I. | 131766 | 6588 | 2635 | 5271 | Insurance Policy | 1318 | 11595 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जलवाहीनी टाकणे | | | | | | | | |

| अ.क्र. | कामाचा तपशिल | |
|---|---|---|
| 1 | ठेकेदाराचे नाव | माजी सैनिक म.स.संस्था |
| 2 | अंदाजपत्रकीय रक्कम | 132105 |
| 3 | तांत्रिक मान्यता क्र. | 271 दि.08/02/2011 |
| 4 | प्रशासकीय मान्यता क्र. | मा.आयुक्त यांची मान्यता |
| 5 | जिल्हा उपनिबंधकाची मान्यता क्र. | 5066 दि.28/01/2011 |
| 6 | कार्यादेश क्र. | 168 दि.09/02/2011 |
| 7 | कामाचा कालावधी | 30 दिवस |
| 8 | बिलाचा प्रकार | प्रथम व अंतिम देयक |
| 9 | मोजमाप पुस्तिका क्रमांक | 45बी पृष्ठ क्र.103 ते 108 |
| 10 | काम पुर्ण दिनांक | 18/02/2011 |

| अ.क्र. | प्रमाणक क्र ,दिनांक व चेक क्र. | तपशिल | देयकाची स्थुल रक्कम (रु.) | सुरक्षा रक्कम (रु.) | आयकर वजाती (रु.) | VAT (रु.) | कामाचा विमा | उपकर (रु.) | निव्वळ देय रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 3039/29.09.2011-847705 | उल्हासनगर वॉर्ड क्र.26 रॉयल इम्रलॅन्ड अपार्ट. ते अमन सिनेमा पर्यंत 150 mm व्यासाची G.I. जलवाहीनी टाकणे | 2953357 | 47668 | 19067 | 38134 | Insur POLICY | 9534 | 83895 |

| अ.क्र. | कामाचा तपशिल | |
|---|---|---|
| 1 | ठेकेदाराचे नाव | मे.यश मजूर सह.संस्था |
| 2 | अंदाजपत्रकीय रक्कम | रु.952870/- |

| | | |
|---|---|---|
| 3 | तांत्रिक मान्यता क्र. | 295 दि.04/03/2011 |
| 4 | प्रशासकीय मान्यता क्र. | मा.आयुक्त यांची मान्यता |
| 5 | जिल्हा उपनिबंधकाची मान्यता क्र. | 6732 दि.22/03/2011 |
| 6 | कार्यादेश क्र. | 493 दि.30/03/2011 |
| 7 | कामाचा कालावधी | 45 दिवस |
| 8 | बिलाचा प्रकार | प्रथम व अंतिम देयक |
| 9 | मोजमाप पुस्तिका क्रमांक | 55बी पृष्ठ क्र.48 ते 50 |
| 10 | काम पुर्ण दिनांक | 29/04/2011 |

| अ.क्र. | प्रमाणक क्र ,दिनांक व चेक क्र. | तपशिल | देयकाची स्थुल रक्कम (रु.) | सुरक्षा रक्कम (रु.) | आयकर वजाती (रु.) | VAT (रु.) | कामाचा विमा (रु.) | उपकर (रु.) | निव्वळ देय रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 3041/29.09.2011-847707 | उ.न.3 मधील चोपडा कोर्ट ते शहेनशाह अपार्ट.पर्यंत 150mm 150 mm व्यासाची G.I. जलवाहीनी टाकणे | 890676 | 44534 | 17814 | 35627 | 8907 | 8907 | 77488 |

| **अ.क्र.** | **कामाचा तपशिल** | |
|---|---|---|
| 1 | ठेकेदाराचे नाव | मे.सिध्दांथ मजूर सह.संस्था |
| 2 | अंदाजपत्रकीय रक्कम | रु.890700/- |
| 3 | तांत्रिक मान्यता क्र. | 276 दि.08/02/2011 |
| 4 | प्रशासकीय मान्यता क्र. | मा.आयुक्त यांची मान्यता |
| 5 | जिल्हा उपनिबंधकाची मान्यता क्र. | 5977 दि.01/03/2011 |
| 6 | कार्यादेश क्र. | 433 दि.21/03/2011 |
| 7 | कामाचा कालावधी | 45 दिवस |
| 8 | बिलाचा प्रकार | प्रथम व अंतिम देयक |

| | | |
|---|---|---|
| 9 | मोजमाप पुस्तिका क्रमांक | 84 पृष्ठ क्र.134 ते 136 |
| 10 | काम पुर्ण दिनांक | 08/04/2011 |

उपरोक्त खर्चाच्या संबंधात उपलब्ध झालेल्या अभिलेख्यांवरुन निदर्शनास आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.69 दि.16.01.2014रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब,खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 158 अन्वये नगरपालिकेच्या बांधकामांचे सर्व अंदाज , नगरपालिका अभियंता यांच्या कडून (अ) प्रशासनिक मंजुरीसाठी रेखांकित नकाशे व जोते क्षेत्रफळासह प्राथमिक अंदाज (ब) तांत्रिक मंजुरीसाठी अंतिम तपशिलवार नकाशे व अंदाज यांचेसह असणे आवश्यक आहे. परंतू उपरोक्त नियमाप्रमाणे रेखांकीत नकाशासह कार्यवाही झाली असल्याचे निदर्शनास आले नाही. त्याचप्रमाणे History Register उपलब्ध झालेले नाही.त्यामुळे कामाच्या अचुकतेबाबत खात्री होत नाही.

2. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 165 अन्वये कामाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष जागेच्या संबंधात स्थानिक निरीक्षण अंतिम तपशिलवार अंदाज तयार करण्याअगोदर केले पाहीजे. परंतू उपरोक्त नियमाप्रमाणे अनुसरणेत आलेली कार्यवाहीबाबत अहवाल आढळून आले नाहीत.

3. मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम,1949 मधील कलम 73(ड) नूसार रु.5 लक्ष ते रु.25 लक्ष कामांकरीता मा.आयुक्तांनी त्यांच्या अधिकारात केलेल्या संविदा तदनंतर 15 दिवसात स्थायी समितीसमोर सादर करणे आवश्यक असतांना उपरोक्त अ.क्र.3 व 4 च्या कामासंदर्भात त्याप्रमाणे कार्यवाही अनुसरणेत आलेली नाही.

4. उपरोक्त अ.क्र. 1 कामाच्या अनुषंगाने मागविण्यात आलेली दरपत्रके जाहीरातीस विस्तृत प्रसिध्दी न देता मागविण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे.

5. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची सन 2009-10 ची जिल्हा दर सुचीमधील सर्वसाधारण सुचना अ.क्र.7(a) नुसार नगरपालिका क्षेत्रातील कामाकरीता दर सुचीतील दरापेक्षा अतिरीक्त 5% दरवाढ अनुज्ञेय असतांना उपरोक्त कामांचे अंदाजपत्रक तयार करतांना तसेच प्रत्यक्ष खर्चाची रक्कम अदा करतांना 10% अतिरीक्त दरवाढ दिल्याने त्याचप्रमाणे दरसुचीतील क्र.9 नूसार पुरवठा केलेल्या पाईप,व्हॉल ,स्पेशल व इ. साहीत्य यांचेवर 5% वाढ अनुज्ञेय नसतांना कंत्राटदारास अ.क्र. 1,2,3, व 4 च्या कामांत अनुक्रमे रु.2573/-,रु.14995/-,रु.82903/- व रु.34499/- असे एकूण रु.134970/- इतके अतिप्रदान झाले आहे.

6. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दरसूची सर्वसाधारण सुचना क्र 13.अन्वये पाईपचा पुरवठा ठेकेदाराने केल्यास 85% रक्कम अदा करून उर्वरित 15% रक्कम हायड्रोलीक चाचणी समाधानकारक झालेनंतर करणे आवश्यक आहेहायड्रोलीक परीक्षणास लेखा. चाचणी अहवाल उपलब्ध झाला नाही .अ.क्र. 1,2,3, व 4 च्या कामातील

15% पाईपची रक्कम अनुक्रमे रु.2756/-,रु.12213/-,रु.135802/- व रु.123725/- असे एकूण रु.274496/- ठेकेदाराकडून वसूल करावे.

7. महसूल व वनविभाग शा.नि.क्र.गौण खनीज/10/1009/सीआर/309/ख दि.11/2/2010 अन्वये रु.70.67 घ.मी.दराने देयकातून रॉयल्टी कपात करणे आवश्यक आहे. सदर कामासाठी खडी/वाळू/रबल इत्यादी साहित्याचा अ.क्र.1,2,3 व 4 च्या कामात अनुक्रमे 6.84, 23.75, 100.65 व 153.93 घ.मी. वापर झाल्याने रॉयल्टीपोटी एकूण रक्कम रु.20156/-ठेकेदाराकडून वसुल करणे आवश्यक आहे.

8. उपरोक्त अ.क्र.1 च्या कामासंदर्भात पुर्वीचा 15 mm पाईपाचे 10 नगाची नोंद भंगार नोंदवहीत घेण्यात आली असल्याचे भंगार नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने खात्री करता आली नाही.

9. उपरोक्त अ.क्र.1 च्या कामासंदर्भात मोजमाप पुस्तीकेतील खोदकामाची लांबी 18 Rmt नोंदविण्यात आले असल्याचे निदर्शनास येते. परंतू मुळ अंदाजपत्रकामध्ये तसेच कामाच्या अनुषंगाने प्रदान रक्कमेतील पाईपाची लांबी 24 Rmt आहे. म्हणजेच 6 Rmt पाईपाची जादा रक्कम रु. 3378/- ठेकेदारास प्रदान करण्यात आलेली आहे.तरी सदर रककम वसुलपात्र आहे.

10. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 172 अन्वये नगरपालिका अभियंता काम चालू असतांना सर्व प्रकारच्या कामातील जितक्या कामाची तपासणी करणे शक्य होईल तितक्या कामांची तपासणी करील. तसेच त्याबाबतचे निरीक्षण अहवाल लेखापरीक्षणासाठी त्यांनी उपलब्ध केले पाहीजेत. अशी तरतूद आहे. तरी उपरोक्त सर्व कामांबाबतचे नगरपालिका अभियंता यांचे निरीक्षण अहवाल लेखा परीक्षणाकरीता उपलब्ध झाले नसल्याने कामाच्या पर्यवेक्षनाबाबत खात्री होत नाही.

11. राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहितेमधील नियम क्र.12.82 (डी) नूसार कंत्राटदाराकडून प्राप्त झालेल्या बिल / इनव्हाईसची नोंद Journalise केल्यानंतरच कंत्राटदारास प्रदान करणेचे आवश्यक असतांना उपरोक्त कामासंदर्भात (बिजके)Invoice / चलन त्याचप्रमाणे नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. त्यामूळे कामाच्या गुणवत्तेबाबत तसेच प्रदानाबाबत खात्री होत नाही.

12. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 183 अन्वये कामाची नोंदवही नमुना क्रमांक 139 प्रमाणे ठेवणे आवश्यक आहे. परंतु अ.क्र. 2 व 3 च्या कामाची नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झालेली नाही.त्यामुळे झालेले काम तसेच प्रदान योग्य झालेबाबत खात्री करता येत नाही. त्याचप्रमाणे अ.क्र.4 च्या कामाची मोजमाप पुस्तिका क्र.84 उपलब्ध करून देण्यात आली असता सदर मोजमाप पुस्तिकेमधील पृ.क्र.134 ते 136 वर संबंधित कामाचा तपशिल नोंदविलेला नाही.

13. उपरोक्त अ.क्र.1 च्या कामासंदर्भात प्रदान रकमेच्या स्थुल रकमेमधून सुरक्षा ठेव रक्कम रु.1135/- इतकी कपात करण्यात आलेली नाही.

14. सार्व.बांधकाम विभाग. शा.नि. बीडीजी/2005/प्र.क्र. 324/इमारती 2 दि.03.03.2006 अन्वये अनोंदणीकृत कंत्राटदारांना देय असलेल्या स्थुल रकमेमधून 4% इतकी मुल्यवर्धित कराची रक्कम कपात करून शासन जमा करणे आवश्यक असतांना उपरोक्त अ.क्र.1च्या कामाच्या अनुषंगाने प्रदान रकमेमधून मुल्यवर्धित कराची रक्कम अ.क्र.1 संबंधात रु.908/- कपात करण्यात आलेली नाही.

15. वित्त विभाग शा.नि.विकास/1098/प्र.क्र.29/98/शासन हमी दि.19.08.1998 अन्वये 1% कंत्राटी कामाचा विमा वित्तीय शिस्तीची बाब म्हणून शासकीय विमा निधीकडे उतरविणे आवश्यक आहे. उपरोक्त अ.क्र.1 च्या कामातून विमा रक्कम रु.227/-कपात करण्यात आलेली नाही.

16. उदयोग,उर्जा व कामगार विभाग,शा.नि.क्र.बीसीए/2009/प्र.क्र.108/कामगार 7अ दि.17.06.2010 अन्वये 1% मजूर उपकराची रक्कम कपात करणे आवश्यक असतांना रु.227/- इतकी रक्कम कपात करण्यात आलेली नाही.

17. उपरोक्त अ.क्र.2 च्या कामाचा अंदाजपत्रकासोबतचा कामाच्या अनुषंगाने नकाशा व प्रत्यक्ष काम पुर्ण झाले नंतरचा नकाशा यामधील प्रत्यक्ष कामाच्या नकाशामधील काम कमी करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे. परंतू अंदाजपत्रकाप्रमाणेच पुर्ण रक्कम अदा करण्यात आलेली आहे. नकाशामध्ये पाईपची लांबी नमूद नसल्यामूळे त्याचप्रमाणे मोजमाप पुस्तिका उपलब्ध न झाल्याने अतिप्रदानाची निश्चित परीगणना करणे शक्य होत नाही. तरी सदर अतिप्रदानाची परीगणना करून वसुली करावी.

18. उपरोक्त अ.क्र.2 च्या कामाच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकातील एकूण रक्कम रु.132105/- असतांना तांत्रिक मंजूरी रु.132905/- ला घेण्यात आली आहे.

19. उपरोक्त अ.क्र.1 च्या कामातील बाब क्र.2 संबंधात ठोक रक्कम रु.1865/- , अ.क्र.2 च्या मातील बाब क्र.2 संबंधात ठोक रक्कम रु.6732.96 , अ.क्र.3 च्या कामातील बाब क्र.8 संबंधात ठोक रक्कम रु.40300/- व अ.क्र.4 च्या कामातील बाब क्र.3 संबंधात ठोक रक्कम रु.20000/- चे दर विश्लेषण (Rate Analysis) प्राप्त झाले नाही.

<u>वसुलपात्र रक्कम</u>

1. पुरवठा केलेल्या मालावर 5% जादा प्रदान रु. 134970/-

2. हॉयड्रोलिक चाचणी अहवाल अप्राप्त 15%जादा प्रदान रु. 274496/-

3.रॉयल्टी रु.20156/-

4. सुरक्षा ठेव रक्कम रु.1135/-

5.मुल्यवर्धित कर रु.908/-

6.कंत्राटी कामाचा विमा रु. 227/-

<u>7.उपकर रु.227/-</u>

एकूण वसुलपात्र रक्कम रुपये 435497/-

DATPVWM7501 (Ref No : 88, Hmm No : 69)

***99 जल (प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण) उपकर अधिनियम,1977 अन्वये आकारण्यात आलेल्या उपकर थकबाकीबाबत...***

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :564-2440 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***जल ( प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम,1974 व जल ( प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण) उपकर अधिनियम,1977 अन्वये उल्हासनगर मनपा क्षेत्रातील सांडपाण्यावर जल- मल नि: सारण केंद्रातून पुरेशा प्रमाणात प्रक्रिया न झाल्याने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळाकडून उपकराची आकारणी केलेली आहे. तरी पुरेशा क्षमतेचे जल- मल नि: सारण केंद्राची निर्मिती करणे आवश्यक आहे.***

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात पाणी पुरवठा व जल-मल नि:सारण विभागामार्फत जल ( प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण) उपकर अधिनियम,1977 अन्वये आकारण्यात आलेल्या उपकरापोटी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास खालीलप्रमाणे रक्कम वित्तीय वर्ष 2011-12 मध्ये अदा करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक | दिनांक | धनादेश क्रमांक | अदा केलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | 647 | 13.05.2011 | 815740 | 2696530 |
| 2 | 4402 | 26.12.2011 | 868825 | 122760 |
| 3 | 4403 | 26.12.2011 | 868824 | 2010 |
| 4 | 4490 | 30.12.2011 | 856436 | 388000 |
| | | | एकूण | 3209300 |

उपरोक्त प्रदानांबाबत उपलब्ध लेख्यांच्या अवलोकनांती निदर्शनास आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.70 दि.16.01.2014 रोजी दिले असतां सर्व पत्रव्यवहार महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ

यांचे नस्तीत असल्याचे अनुपालनात नमूद आहे. त्यामुळे प्राप्त् अनुपालन समाधानकारक नसल्याने खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

**अ)** जल (प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम,1974 मधील कलम 33 ए अन्वये महानगरपालिकेकडून वापरण्यात आलेल्या पाण्यावर (सांडपाण्यावर) उपकर आकारणेची तरतूद आहे.

**ब)** उपकराची रक्कम विहीत कालावधीत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास अदा न केल्यास जल ( प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण) उपकर अधिनियम,1977 मधील कलम 10 अन्वये प्रति माह 2% प्रमाणे दंड आकारण्याची तरतूद आहे.

**क)** त्याचप्रमाणे कलम 7 अन्वये सांडपाण्यावर योग्य प्रमाणात जलशुध्दीकरण केंद्रामार्फत शुध्दीकरणाची प्रक्रिया करण्यात आल्यास देय रकमेवर 25 % (रिबेट)सुट देणेबाबत तरतूद करण्यात आली आहे.

उल्हासनगर मनपाचे खडेगोलवली येथे 28 एमएलडी क्षमतेचा जल-मल नि:सारण केंद्र असून मनपा क्षेत्रातील एकूण सांडपाण्याचे प्रमाण 90 एमएलडी आहे. सदर सांडपाणी नेहरूनगर व शांतीनगर येथील पंपिग स्टेशनवरून उचलण्यात येते. परंतू शांतीनगर येथील केंद्र बंद असल्याने नेहरूनगर येथील केंद्रातूनच सांडपाण्याची उचल करण्यात येते व प्रक्रिया न झालेले सांडपाणी वालधूनी नदी व खेमानी नाल्यात सोडण्यात येते.

संबंधित नस्तीचे अवलोकन केले असता उल्हासनगर महानगरपालिकेकडून उपकराची रक्कम सन 1994 पासून अदा न केल्याने सन 1994 पासून माहे 3/2012 पर्यंत एकूण रु.39,49,499/- इतकी उपकराची रक्कम व विहीत मुदतीत रक्कम अदा न केल्याने विलंबापोटी रु.7,68,053/- इतकी आकारणी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे.

जल (प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण) उपकर अधिनियम,1977 मधील कलम 7 अन्वये उल्हासनगर मनपाने पुरेशा प्रमाणात पुर्ण क्षमतेचे जल-मल नि:सारण केंद्र निर्माण करून सांडपाण्यावर योग्य प्रमाणात जलशुध्दीकरण केंद्रामार्फत शुध्दीकरणाची प्रक्रिया करणे आवश्यक आहे. त्यामुळे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून उपकराची आकारणी कमी करण्यात येईल व देय रकमेवर 25 % (रिबेट)सुट देणेबाबत सवलत मनपास मिळवता येईल.

DATPVWM7501 (Ref No : 89, Hmm No : 70)

## *100 रु. 15 लक्षपर्यंतची कामे शासन निर्णयानूसार 33:33:34 या गुणोत्तर प्रमाणात वाटप झाली नसलेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| ***सार्वजनीक बांधकाम विभाग यांच्याकडील- शासन निर्णय क्र. सीएटी-07/06/ प्र.क्र.94/ इमा-2/ दिनांक 16/11/2006 अन्वये रु. 15 लाखापर्यंत कामाचे वाटप सहकारी मजुर कामगार संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंता व पात्र नोंदणीकृत कंत्राटदार यांच्यामध्ये 33:33:34 या प्रमाणात वाटप करण्याची कार्यवाही अनूसरण्यात येत नाही. त्याचप्रमाणे सार्व.बांधकाम विभाग शा.नि. दि.16/11/2006 नूसार कंत्राटदारांच्या पासबुकमध्ये नोंद घेण्याची कार्यपध्दती अनुसरण्यात येत नाही.*** |

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात पाणी पुरवठा विभागामार्फत वित्तीय वर्ष 2011-12 या वित्तीय वर्षात कंत्राटदारांमार्फत करण्यात आलेल्या कामाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

सार्वजनीक बांधकाम विभाग यांच्याकडील-सीएटी .क्र निर्णय शासन -07/06/ प्र.क्र.94 /2-इमा / दिनांक16/11200/6 अन्वये रु. 15 लाखापर्यंत कामाचे वाटप सहकारी मजुर कामगार संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंता व पात्र नोंदणीकृत कंत्राटदार यांच्यामध्ये 33:33:34 या प्रमाणात करावयाचे आहे.

उल्हासनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागामार्फत वित्तीय वर्ष 2011-2012 मध्ये वाटप करण्यात आलेली 232 पैकी 214 कामे मजूर कामगार सहकारी संस्थेला देण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे.

सार्वजनीक बांधकाम विभाग यांच्याकडील-सीएटी .क्र निर्णय शासन -07/06/ प्र.क्र.94 दिनांक /2-इमा / 16/11200/6 मधील दोन अन्वये मजूर सहकारी संस्था यांना कामाचे कार्यादेश देण्यापुर्वी कार्यकारी अभियंता यांनी संबंधित मजूर सहकारी संस्थेच्या पासबुकात नोंद घ्यावी आणि त्या संस्थेच्या पासबुकातील नोंदी तपासून एका वर्षात एकूण रु.50 लाखापेक्षा जास्त रकमेची कामे दिली जाणार नाही.याची दक्षता घ्यावी. अशी सुचना देण्यात आलेली आहे. तरी तदनुषंगाने कार्यवाही अनुसरण्यात येते किंवा कसे याबाबत साधार अनुपालन मजूर सहकारी संस्थेचे पासबुक लेखापरीक्षण पथकास दाखवणेबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.71 दि.16.01.2014 रोजी दिले असता अद्याप अनुपालन प्राप्त झालेले नाही. तरी शासन निर्णयानूसार कार्यवाही होणे आवश्यक आहे.

### *101 पावर पंप व पाणी पुरवठा साहित्य खरेदी व बसविणे (दुर्बल घटक)अंतर्गत केलेल्या कामातील त्रुटींबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :316-4340 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 980224.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 240203.00/-

***कामाचा स्थळ पाहणी अहवाल नाही.स्थायी समितीची कार्योत्तर मंजूरी घेण्यात आलेली नाही.दरसूचीपेक्षा जादा दराने प्रदान करण्यात आले आहे.हॉयड्रोलिक चाचणी अहवाल घेण्यात आला नाही. स्वामित्वधनाची रक्कम कपात केलेली नाही.प्रस्तावित कामापेक्षा कमी काम झाले असतांना पूर्ण रककम अदा करण्यात आलेली आहे.कामाचे नगरपालिका अभियंता यांचेकडून पर्यवेक्षण झालेचा अहवाल अप्राप्त आहे.कामासाठी खरेदी केलेल्या साहित्याचे इनव्हॉईस/ चलन सादर केलेले नाही.कामाची नोंदवही उपलब्ध करून दिलेली नाही.ठोक रकमेचे विश्लेषण अप्राप्त आहे.***

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात पाणी पुरवठा व जल-मल नि:सारण विभागामार्फत पावर पंप व पाणी पुरवठा साहित्य खरेदी व बसविणे(दुर्बल घटक) लेखाशिर्षांतर्गत माहे सप्टे.2011व मार्च 2011 मध्ये खर्च करण्यात आलेल्या खालील कामांसंदर्भात उपलब्ध झालेल्या लेख्यांचे लेखापरीक्षण केले असता निदर्शनास आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास ज्ञापन क्र. 84 दि.20.01.2014 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे.सबब, पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत व अ.क्र.3 च्या कामाची रक्कम रु.980224/-आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्र, दिनांक | तपशिल | देयकाची स्थुल रक्कम (रु.) | सुरक्षा रक्कम (रु.) | आयकर वजाती (रु.) | मुल्यवर्धित कर (रु.) | कामाचा विमा (रु.) | उपकर (रु.) | निव्वळ देय रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2839/ 17.09.11 | कपात करण्यात आलेली सुरक्षा रक्कम | 12474 | ----- | ----- | ---- | ----- | ---- | 12474 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कंत्राटदारास परत करण्यात आली **(श्रीदत्त म.स.सं.)** | | | | | | | | |
| 2 | 2843/ 17.09.11 | कपात करण्यात आलेली सुरक्षा रक्कम कंत्राटदारास परत करण्यात आली.**मे.जयश्री म.स.सं** | 4306 | --- | ----- | ---- | ---- | ---- | 4306 |
| 3 | 5470/ 09.03.12 | उल्हासनगर3 वॉर्ड क्र.8 हजेरी रोड ते श्री.खरात यांच्या घराजवळ 100 mm व 50mm व्यासाची G.I. जलवाहीनी टाकणे **मे.सिध्दनाथ मजूर सह.संस्था.** | 980224 | 49011 | 19604 | 39209 | 9802 | 9802 | 852796 (-)Prev. Paid Rs. 230000 |

| **अ.क्र.** | **कामाचा तपशिल** | |
|---|---|---|
| 1 | ठेकेदाराचे नाव | मे.सिध्दनाथ मजूर सह.संस्था |
| 2 | अंदाजपत्रकीय रक्कम | रु.980230/- |
| 3 | तांत्रिक मान्यता क्र. | 286 दि.04/02/2011 |
| 4 | प्रशासकीय मान्यता क्र. | मा.आयुक्त यांची मान्यता |
| 5 | जिल्हा उपनिबंधकाची मान्यता क्र. | 6006 दि.10/03/2011 |
| 6 | कार्यादेश क्र. | 447 दि.20/03/2011 |
| 7 | कामाचा कालावधी | 45 दिवस |
| 8 | बिलाचा प्रकार | प्रथम व अंतिम देयक |
| 9 | मोजमाप पुस्तिका क्रमांक | 11/95 पृष्ठ क्र.169 ते 171 |
| 10 | काम पुर्ण दिनांक | 05/05/2011 |

1. उपरोक्त अ.क्र. 1 व 2 नूसार प्रदान केलेली सुरक्षा रक्कम ज्या प्रमाणकाच्या स्थुल रकमेमधून कपात करण्यात आली आहे. ते प्रमाणक अथवा सुरक्षा रकमेची नोंदवही/ तत्सम अभिलेख

लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्यामूळे प्रदानाच्या योग्यतेबाबत खात्री करता आलेली नाही.

2. उपरोक्त अ.क्र.3 च्या कामासंदर्भात मे.सिध्दनाथ मजूर सह.संस्था यांना प्रमाणक क्र.3408 दि.04/10/2011 अन्वये रु.230000/- आगाऊ प्रदान करण्यात आले असल्याचे निदर्शनास येते परंतू सदर प्रमाणक लेखा परीक्षणाकरीता उपलब्ध झालेले नाही.

3. उपरोक्त अ.क्र.3 च्या कामाच्या अनुषंगाने प्रमाणकासोबत खर्चाच्या अनुषंगाने मुळ कागदपत्रांऐवजी छायांकीत प्रती जोडण्यात आल्या असल्याचे दिसून येते.

4. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 158 अन्वये नगरपालिकेच्या बांधकामांचे सर्व अंदाज , नगरपालिका अभियंता यांच्याकडून (अ) प्रशासनिक मंजुरीसाठी रेखांकित नकाशे व जोते क्षेत्रफळासह प्राथमिक अंदाज (ब) तांत्रिक मंजुरीसाठी अंतिम तपशिलवार नकाशे व अंदाज यांचेसह असणे आवश्यक आहे. परंतू उपरोक्त नियमाप्रमाणे रेखांकीत नकाशासह कार्यवाही झाली असल्याचे निदर्शनास आले नाही. त्याचप्रमाणे History Reg.उपलब्ध झाले नाही.त्यामुळे कामाच्या आवश्यकततेबाबत,अंदाजपत्रकाबाबत निश्चिती होत नाही.

5. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 165 अन्वये कामाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष जागेच्या संबंधात स्थानिक निरीक्षण अंतिम तपशिलवार अंदाज तयार करण्याअगोदर केले पाहीजे. परंतू उपरोक्त नियमाप्रमाणे अनुसरणेत आलेली कार्यवाहीबाबत अहवाल आढळून आले नाहीत.

6. मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम,1949 मधील कलम 73(ड) नूसार रु.5 लक्ष ते रु.25 लक्ष कामांकरीता मा.आयुक्तांनी त्यांच्या अधिकारात केलेल्या संविदा तदनंतर 15 दिवसात स्थायी समितीसमोर सादर करणे आवश्यक असतांना उपरोक्त अ.क्र.3 च्या कामासंदर्भात त्याप्रमाणे कार्यवाही अनुसरणेत आलेली नाही.

7. मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम,1949 मधील प्रकरण 5 (1)(2) अन्वये कामासंदर्भातील करारनाम्यावर महानगरपालिकेच्या सामान्य मुद्रा स्थायी समितीच्या दोन सदस्यांच्या उपस्थितीत लावणे आवश्यक आहे. परंतू उपरोक्त कामाच्या अनुषंगाने केलेल्या करारनाम्यावर स्थायी समितीच्या दोन सदस्यांच्या उपस्थितीत त्यांच्या सही, शिक्यासह मनपाची सामान्य मुद्रा लावलेबाबत निदर्शनास आले नाही.

8. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची सन 2009-10 ची जिल्हा दर सुचीमधील सर्वसाधारण सुचना अ.क्र.7(a) नुसार नगरपालिका क्षेत्रातील कामाकरीता दर सुचीतील दरापेक्षा अतिरीक्त 5% दरवाढ अनुज्ञेय असतांना उपरोक्त कामांचे अंदाजपत्रक तयार करतांना तसेच प्रत्यक्ष खर्चाची रक्कम अदा करतांना 10% अतिरीक्त दरवाढ दिल्याने त्याचप्रमाणे दरसुचीतील क्रमांक 9 नूसार पुरवठा केलेल्या पाईप,व्हाल,स्पेशल व इत्यादी साहित्यांवर 5% वाढ अनुज्ञेय नसतांना प्रदान केल्याने कंत्राटदारास

रु.104917/- इतके अतिप्रदान झाले आहे.

9. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दरसूची सर्वसाधारण सुचना क्र.13 अन्वये पाईपचा पुरवठा ठेकेदाराने केल्यास 85% रक्कम अदा करून उर्वरित 15% रक्कम हायड्रोलीक चाचणी समाधानकारक झालेनंतर करणे आवश्यक आहे. लेखापरीक्षणाकरीता हॉयड्रोलीक चाचणी अहवाल उपलब्ध झाला नाही. तो उपलब्ध करावा अन्यथा 15% पाईपची रक्कम रु.124689/- ठेकेदाराकडून वसूल करावे.

10. महसूल व वनविभाग शा.नि.क्र.गौण खनीज/10/2009/सीआर/309/ख/ दि.11/2/2010 अन्वये रु.70.67/-घ.मी. दराने देयकातून रॉयल्टी कपात करणे आवश्यक आहे. सदर कामासाठी खडी/वाळू/रबल इत्यादी साहित्याचा 149.95 घ.मी. वापर झाल्याने रॉयल्टीपोटी एकूण रक्कम रु.10597/-ठेकेदाराकडून वसूल करणे आवश्यक आहे.

11. कामाच्या अनुषंगाने प्रस्तावित संकल्पचित्र व काम पुर्ण झालेनंतरची संकल्पचित्र तपासली असता प्रस्तावित कामापेक्षा कमी काम पुर्ण करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे. संकल्पचित्रात measurement दिले नसल्यामूळे किती काम कमी करण्यात आले याचा बोध होत नाही.

12. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 172 अन्वये नगरपालिका अभियंता काम चालू असतांना सर्व प्रकारच्या कामातील जितक्या कामाची तपासणी करणे शक्य होईल तितक्या कामांची तपासणी करील. तसेच त्याबाबतचे निरीक्षण अहवाल लेखापरीक्षणासाठी त्यांनी उपलब्ध केले पाहीजेत. अशी तरतूद आहे. तरी उपरोक्त सर्व कामांबाबतचे नगरपालिका अभियंता यांचे निरीक्षण अहवाल लेखा परीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्यामूळे कामाच्या पर्यवेक्षणाबाबत अचूकतेबाबत पडताळणी झालेली नाही.

13. राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहितेमधील नियम क्र.12.82 (डी) नूसार कंत्राटदाराकडून प्राप्त झालेल्या बिल / इनव्हाईसची नोंद Journalise केल्यानंतरच कंत्राटदारास प्रदान करणेचे आवश्यक असतांना उपरोक्त कामासंदर्भात (बिजके)Invoice / चलन त्याचप्रमाणे नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. त्यामूळे प्रदानाच्या योग्यतेबाबत तसेच मालाच्या दर्जाबाबत खात्री होत नाही.

14. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 183 अन्वये कामाची नोंदवही नमुना क्रमांक 139 प्रमाणे ठेवणे आवश्यक आहे. परंतु अ.क्र.3 च्या कामाची नोंदवही क्र.11/95 लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झालेली नाही.त्यामुळे झालेले काम तसेच प्रदान योग्य झालेबाबत खात्री करता येत नाही.

15. उपरोक्त अ.क्र.3 च्या कामातील बाब क्र.4-Prov. S & Special संबंधात ठोक रक्कम रु.20000/- चे दर विश्लेषण (Rate Analysis) प्राप्त झाले नाही.

DATPVWM7501 (Ref No : 91, Hmm No : 84)

## *102 बुस्टर मशिनरी चालविणे कामाबाबत निविदा नस्ती व इतर माहीती उपलबध न झालेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :317-2440 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 396793.00/-

***विविध बुस्टर मशिनरी चालविणे कामाबाबतची निविदा नस्ती त्याचप्रमाणे त्याच्याशी संबंधित इतर लेखे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाहीत.***

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात पाणी पुरवठा व जल-मल नि:सारण विभागामार्फत बुस्टर मशिनरी चालविणे खर्च लेखाशिर्षांतर्गत झाले ल्या खर्चासंदर्भात माहे सप्टेंबर 2011 मध्ये खर्च करण्यात आलेल्या खालील कामांसंदर्भात उपलब्ध झालेल्या लेख्यावरून निदर्शनास आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.85 दि.20.01.2014 रोजी दिले अस ता वित्तीय वर्ष 2011-12 मध्ये नवीन निविदा प्रक्रीया केली असल्याचे ,तसेच मागील निविदा नस्ती आढळून येत नसल्याने शोधण्याचे काम चालू आहे,असे अनुपालनात नमूद आहे..सबब,खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

| अ.क्र. | प्रमाणक क्र , दिनांक | तपशिल | देयकाची स्थुल रक्कम (रु.) | सुरक्षा रक्कम (रु.) | आयकर वजाती(रु.) | VAT (रु.) | कामाचा विमा (रु.) | उपकर (रु.) | निव्वळ देय रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2640/ 03.09.11 | विविध बुस्टर पंपिग स्टेशन चालवणे,देखभाल व दुरूस्तीबाबत **(कल्पतरु इंजिनिअरींग) 01.07.11ते31.07.11** | 174769 | 3495 (2%) | 3495 | 6991 | 1748 | 1748 | 157292 |
| 2 | 2968/ | विविध बुस्टर पंपिग स्टेशन | 177091 | 3542 | 3542 | 7084 | 1771 | 1771 | 159381 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 28.09.11 | चालवणे,देखभाल व दुरूस्तीबाबत **(कल्पतरु इंजिनिअरींग) 01.08.11ते31.08.11** | | (2%) | | | | | |
| 3 | 2713/ 12.09.11 | कंत्राटदारांच्या देयकातून कपात करण्यात आलेली मुल्यवर्धित कराची रक्कम शासन जमा | 44933 | | | | | | 44933 |

| **अ.क्र.** | **कामाचा तपशिल** | |
|---|---|---|
| 1 | ठेकेदाराचे नाव | मे.कल्पतरू इंजिनिअरिंग |
| 2 | अंदाजपत्रकीय रक्कम | रु.2106000/- |
| 3 | तांत्रिक मान्यता क्र. | 215 दि.18/11/2005 |
| 4 | प्रशासकीय मान्यता क्र. | स्थायी समिती ठराव क्र .45 /27/10/2005 |
| 6 | कार्यादेश क्र. | 795 दि.29/05/2007 |
| 7 | कामाचा कालावधी | 1 वर्ष |
| 8 | बिलाचा प्रकार | धावते देयक |
| 9 | मोजमाप पुस्तिका क्र. | 78 |

1. उल्हासनगर शहरातील उंच भागात पाणी वितरण करणेसाठी विविध ठिकाणी लाईन बुस्टर पंपिंग स्टेशन बसविण्यात आलेली आहेत . एकूण 16 पंपिंग स्टेशनपैकी 12 पंपिंग स्टेशन वार्षिक कंत्राटी पध्दतीने चालविणे ,देखभाल व दुरूस्ती करणे या कामाकरीता मे.कल्पतरू इंजिनिअर्स,मुंबई यांना पाणी पुरवठा विभागाचे कार्यादेश क्र .795 दि.29.05.2007 अन्वये बारा महिन्याकरीता (1 वर्ष) (दि.01.06.2007 ते दि.31.05.2008)कंत्राट देण्यात आले होते. दि.31.05.2008 नंतर नविन निविदा प्रक्रिया करून कंत्राटदाराची निवड होणेची कार्यवाही करणे अपेक्षित असतांना लेखापरी क्षणाच्या वर्षअखेरपर्यंत नविन कंत्राटदाराची निवड करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे व त्याप्रमाणे उपरोक्त अ.क्र. 1 व 2 नूसार कंत्राटदारास रक्कम अदा करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे.

2. प्रदानाच्या अनुषंगाने ठेका निविदा नस्ती लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झालेली नाही. त्याचप्रमाणे निविदा प्रक्रियेच्या अनुषंगाने झालेली निवड प्रक्रिया विहीत नियमानूसार झाली किंवा कसे , कंत्राटदारासाठी असलेल्या सर्वसाधारण अटी व सुचना , त्यांनी अनुसरण्याची कार्यपध्दती , कामाचे स्वरुप व त्यांचा साप्ताहिक /पाक्षिक/मासिक अहवाल व नोंदवहया इत्यादी बाबतची लेखे

लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झालेले नाहीत.

3. उपरोक्त अ .क्र.3 नूसार कंत्राटदारांच्या देयकातून कपात करण्यात आलेली मुल्यवर्धीत कराची रक्कम शासन जमा करण्यात आल्याचे निदर्शनास येते .परंतू तदसंबंधी अभिलेख जसे , संबंधीत नोंदवहया इ. लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झालेल्या नाहीत.

DATPVWM7501 (Ref No : 92, Hmm No : 85)

### *103 बुस्टर पंपिंग मशिनरी खरेदी कामाबाबत अभिप्राय*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :317-4340 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 981547.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 9229.00/-

***स्वयंचलित पॉवर फॅक्टर कंट्रोलर खरेदी निविदा नस्ती लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाली नाही. खरेदीस स्थायी समितीची मंजूरी घेण्यात आलेली नाही. एपीएफसीची गुणवत्ता इ. बाबत माहीती उपलब्ध झालेली नाही. सक्षम प्राधिका-याचा एपीएफसी बसविण्यात आलेबाबत अहवाल अप्राप्त आहे. मोजमाप नोंदवही उपलब्ध केलेली नाही. खरेदी केलेल्या एपीएफसीचा विमा उतरविण्यात आलेला नाही. काम विलंबाने पुर्ण करण्यात आले आहे.***

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात पाणी पुरवठा व जल-मल नि:सारण विभागामार्फत बुस्टर पंपिंग मशिनरी खरेदी लेखाशिर्षांतर्गत झालेल्या खर्चासंदर्भात माहे सप्टे.2011मध्ये खर्च करण्यात आलेल्या खालील कामांसंदर्भात अर्धसमास ज्ञापन क्र.89 दि.20.01.2014 रोजी देण्यात आले होते.प्राप्त् अनुपालन विचारात घेवून खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत. .

| अ.क्र. | प्रमाणक क्र, दिनांक | तपशिल | देयकाची स्थुल रक्कम (रु.) | सुरक्षा रक्कम (रु.) | आयकर वजाती (रु.) | VAT (रु.) | विमा | उपकर (रु.) | निव्वळ देय रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2207/ | बुस्टर पंपिग मशिनरी खरेदीबाबत | 922863 | 18457 | 18457 | 36915 | --- | 9229 | 839805 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 20.08.11 | **(हर्षल टेकनिक्स)** | | | | | | | |
| 2 | 2713/ 12.09.11 | बुस्टर पंपिग मशिनरी खरेदी तील मुल्यवर्धित कराची कपात केलेली रक्कम शासन जमा केलेबाबत | 58684 | ---- | ----- | ---- | --- | --- | 58684 |

| **अ.क्र.** | **कामाचा तपशिल** | |
|---|---|---|
| 1 | ठेकेदाराचे नाव | मे.हर्षल टेक्निकस |
| 2 | अंदाजपत्रकीय रक्कम | रु.927500/- |
| 3 | तांत्रिक मान्यता क्र. | 257 दि.18/01/2011 |
| 4 | प्रशासकीय मान्यता क्र. | मा.आयुक्त यांची मान्यता दि.18/04/2011 |
| 5 | कार्यादेश क्र. | 685 दि.10/05/2011 |
| 6 | कामाचा कालावधी | 30 दिवस |
| 7 | बिलाचा प्रकार | प्रथम व अंतिम देयक |
| 8 | मोजमाप पुस्तिका क्रमांक | 77 पृष्ठ क्र.156 ते 157 |
| 9 | काम पुर्ण दिनांक | 09/06/2011 |
| | | |

महाराष्ट्र राज्य विदयूत वितरण कं.मर्या. यांच्या नियमानूसार पंपिंग स्टेशन येथील विजेचा वापरावरील पॉवर फॅक्टर 0.90 च्या वर असणे गरजेचे आहे. जेणेकरून पॉवर फॅक्टर पेनल्टी विदयूत वितरण कार्यालयाकडून आकारली जाणार नाही. तसेच पॉवर फॅक्टर 0.96 ते 1 पर्यंत सुधारणा केल्यास विदयूत वितरण कार्यालयाकडून सुट देण्यात येते. यासाठी उल्हासनगर शहरातील 7 पंपिंग स्टेशनवर स्वयंचलित पॉवर फॅक्टर बसविण्यासाठी आलेल्या खर्चाचे देयक उपरोक्त अ.क्र.1 नूसार कंत्राटदारास अदा करण्यात आले असून उपलब्ध लेख्याच्या तपासणी अंती अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. उपरोक्त प्रदानाच्या अनुषंगाने ठेका निविदा नस्ती लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झालेली नाही. त्याचप्रमाणे निविदा प्रक्रियेच्या अनुषंगाने झालेली निवड प्रक्रिया विहीत नियमानूसार झाली किंवा कसे , कंत्राटदारासाठी असलेल्या सर्वसाधारण अटी व सुचना , त्यांनी अनुसरण्याची कार्यपध्दती, कामाचे स्वरुप व त्यांचा अहवाल व इत्यादी बाबतची माहीती लेखापरीक्षकास तपासता आलेली नाही.

2. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,1949 मधील नियम क्र. 73(ड) नुसार ज्यात पाच लाख रुपयापेक्षा अधिक परंतू पंचविस लाख रुपये यापेक्षा अधिक नसलेला खर्च अंतर्भुत असेल अशा,आयुक्ताने केलेल्या प्रत्येक संविदेची माहीती अशी संविदा केल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत स्थायी समितीस कळविली पाहीजे. परंतू त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास येते.

3. बसविण्यात आलेल्या ॲटोमॅटीक पॉवर फॅक्टर कंट्रोलरच्या गुणवत्तेबाबत निकष उपलब्ध करून देणेत आलेले नाही.

4. बसविण्यात आलेल्या ॲटोमॅटीक पॉवर फॅक्टर कंट्रोलरचा सक्षम प्राधिका-यांने प्रमाणित केलेला Installation Report लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झालेला नाही.

5.महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 183 अन्वये कामाची नोंदवही नमुना क्रमांक 139 प्रमाणे ठेवणे आवश्यक आहे. परंतु सदर नोंदवही क्र.77 लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झालेली नाही.

6. वित्त विभाग शा.नि.विकास/1098/प्र.क्र.29/98/शासन हमी दि.19.08.1998 अन्वये कंत्राटी कामाचा शासनामार्फत विमा उतरविणे अन्यथा कंत्राटदाराच्या देयकातून विम्यापोटी 1% रक्कम कपात करून शासन जमा करणे आवश्यक असतांना उपरोक्त देयकातून विम्याची रक्कम रु.9229/- कपात करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

7. कंत्राटदाराबरोबर करारनामा दि.27.04.2011 रोजी करण्यात आला असतांना कार्यादेश उशिराने दि.10.05.2011 रोजी देण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे..

8. करारनाम्याचा दिनांक 27.04.2011 नंतर 30 दिवसात दि.26.05.2011 पर्यंत काम पूर्ण होणे आवश्यक असतांना दि.09.06.2011 रोजी काम पूर्ण झाल्याचे नमूद आहे. विलंबाने काम पुर्ण केल्याबाबत कंत्राटदाराकडून विलंबाची दंडात्मक कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास येते.

9. उपरोक्त अ.क्र.2 नूसार कंत्राटदाराच्या देयकातून कपात करण्यात आलेला मुल्यवर्धित कर रक्कम शासन जमा करण्यात आली असल्याचे दिसून येते. परंतू तदसंबंधी नोंदवहया व इतर अभिलेख तपासणी करीता उपलब्ध न झाल्याने प्रदानाबाबत खात्री करता येत नाही.

DATPVWM7501 (Ref No : 93, Hmm No : 89)

***104 उच्च विद्युत दाबाच्या ग्राहकांनी 90% power factor न राखल्यामुळे झालेले नुकसानीबाबत..***

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :840-2212 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 263344.00/-

***90% पावर फॅक्टर न राखल्यामुळे विदयुत कंपनीकडून आकारण्यात आलेल्या दंडाची रक्कम कंत्राटदाराच्या***

***देयकातून कपात केली नाही. जल-मल निःसारण केंद्र, पंपिंग स्टेशन इत्यादीचे उर्जा लेखापरीक्षण करण्यात आले नाही.***

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड द्वारे महाराष्ट्रातील शेती, उद्योग नागरी व ग्रामीण भागांना विद्युत पुरवठा केला जातो. यापैकी उच्च दाबाने पुरवठा करावयाच्या ग्राहकासाठी Elecricity Regulatory Commission विद्युत पुरवठयाची नियमावली तयार करते व त्या नियमावली नुसार उच्च विद्युत वापरावर Terrif आकारणी करण्यात येते. सदर नियमावली नुसार उच्च विद्युत दाबाच्या ग्राहकांनी 90% Power factor राखणे आवश्यक असून तो न राखल्यास दंडात्मक दराने आकारणी केली जाते.

वित्तीय वर्ष 2011-12 तील उल्हासनगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाचे पंपिंग स्टेशन येथे विद्युत पुरवठा करणा-या मिटरच्या देयकांची तपासणी केली असता 90% Power factor न राखल्यामुळे महापालिकेवर दंडात्मक कारवाई झाल्याने रु. 263344/- एवढे आर्थिक नुकसान झालेले आहे.सदर रक्कम पंपिंग स्टेशन देखभाल करणा-या कंत्राटदाराच्या देयकामधून कपात करणे आवश्यक आहे. परंतू संबंधित प्रमाणके लेखा परीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने पॉवर फॅक्टरची रक्कम कंत्राटदारांच्या देयकातून कपात करण्यात आली असलेबाबत खात्री करता आली नाही.

90% Power factor न राखल्यामुळे आर्थिक दंड लागलेला आहे हे टाळण्यासाठी महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागामार्फत उपाययोजना होणे आवश्यक आहे. उच्च दाबाचे कनेक्शन असलेल्या पाणी पुरवठा केंद्राचे तसेच जल-मल शुध्दीकरण केंद्रांचे एनर्जी(उर्जा) ऑडीट करण्यात आले नाही.

उपरोक्तबाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक 86 दि. 20/01/2014 रोजी दिले असता ठेकेदाराच्या देयकातून पावर फॅक्टरची रक्कम कपात करण्यात आली असल्याचे प्राप्त् अनुपालनात नमूद आहे. परंतू याबाबत कोणतेही कागदपत्रे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने कपातीबाबत खात्री झाली नाही.

DATPVWM7501 (Ref No : 94, Hmm No : 86)

## *105 कुपनलिका व जेटपंप बसविणे कामातील त्रुटींबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :322-4340 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9इ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 264534.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 3648.00/-

***उपरोक्त अ.क्र.2 च्या कामाची निविदा नस्ती लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झालेली नाही. कामाचा स्थळ पाहणी अहवाल व भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, ठाणे यांचे अहवाल उपलब्ध झाले नाही. अंदाजपत्रकीय रक्कम, गुणवत्ता व Installation अहवाल प्राप्त झाले नाहीत. अ.क्र.1 व 3 च्या कामाची मोजमाप नोंदवही प्राप्त झालेली नाही. कंत्राटी कामाचा विमा, उपकर, मुल्यवर्धित कराची रक्कम कपात करण्यात आलेली नाही. नगरपालिका अभियंता यांचे पर्यवेक्षण अहवाल उपलबध झाले नाहीत. केलेल्या कामाचे तसेच खरेदी केलेल्या साहीत्याची चलने प्राप्त झालेली नाहीत.***

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात पाणी पुरवठा व जल-मल नि:सारण विभागामार्फत कुपनलिका व जेटपंप बसविणे खर्च लेखाशिर्षांतर्गत झालेल्या खर्चासंदर्भात माहे डिसेंबर 2011मध्ये खर्च करण्यात आलेल्या खालील कामांसंदर्भात उपलब्ध झालेल्या लेख्यावरून निदर्शनास आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास ज्ञापन क्र. 87 दि.20/01/2014 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त् आहे.सबब,पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

| अ.क्र. | प्रमाणक क्र , दिनांक | तपशिल | देयकाची स्थुल रक्कम (रु.) | सुरक्षा रक्कम (रु.) | आयकर वजाती (रु.) | मुल्यवर्धित कर (रु.) | कामाचा विमा (रु.) | उपकर (रु.) | निव्वळ देय रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 4348/ 23.12.11 | उ.न.3 मधील वॉ.क्र.41 मधुमती किराणाजवळ 2 जेटपंप बसविणे व बॅ.नं.735 जवळ पिंपळाच्या झाडाखाली विहीरीस खोल करून नवीन हातपंप बसविणे (**भाग्यश्री म.स.सं.**) | 115980 | 5799 | 2320 | 4639 | 1160 | 1160 | 100902 |

| **अ.क्र.** | **कामाचा तपशिल** | |
|---|---|---|
| 1 | ठेकेदाराचे नाव | मे. भाग्यश्री मजूर सह.संस्था |
| 2 | अंदाजपत्रकीय रक्कम | रु.135030/- |
| 3 | तांत्रिक मान्यता क्र. | 252 दि.26/10/2009 |
| 4 | प्रशासकीय मान्यता क्र. | मा.आयुक्त यांची मान्यता |
| 5 | जिल्हा उपनिबंधकाची मान्यता | 3492 दि.12/11/2009 |

| | | |
|---|---|---|
| | क्र. | |
| 6 | कार्यादेश क्र. | 3421 दि.17/11/2009 |
| 7 | कामाचा कालावधी | 30 दिवस |
| 8 | बिलाचा प्रकार | प्रथम व अंतिम देयक |
| 9 | मोजमाप पुस्तिका क्रमांक | 55ए पृष्ठ क्र.17 ते 23 |
| 10 | काम पुर्ण दिनांक | 15/12/2009 |

| अ.क्र. | प्रमाणक क्र, दिनांक | तपशिल | देयकाची स्थुल रक्कम (रु.) | सुरक्षा रक्कम (रु.) | आयकर वजाती (रु.) | मुल्यवर्धित कर (रु.) | कामाचा विमा (रु.) | उपकर (रु.) | निव्वळ देय रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 4445/ 28.12.11 | उ.न.2 मधील वॉ.क्र.13 येथील जेठानंद अपार्ट.जवळ नवीन बोरवेल तयार करून त्यावर 1.5 HP चा पाणबुडे पंप बसविणे(**विजयालक्ष्मी म.स.सं.**)) | 49534 | ---- | 991 | ---- | --- | --- | 48543 |

| **अ.क्र.** | **कामाचा तपशिल** | |
|---|---|---|
| 1 | ठेकेदाराचे नाव | मे.विजयालक्ष्मी मजूर सह.संस्था |
| 2 | अंदाजपत्रकीय रक्कम | रु.49540/- |
| 3 | तांत्रिक मान्यता क्र. | |
| 4 | प्रशासकीय मान्यता क्र. | |
| 5 | निविदेचा प्रकार | दरपत्रके |
| 7 | कार्यादेश क्र. | 1041 दि.01/07/2011 |
| 8 | कामाचा कालावधी | 15 दिवस |
| 9 | बिलाचा प्रकार | प्रथम व अंतिम देयक |
| 10 | मोजमाप पुस्तिका क्रमांक | सी/2/3 पृष्ठ क्र.118 ते 120 |
| 11 | काम पुर्ण दिनांक | 14/07/2011 |

| अ.क्र. | प्रमाणक क्र | तपशिल | देयकाची | सुरक्षा | आयकर | मुल्यवर्धित | कामाचा | उपकर | निव्वळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

| | , दिनांक | | स्थुल रक्कम (रु.) | रक्कम (रु.) | वजाती (रु.) | कर (रु.) | विमा (रु.) | (रु.) | देय रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 4511/ 30.12.11 | उ.न.3मधील वॉ.क्र.29 अंतर्गत सरस्वती अपार्ट.पवई चौक येथे अस्तित्वातील विंधन विहीरीवर जेटपंप बसविणे **(जयश्री म.स.सं.)** | 99020 | 4951 | 1980 | 3961 | 990 | 990 | 86148 |

| **अ.क्र.** | **कामाचा तपशिल** | |
|---|---|---|
| 1 | ठेकेदाराचे नाव | मे.जयश्री मजूर सह.संस्था |
| 2 | अंदाजपत्रकीय रक्कम | रु.99100/- |
| 3 | तांत्रिक मान्यता क्र. | 343 दि.08/02/2010 |
| 4 | प्रशासकीय मान्यता क्र. | मा.आयुक्त यांची मान्यता |
| 5 | जिल्हा उपनिबंधकाची मान्यता क्र. | 5403 दि.05/03/2010 |
| 6 | कार्यादेश क्र. | 627 दि.23/03/2010 |
| 7 | कामाचा कालावधी | 45 दिवस |
| 8 | बिलाचा प्रकार | प्रथम व अंतिम देयक |
| 9 | मोजमाप पुस्तिका क्रमांक | 60 बी पृष्ठ क्र.169 ते 171 |
| 10 | काम पुर्ण दिनांक | 02/04/2010 |

1. उपरोक्त अ.क्र.2 च्या कामाची निविदा नस्ती लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे निविदा प्रक्रियेच्या अनुषंगाने झालेली निवड प्रक्रिया विहीत नियमानूसार झाली किंवा कसे , कंत्राटदारासाठी असलेल्या सर्वसाधारण अटी व सुचना , त्यांनी अनुसरण्याची कार्यपध्दती, कामाचे स्वरुप व त्यांचा अहवाल व इत्यादी बाबतची खात्री करता आली नाही.
2. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 158 अन्वये नगरपालिकेच्या बांधकामांचे सर्व अंदाज , नगरपालिका अभियंता यांच्या कडून (अ) प्रशासनिक मंजुरीसाठी रेखांकित नकाशे व जोते क्षेत्रफळासह प्राथमिक अंदाज (ब) तांत्रिक मंजुरीसाठी अंतिम तपशिलवार नकाशे व अंदाज यांचेसह असणे आवश्यक आहे. परंतू उपरोक्त नियमाप्रमाणे रेखांकीत नकाशासह कार्यवाही झाली असल्याचे निदर्शनास आले नाही. त्याचप्रमाणे History Register उपलब्ध झालेले नाही.

3. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 165 अन्वये कामाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष जागेच्या संबंधात स्थानिक निरीक्षण अंतिम तपशिलवार अंदाज तयार करण्याअगोदर केले पाहीजे. परंतू उपरोक्त नियमाप्रमाणे अनुसरणेत आलेली कार्यवाहीबाबत अहवाल आढळून आले नाहीत.

4. उपरोक्त कामाच्या अनुषंगाने भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,ठाणे यांचे अहवाल लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाही.

5. उपरोक्त कामाकरीता अंदाजपत्रकीय दराची निश्चिती कशी केली याबाबत माहीती लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झाली नाही.त्यामुळे दराबाबतची सत्यता पडताळणी करता आलेली नाही.

6. बसविण्यात आलेल्या जेटपंप व हातपंपाच्या गुणवत्तेबाबत निकष उपलब्ध झाले नाहीत. बसविण्यात आलेल्या जेटपंप व हातपंपाची गुणवत्ता तपासण्यात आली नाही. याबाबत अहवाल लेखापरीक्षणाकरीता उपलबध झाले नाहीत.

7. बसविण्यात आलेल्या जेटपंप व हातपंपाचा Installation Report लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झालेला नाही.

8. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 183 अन्वये कामाची नोंदवही नमुना क्रमांक 139 प्रमाणे ठेवणे आवश्यक आहे. परंतु सदर नोंदवही क्र.55(A) व 60(B) लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झालेली नाही.त्यामुळे कामाबाबत खात्री होत नाही.

9. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 180(3) नुसार रक्कम प्रदान करतांना मोजमाप पुस्तिकेतील नोंदी लाल शाईने फुली मारणे आवश्यक असतांना मोजमाप पुस्तिका क्र.सी/2/3 वर त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्याचप्रमाणे मोजमाप पुस्तिकेमधील नोंदी कामाच्या प्रगतीनूसार व दिनांकानूसार घेण्यात आल्याचे निदर्शनास आले नाही.

10. वित्त विभाग शा.नि.विकास/1098/प्र.क्र.29/98/शासन हमी दि.19.08.1998 अन्वये 1% कंत्राटी कामाचा विमा वित्तीय शिस्तीची बाब म्हणून शासकीय विमा निधीकडे उतरविणे आवश्यक आहे. उपरोक्त अ.क्र.2 च्या कामातून विमा रक्कम रु.495/-कपात करण्यात आलेली नाही.

11. उदयोग,उर्जा व कामगार विभाग,शा.नि.क्र.बीसीए/2009/प्र.क्र.108/कामगार 7अ दि.17.06.2010 अन्वये 1% मजूर उपकराची रक्कम कपात करणे आवश्यक असतांना उपरोक्त अ.क्र.2 च्या कामातून रु.495/- इतकी रक्कम कपात करण्यात आलेली नाही.

12. सार्व.बांधकाम विभाग. शा.नि. बीडीजी/2005/प्र.क्र. 324/इमारती 2 दि.03.03.2006 अन्वये अनोंदणीकृत कंत्राटदारांना देय असलेल्या स्थुल रकमेमधून 4% इतकी मुल्यवर्धित कराची रक्कम कपात करून शासन जमा करणे आवश्यक असतांना उपरोक्त अ.क्र.2 च्या कामातून रु.1981/- इतकी रक्कम कपात करण्यात आलेली नाही.

13. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 172 अन्वये नगरपालिका अभियंता काम चालू असतांना सर्व प्रकारच्या कामातील जितक्या कामाची तपासणी करणे शक्य होईल तितक्या कामांची तपासणी करील. तसेच त्याबाबतचे निरीक्षण अहवाल लेखापरीक्षणासाठी त्यांनी उपलब्ध केले पाहीजेत. अशी तरतूद आहे. तरी उपरोक्त सर्व कामांबाबतचे नगरपालिका अभियंता यांचे निरीक्षण अहवाल लेखा परीक्षणाकरीता उपलब्ध झालेले नाहीत.

14. राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहितेमधील नियम क्र.12.82 (डी) नूसार कंत्राटदाराकडून प्राप्त झालेल्या बिल / इनव्हाईसची नोंद Journalise केल्यानंतरच कंत्राटदारास प्रदान करणेचे आवश्यक असतांना उपरोक्त कामासंदर्भात (बिजके)Invoice / चलन त्याचप्रमाणे नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. ज्यामूळे प्रदानाच्या योग्यतेबाबत खातरजमा होत नाही.

15. अ.क्र.1 च्या मुळ प्रस्तावित कामातील बॅ.नं.735 जवळ पिंपळाच्या झाडाखाली विहीरीस खोल करून नवीन हातपंप बसविणे काम कंत्राटदाराने केले नसलेबाबत Execution Statement च्या तपासणीअंती निदर्शनास आले आहे.

16. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहीता,2011 मधील नियम 134 अन्वये कंत्राटी पध्दतीने काम करण्यात आले असतील त्याबाबतीत,अंदाजित खर्च रु.20000/- पेक्षा अधिक असेल तर , कंत्राटदारास ,मुंबई मुद्रांक अधिनियम,1958 अन्वये आवश्यक असलेल्या मुद्रांक कागदावर ,कंत्राटाच्या अटी व शर्ती नमूद करून आणि तो त्या अनुसरण्यास कसूर करील तर तो दंडास पात्र ठरेल व अशा दंडाच्या शर्ती असलेला करारनामा करणे आवश्यक असेल. अशा सुचना असतांना अ.क्र.2 च्या कामाचा कंत्राटदाराबरोबर करारनामा करण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले आहे.

17. जीआय पाईपचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची सन 2009-10 ची जिल्हा दर सुचीमधील दर व प्रत्यक्ष प्रदान रक्कमे यात रु.677/- जादा प्रदान करण्यात आले आहे.

DATPVWM7501 (Ref No : 95, Hmm No : 87)

### *106 पाणी पुरवठा विभागातील अभिलेख/नोंदवहया उपलब्ध न करून दिलेबाबत..*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| ***पाणी पुरवठा मागणीच्या अनुषंगाने अभिलेखे लेखापरीक्षणाकरीता उपलबध करून देणेत आलेले नाहीत.*** |

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा ( सुधारणा) अधिनियम,2011 मधील कलम 6(3) अन्वये लेखापरीक्षणाकरीता अभिलेख उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. उल्हासनगर महानगरपालिका पाणी पुरवठा व जल-मल नि:सारण विभागातील खालील अभिलेख/ नोंदवहया लेखा परीक्षणाकरीता उपलब्ध करून देणेबाबत

अर्धसमास ज्ञापन क्र.83 दि.20.01.2014 देण्यात आले होते.परंतू खालील अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध् करून देणेत आले नाही.

1. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 88 अन्वये खाजगी नळजोडण्यांचे पुस्तक नमूना क्रमांक 62 अ व 62 ब प्रमाणे ठेवण्याचे आवश्यक आहे. सदर पुस्तक लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देण्यात आलेले नाही.
2. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 89 अन्वये नमूना क्रमांक 63 प्रमाणे सर्व मापक जोडण्यासाठी मापक (मिटर)पुस्तक ठेवण्याचे आवश्यक आहे. सदर पुस्तक लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देण्यात आलेले नाही.
3. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 90 अन्वये मापकाद्वारे पाणी पुरवठयासाठी निश्चित केलेल्या पाणी पटटीचे मागणी पुस्तक नमूना क्रमांक 64 प्रमाणे ठेवण्याचे आवश्यक आहे. सदर पुस्तक लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देण्यात आलेले नाही.
4. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 94 अन्वये विशेष स्वच्छता कराचे मागणी पुस्त्क नमूना क्रमांक 66 प्रमाणे ठेवण्याचे आवश्यक आहे. सदर पुस्तक लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देण्यात आले नाही.
5. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 100 अन्वये अधिनियम कलम 50, उपकलम 6 अन्वये आवश्यक असलेले पाणीपुरवठा राखीव निधी लेखा , नमुना क्रमांक 72 प्रमाणे ठेवण्याचे आवश्यक आहे. सदर लेखा लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देण्यात आलेला नाही.

लेखे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून न दिल्यामुळे त्यामधील अनियमितता वेळीच निदर्शनास येत नाहीत व कालांतराने मोठया स्वरुपाची अनियमितता होण्याची शक्यता असते.

DATPVWM7501 (Ref No : 97, Hmm No : 83)

### *107 लेखापरीक्षणाकरीता लेखे/नस्ती उपलब्ध करून देणेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :310-3351 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 17821000.00/-

***लेखापरीक्षणाकरीता लेखे उपलब्ध न करून दिलेबाबत..***

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा ( सुधारणा) अधिनियम,2011 मधील कलम 6(3) अन्वये लेखापरीक्षणाकरीता अभिलेख उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. खालील विषयांबाबतचे लेखे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देणेबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.122 दि. 28/01/2014 अन्वये कळविण्यात आले होते.

1. पाणी पुरवठा योजना कर्ज परतफेड(महाराष्ट्र जीवन प्राधिकरण) रु.17488000
2. पाणी पुरवठा योजना कर्ज हमी रु.333000/-

परंतू सदर लेखे लेखापरीक्षण कालावधीत उपलब्ध करून न दिल्याने त्यांचे लेखापरीक्षण करता आले नाही. त्यामुळे सदर खर्च एकूण रु.1,78,21,000/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DATPVWM7501 (Ref No : 101, Hmm No : 122)

## *108 लेखापरीक्षणाकरीता लेखे/नस्ती उपलब्ध न करून दिलेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1328846.00/-

***पाणी पुरवठा विभागाने लेखे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून दिले नाहीत.***

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा ( सुधारणा) अधिनियम,2011 मधील कलम 6(3) अन्वये लेखापरीक्षणाकरीता अभिलेख उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. उल्हासनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागातील खालील कामासंदर्भात लेखे उपलब्ध करून देणेबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.138 दि.05.02.2014 अन्वये कळविण्यात आले होते. परंतू सदर लेखे लेखापरीक्षण कालावधीत लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देणेत आलेले नाहीत.

1.जल प्रदुषण तपासणी खर्च लेखाशिर्षांतर्गत प्रमाणक क्र.3614 /05.11.2011 रु.1165000/-

2.प्रमाणक क्र.134 दि.11.04.2011 रु.52413 पाणी पुरवठा व नि:सारण विभाग

3.प्रमाणक क्र.2196 दि.18.08.2011 रु.10000/- सेल्फ बिल पाणी पुरवठा विभाग

4.प्रमाणक क्र.2242 दि.25.08.2011 रु.101433/- माहिती व तंत्रज्ञान सेवा खर्च आहे.

मुळ अभिलेख्यां अभावी उपरोक्त लेख्यांचे लेखापरीक्षण झाले नसल्याने सदरचा खर्च आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DATPVWM7501 (Ref No : 107, Hmm No : 138)

### *109 भुयारी गटार जोडणी साहित्य निगा अंतर्गत केलेल्या कामासंदर्भात अभिप्राय...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :332-2432 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 579349.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 47364.00/-

***कामाचा स्थळ पाहणी अहवाल तांत्रिक मंजूरीकरीता सादर करण्यात आलेला नाही.स्थायी समितीची मान्यता घेणेत आलेली नाही.महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे दरसुचीतील दरापेक्षा जादा दराने अंदाजपत्रक तयार करण्यात आल्याने कंत्राटदारास अतिप्रदान झाले आहे. सक्षम प्राधिकारी यांचेकडून कामाचे पर्यवेक्षण झाले नाही.मोजमाप नोंदवही लेखापरीक्षणाकरीता प्राप्त् झाली नाही.***

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात पाणी पुरवठा व जल-मल नि:सारण विभागामार्फत भुयारी गटार जोडणी साहित्य निगा अंतर्गत केलेल्या कामाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे रक्कम अदा करण्यात आली आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्र , दिनांक | तपशिल | देयकाची स्थुल रक्कम (रु.) | सुरक्षा रक्कम (रु.) | आयकर वजाती (रु.) | (VAT) (रु.) | कामाचा विमा (रु.) | उपकर (रु.) | निव्वळ देय रक्क (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1059/ 06.06.11 | उल्हासनगर 3 मधील झोन 2 अंतर्गत असलेल्या पंपिग नं.2 चे मलवाहीन्यावरील वेटसेल , स्क्रिनवेलचे डिसिलटिंग करणे व डिलिवरी तसेच सेक्शन मलवाहीन्या शोधण्याचे काम करणे . | 579349 | 28968 | 11587 | 23174 | विमा पॉलिसी | 5794 | 509826 |

| | | (मे.सिध्दनाथ म.स.सं.) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **कामाचा तपशिल** | | | | | | | | |
| 1 | ठेकेदाराचे नाव | मे. सिध्दनाथ मजूर सह.संस्था | | | | | | | |
| 2 | अंदाजपत्रकीय रक्कम | रु.583010/- | | | | | | | |
| 3 | तांत्रिक मान्यता क्र. | 59 दि.23/07/2010 | | | | | | | |
| 4 | प्रशासकीय मान्यता क्र. | मा.आयुक्त यांची मान्यता | | | | | | | |
| 5 | जिल्हा उपनिबंधकाची मान्यता क्र. | 1679 दि.05/08/2010 | | | | | | | |
| 6 | कार्यादेश क्र. | 3011 दि.15/09/2010 | | | | | | | |
| 7 | कामाचा कालावधी | 45 दिवस | | | | | | | |
| 8 | बिलाचा प्रकार | प्रथम व अंतिम देयक | | | | | | | |
| 9 | मोजमाप पुस्तिका क्रमांक | 52 पृष्ठ क्र. 186-188 | | | | | | | |
| 10 | काम पुर्ण दिनांक | 27/10/2010 | | | | | | | |

उपरोक्त कामाच्या अनुषंगाने उपलब्ध झालेल्या अभिलेख्यांच्या लेखापरीक्षणांती निदर्शनास आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.154 दि.11.02.2014 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त् आहे.सबब,पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 158 अन्वये नगरपालिकेच्या बांधकामांचे सर्व अंदाज , नगरपालिका अभियंता यांच्या कडून (अ) प्रशासनिक मंजुरीसाठी रेखांकित नकाशे व जोते क्षेत्रफळासह प्राथमिक अंदाज (ब) तांत्रिक मंजुरीसाठी अंतिम तपशिलवार नकाशे व अंदाज यांचेसह असणे आवश्यक आहे. परंतू उपरोक्त नियमाप्रमाणे रेखांकीत नकाशासह कार्यवाही झाली असल्याचे निदर्शनास आले नाही. त्याचप्रमाणे History Register उपलब्ध झालेले नाही.

2. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 165 अन्वये कामाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष जागेच्या संबंधात स्थानिक निरीक्षण अंतिम तपशिलवार अंदाज तयार करण्याअगोदर केले पाहीजे. परंतू उपरोक्त नियमाप्रमाणे अनुसरणेत आलेल्या कार्यवाहीबाबत अहवाल आढळून आले नाहीत.

3. मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम,1949 मधील कलम 73(ड) नूसार मा.आयुक्तांनी त्यांच्या अधिकारात केलेल्या संविदा तदनंतर 15 दिवसात स्थायी समितीसमोर सादर करणे आवश्यक असतांना उपरोक्त कामासंदर्भात त्याप्रमाणे कार्यवाही अनुसरणेत आलेली नाही.

4. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची सन 2009-10 ची जिल्हा दर सुचीमधील सर्वसाधारण सुचना अ.क्र.7(a) नुसार नगरपालिका क्षेत्रातील कामाकरीता दर सुचीतील दरापेक्षा अतिरीक्त 5% दरवाढ अनुज्ञेय असतांना उपरोक्त कामांचे अंदाजपत्रक तयार करतांना तसेच प्रत्यक्ष खर्चाची रक्कम अदा करतांना 10% अतिरीक्त दरवाढ दिल्याने व दरसुचीपेक्षा जास्त दर दिल्याने,तसेच दरसुची सुचना क्र.9 नूसार पुरवठा करण्यात आलेल्या पाईप,व्हॉल,स्पेशल इ.साहीत्यांवर अतिरीक्त वाढ अनुज्ञेय नसतांना कंत्राटदारास रु.47364/- इतके अतिप्रदान झाले आहे.

5. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 172 अन्वये नगरपालिका अभियंता काम चालू असतांना सर्व प्रकारच्या कामातील जितक्या कामाची तपासणी करणे शक्य होईल तितक्या कामांची तपासणी करील. तसेच त्याबाबतचे निरीक्षण अहवाल लेखापरीक्षणासाठी त्यांनी उपलब्ध केले पाहीजेत, अशी तरतूद आहे. परंतू सदर पर्यवेक्षण अहवाल लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने कामाचे योग्यरित्या पर्यवेक्षण झाले असल्याची पडताळणी करता आली नाही.

6. राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहितेमधील नियम क्र.12.82 (डी) नूसार कंत्राटदाराकडून प्राप्त झालेल्या बिल / इनव्हाईसची नोंद Journalise केल्यानंतरच कंत्राटदारास प्रदान करणेचे आवश्यक असतांना उपरोक्त कामासंदर्भात (बिजके)Invoice / चलन त्याचप्रमाणे नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. त्यामूळे प्रदानाच्या योग्यतेबाबत खात्री होत नाही.

7. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 183 अन्वये कामाची नोंदवही नमुना क्रमांक 139 प्रमाणे ठेवणे आवश्यक आहे. परंतु मोजमाप नोंदवही क्र.52 लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झालेली नाही.त्यामुळे झालेले काम तसेच प्रदान योग्य झालेबाबत खात्री करता येत नाही.

DATPVWM7501 (Ref No : 110, Hmm No : 154)

## *110 उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत घरगुती,वाणिज्य व इतर जलवाहीनी जोडणीचा तपशिल उपलब्ध करून न दिलेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| ***उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत जलवाहीन्यांचा तपशिल लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देणेत आला नाही.*** |

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा ( सुधारणा) अधिनियम,2011 मधील कलम 6(3) अन्वये लेखापरीक्षणाकरीता अभिलेख उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. उल्हा़सनगर महानगरपालिका क्षेत्रात पाणी पुरवठा विभागांतर्गत असलेल्या अनधिकृत घरगुती,वाणिज्य व इतर जलवाहिनींचा तपशिल,संबंधित लेखे तसेच खालील नमून्यात माहीती लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देणेबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.145 दि.10.02.2014 अन्वये कळविण्यात आले होते. परंतू सदर लेखे उपलब्ध करून न दिल्यामुळे त्यांचे

लेखापरीक्षण करता आले नाही.

| अ.क्र. | कॅम्प क्रमांक | अनधिकृत जलवाहिन्यांची संख्या | | |
|---|---|---|---|---|
| | | घरगुती | वाणिज्य | इतर |
| | | | | |

DATPVWM7501 (Ref No : 112, Hmm No : 145)

## *111 सुधारीत पाणी पुरवठा योजना,टप्पा क्र.1 अंतर्गत उभारण्यात आलेली पाच पंपिग स्टेशनस चालविणे,देखभाल व दुरूस्ती करणे कामासंदर्भात अभिप्राय...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :317-2440 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 116103.00/-

***कामाची जाहिरात ज्या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात आली होती त्या वर्तमानपत्राचे मुळ पृष्ठ लेखापरीक्षणाकरीता उपलबध झाले नाही. कंत्राट कालावधी समाप्त् झालेनंतरसुध्दा लेखापरीक्षण कालावधीपर्यंत नवीन निविदा प्रक्रिया करण्यात आलेली नाही. कामाचा स्थळ पाहणी/ निरीक्षण अहवाल सादर केलेला नाही. पंपिग स्टेशन येथे केलेल्या कामाचा अहवाल लेखापरीक्षणाकरीता उपलबध करून देणेत आला नाही. कंत्राटदाराकडील विदयुत परवाना,अनुभव प्रमाणपत्र, वर्क कॉन्ट्रक्ट टॅक्स् प्रमाणपत्र लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाहीत. सक्षम प्राधिकारी यांचेकडून पंपिग स्टेशन येथे केलेल्या कामाचे पर्यवेक्षण अहवाल लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाहीत. मोजमाप नोंदवहीमधील नोंदी तपशिलवार नोंदविलेल्या नाहीत. पंपिग स्टेशन येथे काम करणा- या कंत्राटदाराकडील कर्मचा- यांचे हजेरीपत्रक तपासणीकरीता उपलब्ध झाले नाही. पॉवर फॅक्टर नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलबध करून दिलेली नाही.***

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे पाणी वितरण समप्रमाणात होणेसाठी पाच ठिकाणी नविन पंपिग स्टेशन्स् व जलकुंभ उभारण्यात आलेली असून ती सुरू करण्यात आलेली आहे. सुधारीत पाणी पुरवठा योजना,टप्पा क्र.1 अंतर्गत उभारण्यात आलेली पाच पंपिग स्टेशनस चालविणे,देखभाल व दुरूस्ती करणे (वार्षिक कालावधी)कामाकरीता वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करून निविदा मागविण्यात आल्या असता मे.कल्पतरू इंजिनिअरींग, मे.महाबळ इन्हायरो

इंजिनिअरींग, मे.महाविर इंजिनिअरींग, मे.ओम इंडस्ट्रिअल इंजि., मे.सरस्वती इंजिनि., मे.व्ही.जी.इंजिनि. यांच्या निविदा प्राप्त् झाल्या होत्या. यापैकी मे.कल्पतरू इंजिनि. यांची न्युनतम निविदा आधारभूत दराच्या 34% कमी असल्यामूळे निवड करण्यात आली. सदर कामाच्या बुस्टर मशिनरी निगा व दुरूस्ती लेखाशिर्षांतर्गत माहे सप्टेंबर 2011मध्ये खालीलप्रमाणे रक्कम खर्च करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्र , दिनांक | तपशिल | देयकाची स्थुल रक्कम (रु.) | सुरक्षा रक्कम (रु.) | आयकर वजाती (रु.) | VAT (रु.) | विमा (रु.) | उपकर (रु.) | निव्वळ देय रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2640/ 03.09.11 | सुधारीत पाणी पुरवठा योजना,टप्पा क्र.1 अंतर्गत उभारण्यात आलेली पाच पंपिग स्टेशनस चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणे (01.07.11 ते 31.07.11) (मे.कल्पतरु इंजि.) | 58856 -पॉवर फॅक्टर 23154.72 **35702.10** | 714 | 714 | 1498 | 357 | 357 | 32132 |
| 1 | 2968/ 23.09.11 | सुधारीत पाणी पुरवठा योजना,टप्पा क्र.1 अंतर्गत उभारण्यात आलेली पाच पंपिग स्टेशनस चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणे (01.08.11 ते 31.08.11) (मे.कल्पतरु इंजि.) | 57247.08 | 1145 | 1145 | 2290 | 572 | 572 | 51523 |

| **अ.क्र.** | **कामाचा तपशिल** | |
|---|---|---|
| 1 | ठेकेदाराचे नाव | मे. कल्पतरू इंजिनिअरिंग |
| 2 | अंदाजपत्रकीय रक्कम | रु.995430/- |
| 3 | तांत्रिक मान्यता क्र. | तांत्रिक मान्यता घेण्यात आलेली नाही. |
| 4 | प्रशासकीय मान्यता क्र. | स्थायी समिती ठराव क्र.51 दि.17.06.2004 |
| 5 | कार्यादेश क्र. | 1698 दि.07/08/2004 |
| 6 | कामाचा कालावधी | 1 वर्ष (365 दिवस) |
| 7 | मोजमाप पुस्तिका क्रमांक | 78 पृ.क्र.64 ते 66 व 71-72 |

उपरोक्त कामाच्या अनुषंगाने उपलब्ध झालेल्या अभिलेख्यांच्या लेखापरीक्षणांती निदर्शनास आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.152 दि.10.02.2014 रोजी दिला असता प्राप्त् अनुपालनाच्या तपासणीअंती पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. उपरोक्त कामाची जाहिरात ज्या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात आली होती. त्या वर्तमानपत्राचे मुळ पृष्ठ लेखापरीक्षणाकरीता उपलबध झाले नाही.त्यामुळे जाहीरातीच्या विहीत प्रसिध्दीबाबत पडताळणी करता आली नाही.

2. उ.म.पा.यांचे कार्यादेश क्र.1698 दि.07.07.2004 अन्वये उपरोक्त काम दि.16.08.2004 पासून एक वर्षाकरीता दिनांक 15.08.2005 या कालावधीकरीता देण्यात आले होते. परंतू कंत्राट कालावधी पूर्ण होणेपूर्वी तसेच लेखापरीक्षण कालावधीपर्यंत नवीन निविदा प्रक्रियेची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3. उपरोक्त कामासंदर्भात कंत्राटदाराने पंपिग स्टेशन येथे केलेल्या कामाची तपशिलवार हिस्ट्री नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झालेली नाही.त्यामुळे देयक कालावधी दि.01.07.2011 ते दि. 31.08.2011 मध्ये कंत्राटदाराने पंपिग स्टेशन येथे निविदेतील अटी व शर्तीनूसार काम केले किंवा कसे याबाबतची पडताळणी करता आली नाही.

4. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 165 अन्वये कामाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष जागेच्या संबंधात स्थानिक निरीक्षण अंतिम तपशिलवार अंदाज तयार करण्याअगोदर केले पाहीजे. तरी अंदाजपत्रकीय रक्कम रु.995430/- ची निश्चिती कशी करण्यात आली?याबाबत सदर कामाचे स्थानिक निरीक्षण अहवाल व अंदाजपत्रकातील बाबनिहाय दराचे जिल्हा दरसुचीनूसार विश्लेषण लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून न दिल्यामुळे अंदाजपत्रकीय रक्कमेची सत्यता पडताळणी करता आली नाही.

5. Detailed Tender Notice मधील अ.क्र.11 (a) नूसार कंत्राटदाराकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचा विदयुत परवाना असणे आवश्यक आहे. सदर परवाना लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाला नसल्याने अर्धसमास ज्ञापन दिले असता प्राप्त अनुपालनात सदर परवाना नस्तीत असल्याचे नमूद आहे. परंतू सदर परवाना नस्तीत आढळून आला नाही.

6. Detailed Tender Notice मधील अ.क्र.11 (सी) नूसार कंत्राटदाराकडे शासकीय/निमशासकीय संस्थेकडील किमान 75 BHP व 1000 KVA सबस्टेशनचा तत्सम कामाचा अनुभव प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नसल्याने अर्धसमास ज्ञापन दिले असता प्राप्त् अनुपालनात सदर प्रमाणपत्र असल्याचे नमूद आहे. परंतू अनुभव प्रमाणपत्र लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाही.

7. Detailed Tender Notice मधील अ.क्र.11 (एफ) नूसार कंत्राटदाराने Work Contract Tax प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. परंतू सदर प्रमाणपत्र लेखापरीक्षणाकरीता उपलबध झाले नाही.

8. मेमोरंडममधील एफ नूसार न्युनतम कंत्राटदाराने सादर केलेले दर अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा 15%

पेक्षा कमी असल्यास 4% अतिरिकत सुरक्षा रक्कम घेणेची सुचना आहे. तरी 3% रु.29863/-, 4% अतिरिक्त सुरक्षा रक्कम रु.39817/- व देयकातून कपात केलेली 2% रु.19909/- चा तपशिल/अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाही. त्यामुळे सुरक्षा ठेव रक्कमेबाबत पडताळणी करता आली नाही.

9. मे.कल्पतरु इंजिनिअरींग यांनी निविदेत सादर केलेले दर अंदापत्रकीय रक्कमेपेक्षा (-)34% ने सादर केले असून त्यांचे दर इतर निविदाकारांपेक्षा कमी असल्याने मान्य करण्यात आले आहेत. तरी कंत्राटदाराकडून Performance Guarantee पोटी अधिकची बँक गॅरंटी घेण्यात आली असलेबाबत जादा बँक गॅरंटीचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देण्यात आले नाही. तसेच न्युनतम कंत्राटदार करणार असलेल्या कामाचे विश्लेषण अप्राप्त आहे. त्यामुळे करण्यात येणा-या कामाच्या गणवत्तेबाबत पडताळणी करता येत नाही.
10. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 172 अन्वये नगरपालिका अभियंता काम चालू असतांना सर्व प्रकारच्या कामातील जितक्या कामाची तपासणी करणे शक्य होईल तितक्या कामांची तपासणी करील. तसेच त्याबाबतचे निरीक्षण अहवाल लेखापरीक्षणासाठी त्यांनी उपलब्ध केले पाहीजेत. अशी तरतूद आहे. परंतू सदर पर्यवेक्षण अहवाल लेखापरीक्षणाकरीता उपलबध न झाल्याने कामाचे योग्यरित्या पर्यवेक्षण झाले असल्याची पडताळणी करता आली नाही.
11. निविदेतील सर्वसाधारण सुचनेमधील अट क्र. 18 नुसार कंत्राटदाराने पुरवठा/खरेदी केलेल्या सर्व साहित्यांची चलन त्याचप्रमाणे राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहितेमधील नियम क्र.12.82 (डी) नूसार कंत्राटदाराकडून प्राप्त झालेल्या बिल / इनव्हाईसची नोंद Journalise केल्यानंतरच कंत्राटदारास प्रदान करणेचे आवश्यक असतांना उपरोक्त कामासंदर्भात (बिजके)Invoice / चलन त्याचप्रमाणे नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. त्यामूळे प्रदानाच्या योग्यतेबाबत खात्री होत नाही.
12. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 183 अन्वये कामाची नोंदवही नमुना क्रमांक 139 प्रमाणे ठेवणे आवश्यक आहे. मोजमाप नोंदवही क्र.78 तपासली असता कंत्राटदाराने केलेल्या कामाची तपशिलवार नोंद नोंदवहीत घेण्यात आली नसून पुर्ण महिन्यात केलेल्या कामाची एकच नोंद घेण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे मोजमाप नोंदवहीमधील कामाची नोंदी दररोज केलेल्या कामाच्या प्रगतीनूसार नोंदविणेत आलेले नाही. त्यामुळे झालेले काम तसेच प्रदान योग्य झालेबाबत पडताळणी करता येत नाही. त्याचप्रमाणे महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 180(3) नुसार रक्कम प्रदान करतांना मोजमाप पुस्तिकेतील नोंदी लाल शाईने फुली मारणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.
13. लेखापरीक्षणाकरीता प्राप्त् झालेल्या उपरोक्त अ.क्र.1 च्या देयकावर उपअभियंता यांनी स्वाक्षरी केलेली नाही.
14. Detailed Specification मधील 1 नूसार कंत्राटदाराने केलेल्या कामाचा मासिक अहवाल बिलासोबत सादर करणे आवश्यक असतांना सदर अहवाल लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देणेत आलेला नाही.

15. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 179 अन्वये जेव्हा कोणतेही काम कामगाराकडून करण्यात येईल तेव्हा, नमुना क्रमांक 134 प्रमाणे त्या कामाच्या प्रभारी अधिका-याने हजेरीपट ठेवून त्यात रोजच्या रोज नोंदी केल्या पाहीजेत. परंतू उपरोक्त कामासंदर्भात ठेवण्यात आलेले हजेरीपट लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाही.
16. सर्वसाधारण सुचनेमधील अट क्र.1-2 मध्ये नमूद कामाचे निकष ठरवून देण्यात आले आहेत.सदर निकषानूसार माहे जुलै 2011 व ऑगस्ट 2011 मध्ये कंत्राटदाराने पंपिग स्टेशनवर केलेल्या कामाचा अहवाल लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झालेला नाही.
17. सर्वसाधारण सुचनेमधील अट क्र.1.2 मधील 16 नूसार कंत्राटदाराने विजेच्या वापरासंबंधी पॉवर फॅक्टर न राखल्यास पॉवर फॅक्टरची रक्कम कंत्राटदाराच्या देयकातून कपात करणे आवश्यक आहे. त्याकरीता अट क्र. 18 नूसार पॉवर फॅक्टरची दैनिक नोंदवही कंत्राटदाराने ठेवणे आवश्यक आहे. सदर नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने पॉवर फॅक्टरची रक्कम कंत्राटदाराच्या देयकातून कपात केलेबाबत पडताळणी करता आली नाही.

DATPVWM7501 (Ref No : 113, Hmm No : 152)

## *112 मलप्रक्रिया केंद्र,खडेगोळवली येथील पंपिग स्टेशनस चालविणे,देखभाल व दुरूस्ती करणे कामातील अनियमिततेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :317-2440 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 125332.00/-

***कामाची जाहिरात ज्या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात आली होती त्या वर्तमानपत्राची मुळ पृष्ठ लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाही. कंत्राट कालावधी समाप्त झालेनंतरसुध्दा लेखापरीक्षण कालावधीपर्यंत नवीन निविदा प्रक्रिया करण्यात आलेली नाही. कामाचा स्थळ पाहणी/ निरीक्षण अहवाल सादर केलेला नाही. पंपिग स्टेशन येथे केलेल्या कामाचा अहवाल लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देणेत आला नाही. सक्षम प्राधिकारी यांचेकडून पंपिग स्टेशन येथे केलेल्या कामाचे पर्यवेक्षण अहवाल लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाहीत. मोजमाप नोंदवही तपशिलवार नोंदविलेली नाही. पंपिग स्टेशन येथे काम करणा- या कंत्राटदाराकडील कर्मचा- यांचे हजेरीपत्रक तपासणीकरीता उपलब्ध झाले नाही. पॉवर फॅक्टर नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलबध करून दिलेली नाही.***

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील मलप्रक्रिया केंद्र,खडेगोळवली येथील पंपिग मशिनरी

चालविणे,देखभाल व दुरूस्ती करणेचे काम मे.ओम इंडस्ट्रियल सर्व्हिसेस,डोंबिवली यांना कार्यादेश क्र.युएमसी/डब्लुएसएसडी/220 दि.27.01.2003 अन्वये देण्यात आलेल्या कामाची मुदत दि.31.01.2004 रोजी संपल्यानंतर काही दुरूस्तीची कामे प्रलंबित असल्यामुळे व दुरूस्तीसाठी 1 ते 1.5 महिन्याचा कालावधी लागणार असल्याने दि.31.03.2004 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. त्याचप्रमाणे नवीन कंत्राटदाराची नियुक्ती करणेकरीता रु.12,60,339/- चे अंदाजपत्रकीय रकमेचे प्राकलन तयार करून जाहिर निविदा सुचना प्रसिध्दी करण्यात आली असता दोन कंत्राटदारांनी निविदा मिळणेसाठी अर्ज सादर केले होते. मात्र मे.कल्पतरु इंजिनिअरींग या एकाच निविदाकाराने निविदा दाखल केली असता अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा(-)2% ने उ.म.पा.यांचे कार्यादेश क्र.835 दि.01.04.2004 अन्वये एक वर्षाकरीता निवड करण्यात आली. परंतू एक वर्षानंतर नवीन निविदा प्रक्रिया न घेता त्याच कंत्राटदारास लेखापरीक्षणाच्या कालावधीपर्यंत कंत्राट देण्यात आले असून त्यास माहे सप्टे.2011 मध्ये खालीलप्रमाणे रककम अदा करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्र, दिनांक | तपशिल | देयकाची स्थुल रक्कम (रु.) | सुरक्षा रक्कम (रु.) | आयकर वजाती (रु.) | (VAT) (रु.) | विमा (रु.) | उपकर (रु.) | निव्वळ देय रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2640/ 03.09.11 | मलप्रक्रिया केंद्र, खडेगोळवली येथील पंपिग स्टेशनस चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणे (01.07.11 ते 31.07.11) (मे.कल्पतरु इंजिनिअरिंग) | 62666 | 1253 | 1253 | 2507 | 627 | 627 | 56399 |
| 1 | 2968/ 23.09.11 | मलप्रक्रिया केंद्र, खडेगोळवली येथील पंपिग स्टेशनस चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणे (01.08.11 ते 31.08.11) (मे.कल्पतरु इंजिनिअरिंग) | 62666 -पॉवर फॅक्टर <u>6823.40</u> **<u>55842.70</u>** | 1117 | 1117 | 2234 | 558 | 558 | 50259 |

| **अ.क्र.** | **कामाचा तपशिल** | |
|---|---|---|
| 1 | ठेकेदाराचे नाव | मे. कल्पतरू इंजिनिअरिंग |
| 2 | अंदाजपत्रकीय रक्कम | रु.1260339/- |
| 3 | तांत्रिक मान्यता क्र. | 1130 दि.13/02/2004 |
| 4 | प्रशासकीय मान्यता क्र. | स्थायी समिती ठराव क्र.174 दि.09.02.2004 |
| 5 | कार्यादेश क्र. | 835 दि.01/04/2004 |
| 6 | कामाचा कालावधी | 1 वर्ष (365 दिवस) |
| 7 | मोजमाप पुस्तिका क्रमांक | 78 पृ.क्र.73 ते 74 |

उपरोक्त कामाच्या अनुषंगाने उपलब्ध झालेल्या अभिलेख्यांच्या लेखापरीक्षणांती निदर्शनास आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.151 दि.10.02.2014 दिले असता प्राप्त् अनुपालनाच्या तपासणीअंती पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. उपरोक्त कामाची जाहिरात ज्या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात आली होती त्या वर्तमानपत्राचे मुळ पृष्ठ लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाही.त्यामुळे जाहीरातीच्या विहीत प्रसिध्दीबाबत पडताळणी करता आली नाही.

2. तांत्रिक / दराचे लिफाफे उघडणेकरीता विहीत नियमानूसार कमीतकमी तीन पात्र निविदा प्राप्त होणे आवश्यक आहे. परंतू उपरोक्त कामाकरीता जाहीर निविदा सुचना प्रसिध्दी करण्यात आली असता दोन कंत्राटदारांनी निविदा मिळणेसाठी अर्ज सादर केले. मात्र, त्यापैकी एकाच कंत्राटदाराने निविदा दाखल केली व त्याच निविदाकाराची निवड अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा(-)2% दराने उ.म.पा.यांचे कार्यादेश क्र.835 दि.01.04.2004 अन्वये एक वर्षाकरीता करण्यात आलेली आहे.

3. उ.म.पा.यांचे कार्यादेश क्र.835 दि.01.04.2004 अन्वये उपरोक्त काम दि.01.04.2004 पासून एक वर्षाकरीता दिनांक 31.03.2004 या कालावधीकरीता देण्यात आले होते. परंतू कंत्राट कालावधी पूर्ण होणेपूर्वी तसेच लेखापरीक्षण कालावधी सन 2011-12 पर्यंत नवीन निविदा प्रक्रियेची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4. उपरोक्त कामासंदर्भात मलप्रक्रिया केंद्र, खडेगोळवली येथील पंपिग स्टेशनवर कंत्राटदाराने दि.01.07.2011 ते 31.08.2011 कालावधीत केलेल्या कामाची तसेच त्यापुर्वी केलेल्या कामाची हिस्ट्री नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे देयक कालावधीत कंत्राटदाराने उल्हासनगरमहानगरपालिकेने ठरवून दिलेले काम केल्याची पडताळणी करता आली नाही.

5. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 165 अन्वये कामाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष जागेच्या संबंधात स्थानिक निरीक्षण अंतिम तपशिलवार अंदाज तयार करण्याअगोदर केले पाहीजे. तरी अंदाजपत्रकीय रक्कम रु.1260339/- ची निश्चिती कशी करण्यात आली? याबाबत सदर कामाचे स्थानिक निरीक्षण अहवाल व अंदाजपत्रकातील बाबनिहाय दराचे जिल्हा दरसुचीनूसार विश्लेषण लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न करून दिल्यामुळे अंदाजपत्रकीय रक्कमेची सत्यता पडताळणी करता आली नाही.

6. Detailed Tender Notice मधील अ.क्र. (ए) नूसार कंत्राटदाराकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे विदयुत परवाना असणे आवश्यक आहे. सदर परवाना लेखापरीक्षणाकरीता उपलबध झाला नसल्याने अर्धसमास ज्ञापन दिले असता प्राप्त् अनुपालनात सदर परवाना नस्तीत असल्याचे नमूद आहे. परंतू सदर परवाना नस्तीत आढळून आला नाही.

7. Detailed Tender Notice मधील अ.क्र. (बी) नूसार कंत्राटदाराकडे शासकीय/निमशासकीय संस्थेकडील कामाचा अनुभव प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र लेखापरीक्षणाकरीता उपलबध झाले नसल्याने अर्धसमास ज्ञापन दिले असता प्राप्त् अनुपालनात सदर प्रमाणपत्र असल्याचे नमूद आहे. परंतू अनुभव प्रमाणपत्र नस्तीत आढळून आले नाही.

8. Additional General Conditions मधील अट क्र.7 नूसार कंत्राट कामाची कार्यादेश नोंदवही ठेवून पाणी पुरवठा विभागाकडून देण्यात आलेल्या कामाचे अनुषंगाने कार्यादेशाची नोंद त्यांत नोंदविणे आवश्यक आहे.परंतू सदर नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.त्यामुळे कंत्राटदारास देण्यात आलेले कार्यादेश व त्याने केलेली कामे याबाबतची पडताळणी करता आली नाही.

9. मल:निसारण केंद्रातील कंत्राटदाराच्या कामाच्या अनुषंगाने दैनिक/मासिक इ.बाबतचा अहवाल लेखापरीक्षणाकरीता उपलबध झालेला नाही.त्यामुळे कंत्राटदाराला केलेल्या प्रदानाच्या अनुषंगाने योग्य प्रदान झालेची पडताळणी करता आली नाही.

10. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता, 1971 च्या नियम क्रमांक 172 अन्वये नगरपालिका अभियंता काम चालू असतांना सर्व प्रकारच्या कामातील जितक्या कामाची तपासणी करणे शक्य होईल तितक्या कामांची तपासणी करील. तसेच त्याबाबतचे निरीक्षण अहवाल लेखापरीक्षणासाठी त्यांनी उपलब्ध केले पाहीजेत. अशी तरतूद आहे. परंतू सदर पर्यवेक्षण अहवाल लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने कामाचे योग्यरित्या पर्यवेक्षण झाले असल्याची पडताळणी करता आली नाही.

11. राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहितेमधील नियम क्र.12.82 (डी) नूसार कंत्राटदाराकडून प्राप्त झालेल्या बिल / इनव्हाईसची नोंद Journalise केल्यानंतरच कंत्राटदारास प्रदान करणेचे आवश्यक असतांना उपरोक्त कामासंदर्भात (बिजके)Invoice / चलन त्याचप्रमाणे नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. त्यामूळे प्रदानाच्या योग्यतेबाबत पडताळणी करता आली नाही.

12. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 183 अन्वये कामाची नोंदवही नमुना क्रमांक 139 प्रमाणे ठेवणे आवश्यक आहे. मोजमाप नोंदवही क्र.78 तपासली असता कंत्राटदाराने केलेल्या कामाची तपशिलवार नोंद नोंदवहीत घेण्यात आली नसून पुर्ण महिन्यात केलेल्या कामाची एकच नोंद घेण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे मोजमाप नोंदवहीमधील कामाच्या नोंदी दररोज केलेल्या कामाच्या प्रगतीनूसार नोंदविणेत आलेल्या नाही. त्यामुळे झालेले काम तसेच प्रदान योग्य झालेबाबत पडताळणी करता आली नाही. त्याचप्रमाणे महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 180(3) नुसार रक्कम प्रदान करतांना मोजमाप पुस्तिकेतील नोंदी लाल शाईने फुली मारणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

13. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 179 अन्वये जेव्हा कोणतेही काम कामगाराकडून करण्यात येईल तेव्हा, नमुना क्रमांक 134 प्रमाणे त्या कामाच्या प्रभारी अधिका-याने हजेरीपट ठेवून त्यात रोजच्या रोज नोंदी केल्या पाहीजेत. परंतू उपरोक्त कामासंदर्भात ठेवण्यात आलेले हजेरीपट लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाही.

14. कंत्राटदाराने विजेच्या वापरासंबंधी पॉवर फॅक्टर न राखल्यास पॉवर फॅक्टरची रक्कम

कंत्राटदाराच्या देयकातून कपात करण्यात येते. त्याकरीता पॉवर फॅक्टरची दैनिक नोंदवही कंत्राटदाराने ठेवणे आवश्यक आहे. सदर नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने पॉवर फॅक्टरची रक्कम कंत्राटदाराच्या देयकातून कपात केलेबाबत पडताळणी करता आली नाही.

DATPVWM7501 (Ref No : 114, Hmm No : 151)

## *113 उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील पिण्याचे पाण्याचे नमूने प्रयोगशाळेतील तपासणीबाबत ..*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :420-2440 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 120000.00/-

***उ.म.पा. क्षेत्रातील पिण्याचे पाण्याचे नमूने नागरिकांना पिण्यास अयोग्य असलेबाबत...***

महापालिकाक्षेत्रातील नागरिकांना पिण्यायोग्य पाण्याचे पुरेशा प्रमाणात वाटप करणे ही महापालिकेची जबाबदारी आहे. सदर पाण्याचे नमूने कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी, सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, कोकण भवन, नवी मुंबई यांचेकडून तपासणी करून घेणे आवश्यक आहे. सदर बाबीकरीता माहे सप्टे..2011 मध्ये कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी, सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, कोकण भवन यांना प्रमाणक क्र. 2741 दि.13.09.2011 अन्वये रु.12000/- इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे. याबाबत खालील मुददेनिहाय माहीती उपलब्ध करून देणेबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.158 दि.12.02.2014 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त् आहे.

वित्तीय वर्ष 2011-12 मध्ये घेण्यात आलेल्या एकूण पाण्याच्या नमून्यांची संख्या ...

सार्व.आरोग्य प्रयोगशाळेत पाठविलेल्या व प्राप्त पिण्यास योग्य /अयोग्य पाणी अहवालाची संख्या ...

प्रयोगशाळेकडून प्राप्त पिण्यास अयोग्य पाणी अहवालावर महानगरपालिकेकडून कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या होत्या? याबाबतचा तपशिल...

परंतू उपलब्ध लेख्यांच्या लेखापरीक्षणांती पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

सन 2011-12 कालावधीत प्रयोगशाळेत तपासणीकरीता पाठविलेले पाण्याचे नमूने अहवालातील माहे जुलै 2011 मध्ये 8 नमूने ,ऑगस्ट 2011 मध्ये 4 नमूने, सप्टें.2011 मध्ये 7 नमूने , ऑक्टो.2011 मध्ये 2 नमूने व डिसें. 2011-जाने.-2012 मध्ये प्रत्येकी एक नमूने इ. नागरिकांना पिण्यास अयोग्य पाण्याचे

होते. पिण्यास अयोग्य पाण्यामुळे नागरिकांना कॉलरा,गॅस्ट्रो,डायरिया,ताप इ. आजारांना सामोरे जावे लागले आहे.

DATPVWM7501 (Ref No : 115, Hmm No : 158)

### *114 अंतर्गत लेखापरीक्षण प्रलंबित तसेच त्रोटक स्वरूपाचे असलेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***प्रलंबित अंतर्गत लेखापरीक्षणाबाबत...***

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ,1949 मधील प्रकरण 9 चे कलम 106 (3) अन्वये प्रत्येक सरकारी वर्ष सुरू झाल्यावर मुख्य लेखापरीक्षकाने मागील वर्षाच्या संपूर्ण लेख्यावरील आपला अहवाल स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे . परंतू वित्तीय वर्ष 2009-2010, 2010 - 2011,2011-2012,व 2012-2013 चे अंतर्गत लेखापरीक्षण प्रलंबित असून सदर वर्षाच्या लेख्यावरील अहवाल स्थायी समितीस सदर केलेले नाहीत.उल्हासनगर महानगरपालिकेचे अंतर्गत लेखापरीक्षण मुख्य लेखापरीक्षक यांचे मार्फत करण्यात येते . त्यात जमा रकमांचे उत्तर लेखापरीक्षण व खर्चाचे पुर्व लेखापरीक्षण केले जाते . मुख्य लेखापरीक्षक यांनी 2008-09 चा लेखापरीक्षण अहवाल स्थायी समितीसमोर सादर केलेला दिसून येतो. त्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. सर्व विभागांचे लेखापरीक्षण करण्यात येत नाही.सदर लेखापरीक्षण अहवालात जमेच्या महत्वपुर्ण बाबी असलेल्या जकात व कर या विभागांचा तसेच लेखा ,आस्थापना इ. विभागाचे लेखापरीक्षण झाल्याचे निदर्शनास आले नाही.

2. ज्या विभागांचे लेखापरीक्षण करण्यात आले आहे , ते परीपुर्ण नाही. परिच्छेद अत्यंत त्रोटक स्वरूपात असल्या चे दिसून आले .अंतर्गत लेखापरीक्षण आक्षेपांचेअनुपालन करून ते निरस्त करण्याची कार्यवाही दिसून आली नाही. अंतर्गत लेखा परीक्षण हे महानगरपालिकेच्या अंतर्गत कामकाजावर नियंत्रण ठेवण्याचे महत्वपुर्ण साधन असतांना त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे झालेली नाही.

3. वित्तीय वर्ष 2009-10, 2010-11, 2011-12 व 2012-13 या कालावधीचे अंतर्गत

लेखापरीक्षण प्रलंबित आहेत . प्रलंबित अंतर्गत लेखापरीक्षणामुळे कामकाजातील अनियमितता वेळीच निदर्शनास येत नाहीत व त्यामूळे झालेल्या अनियमितता / चुका तशाच पुढे चालू राहून मोठया प्रमाणात अनियमितता होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

4. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949, कलम 105 नुसार मुख्य लेखापरीक्षकाने महानगरपालिकेच्या लेख्यांची साप्ताहिक तपासणी करून त्यावरील आपला अहवाल स्थायी समितीकडे पाठविला पाहिजे.अशी कार्यवाही केलेली दिसून आली नाही.

महानगरपालिकेकडे स्थानिक निधी कार्यालयाचे (नगरपालिका कालावधीतील) 714 परीच्छेद तसेच महालेखापाल,मुंबई यांचेकडील 71 परीच्छेद प्रलंबित आहेत . प्रलंबित परीच्छेदांचे योग्य अनुपालन संबंधित कार्यालयाकडे पाठवून प्रलंबित परीच्छेदांची संख्या कमी करण्याचे दृष्टीने कार्यवा ही होणे आवश्यक आहे.

उपरोक्त अनियमितता बाबत अर्धासमास ज्ञापन क्र. 124 दि. 28.01.2014 चे अनुपालन विचारात घेऊन परिच्छेद अंतिम केला आहे.

DATDSAM7301 (Ref No : 7, Hmm No : 124)

### *115 इमारतीचे संरचनात्मक निरिक्षण (Structural Audit) करण्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*अनियमितता कलम : 9ड*

***उल्हासनगर महानगरपालिकेतील नगररचना विभागाने महानगरपालिकेच्या हददीतील इमारतीचे संरचनात्मक निरिक्षण केले नाही.***

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 265(अ) नुसार कोणत्याही इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र दिल्यापासून 30 वर्षाचा कालावधी समाप्त झाला असेल अशा इमारतीचा मालक किंवा भोगवटादार यांनी महानगरपालिकेच्या अधिका-यांकडून इमारत मानवी वस्तीसाठी योग्य आहे या प्रयोजनासाठी बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे.

अधिनियम कलम 265( अ)(3) नुसार भोगवटादाराने असे प्रमाणपत्र न घेतल्यास आयुक्त यांचे आदेशानुसार बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र सादर करण्याचे निर्देश इमारतीच्या मालकाला किंवा भोगवटादाराला

देता येतील . कलम (अ)4 नुसार इमारतीच्या मालकाकाडून दोषनिवारक दुरुस्त्या करण्यात येतील. पोटकलम 6 नुसार जर मालक/भोगवटादाराने उक्त कालावधीच्या आत दोषनिवारक दुरुस्त्या करण्यास कसुर केल्यास आयुक्तांना त्या दोषनिवारक दुरुस्त्या करता येतील व अशा दुरुस्त्यांवर आयुक्ताने केलेला खर्च त्यांची मागणी केल्यानंतर तीस दिवसाच्या आत भरणा न केल्यास मालमत्ता कराच्या थकबाकी प्रमाणे मालक/भोगवटादाराकडून वसुल केला जाईल. अशी कार्यवाही केली किंवा कसे याबाबतचा अहवाल लेखापरिक्षणास नस्तीसह उपलब्ध करुन देण्याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 140 दिनांक 07/02/2014 अन्वये विचारणा केली असता, लेखापरिक्षणाचे अंतीम तारखेपर्यंत कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही.

DATDSAM7301 (Ref No : 12, Hmm No : 140)

## *116 बांधकामाना प्रांरभ प्रमाणपत्र देणे, पूर्णत्वाचा दाखला देणे व भोगवटा प्रमाणपत्र प्रलंबित ठेवल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*अनियमितता कलम : 9ड*

| ***बांधकामास प्रांरभ प्रमाणपत्र देणे, पूर्णत्वाचा दाखला देणे व भोगवटा प्रमाणपत्र दिर्घकाळ प्रलंबित ठेवले आहे.*** |
|---|

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना, 1966मधील कलम 43नुसार महानरगरपालिकेच्या लेखी परवानगीशिवाय कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही जमिनीचा वापर चालू करता कामा नये किंवा त्यात बदल करता कामा नये किंवा तिचा कोणताही विकास करता कामा नये. त्यानंतर, बांधकाम चालू करण्यासासाठी दिलेले प्रारंभ प्रमाणपत्र, जमिनीचा विकास करण्यासाठी दिलेली परवानगी सरासरी तिन वर्षापर्यन्त वैध आहे .तथापी सदरची परवानगी, दिलेल्या तारखेपासून प्रत्येक वर्षी नुतनीकरण करणे आवश्यक आहे .परवानगी दिलेल्या तारखेपासून एक वर्ष संपण्यापूर्वी परवानगी नुतनीकरणासाठी प्राधिकरणाकडे अर्ज दाखल करणे आवश्यक आहे . बांधकाम चालू केले नसल्यास नुतनीकरण तीन वर्षापर्यंत अनुज्ञेय आहे .त्यानंतरच्या कालावधीसाठी नवीन प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

जागा मालकाने आयुक्तांना सादरकेलेला नमुना APPX -XV77 मधील पूर्णत्वाचा दाखला प्राधिकरणास प्राप्त झाल्यानंतर आयुक्तांनी जागेची स्थळपाहणी करुन मंजूर नकाशाप्रमाणे जागेचे बांधकाम झाल्याची खात्री करुन नमुना APPX-YV777 मध्ये भोगवटा प्रमाणपत्र दिले पाहीजे.

उल्हासनगर महानगर पालिकेतील नगर रचना विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या अभिलेख्यांचे लेखा परिक्षण केले असता 2011-2012 मध्ये एकूण..33 इतके बांधकाम प्रांरभ प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी केवळ एका बांधकामास बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र दिल्याचे नोंदवहीवरुन आढळून आले व एका बांधकामास पूर्णत्वाचा दाखला दिल्याचे आढळून आले आहे .बांधकामास प्रांरभ प्रमाणपत्र देणे, पूर्णत्वाचा दाखला देणे व भोगवटा प्रमाणपत्र देणे इत्यादीबाबत विलंब होत असल्याचे दिसून येते .त्यामुळे अवैध बांधकामाची संख्या वाढण्यास वाव मिळाला व वेगवेगळया शिर्षांतर्गत जमा होणा-या रक्कमा उदा.अग्निसुरक्षा, वृक्ष निधी, सौर उर्जा इ .पासून महानगरपालिका वंचित राहीली आहे .बांधकामाचे भोगवटा प्रमाणपत्र न दिल्यामुळे सदरची इमारत मंजूर नकाशाप्रमाणे असल्याची खात्री करता येत नाही .भोगवटा प्रमाणपत्र न दिलेले बांधकाम नियमाप्रमाणे अवैध ठरते .याबाबत नगररचना विभागास अर्धसमास क्रमांक 175दि. 13.02.2014 नुसार कळविले असता, लेखापरिक्षणाचे अंतीम दिनांकापर्यन्त विभागाकडून उत्तर प्राप्त झाले नाही.

DATVCSM6501 (Ref No : 32, Hmm No : 175)

## *117 विकास भार शुल्काव्दारे जमा केलेली रक्कम विकास निधी मध्ये जमा करुन सार्वजनिक विकास कामासाठी वापर करण्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :1211555 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, 1966 मधील नियम 124 नुसार विकास निधी म्हणून स्वतंत्र निधी स्थापन करुन विकास भार शुल्काव्दारे जमा झालेल्या सर्व रक्कमा सदर निधीमध्ये जमा करणे आवश्यक असतांना महानगरपालीकेने तशी कार्यवाही केलेली दिसून येत नाही.***

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 मधील कलम 124 मध्ये नुसार ,मनपा मध्ये " विकास निधी" म्हणून संबोधण्यात येणारा एक स्वतंत्र निधी स्थापन करण्यात येईल व तो अलग ठेवण्यात येईल आणि प्राधिकरण त्याच्या अर्थसंकल्पामध्ये तो स्वतत्रपणे दर्शवील. विकासभार म्हणून प्राधिकरणास मिळालेल्या सर्व रक्कमा व त्यावरील व्याज असेल तर व्याजासह विकास निधीमध्ये जमा करण्यात येईल. उक्त निधीमध्ये वेळोवेळी जमा करण्यात आलेल्या पैशांचा वापर केवळ उक्त प्राधिकरणाच्या अधिकारितेखालील क्षेत्रामध्ये सार्वजनिक सुविधा पुरविणे आणि क्षेत्राचे परिरक्षण व**

**सुधारणा या प्रयोजनासाठी करण्यात येईल.उक्त प्रयोजनासाठी त्वरीत किंवा लवकर वापरता येणार नाही असा उक्त निधीमध्ये जमा असलेला पैसा , प्राधिकरण, बँकेमध्ये जमा करील असे नमूद केलेले आहे. त्यानुसार नगर रचना विभागाकडील विकास भार निधीचे लेखापरिक्षण केले असता , खालील अभिप्राय देण्यांत येत आहेत.**

1) **उल्हासनगर महानगरपालिकेतील नगररचना विभागाकडे 2011-12 मध्ये एकूण रु.2500000/- इतकी रक्कम विकास भार म्हणून जमा झालेली आहे. सदरची रक्कम विकास भार , बांधकाम परवानगी शुल्क व प्रिमियम याव्दारे जमा झालेल्या रककमा अधिनियमातील तरतुदीनुसार बँकेत ठेवण्याऐवजी मनपा फंडात जमा केलेली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम , 1966 मधील नियम 124 नुसार विकास निधी म्हणून स्वतंत्र निधी स्थापन करुन विकास भार शुल्काव्दारे जमा झालेल्या सर्व रककमा सदर निधीमध्ये जमा करणे आवश्यक असतांना महानगरपालीकेने तशी कार्यवाही केलेली दिसून येत नाही.**

**2) महानगरपालिकेतील नगररचना विभागाने 2011-12 मध्ये विकास भार शुल्काव्दारे रु.25 लाख इतकी रक्कम वसुल केलेली आहे. तथापी अधिनियमातील उक्त नियमानुसार सदरची रक्कम विकास निधीमध्ये जमा केली नाही. सदरील रक्कम प्राधिकरणाच्या क्षेत्रातील सार्वजनिक विकासासाठी व सार्वजनिक परिरक्षण व विकासासाठी न वापरता मनपा निधीमध्ये जमा केली आहे व इतर वेगवेगळया कामासाठी वापर करण्यात आला आहे. सदर बाब वरील नियमाशी सुसंगत असल्याचे दिसून येत नाही.**

**उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अर्धसमास क्रमांक 174दिनांक 13.02.2014 अन्वये अर्धसमास निर्गमित करण्यांत आलेले होते. परंतु याबाबत कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही.**

DVESMBM7301 (Ref No : 59, Hmm No : 174)

## *118 इ.10 वी च्या विद्यार्थ्या करीता 21 व्या शतकातील शैक्षणिक संधी" कार्यक्रमासाठी केलेल्या खर्चातील अनियमितते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 144739.00/-

| |
|---|
| ***21 व्या शतकातील शैक्षणिक संधी व दहावी नंतरच्या दाही दिशा'या विषयावर मार्गदर्शनासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यासाठी केलेली खरेदी रु.50 हजारावरील असूनही निविदा न मागविता दरपत्रके मागवून खरेदी*** |

***केली. दरपत्रकाचा प्राप्त दिनांक, कार्यक्रमाचा दिनांक व पुरवठा दिनांक यामध्ये तफावत आहे.***

प्रमाणक क्रं.5120/8.02.12

मा.महापौर यांचे दिनांक 30.06.2011 चे पत्रा नुसार इ.10 वी च्या विदर्यार्थ्याकरीता "21 व्या शतकातील शैक्षणिक संधी व दहावी नंतरच्या दाही दिशा" या विषयावर मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन दिनांक 1/07/2 011 रोजी सकाळी 10 ते 3 या दरम्यान करण्या करीता 10X20 फुटाचे 10 बॅनर्स लावणे बाबत कळविण्यात आले. साहित्य खरेदीसाठी सदर केलेल्या टिपणीमध्ये कार्यशाळेचे स्वरूप, कार्यशाळा कोणाच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली, तसेच सदर कार्यशाळेसाठी किती विध्यार्थी उपस्थित राहणार आहेत. या बाबत उल्लेख न करता खालील साहित्य खरेदीसाठी मान्यता घेण्यात आली आहे. त्यानुषंगाने दिनांक 8.7.2011 रोजी नोटीस बोर्डवर सूचना प्रसिध्द करुन दिनांक 11/07/2011 पर्यंत दरपत्रके मागविण्यात आली. व मे.उर्वशी एंटरप्रायझेस यांना पुरवठा आदेश देवून खालील साहित्य खरेदी करण्यात आले.

| पुरवठा आदेश क्रमांक व दिनांक | बिल क्रं.व दिनांक | पुरवठादाराचे नांव | खरेदी केलेल्या वस्तूंचा तपशिल | परिमाण | रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| 90अ/2011<br>दि.11.07.11 | 133/---<br>दि.निरंक.. | मे.उर्वशी एंटरप्रायझेस | लोखंडी फ्रेम सह बॅनर्स | 10 नग | 50000 |
| 11/07/2011 | 132/--दि.निरंक | मे.उर्वशी एंटरप्रायझेस | फोटो<br>व्हीडीओ शूटींग<br>ग्लास<br>बिसलरी (पाणी)<br>पॅड व पेज<br>सन्मानचिन्ह<br>कॉफी<br>बिस्कीट | 100 नग<br>1 दिवस<br>360<br>24बॉक्स<br>300नग<br>15नग<br>50नग<br>350नग | 4000<br>4000<br>1080<br>384<br>9000<br>27000<br>550<br>1050 |
| | | | | | 49764 |
| 02/072011 | 134/-निरंक | मे.उर्वशी एंटरप्रायझेस | अल्पोपहार<br>ध्वनी क्षेपण<br>निमंत्रण पत्रिका<br>शाल<br>श्रीफळ<br>पुष्पगुच्छ | 600पॅकेट<br>1 दिवस<br>500 नग<br>30 नग<br>30 नग<br>30 नग | 18000<br>2000<br>6000<br>6000<br>450<br>6000 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | सन्मानचिन्ह | 15 नग | 6525 |
| | | | | | 44975 |

वरील खरेदीसाठी मागविण्यात आलेली दरपत्रके व खर्चाच्या देयकांचे लेखापरीक्षण केले असता, खालील अनियमितता झाल्याचे आढळून आले आहे.

1. वरील साहित्य खरेदी करतांना बिल क्र. क्र.१३२ व १३३ नुसार खरेदी कलेले साहित्य हे दिनांक 11/07/2011 या एकाच तारखेस पुरवठा आदेश देवून रु.99764/-चे साहित्य खरेदी केले आहे. व उर्वरित रु.44975 ची खरेदी 2/07/2011 चे पुरवठा आदेशानुसार केली आहे. असी एकूण रु.144739 चे साहित्य दरपत्रककाद्वारे खरेदी केले आहे. तसेच शासन निर्णय दिनांक 2 जानेवारी 1992 मधील नियम क्रमांक 8.3 नुसार रु.50000 किंवा त्या पेक्षा जास्त खरेदीसाठी निविदा प्रसिद्ध करणे आवश्यक असतांना वेगवेगळया पुरवठा आदेशान्वये रु 144739/-चे साहित्य खरेदी केले आहे. महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियमावली 1965 मधील नियम 174 नुसार मंजुरी टाळण्याच्या दृष्टीने खरेदीचे आदेश विभागून देणे ही बाब नियमबाहय आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 परिशिष्ट - 5 मधील तरतुदी नुसार पुरवठादारा बरोबर करारनामा करणे बंधनकारक असतांना पुरवठादारा बरोबर साहित्य पुरविण्यासाठी करारनामा केलेला नाही.

2. मा.महापौर यांचे दिनांक 30/062011 चे पत्रामध्ये उल्लेख केल्यानुसार सदरचा कार्यक्रमाचा दिनांक 1 जुलै 2011 निश्चित करण्यात आलेला असतांना सदर कार्यक्रमासाठी लागणारे साहित्य खरेदी करण्याकरीता दरपत्रकाची नोटीस दि.8.7.2011 रोजी प्रसिध्द करण्यात आली. पुरवठादारा कडून दिनांक 11.07.2011 रोजी दरपत्रके प्राप्त झाली व दिनांक 11.07.2011 रोजी संबंधीत पुरवठादारास पुरवठा आदेश निर्गमित केले आहेत. पुरवठादाराकडील चलन क्रमांक .निरंक.. दि.01/10/2011 नुसार बॅनर्स प्राप्त झाले आहेत. तसेच बिल क्रं.134 दि..निरंक..नुसार खरेदी केलेल्या साहित्याची दरपत्रके 01/07/2011 रोजी प्राप्त झाली आहेत व पुरवठा आदेश दि.02/07/2011 रोजी दिले आहेत. साहित्य मागविल्याचे व साहित्याच पुरवठा झाल्याचे दिनांक कार्यक्रमाच्या दिनांकानंतरचे दिनांक आहेत. कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिका नस्तीसोबत आढळून आली नाही.

3. मे.उर्वशी एंटरप्रायझेस यांनी दरपत्रकासोबत सादर केलेल्या व्यवसाय नोंदणी दाखल्यानुसार (shop act liscence) वरून उर्वशी एंटरप्रायझेस यांचेकडे खादयपदार्थ विक्री चा परवाना नसल्याचे आढळून आले. तथापि, त्यांचेकडून अल्पोपहार कॉफी, बिस्कीट,बिसलरी पाणी इ.साहित्य खरेदी केले आहे. तसेच फोटो काढणे, व्हीडीओ शुटींग करणे इ चा परवाना नसतांना सदरचे काम करण्याबाबत पुरवठा आदेश दिले आहे. वरील साहित्य प्राप्त झाल्याबाबत साठानोंदवहीत नोंद आढळून आली नाही. त्यामुळे खर्चाची सत्यता पडताळता येत नाही.

वरील अनियमितते बाबत अर्धसमास पत्र क्रमांक 98.दिनांक 20.01.2014 नुसार विभागास कळविले असता विभागाकडून विहीत कालावधीत उत्तर प्राप्त झाले नाही. त्यामुळे झालेला खर्च रक्कम रु.144739/-

आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATVCSM6501 (Ref No : 13, Hmm No : 98)

### *119 महापालिका वर्ग क व ड च्या लाभार्थी स्त्री व पुरुष कर्मचा-यांसाठी साडया व गणवेश कापड खरेदी मध्ये झालेल्या अनियमितते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :A-2 (8) मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 9.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4701955.00/-

***महापालिकेतील वर्ग- क व वर्ग- ड चे 2625 लाभार्थी कर्मचा- यांना गणवेश कापड खरेदी करण्यासाठी खरेदीच्या विहीत कार्यपध्दतीचा अवलंब न करता खरेदी केली, शासन निर्णय दि.2.01.1992 मधील तरतुदी नुसार खरेदी समितीची स्थापना न केलीनाही. गणवेश कापडाची खरेदी महाराष्ट्र राज्य वस्त्रोदयोग महामंडळ/महाटेक्स /टेक्सकॉम/महाराष्ट्र यंत्रमाग महामंडळ यांचेकडे मागणी नोंदवून खरेदी करणे बंधनकारक केलेले असतांना शासन निर्णयातील तरतुदीचे उल्लंघन करुन निविदेव्दारे खरेदी केली. अधिकृत पुरवठादारांकडून निविदा न मागविता इतर व्यावसायिकांकडून निविदा मागवून खरेदी केली.***

महापालिकेतील भांडार विभागामार्फत 2011-12 वर्षा करीता महापालिकेच्या वर्ग क व ड मधील 2625 कर्मचा-यांना गणवेश कापड पुरविण्यासाठी दिनांक 26.07.2011 रोजी वृतपत्रात निविदा सूचना प्रसिध्द करुन दि.26/07/2011 ते 02/08/2011 या कालावधी मध्ये निविदा मागविण्यात आल्या. सदर खरेदीस स्थायी समिती ठराव क्रमांक 15 दि.18.05.2011 अन्वये मान्यता देण्यात आली. प्राप्त झालेल्या निविदा दि.26/09/2011 रोजी उघडण्यात आल्या. निविदेमध्ये खालील तीन निविदाधारकांच्या निविदा तांत्रिकदृष्टया पात्र ठरवून दरनिश्चिती करण्यात आली.

मोहीनी एंटरप्रायझेस

अमर ज्योत एंटरप्रायझेस

मोहित एंटरप्रायझेस

याबाबत निविदा नस्तीचे लेखापरीक्षण केले असता, खालील अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे.

1. उदयोग, उर्जा व कामगार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं.भांखस.1088/(2512)/उदयोग-6, दि.2 जानेवारी 1992 मधील परि.8.1 नुसार वस्तू खरेदी संबंधी खरेदी समिती स्थापन करणे आवश्यक असतांना अशी खरेदी समिती स्थापन न करता खरेदी करण्यात आली आहे.

2. शासन निर्णय दि.2.01.1992 मधील तरतूद व उदयोग संचालनालय नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय मुंबई यांचेकडील परिपत्रक क्रं.उसं/शा.निम.शा.वख./परिपत्रक/2009/बी-15279 दि.3 जून, 2009 मधील तरतुदीनुसार एकूण वार्षिक खरेदी रु.50000/ किंवा त्यापेक्षा अधिक असेल अशा वेळी निविदा चौकशी राजपत्रात प्रसिध्द करणे बंधनकारक आहे. तथापि, अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3. उदयोग, उर्जा व कामगार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं.भांखस.1088/(2512)/उदयोग-6, दि.2 जानेवारी 1992 मधील परिच्छेद-7 मधील परिशिष्ट-पाच मध्ये नमुद केल्याप्रमाणे तसेच शासनाचे पत्र क्रमांक संकीर्ण/2005/46/प्र.क्र.-3/06/नवि-20, दि.31.07.2006 नुसार गणवेषाचे कापड महाराष्ट्र राज्य वस्त्रोदयोग महामंडळ /महाटेक्स /टेक्सकॉम /महाराष्ट्र यंत्रमाग महामंडळ यांचेकडे मागणी नोंदवून खरेदी करणे बंधनकारक केलेले असतांना महापालिकेने निविदा मागवून रु. 4701955 ची खरेदी केली आहे. शासन निर्णय दिनांक 4.02.2003 नुसार महापालिकेस शासन निर्णय 2 जानेवारी 1992 मधील विहीत केलेल्या भांडार साहित्य खरेदी बाबतची कार्यपध्दती आणि त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणा अथवा बदल महापालिकांना बंधनकारक आहे.

4. खरेदीसाठी तांत्रिकदृष्टया पात्र ठरविण्यात आलेल्या निविदाधारकांच्या व्यवसाय नोंदणी दाखल्यानुसार सदरचे निविदाधारकांचा व्यवसाय खालील प्रमाणे आहे.

अ. मोहीनी एंटरप्रायझेस --स्टेशनरी फायर मटेरियल व फर्निचर विक्री.

आ. अमरज्योत एंटरप्रायझेस–ऑफीस असे नमुदआहे.

इ. मोहित एंटरप्रायझेस - स्टेशनरी, इलेक्ट्रीकल गुडस, हार्डवेअर, फर्निचर इ.

वरील निविदाधारक हे गणवेशाचे कापड पुरविण्यास सक्षम नसतांना किंवा त्यांना कापड विक्रीचा व्यवसाय परवाना नसतांना सदरच्या निविदा स्वीकृत करण्यात येवून खालील प्रमाणे गणवेश खरेदीवर रु. 4701955 खर्च केला आहे.

| निविदा स्वीकृत पत्र क्रं. व दिनांक | पुरवठा आदेश क्रमांक व दिनांक | करारनामा दिनांक | पुरवठाधारकाचे नांव | खरेदीची रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|
| 250/30.12.11 | 31.12.2011 | 04.01.12 | मोहीत एंटरप्रायझेस | 1610000 |
| 251/30.12.11 | 31.12.11 | -- | अमरज्योत एंटरप्रायझेस | 1481955 |
| 251/30.12.11 | 31.12.2011 | 03.03.12 | मोहीनी एंटरप्रायझेस | 1610000 |
| | | | | 4701955 |

5. शासन निर्णय दि. 2 जानेवारी १९९२ मधील परीछेद 8.4 मधील तरतुदीनुसार वरील पुरवठा आदेशान्वये खरेदी केलेल्या कापडाची तपासणी केल्याबाबत तपासणी अहवाल नस्तीसोबत आढळून आला नाही. त्यामुळे विहित दर्जाचे कापडाचा पुरवठा झाल्याची खात्री देता येत नाही. प्राप्त झालेले कापड ज्या

डिलीव्हरी चलनाव्दारे महापालिकेस प्राप्त झाले आहे, सदरचे डिलीव्हरी चलन लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

वरील अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 94, दिनांक 20.01.2014 नुसार विभागास कळविले असता विभागाकडून विहीत कालावधीत उत्तर प्राप्त झाले नाही. त्यामुळे वरील कापड खरेदीची रक्कम रु. 4701955 आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DATVCSM6501 (Ref No : 14, Hmm No : 94)

## *120 "श्री गणेश दर्शन प्रतियोगिता -2011" कार्यक्रमासाठी साहित्य खरेदीमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : ई(9) मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1015380.00/-

***गणेशदर्शन प्रतियोगिता-2011 या कार्यक्रमासाठी साहित्य खरेदी करतांना साहित्याचा पुरवठा करण्यास पात्र असलेल्या व्यावसायिंकाकडून निविदा न मागविता इतर पुरवठादारांनी सादर केलेल्या निविदा स्विकृत करुन साहित्याची खरेदी केली. विहित तांत्रिक बाबींची पूर्तता न करणाऱ्या निविदाधारकांच्या निविदा उघडण्यास पात्र ठरवून दरनिश्चिती केली.***

दि.01.09.2011 ते 11.09.2011 या कालावधीत गणेशदर्शन प्रतियोगिता -2011 या कार्यक्रमासाठी लागणारे साहित्य भाडेतत्वावर घेणे व खरेदी करण्या करीता दिनांक 02.08.2011 रोजी दै.प्रहार, दै.प्रातकाल व दै.नगरन्युज हया वृतपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करुन दिनांक 02.08.2011 ते 09.07.2011 या कालावधीमध्ये निविदा मागविण्यात आल्या. सदर कार्यक्रमासाठी आवश्यक असणाऱ्या साहित्य खरेदीची टिपणी सादर करतांना गणेशदर्शन प्रतियोगिता -2011 या कार्यक्रमाची रूपरेषा,कार्यक्रमाचा उद्देश , कार्यक्रमामध्ये उपस्थित राहणारे स्पर्धक यांची संख्या नमूद न करता टिपणी सादर करून साहित्य खरेदीसाठी मंजुरी घेण्यात आली.

त्यामध्ये खालील निविदाधारकांच्या निविदा वैध ठरविण्यात येवून दरनिश्चिती करण्यात आली.

मे. राधा एंटरप्रायझेस बदलापूर, 2. मे.महेश एंटरप्रायझेस बदलापूर, 3. मे.मोहीनी एंटरप्रायझेस प्राप्त निविदांधारकांनी दिलेल्या दराचा तुलनात्मक तक्ता तयार करुन खालील प्रमाणे पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आले.

| पुरवठा आदेश क्रमांक व दिनांक | पुरवठादाराचे नांव | खरेदी केलेल्या वस्तूंचा तपशिल | परिमाण | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 139/29.08.11 | महेश एंटरप्रायझेस | छायाचित्र काढणे<br>बॅनर्स<br>चहा अल्पोहपार<br>शाल<br>प्रमाणपत्र<br>पारितोषीके<br>उत्तेजनार्थ पारितोषीके<br>अल्पोपहार | 600नग<br>1000Sq.Ft<br>50 व्यक्ती<br>50नग<br>3000नग<br>02नग<br>50 पारितोषीके<br>500नग | 24000<br>19000<br>82500<br>12500<br>6000<br>30000<br>150000<br>25000 |
| | | | | 349000 |
| 215अ/16.12.2011 | महेश एंटरप्रायझेस | उत्तेजनार्थ पारितोषीके | 100नग | 300000 |
| | महेश एंटरप्रायझेस | व्हीडीओ शूटींग | 11 दिवस | 32890 |
| | | डीजीटल बॅनर्स | 1000स्क्वे.फुट | 19000 |
| | | बॅचेस | 50 नग | 7000 |
| | | सेलोफोन | 50 नग | 1250 |
| | | फाईल फोल्डर | 50 नग | 12500 |
| | | गुणपत्रीका | 2500नग | 3750 |
| | | निमंत्रणपत्रिका | 200 नग | 2400 |
| | | प्लॅसिटक खुर्च्या भाडे | 300नग | 3600 |
| | | टेबल भाडे | 10 नग | 1250 |
| | | | | 83640 |
| 140/29.08.11 | मोहीनी एंटरप्रायझेस | ध्वनीक्षेपन | 01 दिवस | 2250 |
| | | नारळ<br>बुके | 50नग<br>50नग | 600<br>11250 |
| | | ट्राफी | 01 नग | 20000 |
| | | पारितोषीके -1 | 03नग | 45000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | पारितोषीके-2 | 05नग | 50000 |
| | | पारितोषीके-3 | 05नग | 40000 |
| | | पारितोषीके-4 | 05नग | 30000 |
| | | | | 282740 |

सदर निविदांची व खरेदी कार्यपध्दतीचे लेखापरीक्षण केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या आहेत.

1. मे.राधा एंटरप्रायझेस यांचा व्यवसाय परवाना, नोंदणी दाखला नसतांना निविदा पात्र ठरविण्यात आली व महेश एंटरप्रायझेस यांचेकडे VAT CERTIFICATE (मुल्यवर्धीत कराचे नोंदणी प्रमाणपत्र) नसतांना तसेच खादय पदार्थ पुरविण्याचे परवाना नसतांना अल्पोपहार चहा इ.साठी निविदा वैध ठरविण्यात आली. तसेच मोहीनी एंटरप्रायझेस यांचा नोंदणी दाखल्यानुसार सदरचे निविदाधारक हे स्टेशनरी पुरवठा व फायर मटेरियलचा पुरवठा करण्यास सक्षम असतांना पारितोषीके खरेदीसाठी निविदा पात्र ठरविण्यात आली.

2. “श्री गणेश प्रतियोगिता” हा कार्यक्रम 1-9-2011 ते 11-09-2011 या कालावधीत निश्चित केलेला असतांना सदरचे साहित्य मोहीनी एंटरप्रायझेस यांचेकडील चलन क्रमांक 93 दि.29.09.11 नुसार प्राप्त झाले. तसेच महेश एंटरप्रायझेस यांचेकडून खरेदी केलेले साहित्याचे चलन लेखापरीक्षणास उपलब्ध् झाले नाही. तरी साहित्य प्राप्त झाल्याचा दिनांक कार्यक्रमाच्या दिनांकानंतरचा आहे.

3. मे.महेश एंटरप्रायझेस यांचेकडे खादयपदार्थ विक्रीचा परवाना नसतांना त्यांचेकडून अल्पोपहार, बिस्कीट, बिसलरी पाणी इ.साहित्य खरेदी केले आहे. तसेच फोटो काढणे, व्हिडीओ शुटींग करणे इ चा परवाना नसतांना सदरचे काम करण्याबाबत पुरवठा आदेश दिले आहेत. वरील साहित्य प्राप्त झाल्याबाबत साठा नोंदवहीत नोंद आढळून आली नाही. तसेच पारितोषिके वितरणाबाबतचे अभिलेखे स्पर्धकांच्या स्वाक्षरी व परिक्षण समितीचा अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही. त्यामुळे खर्चाची सत्यता पडताळता आली नाही.

४. उत्तेजनार्थ पारितोषिके व इतर पारितोषिके कोणत्या स्वरुपाची आवश्यक आहेत याबाबतचा तपशिल पुरवठा आदेशात नसतांना पुरवठादाराने पारितोषिके कशी पुरविली याबाबत खुलासा झाला नाही.

वरील अनियमितते बाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.97 दिनांक 20/01/2014 नुसार कळविले असता विभागाने लेखापरिक्षनाच्या अखेरच्या दिनांका पर्यंत कोणतेही उत्तर दिले नाही. वरील अनियमिततेमुळे रक्कम रु.१०१५३८० आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DATVCSM6501 (Ref No : 15, Hmm No : 97)

## *121 मनपातील लाभार्थी कर्मचाऱ्यांना सन 2011-12 करीता रेनकोट,गमबूट व कोल्हापुरी चप्पल पुरविण्यासाठी झालेल्या खरेदीमधील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :AB A-2(8) मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***मनपा कर्मचाऱ्यांना रेनकोट, गमबूट व कोल्हापूरी चप्पल खरेदी करतांना शासन निर्णय 2.01.1992 च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार चर्मोदयोग महामंडळाकडून खरेदी न करता निविदा मागवून खरेदी केली.***

मनपातील लाभार्थी कर्मचाऱ्यांना सन 2011-12 मध्ये रेनकोट , गमबूट व कोल्हापुरी चप्पल पुरविण्यासाठी लेखाशिर्ष AB A-2 (8) मधील तरतुदी मधून रु.3302129/- इतक्या रक्कमेची खरेदी करण्यात आली आहे. त्याकरीता दिनांक 25.05.2011 रोजीच्या दै.मुंबई, दै.लक्ष दिप व दै.अमृतधारा हया वृतपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्द करुन दि.25.05.11 ते 02.06.11 या कालावधीत निविदा मागविण्यात आल्या. सदर प्राप्त निविदाधारकापैकी खालील निविदाधारकांच्या निविदा दरनिश्चिती साठी पात्र ठरविण्यात आल्या.

मे.मोहीनी एंटरप्रायझेस, उल्हासनगर-4

मे.अमरज्योत एंटरप्रायझेस,उल्हासनगर-3

मे.मोहीत एंटरप्रायझेस,उल्हासनगर-3

सदरच्या निविदा नस्ती व खरेदी कार्यपध्दतीचे लेखापरीक्षण केले असता, खालील अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे.

1) उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखंस-2002/(2990)उदयोग-6 दिनांक 4.02.2003 नुसार शासकीय विभाग /निमशासकीय विभाग /मंडळे /महामंडळे /शासकीय उपक्रम /संस्था /स्वायत्तसंस्था /जिल्हापरिषदा /नगरपरिषदा /महानगरपालीका /नगरपालीका /इ. ना वस्तू खरेदी साठी शासनाने दिनांक 2/1/1992 च्या शासन निर्णयान्वये आणि वेळोवेळी विहीत केलली कार्यपध्दती बंधनकारक केली आहे. उदयोग, उर्जा व कामगार विभाग, दि.2/1/1992 च्या परिशिष्ट-पाच (अ) (1) अनुसार चर्म वस्तूंचा पुरवठा महाराष्ट्र चर्मोदयोग विकास महामंडळासाठी आरक्षित आहे. त्यामुळे चर्म वस्तुंची खरेदी सदरच्या महामंडळाकडून करणे बंधनकारक आहे. तसेच परिच्छेद 6 परिशिष्ट-चार मधील अ.क्र.7 ,8 नुसार रेनकोट खरेदी मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेमार्फत करण्याबाबत तरतूद आहे. असे असतांना निविदा मागवून खरेदी करण्यात आली आहे. शासन निर्णय 4.02.2003 मधील परि-4

नुसार दि.2/1/1992 च्या निर्णयानुसार आणि या निर्णयामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणा नुसार विहीत केलेल्या खरेदी कार्यपध्दतीचा अवलंब करणे बंधनकारक असतांना शासन तरतुदीचे उल्लंघन करुन खरेदी केली आहे.

2)उदयोग, उर्जा व कामगार विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रं.भांखस.1088/(2512)/उदयोग-6, दि.2 जानेवारी 1992 मधील परि.8.1 नुसार वस्तू खरेदी संबंधी खरेदी समिती स्थापन करणे आवश्यक असतांना अशी खरेदी समिती स्थापन न करता खरेदी करण्यात आली आहे.

3)शासन निर्णय दि.2.01.1992 मधील तरतूद व उदयोग संचालनालय नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय मुंबई यांचे कडील परिपत्रक क्रं.उसं/शा.निम.शा.वख./परिपत्रक/2009/बी-15279 दि.3 जून, 2009 मधील तरतुदी नुसार एकूण वार्षीक खरेदी रु.50000/ किंवा त्यापेक्षा अधिक असेल अशा वेळी निविदा चौकशी राजपत्रात प्रसिध्द करणे बंधनकारक आहे. तथापी अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4)निविदापत्रकांची छाननी तक्ता नस्तीसोबत आढळून आला नाही. अमरज्योत एंटरप्रायझेस यांचे नोंदणी दाखल्यावर व्यवसायाचे स्वरुप "ऑफीस" असे असतांना रेनकोट व चप्पल खरेदी साठी निविदापात्र ठरविण्यात आली आहे. मोहीनी एंटरप्रायझेस यांचे नोंदणी दाखल्यावर स्टेशनरी फायर मटेरियल युनिफॉर्म फर्निचर असे नमूद आहे. तसेच मोहीत एंटरप्रायझेस यांचे नोंदणी दाखल्यावर स्टेशनरी इलेक्टीकल गुडस हार्डवेअर फर्निचर असे नमूद आहे. तथापी, सदरच्या निविदाधारकांना रेनसूटचे न्यु झील कंपनी, रेनप्रुफ गार्मेट पॉलीवेल्ड कं. नेक्सस क्लोथींग कंपनी तसेच अॅपेक्स डकबॅक कंपनी व कोल्हापूर चपल खरेदीसाठी पात्र ठरविण्यात आले आहे. तसेच वरील निविदाधारक अधिकृत विक्रेते नसतांना गमबुट (फूलसाईज) सिको कंपनी व हिप्पो कंपनी चे दिलेले दर कशाच्या आधारे मान्य करण्यात आले. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. संबधित निविदाधारक यांना संबंधीत साहित्याच्या पुरवठा करण्यास उत्पादक कंपनीने दिलेल्या प्राधिकारपत्राची प्रत उपलब्ध करुन देण्याबाबत अर्धसमास क्रमांक 95, दिनांक २०/०१/२०१४ अन्वये विचारणा केली असता,लेखापरीक्षणाच्या अखेरच्या दिनांकापर्यंत अनुपालन प्राप्तझाले नाही.

5)दरपत्रकावर आवक क्रमांक व दिनांक नाही, त्यामुळे दरपत्रके प्रत्यक्षात कोणत्या तारखेस प्राप्त झाली व कोणत्या तारखेस उघडण्यात आली ही बाब स्पष्ट होत नाही.

6)पुरवठाधारकांना खालील प्रमाणे स्विकृतीपत्रे व पुरवठा आदेश देण्यात आले आहेत.

| पुरवठाधारकाचे नांव | साहित्याचा तपशिल | परिमाण | दर | रक्कम रु. | प्रमाणक क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| अमरज्योत एंटरप्रायझेस<br>बिल नं.21/07.08.2011 | 1.रेनप्रुफ गार्मेट<br>2.अॅकल बुट रबर | 725 नग<br>93 जोडी | 1095<br>578 | 793875<br>53754 | 3124/<br>11.10.11 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | 847629 | |
| मोहीनी एंटरप्रायझेस | रेनप्रुफ गार्मेट (महिलांसाठी)<br>गमबूट सिको कंपनी | 550 नग<br>700 जोडी | 995<br>610 | 547250<br>427000 | |
| | | | | 974250 | 3949 |
| मोहीत एंटरप्रायझेस | रेनप्रुफ गार्मेन्ट रेनसूट<br>गमबूट सिको कं | 725 नग<br>700 जोडी | 1095<br>610 | 793875<br>427000 | |
| | | | | 1220875 | 3997 |
| अमरज्योत एंटरप्रायझेस | कोल्हापूरी चपल (पुरुष)<br>कोल्हापूरी चपल (स्त्री) | 725 जोडी<br>425 जोडी | 225<br>200 | 174375<br>8500 | |
| | | | | 259375 | |

अमरज्योत एंटरप्रायझेस यांचेकडून खरेदी केलेल्या कोल्हापूरी चप्प्ल (पुरुष) व कोल्हापूरी चप्प्ल (स्त्री) 425 जोडया पुरवठा केल्याबाबत पुरवठाधारकाकडील चलनाची प्रत उपलब्ध झाली नाही. तसेच सदर साहित्याची नोंद ज्या पानावर घेण्यात आली त्या साठानोंदवहीतील पृष्ठाची प्रत सादर करण्याबाबत अर्धसमास क्रमांक 95, दिनांक २०/०१/२०१४ अन्वये विचारणा केली असता, लेखापरीक्षणाच्या अखेरच्या दिनांकापर्यंत अनुपालन प्राप्त झाले नाही.

DATVCSM6501 (Ref No : 16, Hmm No : 95)

### *122 प्रभाग समिती नं.2, करीता खुर्च्या व टेबल खरेदी मधील अनियमितते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ङ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 49900.00/-

***मनपाच्या प्रभाग समिती-2 च्या कार्यालयाकरीता फर्निचर खरेदी करतांना शासन निर्णय 2.01.1992 मधील तरतुदीनुसार विहीत पध्दतीचा अवलंब न करता खरेदी केली, अधिकृत फर्निचर विक्रेत्याकडून दरपत्रके न मागविता बांधकाम व्यावसायिकांकडून दरपत्रके मागवून खरेदी केली.***

(प्रमाणकक्रं.2728/2.9.11 वप्रमाणकक्र.2792 दि.15.09.11)

कार्यकारी अभीयंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे पत्र क्रमांक 120 दि.28.07.2011 नुसार प्रभाग समिती नं.2 साठी खुर्ची व टेबल खरेदी साठी दरपत्रके मागविण्यात आली. खालील दरपत्रके दरनिश्चितीसाठी पात्र ठरवून Executive chairs 02 नग' Executive Table 01 नग. 01 नग. व Chairs 07 नग खरेदी करण्यात आले.

जंकुश कन्स्ट्रक्शन इंजिनिअर्स दरपत्रका वरील दि.28.07.2011

मुंब्रादेवी मजुर कामगार सहकारी संस्था मर्यादित दरपत्रकावरील दि.28.07.2011

गुरुराज मजूर कामगार सहकारी संस्था मर्यादित दरपत्रका वरील दि.18.07.2011

कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्रमांक 120/1.8.2011 नुसार मे.जंकुश कन्स्ट्रक्शन इंजिनिअर्स यांना खालील पुरवठा आदेश दिले आहेत.

| अ.क्र. | साहित्याचे नांव | नग | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| 1 | Executive chairs | 02 | 20100 |
| 2 | Executive Table | 01 | 20000 |
| 3 | Chairs | 07 | 9800 |
| | | | 49900 |

वरील साहित्य खरेदी नस्तीचे लेखापरीक्षण केले असता खालील अनियमितता झाल्याचे आढळून आले आहे.

1. उदयोग, उर्जा व कामगार विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रं.भांखस.1088/(2512)/उदयोग-6, दि.2 जानेवारी 1992 मधीलपरि.8.1 नुसार वस्तू खरेदी संबंधी एक खरेदी समिती स्थापन करणे आवश्यक असतांना अशी खरेदी समिती स्थापन न करता खरेदी करण्यात आली आहे.

2. उदयोग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक भांखस-1088/(2512)/उदयोग-6, दिनांक 2/1/1992 अन्वये तसेच शासन निर्णय क्रमांक भाखंस-2002/ (2990) उदयोग-6 दिनांक 4.02.2003 नुसार शासकीय विभाग/ निमशासकीय विभाग/ मंडळे/ महामंडळे/ शासकीय उपक्रम/ संस्था/ स्वायत्त संस्था/ जिल्हा परिषदा/नगरपरिषदा/ महानगरपालीका/ नगरपालीका/ इ. मध्ये वस्तू खरेदी साठी शासनाने दिनांक 2/1/1992 च्या शासन निर्णयान्वये आणि वेळोवेळी विहीत केलली कार्यपध्दती बंधनकारक केली आहे. सदर शासन निर्णयातील परि-2 नुसार उदयोग, उर्जा व कामगार विभाग, दि.2/1/1992 च्या परिच्छेद-5, परिशिष्ट-तीन अनुसार लाकडी फर्निचर महाराष्ट्र लघुउदयोग विकासमहामंडळासाठी आरक्षित आहे. त्यामुळे लाकडी फर्निचरची खरेदी सदरच्या महामंडळाकडून करणे बंधनकारक आहे. तसेच उदयोग उर्जा व कामगार विभाग यांचेकडील पुरक शासन निर्णय क्रमांक भांखस-2000/ (2883)/ उदयोग-6, दि.16.10.2001 नुसार नवीन लाकडी फर्निचर खरेदीही बाब मे.अम्बीशियसब्लांईड इंडस्ट्रीयल को.ऑप प्रोडयुसर्स सोसायटी विक्रोळी (पूर्व)मुंबई-400083 यांचे करीता राखीव ठेवण्यात आलेली आहे असे असतांना कार्यकारी अभीयंता यांनी त्यांचे स्तरावर दरपत्रके मागवून खरेदी केली आहे.

3. जंकुश कंन्स्ट्रक्शन इंजिनिअर्स यांचा बांधकामाचा व्यवसाय असतांना त्यांचेकडुन लाकडी फर्निचर खरेदी केली.

4. सदरचे फर्निचर प्राप्त झाल्याबाबत पुरवठादाराकडील चलनाची प्रत व साठा नोंदवही प्राप्त झाली नाही त्यामुळे प्रत्यक्षात खरेदी केलेले साहित्य पुरवठा झाल्याची खात्री झाली नाही. साहित्य पुरवठा झाल्याबाबतचे चलन व साठा नोंदवही उपलब्ध झाली नाही.संबंधीत पुरवठादाराकडुन नोंदणीप्रमाणपत्र, व्हॅटदाखला, आयकर प्रमाणपत्र इ.न घेता दरपत्रक मान्य करुन फर्निचर विक्रीचा परवाना नसलेल्या बांधकाम ठेकेदारास पुरवठा आदेश देण्यात आले.

5. सदरची खरेदी महानगरपालिकेतील मध्यवर्ती भांडारामार्फत होणे आवश्यक असतांना कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, यांनी खरेदी केली आहे. कार्यकारी अभियंता यांचे टिप्पणी मध्ये खरेदी कोणत्या लेखाशिर्षामधून करण्यात येणार आहे याचा उल्लेख नाही.सदर खर्चाचे मंजुरी आदेश काढण्यात आल्याचे आढळून आले नाही. याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 106 दिनांक 20/01/2014 अन्वये कळविले असता विभागाने अनुपालन सादर केले नाही. त्यामुळे सदरचा खर्च रु.49900/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATVCSM6501 (Ref No : 17, Hmm No : 106)

## *123 स्थायी समिती सभापती कार्यालयाकरीता सोफासेट खरेदीमध्ये झालेली अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 99000.00/-

***सभापती स्थायी समिती यांचे कार्यालयाकरीता सोफासेटची खरेदी करतांना फक्त् एका सोफासेटची मागणी केली असतांना दोन सोफासेट खरेदी केले. सोफासेटची खरेदी अधिकृत फर्निचर विक्रेत्याकडून निविदा न मागविता कॉम्प्यूटर्स व संगणक साहित्याची विक्री करणा-या विक्रेत्याकडून दरपत्रके मागवून खरेदी केली.***

सभापती स्थायी समिती यांचे कार्यालयाकरीता सोफासेट बसविण्याची टिप्पणी प्रस्तावित करुन त्यामध्ये सभापती स्थायी समिती यांचे दिनांक 04.02.11 चे मागणी पत्राचा उल्लेख करण्यात येवून खालीलप्रमाणे सोफासेट खरेदी करण्यात आले.

| प्रमाणक क्रंमाक व दिनांक | पुरवठादाराचे नांव | खरेदीचा तपशिल | संख्या | दर (रु.) | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| 5633/21.03.12 | जयपी कॉम्प्युटर्स | सोफासेट | 01 | 49500 | 49500 |
| 5633/21.03.12 | जयपी कॉम्प्यूटर्स | सोफासेट | 01 | 49500 | 49500 |
| | | | | | 99000 |

1. स्थायी समिती सभापती यांनी एक सोफासेटची मागणी केली असतांना पुरवठा आदेश क्रमांक 159/29.09.2011 व पुरवठा आदेश क्रमांक 160/29.09.2011 या दोन पुरवठा आदेशान्वये दोन सोफासेट खरेदी करण्यात आले.

2. शासन निर्णय क्रं.भांखस.1088/(2512)/उदयोग-6, दि.2 जानेवारी 1992 मधील परि.8.1 नुसार वस्तू खरेदीसंबंधी एक खरेदी समिती स्थापन करुन खरेदी समितीच्या मंजुरीने साहित्याची खरेदी करणे बंधनकारक असतांना खरेदी समिती स्थापन न करता खरेदी करण्यात आली आहे.

3. शासन निर्णय दिनांक 2 जानेवारी 1992 मधील नियम क्रमांक 8.3 नुसार रु.50000 किंवा त्यापेक्षा जास्त खरेदीसाठी निविदा प्रसिध्द करणे आवश्यक असतांना निविदा /दरपत्रके न मागविता एकाच तारखेस वेगवेगळया पुरवठा आदेशान्वये रु. 99000/-चे साहित्य खरेदी केले आहे. महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियमावली 1965 मधील नियम 174 नुसार मंजुरी टाळण्याच्या दृष्टीने खरेदीचे आदेश विभागून देणे ही बाब नियमबाहय आहे.

4. उदयोग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक भांखस-1088/(2512)/उदयोग-6, दिनांक 2/1/1992 अन्वये तसेच शासन निर्णय क्रमांक भाखंस-2002/(2990)उदयोग-6 दिनांक 4.02.2003 नुसार शासकीय विभाग/निमशासकीय विभाग/मंडळे/महामंडळे/शासकीय उपक्रम/संस्था/स्वायत्त संस्था/जिल्हा परिषदा/नगरपरिषदा/महानगरपालीका/नगरपालीका/इ. मध्ये वस्तू खरेदीसाठी शासनाने दिनांक 2/1/1992 च्या शासन निर्णयान्वये आणि वेळोवेळी विहीत केलली कार्यपध्दती बंधनकारक केली आहे. सदर शासन निर्णयातील परि-2 नुसार उदयोग, उर्जा व कामगार विभाग, दि.2/1/1992 च्या परिच्छेद-5, परिशिष्ट-तीन अनुसार लाकडी फर्निचर महाराष्ट्र लघुउदयोग विकास महामंडळासाठी आरक्षित आहे. त्यामुळे लाकडी फर्निचरची खरेदी सदरच्या महामंडळाकडून करणे बंधनकारक आहे. तसेच उदयोग उर्जा व कामगार विभाग यांचेकडील पुरक शासन निर्णय क्रमांक भांखस-2000/(2883)/उदयोग-6, दि.16.10.2001 नुसार नवीन लाकडी फर्निचर खरेदी ही बाब मे.अम्बीशियस ब्लांईड इंडस्ट्रीयल को.ऑप प्रोडयुसर्स सोसायटी विक्रोळी (पूर्व)मुंबई-400083 यांचेकरीता राखीव ठेवण्यात आलेली आहे असे असतांना कोणतीही खरेदीप्रक्रीया न राबविता खरेदी करण्यात आली आहे.

5. खरेदी करण्यात आलेल्या सोफासेटची दर निश्चिती करण्यासाठी दरपत्रके न मागविता खरेदी केल्यामुळे सोफासेटची किंमत बाजारभावाशी तुलना न करता निश्चित केल्याचे दिसून येते..

6. पुरवठादाराने सोफासेट पुरवठा केल्याबाबत डिलीव्हरी चलनाची प्रत व साठा नोंदवही उपलब्ध

झाली नाही त्यामुळे सोफासेट प्राप्त झाल्याची खात्री देता येत नाही.

वरील आक्षेपाबाबत संबधित विभागास अर्धसमास पत्र क्र.99 दिनांक 20/01/2014 नुसार विचारणा केली असता विभागाने लेखापरीक्षणाच्या अंतिम तारखेपर्यंत कोणतेही उत्तर दिले नाही. त्यामुळे रक्कम रु.99000 चा खर्च अक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DATVCSM6501 (Ref No : 18, Hmm No : 99)

## *124 मनपाच्या हददीत येणाऱ्या मनपा शाळा व खाजगी शाळा / क.महाविदयालये अंतर्गत शालेय व इतर स्पर्धाचे आयोजना मधील खर्चाच्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : ई-संकीर्ण (9) मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 197810.00/-

***क्रिडा स्पर्धांच्या आयोजनासाठी खरेदी करण्यात आलेले साहित्याची अधिकृत पुरवठाधारकाकडून खरेदी केली नाही. कार्यक्रमाच्या दिनांकानंतर खरेदी केली, खरेदी पध्दतीच्या विहीत कार्यपध्दतीचा वापर न करता खरेदी केली आहे, निविदा न मागविता दरपत्रके मागवून विभागून खरेदी केली आहे.***

महानगरपालीकेच्या हददीत येणाऱ्या मनपा शाळा, खाजगी शाळा, क.महाविदयालये यांच्या अंतर्गत शालेय व इतर स्पर्धाचे आयोजन करण्यासाठी लेखाशिर्ष ई-संकीर्ण (9) अंतर्गतरु.5.00 लाख इतक्या खर्चास आयुक्त म.न.पा यांनी दिनांक 24.8.2010 रोजीच्या प्रस्तावित टिप्पणीस मान्यता दिली आहे. त्याकरीता दिनांक 9/12/2010 रोजी दरपत्रके मागविण्या बाबत नोटीस प्रसिध्द करुन दिनांक 13/12/2010 पर्यन्त दरपत्रके मागविण्यात आली. व खालील प्रमाणे साहित्य खरेदी करण्यात आले आहे.

| पुरवठा आदेश क्रमांक व दिनांक | बिल क्रं.व दिनांक | पुरवठादाराचेनांव | खरेदी केलेल्या वस्तूंचा तपशिल | परिमाण | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 299/6.01.2011 | 216/<br>31.03.11 | उर्वशी<br>एंटरप्रायझेस | प्रमाणपत्र<br>बुके | 3000 नग<br>25 नग | 15<br>200 | 45000<br>5000 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | 50000 |
| | 214/<br>31.03.11 | उर्वशी<br>एंटरप्रायझेस | Softball बॉस्को कं<br>चुना गोणी<br>ध्वनी क्षेपक<br>प्लॅस्टीक खुर्च्या<br>टेबल भाडयाने<br>जेवण, नाष्टा<br>स्टोअर बुक<br>पारितोषीके<br>निमंत्रण पत्रिका<br>चहा | 10 नग<br>40 गोणी<br>01 दिवस<br>50 नग<br>05 नग<br>60 प्लेट<br>01 नग<br>04 नग<br>1000 नग<br>1000 नग | 800<br>50<br>1500<br>8<br>50<br>175<br>500<br>2700<br>8<br>7 | 8000<br>2000<br>1500<br>400<br>250<br>10500<br>500<br>10800<br>8000<br>7000 |
| | | | | | | 48950 |
| | 124/21.06.11 | उर्वशी<br>एंटरप्रायझेस | सन्मान चिन्ह<br>सुवर्णपदके | 20 नग<br>283 नग | 760<br>160 | 15200<br>33960 |
| | | | | | | 49160 |
| | 123/<br>21.06.11 | उर्वशी<br>एंटरप्रायझेस | प्रथम क्रमांक पारितोषीक<br>ब्रॉन्झपदक<br>नाष्टा<br>कॉफी | 40नग<br>115 नग<br>300 नग<br>100 नग | 780<br>80<br>28<br>09 | 31200<br>9200<br>8400<br>900 |
| | | | | | | 49700 |

वरील खरेदी संबंधीची नस्ती व देयकांची पडताळणी केली असता खालील अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे.

1. वरील साहित्य खरेदीबाबत क्रिडा अधीकारी यांचे मागणीपत्रक नस्तीसोबत उपलब्ध झाले नाही.

शासन निर्णय दिनांक 2 जानेवारी 1992 मधील नियम क्रमांक 8.3 नुसाररु.50000 किंवा त्यापेक्षा जास्त खरेदीसाठी निविदा प्रसिध्द करणे आवश्यक असतांना निविदा न मागविता दरपत्रके मागवून रु. 148650/-चे साहित्य खरेदी केले आहे. महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियमावली 1965 मधील नियम 174 नुसार खरेदीप्रक्रीया टाळण्याच्या दृष्टीने खरेदीचे आदेश विभागून देणे ही बाब नियमबाहय आहे.

2. सदर खरेदीसाठी श्रृती प्रिंटर्स, साईली प्रिंटर्स व भवानी ट्रेडर्स यांचे कडील दरपत्रका सोबत व्यवसाय परवाना नोंदणी दाखला, व्हॅट प्रमाणपत्र व आयकराचा दाखला प्राप्त करुन न घेता दरपत्रके पात्र

ठरविण्यात आली.

3. श्रृती प्रिंटर्स, साईली प्रिंटर्स व भवानी ट्रेडर्स यांचे कडे कोणताही खादयपदार्थ विक्रीचा व्यवसाय नसतांना दरपत्रके स्वीकृत करुन दरपत्रक सादर न केलेल्या उर्वशी एंटरप्रायझेस यांना चहा, कॉफी, नाष्टा व जेवण इ.साठी पुरवठा आदेश देण्यात आले आहेत. उर्वशी एंटरप्रायझेस यांनी कोणतेही दरपत्रक सादर केले नसतांना वरील रु. 197810/- ची साहित्य खरेदी उर्वशी एंटरप्रायझेस यांचेकडून केली .याबाबत खुलासा खुलासा केला नाही.

4. बिल नं.123/21.6.11 नुसार उर्वशी एंटरप्रायझेस यांचे कडून खरेदी केलेले साहित्य हे कार्यक्रमाच्या दिनांका नंतर (कार्यक्रमाचा दिनांक 07.05.11) पुरवठा आदेश दिनांक 17.06.11 रोजी देवून खरेदी केले आहे. सदरच्या साहित्याच्या विनियोगा बाबतचा तपशिल उपलब्ध झाला नाही.

5. उर्वशी एंटरप्रायझेस यांचा ध्वनीक्षेपक, बुके,ब्रॉन्झपदक, पारितोषिके पुरविण्याचा व्यवसाय नसतांना त्यांचे कडून सदर साहित्य खरेदी करण्यात आले.

6. खरेदी करण्यात आलेल्या वरील तक्त्यातील साहित्यामध्ये प्रथम क्रमांक पारितोषिके याचा तपशिल न देता खरेदीसाठी पुरवठा आदेश देण्यात आले आहेत. पुरवठा आदेशामध्ये व दर् पत्रकामध्ये प्रथम पारितोषिकाचा तपशील दिलेला नाही.

वरील अनियमिततेबाबत अर्धसमास क्रमांक 101, दिनांक 20.01.2014 अन्वये विभागास कळविले असता विभागाकडून उत्तर प्राप्त झाले नाही. त्यामुळे सदर कार्यक्रमावरील खर्चाची रक्कम रुपये 197810/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATVCSM6501 (Ref No : 20, Hmm No : 101)

## *125 मालमता कर आकारणी व वसुली व्यवस्थापन अंतर्गत केलेल्या सुधारणा यासंदर्भातील अहवालाच्या प्रती (Project Report Printing) छपाई करणे पोटी केलेल्या नियमबाहय खर्चाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : ९ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 149940.00/-

***कर विभागामार्फत मालमत्ता कर आकारणी व वसुली व्यवस्थापन अंतर्गत केलेल्या सुधारणा या संदर्भातील अहवालाची छपाई करुन घेतांना विहीत कार्यपध्दतीचा अवलंब न करता छपाई करुन घेतली आहे***

करविभाग, मनपा यांनी दिनांक नसलेली टिप्पणी प्रस्तावित करुन मालमताकर आकारणी व वसुली व्यवस्थापन अंतर्गत केलेल्या सुधारणा यासंदर्भातील अहवालाच्या प्रती (Project Report Printing) छपाई करणे साठी खालील प्रमाणे खरेदी केली आहे.

| पुरवठा आदेश क्रमांक व दिनांक | बिल क्रं.व दिनांक | पुरवठादाराचेनांव | खरेदी केलेल्या वस्तूंचा तपशिल | परिमाण | दर (रु.) | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|
| 368/31.03.11 | 153/-निरंक-प्र.क्रं.847 /25.05.11 | जॉली प्रिंटर्स | Project Report 140 pages colour with spiral binding | 50 Book | 7.14per page | 49980 |
| 352अ/ 17.03.2011 | 154/-निरंक-प्र.क्रं.847 /25.05.11 | जॉली प्रिंटर्स | Project Report 140 pages colour with spiral binding | 50Book | 7.14per page | 49980 |
| 363A/ 25.03.2011 | 155/ Dt..Nil.. | शिवम ट्रेडर्स | Project Report 140 pages colour with spiral binding | 50 Book | 7.14per page | 49980 |
| | | | | | | **149940** |

वरील साहित्याच्या खरेदी संदर्भातील नस्ती व देयकाचे लेखापरीक्षण केले असता खालील अनियमितता झाल्याचे आढळून आले आहे.

1. शासन निर्णय क्रं.भांखस.1088/(2512)/उदयोग-6, दि.2 जानेवारी 1992 मधील परि.8.1 नुसार वस्तू खरेदी संबंधी एक खरेदी समिती स्थापन करुन खरेदी समितीच्या मंजुरीने साहित्याची खरेदी करणे बंधनकारक असतांना खरेदी समिती स्थापन न करता खरेदी केली आहे.

2. दरपत्रकाच्या पाकीटावर उपकर निर्धारक व करनिर्धारक यांनी स्वाक्षरी केली आहे. तथापी कोणत्या तारखेस पाकीट उघडण्यात आले याबाबत दिनांक नमुद केला नाही. दरपत्रके आवक नोंदवहीत नोंदवल्या बाबतचे पृष्ठांकन नाही, दरपत्रके सामक्ष उघडल्याबाबत कोणत्याही अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही, त्यामुळे प्रत्यक्षात दरपत्रके कोणत्या तारखेस प्राप्त झाली याची सत्यता पडताळता येत नाही.

3. सदरची खरेदी /छपाई मध्यवर्ती भांडार मार्फत करणे आवश्यक असतांना करनिर्धारक व करसंकलन यांनी पुरवठा आदेश देवून खरेदी करण्याचे प्रयोजन कोणते याबाबत विभागास अर्धसमास क्रमांक 100 दिनांक 20/1/2014 नुसार विचारणा केली असता विभागाचे उत्तर प्राप्त झाले नाही.

4. शासन निर्णय दिनांक 2 जानेवारी 1992 मधील नियम क्रमांक 8.3 नुसार रु.50000 किंवा त्यापेक्षा जास्त खरेदीसाठी निविदा प्रसिध्द करणे आवश्यक असतांना निविदा न मागविता एकाच बाबीसाठी दोन वेळा दरपत्रके मागविण्यात येवून रु. 149940/ -चे साहित्याची छपाई केली आहे. पPROJECT REPORT एकच

असताना एकाच वेळी 150 प्रतींची छपाई करून घेण्यास कोणती अडचण होती. तसेच एकाच बाबीसाठी एकाच वेळी मंजुरी घेऊन खर्च करणे शक्य असताना दोन वेळा वेगवेगळी दरपत्रके मागविण्यात आली आहेत. महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियमावली 1965 मधील नियम 174 नुसार खरेदी वरिष्ठांची मंजूरी टाळण्याच्या दृष्टीने खरेदीचे आदेश विभागून देणे ही बाब नियमबाहय आहे.

5. बिल क्रमांक 154/ दि-निरंक-. प्रमाणक क्र.847/25.05.11 नुसार केलेल्या छपाई बाबत दिनांक 11.07.11 रोजी दरपत्रके मागविण्यात आली असतांना जॉली पिंटर्स यांचेकडील दरपत्रकावरील दि.11/03/2011, ओम एंटरप्रायझेस यांचेकडील दरपत्रकावरील दिनांक 14/03/2011 व शिवम ट्रेडर्स यांचेकडील दरपत्रकावरील दिनांक 15/03/11 असा आहे. जॉली प्रिंटर्स यांना 17/03/11 रोजी पुरवठा आदेश दिले आहे. दरपत्रके माग्विल्याचा दिनांक हा पुरवठा आदेश्याच्या दिनांका नंतरचा असल्यामुळे दरपत्रके मागविण्याचा दिनांक व पुरवठा आदेशाचा दिनांक यामध्ये तफावत असल्याचे दिसून येते.

6. वरील बिलांव्दारे छपाई करुन घेतलेले साहित्य पुरवठादाराकडून प्राप्त झाल्याबाबत पुरवठादाराकडील DiliveryChallan व साठा नोंदवहीत घेतल्याची नोंद नाही, तसेच छपाई करण्यात आलेली पुस्तीका लेखापरीक्षणास पडताळणी करीता सादर करण्यात आली नाही. त्यामुळे साहित्य सुस्थितीत व मागणी प्रमाणे प्राप्त झाल्याची खात्री देता येत नाही. तसेच सदरहू साहित्याचे वितरण केल्याबाबतची नोंद घेण्यात आली नाही.

7. मे.शिवम ट्रेडर्स यांचे कडुन छपाई करण्यात आलेली पुस्तकांबाबत दिनांक 25/03/11 रोजी जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली व त्यानुसार शिवम ट्रेडर्स यापुरवठादाराने दिनांक 30/03/11 रोजी दरपत्रक सादर केले असतांना त्यांचे दरपत्रक प्राप्त होण्यापूर्वीच सदरच्या पुरवठादारास दिनांक 25.03.11 रोजी आदेश दिले आहेत. प्रथम पुरवठा आदेश देवून नंतरच्या तारखेस दरपत्रक प्राप्त करुन घेतल्याचे दिसून येते ही बाब नियमबाहय आहे.

8. एकाच अह्वालाची पुस्तके छपाई साठी वेगवेगळया वेगवेगळी टिपण्णी प्रस्तावित करुन 50 पुस्तकांची मागणी असतांना 150 पुस्तके छपाई करुन घेतली आहे.

वरील अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 100 दिनांक 20/1/2014 नुसार कळविले असता विभागाने कोणतेही उत्तर दिले नाही त्यामुळे वरील खर्चाची रक्कम रु 149940 आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DATVCSM6501 (Ref No : 21, Hmm No : 100)

## *126 सन 2011-12 चे अंदाजपत्रक तयार करण्याकरीता स्टेशनरी खरेदी मधील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

उल्हासनगर महानगरपालिका

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : ९ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 41116.00/-

***खरेदी पध्दतीच्या विहीत कार्यपध्दतीचा अवलंब न करता, अंदाजपत्रक तयार करण्यासाठी स्टेशनरी खरेदी केली. प्राप्त झालेल्या साहित्याची नोंद साठा नोंदवहीत घेतली नाही.***

प्रमाणक क्रमांक 599 दिनांक 09.05.2011

लेखा विभागाने दिनांक 14.02.2011 रोजी टिप्पणी प्रस्तावित करुन 2011-12 चे अंदाजपत्रक बनविण्यासाठी खालील प्रमाणे स्टेशनरी खरेदी केली आहे.

| पुरवठा आदेश क्रमांक व दिनांक | बिल क्रं. व दिनांक | पुरवठादाराचे नांव | खरेदी केलेल्या वस्तूंचा तपशिल | परिमाण | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 457/अ<br>/17.02.11 | 478/-निरंक | निलराज<br>फॅन्सी स्टोअर्स | Budget folder<br>Conference Pad<br>Ball pen<br>Ball Pen | 150 No<br>150 No<br>150 No<br>24 No. | 37500<br>825<br>1425<br>1416 |
| | | | | | 41166 |

1. सदरची स्टेशनरी खरेदी करण्यापूर्वी भांडारात स्टेशनरी उपलब्ध असल्याची खात्री करण्यासाठी भांडार विभागास वरील स्टेशनरी मागणी पत्रक नास्तीसोबत आढळून आले नाही. भांडार विभागाकडून स्टेशनरी उपलबद्ध नसल्याचे व खरेदी करण्यास हरकत नसल्याचे पत्र न घेता लेखा विभागाने परस्पर खरेदी केली आहे.

2. दरपत्रकावर मुख्य लेखा अधिकारी यांनी स्वाक्षरी केली आहे, तथापी दरपत्रके केंव्हा प्राप्त झाली याबाबतचा दिनांक नमुद केला नाही. तसेच सदर दरपत्रकाची आवक नोंदवहीमध्ये नोंद घेण्यात आली नाही.

3. वरील बिलांव्दारे छपाई करुन घेतलेले साहित्य पुरवठादाराकडून प्राप्त झाल्याबाबत पुरवठादाराकडील Dilivery Challan व साठानोंदवहीत घेतल्याची नोंद नाही, त्यामुळे साहित्य सुस्थितीत व मागणी प्रमाणे प्राप्त झाल्याची खात्री देता येत नाही. तसेच सदरहू साहित्याचे वितरण केल्याबाबतची नोंद घेण्यात आली नाही.

वरील अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 104 दिनांक 20.01.14 अन्वये विचारणा केली असता, विभागाकडून उत्तर प्राप्त झाले नाही. त्यामुळे वरील बाबींवर झालेल्या खर्चाची रक्कम रु.41116/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

## *127 महापौर निधीतून केलेल्या खर्चामधील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :C-4(14) मनपा महापौर निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महापौर निधीतून वेगवेगळे सांस्कृतीक, सामाजिक कार्यक्रमासाठी साहित्य् खरेदी करतांना खरेदी पध्दतीच्या नियमांचे पालन न करता खरेदी करून, शासन निर्णय 2.1.1992 मधील नियमांचे उल्लंघन केले.***

उल्हासनगर महानगरपालिकेतील भांडार विभागाने 2011-12 या वित्तीय वर्षामध्ये महापौर निधीतून लेखाशिर्ष C- 4(14) महापौर निधी या लेखाशिर्षांतर्गत खालील कार्यक्रमासाठी खर्च केला आहे.

| अ.क्र. | कार्यक्रमाचे नांव | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| 1. | होम मिनीस्टर चषक आयोजित करणे | 622875 |
| 2. | महापौर निधीतून जिवनगौरव पुरस्कार साहित्य खरेदी | 445800 |
| 3. | महापौर निधीतून मंगळागौर कार्यक्रम साहित्य खरेदी | 197482 |
| 4. | महापौर निधीतून बुध्दीबळ स्पर्धेसाठी साहित्य खरेदी | 294165 |
| 5 | महापौर निधीतून मकर संक्रांत कार्यक्रम साजरा करणे | 49977 |
| | एकूण् खर्च | 1610299 |

1)महापौर निधीतून होम मिनीस्टर चषक कार्यक्रम आयोजित करण्यासाठी केलेल्या खर्चाबाबत

महापौर निधीतून होम मिनिस्टर कार्यक्रम राबविण्याकरीता निविदा सूचना क्रं.11 प्रसिध्द करुन मे.मोहिनी एंटरप्रायझेस व महेश एंटरप्रायझेस यांचेकडून खालील देयकांव्दारे खर्च केला आहे.

| पुरवठा आदेश क्रमांक व दिनांक | देयक क्रं.व दिनांक | पुरवठाधारकाचे नांव | उपप्रमाणकाची रक्कम |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| 202/28.11.2011 | क्रं....निरंक....दि.31.12.11 | मोहिनी एंटरप्रायझेस | 310000 |
| 202/28.11.2011 | क्र.148/31.12.11 | महेश एंटरप्रायझेस | 312875 |

उपरोक्त कार्यक्रमासाठी साहित्याची खरेदी करतांना खालील अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले.

अ. वरील कार्यक्रम आयोजीत करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या. स्विकृत करण्यात आलेल्या निविदेमध्ये मे.गायत्री फायर सर्व्हीसेस उल्हासनगर यांची निविदा ग्राहय धरुन दरनिश्चिती करण्यात आली. मे.गायत्री फायर सर्व्हीसेस उल्हासनगर हे अग्निशमन साहित्याची विक्री करणारे पुरवठादार असतांना महापौरनिधीतून होममिनिस्टर कार्यक्रमासाठी महिलास्पर्धकांना साडी व पारितोषीके पुरविणे, पैठणी पुरविणे इ.साठी त्यांची निविदा पात्र ठरविण्यात आली.

ब. महेश एंटरप्रायझेस बदलापूर यांना होम मिनिस्टर कार्यक्रमांतर्गत 1 ते 4 प्रभाग समिती मध्ये 2500 कप चहा प्रत्येकी रु.10/-प्रमाणे तसेच रु.30/-प्रत्येकी प्रमाणे एकूण 500 नग नाश्ता पुरविण्याबाबत आदेश देण्यात आलेले आहेत त्यापोटी रु.40000/-इतकी रक्कम अदा केली आहे. महेश एंटरप्रायझेस यांचा हॉटेल किंवा खादयपदार्थ तयार करण्याचा व्यवसाय नसतांना चहा व नाश्ता पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले आहे. तसेच सदर कार्यक्रमाकरीता हजर असलेल्या स्पर्धकांची माहीती लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आली नाही.

क. मोहीनी एंटरप्रायझेस यांचा व्यवसाय स्टेशनरी, फायर मटेरियल व फर्निचर विक्री करणेसाठी असतांना त्यांना पैठणी साडया पुरवठा करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. सदरच्या पैठणी साडया ज्या स्पर्धकांना वाटप केल्या त्यांची स्वाक्षरीनिशी यादी लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. तसेच वरील साहित्य ज्या चलनाव्दारे महापालीकेस प्राप्त झाले त्या चलनाची प्रत पडताळणी साठी प्राप्त झाली नाही. त्यामुळे प्राप्त झालेल्या साहित्य व स्पर्धकांना वाटप केलेले साहित्य याचा मेळ घालणे शक्य झाले नाही.

2) महापौर निधीतून जिवनगौरव कार्यक्रमासाठी केलेला खर्चामधील अनियमितता..

( प्रमाणक क्रं.1801/22.07.2011)

अ. जेष्ठ नागरिकांच्या सत्काराचे आयोजन करण्याबाबत नागरिकांनी विनंती केल्याने, महापौर निधीतून शहरातील विविध क्षेत्रातील प्राविण्य व थोर समाजकार्य केलेल्या जेष्ठ नागरिकांना जिवनगौरव पुरस्कार देवून सत्कार समारंभ आयोजित करण्यासाठी मा.महापौर यांचे दिनांक 18.04.2011 चे पत्रान्वये 1 मे 2011 महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून दिनांक 30 एप्रील 2011 रोजी शहीद अरुण कुमार वैदय सभागृहात दु.4.00 ते सांय.7.00 यावेळात कार्यक्रम आयोजित करण्याबाबत कळविण्यात आले. त्यानुषंगाने महापौर यांनी दिनांक 19.04.2011 रोजी एकाच क्रमांकाची, क्रमांक 885/11 दिनांक 19.04.2011 ची तीन स्वतंत्र पत्रे देवून साहित्याची मागणी केली आहे.

1.अल्पोपहार .... 1500 नग

2.भित्ती पत्रीका -- 450 नग

3.स्टेज सजावट -- VIP खुर्ची 20 नग

सोफे 10 नग

फुलदाणी 10 नग

4.प्रमाणपत्रे 500 नग

5.पाण्याचे ग्लास 1500 नग

6.स्टेजबॅनर 01 नग

7.भेटवस्तू 200 नग (भेटवस्तूचा तपशिल नमुद केला नाही)

8.सन्मान चिन्ह (नमुन्या प्रमाणे) 37 नग

9.इतर गोल्ड पॉलीश मंडळ 130 नग,

10.बॅनर्स - 1500 स्कवे.फुट

11.बुके मोठे 50 नग

12.चहा 700 नग

13.निमंत्रण पत्रिका 500 नग

ब. वरील साहित्य खरेदीसाठी टिप्पणी सादर करताना कार्यक्रमाचे उद्दिष्ट, प्रत्यक्ष कार्याक्रमाबाबत कोणतीही प्रस्तावना, व कार्यक्रमासाठी आवश्यक असणारे साहित्य याबाबत टिप्पणी प्रास्तावित न करताच, दिनांक 25.04.2011 चे दरपत्रक नोटीस क्रंमांक 08/11 दि.27.04.2011 रोजी दु.4.00 पर्यन्त इच्छुक पुरवठादाराकडून सिलबंद दरपत्रके भांडार विभागास सादर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

क. प्राप्त दरपत्रकाची पडताळणी केली असता, दरपत्रकावर दिनांक नमुद नाही, तसेच दरपत्रके कार्यालयात प्राप्त झाल्याबाबत आवक नोंदवहीत नोंद करण्यात आलेली नाही. दरपत्रकासोबत नोंदणी दाखला, मुल्यवर्धीत कर प्रमाणपत्र (Vat Certificate), आयकराचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक असताना सदरची प्रमाणपत्रे घेण्यात आलेली नाहीत.

खालीलप्रमाणे पुरवठा आदेश देवून साहित्याची खरेदी करण्यात आली आहे.

| पुरवठा आदेश क्रमांक व | बिल क्रं.व | पुरवठादाराचे | खरेदी केलेल्या वस्तूंचा | परिमाण | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|

| दिनांक | दिनांक | नांव | तपशिल | | रुपये | |
|---|---|---|---|---|---|---|
| 16/ 30.04.11 | 03.05.11 | महेश एंटरप्रायझेस | अल्पोपहार | 1500 नग | 80 | 45000 |
| | | | भित्तीपत्रके | 450 नग | 10 | 4500 |
| | | | | | | 49500 |
| 20/ 30.04.11 | 03.05.11 | महेश एंटरप्रायझेस | स्टेज सजावट | 01 सेट | 23000 | 23000 |
| | | | प्रमाणपत्र | 500 नग | 15 | 7500 |
| | | | ग्लास (प्लॅस्टीक) | 05 | 05 | 7500 |
| | | | स्टेजसाठी बॅनर्स | 600 Sq.ft | 19 | 11400 |
| | | | | | | 49400 |
| 28/ 30.04.11 | 03.05.11 | महेश एंटरप्रायझेस | भेटवस्तू | 200 नग | 248 | 49600 |
| 21/ 30.04.11 | 126/3.5.11 | लाल स्वास्तीक एंटरप्रायझेस | सन्मान चिन्ह (तपशिल नाही) | 46 नग | 1075 | 49450 |
| 19/ 30.4.11 | 117/3.5.11 | लाल स्वास्तीक एंटरप्रायझेस | ऑर्केस्ट्रा | 01 दिवस | 30000 | 30000 |
| | | | फटाकेमाळ | 05 नग | 1000 | 5000 |
| | | | नारळ<br>नाष्टा व जेवन | 40 नग<br>50 नग | 10<br>290 | 400<br>14500 |
| | | | | | | 49900 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 23/<br>30.4.11 | 115/3.5.11 | लाल स्वास्तीक एन्टरप्रायझेस | फोटो | 500 | 28 | 14000 |
| | | | व्हिडीओ शुटींग | 01 दिवस | 3000 | 3000 |
| | | | लाईटींग सेट | 02 सेट | 2500 | 5000 |
| | | | सांउड सिस्टीम | 01 सेट | 3000 | 3000 |
| | | | बॅन्ड पथक | 01 | 7000 | 7000 |
| | | | हॅन्डबील | 5000 नग | 2.50 | 12500 |
| | | | | | | 49500 |
| 18<br>/30.4.11 | 116/3.5.11 | लाल स्वास्तीक एन्टरप्रायझेस | Digital Baner | 1500 Sq.ft | 19 | 28500 |
| | | | बुके मोठी | 50 नग | 200 | 10000 |
| | | | चहा | 700 नग | 08 | 5600 |
| | | | निमंत्रणपत्रिका | 500 नग | 11 | 5500 |
| | | | | | | 49600 |
| 17/<br>30.4.11 | 124/3.5.11 | लाल स्वास्तीक एन्टरप्रायझेस | शॉल<br>वाहतूक खर्च | 200 नग<br>07 गाडया | 177<br>2000 | 35400<br>14000 |
| | | | | | | 49400 |
| 22/<br>30.04.11 | 126/3.5.11 | लाल स्वास्तीक एंटरप्रायझेस | सन्मान चिन्ह (तपशिल नाही) | 46 नग | 1075 | 49450 |

ड.वरील सर्व साहित्यासाठी एकाच दिवशी दि. 25.4.11 रोजी सूचना प्रसिध्द करुन दि.27.4.11 पर्यंत दरपत्रके मागविली व दि.30.4.11 रोजी पुरवठा आदेश दिले आहेत. उदयोग, उर्जा व कामगार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं.भांखस.1088/(2512)/उदयोग-6, दि.2 जानेवारी 1992 मधील परि.8.1 नुसार वस्तू खरेदी संबंधी एक खरेदी समिती स्थापन करुन खरेदी समितीच्या मंजुरीने

साहित्याची खरेदी करणे बंधनकारक असतांना खरेदी समिती स्थापन न करता खरेदी करण्यात आली आहे.

इ. शासन निर्णय दिनांक 2 जानेवारी 1992 मधील नियम क्रमांक 8.3 नुसार रु.50000 किंवा त्यापेक्षा जास्त खरेदीसाठी निविदा प्रसिद करणे आवश्यक असतांना एकाच तारखेस एकूण 09 पुरवठा आदेशान्वये रु. 445800/- चे साहित्य खरेदी केले आहे. एकूण रक्कम रु. 445800 ची खरेदी ०९ पुरवठा आदेशात विभागून करण्यात आल्याचे स्पष्ट होते. महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियमावली 1965 मधील नियम 174 नुसार मंजुरी टाळण्याच्या दृष्टीने खरेदीचे आदेश विभागून देणे ही बाब नियमबाहय आहे.

उ.दिनांक 30.4.2011 रोजीच्या जिवनगौरव कार्यक्रमासाठी दि.30.4.11 रोजी पुरवठा आदेश दिले आहेत. एकाच दिवशी बॅनर्स छपाई, निमंत्रणपत्रिका छपाई व भित्तीपत्रके छपाई इ. सारखी कामे पूर्ण करुन पुरवठा करण्यात आला आहे. प्रत्यक्षात सदर साहित्य पुरवठा केल्याबाबत पुरवठादाराकडील चलनाची प्रत, निमंत्रणपत्रिका व भित्तीपत्रके नास्तीसोबत आढळून आल्या नाहीत.

ऊ.लाल स्वास्तीक एंटरप्रायझेस हे स्टेशनरी, प्रिंटींग, कॉम्प्युटर फर्निचर ऑफीस मटेरियलचे पुरवठादार असतांना त्यांचेकडून सन्मानचिन्ह, ऑर्केस्ट्रॉ, फटाके, नाष्टा, जेवण, चहा, बुके, बॅन्डपथक, शॉल व वाहतुकी साठी गाडया पुरविण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत.

ए. वरील साहित्यापैकी सन्मानचिन्ह 46 नग मिळण्याबाबत महापौर यांचे पत्र.क्रं.मनपा/11/885/11/19.4.11 नुसार कळविले असतांना एकाच पत्राव्दारे 192 नगाची खरेदी करण्यात आली आहे. तसेच सन्मानचिन्हाचे वाटप कोण कोणत्या मान्यवरांना करण्यात आले याबाबतची यादी लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

ई.महेश एंटरप्रायझेस यांचा हॉटेलींगचा व्यवसाय नसतांना त्यांचेकडून अल्पोपहार पुरवठा करण्याबाबत आदेश देण्यात आले आहे याबाबत खुलासा केलेला नाही.

3) <u>महापौर निधीतून मंगळागौर कार्यक्रमासाठी केलेल्या खर्चाबाबत</u>

महापौर यांचे पत्र क्रमांक 1161/2011 दिनांक 24.8.2011, 1162/2011 दिनांक 24.8.2011, 1163/2011 दिनांक 24.8.2011, 1164/2011 दिनांक 24.8.2011 नुसार मंगळागौरीचे औचित्य साधून दिनांक 27.8.11 रोजी दु.3.00 ते 8.00 या दरम्यान शहीद अरुणकुमार वैदय सभागृह हॉल उल्हासनगर-3 येथे सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करण्याबाबत कळविण्यात आले त्या करीता खालील साहित्याची मागणी करण्यात आली. एकत्रित मागणी न करता एकाच तारखेस वेगवेगळी पत्रे देवून साहित्य मिळण्याबाबत मागणी केल्याचे दिसून येते.

| पुरवठा आदेश | बिल क्रं.व दिनांक | पुरवठादाराचेनांव | खरेदी | परिमाण | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|

| क्रमांक व दिनांक | | | केलेल्या वस्तूंचा तपशिल | (रु.) | (रु.) | |
|---|---|---|---|---|---|---|
| 140ब/29.8.2011 | 51/29.8.11 प्र.क्रं.3709/ 15.11.11 | महेश एंटरप्रायझेस | गोल्डन फ्रेम | 950 नग | 142 | 9700 |
| 139अ/24.8.2011 | 49/29.8.11 प्र.क्रं.3709/ 15.11.11 | महेश एंटरप्रायझेस | फोटो | 200नग | 28 | 5600 |
| | | | व्हिडीओ शुटींग | 01 दिवस | 2500 | 2500 |
| | | | बिसलेरी (पाणी) | 02 | 142 | 284 |
| | | | बुके | 50 नग | 250 | 12500 |
| | | | नास्टा | 1000नग | 28 | 28000 |
| | | | रांगोळी | 20 किलो | 15 | 300 |
| | | | नारळ | 50 नग | 10 | 500 |
| | | | | | | 49682 |
| 140अ/29.8.11 | 50/29.8.11 प्र.क्रं.3709/15.11.11 | महेश एंटरप्रायझेस | बॅनर्स | 2000 Sqt | 19 | 38000 |
| | | | शा्ल | 30 नग | 350 | 10500 |
| | | | चहा | 50 नग | 07 | 350 |
| | | | | | | 48850 |
| 140क/29.8.11 | 52/29.8.11 प्र.क्रं.3709/15.11.11 | महेश एंटरप्रायझेस | सांऊड सिस्टीम | 02 सेट | 3000 | 6000 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | जेवण<br>बॅन्डपथक<br>मिनरल वाटरग्लास | 50प्लेट<br>01 दिवस<br>1500नग | 550<br>9000<br>4.50 | 27500<br>9000<br>6750 |
| | | | | | | 49250 |

अ)वरील साहित्याची मागणी मा. महापौर यांचे कार्यालाचे दि.24.8.2011 रोजीच्या पत्रान्वये करण्यात आली आहे. सदर कार्यक्रमासाठी किती सदस्य उपस्थित राहणार आहेत, त्याकरिता किती साहित्याची आवश्यता आहे तसेच किती सदस्यांना जेवण द्यावयाचे आहे याबाबत सविस्तर टिप्पणी मध्ये उल्लेख न करताच वरील साहित्य खरेदीस मंजुरी घेण्यात येवून दिनांक 26.38.2011 रोजी दरपत्रके मागविण्यात आली तथापि, दराच्या तुलनात्मक तक्त्यावर सादर केलेली टिपणीचा दिनांक 24.8.11 असा नमुद केला आहे. सदर खरेदीसाठी पुरवठादारास दिनांक 29.8.2011 रोजी आदेश दिले आहेत. व कार्यक्रमाचा दिनांक 27.8.2011 असा आहे. कार्यक्रमाच्या तारखेनंतर वरील साहित्याचे पुरवठा आदेश देण्यात आल्याचे दिसून येते.

ब)वरील सर्व साहित्यासाठी एकाच दिवशी दि. 24.8.2011 रोजी सूचना प्रसिध्द करुन दि.26.8.11 पर्यंत दरपत्रके मागविली व दि.29.8.11 रोजी पुरवठा आदेश दिले आहेत. उदयोग, उर्जा व कामगार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं.भांखस.1088/(2512)/उदयोग-6, दि.2 जानेवारी 1992 मधील परि.8.1 नुसार वस्तू खरेदी संबंधी एक खरेदी समिती स्थापन करुन खरेदी समितीच्या मंजुरीने साहित्याची खरेदी करणे बंधनकारक असतांना खरेदी समिती स्थापन न करता खरेदी करण्यात आली आहे.

क)महेश एंटरप्रायझेस यांचा हॉटेल किंवा खादयपदार्थ विक्री चा व्यवसाय नसतांना त्यांचे कडून चहा, नाष्टा, व जेवण बिसलेरी पाणी, मिनरल वॉटर ग्लास खरेदी करण्यात आले आहे. तसेच व्हीडीओ शुटींग करणे, बॅण्डलावणे इ.साठी आदेश दिले आहे. सदर पुरवठादाराकडे संबंधीत व्यवसायासाठीचे प्रमाणपत्र, उपकरणे व मनुष्यबळ इ. बाबी विचारात न घेता पुरवठा आदेश देण्यात आले आहे.

ड)शासन निर्णय दिनांक 2 जानेवारी 1992 मधीलनियमक्रमांक 8.3 नुसाररु.50000 किंवा त्यापेक्षा जास्त खरेदीसाठी निविदा प्रसिद करणे आवश्यक असतांना एकाच तारखेस 04 वेगवेगळे पुरवठा आदेश विभागून देवून रु.197482/- चे साहित्य खरेदी केले आहे. महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियमावली 1965 मधील नियम 174 नुसार मंजुरी टाळण्याच्या दृष्टीने खरेदीचे आदेश विभागून देणे ही बाब नियमबाहय आहे.

इ)सदरचे साहित्याचे वाटप ज्या लाभार्थ्यांना करण्यात आले त्या लाभार्थी, स्पर्धकांची यादी

उपस्थीत असलेले लाभार्थी इ.ची यादी पडताळणी साठी उपलब्ध झाली नाही. त्यामुळे खरेदी करण्यात आलेल्या साहित्याचा योग्य विनियोग झाल्याची पडताळणी करता आली नाही.

4) <u>महापौर निधीतून बुध्दीबळ चषक स्पर्धा आयोजित करण्यासाठी केलेल्या खर्चाबाबत</u>

महापौर निधीतून बुध्दीबळ चषक स्पर्धे करीता खालील उपप्रमाणकाव्दारे रक्कम रु.343162/- प्रमाणक क्रमांक 1155 नुसार खर्च करण्यात आली आहे.

| पुरवठा आदेश क्रमांक व दिनांक | उपप्रमाणक क्रं.व दिनांक | पुरवठादाराचे नांव | खरेदी केलेल्या वस्तूंचा तपशिल | परिमाण | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| 47/27.05.11 | 113/13.10.11 | ठाणे जिल्हा शहर बुध्दीबळ असोसिएशन | पदके<br>बॅनर<br>निमंत्रण पत्रिका | 300 नग<br>200 sq.ft<br>1500 नग | 32400<br>2150<br>15000 |
| | | | | | 49550 |
| 27/27.05.11 | 111/13.10.11 | ठाणे जिल्हा शहर बुध्दीबळ असोसिएशन | नास्ता<br>जेवण<br>चहा<br>बिसलरी (पाणी)<br>टेबलभाडे | 1000नग<br>100 नग<br>1000 नग<br>20 बॉक्स<br>100 नग | 25000<br>12500<br>7000<br>3840<br>1500 |
| | | | | | 49840 |
| 50/27.05.11 | 115/13.10.11 | ठाणे जिल्हा शहर बुध्दीबळ असोसिएशन | प्रसिध्दी बॅनर | 4600 sq.ft | 49450 |
| 52/27.05.11 | 116/13.10.11 | ठाणे जिल्हा शहर बुध्दीबळ असोसिएशन | हॉल सजावट<br>सांऊड सिस्टीम<br>खुर्चीभा|डे<br>विदुयत रोषणाई<br>स्टेज बॅनर | 01 दिवस<br>01 दिवस | 11000<br>15000<br>2100<br>10000<br>3225<br>1000 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | व्हिडीओ शुटींग | | 4000 |
| | | | | | 46325 |
| 51/27.05.11 | 110/13.10.11 | ठाणे जिल्हा शहर बुध्दीबळ असोसिएशन | प्रथम<br>पारितोषिक<br>व्दितीय<br>पारितोषीक<br>फोटो<br>शाल<br>नारळ<br>बुके | 04<br>04<br>250<br>100<br>100<br>100 | 10000<br>6500<br>7000<br>15000<br>1000<br>10000 |
| | | | | | 49500 |
| 46/27.05.11 | 109/13.10.11 | ठाणे जिल्हा शहर बुध्दीबळ असोसिएशन | ट्रॉफी | 100 | 24500 |
| | | | सन्मान चिन्ह | 100 | 25000 |
| | | | | | 49500 |

अ)वरील साहित्य खरेदी करतांना एकाच तारखेस वेगवेगळया क्रमांकाचे 06 पुरवठा आदेश देवून रु.294165/-चे साहित्य खरेदी केले आहे. शासन निर्णय दिनांक 2 जानेवारी 1992 मधील नियम क्रमांक 8.3 नुसार रु.50000 किंवा त्यापेक्षा जास्त खरेदीसाठी निविदा प्रसिद करणे आवश्यक असतांना एकाच तारखेस वेगवेगळया पुरवठा आदेशान्वये रु 294165/-चे साहित्य खरेदी केले आहे. महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियमावली 1965 मधील नियम 174 नुसार वरिष्ठांची मंजुरी टाळण्याच्या दृष्टीने खरेदीचे आदेश विभागून देणे ही बाब नियमबाहय आहे. पुरवठादारा बरोबर साहित्य पुरविण्यासाठी करारनामा केलेला नाही. महाराष्ट्र महानगरपालीका अधिनियमा मधील परिशिष्ट-5 मधील तरतुदी नुसार पुरवठादाराबरोबर करारनामा करणे बंधनकारक आहे.

ब)ठाणे जिल्हा शहर बुध्दीबळ असोसिएशन यांचेकडे वरील तपशिलात नमुद केलेले साहित्य पुरवठा करण्याबाबत कोणताही व्यावसायिक परवाना नसतांना सदर असोसिएशनचे दरपत्रक मान्य करुन

साहित्य खरेदी केले आहे. सदर संस्था बुध्दीबळ खेळासाठी नोंदणीकृत असतांना त्यांचे कडुन जेवण, नाष्टा, चहा, बिसलरी यासारखे खादयपदार्थ व बॅनर तयार करणे रोषणाई करणे, सांऊड सिस्टीम लावणे, व्हिडीओ शूटीग करणे, पारितोषिके देणे, सन्मान चिन्ह तयार करणे व ट्रॉफी तयार करुन देणे इ.साठी पुरवठा आदेश देण्यात आले आहे. सदर पुरवठादाराकडे संबंधीत व्यवसायासाठीचे प्रमाणपत्र, उपकरणे व मनुष्यबळ इ . बाबी विचारात न घेता पुरवठा आदेश देण्यात आले आहेत. संस्थेकडील नोंदणीकृत दाखला व साहित्य पुरवठा केल्याबाबत चलनाची प्रत उपलब्ध झाली नाही.

क)सदरचे साहित्याचे वितरण ज्या लाभार्थ्यांना करण्यात आले त्या लाभार्थ्यांची यादी व साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे खरेदी करण्यात आलेल्या साहित्याचा योग्य विनियोग झाल्याची पडताळणी करता आली नाही.

5) <u>महापौर निधीतून मकर संक्रांत कार्यक्रमासाठी केलेल्या खर्चाबाबत</u>

(प्रमाणक क्रं. 8 दि.7.04.2011

महापौर यांचे दिनांक 11.01.2011 चे पत्रान्वये मकर संक्रात कार्यक्रमाचे आयोजनावर दरपत्रके मागवून खालील प्रमाणे खर्च केला आहे.

| पुरवठा आदेश क्रमांक व दिनांक | उपप्रमाणक क्रं.व दिनांक | पुरवठादाराचे नांव | खरेदी केलेल्या वस्तूंचा तपशिल | परिमाण | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| 329/11,<br>दि.4.02.2011 | 250/10.03.2011 | महेश एंटरप्रायझेस | बॅनर<br>फोटो<br>व्हीडीओ शूटींग<br>टिफीन बॉक्स<br>Gift Item<br>नाष्टा | 180 sq.ft.<br>100 नग<br>1 दिवस<br>300 नग<br>45 न ग<br>400 प्लेट | 2051<br>2800<br>2000<br>16500<br>14625<br>12000 |
| | | | | | 49977 |

अ)दि.15 जानेवारी 2011 रोजी कार्यक्रम साजरा करण्याकरीता लागणारे साहित्याची खरेदी करणेकरीता दरपत्रके मागविण्याबाबत नोटीस बोर्डवर दिनांक 11.01.2011 रोजी सूचना प्रसिध्द करुन 13.01.2011 पर्यंत दरपत्रके मागविण्यात आली. व पुरवठा आदेश क्रमांक उमपा/भां.वि/329 दि.4.2.11 रोजी दिले आहेत. 15 जानेवारी 2011 रोजीच्या कार्यक्रमासाठी दि.04.02.2011 रोजी साहित्याचा पुरवठा करणेबाबत आदेश देण्यात आले आहेत.

ब)दरपत्रके सादर करणारे पुरवठादार हे स्टेशनरी प्रिंटींग हार्डवेअर इलेक्ट्रीकल गुडस कॉम्पयुटर स्टेशनरी सारखे साहित्याची विक्री पुरवठा करण्यास त्यांनी दर पत्रकासोबत सादर केलेल्या व्यवसाय नोंदणी दाखल्यावरील नोंदी वरून पात्र असल्याचे आढळून आले, तथापि, सदरच्या पुर्वाथादारणी सादर केलेली दरपत्रके वरील साहित्याच्या खरेदीसाठी मान्य करण्यात आली. व महेश एंटरप्रायझेस यांनी बॅनर, फोटो, व्हीडीओ शूटींग ,नाष्टा इ.सारखे साहित्य व खादयपदार्थ पुरवठा करण्यासाठी पात्र असल्याबाबत दर पत्रकासोबत कोणतेही प्रमाणपत्र, जोडलेले नसताना त्यांचे दरपत्रक मान्य करुन आदेश देण्यात आले आहे.

क)सदरचे साहित्य प्राप्त झाल्याची पुरवठादाराकडील DILIVERY CHALAN व साठा नोंदवही तसेच वितरण नोंदवही लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झाली नाही. त्यामुळे पुरवठा आदेशाप्रमाणे प्रतक्ष्यात साहित्य प्राप्त होवून सदर साहित्याचे वाटप झाल्याची खात्री करता आली नाही.

वरील अनियमितेबाबत विभागास अर्ध समास पत्र क्रमांक 92 दिनांक 20.01.2014 नुसार कळविले असता विभागाने अनुपालन सादर केले नाही.

DATVCSM6501 (Ref No : 23, Hmm No : 92)

## ***128 नोटा मोजण्याचे मशिन (Currency Counting Machine) खरेदी मध्ये झालेली अनियमितते बाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| ***Currency Counting Machine ची खरेदी करतांना विहीत कार्यपध्दतीचा अवलंब न करता खरेदी करणे, प्राप्त साहित्याची नोंद साठा नोंदवहीत न घेणे इ.अनियमिततेबाबत.*** |

प्रमाणक क्रमांक 599

कर निर्धारक व कर संकलन विभागाने मालमता व कर वसुली व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत Currency Counting Machine खरेदी साठी दिनांक नसलेली टिप्पणी प्रस्तावित केली. सदर टिप्पणी मध्ये

खर्चाचे लेखाशिर्षाचा उल्लेख करण्यात आला नाही .तसेच सदरची मशीन खरेदी करण्यासाठी अंदाजीत रक्कम निश्चित करण्यात आलेली नाही. दिनांक 21/03/2011 रोजी जाहीर सूचना नोटीस बोर्डवर प्रसिध्द करुन दरपत्रके मागविण्यात आली. खालील पुरवठादारांनी दरपत्रके सादर केल्याचे दिसून येते.

1.निलराज फॅन्सी स्र्टाअर्स

2. विजयदिप एंटरप्रायझेस

3.व्ही.पी.एंटरप्रायझेस

प्रमाणक क्रमांक 599 नुसार खालील प्रमाणे मे. निलराज फॅन्सी स्टोअर्स, यांचेकडील देयक क्रमांक 3229 दिनांक निरंक नुसार रक्कम अदा केली आहे.

| अ.क्र | साहित्याचे नांव | रक्कम(रु.) |
|---|---|---|
| 1. | Currency Counting Machine | 6450 |
| 2. | Currency Counting Kemt | 36500 |
| 3. | Detective Machine FND | 1750 |
| | | **44700** |

1. सदर दरपत्रकाची छाननी केली असता, दरपत्रकावर पुरवठादारानी दिनांक नमूद केला नाही. तसेच दरपत्रकाचे पाकीट व दरपत्रकावर खरेदी समितीच्या कोणत्याही कर्मचारी वा अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही. दरपत्रकावर आवक क्रमांक दिनांक नमुद नाही. त्यामुळे प्रत्यक्षात दरपत्रके कधी प्राप्त झाली याबाबत खात्री करता आली नाही.

2. दरपत्रकावर मुख्य लेखाधिकारी यांनी स्वाक्षरी केली आहे, तथापी दरपत्रके कैंव्हा प्राप्त झाली याबाबतचा दिनांक नमुद केला नाही. तसेच सदर दरपत्रकाची आवक नोंदवहीमध्ये नोंदघेण्यात आली नाही.

3. वरील बिलांव्दारे खरेदी केलेले साहित्य पुरवठादाराकडून प्राप्त झाल्याबाबत पुरवठादाराकडील Dilivery Challan व साठा नोंदवहीत घेतल्याची नोंद नाही, त्यामुळे साहित्य सुस्थितीत व मागणी प्रमाणे प्राप्त झाल्याची खात्री देता येत नाही. तसेच सदरहू साहित्याचे वितरण केल्याबाबतची नोंद घेण्यात आली नाही.

वरील अनियमितेबाबत विभागास अर्ध समासपत्र क्रमांक107,दिनांक20.01.2014 नुसार कळविले असता विभागाने अनुपालन सादर केले नाही. त्यामुळे वरील बाबीवर करण्यात आलेल्या खर्चाची रक्कम रु .44700/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

## *129 सार्वत्रिक निवडणूक -2012 साठी साहित्याच्या खरेदी मध्ये झालेल्या अनियमितते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : निवडणूक खर्च मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 99225.00/-

***सार्वत्रिक निवडणूकी साठी खरेदी केलेले साहित्य विहीत खरेदी कार्यपध्दतीचा अवलंब न करता खरेदी करणे, खरेदीस सक्षम अधिका-याची मंजूरी न घेता खरेदी करणे, प्राप्त साहित्याची साठा नोंदवहीत नोंद न घेणे इ. अनियमिततता झाल्या आहेत.***

प्रमाणक क्रमांक 5124

सार्वत्रिक निवडणूक-2012 साठी महानगरपालिका येथील निवडणूक विभागातून खालील प्रमाणे साहित्याची खरेदी दर पत्रकाव्दारे केली आहे.

| पुरवठा आदेश क्रमांक व दिनांक | बिल क्रं. व दिनांक | पुरवठादाराचेनांव | खरेदी केलेल्या वस्तूंचा तपशिल | परिमाण | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| 384/11<br>दि.4.02.2012 | | महेश एंटरप्रायझेस | झेरॉक्सपेपर, टोनर<br>फॅक्सरोल<br>A-4 Size Folder<br>Plastic Folder<br>Executive File<br>दोन फोल्डर फाईल<br>चार फोल्डर फाईल | 03नग<br>20नग<br>100नग<br>100नग<br>10नग<br>100नग<br>100नग | 14700<br>4800<br>9300<br>11000<br>3250<br>2400<br>4000 |
| | | | | | 49450 |
| 383/12,<br>दि.4.2.12 | 20/01/12 | महेश एंटरप्रायझेस | अे-4 साईज पेपर<br>झेरॉक्स पेपर<br>कलर पेपर<br>पंचमशीन | 75नग<br>60नग<br>50नग<br>50नग | 11665<br>9450<br>5000<br>4750<br>4250 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | इंकपॅड<br>स्टेपलर मोठे<br>गम बॉटल | 50नग<br>50नग<br>50नग | 4750<br>4500 |
| | | | | | 49775 |

वरील साहित्याची खरेदी नस्ती तपासली असता खालील प्रमाणे अनियमितता आढळून आल्या आहेत.

1. वरील साहित्याच्या खरेदी बाबतची दरपत्रके मागविण्यापूर्वी आयुक्तांची मंजूरी घेणे आवश्यक असतांना अशी मंजुरी घेतल्याचे मंजुरी आदेश नस्ती सोबत आढळून आले नाहीत.
लाल स्वास्तीक व महेश एंटरप्रायझेस यांचे दर पत्रकावर दिनांक नमूद नाही. तसेच यांचे दर पत्रकावर आवक क्रंमाक व दिनांक नमूद नाही.

2. शासन निर्णय दिनांक 2 जानेवारी 1992 मधील नियम क्रमांक 8.3 नुसार रु.50000 किंवा त्यापेक्षा जास्त खरेदीसाठी निविदा प्रसिध्द करणे आवश्यक असतांना निविदा न मागविता निवडणूक कामासाठी लागणाऱ्या साहित्य खरेदीसाठी दोन वेळा दरपत्रके मागविण्यात येवून रु.99225/ -चे साहित्याची छपाई केली आहे. वरील खरेदी एकाच दिनांकाच्या पुरवठा आदेशानुसार करण्यात आल्याने व खरेदी केलेल्या साहित्याची रक्कम रु.50 हजाराचे वर असल्यामुळे निविदा मागवून खरेदीचे पुरवठा आदेश देणे आवश्यक असताना दोन स्वतंत्र आदेशामध्ये खरेदीची रक्कम विभागून खरेदी करण्यात आली आहे. महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियमावली 1965 मधील नियम 174 नुसार खरेदी प्रक्रीया टाळण्याच्या दृष्टीने खरेदी चे आदेश विभागून देणे ही बाब नियम बाहय आहे

3. वरील बिलांव्दारे खरेदी केलेले साहित्य पुरवठादाराकडून प्राप्त झाल्याबाबत पुरवठादाराकडील Dilivery Challan व साठा नोंदवहीत घेतल्याची नोंद नाही, त्यामुळे साहित्य सुस्थितीत व मागणी प्रमाणे प्राप्त झाल्याची खात्री करता आली नाही. तसेच सदरहू साहित्याचे वितरण केल्याबाबतची नोंद घेण्यात आली नाही.

वरील अनियमितेबाबत विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 102 दिनांक 20.01.2014 नुसार कळविले असता विभागाने अनुपालन सादर केले नाही. तरी वरील बाबी वरील खर्चाची रक्कम रु 99225/-आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DATVCSM6501 (Ref No : 25, Hmm No : 102)

## *130 सन 2011 सालची महापालीका दैंनदिनी छपाई व भांडार विभागास नियमित लागणारे छपाई साहित्य खरेदी मधील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :AB A-3(2) मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महापालीका दैंनदिनी छपाई व भांडार विभागास नियमित लागणारे छपाई साहित्याची खरेदी करतांना विहीत खरेदी कार्यपध्दतीचा अवलंब न करता खरेदी केली आहे.***

(प्रमाणक क्रं.2407/20/09/2011)

महापालिका दैंनदिनी -2011 ची छपाई करणे व भांडार विभागास नियमित लागणारे साहित्य छपाई करुन घेणे साठी लेखाशिर्ष AB A-3(2) अंतर्गत दिनांक 04.11.2010 रोजी दै.मानस, दै.अमृत कलश, या वृतपत्रांमध्ये निविदा जाहीरात प्रसिध्द करुन दि.1/11/2010 ते 15/11/2010 या कालावधीत निविदा मागविण्यात आल्या आहेत. त्यामध्ये खालील निविदाधारकांनी निविदा सादर केल्या आहेत.

मे. मोहीत एंटरप्रायझेस

मे.श्रृती प्रिंटर्स

मे.अमरज्योत एंटरप्रायझेस

सदरचे निविदाव्दारे खालील प्रमाणे साहित्याची खरेदी केल्याचे दिसून येते.

| पुरवठा आदेश क्रमांक व दिनांक | बिल क्रं.व दिनांक | पुरवठादाराचे नांव | रक्कम (रु.) | प्रमाणक क्रमांक |
|---|---|---|---|---|
| 72/2011<br>दि.17/06/11<br>393/23.03.2011 | 182/31.03.11<br>181/31.03.11 | मे.मोहीत एंटरप्रायझेस | 203700<br>50000 | 3096/1.10.11 |
| 286/2010<br>दि.13.12.10<br>70/2011<br>दि.17.6.2011 | 10/ --NIL-<br>12/21.06.11 | श्रृती एंटरप्रायझेस<br>श्रृती एंटरप्रायझेस | 192450<br>35000 | 2407/2.9.11<br>3957/30.11.11 |
| 287/2010<br>दि.13.12.10 | | अमरज्योत एंटरप्रायझेस | 298000 | |
| | | | | |

वरील साहित्याची खरेदी नस्ती व देयकांचे लेखापरीक्षण केले असता, खालील उणिवा आढळून आल्या आहेत.

1. शासन निर्णय क्रं.भांखस.1088/(2512)/उदयोग-6, दि.2 जानेवारी 1992 मधीलपरि.8.1 नुसार

वस्तू खरेदी संबंधी खरेदी समिती स्थापन करुन खरेदी समितीच्या मंजुरीने साहित्याची खरेदी करणे बंधनकारक असतांना खरेदी समिती स्थापन न करता खरेदी केली आहे.

2. भाडारास नियमित लागणारे छपाई फॉर्म, व साहित्याची खरेदी करण्यासाठी एकत्रित निविदा मागविल्या असतांना मोहीत एंटरप्रायझेस यांचे कडील बिल.क्र.181/31.03.2011 नुसार खरेदी केलेले जन्म मृत्यू दाखला फॉर्म एकूण किंमतरु.50000/- चे साहित्य दि.25.03.11 रोजी दरपत्रके मागवून खरेदी करण्यात आले आहे. शासन निर्णय दिनांक 2 जानेवारी 1992 मधील नियम क्रमांक 8.3 नुसार रु.50000 किंवा त्यापेक्षा जास्त खरेदीसाठी निविदा प्रसिध्द करणे आवश्यक असतांना निविदा न मागविता एकाच बाबीसाठी दोन वेळा दरपत्रके मागविण्यात येवून रु. 50000/ -चे साहित्याची छपाई केली आहे.

3. मोहीत एंटरप्रायझेस यांचे नोंदणी दाखल्यावर स्टेशनरी एलेक्ट्रीकल गुडस हार्डवेअर फर्निचर असे नमूद आहे. तसेच अमरज्योती एंटरप्रायझेस यांचे व्यवसायाचे नोंदणी दाखल्यावर व्यवसायाचे स्वरुप ऑफीस असे नमूद असतांना सदर निविदाधारकांची निविदा ग्राहय धरुन दर निश्चिती करण्यात आली आहे. निविदा मागविताना इच्छूक पुरवाठादाराकडून निविदा मागविण्यात आल्या. वास्तविक पाहता छपाई साहित्याची निविदा प्रिटींग व्यवसाय परवाना धारकाकडून मागविणे आवश्यक होते. वरील पात्र ठरविलेल्या निविदाधारकाकडे प्रिटींग व्यवसाय परवाना नसतांना सदरचे साहित्याच्या खरेदीसाठी तांत्रिक दृष्टया निविदा मंजुर करण्यात आली.

4. सदरील प्राप्त झालेले साहित्याचे वितरण करतांना संबंधीत विभागाकडून विभाग प्रमुखाचे सहीचे

मागणीपत्र न घेता साहित्याचे वितरण केलेले साठानोंदवही वरुन दिसून येते.

वरील अनियमितेबाबत विभागास अर्ध समास पत्र क्रमांक 96 दिनांक 20.01.2014 नुसार कळविले असता विभागाने अनुपालन सादर केले नाही.

DATVCSM6501 (Ref No : 26, Hmm No : 102)

## *131 वाहन खरेदीमधील अनियमिततेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :AA-2 Part-II मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***जुने वाहन निर्लेखित न करता नवीन वाहने खरेदी केली, ट्रॅक्टर ट्रॉलीसह खरेदी करतांना, ती अधिकृत पुरवठादाराकडून खरेदी न करता निविदेव्दारे खरेदी केली.***

उल्हासनगर महानगरपालिकेच्या वाहन विभागामार्फत वित्तीय वर्ष 2011-12 मध्ये लेखाशिर्ष AA-2 Part-II मधून खालीलप्रमाणे वाहन खरेदी केली आहेत.

| अ.क्रं. | प्रमाणक क्रमांक व दिनांक | पुरवठादाराचे नांव | वाहनाचा प्रकार | वाहनाचा दर रु. | एकूण वाहने | बिलाची केलेली रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 5626/21.3.12 | मोहन मोटर्स | ट्रॅक्टर ट्रॉली, टँक | 399000 | 04 | 1532126 |
| 2. | 83/7.04.2011 | टाटा मोटर्स | मिनी बस | 1122818 | 01 | 1122818 |
| 3. | 4562/2.01.12 | महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनी | जीप बोलेरो | 497534 | 02 | 995069 |
| | | | | | | 3650013 |

वरील वाहने खरेदीच्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता, खालील उणिवा आढळून आल्या आहेत.

1 नगरविकास विभाग शासन निणर्य क्रं.संकीर्ण-2007/वाहन खरेदी/प्र.क्रं.27/2008/नवि-26, दिनांक 28/02/2008 अन्वये मा.उच्च न्यायालयाने दि.27 जून 2007 रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे काटकसरीचे धोरणाची उपाययोजना म्हणून तसेच उपलब्ध निधीचा जास्तीत जास्त व सुयोग्य वापर होण्यासाठी शासन निणर्यातील परिच्छेद 3 नुसार नवीन वाहन खरेदी करतांना बदली नवीन वाहन घेण्यापूर्वी जुने वाहन निकाली काढावे व तसा उल्लेख नवीन वाहन खरेदी आदेशात करण्यात यावा, असे असतांना मनपाकडील जुने जीप वाहन क्रमांक MH-05F229, MH-05F170 तसेच जुनी मिनी बस निकाली काढण्याबाबत कार्यवाही न करता वाहन खरेदी केली आहे.

मनपा आरोग्य विभागाने स्प्रेईंगकरीता चार टॅक्टर खरेदी प्रस्तावित करुन खरेदीसाठी निविदा मागविण्यात आल्या. त्यामध्ये खालील निविदा प्राप्त झाल्याचे दिसून येते.

1. मे.मोहन मोटर्स कं.बुलढाणा
2. मे.पॉजीटिव्ह ट्रॅक्टरर्स, नाशिक,
3. मे. पवार ट्रॅक्टर्स, अहमदनगर

वरील ट्रॅक्टर खरेदी निविदा नस्तीचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या आहेत.

2. वरील निविदाधारक हे ट्रॅक्टरचे अधिकृत विक्रेते असल्याबाबतचे प्राधिकारपत्र, पुरवठाधारकाचे व्यवसाय प्रमाणपत्र, आयकर भरल्याबाबतचे विवरणपत्र, तसेच व्हॅट प्रमाणपत्राच्या प्रती निविदा नस्तीसोबत आढळून आल्या नाहीत.

3. स्थायी समितीच्या दिनांक 28.04.2011 चे मंजुरी नुसार पुरवठा आदेश क्रमांक C/Vehicle/06 दिनांक 9.06.11 नुसार मोहन मोटर्स कंपनी यांचे वाटाघाटी अंती कमी आलेल्या दराप्रमाणे एकूण चार ट्रॅक्टर, ट्रॉलीसह प्रती ट्रॅक्टर रु.504000/- प्रमाणे आदेश देण्यात आले. त्यानंतर मुख्य आरोग्य निरिक्षक यांनी दिनांक 20.08.2011 रोजी सुचविल्यानुसार 25 एच.पी ट्रॅक्टर ऐवजी 15 एच पी ट्रॅक्टर खरेदी करण्याचे ठरविण्यात आले. व त्यासाठी महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीचे दर मागविण्यात आले. त्यामध्ये रु.230000/- प्रती ट्रॅक्टर असे दर दिले असतांना व महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीचे दरपत्रकावरुन सदरचे पुरवठादार, ट्रॅक्टर पुरविण्याबाबत महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनी अधिकृत पुरवठादार असतांना, प्रति ट्रॅक्टर रु.399000/- प्रमाणे चार ट्रॅक्टर पुरविण्याबाबत मे.मोहन मोटर्स मलकापूर जि.बुलढाणा यांना पुरवठा आदेश क्रमांक 153 दिनांक 28.09.2011 पुरवठा करण्याबाबत कळविण्यात आले. महिद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीने दिलेले 15 HP ट्रॅक्टरचे दर रु.230000/- व मोहन मोटर्स मलकापूर जि. बुलढाणा यांचे 15 HP ट्रॅक्टरचे दर रु.399000/- या दोन्ही दरांमध्ये तुलना केली असता, मोहन मोटर्स मलकापूर जि. बुलढाणा यांचे दर महिद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीचे दरापेक्षा प्रति ट्रॅक्टर रु.169000/- ने जास्त असल्याचे दिसून आले. तसेच स्थायी समितीच्या दिनांक 28.04.2011 चे मंजुरी नुसार 25 एच.पी ट्रॅक्टर खरेदीस मंजुरी असतांना 15 एच.पी.टॅक्टर खरेदी करण्यात आले आहेत. त्यामुळे एकूण चार ट्रॅक्टर खरेदी पोटी रु.676000/- इतक्या रक्कमेचे जादा प्रदान झाल्याचे सकृत दर्शनी दिसून येते.

4. सदरचे चार ट्रॅक्टर, ट्रॉली प्राप्त झाल्याची पुरवठादाराकडील डिलीव्हरी चलन लेखापरीक्षणासाठी प्राप्त झाले नाही.

याबाबत अर्धसमास क्रं.121 दि.28.01.14 अन्वये विचारणा केली असता विभागाकडील उत्तर अप्राप्त आहे.

DATVCSM6501 (Ref No : 28, Hmm No : 121)

## *132 विदयुत अभियांत्रिकी विभागाने 2011-12 मध्ये केलेल्या विदयुतविषयक कामातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :B-1 रस्त्यावरील दिवा मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***विदयुत विषयक कामाची नोंद मोजमाप पुस्तिकेमध्ये घेतांना कार्यकारी अभियंता यांचे प्रमाणपत्र मोजमाप***

***पुस्तिकेमध्ये नोंदवले नाही, मोजमाप पुस्तिकेमध्ये महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका परिच्छेद-24 मधील तरतुदीनुसार मोजमापाची नोंद घेण्यात आली नाही. विदयुत साहित्याची खरेदी शासन निर्णय दि.2.01.1992 मधील तरतुदीनूसार लघुउदयोग महामंडळाकडून खरेदी न करता निविदेव्दारे खरेदी केली आहे.***

महानगरपालिकेतील विदयुत विभागातील सोबतच्या परिशिष्ट क्र. मधील विदयुत विषयक कामाचीदरपत्रके/ निविदा, मोजमापपुस्तकेवठेकेदारासप्रदानकेलेल्यादेयकांचेलेखापरिक्षण केले असता, खालील अनियमितता आढळून आल्या आहेत.

1. दरसूचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे सदरच्या कामामध्ये वापरलेले विदयुतविषयक साहित्य ISI/IEEE दर्जाचे असल्याची खात्री करुन घेण्यात आली नाही. सार्वजनिक बांधकाम विभाग, मुख्य अभियंता (इलेक्ट्रीकल) मुंबई यांचे सन 2008-09 च्या दरसुचीमध्ये नमूद केलेल्या स्पेशिफिकेशनप्रमाणे काम असल्याची खात्री केल्याची कार्यकारी अभियंता यांचे स्वाक्षरीचे प्रमाणपत्र मोजमापपुस्तिकेमध्ये नोंदविलेले नाही. याबाबत अर्धसमास क्रमांक 141 दिनांक 7/01/2014 नुसार विभागास विचारणा केली असता, विभागाने त्यांचेकडील दिनांक 13/02/14 रोजीचे उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, यापुढे सदरचे साहित्य स्पेशिफिकेशनप्रमाणे असल्याची नोंद मोजमाप पुस्तिकेमध्ये घेण्यात येईल. तसेच वायर, स्विचेस, पीव्हीसी पाईप /केसिंग व कॅपिंग इ.ISI असल्याचे प्रमाणपत्र जोडले आहे. तथापि, सोबत जोडलेल्या यादीतील कामामध्ये 150 W.HPSW Fitting, 150 W HPSW Lamp (T),6 mtr.GI Pole इत्यादी साहित्य ISI असल्याचे प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.

2. दरसुचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे Standard & Specification मधील अटीनुसार Bureau of Energy Efficiency नुसार तिन स्टार किंवा त्यावरील दर्जा असलेले साहित्य वापरल्याबाबत नस्तीमधील कामाचे देयकावरुन आढळून आले नाही. याबाबत विभागाने त्यांचेकडील दि. 13/02/14 रोजीचे उत्तरामध्ये ज्या साहित्याची स्टार रेटींग आहे ते त्याचनुसार खरेदी करण्यात येते. असे नमूद केले आहे. तथापी, खरेदी करण्यात आलेल्या साहित्याची उपप्रमाणकावर सदरचे साहित्य् स्टार रेटींग प्रमाणे असल्याचे नमूद नाही.

3. दरसुचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे मापन पुस्तकात कामाची मापे नमुद केल्यानंतर सदरील काम स्पेसिफिकेशन प्रमाणे झाल्याचे प्रमाणपत्र नमुद नाही. याबाबत विभागाने त्यांचेकडील दि. 13/02/14 रोजीचे उत्तरामध्ये यापुढे मोजमापपुस्तिकेमध्ये नोंद घेण्यात येईल असे नमुद केले आहे.

4. दरसूचीमधील तपशिलानुसार विदयुत कामामध्ये वापरलेले साहित्य ERDA/CPRT किंवा केंद्र शासनाच्या व राज्यशासनाच्या प्रयोगशाळेतून तपासले नाही. याबाबत विभागाने त्यांचे दि.13/02/14 चे उत्तरात विदयुत कामामध्ये वापरलेले साहित्य गरज/आवश्यकता असेल तर ERDA/CPRT किंवा केंद्र शासनाच्या व राज्यशासनाच्या प्रयोगशाळेतून तपासले पाहिजे, परंतु मनपाकडे स्वत:ची प्रत्येक सामान चाचणी करण्याची सुविधा उपलब्ध आहे व सामानाची चाचणी केल्यानंतर वापरण्यात येतात. विभागाने दिलेले उत्तर स्वीकारार्ह नसुन दरसूचीमधील तपशिलाप्रमाणे वापरलेले साहित्याची तपासणी वरील संस्थाच्या प्रयोगशाळेतून होणे आवश्यक आहे.

5. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका परि.24 नुसार मोजमापे नमुद करणा-या व्यक्तिने, ती मोजमापे नोंदवहीत नमूद करत असलेले प्रत्येक परिमाण हे प्रत्यक्षात त्या मोजमापाचे आहे, याची त्या ठिकाणी स्वत: तपासणी करुन, स्वत:ची खातरजमा करुन घेतली पाहीजे, मोजमापे ही, इतरांनी दिलेल्या माहितीवरुन नोंदविण्यात येवू नयेत, किंवा अंदाज अथवा कंत्राटदारांनी/ पुरवठादारांची बिले इत्यादि सारख्या अन्य कागदपत्राच्या आधारे उतरवून काढण्यात येवू नयेत अशा स्पष्ट सूचना आहेत, तसेच केलेले सर्व काम व पुरविण्यात आलेली सामुग्री, यांचे त्याचवेळी व त्याच ठिकाणी यथास्थिती मोजमाप, मोजणी किंवा वजन करण्यात येईल आणि त्यांची अधिकृत मोजमाप नोंदवहीमध्ये नोंद करणा-या अधिका-याने त्या तारखेसह आपल्या सहीने त्या बाबतीत अशा अर्थाचे प्रमाणपत्र नमुद करणे आवश्यक आहे. मोजमापांची नोदं करणा-या अधिका-याने आतील बाबी किंवा क्षेत्र या स्तंभामधील नोंदी शाईने करणे आवश्यक आहेत व शेवटी तारखेनिशी प्रमाणित करणे आवश्यक आहे. तथापी सोबत जोडललेल्या पारीशिष्ट क्र. मध्ये नमूद केलेल्या कामांची मोजमापपुस्तिका तपासली असता, प्रत्यक्षात कामाची स्थळ पाहणी करुन कामाचे दिनांकानुसार मोजमाप घेवून लिहीली नाही. एवजी कामाचे अनुसूची -“ बी ” ची प्रिंट मोजमाप पुस्तकामध्ये जोडली आहे. मोजमापाची नोंद करणा-या अधिका-याने तारखरेसह स्वाक्षरीचे प्रमाणपत्र नमुद केले नाही. तसेच मोजमाप पुस्तकामध्ये उप अभियंता/ कार्यकारी अभियंता याचे तपासणी प्रमाणपत्र मोजमाप पुस्तिकेमध्ये नमुद नाही. विभागाने त्यांचे उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, मोजमाप बुकमध्ये दिलेल्या तारखेनुसार संपूर्ण मोजमाप इ.होत असते. म्हणून तिथे तारीख टाकण्याची सवय नाही. परंतु यापुढे आपण निदर्शनास आणलेल्या सर्व बाबींची दक्षतापूर्वक अंमलबजावणी करण्यात येईल असे नमुद केले आहे.

6. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 10 पोटकलम 2 च्या तरतुदीनुसार कंत्राटदाराने केलेल्या कोणत्याही करारामध्ये पालिका सदस्याचा / अधिकारी वा कर्मचारी यांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष हितसंबंध नसल्याचे प्रमाणपत्र कंत्राटदाराकडून घेणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही. विभागाने त्यांचे दिनांक 13/02/14 चे उत्तरात असे नमूद केले आहे कि,सदर सुचनेची नोंद करण्यात आलेली असून यापुढे याबाबीचे पालन करण्यात येईल.

7. सोबतच्या परिशिष्टामधील कामासाठी वापरलेले साहित्य Street Light, GI Pole 6mtr, 150Watt HPSV Fitting इत्यादी सारखे साहित्याचा मेळ कंत्राटदाराने खरेदी केलेल्या इन्व्हॉईस वरुन घेतला नाही. याबाबत विभागाचे दिनांक 13/02/14 चे उत्तरामध्ये असे नमुद केले आहे की, निविदाकारांशी केलेल्या संविदेत त्यांचे खरेदीचे देयक सादर करण्याची अट नसते, परंतु महापालिकेचे विदयुत विभागाचे सर्व साहित्याची आमच्या स्पेशिफिकेशनप्रमाणे आहे किंवा नाही याबाबत खात्री करुन कंत्राटदाराला सामान वापरण्याची परवानगी देत आहे. विभागाचे उत्तर स्वीकारार्ह नाही, कारण कामावर वापरलेले साहित्य कंत्राटदारास दिलेल्या कामाचे आदेशा सोबतच्या अनुसूची “बी “ मधील specification नुसार त्याच दर्जाचे असल्याची खात्री करण्यासाठी पुरवठादाराचे INVOICE सोबत मेळ घेणे आवश्यक आहे.

8. उदयोग, उर्जा व कामगार विभाग यांचेकडील शासन निर्णय दिनांक 2/01/1992 मधील परिच्छेद 10.6 व परिशिष्ट-11 नुसार Flurocent tube, Chokes, Starter, street Light, Ficture PVC & VIRS cable,

street light fitting इत्यादी सारखे साहित्य लघु उदयोगांकडून खरेदीपोटी राखून ठेवलेले असतांना निविदेव्दारे खरेदी केली आहे. याबाबत विभागाने त्यांचे दिनांक 13/02/2014 चे उत्तरात 21 ऑक्टोबर 1996 रोजी उल्हासनगर नगरपालिकेचे महानगरपालिकेत रुपांतर झाले व मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 लागू झाले. त्या अधिनियमातील तरतुदीनुसार निविदाव्दारे खरेदी केली आहे. विभागाकडील उत्तर स्वीकारार्ह नाही कारण, वरील साहित्य हे लघु उदयोगांकडून खरेदी करण्यासाठी राखीव असून शासन निर्णय क्रमांक भाखंस-2002/(2990)उदयोग-6 दिनांक 4.02.2003 नुसार शासकीय विभाग /निमशासकीय विभाग/मंडळे/महामंडळे/शासकीय उपक्रम/संस्था/स्वायत्तसंस्था/जिल्हापरिषदा/नगरपरिषदा/महानगरपालिका/नगरपालीका/इ. ना वस्तू खरेदीसाठी शासनाने दिनांक 2/1/1992 च्या शासन निर्णयान्वये आणि वेळोवेळी विहीत केलली कार्यपध्दती बंधनकारक केली आहे.

9. दरसूचीमध्ये नमूद केल्यानुसार महानगरपालिका क्षेत्रातील 5 टक्के कामाची तपासणी मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग ( इलेक्ट्रीकल) यांचे अधिपत्याखालील कार्यकारी अभियंता यांचेकडून होणे आवश्यक असतांना सोबत जोडलेल्या विदयुत विषयक कामाची तपासणी केली नाही. याबाबत विभागाने त्यांचे दिनांक 13/02/2014 चे उत्तरामध्ये ज्या संस्थेत कार्यकारी अभियंता (विदयुत) यांची नेमणूक नसेल त्यांनी वर्षात कमीत कमी 5 कामे तपासणी करुन घ्यावे परंतु महापालिकेत पुर्वीपासून कार्यकारी अभियंता यांचे मंजूर पद आहे. त्यामुळे सदरचे उत्तर स्वीकारार्ह नसुन सार्वजनिक बांधकाम विदयुत विभाग मुख्य अभियंता (इलेक्ट्रीकल) मुंबई यांचे 2008-09 च्या दरसुचीमध्ये नमूद केल्यानुसार वरील कार्यवाही करणे आवश्यक आहे.

DATVCSM6501 (Ref No : 29, Hmm No : 141)

## *133 मनपाच्या अधिनस्त असलेली विदयुत जोडणीच्या विदयुत देयकांमधील वीज शुल्काची रक्कम परत घेण्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :B-I मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 659867.00/-

| |
|---|
| ***मुंबई वीज अधिनियम१९५८ कलम 2 (1)(क) नुसारनिमशासकीय आस्थापनांना वीज शुल्क माफ असताना विदयुत मंडळाकडून वीज शुल्क माफ करून न घेता वीज शुल्करु.659867/- अदा केले आहे.*** |

मनपाच्या अधिपत्याखाली असलेली विदयुत जोडणीच्या सन 2011-12 मध्ये महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी लिमिटेड यांना अदा केलेल्या सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्र. 02 मधिल देयकांचे लेखापरिक्षण केले असता, महानगरपालिकेतील विदयुत विभागाकडून एप्रिल-11 ते मार्च-12 या कालावधीत रु.6,59,867/- इतकी रक्कम वीज शुल्कापोटी अदा केली आहे. मुंबई विज अधिनियम 1956 च्या कलम 2( क)(1)(क) नुसार शासकीय, निमशासकीय कार्यालयांना विज शुल्क माफ असतांना विदयुत मंडळाकडून विज शुल्क माफ करुन न घेता विज बिलाचा भरणा केला आहे. त्यामुळे विज शुल्कापोटी मनपाचा रु.659867/- इतका अतिरिक्त खर्च झाला आहे.

याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 142 दि.०७/०२/२०१४ नुसार महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेड यांच्याकडील परिपत्रक क्रं.P-Com/ACCTS/ED/EXmp/22550, द८/८/२०१३अन्वयें उल्हासनगर महानगरपालिकेच्या अधिनस्त असलेल्या विदयुत जोडणीच्या विदयुत बिलात वीज शुल्क सुट व आजपर्यन्त भरणा केलेले वीज शुल्काची रक्कम परत मिळणेबाबत अर्ज दाखल केला असल्याचे नमूद केले आहे.

तरी याबाबत महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेड यांचेकडे पाठपुरावा करुन रक्कम रु.659867/- वसुल करुन मनपा निधीत जमा करावी.

DATVCSM6501 (Ref No : 30, Hmm No : 142)

## *134 डॅम्पिंग ग्राऊंड येथील कच-याचे सपाटीकरण करणे या कामातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :3412550 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 778360.00/-

***निविदे संदर्भात स्टोअर मॅन्युअल मध्ये अंतर्भुत केलेल्या पार्ट –II –e नुसार नमूद केल्याप्रमाणे व्दितीय मुदतवाढीनंतर आलेल्या निविदेमधून अंतिमीकरण करणे नियमाधीन असतांना व्दितीय मुदतवाढ न देताच मागील वर्षाच्या पुरवठादारास सेवेसाठी ठेका दिल्याचे प्राप्त नस्तीवरुन दिसून येते.तसेच जाहिरातीबाबत शासन निर्णय क्रमांक पीयुबी-1000 / प्र.क.73 / 2000 / 34, दिनांक 01.05.2001 या शासन निर्णयाचे पालन झाल्याचे आढळून येत नाही. त्याचप्रमाणे तपासणी देयकामध्ये फक्त Dozar-08 ने काम केल्याची दिनांक व वेळ नमूद आहे तथापी हे काम कसे करण्यांत आले याबाबतीचा प्राधीकृत अहवाल आढळून न आल्यामुळे कामाचे मुल्यांकन देयकावरुन तपासणे शक्य झाले नाही.***

**डम्पींग ग्राऊंड येथील कच-याचे सपाटीकरण करणे या कामासाठी दिनांक** 01.07.2011 **रोजी दै.फ्री प्रेस जर्नल,दै.धनुष्यधारी, व दै.सागर या वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यांत आली होती.निविदा प्रक्रिया व खर्चाच्या अनुषंगाने पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.**

| | | |
|---|---|---|
| **कामाचे नाव** | :- | **डॅम्पींग ग्राऊंड येथील कच-याचे सपाटीकरण करणे.** |
| **निविदा सुचना क्रमांक** | :- | 1.**पहिली** UMC/PRO/117/11<br>2.**दुसरी** UMC/PRO/312/11 |
| **अंदाजपत्रकीय रक्कम** | :- | **रु.**46,57,400 |
| **तांत्रिक मान्यता** | :- | **दिसून आली नाही** |
| **प्रशासकिय मान्यता** | :- | **स्थायी समिती ठराव क्रमांक** 40 **दिनांक** 24.06.2011 |
| **ठेकेदाराचे नाव** | :- | **मे.ॲन्टोनी वेस्ट हं.सेल प्रा.लि.नवी मुंबई.** |
| **दर विश्लेषण** | :- | **रु.**12760/-(**प्रति दिन**) |
| **अनुदान संकेतांक** | :- | **भाग** -1 **सी**- 1(**सी**) **कचरा वाहतुक खर्च** |

1) **निविदेसंदर्भात स्टोअर मॅन्युअल मध्ये अंतर्भुत केलेल्या पार्ट** -II -e **नुसार नमूद केल्याप्रमाणे व्दितीय मुदतवाढीनंतर आलेल्या निविदेमधून अंतिमीकरण करणे नियमाधीन असतांना व्दितीय मुदतवाढ न देताच मागील वर्षाच्या पुरवठादारास ठेका दिल्याचे प्राप्त नस्तीवरुन दिसून येते.**

2) **या निविदेतील कामासाठी अंदाजीत रक्कम रुपये** 46,57,400/-**अशी दर्शविण्यांत आलेली आहे. त्यानुसार दे.धनुष्यधारी, दै.सागर व दै.फ्री प्रेस जर्नरल या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यांत आलेली आढळून येते. शासन निर्णय क्रमांक पीयुबी** -1000 / **प्र.क.**73 / 2000 / 34, **दिनांक** 01.05.2001 **नुसार वरील रकमेसाठी एक ब वर्ग दैनिक व एक साप्ताहीक या वृत्तपत्रांमध्ये सदरची जाहिरात प्रसारीत होणे आवश्यक होते. परंतु या तरतूदीचे पालन झाले नाही.**

3) 2011-2012 **साठी अंदाजपत्रकीय रक्कम कशी निश्चित करण्यांत आली याबाबतची माहिती संचिकेसह आढळून आली नाही. तसेच या वित्तीय वर्षातील कार्यादेश, मार्गदर्शक तत्वे ,** Scope of Work, **सविस्तर दैनंदिन कामाचा अहवाल व त्याबाबतच्या दराची मंजुरी, वेळोवेळी डम्पींग ग्राऊंडवर जमा होणारा कचरा,डम्पींग ग्राऊंडची आवक जावक नोंदवही, कचरा वाहून आणणा-या वाहनांचा नंबर विभाग ,वेळ व वजन यासह संपूर्ण माहिती तसेच या अनुषंगाने आवश्यक असणारे पुरेसे दस्ताऐवज लेखापरीक्षणास सादर करण्यांत आले नाही त्यामुळे अदाई रकमेबाबतची सत्यता पडताळणी करता आली नाही.**

4) **या कामाचे देयक डि . व्ही. क्रमांक** 4460/229.12.2011

| **प्रमाणक क्रमांक** | **स्थूल रक्कम रु.** | **वजाती रु.** | **निव्वळ रक्कम रु.** | **कालावधी** |
|---|---|---|---|---|
| 30/15.10.11 | 395560 | 7911 | 387649 | 01.05.2011**ते** 31.05.2011 |
| 31/15.10.2011 | 382800 | 26796 | 356004 | 01.06.2011 **ते** 30.06.11 |
| **एकूण** | 778360 | 34707 | 743653 | |

**उपरोक्त कामाचे** 2011-12 **या वित्तीय वर्षातील देयकांची तपासणी केली असता पुढील अदा करण्यांत आलेल्या देयकांमध्ये फक्त** Dozar-08 **ने काम केल्याची दिनांक व वेळ नमूद आहे. हे काम कसे**

**करण्यांत आले याबाबतचा संपूर्ण अहवाल प्राधीकृत स्वाक्षरीसह नस्तीसह आढळून आला नाही त्यामुळे दिवसागणीक करण्यांत आलेल्या कामाचे मुल्यांकन देयकावरुन तपासणे शक्य झाले नाही. सबब उपरोक्त खर्चाची रक्कम रु.**778360/-**आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.**

**उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अर्धसमास क्रमांक** 78, **दिनाक** 16.01.2014 **अन्वये अर्धसमास निर्गमित करण्यांत आलेले होते. परंतू याबाबत कोणतेही अनुपालन प्राप्त न झाल्यामुळे सदर आक्षेप कायम करण्यात येत आहे.**

DVESMBM7301 (Ref No : 34, Hmm No : 78)

## ***135 सार्वजनिक आरोग्य विभागातील किटकनाशके /जंतुनाशके / दुर्गंधीनाशके /अळीनाशके / डासनाशके इत्यादींच्या खरेदीमध्ये आढळलेल्या उणींवाबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :6292520 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 2870600.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 20500.00/-

***मागणी पत्रातील मागणी व प्रत्यक्षातील खरेदीतील फरक रु.918100 व मागणी पत्रक नसतांना खरेदी केलेली रक्कम रुपये 1952500 अशी एकूण रक्कम 2870600 ची अनावश्यक खरेदी केलेली आढळून येते. सबब सदरची रक्कम नाहक गुंतवल्याचे लेखापरीक्षणांती निदर्शनास येत आहे.***

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडून किटकनाशके /जंतुनाशके / दुर्गंधीनाशके /अळीनाशके / डासनाशके इत्यादींच्या खरेदीबाबत दै.सकाळ,दै.नगरन्युज,व दै.प्रातःकाल या दैनिक वृत्तपत्रात दि.**01.07.2011 **रोजी जाहिरात प्रसारीत करण्यांत आली होती. या जाहिरातीच्या अनुषंगाने पुढील प्रमाणे निविदाकार होते. मे.डॉल्फिन सेल्स कल्याण, मे.मित्र हर्बल प्रा.लि.डोंबिवली, मे,न्युओ लॅब सोलापूर, मे.रविराज केमिकल्स डोंबिवली, व मे.रायल इंटरप्रायजेस मुंबई यांनी वेगवेगळया बाबींसाठी दर भरलेले होते. या निविदाकारांमधून किमान दर धारकास वाटाघाटीनंतर उभयतास मान्यता असलेल्या दरांना स्थायी समिती ठराव क्रमांक** 64, **दिनांक** 08.08.2011 **नुसार मान्यता देण्यांत आल्यानंतर खरेदी करण्यांत आलेली आहे. याबाबत उपलब्ध करुन दिलेल्या संचिकेच्या लेखापरीक्षणांती पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.**

1) **प्राप्त संचिकेतील छायांकित पत्र क्रमांक उमपा /मुस्वनि** /541 /11, **दिनांक** 31.01.2011 **अन्वये**

**आवश्यक जंतूनाशके / किटकनाशके औषधे व सफाईकामगारांसाठी शहरातील स्वच्छता / सफाईसाठी आवश्यक साहित्य पुरवठा होणेबाबत स्वच्छता निरिक्षकांनी प्रभाग निहाय स्वतंत्र मागणी न करता एकत्र मागणी केलेली आढळून येते. सदर मागणी विभागवार, आवश्यकतेनुसार तसेच शिल्लक असलेल्या साठयाच्या प्रमाणात आवश्यक असतांना त्या प्रमाणात करण्यांत आलेली आढळून आली नाही. क्षेत्रानिहाय वापर, त्याची आवश्यकता, वापराचे परीमाण व प्रमाण त्याप्रमाणे या खरेदी संदर्भातील मागील वापर नोंदवही, कमाल व किमान साठा पातळी त्याची मार्गदर्शक तत्वे याबाबतची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यांत आली नाही. त्यामुळे सदर खरेदी आवश्यकते इतकीच करण्यांत आल्याची खात्री पटली नाही.**

2) **प्राप्त नस्तीमध्ये तांत्रीक मंजुरी आढळून आलेली नाही. तसेच या अंदाजपत्रकातील निश्चित केलेली रक्कम रुपये** 750000/- **कशाच्या आधारावर निश्चित करण्यांत आली या पृष्ठयर्थ आवश्यक दस्ताऐवज लेखापरीक्षणास आढळून आले नाही.**

3) **शासन परिपत्रक क्रमांक सीएटी** 09/**सीआर**-16/**इमारत**-2,**दि**.15.05.2001 **नुसार रु**.750000/- **रकमेसाठी आवश्यक निविदा शुल्क रुपये** 5000/- **आवश्यक असतांना रुपये** 2000/- **इतके आकारण्यांत आलेले आहे.उर्वरीत रुपये** 2000X5 = 10000 **वसुल करणे आवश्यक आहे.**

4) **निविदा प्राप्त करणा-या अधिकारी /-कर्मचारी यांची दिनांकित स्वाक्षरी नसल्यामुळे सदर निविदा विहीत कालावधीत प्राप्त झाल्याची खात्री पटली नाही. तसेच निविदा शुल्क, अनामत रक्कम, तसेच वृत्पत्राच्या मुळ प्रती / वा या पृष्ठयर्थ अनुषंगिक दस्ताऐवज संचिकेसह प्राप्त झाले नाहीत.**

5) **वरील जंतुनाशके व इतर साहित्यांच्या भांडारात नोंद वहया ठेवण्यांत आलेल्या आहेत. ही जंतुनाशके विविध स्वच्छता निरिक्षक यांना वाटप केल्यानंतर वाटप केलेल्या जंतुनाशकांची वा रसायनांची फवारणी अथवा उपयोग कुठे व कसा करण्यांत आला याचा अहवाल नसल्यामुळे खरेदी करण्यात आलेल्या जंतुनाशकांचा वा रसायनांचा विनियोग व वापर जनहितार्थ झाल्याची सत्यता पडताळता आली नाही.**

6) **निविदेतील अटी व शर्तीनुसार अट क्रमांक** 11 EXPIRY DATE **ची प्राप्त मालावरुन शहानिशा केल्याचे आढळून येत नाही. तसेच अट क्रमांक** 31 **नुसार नमुना तपासणी आवश्यक असतांना अशी नमुना तपासणी केल्याचे आढळून आले नाही.**

7) **या निविदेतील मे. डाल्फिन या पुरवठादाराचे दिनांक** 01.07.2011 **च्या वाटाघाटीच्या पत्रात खाडाखोड झालेली आढळून येते. तसेच या निविदेची लिफाफा उघडण्याचा दिनांक** 16.07.2011 **असतांना निविदा उघडण्यापूर्वी वाटाघाटी केल्याचे दिसून येते.ही वाटाघाटी कशाच्या आधारावर करण्यांत आल्या याचा बोध होत नसल्यामुळे या कामी स्विकारण्यांत आलेल्या दराबाबत संदिग्धता आहे.**

8) **मागणी पत्रातील मागणी व प्रत्यक्ष खरेदी केलेली रसायने यात खालील प्रमाणे तफावत आढळून येते.**

| **यादीतील अनुक्रमांक** | **वस्तुचे नाव** | **मागणी करण्यांत आलेले जंतुनाशके व इतर** | **प्रत्यक्ष खरेदी** | **फरक** | **दर रुपये** | **एकूण रुपये** |
|---|---|---|---|---|---|---|
| 10 | **बायोकल्चर पावडर** | 5000 **कि.** | 7500**कि.** | 2500**कि.** | 79 | 197500 |
| 14 | **क्लोनोव्हाईट** | 600 **लि.** | 4000 **लि.** | 3400 **लि.** | 109 | 370600 |
| 18 | **डॅनामिक** | 500 **लि.** | 1000**लि.** | 500 **लि.** | 700 | 350000 |
| | | | | **एकूण** | | 918100 |

9) **खालील बाबींची मागणी पत्रक नसतांनाच खरेदी केलीले आढळून येते.**

| **यादीतील अनुक्रमांक** | **वस्तुचे नाव** | **खरेदी परिमाण** | **दर रुपये** | **एकूण रुपये** |
|---|---|---|---|---|
| 4 | **ऑडोक्रेश, हर्बल** | 500 **कि.** | 1048 | 524000 |
| 9 | **सफाया मानोक्लिरोफिन** | 5000 **लि.** | 48 | 240000 |
| 16 | **प्रिमिसॅ मिथेले** | 200 **लि.** | 1860 | 372000 |
| 17 | **सॅफीनोथ्रील** 50% **ईसी** | 200 **लि.** | 1260 | 252000 |
| 20 | **फ्रेश ऑल डिलक्स** | 1000 **नग** | 77 | 77000 |
| 21 | **पिपबेट** | 750 **कि.** | 650 | 487500 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | **एकूण** | | 1952500 |

**उपरोक्त बाबीवरुन एकूण रु.**918100+1952500=**रु.**2870600/- **ची मागणी नसतांना खरेदी झाल्याचे निदर्शनास येते.**

10) **या निविदा प्रक्रियेमध्ये उशिरा पुरवठा करण्यात आलेल्या मालासाठी दंडाची तरतूद करण्यात आलेली दिसून येत नाही मात्र करारनाम्यामध्ये ती प्रती दिन रुपये** 100/-**अशी आहे. मॅन्युअल ऑफ ऑफिस प्रोसीजर फॉर परचेस ऑफ स्टोअर मधील** CHAPTER 1 **मधील** (G) **नुसार ही दंडनीय रक्कम प्रति आठवडा** 0.5 **प्रती आठवडा अशी असतांना उपरोक्त तरतूद नगण्य असल्याचे दिसून येते.**

11) **करारनाम्यातील अट क्रमांक** 9 **नुसार कार्यादेश मिळाल्यापासून** 30 **दिवसात पुरवठा न केल्यास प्रति दिन रुपये** 100/-**दंड प्रस्तावीत करण्यांत आलेला आहे. खाली नमूद केलेल्या मालाचा पुरवठा उशिरा झालेला असतांनाही दंड वसुल करण्यात आलेला दिसून येत नाही. सबब हा दंड वसुल करणे आवश्यक आहे.**

| **अनु.** | **डि व्ही. क्रमांक** | **वस्तुचे नाव** | **माल मिळाल्याचा दिनांक** | **उशिराने प्राप्त दिवस** | **दंडनिय रक्कम रु.** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 3536 / 01.11.11 | Clino White | 20.09.11 | 05 | 500 |
| | | Napthline | 30.08.11 | 15 | 1500 |
| 2 | 3414 / 28.01.11 | **सफेद फिनाईल** | 01.11.11 | 16 | 1600 |
| | | **सॅनिटेक्स व्हाईट** | 01.10.11 | 16 | 1600 |
| | | Germitox Plue | 16.08.11 | 01 | 100 |
| | | Seffa | 16.08.11 | 1 | 100 |
| | | **ग्रीन आर्वी हर्बल** | 08.11.11 | 23 | 2300 |
| | | Pinr Cl | 29.09.11 | 14 | 1400 |
| | | Pip Balt | 29.09.11 | 14 | 1400 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | **एकूण** | | 10500 |

**वरील तक्यानुसार रुपये** 10500/-**ची वसुली करण्यात यावी.**

12) **या निविदे आधारे खरेदी करण्यांत आलेल्या रसायने / औषधे यांचा तपासणी अहवाल प्राप्त संचिकेसह आढळून आला नाही. त्यामुळे खरेदीनंतर प्राप्त झालेली रसायने / औषधे व इतर बार्बीचा दर्जा व प्रत मागणी केलेल्या मालासारखीच असल्याची सत्यता पडताळणी करता आली नाही.**

13) **डि व्ही. क्रमांक** 3536 / 01.11.2011 **या देयकातील** Dapneeka 50-50 **हे जंतूनाशक** 11.08.11 **रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. हे जंतुनाशक पुरविण्याचे कार्यादेश दिनांक** 16.08.11 **या दिवसाचे असतांना सदर जंतुनाशक हे कार्यादेशाच्या दिनांकाच्या आधी प्राप्त झाल्याचे दिसून येते.**

**वरील बार्बीचे अवलोकन केले असता या खरेदीची निविदा प्रक्रिया सदोष असल्याचे प्रथम दर्शनी दिसून येते.**

**या कामाचे देयक - प्रमाणक क्रमांक (डिव्ही.नंबर)**3536/ **दि.**01.11.2011

**रक्कम रुपये** 1893750-132563=**रु.**1761187

**उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अर्धसमास क्रमांक** 50, **दिनाक** 11.12.2013 **अन्वये अर्धसमास निर्गमित करण्यांत आलेले होते. परंतू याबाबत कोणतेही अनुपालन प्राप्त न झाल्यामुळे सदर आक्षेप कायम करण्यात येत आहे.**

DVESMBM7301 (Ref No : 35, Hmm No : 50)

## *136 पावसाळयापुर्वी मशिन व मनुष्यबळाद्वारे नाल्याची सफाई करणे व निघालेला कचरा/गाळ याची डम्परव्दारे वाहतुक डम्पींग ग्राऊंडवर करणे या कामातील उणींवाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :3412550 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 668150.00/-

***अदाई रकमेतील कामे प्रभागातील असल्यामुळे प्रभाग निहाय अधिका-यांचा परिपूर्ण अभिप्राय व तसेच कार्यादेश पूर्ण नसल्यामुळे या कामाचे पूर्ण लेखापरीक्षण करणे शक्य झाले नाही. तसेच सेवाकर रु. 357284व मुद्रांक शुल्क रु.2469 वसुल केल्याचे निदर्शनास येत नाही.***

**पावसाळयापुर्वी पोक्लेन मशिनद्वारे लहान-मोठया नाल्यांची सफाई करणे व निघालेला गाळ डम्पींगद्वारे डम्पींग ग्राऊंडवर वाहतुक करणे याकामासाठी दै. पुण्यनगरी,दै.नगर न्युज व दै.आजतक या वृत्तपत्रात दि.**10.05.2011 **रोजी जाहिरात देण्यांत आलेली होती. जाहिरातीनुसार या निविदेसाठी पात्र ठरलेले निविदाकार व त्यांचे दर पुढील प्रमाणे**

| निविदाकारांची नावे | | अंदाजीत दर प्राकलनापेक्षा जास्त / कमी |
|---|---|---|
| 1.मे.अजीत ट्रान्सपोर्ट कंपनी | - | 45.00% जास्त्. |
| 2.मे.ईगल कंन्सट्रक्शन | - | 35.20% जास्त्. |
| 3.मे.शुभम कंन्स्ट्रशन | - | 16% जास्त्. |

**वरील प्राप्त निविदांमध्ये मे.शुभम कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकरित्या कमी होते. परंतू सदर दर हे अंदाजीत प्राकलन रु.**3042785/- **पेक्षा** 16% **ने जास्त म्हणजे रु.**35,29,631/-**असल्यामुळे संबंधीत निविदाकाराशी वाटाघाटी केल्यानंतर निविदाकाराने अंदाजीत प्राकलनापेक्षा** 14% **जास्त दराने म्हणजे रु.**3468776/- **ने काम करण्याची तयारी दर्शविली. सदर वाटाघाटाअंतीचे दरही प्राकलनापेक्षा जास्त असल्यामुळे प्रचलित प्राकलन रुपये** 3271908 **नव्याने तयार करण्यांत आले. नव्याने तयार करण्यांत आलेल्या प्राकलनाच्या दरापेक्षा ठेकेदाराने सहमती दर्शविलेले दर रुपये** 3468776/- **हे सुमारे** 6% **ने जास्त होते.अंतीमत: या दरावर मंजुरी होऊन स्थायी समिती ठराव क्रमांक**18, **दिनांक** 18.05.2011 **नुसार मंजुरी व जा.क्र. उमपा/उपआ/आवि/**63/ 11, **दिनांक**19.05.2011**नुसार कार्यादेश देण्यांत आलेले होते. या संदर्भातील प्राप्त संचिकेचे लेखापरीक्षण केले असता पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.**

| | | |
|---|---|---|
| कामाचे नाव | - | पावसाळयापुर्वी मशिन व मनुष्यबळाद्वारे नाल्याची सफाई करणे व निघालेला कचरा/गाळ याची डम्परद्वारे वाहतुक डम्पींग ग्राऊंडवर करणे. |
| निविदा सुचना | - | उमपा/उप-आ/आवि/65/11, दि.19.05.2011 |
| अर्थसंकल्पिय तरतूद | - | रु.8000000 |
| अंदाजपत्रकीय रक्कम | - | रु.3042785 |
| प्रशासकिय मान्यता | - | स्थायी समिती ठराव क्रमांक 18, दिनांक 18.05.2011 |

| | | |
|---|---|---|
| कार्यारंभ आदेश क्र. | - | उमपा/उपआ/आवि/64/11,दिनांक 19.05.2011 |
| लेखाशिर्ष | - | (iv) नाला व गटार सफाई खर्च. |

1) उपरोक्त कामाची तांत्रिक मान्यता नस्तीत आढळून आली नाही.

2) अदाई रकमेतील कामे प्रभागातील असल्यामुळे या कामासंदर्भात विभाग निहाय करावयाची आवश्यक कामे व त्यामागील पार्श्वभूमी संबंधांत कर्मचारी / अधिकारी यांचे अभिप्राय आवश्यक असतांना असे कोणतेही अभिप्राय व विस्तृत अहवाल नस्तीसह आढळून आले नाही. त्यामुळे या कामाबाबत कोणता आधार निश्चित करुन निविदा काढण्यांत आली याचा बोध होत नाही.

3) या निविदेसंदर्भातील जाहिरात दिलेल्या वर्तमान पत्राची मुळ/छायांकित सत्यप्रत लेखापरीक्षणास आढळून आली नाही.

4) कार्यादेश देतांना पुरवठादाराने कोणती कामे कशी करावी याबाबतचे सविस्तर निर्देश कार्यादेशात वा नस्तीसह आढळून आले नाही. त्यामुळे मशिनद्वारे व मजुरांद्वारे कोणती कामे करण्यांत आली याची सिध्दता होवू शकली नाही.

5) निविदा प्रक्रियेत सहभागी झालेल्या निविदाकारांचे व्हॅट क्लिअरन्स प्रमाणपत्र,पुरवठादारांचे व्हॅट क्लिअरन्स प्रमाणपत्र, नोंदणी प्रमाणपत्र,यासारखे आवश्यक दस्ताऐवज नस्तीसह आढळून न आल्यामुळे सदर निविदाकार पात्र असल्याची सत्यता पडताळता आली नाही.

6) दरपत्रक हे संगणक छापित्याच्या (computer Prints) स्वरुपात निविदा पुस्तकास स्टेपल करण्यांत आलेले आहे. या दरपत्रकावर केवळ स्वाक्षरी करण्यात आलेली असून त्या स्वाक्षरी खाली संबंधीत आस्थापनेची मोहर अथवा सदर जोडलेले दरपत्रक याच कंपनीचे असल्याच्या पृष्ठयर्थ आवश्यक नोंदणी क्रमांक वा इतर माहिती नाही त्यामुळे दरपत्रकात नमूद करण्यांत आलेले दर हे त्याच कंत्राटदाराचे आहे याबाबत सिध्दता होऊ शकली नाही.

7) निविदा पाकीटावर निविदा स्विकारणा-या संबंधीत अधिकारी/कमर्चारी यांची दिनांकीत स्वाक्षरी आढळून आली नाही. त्यामुळे सदर निविदा पाकिटे हे विहीत वेळेत स्विकारण्यांत आली याची सत्यता पडताळता आली नाही.

8) निविदा फार्म फी, अनामत रक्कम, यासारख्या पावत्या प्राप्त नस्तीसह आढळून आल्या नाही,त्यामुळे सदर रकमा प्राप्त झाल्याची सत्यता पडताळणी करणे शक्य झाले नाही.

9) निविदेतील किंमतीच्या अनुषंगाने मुद्रांक नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक यांचे पत्र क्रमांक 12/कलम34/चू.मू.शू.स133/09, दि.20.07.2009 नुसार मुद्रांक शुल्क रुपये 2569/-इतके आवश्यक असतांना रु100/-मुल्यांचे मुद्रांक शुल्क आकारण्यांत आलेले आहे. त्यामुळे रु.2469/- वसुल करण्यांचे प्रस्तावीत करण्यांत येत आहे.

10) उपरोक्त बाबीवरील खर्चाचे देयक खालील प्रमाणे----

**डि.व्ही. क्रमांक** - 4551, **दिनांक** 02.01.2011

**प्रमाणक क्रमांक** - 40, **दिनांक** 25.10.2011

**रक्कम रुपये** - 3468776

**वजाती** - 98900 (17677.80(366x48.30)**फोटो**+12450(7x1778.70)**व्हिडीओ शुटींग**+68773, **आयटी**2%)

**स्थुल रक्कम** - **रु**.3369876.

**या देयकासंदर्भात पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.**

i)**पुरवठादाराचे देयक त्रोटक आहे. सविस्तर देयक नसल्यामुळे बाब निहाय मागणी असल्याचे सिध्द होवू शकले नाही.**

ii)**सदर देयकामधून फोटो व व्हिडीओ शुटींग रु.**30127 **वजा करण्यांत आलेले आहे. कार्यालयीन आदेश क्रमांक उमपा/उप-आ/आवि/**64/11, **दिनांक** 19.05.2011 **अन्वये करीत असलेल्या कामाचे छायाचित्र व चित्रीकरण (फोटो व व्हिडीओ शुटींग) नाले सफाई करण्यापूर्वी व नंतर करणे बंधनकारक आहे असे नमूद आहे. या कामाच्या करारनाम्यातील अट क्रमांक** 7 **नुसार निविदाकाराने केलेल्या कामाचा दैनंदिन अहवाल, उल्हासनगर महानगरपालिकेने पर्यवेक्षणासाठी व कामाचे मुल्यमापानासाठी नेमलेल्या अधिका-यांचा तपासणी अहवाल तसेच केलेल्या कामाच्या व्हीडीओ शुटींग सिडी व फोटो देयक प्रदानाचे ग्राहय धरले जाईल अशी अट असतांना उपरोक्त अटीचे पालन झाल्याचे दस्ताऐवज प्राप्त नस्तीसह आढळून आले नाही. त्यामुळे छायाचित्रे अथवा काम चित्रीकरण नसल्यामुळे काम झाल्याची सत्यता पडताळता आली नाही.**

iii)**देयकावर कामाचा कालावधी नमूद करण्यांत आलेला नाही. त्यामुळे कोणत्या कालावधीतील देयक आहे याची सत्यता तपासणी करता आली नाही.**

iv)**काम पुर्ण झाल्याचा अहवाल सदर देयकासह आढळून आला नाही. त्यामुळे सदर काम हे विहित मुदतीत झाल्याची पडताळणी करता आली नाही.**

v)**करारनाम्यातील अट क्रमांक** 13 **नुसार नाले, कल्व्हर्ट सफाई मनुष्यबळाद्वारे करावयाची असल्याने कामासाठी कामगार कायदयानुसार अपघात विमा आवश्यक असतांना असा विमा काढण्यांत आल्याचे निदर्शनास आले नाही.**

vi)**या कामासाठी प्राकलनाप्रमाणे काम करुन त्याचे साक्षांकन करणे व त्या कामाची मोजमाप पुस्तीका अदयावत ठेवणे आवश्यक असतांना या नोंदी लेखापरीक्षणास आढळून आल्या नाहीत. तसेच उपरोक्त कामातून गाळ किती काढण्यांत आला व त्याची वाहतुक कुठे व कशी करण्यांत आली तसेच प्रती दिन किती गाडयांचे किती फेरे किती वजनासह करण्यांत आले याची विस्तृत अहवाल नस्तीसह प्राप्त न झाल्यामुळे या अनुषंगाने अदा करण्यांत आलेल्या रकमेची पडताळणी करता आली नाही.**

vii)**करारनाम्यातील अट क्रमांक** 4 **नुसार सदरचे काम कार्यादेश दिल्यापासून कमाल** 30 **दिवसाचे आत**

**पुर्ण करण्याबाबत बंधनकारक होते अन्यथा विलंबाबत प्रती रु.**1000/-**ची तरतूद असल्याचे नमूद आहे. त्यानुसार सदर कामाचे कार्यादेश हे दिनांक** 19.05.2011**चे आहेत. तदनंतर** 30 **दिवस म्हणजे दिनांक** 18.06.2011 **पर्यंत काम पुर्ण आवश्यक होते. परंतू या कामाच्या प्राप्त नस्तीतील** LIFTING OF GARBAGE & SLIT FROM THE WORD **या कामाची नोंद दि.**11.07.2011 **अशी आहे म्हणजे हे काम दि.**11.07.2011 **पर्यंतही चालू होत. त्यानुसार उपरोक्त अटी नुसार सदर काम** 23 **दिवस नंतरही चालु असल्यामुळे प्रती दिन रु.**1000/-**प्रमाणे रुपये** 23x1000=23,000 **दंडाची रक्कम वसुल होणे आवश्यक होते. परंतू याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली आढळून येत नाही. तरी दंडाची रक्कम रु.**23000/- **वसुल करावी.**

viii)**मे.शुभम कंन्स्टक्शन यांना महानगरपालिकेकडून अग्रेशिष केलेले पत्र क्रमांक उमपा/उपआ/आवि/**86/11,**दिनांक** 27.05.2011 **मध्ये दि.**27.05.2011 **पर्यंत मनुष्यबळाव्दारे साफ सफाई कामासाठी** 70 **मजुर लावून संथ गतीने काम सुरु असल्याचे नमुद आहे. अंदाजीत प्राकलना मध्ये एकूण** 30 **दिवसाच्या कामासाठी** 6338 **मजुर प्रस्तावीत आहे. त्यानुसार** 6338/30=211 **इतके अभिप्रेत आहेत.** 211-70=141 **प्रती दिन पुरवठादाराने कमी मजूर लावून काम केल्याचे सिध्द होते. कार्यादेशाच्या दिनांकापासून म्हणजे दि.**19.05.2011 **ते दि.**27.05.2011 **या कालावधीसाठी कमी मजुर लावून काम केल्याचे निदर्शनास येते. सबब पुरवठादाराकडून** 141 **मजूरांचे** 8 **दिवसाचे देय होणारे शुल्क रु.**141(**मजुरांची संख्या**) x 8 (**दिवस**) x 236 (**दर**) = 266208 **इतकी रक्कम कमी मजूर लावले असतांनाही प्रदान झाल्याने सदर रक्कम वसुल करावी.**

ix)**खालील दिनांकांना** SUPPLY OF MANPOWER **दोनवेळा दर्शविण्यांत आलेली असल्यामुळे सदर जास्तीचा मनुष्यबळाच्या देय रकमेबाबत तपशिल खालील प्रमाणे आहे.**

| दिनांक | प्रभाग क्रमांक | मजुरांची संख्या | दिनांक | प्रभाग क्रमांक | मजुरांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| 01/06/2011 | 5 | 10 | 04/06/2011 | 65 | 04 |
| | 65 | 05 | 05/06/2011 | 51 | 06 |
| | 66 | 01 | 06/06/2011 | 51 | 06 |
| | 68 | 01 | | 69 | 05 |
| 02/06/2011 | 5 | 10 | 07/06/2011 | 69 | 05 |
| | 39 | 7 | 08/06/2011 | 69 | 05 |
| | 65 | 05 | 09/06/2011 | 62 | 05 |
| | 66 | 02 | | | |
| | 68 | 01 | | | |
| एकूण मजुर | | | 78 | | |

A.**देयकात वेतन अदा करण्यांत आलेल्या मजुरांची संख्या** = 6338

B.**पुरवठादाराने पुरविलेल्या मजूरांची संख्या** = 6396

C.**पुरवठादाराने नमुद केलेले मजूर** 6396-1128(**अनु**.10 **नुसार**141x8)
-78(**अनु**.11**नुसार**) =5190

D.**प्रत्यक्षात पुरवठादारास अदा करावयाची रक्कम** 5196x236(**दर**)=1224840

E.**प्रत्यक्ष पुरवठादारास अदा करण्यांत आलेली रक्कम** 6338x236=1495768

**एकूण** = E-D=1495768-1224840-266208(**अनु**.8 **प्रमाणे**)=4720

**उपरोक्त रक्कम वसुल करण्यात यावी.**

11) **उल्हासनगर महानगरपालिकेचे नोटीस क्रमांक उमपा/उपआ/आवि**/108/11,**दिनांक** 07.06.2011 **नुसार उपरोक्त पुरवठादाराने दि**.06.06.2011 **रोजी कचरा न उचलल्याचे पाहणी दौ-यात आढळून आले आहे. करारनाम्यातील अट क्रमांक** 5 **नुसार उपरोक्त पुरवठादाराकडून प्रती फेरी रुपये** 2000/- **प्रमाणे वसुलीची तरतूद असल्यामुळे एकूण** 6 **फे-यांची रक्कम रुपये** 12000/-**वसुली करण्यांत आल्याचे प्राप्त संचिकेसह आढळून आले नाही. तरी रक्कम रु**.12000/- **वसुल करावी.**

12) **वित्तीय अधिनियम 1994 कलम 64 अन्वये उपरोक्त देयकातून सेवा कर रुपये** 3468776x10.30%=357284 **वसुल केलेला नाही.**

**एकूण वसुलपात्र रक्कम रुपये** 2469+23000+266208+4720+12000+359753=668150

**उपरोक्तबाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक** 79 **दिनांक**16.01.2014 **रोजी निर्गमित करण्यात आलेले आहे. परंतु त्या बाबत कोणतेही अभिप्राय लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत.**

## *137 पावसाळयापुर्वी पोकलेन मशिनव्दारे छोटया मोठया नाल्याची सफाई करणे व निघालेला गाळ डम्परव्दारे वाहतुक डम्पींग ग्राऊंडवर वाहतुक करणे याकामातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :3412550 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 198632.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 408004.00/-

***कचरा न उचलताच सदर कामाचे रु.162028/-इतक्या रकमेचे प्रदान करण्यांत आल्याचे लेखापरीक्षणांती निदर्शनास येते.***

**पावसाळयापुर्वी पोकलेन मशिनव्दारे लहान-मोठया नाल्यांची सफाई करणे व निघालेला गाळ डम्पींगव्दारे डम्पींग ग्राऊंडवर वाहतुक करणे याकामासाठी दै.वार्ताहार व दै.धनुष्यधारी या वृत्तपत्रात दि.**03.05.2011 **रोजी जाहिरात देण्यांत आलेली होती. जाहिरातीनुसार या निविदेसाठी पात्र ठरलेले निविदाकार व त्यांचे दर पुढील प्रमाणे**

| **निविदाकारांची नावे** | | **अंदाजीत दर प्राकलनापेक्षा जास्त / कमी** |
|---|---|---|
| 1.**मे.अजीत ट्रान्सपोर्ट कंपनी** | - | 43.20% **जास्त्.** |
| 2.**मे.ईगल कंन्सट्रक्शन** | - | 33.30% **जास्त्.** |
| 3.**मे.शुभम कंन्स्ट्रशन** | - | 30.60% **जास्त्.** |

**वरील प्राप्त निविदांमध्ये मे.शुभम कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकरित्या कमी होते. परंतू सदर दर हे अंदाजीत प्राकलन रुपये** 3416151/-**पेक्षा** 30.60% **ने जास्त म्हणजे रु.**4461493/-**असल्यामुळे संबंधीत निविदाकाराशी वाटाघाटी केल्यानंतर निविदाकाराने अंदाजीत प्राकलनापेक्षा** 23% **जास्त दराने म्हणजे रु.**4201866/- **ने काम करण्याची तयारी दर्शविली. सदर दर हे अंदाजीत प्राकलनापेक्षा जास्त असल्यामुळे निविदाकाराने पुन्हा दर कमी करुन प्राकलनापेक्षा** 16 % **जास्त दराने म्हणजे रु.3932735 काम करण्याची तयारी दर्शविली. तदनंतर प्रचलित दराने नवीन प्राकलन** (**रुपये** 3708597/-) **तयार करण्यांत आले. नव्याने तयार करण्यांत आलेल्या प्राकलनाच्या दरापेक्षा सुमारे** 6 % **दर जास्त होते. अंतीमत: रु.**39,32,735/-**या दरावर उभयतांची मंजुरी होऊन स्थायी समिती ठराव क्रमांक**19, **दिनांक**18.05.2011 **नुसार मंजुरी व जा.क्र. उमपा/उपआ/आवि/**65/11, **दिनांक** 19.05.2011 **नुसार कार्यादेश देण्यांत आलेले होते. या संदर्भातील प्राप्त संचिकेचे लेखापरीक्षण केले**

**असता पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.**

| | | |
|---|---|---|
| **कामाचे नाव** | - | **पावसाळयापुर्वी पोकलेन मशिनद्वारे छोटया मोठया नाल्याची सफाई करणे व निघालेला गाळ डम्परद्वारे वाहतुक डम्पींग ग्राउंडवर वाहतुक करणे.** |
| **निविदा सुचना** | - | **उमपा/उप-आ/आवि**/36/11, **दि.**02.05.2011 |
| **अर्थसंकल्पिय तरतूद** | - | **रु.**8000000 |
| **अंदाजपत्रकीय रक्कम** | - | **रु.**3416151 |
| **प्रशासकिय मान्यता** | - | **स्थायी समिती ठराव क्रमांक**19, **दिनांक** 18.05.2011 |
| **कार्यारंभ आदेश क्र.** | - | **उमपा/उपआ/आवि**/65/11 ,**दिनांक**19.05.2011 |
| **लेखाशिर्ष** | - | **ड**(iv)**नाला गटार सफाई खर्च** |

1) **उपरोक्त कामाची तांत्रिक मान्यता नस्तीत आढळून आली नाही.**

2)**ही कामे विभागानिहाय करावयाची असल्यामुळे या कामासंदर्भात विभाग निहाय आवश्यक कामे व त्यामागील पार्श्वभूमी संबंधांत कर्मचारी / अधिकारी यांचे अभिप्राय आवश्यक असतांना असे कोणतेही अभिप्राय व विस्तृत अहवाल नस्तीसह आढळून आले नाही. त्यामुळे या कामाबाबत कोणता आधार निश्चित करुन निविदा काढण्यांत आली याचा बोध होत नाही.**

3) **या निविदेसंदर्भातील जाहिरात दिलेल्या वर्तमान पत्राची मुळ/छायांकित सत्यप्रत लेखापरीक्षणास आढळून आली नाही.**

4) **निविदा प्रक्रियेत सहभागी झालेल्या निविदाकारांचे व्हॅट क्लिअरन्स प्रमाणपत्र,पुरवठादारांचे व्हॅट क्लिअरन्स प्रमाणपत्र, नोंदणी प्रमाणपत्र,यासारखे आवश्यक दस्ताऐवज नस्तीसह आढळून न आल्यामुळे सदर निविदाकार पात्र असल्याची खात्री पटली नाही.**

5) **दरपत्रक हे संगणक छापित्याच्या** (Computer Prints) **स्वरुपात निविदा पुस्तकास स्टेपल करण्यांत आलेले आहे. या दरपत्रकावर केवळ स्वाक्षरी करण्यात आलेली असून त्या स्वाक्षरी खाली संबंधीत आस्थापनेची मोहर अथवा दरपत्रकाचे पान त्याच कंपनीचे असल्याच्या पृष्ठयर्थ आवश्यक नोंदणी क्रमांक वा इतर माहिती नाही त्यामुळे दरपत्रकात नमूद करण्यांत आलेले दर हे त्याच कंत्राटदाराचे आहे याबाबत सिध्दता होऊ शकली नाही.**

6) **निविदा पाकीटावर निविदा स्विकारणा-या संबंधीत अधिकारी/कमर्चारी यांची दिनांकीत स्वाक्षरी आढळून आली नाही. त्यामुळे सदर निविदा पाकिटे हे विहीत वेळेत स्विकारण्यांत आली याची सत्यता पडताळता आली नाही.**

7) **निविदेतील किंमतीच्या अनुषंगाने मुद्रांक नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक यांचे पत्र क्रमांक** 12/**कलम**34/**चू.मू.शू.स**133/09, **दि.**20.07.2009 **नुसार मुद्रांक शुल्क रुपये**3032 /-**इतके आवश्यक असतांना रु**100/-**मुल्यांचे मुद्रांक शुल्क आकारण्यांत आलेले आहे. त्यामुळे रु**2932/- **मुद्रांक शुल्क कमी करण्यात आले आहे.**

8) **या निविदेच्या अनुषंगाने करावयाच्या कामाची विस्तृत यादी (जसे नाले सफाईचे ठिकाण व अंतर त्या ठिकाणाची उंची, खोली व लांबी) या बाबी निविदेमध्ये तसेच कार्यादेशात,प्राप्त संचिकेसह आढळून आली नाही. त्यामुळे प्रत्यक्षात केलेली कामे ही निविदेनेनुसार केल्याची सत्यता पडताळता आली नाही.**

9) **या कामासाठी अंदाजीत प्राकलन रु.**3416151/- **चे करण्यांत आलेले होते. निविदा किमान दर प्राकलनापेक्षा** 16%**ने जास्त म्हणजे रुपये** 3932735/-**ची असल्यामुळे पुन्हा रुपये** 3708597/-**या अंदाजीत रकमेचे प्राकलन तयार केल्याचे टिप्पणीत नमूद आहे. हे नव्याने केलेले प्राकलन लेखापरीक्षणास आढळून आले नाही.**

10) **पावसाळयापुर्वी पोकलेन मशिनद्वारे छोटया मोठया नाल्याची सफाई करणे व निघालेला गाळ डम्परद्वारे वाहतुक डम्पींग ग्राऊंडवर वाहतुक करणे यावरील खर्चाचे देयक खालील प्रमाणे----**

**डि.व्ही. क्रमांक** - 4552, **दिनांक** 07.01.2011

**प्रमाणक क्रमांक** - 39, **दिनांक** 25.10.2011

**रक्कम रुपये** - **रु.**3932735

**वजाती** - 92000 (2946.30**फोटो**+10672.20**व्हिडीओ शुटींग**+78382, **आयटी**2%)

**स्थुल रक्कम** - **रु.**3840735.

**या देयकासंदर्भात पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.**

1) **पुरवठादाराचे देयक त्रोटक आहे. सविस्तर देयक नसल्यामुळे बाब निहाय पुरवठादाराची मागणी असल्याचे सिध्द होवू शकले नाही.**
2) **कार्यालयीन आदेश क्रमांक उमपा/उप-आ/आवि/**65/11,**दि.**19.05.2011**अन्वये करीत असलेल्या कामाची छायाचित्रे व चित्रीकरण (फोटो व व्हिडीओ शुटींग) नाले सफाई करण्यापूर्वी व नाले सफाई केल्यानंतर करणे बंधनकारक आहे असे नमूद केले आहे. तसेच करारनाम्यातील अट क्रमांक** 7 **नुसार निविदाकाराने केलेल्या कामाचा दैनंदिन अहवाल, उल्हासनगर महानगरपालिकेने पर्यवेक्षण व कामाचे मुल्यमापनासाठी नेमलेल्या अधिका-यांचा तपासणी अहवाल व केलेल्या कामाच्या व्हीडीओ शुटींगची सिडी व फोटो देयक प्रदानाच्या वेळी ग्राहय धरले जाईल अशी अट असतांना उपरोक्त अटीचे पालन झाल्याचे आढळून आले नाही. तसेच उपरोक्त देयकामधून फोटोचे रु.**17677/-**व व्हिडीओ शुटींगचे रु.**12450/-**वजा करण्यांत आलेले आहे. त्यामुळे या वजाती नुसार सदरचे काम झाले किंवा कसे याबाबत स्पष्टात नसल्यामुळे केलेल्या खर्चाची सत्यता पडताळणी करणे शक्य झाले नाही. विभागाने काम झाल्याची खात्री न करता प्रदान केले आहे.**

3) **देयकावर कामाचा कालावधी नमूद करण्यांत आलेला नाही. त्यामुळे कोणत्या कालावधीतील देयक आहे याची सत्यता तपासणी करता आली नाही.**
4) **काम पुर्ण झाल्याचा अहवाल सदर देयकासह आढळून आला नाही. त्यामुळे सदर काम हे विहित मुदतीत झाल्याची पडताळणी करता आली नाही.**
5) **सदरचे काम कार्यादेश दिल्यापासून कमाल** 45 **दिवसात पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच या कामासाठी झालेल्या विलंबास प्रती दिन रुपये** 1000/- **दंड अशी करारनाम्यातील अट क्रमांक** 4 **मध्ये तरतूद आहे. उक्त ठेकेदाराने काम विहीत मुदतीत काम केले आहे किंवा नाही याची सत्यता पडताळणीसाठी हे काम कधी पूर्ण झाले यापृष्ठयर्थ कोणतेही दस्ताऐवज प्राप्त संचिकेसह आढळून आले नाही.**
6) **उपरोक्त देयकातून** 3932735X10.30=405072 **इतका सेवा कर कपात करण्यांत आलेला नाही. सबब ही रक्कम वसुलीसाठी प्रस्तावीत करण्यांत येत आहे.**
7) **उपरोक्त कामातून काढण्यात आलेला गाळ डम्पींग ग्राऊंडला जमा केल्याचे नमूद आहे, परंतू या पृष्ठर्थ कोणतेही दस्ताऐवज उपलब्ध संचिकेसह आढळून आले नाही.**
8) **संचिकेतील मेसर्स शुभम यांच्या पत्रातील जेसीबी मशिनच्या अहवालातील पुढील दिनांकापुढे महानगरपालिका अधिकारी / कर्मचारी यांची स्वाक्षरी नाही त्यामुळे हे काम झाल्याचे सिध्द होत नाही. परिणामी यास्तव अदा केलेल्या रकमेबाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.**

| **अहवालातील अनु.** | **दिनांक** | **जेसीबी मशिनच्या कामाची जागा** | **एकूण तास** |
|---|---|---|---|
| 02 | 22.05.2011 | Culvert Nr.Mangaram Apt. | 06 |
| 19 | 31.05.2011 | Nr.Tech.School | 08 |
| 30 | 10.06.2011 | Vithalwadi Rly. Stn. Side Drains | 09 |
| 32 | 12.06.2011 | Kritipath Culvet & Culvert at fakad mandir | 09 |
| Total | | | 32 |

A.**पुरवठादाराने दर्शविलेले एकूण तास** =252.5

B.**अंदाजीत प्राकलनात दिलेले तास** =250

C.**वजा वरील काम न झालेले तास** =32

D.**एकूण प्रत्यक्ष कामाचे तास** =220.5

E.**वेतन अदा करण्यांत आलेले जेसीबीचे तास** =250

F.**त्या अनुषंगाने अदा केलेले वेतन**

250x1069.64(**प्राकलनातील दर**) =267410

G.**अदा करावयाचे वेतन** 220.5x1069.64 =235855.62

H.**फरक**(F-G)+**असुधारीत प्राकलनापेक्षा** 16%**जास्त**

31554.38X16%=5048.70

I.**एकूण आक्षेपाधीन रक्कम रुपये** 31554+5048=36603

11) **संचिकेतील** Dumper **वाहतुकीच्या नोंदी मध्ये काही ठिकाणी कचरा उचलण्यांत आलेला नाही तर काही ठिकाणी स्वच्छता निरीक्षकांच्या स्वाक्ष-या नाहीत. सदर फे-यांची वाहतुकीसाठी अदा केलेल्या रकमेची माहिती खालील प्रमाणे**

| **यादीतील अनु.** | **दिनांक** | **गाडी क्रमांक** | **ठिकाण** | **फे-यांची संख्या** | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|
| 133 | 09.06.2011 | MH06 AC2153 | **राजीव गांधी नगर ते डम्पींग ग्राऊंउ** | 12 | **कचरा उचलला नाही.** |
| 134 | 09.06.2011 | MH06 AC2153 | **राजीव गांधी नगर ते डम्पींग ग्राऊंउ** | 11 | **कचरा उचलला नाही.** |
| 163 | 13.06.2011 | MWN-366 | **गायत्री टिम्बर मार्ट जवळ** | 12 | **स्वच्छता निरिक्षकाची स्वाक्षरी नाही.** |
| 164 | 13.06.2011 | MH06 AC2153 | **गायत्री टिम्बर मार्ट जवळ** | 12 | **स्वच्छता निरिक्षकाची स्वाक्षरी नाही.** |
| **एकूण फेरे** | | | | 47 | |

| | | | |
|---|---|---|---|
| A | **प्रत्सक्षात अदा केलेल्या फे-यांची संख्या** | = | 3035 |
| B | **वजा वरील प्रमाणे कमी फेरे** | = | 47 |
| C | **प्रत्यक्ष अदा करण्यासाठीचे फेरे** | = | 2988 |
| D | **प्राकलनाप्रमाणे एका फेरीमधील गाळ** | = | 4.25 cum |
| E | **एकूण वाहून नेलेला गाळ** 2988X4.25 | = | 12699 |
| F | **प्राकलनाप्रमाणे एकूण वाहून नेलेल्या गाळाचे प्रत्यक्षात अदा करावयाची रक्कम** 12699X120.31 | = | 1527816.69 |
| G | **देयकात अदा केलेली रक्कम** | = | 1667496.60 |
| H | **फरक** | = | 139679.91 |
| I | **असुधारीत प्रकालनानुसार** 16%**जास्त** | = | 22348.78 |
| J | **एकूण** | = | 162028.69 |

**एकूण आक्षेपाधीन रक्कम रुपये** = 36603+162029=198632

**एकूण प्रस्तावीत वसुली**=2932+405072(**सेवा कर**)=408004

12) **उपरोक्त कामाचे मुल्यामापन व फलश्रृती याबाबत माहिती प्राप्त झाली नाही.**

**उपरोक्तबाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक** 80 **दिनांक**16.01.2011 **रोजी निर्गमित करण्यात आलेले आहे. परंतु त्याबाबत कोणतेही अभिप्राय लेखापरीक्षणास उपलब्ध् झालेले नाहीत.**

DVESMBM7301 (Ref No : 37, Hmm No : 80)

## *138 उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत मुख्य रस्त्यांची पावर स्विपींग मशिनद्वारे साफसफाई करणे या कामातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :3412550 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1888590.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1082839.00/-

***शासन परिपत्रक क्रमांक सीएटी09/सी.आर.16/इमारती-2, दि.15.05.2007 नुसार या निविदा प्रक्रियेसाठी आवश्यक रु.15000 निविदा शुल्क तसेच रु.135542 सेवाशुल्क कमी आकारण्यांत आल्याचे आढळून आले नाहीत. तसेच साफसफाईसाठी नेमण्यांत आलेल्या कर्मचा-यांची माहिती त्याचप्रमाणे निविदेतील अट क्रमांक 4.8 d नुसार यशस्वी निविदाकाराने या अटीत आंतर्भूत असलेले अभिलेख ठेवणे आवश्यक होते परंतू सदर अभिलेख लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेली नाही.***

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने महानगरपालिका हद्दीत मुख्य रस्त्याचा पावर स्विपींग मशिनद्वारे साफसफाई करणे या कामासाठी** 10 **वर्ष इतक्या कालावधीसाठी ठेका देण्यांत आलेला आहे. या कामासाठी स्थायी समिती ठराव क्रमांक** 52,**दि**.20.09.2009 **व** UMC/Health Dept./196/09, **दिनांक** 24.09.2009 **नुसार कार्यादेश देण्यांत आलेले होते. याकामाच्या प्राप्त संचिकेचे लेखापरीक्षण केले असता खालील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.**

| | | |
|---|---|---|
| **कामाचे नाव** | : | **उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत मुख्य रस्त्यांची पावर स्विपींग मशिनद्वारे साफसफाई करणे.** |
| **निविदा सुचना** | : | UMC/PRO/37/09, **दि.**04.06.2009 |
| **प्रशासकिय मान्यता** | : | **स्थायी समिती ठराव क्रमांक** 52, **दि.**24.08.2009 |
| **कार्यारंभ आदेश** | : | UMC/Health Dept./196/09, **दिनांक** 24.09.2009 |
| **अनुदान संकेतांक** | : | **भाग-**1**सी-**1(2) **मॅकनिकल स्विपींग** |
| **ठेकेदार** | : | **मे.अन्टॉनी वेस्ट हँडलीन सेल प्रा.लि.** |

1) **पावर स्विपिंग मशिनव्दारे साफसफाई ज्या रस्त्यावर करण्यांत येते त्या रस्त्यावर मशिनव्दारे काम करण्याआधी किती कामगार / अधिकारी कार्यरत होते. मशिनव्दारे साफसफाई सुरु झाल्यानंतर अशा सर्व कर्मचा-यांची सेवा कोणत्या विभागात वर्ग करण्यांत आली याबाबतचे आदेश व या कर्मचा-यांच्या वेतनावरील खर्चाचे अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यांत आलेले नाही. त्यामुळे सदर ठेका हा महानगरपालिकेच्या हिताचा आहे किंवा नाही याबाबतचे लेखापरीक्षण करणे शक्य झाले नाही.**

2) **उपरोक्त मशिनव्दारे साफसफाई करण्यासंदर्भात रस्त्याच्या बनावटीचे निकष काय आहेत ?असे किती रस्ते उल्हासनगर महानगरपालिकाक्षेत्रात आहेत ? त्या रस्त्याची लांबी,क्षेत्र व स्थान याबाबतची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यांत आलेली नाही. त्याच प्रमाणे स्विपींग मशिनची आवश्यकता का भासली ? या कामामुळे महसुली खर्चात बचत झाली आहे काय ? असल्यास किती ? खर्चाची बचत झाली नसल्यास अधिकचा खर्च किती व त्याचे समर्थन प्राप्त न झाल्यामुळे या कामासाठी स्विपींग वापरणे फायदयाचे व यावरील खर्च रास्त असल्याची पडताळणी करता आली नाही.**

3) **स्विपींग मशिनव्दारे साफसफाईसाठीची तांत्रीक मंजुरी प्राप्त नस्तीत आढळून आली नाही.**

4) **सदर कामाची दर निश्चिती कशाच्या आधारे करण्यांत आली याबाबत आवश्यक दस्ताऐवज साधार स्पष्ट न झाल्याने या कामावरील झालेल्या खर्चाचे दर योग्य असल्याची पडताळणी करणे शक्य झाले नाही.**

5) **निविदा प्रसिध्दी करण्यांत आलेल्या वर्तमानपत्रांची मुळ कात्रणे / छायांकित सत्यप्रती लेखापरीक्षणास आढळून आल्या नाहीत. तसेच सामान्य प्रशासन शासन निर्णय क्रमांक पीयूबी-**1000/**प्र.क्रमांक** 73/2000/34,**दिनांक** 01.05.2001 **नुसार जाहिरातील ज्या कामाचे मूल्य रुपये** 50,00,001 **पेक्षा अधिक आहे अशा जाहिरात असलेल्या मुल्याकरीता संबंधीत विभागतील अ वर्ग दैनिकास व त्या विभागातील ब व ज्या जिल्हाचे काम असेल त्या जिल्हातील क वर्ग दैनिकास आळीपाळीने त्या वर्गातील वृत्तपत्रांचे से.मी.प्रमाण लक्षात घेऊन जाहिरातींचे वितरण करणे आवश्यक असतांना या निविदेतील जाहिरात दै.मुंबई लक्षदिप व दै.एशियन ऐज या ब वर्ग व दै.नगरन्युज व**

**दै.अमृत कलश या दोन क वर्ग दैनिकास दिलेली आहे. उपरोक्त बाबीमुळे यात नमूद शासन निर्णयाचे उल्लंघन झाल्याचे दिसून येते.**

6) **शासन परिपत्रक क्रमांक सीएटी**09/**सी.आर.**16/**इमारती**-2, **दि.**15.05.2007 **नुसार या निविदा प्रक्रियेसाठी आवश्यक शुल्क रुपये** 25000/- **असतांना रुपये** 10000/- **स्विकारण्यांत आल्याचे आढळून आले आहेत. एकूण** 15000x5(**निविदाकार**)=75000 **रुपये वसुल करण्यास प्रस्तावीत करण्यांत येत आहे.**

7) **अनामत रक्कम रु.**7,28,209/- **आवश्यक असतांना रुपये** 1,00,000/- **इतके वसुल करण्यांत आलेले आहेत.याबाबत साधार स्पष्टता न झाल्यामुळे रुपये** 6,28,209/- **इतकी रक्कम अमानत रक्कम म्हणूण उपरोक्त ठेकेदाराकडून जमा करण्याचे प्रस्तावीत करण्यांत येत आहे.**

8) **नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक शुल्क नियंत्रक यांचे पत्र क्रमांक** 12/**कलम**/34/**चू.मू.शू.सं** 133/09, **दि.**20.07.2009 **नुसार मुद्रांक नोंदणी शुल्क रु.**1,35,642/- **इतके आवश्यक असतांना रु.**100 **इतके मुद्रांक शुल्क आकारण्यांत आल्याने उर्वरीत रु.**1,35,542/-**वसुलीसाठी प्रस्तावीत करण्यांत येत आहे.**

9) **या निविदा प्रक्रियेसाठी आवश्यक असलेले निविदा शुल्क भरल्याची पावती, अनामत रक्कम, इत्यादींच्या पृष्ठयर्थ आवश्यक दस्ताऐवज प्राप्त नस्तीत आढळून आले नाही.**

10) Solvancy Certificate **ची मुळ प्रत प्राप्त नस्तीसह आढळून आली नाही.**

11) **सदर ठेका** 10 **वर्ष इतक्या प्रदीर्घ कालावधीसाठी का देण्यांत आला याचा साधार खुलासा न याकामासाठी ठेकेदारामार्फत कामाची गुणवत्ता व सातत्य टिकविण्यास दिरंगाई करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर ठेका हा कमी कालावधीचा असणे आवश्यक असल्याचे लेखापरीक्षणाचा निकर्ष आहे.**

12) **या संपूर्ण ठेक्यासाठी किती जुनी वाहन वापरण्यात यावी याबाबतच्या लावण्यांत आलेल्या निकषांबाबत साधार खुलासा झालेला नाही.**

13) **या खर्चाबाबतची देयके पुढील प्रमाणे**

D.V.NO.5748/30.01.2012

| **अ.क्र.** | **प्रमाणक क्रमांक** | **स्थुल रक्कम रु.** | **वजाती रु.** | **निव्वळ रक्कम रु.** |
|---|---|---|---|---|
| 1 | 55/30.01.2012 | 413725 | 8275 | 405450 |
| 2 | 56/30.01.2012 | 467250 | 9345 | 457905 |
| 3 | 57/01.02.2012 | 550000 | 11000 | 539000 |
| 4 | 58/06.02.2012 | 457615 | 9152 | 448463 |
| | **एकूण** | 1888590 | 37772 | 1850818 |

**उपरोक्त देयकांच्या अनुषंगाने खालील अभिप्राय देण्यात येत आहे.**

i)**साफसफाई करीता नेमण्यांत आलेल्या कर्मचा-यांची माहिती लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेली नाही त्यामुळे या देयकानुसार अदा करण्यांत आलेल्या रकमेचे लेखापरीक्षण करणे शक्य झाले नाही.**

ii)**उपरोक्त कामगारांची नेमणुक कामगार कायदयांतर्गत करण्यांत आली आहे किंवा कसे याबाबत साधार स्पष्टता करण्यांत आली नाही.**

iii)**निविदेतील अट क्रमांक** 4.8 d **नुसार यशस्वी निविदाकाराने खालील अभिलेख ठेवणे आवश्कय असल्याचे नमूद आहे. परंतू या अटीचे पालन केल्याचे प्राप्त नस्तीत आढळून आले नाही.त्यामुळे या कामाच्या अदाई रकमेच्या खर्चाचे पूर्ण लेखापरीक्षण करणे शक्य झाले नाही.सबब सदर खर्चाची अदाई रक्कम आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.**

a.Attendeance Card / Register of manpower Deployed.

b.Regiser of issue of disifectant liquid.

c.Register of stock of implements & other material and their uses.

d.Register of uniform and procedure hears defined in the specification.

e.Performance Evaluation record inseparate from of each sector.

f.Maintanance & Operation record of power sweeper &vehicle.

iv)Performance of Evaluation Sheet **वर पदनामाचे ठसे व महानगरपालिकेच्या वतीने स्वाक्षरी करण्यांत आलेल्या नियुक्त प्राधीका-याचे व महानगरपालिकेचे ठसे नसल्यामुळे या** Performance of Evaluation Sheet **सिटची सत्यता पाडताळणी करता आली नाही.**

v)**उपरोक्त कामासाठी अदा करण्यांत आलेल्या रकमेच्या कामातून रस्त्याच्या साफसफाई मधून किती धुळ / कचरा निघाला व त्याची विल्हेवाट कशी लावण्यांत आली ? त्याचप्रमाणे याची वाहतुक कशी करण्यात आली ? वाहतुकीच्या संपूर्ण वाहनांच्या आवश्यक दस्ताऐवज लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात न आल्यामुळे उपरोक्त काम झाल्याची सत्यता पडताळणी करता आली नाही.**

vi)**निविदेतील अट क्रमांक** 4.4 **मधील** C **नुसार वीज देयक व पाणी देयक कंत्राटदाराने भरणे आवश्यक आहे. त्यानुसार संबंधीत कंत्राटदाराने वीज व पाणी देयके अदा केल्याच्या पृष्ठयार्थ कोणतेही दस्ताऐवज लेखापरीक्षणास आढळून आले नाही.**

vii)**या कामाचे मुल्यांकन व फलश्रृती लेखापरीक्षणास उपलब्धेबाबत साधार स्पष्टता करण्यांत आलेली नाही.**

viii)**सदर कामासाठी खर्च करण्यात आलेल्या बाबीवर सेवा कर आकारण्यांत आलेले नाही. वरील डी.व्ही.क्रमांक** 5748/30.01.2012 **ची एकूण रक्कम** 2369782x10.30%=244088 **रुपये वसुलीसाठी प्रस्तावीत करण्यात येत आहे.**

**एकूण प्रस्तावीत वसुली–**

**निविदा शुल्क** : **रुपये** 75000

**मुद्रांक शुल्क** : **रुपये** 135542

**सेवाशुल्क** : **रुपये** 244088

**अनामत रक्कम** : **रुपये** 628209

**एकूण रुपये** 1082839

**उपरोक्तबाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक** 76 **दिनांक** 16.01.2014**रोजी निर्गमित करण्यात आलेले आहे. परंतु त्याबाबत कोणतेही अनुपालन लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत.**

DVESMBM7301 (Ref No : 38, Hmm No : 76)

### *139 घनकच-याची वाहतुक व त्याची विल्हेवाट लावणे याकामातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :3412550 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 16105.00/-

***महानगरपालीका हद्दीतील कच- याची वाहतुक आणि त्याची विल्हेवाट याबाबतची निविदा लेखापरीक्षणास अप्राप्त असल्यामुळे या निविदेचे लेखापरीक्षण करणे शक्य झाले नाही.तसेच गणितीय पध्दतीने देयकांची तपासणी केली असता रु.15989/-अतीप्रदान झाल्याचे दिसून आले.***

उल्हासनगर महानगरपालिका हद्दीततील निर्माण होणा-या कच-याची वाहतुक व त्याची विल्हेवाट लावणे याकामासाठीचा ठेका 10 वर्षासाठी मे.अन्थोनी वेस्ट हं.प्रा.लि., नवी मुंबई यांना देण्यांत आलेला आहे. सदर ठेक्यास स्थायी समिती ठराव क्रमांक 45, दिनांक 09.07.2007 नुसार मान्यता व जा.क्र.उमपा/उप-आ/आरोग्य/12, दि.22.08.2003 नुसार कार्यादेश देण्यांत आलेले आहेत.याबाबतची संपूर्ण निविदा लेखापरीक्षणास उपलब्ध करुन न दिल्यामुळे या निविदेचे लेखापरीक्षण करता आले नाही.

प्राप्त देयकांच्यामध्ये मुल्यांकन प्रपत्र व त्यानुसार नमूद सूत्रांवरुन देयकाची रक्कम काढण्यात आलेली आहे.

या मुल्यांकन पत्राची गणितीय पध्दतीने तपासणी केली असता पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.

खालील देयकांच्या गणणा सुत्रामधील संक्षिप्तीकरण खालील प्रमाणे आहे.

ZT= प्रपत्रातील गणणानुसार प्रत्यक्ष कामाची आकडेवारी.

ZAT= प्रपत्रातील गणणानुसार एकूण कामाची आकडेवारी.

Z= कामाची टक्केवारी.

अदाईची रक्कम पुढील सुत्राने काढल्याचे उपलब्ध नस्तीवरुन दिसून येते

Z=ZT/ZATx100

अदाईची रक्कम = Rate X Z/100XNo.of Days

1. डि व्ही. क्रमांक 5750/31.03.2012.

| प्रमाणक क्रमांक | स्थूल रक्कम रु. | वजाती रु. | निव्वळ रक्कम रु. | कालावधी |
|---|---|---|---|---|
| 46/31.12.2011 | 2080073 | 41601 | 2038472 | 16.09.11 ते 30.09.2011 |

| झोन | प्रपत्रात दर्शविलेली मुल्यांकनाची बेरीज | प्रत्यक्ष मुल्यांकनाची बेरीज | फरक | ZAT |
|---|---|---|---|---|
| 1 | 14230.76 | 14146.1 | 84.66 | 15000 |
| 2 | 13622 | 13532.86 | 89.14 | 15000 |
| 3 | 14129.40 | 14094.21 | 35.19 | 15000 |
| 4 | 14404.07 | 14399.28 | 04.79 | 15000 |
| एकूण | 56386.23 | 56172.45 | 231.78 | 60000 |
| | ZT | ZT | | ZAT |

Calculation-----

| अदा करण्यात आलेले देयक | देय असलेली रक्कम |
|---|---|
| Z=ZT/ZATx100 | |
| Z=56386.23/60000x100=93.97 | Z=56172.45/60000x100=93.62 |

| अदा केलेली रक्कम=ratexz/100xno. days<br>=147559x0.9397x15<br>=2080073 | अदा केलेली रक्कम =ratexz/100xno. days<br>=147559(Rate)x0.9362x15 days<br>=2072171 |
|---|---|
| वसुलपात्र रक्कम 2080073-2072171=रु.7902 | |

2. डि व्ही. क्रमांक 4209/16.12.2011.

| प्रमाणक क्रमांक | स्थूल रक्कम रु. | वजाती रु. | निव्वळ रक्कम रु. | कालावधी |
|---|---|---|---|---|
| 33/24.12.2011 | 2155395 | 43108 | 2112287 | 16.06.11 ते 30.06.2011 |

| झोन | प्रपत्रात मुल्यांकनावरुन दर्शविलेली बेरीज | प्रत्यक्ष मुल्यांकनाची बेरीज | फरक | ZAT |
|---|---|---|---|---|
| 1 | 14518.46 | 14518.46 | 0 | 15000 |
| 2 | 14647.82 | 14602.82 | 45 | 15000 |
| 3 | 14685.80 | 14685.80 | 0 | 15000 |
| 4 | 14576.35 | 14576.35 | 0 | 15000 |
| एकूण | 58428.43 | 58383.43 | 45 | 60000 |
| | ZT | ZT | | ZAT |

Calculation-----

| अदा करण्यात आलेले देयक | देय असलेली रक्कम |
|---|---|
| Z=ZT/ZATx100 | |
| Z=58428.43/60000x100=97.38 | Z=58383.43/60000x100=97.30 |
| =147559(Rate)x0.9738x15 days =2155394.31=2155394 | =147559(Rate)x0.9730x15 days =2153623.60 |
| वसुलपात्र रक्कम 2155394-2153623=1771 | |

3. डि व्ही. क्रमांक 4209/16.12.2012

| प्रमाणक क्रमांक | स्थूल रक्कम रु. | वजाती रु. | निव्वळ रक्कम रु. | कालावधी |
|---|---|---|---|---|
| /24.12.2011 | 2236144 | 44723 | 2191421 | 16.08.11 ते 31.08.2011 |

| झोन | प्रपत्रात मुल्यांकनाची दर्शविलेली बेरीज | प्रत्यक्ष मुल्यांकनाची बेरीज | फरक | ZAT |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | 15237.57 | 15155.14 | 82.43 | 16000 |
| 2 | 15073 | 15066.03 | 06.97 | 16000 |
| 3 | 14957.68 | 14932.77 | 24.91 | 16000 |
| 4 | 15349.02 | 15344.52 | 4.5 | 16000 |
| एकूण | 60617.27 | 60498.46 | 118.81 | 64000 |
| ZT | | | | ZAT |

Calculation-----

| अदा करण्यात आलेले देयक | देय असलेली रक्कम |
|---|---|
| Z=ZT/ZATx100 | |
| Z=60617.27/64000x100=94.71 | Z=60498.46/64000x100=94.52 |
| =147559(Rate)x0.9471x16 days =2236144 | =147559(Rate)x0.9452x16 days =2231773 |
| प्रस्तावीत वसुली 2236144-2231773=4371 | |

4. डि व्ही. क्रमांक 3415/29.10.2011

| प्रमाणक क्रमांक | स्थूल रक्कम रु. | वजाती रु. | निव्वळ रक्कम रु.म | कालावधी |
|---|---|---|---|---|
| /24.12.2011 | 2116170 | 42323 | 2073847 | 01.08.11 ते 15.08.2011 |

| झोन | प्रपत्रात मुल्यांकनाची दर्शविलेली बेरीज | प्रत्यक्ष मुल्यांकनाची बेरीज | फरक | ZAT |
|---|---|---|---|---|
| 1 | 14432.26 | 14432.26 | 0 | 15000 |
| 2 | 14203.95 | 14195.67 | 8.28 | 15000 |
| 3 | 14266.33 | 14245.50 | 20.83 | 15000 |
| 4 | 14462.48 | 14435.42 | 56.17 | 15000 |
| एकूण | 57365.02 | 57308.85 | 56.17 | 60000 |
| ZT | | | | ZAT |

Calculation-----

| अदा करण्यात आलेले देयक | देय असलेली रक्कम |
|---|---|
| Z=ZT/ZATx100 | |
| Z=57365.02/60000x100=95.60 | Z=57308.85/60000x100=95.51 |

| | |
|---|---|
| =147559(Rate)x0.9560x15 days =2116170 | =147559(Rate)x0.9551x15 days =2114109 |
| प्रस्तावीत वसुली 2116170-2114109=2061 | |

एकूण वसुली

| क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|
| I | 7902 |
| Ii | 1771 |
| Iii | 4371 |
| Iv | 2061 |
| एकूण | 16105 |

उपरोक्तबाबत चुकलेल्या गणितीय पध्दतीनुसार वसुलपात्र रकमेसंदर्भात अर्धसमास ज्ञापन क्रमांक 75 दिनांक 16/01/2014रोजी निर्गमित करण्यात आलेले आहे. परंतु त्याबाबत कोणतेही अभिप्राय लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत.

DVESMBM7301 (Ref No : 39, Hmm No : 75)

### *140 आरोग्य विभागाकडील लस टोचणी याकामावरील खर्चातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :P6332532 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1270687.00/-

| |
|---|
| ***लस टोचणी या लेखाशिर्षांगत झालेल्या खर्चात छपाई खर्चाची रक्कम रु.50,000 च्या वर असतांनाही या खर्चासाठी निविदा न मागविता खरेदी केली आहे.*** |

**उल्हासनगर महानगरपालिकेतील आरोग्य विभागाकडील** C-2 (**लस टोचणी** ) **या लेखाशिर्षाखालील खर्चाचे लेखापरीक्षण केले असता खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.**

| अ.क्र. | डिव्ही.क्रमांक व दिनांक | कामाचे नाव | खर्च रु. |
|---|---|---|---|
| 1 | 2407/02.09.2011 | **हस्तपत्रके छपाई** | 40000 |
| | | **स्टिकर फोर कलर छपाई** | 48000 |
| 3 | 2407/02.09.2011 | **स्लिप बुक तयार करणे** | 28000 |
| 4 | 2702/12.09.2011 | **पल्स पोलिओ बॅनर्स डिजीटल प्रिटींग** | 50000 |
| 5 | 3018/28.09.2011 | **हस्तपत्रके छपाई** | 40000 |
| | | **स्टिकर फोर कलर छपाई** | 48000 |
| | | **पल्स पोलिओ स्पिल बुक** | 28000 |
| 5 | 2720/12.09.11 | **पल्स पोलिओ बॅनर्स डिजीटल प्रिंटींग** | 50000 |
| | **एकूण** | | 3,32,000 |

1) **उपरोक्त खर्चाबाबतच्या नस्ती तपासल्या असता सदर खरेदी दरपत्रकानुसार केल्याचे दिसून येते. या देयकातील नमूद दर कसे घेण्यांत आले या पृष्ठयार्थ कोणतेही दस्ताऐवज लेखापरीक्षणास सादर करण्यात आले नाही. तसेच याबाबतची नोंदवही, मागणी पत्र,खरेदी प्रक्रिया यासारखे लेखापरीक्षणास आवश्यक दस्ताऐवज अर्धसमास पत्र क्रमांक 47, दि.11.12.2013 अन्वये मागणी करण्यात आल्यानंतरही उपलब्ध करुन देण्यात आले नाही.**

2) **उपरोक्त खर्च केवळ छपाईसाठीच झाल्याचे निदर्शनास येते. सदर खर्चाची एकूण रक्कम रु.**50,000/- **च्या वर असल्यामुळे या खर्चाच्या बाबीकरीता शासन निर्णय क्रमांक भाखंस-**1088/(2512) / **उदयोग**-6, **दि.**02.01.92 **नुसार निविदा मागविणे आवश्यक असतांनाही निविदा न न मागविता सदर खर्च केल्याचे निदर्शनास येते.**

3)2011-2012 **या वित्तीय वर्षात छपाईसाठी एकूण किती खर्च झाला याबाबतची माहिती उपलब्ध करुन देण्यांत आली नाही.**

**तसेच मानधनाच्या खर्चाची देयके खालील प्रमाणे**

| अ.क्र. | डिव्ही.क्रमांक व दिनांक | कामाचे नाव | खर्च रु. |
|---|---|---|---|
| 1 | 2666/08.09.2011 | **पल्स पोलिओ लसीकरण मोहिमे अंतर्गत कर्मचा-यांना मानधन वाटप** | 91100 |
| 2 | 2857/19.09.2011 | **पल्स पोलिओ लसीकरण मोहिमे अंतर्गत कर्मचा-यांना मानधन वाटप** | 847587 |
| | **एकूण** | | 9,38,687 |

**उपरोक्त खर्चाच्या नस्ती तपासल्या असता या नस्तीमध्ये अग्रीम देण्यांत आलेल्या कर्मचा-यांची मागणी, लसीकरण मोहिमेत आदेशित करण्यांत आलेल्या कर्मचा-यांचे नियुक्ती आदेश, मानधन अदा करण्यांत आलेल्या कर्मचा-यांचे पर्यवेक्षीय कर्मचारी / अधिकारी यांच्या अहवालासह हजेरी पत्र तसेच पल्स पोलीओ लसीकरण मोहिमेंतर्गत अग्रीम वाटप करण्यांत आलेल्या कर्मचा-यांना सदर अग्रीमाचे दर व अग्रीम कशाच्या आधारे निश्चित करण्यांत आले या पृष्ठयार्थ कोणतेही दस्ताऐवज लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आले नाही.**

4)**सदर अग्रिम देय मानधनामधून वसुल करण्यात आले किंवा नाही याबाबतची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आली नाही.**

**एकूण आक्षेपाधीन रक्कम** 332000+938687=1270687

**कर्मचा-यांची मागणी,त्यांचे नियुक्ती आदेश,हजेरी पत्रक अग्रीमाचे दर याबाबतीची माहिती अप्राप्त असल्यामुळे यासाठी झालेल्या खर्चाची रक्कम आक्षेपाधीन असल्याचे लेखापरीक्षणांती निदर्शनास येते.**

**उपरोक्त माहिती मिळण्यासंदर्भात अर्धसमास क्रमांक** 47/11.12.2013 **नुसार संबंधीत विभागांना कळविण्यांत आले होते. परंतु याबाबत कोणतेही उत्तर प्राप्त झालेले नाही.**

DVESMBM7301 (Ref No : 40, Hmm No : 47)

## *141 आरोग्य विभागाकडील एड्स टि.बी.व इतर रोग प्रतिबंधक खर्च याकामावरील खर्चातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :P6352579 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 105000.00/-

***एड्स, टि.बी. व इतर रोग प्रतिबंधक खर्च लेखाशिर्षांगत झालेल्या खर्चासाठी छपाई खर्चाची रक्कम रु.50,000 च्या वर असतांनाही या खर्चासाठी निविदा न मागविता खरेदी केल्याचे निदर्शनास येते.***

**उल्हासनगर महानगरपालिकेतील आरोग्य विभागाकडील** C-2(v) **एड्स टि.बी.व इतर रोग प्रतिबंधक खर्च लेखाशिर्षाखालील खर्चाचे लेखापरीक्षण केले असता खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.**

| अ.क्र. | डिव्ही.क्रमांक व दिनांक | कामाचे नाव | खर्च रु. |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | 3018/28.09.2011 | **दुषित पाण्याच्या छपाई पॅम्पॅलेट खर्च** | 30000 |
| | | **चिकनगुन्या व डेंगुपासून जनतेला आवाहन** | 30000 |
| 2 | 2720/12.09.2011 | **चालीया उत्सवाकरीता बॅनर्स बनविणेबाबत** | 45000 |
| | **एकूण** | | 105000 |

1) **उपरोक्त खर्चाबाबतच्या नस्ती तपासल्या असता सदर खरेदी दरपत्रकानुसार केल्याचे नस्तीमधील प्रस्तावीत टिपण्णीत नमूद आहे. या देयकात नमूद दर कसे घेण्यांत आले या पृष्ठयार्थ कोणतेही दस्ताऐवज लेखापरीक्षणास सादर करण्यात आले नाही. तसेच याबाबतची नोंदवही, मागणी पत्र,खरेदी प्रक्रिया यासारखे लेखापरीक्षणास आवश्यक दस्ताऐवज उपलब्ध करुन देण्यात आले नाही.**

2) **उपरोक्त खर्च केवळ छपाईसाठीच झाल्याचे निदर्शनास येते. सदर खर्चाची एकूण रक्कम रु.**50,000/- **च्या वर असल्यामुळे या खर्चाच्या बाबीकरीता शासन निर्णय क्रमांक भाखंस**-1086/(2512)/**उदयोग**-6, **दि.**02.01.1992 **नुसार निविदा मागविणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केली नाही.**

3) 2011-2012 **या वित्तीय वर्षात एकूण छपाईसाठी किती खर्च झाला याबाबतची माहिती उपलब्ध करुन देण्यांत आली नाही.**

**वरील मुदयांच्या अनुषंगाने या खर्चाची आवश्यक ती माहिती अप्राप्त असल्यामुळे यासाठी झालेल्या खर्चाची रक्कम आक्षेपाधीन असल्याचे लेखापरीक्षणांती निदर्शनास येते.**

**उपरोक्त माहिती मिळण्यासंदर्भात अर्धसमास क्रमांक** 47/11.12.2013 **नुसार संबंधीत विभागांना कळविण्यांत आले होते. परंतु याबाबत कोणतेही उत्तर प्राप्त झालेली नाही.**

DVESMBM7301 (Ref No : 41, Hmm No : 47)

## *142 आरोग्य विभागाकडील कुत्र्याच्या दंशावर औषधोपचार खर्चातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :P6392532 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 551000.00/-

***श्वान दंशावरील लस एकूण 1900 नगांचा पुरवठा महानगरपालिका दवाखान्या व्यतिरिक्त शासकिय दवाखान्यांना केल्यामुळे या रकमेची वसुली करण्याचे प्रस्तावीत करण्यांत येत आहे. तसेच निविदा प्रक्रियेतील निविदाकारांचे आवश्यक सहपत्रे/ पावत्या (जसे व्हॅट क्लिअरन्स प्रपत्र, अनामत रक्कम पावती वगैरे)***

*लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिल्या नाहीत.*

**उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील नागरी आरोग्य केंद्रे व दवाखाना येथे श्वान दंशावर उपचारासाठी वार्षीक निविदा काढण्यांत आलेली होती. ही निविदा दि.**07.05.2011 **रोजी दै.लोकमत व दै.महाराष्ट्र जनमुद्रा या वृत्तपत्रात प्रसारीत झालेली होती. विहीत कालावधीत सादर केलेले निविदाकार व त्यांचे दर प्रति नग पुढील प्रमाणे...**

1.**मे.नमन इंटरप्रायजेस- दर रु.**315/- 2.**मे.आर.अेस.इंटरप्रायजेस- दर रु रु.**358/- **व** 3.**मे उषा फॉम्यासिटीकल - रु.**337/- **प्रति नग यांनी निविदा सादर केल्या होत्या. किमान दरधारक मे.नमन इंटरप्रायजेस यांच्याशी वाटाघाटी करुन रु.**290/-**दर अंतीम करण्यांत आला. तदनंतर त्यास** UMC/HD/MOHO/11/11, **दि.**10.06.2011 **नुसार कार्यादेश देण्यांत आला आहे. या संदर्भात उपलब्ध करुन दिलेल्या संचिकेच्या आधारे पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.**

1) **महानगरपालिका क्षेत्रात कुत्र्याच्या दंशावर औषधोपचार करणारे किती नागरी आरोग्य केंद्र /दवाखाने असून त्यांना आवश्यक असलेला पुरवठा, लस खरेदीच्या वेळी त्यांच्याकडे असलेला साठा, मागील साठयाची विनियोग नोंदवही, तसेच** 2011-2012 **या वर्षासाठी लागणारी लस व त्या अनुषंगाने केलेली मागणी व नागरी आरोग्य केंद्रानिहाय केलेला पुरवठा याबाबतची माहिती अर्ध समास पत्र क्रमांक 49, दि.11.12.2013 नुसार मागणी केली असता लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात न आल्यामुळे** 2011-2012 **या वित्तीय वर्षात केलेली खरेदी आवश्यकते इतकीच करण्यांत आल्याची सत्यता पडताळता आली नाही.**

2) **संचिकेतील दि.**05.05.2011 **या पत्रानुसार मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर यांना** 200 **नग तर, शासकिय दवाखाना, उल्हासनगर यांना** 1700 **नग असे एकूण** 1900 **नगांचा पुरवठा महानगरपालिका आस्थापना व्यतिरिक्त आस्थापनांना केल्यामुळे या रक्कमा आक्षेपाधीन असल्याचे लेखापरीक्षणांती निदर्शनास येते.**

| **नग** | **दर रु.** | **आक्षेपाधीन रक्कम रु.** |
|---|---|---|
| 200 | 290 | 58000 |
| 1700 | 290 | 493000 |
| **एकूण** | | 551000 |

3) **प्राप्त संचिकेतील पत्र क्रमांक शप्रग/लेखा/कु.क/रॅबीपुर/**2519/111, **दि.**19.12.2011 **नुसार** 2000 **नग व जिल्हा शल्य चिकित्यक, मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर यांचे पत्र क्रमांक मरुड/औ.भांडार/मागणी/**97772/11,**दि.**23.11.2011 **नुसार** 2000 **नग यांची मागणी करण्यांत आलेली होती. वरील दवाखान्यांना सदर लसीचा पुरवठा करण्यांत आला किंवा कसे? तसेच पुरवठा करण्यांत आला असल्यास कोणत्या नियमानुसार याबाबतची माहितीची मागणी अर्धसमास पत्र क्रमांक 49, दि.11.12.2013 नुसार केली असता अप्राप्त असल्यामुळे सदर लसही महानगरपालिके व्यतिरिक्त**

**दवाखानांना देण्यांत आली किंवा नाही याची खात्री करता आली नाही. सदर लस वितरीत केली असल्यास रक्कम रु.**551000/- **संबंधीताकडून करुन महानगरपालिका लेख्यात जमा करण्यांत यावी.**

4) **निविदा प्रक्रियेतील निविदाकारांची आवश्यक सहपत्रे / पावत्या (जसे व्हॅट क्लिअरन्स प्रपत्र, अनामत रक्कम पावती वगैर) लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यांत न आल्यामुळे संपूर्ण निविदा प्रक्रिया तपासणे शक्य झाले नाही.**

5) Supply of Anti Rabies Vaccin **चा पुरवठा आदेश** UMC/HD/MOHO/52/11, DT.15.02.2011**मधील अट क्रमांक** 2 **नुसार उत्पादित दिनांक बॅच क्रमांक याबाबी चलनांवर आढळून आल्या नाहीत. तसेच उपरोक्त आदेशातील मालाचा पुरवठा कधी झाला याची प्राप्त दिनांक नमूद नसल्यामुळे ही लस विहीत वेळेत प्राप्त झाल्याची खात्री पटली नाही.**

6) **केंद्रीय अनुसंधान संस्थान, कसौली,हिमाचल प्रदेश यांचे पत्र क्रमांक** CDL/2011/4595, **दिनांक** 20.06.2011 **या तपासणी अहवालानुसार तपासणी केलेले** Sample **पुरवठा करण्यांत आलेल्या लसचेच आहे याचा साधार पुरावा लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यांत आलेला नाही. सदर पत्राची छायांकित प्रत नस्तीत आहे या पत्राची मुळ प्रत वा सत्यप्रत नस्तीत नसल्यामुळे या पत्राची सत्यता पडताळणी करणे शक्य झाले नाही.**

**याबाबतच्या खर्चाचे देयक**

| **डि व्ही. क्रमांक व दिनांक** | **खर्च रु.** |
|---|---|
| 2938/22.09.2011 | 609000 |

**उपरोक्त माहिती मिळण्यासंदर्भात अर्धसमास क्रमांक** 49/11.12.2013 **नुसार संबंधीत विभागांना कळविण्यांत आले होते. परंतु याबाबत कोणतेही उत्तर प्राप्त झालेले नाही.**

DVESMBM7301 (Ref No : 42, Hmm No : 49)

## *143 आरोग्य विभागाकडील श्वान निर्बिजीकरणावरील खर्चातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :6622579 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 812944.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1622.00/-

***श्वान निर्बिजीकरण कार्यक्रमांतर्गत श्वान निर्बिजीकरण शस्त्रक्रियेसाठी आवश्यक माहिती न ठेवल्यामुळे या श्वान निर्बिजीकरण शस्त्रक्रियेसाठी झालेल्या खर्चाची पडताळणी करता आली नाही.तसेच आवश्यक ते मुद्रांक***

***शुल्क नियमानुसार वसुल करण्यात आलेले आढळून आले नाही.***

**उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात निर्बिजीकरण कार्यक्रमांतर्गत भटक्या कुत्र्यांवर शस्त्रक्रिया करणे व रेबिज लस देण्यासाठी जाहिर निविदा काढण्यांत आली होती. ही निविदा दि.**21.10.2010 **रोजी दै.पुण्यनगरी व दै.लक्षव्दिप या वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यात आली. यामधील पात्र निविदाधारक व त्यांचे दर प्रती श्वान पुढील प्रमाणे** 1.**मे.ॲनिमल वेल्फेअर सोसायटी,मुंबई- दर रुपये** 1192/- 2.**मे.ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, ठाणे- दर रुपये** 1210/-**व** 3.**मे.रॉयल वॅटरनरीस सोसायटी ऑफ इंडिया,नागपूर- दर रुपये** 1212/-.**या निविदाधारकामधून किमान दर असलेले निविदाधारक मे.ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, मुंबई यांना पुरवठा करणेसाठी पाचारण करण्यांत आलेले होते. याबाबतच्या प्राप्त नस्तीचे लेखापरीक्षण केले असता पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.**

| | | |
|---|---|---|
| **कामाचे नाव** | :- | **श्वान निर्बिजीकरण करणे.** |
| **निविदा सुचना क्रमांक** | :- | **उमपा/आवि/वैआअका/**282/10, **दि.**08.10.10 |
| **अंदाजपत्रकीय रक्कम** | :- | **रु.**26,22,400 |
| **तांत्रिक मान्यता** | :- | **दिसून आली नाही** |
| **प्रशासकिय मान्यता** | :- | **स्थायी समिती ठराव क्रमांक** 139 **दिनांक** 21.02.2011 |
| **ठेकेदाराचे नाव** | :- | **मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, अंबरनाथ..** |
| **दर** | :- | 1192/-(**प्रति श्वान**). **श्वानांची संख्या** 1500 |
| **अनुदान संकेतांक** | :- | **सी-**2(ix) **श्वान निर्बिजीकरण खर्च** |

1) **उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत** 2011-2012 **वर्षात श्वानांची संख्या किती होती ? त्यापैकी परवानाधारक व विनापरवानाधारक श्वान किती होते, तसेच परवानाधारक श्वानांच्या परवान्यांचे नुतनीकरण करण्यांत आलेले आहे व त्यापासून किती महसुल प्राप्त आहे ही माहीती मागितली असता प्राप्त झाली नाही त्यामुळे एकूण संख्येच्या अनुषंगाने श्वानांच्या निर्बिजीकरणावर झालेला खर्च योग्य असल्याबाबत रक्कम रुपये 832016 चे लेखापरीक्षण करणे शक्य झाले नाही.**

2) **श्वान निर्बिजीकरण खर्चाबाबत प्रभाग निहाय सक्षम अधिका-यांचा निर्बिजीकरण करण्याबाबतच्या आवश्यक संख्येनिहाय अहवाल नस्तीसह आढळून आला नसल्यामुळे तसेच निर्बिजीकरणासाठी संख्या कशाच्या आधारे निश्चित करण्यात आली याबाबतची साधार माहिति नसतांना अंदाजपत्रकीय रक्कम**

**कशाच्या आधारे निश्चित करण्यांत आली याचे आकलन होवू शकले नाही.**

3) **या निविदाप्रक्रियेसाठी स्विकारण्यात आलेल्या लिफाफ्यावर संबंधीत अधिकारी** / **कर्मचारी यांची दिनांकीत स्वाक्षरी नसल्यामुळे सदर निविदेची स्विकृती विहीत वेळेत स्विकारण्यात आल्याची सत्यता पडताळणी करता आली नाही.**

4) **निविदा प्रक्रियेत निविदापात्रतेसंबंधीची निविदाकारांची आवश्यक सहपत्रे/पावत्या** (**उदा.निविदा, अनामत भरल्याची रक्कम,व्हॅट क्लिअरन्स सर्टिफिकेट आदी**) **लेखापरीक्षणास आढळून न आल्याने याबाबतची सत्यता पडताळता आली नाही.**

5) **या निविदेप्रक्रियेसाठी मुद्रांक शुल्क रु.**1722/- **आवश्यक असतांना रुपये** 100 /- **वसुल केले असून उर्वरीत रक्कम रुपये** 1622 **वसुल केलेले नाही.**

6) **एकूण 698 इतक्या शस्त्रक्रियेचे देयक अदा करण्यात आल्यामुळे** 2011-2012 **या वर्षात निर्बिजीकरणासाठी किती श्वान पकडण्यांत आले व किती श्वानांवर निर्बिजीकरण करुन सुटका करण्यांत आली याबाबत प्रभागवार माहिती अप्राप्त असल्यामुळे एकूण 698 श्वानांच्या निर्बिजीकरणावर झालेल्या प्रत्यक्ष खर्चाची सत्यता पडताळणी करता आली नाही.**

7) **निर्बिजीकरणासाठी ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडिया यांच्या नियमावलीनुसार अभिकर्त्याने खालील माहिती ठेवणे आवश्यक आहे. ही माहिती प्राप्त संचिकेसह आढळून न आल्यामुळे निर्बिजीकरणावर झालेल्या खर्चाची सत्यता पडताळता आली नाही.**

1) Pre-operative Assement. (**प्रती श्वान**).
2) Driver record sheet (**श्वान केंद्रावर श्वान असल्यावेळी ठेवायची नोंदवही**).
3) Surgery case record per dog.
4) Ofiice daily record sheet of surgery.
5) Detail record register of ABC programme (Dog's).
6) Medicine Inventory record sheet.
7) Instrument Inventory record sheet.
8) Electrical equipment Invertor record.

**पार्ट पेमेंटचे देयक डि व्ही. क्रमांक** 2967,**दिनांक** 23.09.2011

**शस्त्रक्रिया** 698x**दर रु.** 1192=**रु.**832016 **चे पार्ट पेमेंटचे देयक डि व्ही. क्रमांक** 2967,**दि.**23.09.2011

| | | |
|---|---|---|
| **स्थुल रक्कम** | = | 432096 |
| **वजाती** (5 %**अनामत रक्कम**) | = | 21605 |
| **आय.टी.**(2 %**अनामत रक्कम**) | = | 8642 |

**निव्वळ रक्कम** = 401849

**वरील मुद्दे क्रमांक 1 ते 8 च्या अनुषंगाने या शस्त्रक्रियेसंबंधी आवश्यक ती माहिती अप्राप्त असल्यामुळे यासाठी झालेल्या खर्चाची रक्कम रुपये** 832016/- **आक्षेपाधीन आहे.**

**उपरोक्त माहिती मिळण्यासंदर्भात अर्धसमास क्रमांक** 49/11.12.2013 **नुसार संबंधीत विभागांना कळविण्यांत आले होते. परंतु त्यांच्याकडून कोणतेही उत्तर प्राप्त झालेली नाही.**

DVESMBM7301 (Ref No : 43, Hmm No : 49)

### *144 अेस.टी.डी./ पी.सी.ओ.व गटई व्यवसाय स्टॉल भाडयाच्या थकबाकीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :4501910 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 194514.00/-

| |
|---|
| ***अेस.टी.डी. / पी.सी.ओ.व गटई व्यवसाय स्टॉलची भाडे थकबाकी रु.194514 वसुल करण्यांत आली नाही व त्यांचे संपलेले करारनाम्याचे नुतनीकरण करण्यांत आलेले आढळून आले नाही.*** |

**उल्हासनगर महानगरपालीकेच्या मालमत्ता विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या अेस.टी.डी.पी.सी.ओ.व गटई व्यवसाय स्टॉल या भाडयाने वितरीत मालकत्तेचे थकीत असलेल्या भाडयाबाबतच्या संचिकेची तपासणी केली असता पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.**

**अेस.टी.डी. / पी.सी.ओ.**

1) **उल्हासनगर महापालिकांतर्गत माहे मार्च**-2012 **अखेर एकूण** 18 **अेस.टी.डी.पी.सी.ओ.धारक आहेत. सदर स्टॉल वितरीत करण्याबाबत कोणतेही नियम व अटी शर्ती असल्याचे लेखापरीक्षणास आढळून आले नाही. केवळ अर्जाच्या अनुषंगाने स्टॉल वितरीत केलेले आढळून आले. या अेस.टी.डी.पी.सी.ओ.साठी** 3 **वर्षासाठी कालावधी कमाल मर्यादा होती. परंतू याबाबत प्राप्त नस्तीचे अवलोकन केले असता या कालावधीनंतर मुदतवाढ दिलेली आढळून आली नाही.**

2) **ठराव क्रमांक** 16,**दि**.20.05.2005 **नुसार रु**.1800 **अनामत रक्कम व भाडे रु**.150 **प्रती महिना निश्चित करण्यात आलेले आहे. परंतू भाडे निश्चित करतांना ज्या परिपत्रक / शासन निर्णयाचा आधार घेण्यांत आला या पृष्ठयर्थचे दस्ताऐवज संचिकेसह आढळून आले नाही.**

3) 31 **मार्च**-2012 **पर्यंत अस्तित्वात असलेल्या अेस.टी.डी.पी.सी.ओ. धारकांकडून वसुल करण्यांत**

आलेली अनामत रक्कम पावतीची सत्यता दर्शविणारे कोणतेही दस्ताऐवज लेखापरीक्षणास सादर करण्याबाबत अर्धसमास क्रमांक 168,दि.13.02.20014 नुसार कळविण्यात आले होते. परंतू सदर दस्ताऐवज लेखापरीक्षणास उपलब्ध करुन न दिल्यामुळे ही रक्कम संबंधीतांनी भरल्याची सत्यता पडताळणे शक्य झाले नाही.

4) वरील वितरीत केलेल्या स्टॉलच्या भाडयाची मागणी वही लेखापरिक्षणास प्राप्त झालेली नाही. त्यामुळे या वसुली संदर्भात पूर्ण लेखापरीक्षण करणे शक्य झाले नाही. मालमत्ता विभाग उपायुक्त यांनी लेखापरीक्षणास दिलेल्या प्रमाणपत्रानुसार एकूण थकबाकी रु.45150+4650 (10.30%) =42852+45150=49800 या रकमेची वसुली करुन महानगरपालिका लेख्यात जमा करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच एकूण वसुलीची रक्कम बघता अनामत रकमेतून सदर वसुली करुन कालावधी संपलेल्या अेस.टी.डी.पी.सी.ओ. धारकांची परवानगी रद्द करुन नव्याने प्रक्रिया करणे आवश्यक आहे.

**गटई व्यवसाय स्टॉल-**

5) उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात गटई व्यवसाय स्टॉल महासभा ठराव क्रमांक 62 दिनांक 20.08.2003 नुसार ऑगस्ट-2008 पासून रुपये 150 रुपये प्रति महिन्यानुसार वितरीत करण्यात आलेले आहेत.सदर स्टॉल वितरणासाठी उपरोक्त दर कसे ठरविण्यांत आले तसेच स्टॉल वितरणासाठी कोणती पध्दत वापरण्यांत आली या पृष्ठयार्थ कोणतेही दस्ताऐवज प्राप्त संचिकेसह आढळून आले नाही.

6) 31 मार्च-2012 अखेर एकूण 36 गटई व्यवसाय स्टॉल असून त्यांची मागणी नोंदवही नसल्यामुळे सदर स्टॉलधारकांनी विहीत वेळेत भाडे भरल्याची सत्यता पडताळणी करता आली नाही. या स्टॉलचे भाडयाची जुन्याच दराने आकारणी होत असून दराचे नुतनीकरणे न केल्यामुळे यापोटी मिळणा-या महसुलाइतके महानगरपालिकेचे नुकसान झालेले असल्याचे निदर्शनास येते.

7) मालमत्ता उपायुक्त यांच्या प्रमाणपत्रानुसार माहे मार्च-2012 अखेर गटई व्यवसाय स्टॉलधारकांकडून येणे असलेली रक्कम रुपये 1,31,200 महापालिका फंडात जमा करण्यांत यावी.

8) तसेच सेवा कर शुल्क 10.30% आकारण्यांत आल्याचे आढळून आले नाही. सदर सेवाकर रुपये 131200x10.30% =13514 वसुलपात्र आहे.

एकूण वसुलपात्र रक्कम रुपये 131200+13514= रु.144714

| एकूण प्रस्तावीत भाडे | |
|---|---|
| अेस.टी.डी.पी.सी.ओ. | =49800 |
| गटई स्टॉल | =144714 |
| एकूण | =194514 |

उपरोक्त माहिती मिळण्यासंदर्भात अर्धसमास क्रमांक 168 /13.02.2014 नुसार संबंधीत विभागांना कळविण्यांत आले होते. परंतु याबाबत कोणतेही उत्तर प्राप्त झालेली नाही.

## *145 उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी मालमत्तेवर जाहिरात लावणे बाबत अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :4601429 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 5064.00/-

***तीलसन शॉपींग सेंटर या खाजगी मालमत्तेवर मे.पुजा ॲडव्र्हेटाईझिंग, उल्हासनगर यांनी लावलेल्या 1 वर्ष मुदतीच्या जाहिरातीवर रु.5074/- कमी वसुल केल्याचे निदर्शनास येते.***

**उल्हासनगर शहरातील खाजगी मिळकतींवर जाहिरात लावणे संदर्भात खाजगी मिळकतींवर मे.पुजा ॲड उल्हासनगर यांना खालील प्रमाणे जाहिरात लावण्यांस परवानगी देण्यांत आली होती. त्यानुसार खालील अभिप्राय देण्यांत येत आहे**.

1) **जाहिरातदाराचे नाव** : **मे.पुजा ॲडव्हर्टाईझिंग एजन्सी**, **उल्हासनगर**.

**जागेचे ठिकाण** : **शॉप नं**736 **च्या वर कल्याण अंबरनाथ रोड**, **तीलसन**
**तिलसन शॉपींग सेंटर**, **उल्हासनगर**-3.

**कालावधी** : **दि**.01.09.2011 **ते** 31.08.2012.

**क्षेत्र** : 30x20=600**चौ.फूट**.=55.74 **चौ.मी**.

**दर** : **दि**.06.10.2011 **पर्यंत** 2.75 **प्रती चौ.मी.प्रती दिवस**
: **दि**.07.10.2011**ते** 31.08.2012**रु**3.03**प्रती चौ.मी.प्रती दिन**

i)**भरलेली रक्कम** : **रुपये** 56020 **पावती क्रमांक** 303734/19.09.11

**भरावयाची रक्कम**….

**दि**.01.09.2011**तेदि**.06.10.2011=36(**दिवस**)x55.74(**क्षेत्र**)x2.75(**दर**)=5518.26

**दि**.07.10.2011**तेदि**.31.08.2012=329x55.74x3.03=55565.53

**एकूण** 5518.26+55565.53=61084.

**एकूण कमी भरलेली रक्कम** =**प्रत्यक्ष गणणा रक्कम**-**प्रत्यक्ष भरलेली रक्कम**
= 61084-56020
= 5064.

ii)**उपरोक्त परवानगीधारक मे.पुजा ॲडव्हर्टाइझिंग एजन्सी**, **उल्हानगर यांना परवानगी दिलेल्या नस्तीमध्ये**

**केवळ मे.पुजा ॲड. उल्हासनगर यांचा केवळ विनंती अर्ज प्राप्त झाला असून इतर दस्ताऐवज जसे की मंजुरी आदेश, अटी शर्ती, संबंधीत अधिकारी कर्मचारी / अधिकारी यांचा प्रत्यक्ष दर्शनी अहवाल प्राप्त झालेला नसल्यामुळे पूर्ण लेखापरीक्षण करणे शक्य झाले नाही.**

**उपरोक्त माहिती मिळण्यासंदर्भात अर्धसमास क्रमांक** 170/13.02.2014 **नुसार संबंधीत विभागास कळविण्यांत आले होते. परंतु याबाबत कोणतेही उत्तर प्राप्त झालेले नाही.**

DVESMBM7301 (Ref No : 47, Hmm No : 170)

### *146 उल्हासनगर शहरात दिशादर्शक फलक लावणेसाठी 15 वर्षाच्या कालावधीसाठी बी.ओ.टी.तत्वावर अभिकर्त्याची नेमणूक करणेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :4601429 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***उल्हासनगर शहरातील विविध चौकात व महत्वाच्या ठिकाणी दिशादर्शक फलक लावण्याचा ठेका बी.ओ.टी तत्वावर मे.पवन ॲड. यांना देण्यांत आलेला आहे. सदर ठेका देण्यासाठी बी.ओ.टी तत्वावर निविदा काढण्यांत आली होती.उपरोक्त निविदेमध्ये यासाठी प्रति वर्ष पहिल्या वर्षासाठी रु.1320 प्र.चौ.मी.प्रती वर्ष दुस-या व तिस-या वर्षासाठीठी रु.1500 प्र.चौ.मी.प्रती वर्ष, चौथ्या,पाचव्या व सहाव्या वर्षासाठी रु.1680 प्र.चौ.मी.प्रती वर्ष, सातव्या, आठव्या व नवव्या वर्षासाठी रु.1800 प्र.चौ.मी.प्रती वर्ष, दहाव्या, अकराव्या व बाराव्या वर्षासाठी 2040 प्र.चौ.मी.प्रती वर्ष तर तेराव्या चौदाव्या व पंधराव्या वर्षासाठी रु.2400 प्र.चौ.मी.प्रती वर्ष इतक्या रुपयास मान्यता देण्यांत आलेली आहे. प्रत्येक वर्षी वाढ अपेक्षीत असतांना या ठेकेदाराशी वाटाघाटी केल्याचे निदर्शनास येत नाही.***

**उल्हासनगर शहरातील विविध चौकातील व महत्वाचे ठिकाणी नागरीकांच्या सोयीसाठी दिशादर्शक फलक लावण्यासाठी बी.ओ.टी.तत्वावर निविदा जाहिरात दै.मुंबई लक्षदिप व दै.अमृतकलश या वृत्तपत्रात दिनांक** 28.08.2010 **रोजी जाहिरात प्रसारीत करण्यांत आली होती. या निविदेनुसार मे.पवन ॲडव्हेटाईझिग,माधव कन्स्टक्शन,केस्टल ईन्फास्टक्चर यांनी निविदा भरल्या होत्या . यातील निविदाधारक मे.पवन ॲडव्हर्टटाईझींग यांना** 15 **वर्षाच्या करारावर ठेका देण्यांत आलेला आहे. यामध्ये** 55 % **भाग महानगरपालिका व** 45 % **भाग मे.पवन ॲड यांच्या फलकावरील जाहिरातीचा**

**राहील अशी महासभा ठराव क्रमांक** 35, **दिनांक** 20.08.2010 **नुसार मान्यता व जा.क्र. उमपा/मालमत्ता**/471/10, **दि**.20.12.2010 **नुसार कार्यादेश देण्यांत आलेले होते.सदर ठेका** 15 **वर्षासाठी देण्यांत आलेला आहे. यासाठी प्रति वर्ष पहिल्या वर्षासाठी रु**.1320 **प्र.चौ.मी.प्रती वर्ष दुस-या व तिस-या वर्षासाठीठी रु**.1500 **प्र.चौ.मी.प्रती वर्ष**, **चौथ्या,पाचव्या व सहाव्या वर्षासाठी रु**.1680 **प्र.चौ.मी.प्रती वर्ष**, **सातव्या**, **आठव्या व नवव्या वर्षासाठी रु**.1800 **प्र.चौ.मी.प्रती वर्ष** , **दहाव्या**, **अकराव्या व बाराव्या वर्षासाठी रु**.2040 **प्र.चौ.मी.प्रती वर्ष तर तेराव्या चौदाव्या व पंधराव्या वर्षासाठी रु**.2400 **प्र.चौ.मी.प्रती वर्ष अश्या दरास स्थायी समिती ठराव क्रमांक** 84, **दिनांक** 25.10.2010 **नुसार मान्यता देण्यांत आलेली आहे. वरील ठेक्याच्या अनुषंगाने प्राप्त नस्तीचे अवलोकन केले असता पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.**

| | | |
|---|---|---|
| **कामाचे नाव** | : | **उल्हासनगर शहरात दिशादर्शक फलक लावणेसाठी** 15 **वर्षाच्या कालावधीसाठी बी.ओ.टी.तत्वार अभिकर्त्याची नेमणूक करणेबाबत.** |
| **निविदा सुचना** | : | **उमपा/पिआरओ**/176/10 |
| **तांत्रिक मान्यता** | : | **आढळून आली नाही.** |
| **प्रशासकिय मान्यता** | : | **स्थायी समिती ठराव क्रमांक** 84, **दि**.25.10.2010. |
| **कार्यारंभ आदेश क्रमांक** | : | **उमपा/मालमत्ता**/471/10,**दिनांक** 20.12.2012. |
| **काम पुर्ण केल्याचा दिनांक** | : | **आढळून आला नाही.** |
| **वर्तमान पत्राचे नाव** | : | **दै.मुंबई लक्षदिप (ब वर्ग् सायं दै.), दै.अमृत कलश (क वर्ग दैनिक),दि**.25.08.2010. |
| **निविदा कालावधी** | : | **दि**.30.08.2010 **ते दि**.06.09.2010 |
| **निविदा शुल्क** | : | **रु**.15000 |
| **अनामत रक्कम** | : | **रु**.500000 |
| **मुद्रांक शुल्क** | : | **आढळून आले नाही.** |
| **सेवा कर** | : | **वसुल करण्यांत आलेला नाही** |

1) **जाहिरात फलकासाठी** 15 **वर्ष ठेका देतांना सदर जाहिरातीचे फलक उभारण्यासाठी किती खर्च येईल** ? **तसेच आलेल्या खर्चानुसार किती नफा संबंधीतांना देता येईल** ? **याबाबत कोणतेही अनुमान गणणा न करता ठेका** 15 **वर्षासाठी संबंधीत ठेकेदारास देण्यांत आलेला आहे.**

2) **मे.पवन ॲडव्हर्टटाझिंग यांनी सुचविलेला दर पहिल्या वर्षासाठी रु**.1320 **प्र.चौ.मी.प्रती वर्ष**, **दुस-या व तिस-या वर्षासाठीठी रु**.1500 **प्र.चौ.मी.प्रती वर्ष**, **चौथ्या,पाचव्या व सहाव्या वर्षासाठी रु**.1680 **प्र.चौ.मी.प्रती वर्ष**, **सातव्या**, **आठव्या व नवव्या वर्षासाठी रु**.1800 **प्र.चौ.मी.प्रती वर्ष**, **दहाव्या**,

**अकराव्या व बाराव्या वर्षासाठी** 2040 **प्र.चौ.मी.प्रती वर्ष ,तर तेराव्या चौदाव्या व पंधराव्या वर्षासाठी रु.**2400 **प्र.चौ.मी.प्रती वर्ष असे आहेत. सदर दर प्रती वर्षी वाढ दर्शविणारे नाहीत. याबाबत मे.पवन ॲड. यांच्याशी वाटाघाटी न करताच अंतीम करण्यांत आलेले दिसून येतात. दर वर्षांनी सदर दरवाढ होणे अपेक्षित असतांना अशा प्रकारच्या वाटाघाटी उपरोक्त निविदा अंतीम करतांना केल्याचे दिसून येत नाही.**

3) **उपरोक्त ठेक्याची जाहिरात देतांना सामान्य प्रशासन शासन निर्णय क्रमांक** 209/**प्र.क्र.**137/**का**-34, **दिनांक** 31.09.2009 **नुसार ज्या कामाचे मुल्य रुपये** 55 **लाखापेक्षा अधिक आहे अशा जाहिराती संबंधीत विभागातील अ वर्ग दैनिक व त्या विभागातील ब वर्ग व ज्या जिल्हातील काम असेल त्या जिल्हातील क वर्ग दैनिकास आळीपाळीने त्या वर्गातील वृत्तपत्राचे से.मी.चे प्रमाण लक्षात घेऊन जाहिरातीचे वितरण करणे आवश्यक होते.परंतु उक्त शासन निर्णयानुसार पालन झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सदर ठेक्यास योग्य प्रमाणात स्पर्धा झाल्याचे निदर्शनास येत नाही.**

4) **या जाहिरातीसंदर्भात एकूण किती ठिकाणी परवानगी देण्यांत आली आहे तसेच त्याचे क्षेत्र किती आहे** ? **निविदेतील अट क्रमांक** 7 **नुसार महानगरपालिकेने निर्देशित केलेले ठिकाणी फलक लावणेच्या ठेकदाराने तज्ञ वास्तुविशारदाचे स्वाक्षरीसह स्टक्चरल डिझाईन उपआयुक्त, मालमत्ता यांना सादर करुन, फलक लावणेची परवानगी घेणे आवश्यक असतांना अशी परवानगी घेतल्याचे प्राप्त संचिकेत आढळून आले नाही. त्याचप्रमाणे फलक निहाय महानगरपालिका व अभिकर्त्याचे प्रमाण दर्शविणारा स्वयंस्पष्ट अहवाल प्राप्त संचिकेसह आढळून आला नाही.**

5) **उपरोक्त जाहिरातीचे काम पूर्ण झाल्याचा अहवाल प्राप्त संचिकेसह आढळून आला नाही.**

6) **उपरोक्त ठेकेदाराने** 2011-2012 **या वित्तीय वर्षात किती रक्कम भरणा केलेली आहे, याची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यांत आली नाही. सदर रकमेची गणणा करतांना किती ठिकाणच्या जाहिरातीचे व कोणत्या दराने तसेच किती क्षेत्राची भाडे वसुली करण्यांत आली याची पडताळणी महानगरपालिकेकडून केल्याचे प्राप्त नस्तीवरुन आढळून आले नाही.**

7) **करारनाम्यातील अट क्रमांक** 10 **अ नुसार कार्य सुरु करण्यासाठी कार्यादेशाच्या दिनांकापासून** 2 **महिन्याचा कालावधी देण्यांत आला होता. तसचे** 10 **ब नुसार कार्यादेश दिनांकापासून** 6 **महिन्यांचा कालावधीत सर्व फलक लावणे बंधनकारक होते. परंतु उमपा /मालमत्ता/**133/11, **दिनांक** 05.08.2011 **नुसार** 04 **महिने मुदतवाढ देण्यांत आलेली आहे. सदर मुदत कशाच्या आधारे देण्यांत आली. तसेच संबंधीत अभिकर्त्याने काम कधी पूर्ण केले याबाबतचा अहवाल नस्तीमध्ये आढळून आली नाही.**

8) **उपरोक्त जाहिराती संदर्भात सदर जाहिरातीचे दर काय असावे याबाबतचा तज्ञांचा अहवाल व त्यास मान्यता असल्याचे प्राप्त संचिकेत आढळून आले नाही.**

9) **मुद्रांक शुल्क व सेवाकर वसुल केल्याचे पृष्ठयर्थ कोणतेही दस्ताऐवज प्राप्त संचिकेत आढळून आले नाही.**

**उपरोक्त माहिती मिळण्यासंदर्भात अर्धसमास क्रमांक** 171 /13.02.2014 **नुसार संबंधीत विभागास**

**कळविण्यांत आले होते. परंतु याबाबत कोणतेही उत्तर प्राप्त झालेले नाही.**

DVESMBM7301 (Ref No : 48, Hmm No : 171)

## *147 उल्हासनगर महानगरपालिका मालकीच्या भाडयाने दिलेल्या उदयाने व मैदाने या मालमत्तेच्या थकीत असलेल्या भाडयाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :4501427 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 263654.00/-

***उल्हासनगर महानगरपालीकेच्या मालकीच्या एकूण 16 मैदाने व उदयाने या मालमत्ता विविध दराने सर्वसाधारण महासभा ठराव क्रमांक 8 दिनांक 24.05.2002 नुसार जागेनिहाय प्रतिदिन भाडयाने देण्याबाबत वेगवेगळया दराने मंजूरी दिलेली आहे.***

उल्हासनगर महानगरपालीकेच्या मालकीची एकूण 16 मैदाने व उदयाने या मालमत्ता विविध दराने सर्वसाधारण महासभा ठराव क्रमांक 8 दिनांक 24.05.2002 नुसार जागेनिहाय प्रतिदिन भाडयाने देण्याबाबत वेगवेगळया दराने मंजूरी दिलेली आहे.मालमत्ता विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या उदयाने व मैदाने या भाडयाने देण्यांत आलेल्या भाडे देणेबाबतच्या संचिकेची तपासणी केली असता पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.

1) उदयाने व मैदाने यासाठी महासभा ठराव क्रमांक 8 दिनांक 24.05.2002 अन्वये 24 तासांसाठी भाडे निश्चित केलेले आहे. यामध्ये एकूण 16 उदयाने व मैदाने यांचा समावेश आहे. सदर मालमत्ता भाडयाने देण्यात आलेल्या उदयाने मैदानांची भाडे निश्चिती कशाप्रकारे करण्यांत आली यापृष्ठयर्थ कोणतेही दस्ताऐवज प्राप्त संचिकेत आढळून आले नाहीत.

2) सदरचे दर हे 2002 पासूनचे आहे. यात सुधारणा न केल्यामुळे प्राप्त महसुलापेक्षा जास्त भाडयापोटी येणा-या महसुला इतके महानगरपालिकेचे नुकसान झाल्याचे निदर्शनास येते.

3) या अनुषंगाने भाडयाने दिलेली उदयाने व मैदाने यासाठी ठराव क्रमांक 8 दिनांक 24.05.2002 नुसार घालून दिलेल्या अटीचे व शर्तीचे पालन केल्या पृष्ठयर्थ कोणतेही दस्ताऐवज प्राप्त संचिकेत आढळून आले नाही. (जसे अट क्रमांक 3 वीज पुरवठा हा महानगरपालिकेच्या खांबावरुन न घेता महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या ,वीज मंडळाच्या मुख्य खांबावरुन घ्यावा अट क्रमांक 2 ज्या

उद्देशाने परवानगी देण्यांत आली आहे त्याच उद्देशाने मैदानाचा वापर करणे , 4 व 13 या ठिकाणी खड्डे खोदू नये.)

4) उदयाने मैदाने भाडयाने देणे या अंतर्गत परवानगी क्रमांक उमपा / मालमत्ता / 201 / 11,दिनांक 13.10.2011 नुसार श्री. राजु सोनी (जय भवानी अमेंजमेंट पार्क) यांना दिनांक 19.10.2011 ते 05.11.2011 या कालावधीत एकूण 18 दिवस परवानगी देण्यांत आलेली होती. ठराव क्रमांक 8, दिनांक 24.05.2002 नुसार गौल मैदान येथील भगवंती नावानी स्टेज समोर, उल्हासनगर हे मैदान रु.18750 प्रती दिन (व्यावसायिक दराने) या प्रमाणे भाडयाने देण्यांत आले होते. संबंधीतांकडून 18750x18=3,37,500 + 18750 (अनामत रक्कम) असे एकूण 3,56,250 आवश्यक असतांना रु.187500 + 18750 (अनामत रक्कम) असे एकूण 2,06,250 रुपये वसुल केलेली आहे. म्हणजेच संबंधींकडून 337500-206250=1,50,000 इतकी रक्कम कमी वसुल केल्याचे निदर्शनास येते. तसेच रुपये 3,37,500 वरील सेवा कर = 3,37,500x10.30% =32831/365x18=1714 वसूल केलेला नाही. सबब एकूण 1,50,000+1714 =1,51,714 रक्कम वसुल करण्यात यावी.

5)परवानगी क्रमांक उमपा / मालमत्ता / 297 / 11,दिनांक 16.12.2011 नुसार श्री. राजु सोनी (जय भवानी अमेंजमेंट पार्क) यांना दिनांक 23.12.2011 ते 02.01.2012 या कालावधीत एकूण 11 दिवस परवानगी देण्यांत आलेली होती. ठराव क्रमांक 8, दिनांक 24.05.2002 नुसार गौल मैदान येथील भगवंती नावानी स्टेज समोर, उल्हासनगर हे मैदान रु.18750 प्रती दिन (व्यावसायिक दराने) या प्रमाणे भाडयाने देण्यांत आले होते. संबंधीतांकडून 18750x11=206250 + 18750 (अनामत रक्कम) असे एकूण 2,25,000 आवश्यक असतांना रु.93750 +1200(डम्पींग चार्जेस) + 18750 (अनामत रक्कम) असे एकूण 1,13,700 रक्कम वसुल केलेली आहे. म्हणजेच संबंधींकडून 2,25,000-1,13,700=1,11,300 इतकी रक्कम कमी वसुल केल्याचे निदर्शनास येते. तसेच या रकमेवर सेवा कर 206250x10.30%/365x11=640 अशी एकूण 1,11,300+640=111940 रक्कम वसुल करण्यांत यावी.

6) व्ही.टी.सी. ग्राऊंड या ठिकाणी जा.क्र.उमपा/मालमत्ता /1365 / 12, दिनांक 21.02.2012 अन्वये हेलिकॉप्टर उतरविण्यांस परवानगी देण्यांत आल्याचे दिसून येते. सदर मैदान भाडेपट्टीने देण्यासाठी वरील ठरावात नमूद नसतांना उक्त मैदान भाडे पट्टीने देण्यास परवानगी देण्यात आली आहे. तसेच सदर मैदान किती कालावधीसाठी भाडयाने देण्यात आले होते व त्याद्वारे किती भाडे वसुल करण्यांत आले याबाबतची माहिती प्राप्त संचीकेत आढळून आली नाही.

7) उपरोक्त मैदाने व उदयाने भाडयाने दिल्यानंतर अटी शर्ती पालन झाल्याचे संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांचे अहवाल प्राप्त संचिकेसह आढळून आले नाही.

एकूण वसुलपात्र रक्कम= 151714+111940=रु.263654

उपरोक्त माहिती मिळण्यासंदर्भात अर्धसमास क्रमांक 173 /13.02.2014 नुसार संबंधीत विभागास कळविण्यांत आले होते. परंतु याबाबत कोणतेही उत्तर प्राप्त झालेला नाही.

### *148 उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या भाडयाने दिलेल्या गाळयाच्या प्रलंबीत भाडयाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 9382878.00/-

***उल्हासनगर महानगरपालिका मालकीचे असलेले 363 गाळयापैकी 250 गाळे भाडयाने दिलेले आहेत परंतू सदरच्या भाडयाची रुपये 9382878/- वसुली केलेली नाही.***

**उल्हासनगर महानगरपालीकेच्या मालकीचे गाळे भाडयाने देण्याबाबतची मार्च -2012 अखेर स्थिती खालील प्रमाणे होती.**

| ठिकाण | एकूण गाळे | भाडयाने | रिक्त |
|---|---|---|---|
| जय भवानी भाजी मार्केट, उल्हासनगर-1 | 84 | 72 | 12 |
| झुलेलाल भाजी मार्केट, उल्हासनगर-2 | 32 | 28 | 04 |
| इंदिरा गांधी भाजी मार्केट, उल्हासनगर-3 | 182 | 104 | 78 |
| भाजी मार्केट, उल्हासनगर-5 | 65 | 46 | 19 |
| एकूण | 363 | 250 | 113 |

**या संदर्भात मालमत्ता विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या प्राप्त संचिकेचे लेखापरीक्षण केले असता पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.**

1) **एकूण** 363 **गाळयांपैकी** 250 **गाळे** 1998 **पासून भाडयाने दिल्याचे प्राप्त संचिकेवरुन दिसून येते. सदर गाळे भाडयाने देतांना कोणतेही नियम, अटी व शर्ती नुसार गाळे वितरीत केल्याचे लेखापरीक्षणात आढळून आले नाही. तसेच गाळे वितरणाची पध्दत, वितरीत केलेल्या गाळे धारकांची नावे, कालावधी व करारनामे प्राप्त संचिकेत आढळून आले नाही.**

2) **सदर गाळे** 1998 **पासून भाडे कराराने दिलेले आहेत. सर्वसाधारण महासभा ठराव क्रमांक** 11 , **दिनांक** 19.07.2002 **यानुसार कॅम्प क्रमांक** 1,3 **व**5 **साठी रु.**300 **तर कॅम्प क्रमांक** 2 **साठी किमान**

**मासिक भाडे रु.**500 **मंजूर करण्यात आले होते. म्हणजे** 1998 **ते** 2002 **पर्यंत तसेच** 2002 **पासून ते मार्च**-2012 **पर्यंत भाडेवाढ झालेली आढळून येत नाही. प्रती वर्षी याबाबत आढावा घेऊन भाडेवाढ न केल्याने व** 11 **महिन्यांचा करारनामा न केल्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे स्पष्ट होते.**

3) **वितरीत केलेल्या गाळयांच्या भाडयाच्या रकमेची मागणीवही व पावतीपुस्तकांचा साठा आढळून आला नाही. त्यामुळे या वसुलीसंदर्भात लेखापरीक्षण करणे शक्य झाले नाही. प्राप्त प्रपत्रावरुन उपरोक्त गाळयांची थकबाकी खालील प्रमाणे असल्याचे निदर्शनास येते.**

1) 1998-99 **ते** 2001-2002 **पर्यंत मासिक भाडे रुपये** 150 **प्रमाणे** 4 **वर्ष म्हणजे** 48 **महिन्याचे एकूण गाळयांपैकी भाडयाने दिलेल्या** 363 **पैकी** 250 **चे येणारे वार्षिक भाडे**

| **वर्ष** | **भाडयाने दिलेल्या मालमत्ता** | **कालावधी (महिने)** | **दर रु.** | **एकूण भाडे रकाना** = 2X3X4 | **वसुली रु.** | **थकबाकी** =5-6 **रु.** |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1998-99 | 250 | 12 | 150 | =450000 | 273988 | 176012 |
| 1999-2000 | 250 | 12 | 150 | =450000 | 274409 | 175591 |
| 2000-2001 | 250 | 12 | 150 | =450000 | 207059 | 242941 |
| 2001-2002 | 250 | 12 | 150 | =450000 | 152675 | 297325 |
| **एकूण** | | | | 1800000 | 908131 | 891869 |

2) **तसेच सर्वसाधारण महासभा ठराव क्रमांक** 11 , **दिनांक** 19.07.2002 **यानुसार कॅम्प क्रमांक** 1,3 **व**5 (**एकूण भाडयाने दिलेल्या मालमत्ता** 224) **साठी रु.**300 **तर कॅम्प क्रमांक** 2(**भाडयाने दिलेल्या मालमत्ता** 26) **साठी किमान मासिक भाडे रु.**500 **प्रस्तावीत करण्यांत आले होते. त्यानुसार असलेली थकबाकी**

| **वर्ष** | **भाडयाच्या मालमत्ता** | **कालावधी** | **दर रु. दरमहा भाडयाचा** | **एकूण भाडे** = 2X3X4 | **वसुली रु.** | **थकबाकी** =5-6 **रु.** |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 2002-03 | 224 | 12 | 300 | 806400 | 22301 | 940099 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | 26 | 12 | 500 | 156000 | | |
| 2003-04 | 224 | 12 | 300 | 806400 | 0 | 962400 |
| | 26 | 12 | 500 | 156000 | | |
| 2004-05 | 224 | 12 | 300 | 806400 | 0 | 962400 |
| | 26 | 12 | 500 | 156000 | | |
| 2006-07 | 224 | 12 | 300 | 806400 | 0 | 962400 |
| | 26 | 12 | 500 | 156000 | | |
| 2007-08 | 224 | 12 | 300 | 806400 | 0 | 962400 |
| | 26 | 12 | 500 | 156000 | | |
| 2008-09 | 224 | 12 | 300 | 806400 | 57917 | 904483 |
| | 26 | 12 | 500 | 156000 | | |
| 2009-10 | 224 | 12 | 300 | 806400 | 79723 | 882677 |
| | 26 | 12 | 500 | 156000 | | |
| 2010-11 | 224 | 12 | 300 | 806400 | 3150 | 959250 |
| | 26 | 12 | 500 | 156000 | | |
| 2011-12 | 224 | 12 | 300 | 806400 | 7500 | 954900 |
| | 26 | 12 | 500 | 156000 | | |
| | **एकूण** | | | 8661600 | 170591 | 8491009 |

**एकूण वसुलपात्र रक्कम** A+B = 891869+8491009 = **रु.**9382878

4) **महानगरपालिका मालकीचे एकूण** 363 **गाळयांपैकी** 113 **गाळे रिक्त ठेवल्यामुळे** 1998 **ते 2002 पर्यंत 113** X150**(दर)**X4**(वर्ष)**=67800 **तसेच** 2003 **ते 2012 या कालावधीचे 113**X300**(दर)**X9**(वर्ष)**=152550 **असे एकूण 67800+152550** =220350 **इतक्या रकमेचे महानगरपालिकेचे नुकसान झाल्याचे निदर्शनास येते**

**उपरोक्त माहिती मिळण्यासंदर्भात अर्धसमास क्रमांक** 189 /17.02.2014 **नुसार संबंधीत विभागास कळविण्यांत आले होते. परंतु याबाबत कोणतेही उत्तर प्राप्त झालेले नाही.**

DVESMBM7301 (Ref No : 51, Hmm No : 189)

## *149 अतिक्रमण विभागातील माहिती अप्राप्त असल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :1302550 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***अतिक्रमण विभागाकडून लेखापरीक्षणास आवश्यक माहिती उपलब्ध करुन देण्यांत आलेले नाही. प्रभाग क्रमांक 1 व 2 च्या नोंदवहया उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत त्या प्रमाणित व साक्षांकित केलेल्या नाहीत.***

**उल्हासनगर महानगरपालिका अतिक्रमण विभागाचे लेखापरीक्षण केले असता आवश्यक नस्ती व माहिती अर्धसमास ज्ञापन क्रमांक**23 **व** 33 **अनुक्रमे दिनांक** 29.10.2013 **व दिनांक** 21.11.2013 **नुसार मागितली असता अप्राप्त असल्यामुळे सदर विभागाचे लेखापरीक्षण करणे शक्य झाले नाही. या विभागास खालील माहिती मागितली असता प्राप्त करुन देण्यात आली नाही.**

1)

| **अ.क्र.** | **दि**.01.04. 2012 **रोजी असलेले अनधिकृत बांधकाम** | 2011-2012 **मधील अनधिकृत बांधकामांची संख्या** | 2011-2012 **या वित्तीय वर्षामध्ये दिलेल्या नोटींसींची संख्या.** | 2011-2012 **या वित्तिय वर्षात निष्कासित केलेल्या अतिक्रमणांची संख्या** | **दि**.31.03. 2012 **अखेर शिल्लक असलेले अनधिकृत बांधकामांची संख्या.** | **शिल्लक अनधिकृत निष्कासन न केल्याची कारणे** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

2) **सन** 2011-2012 **या वित्तीय वर्षात करण्यांत आलेली वसुली त्याबाबतची मार्गदर्शक तत्वे वसुली संदर्भातील निकष व वसुल करण्यांत आलेल्या संख्येच्या गणितीय पध्दतीसह खालील बाबींची माहिती.**

a.**वेदर शेड पासूनची वसुली,रस्ते , पदपथ व सार्वजनिक ठिकाण वापरण्याची परवानगी व विनापरवागी देण्यांत आलेली संख्या व त्यापासून करण्यांत आलेली सर्व प्रकारची वसुली, विनापरवानगी दुकानासमोरील समासी जागेत विक्रीने साहित्य ठेवल्याबाबतची वसुली.**

b. **ब्यॉनर, पोस्टर/होर्डिंग जाहिरात फलक व इतर तत्सम या अंतर्गत जमा केलेली रक्कम.**

c. **निष्काशित केलेल्या झोपडया व इतर अनधिकृत बांधकाम या अनुषंगाने जमा केलेली रक्कम.**

d. **फेरीवाले (दुचाकी, चारचाकी व इतर सर्व), तसेच व्हेईकल टाईंग अंतर्गत केलेली वसुली. या व्यतिरिक्त अतिक्रमण विभागात वसुल करण्यांत आलेली वसुली.**

d.2011-12 **या वित्तिय वर्षामध्ये उल्हासनगरमहानगरपालिकेचे मान्यता प्राप्त पार्किंगबाबत काय धोरण त्याबाबतची निविदा त्या निविदांच्या अटी व शर्ती व त्याबाबतचा अहवाल.**

e.उल्हासनगर महानगरपालिकने पार्किंगच्या निश्चित केलेल्या जागा, जागा वितरीत केलेल्या पध्दती (निविदा व अन्य पध्दतीने निविदा नसल्यास लिलाव न झालेल्या जागांबाबत पालिकेचे धारेण) जागेच्या यादया, जमा रकमेच्या चलनासह तसेच त्यापासून 2011-2012 या वित्तिय वर्षात मिळालेले उत्पन्न याबाबतची माहिती.

3) अनधिकृत बांधकामे निष्कासन बाबतच्या 2011-12 या वित्तिय वर्षाच्या जमा व खर्चाच्या नस्ती लेखा परीक्षणास उपलब्ध करुन देण्यांत आलेल्या नाहीत.

4) अतिक्रमण विभाग 1व 2 या कार्यालयाकडून उपलब्ध झालेले बांधकाम रजिस्टर नोंदवहीची तपासणी केली असता पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.

i) अनधिकृत बांधकामासंदर्भात क्षेत्र निरिक्षकाने पाहणी केल्याचा अहवाल.

ii) अनधिकृत बांधकाम निष्कासित करणे करीता सक्षम अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाच्या स्थळ प्रती, संबंधीत बांधकाम करणा-या व्यक्तिस देण्यांत आलेल्या नोटीसीच्या स्थळप्रती, निष्कासनासाठी महानगरपालिकेस आलेल्या खर्चाचा तपशिल याबाबत व या अनुषंगाने इतर खर्चाचा तपशिल व त्यासंबंधीची तत्सम इतर कागदपत्रे, नोंदवहया व नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यांत आलेल्या नाहीत.

iii) उपलब्ध करुन देण्यांत आलेले अनधिकृत बांधकाम नोद रजिस्टर कोणत्या विभागाचे आहे याचा बोध नाही तसेच उपलब्ध नोंदवहीच्या कोणत्याही पानावर सबंधीत अधिकारी / कर्मचारी यांच्या स्वाक्ष-या आढळून आल्या नाहीत. तसेच या नोंदवहीचे पृष्ठांकन केल्यानंतर 1 ते इतके पृष्ठ आहे या आशयाचे प्रमाणपत्र आढळून आले नाही.

iv) प्रभाग क्रमांक 2 ची कर व पट्टया यांच्या दैनिक नोंदवहीची तपासणी केली असता या नोंदवहीत घेण्यांत आलेल्या नोंदी ज्या पावत्यांवरुन घेण्यात आलेल्या आहेत त्या पावत्यांच्या, स्थळ प्रती लेखा परीक्षणास सादर करण्यांत आलेल्या नाहीत. तसेच सदर नोंदी कशाच्या आधारे घेण्यात आल्या त्या पृष्ठयर्थ कागदपत्रे, वसुलीच्या आधारे दिलेल्या आदेशाच्या नस्ती अर्धसमास ज्ञापन क्रमांक23 व 33 अनुक्रमे दिनांक 29.10.2013 व दिनांक 21.11.2013 नुसार मागितली असता लेखापरीक्षणास सादर करण्यांत आलेल्या नाहीत.

v) सादर करण्यांत आलेल्या नोंदवहीत हातगाडया, भंगार गोणी यांच्या पासूनची वसुली रु.1000/- रोडवरील सामान वसुली रु250/- अशी वसुली दर्शविण्यांत आलेली आहे.सदर वसुली कशाच्या आधारे निश्चित करण्यात आली याबाबतचे दस्ताऐवज वा मार्गदर्शक तत्वे तसेच ही वसुली करण्यांत आलेल्या अधिका-याचे अहवाल याबाबतची माहिती उपलब्ध करुन देण्यांत आलेली नाही त्यामुळे याबाबतचे लेखापरीक्षण करता आले नाही.

उपरोक्त मुदयांबाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक23 व 33 अनुक्रमे दिनांक 29.10.2013 व दिनांक 21.11.2013 रोजी निर्गमित करण्यात आलेले आहे. परंतु त्याबाबत कोणतेही अभिप्राय

**लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत.**

DVESMBM7301 (Ref No : 52, Hmm No : 33)

### *150 प्रभाग समिती -1 च्या लेखापरीक्षणातील त्रुटीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 500.00/-

***प्रभाग समिती-1 या विभागाचे पावतीपुस्तकांची साठा उपलब्ध करुन देण्यांत आलेली नसून पावतीची रक्कम रोखवहीत कमी भरणा केल्याचे दिसून येते.***

**प्रभाग समिती कार्यालय**-1 **या विभागाचे लेखापरीक्षण केले असता पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे**.

1) **प्रभाग समिती** -1 **या कार्यालयाकडून महानगरपालिकेकरीता** 2011-2012 **या वित्तिय वर्षाचा महसुल जमा करतांना पावती क्रमांक**074013 **ते** 74100, 82001 **ते** 82100 **व** 108101 **ते** 108123 **ही पावती पुस्तके वापरण्यांत आलेली आहे**. **सदर पावती पुस्तके क्रमावर वापरण्यांत आलेली आढळून आली नाही**. **तसेच या विभागासाठी महानगरपालिकेकडून किती पुस्तके प्राप्त झाली अथवा महानगरपालिका परवानगीने किती पुस्तके छापुन आणली याबाबतची साठा नोंदवही लेखापरीक्षणास आढळून आली नाही**. **त्यामुळे नेमकी किती पावतीपुस्तके वापरुन महसुल गोळा करण्यांत आला याचे लेखापरीक्षण करणे शक्य झाले नाही**. **पावती क्रमांक** 082049, **दिनांक** 27.07.2011 **या पावतीवर वसुल रक्कम रु**.750 **इतकी आहे**, **परंतू रोखवहीत या पावतीची नोंद रुपये** 250 **दर्शविण्यांत आलेली आहे**.**प्रत्यक्षात जमा रक्कमे पेक्षा रुपये** 500 **कमी जमा केल्याचे निदर्शनास येते**. **तसेच पावती क्रमांक** 087136 **दि**.13.10.2011 **रुपये** 250 **अशी असून या पावतीच्या अक्षरी व अंकी रकमेत खाडाखोड केलेली आढळून येते तसेच या पावतीवर संबंधीत जमाकर्त्या कर्मचारी व अधिकारी यांची स्वाक्षरी नसल्यामुळे या रकमेबाबत संदिग्धता आहे**.

2) **विवाह नोंदणी प्रमाणपत्रासाठी रु**.50,150 **व** 250 (**पावती क्रमांक** 082083, 082084 **रुपये** 50, **पावती क्रमांक** 82089 **व** 82090 **रक्कम रुपये** 150 , **पावती क्रमांक** 082087 **व** 082088 **रक्कम रुपये** 250)**अशी वसुली करण्यात आलेली आढळून येते**. **सदर वेगवेगळी रक्कम वसुली पृष्ठयर्थ महानगरपालिका ठराव**, **शासन निर्णय**

**वा परिपत्रक लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यांत आलेले नसल्यामुळे याप्रकरणी योग्य वसुली करण्यांत आल्याची सत्यता पडताळणी करता आली नाही**.

3) **पावती क्रमांक** 082080 **दिनांक** 29.07.2011 **रक्कम रु**.1000, **पावती क्रमांक** 082062 **दिनांक** 29.07.2011 **रक्कम रुपये** 250 ,**पावती क्रमांक** 082013 **दिनांक** 28.06.2011 **रुपये** 5000 **अशा पावत्या आढळून येतात**. **प्रत्यक्षात कशाची वसुली करण्यांत आली त्याचे निकष**, **मार्गदर्शक तत्वे**,**महासभा ठराव**, **शासन निर्णय वा इतर अनुषंगिक दस्ताऐवज लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यांत आलेले नाही त्यामुळे या महसुलांर्गत जमा झालेल्या रकमेची अचूकता पडताळता आली नाही**.

4) **या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या रोखवहीची पृष्ठे प्रमाणित केलेली आढळून आली नाही**.**विवाह नोंदणी प्रमाणपत्र**, **माहिती अधिकार**, **हातगाडी दंडवसुली या वसुली व्यतिरिक्त कोणतेही अधिकृत दस्ताऐवज लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यांत आलेले नाही**.

**उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अर्धसमास क्रमांक** 113, **दिनाक** 23.01.2014 **अन्वये अर्धसमास निर्गमित करण्यांत आलेले होते**. **परंतू याबाबत कोणतेही अनुपालन प्राप्त न झाल्यामुळे सदर आक्षेप कायम करण्यात येत आहे**.

DVESMBM7301 (Ref No : 54, Hmm No : 113)

## *151 प्रभाग समिती -2 च्या लेखापरीक्षणातील त्रुटीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : ९ड*

| |
|---|
| ***पावतीपुस्तक साठा नोंदवही लेखापरीक्षणास आढळून आली नाही. तसेच विवाह नोंदणी व वृक्षतोड वसुली संदर्भात महानगरपालिका ठराव, शासन निर्णय वा परिपत्रक लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यांत आलेले नसल्यामुळे याप्रकरणी योग्य वसुली करण्यांत आल्याची खातरजमा पडताळणी करता आली नाही.*** |

**प्रभाग समिती कार्यालय**-2 **या विभागाचे लेखापरीक्षण केले असता पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे**.

1)**प्रभाग समिती** -2 **या कार्यालयाकडून महानगरपालिकेकरीता** 2011-2012 **या वित्तिय वर्षाचा महसुल जमा करतांना पावती क्रमांक** 062401 **ते** 62500, 62501 **ते** 62600 **व** 145401 **ते** 145500 **ही पावती पुस्तके वापरण्यांत आलेली आहे**. **सदर पावती पुस्तके क्रमवार वापरण्यांत आलेली आढळून आली नाही**. **तसेच या विभागासाठी महानगरपालिकेकडून किती पुस्तके प्राप्त झाली अथवा महानगरपालिका परवानगीने किती पुस्तके छापुन आणली याबाबतची साठा नोंदवही लेखापरीक्षणास आढळून आली नाही**. **त्यामुळे नेमकी किती पावतीपुस्तके वापरुन महसुल गोळा करण्यांत आला याचे लेखापरीक्षण करणे शक्य झाले नाही**.

2)**विवाह नोंदणी प्रमाणपत्रासाठी रु**.50,150 **व** 250 **अशी वसुली करण्यात आलेली आढळून येते**. **सदर वेगवेगळी रक्कम वसुली पृष्ठयर्थ महानगरपालिका ठराव**, **शासन निर्णय वा परिपत्रक लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यांत आलेले नसल्यामुळे याप्रकरणी योग्य वसुली करण्यांत आल्याची खातरजमा करता आली नाही**.

3)**वृक्षतोड वसुलीसाठी रु**.1000 **अशी वसुली करण्यात आलेली आढळून येते**. (**पावती क्रमांक** 080940, **दि**.02.07.2011, **पावती क्रमांक** 089402, **दि**.02.07.2011) **सदर वसुलीबाबत वसुली अधिकारी यांचा सविस्तर अहवाल**,**वृक्षतोडीबाबतचा ठराव**, **त्याचे निकष**, **त्याअनुषंगाने असलेल्या विविध परवानग्या**, **व इतर अनुषंगिक दस्ताऐवज प्राप्त संचिकेसह आढळून न आल्यामुळे प्रकरणी वसुलीबाबतचे लेखापरीक्षण करणे शक्य झाले नाही**.

4)**रोखवहीतील पृष्ठे प्रमाणित केलेली आढळून आली नाही**.

**उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अर्धसमास क्रमांक** 114, **दिनाक** 23.01.2014 **अन्वये अर्धसमास निर्गमित करण्यांत आलेले होते. परंतू याबाबत कोणतेही अनुपालन प्राप्त न झाल्यामुळे सदर आक्षेप कायम करण्यात येत आहे.**

DVESMBM7301 (Ref No : 55, Hmm No : 114)

## *152 नगरसचिव विभागातील खर्चाच्या लेखापरीक्षणात आढळलेल्या उणींवाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :7322219 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 39233.00/-

***दरपत्रासाठी पुरशी स्पर्धा न होणे तसेच दरपत्रामध्ये नमूद नगापेक्षा जास्त खरेदी करणे यासारख्या अनियमितता या खरेदीत आढळून येतात.***

**उल्हासनगर महानगरपालीकेच्या नगरसचिव विभागातील खर्चाच्या उपलब्ध संचिकेच्या निवडक खर्चाचे लेखापरीक्षण करण्यात आलेले आहे. ते खालील प्रमाणे**

1) D.V No.5505/12.05.2011

| **प्रमाणक क्रमांक व दिनांक** | **स्थुल रक्कम रु.** | **वजाती रु.** | **निव्वळ रक्कम रु.** |
|---|---|---|---|
| **निरंक** / 01.10.2011 | 47273 | 945 | 46328 |
| **निरंक** / 09.01.2012 | 45133 | 903 | 44230 |
| **एकूण** | 92406 | 1848 | 90558 |

**उपरोक्त देयकाबाबत पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.**

i) **या देयकात मास्टर रोल व सीपआय इंक खरेदी करण्यांत आलेले आहे.या मध्ये मे.बी.वाय.इंटरप्रायजेस, मे.हरी ओम इंटरप्रायजेस व यश ट्रेडिंग यांच्या कोटेशन प्राप्तीवरुन किमान दर धारक मे.यश ट्रेडिंग यांना खरेदीसाठी पाचारण करण्यांत आलेले प्राप्त नस्तीवरुन आढळून येते. हे कोटेशन काढतांना केवळ नोटीस बोर्ड वर जाहिरात देण्यांत आल्याचे नमूद आहे. उपरोक्त खरेदीसाठी स्पर्धा होण्यासाठी व्यापक प्रसिध्दी झाल्याचे निदर्शनास येत नाही. तसेच कोटेशन प्राप्त होण्याचा कालावधी** 3 **दिवसाचा नमूद करण्यांत आला होता. परंतू उपरोक्त तिनही पुरवठादारांच्या निविदा विहीत वेळेत लखोटयावर प्राप्त दिनांक अथवा कोणतेही दस्ताऐवज प्राप्त संचिकेसह आढळून आली नाही.**

ii) **वरील खरेदीची प्रशासकिय मंजुरी ,मास्टर रोल या खरेदीचे पुरवठा आदेश प्राप्त संचिकेत आढळून आली नाही.**

iii) **मास्टर रोल खरेदी संदर्भात कोटेशन नोटीसमध्से** 5 **रोलची आवश्यक खरेदी नमूद आहे, परंतू खरेदी करतांना** 5 **बॉक्स (प्रती** 2 **रोल) ची खरेदी करण्यात आलेली आहे. म्हणजे** 5 **रोलची आवश्यकता नसतांना** 9454.54 **(प्रती दोन रोल) प्रमाणे रुपये** 23636/-**ची अनावश्यक खरेदी झाल्याचे दिसून येते. त्यामुळे रु.**23636/- **खर्च आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.**

iv)**कॉपी प्रिंटर इंक सीपीआ**-7 **चे** 8 **बॉकस पुरवठा करणेबाबतचे पुरवठा आदेश क्रमांक उमपा / स.का.**933**अ** / 2011, **दिनांक** 16.12.2011 **मध्ये पुरवठा करण्याचा दिनांक व उशिरा प्राप्तीबाबत दंडची तरतूद नाही.**

2) D.V No.1001/02.06..2011

| प्रमाणक क्रमांक व दिनांक | स्थुल रक्कम | वजाती | निव्वळ रक्कम |
|---|---|---|---|
| निरंक / 11.05.2011 | 49364 | 987 | 48377 |
| निरंक / 11.05.2011 | 49503 | 991 | 48512 |
| एकूण | 98867 | 1978 | 96889 |

**उपरोक्त देयकाबाबत पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.**

i) **या देयकात मास्टर रोल व सीपआय इंक खरेदी करण्यांत आलेले आहे.या मध्ये मे.बी.वाय.इंटरप्रायजेस, मे.हरी ओम इंटरप्रायजेस व यश ट्रेडिंग यांच्या कोटेशन प्रतीवरुन किमान दर धारक मे.यश ट्रेडिंग यांना खरेदीसाठी पाचारण करण्यांत आल्याचे प्राप्त नस्तीवरुन आढळून येते. हे कोटेशन काढतांना केवळ नोटीस बोर्ड वर जाहिरात देण्यांत आल्याचे नमूद आहे. उपरोक्त खरेदीसाठी स्पर्धा होण्यासाठी व्यापक प्रसिध्दी झाल्याचे निदर्शनास येत नाही. याबाबत साधार स्पष्टता व्हावी. तसेच कोटेशन प्राप्त होण्याचा कालावधी** 3 **दिवसाचा नमूद करण्यांत आला होता. परंतू उपरोक्त तीनही पुरवठादारांचे कोटेशन दि.**28.04.2011 **रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. विहीत मुदतीत पुरवठादारांनी कोटेशन सादर न केल्याने प्रक्रिया पुन्हा राबविणे इष्ट असताना उशिरा आलेल्या पुरवठादारामधून किमान दर स्विकारण्यांत आल्याचे दिसून येते.**

ii) **उपरोक्त खरेदीची प्रशासकिय मंजुरी प्राप्त संचिकेत आढळून आली नाही.**

iii) **मास्टर रोल खरेदी संदर्भात कोटेशन नोटीसमध्से** 6 **रोलची आवश्यक खरेदी नमूद आहे**, **परंतू खरेदी करतांना** 6 **बॉक्स** (**प्रती** 2 **रोल**) **ची खरेदी करण्यात आलेली आहे. म्हणजे** 6 **रोलची आवश्यकता नसतांना** 5199 (**प्रती दोन रोल**) **प्रमाणे रुपये** 15597/-**ची अनावश्यक खरेदी झाली. त्यामुळे रक्कम रुपये** 15597/- **खर्च आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.**

iv) **मास्टर रोल सीपीएमटी**-9 **चे सहा रोल व सीप इंक सीपीआय** -2 **चे** 17 **कॉर्टेजचे पुरवठा करणेबाबतचे पुरवठा आदेश क्रमांक उमपा / स.का.**18 **अ** / 2011, **दिनांक** 25.04.2011 **मध्ये पुरवठा करण्याचा दिनांक व उशिरा प्राप्तीबाबत दंडाची तरतूद नाही.**

v) **सीपीआय इंक** -7 **या मालाचे डि व्ही. क्रमांक** 1101, **प्रमाणक क्रमांक निरंक दिनांक** 11.05.2011 **नुसार** 27 **कॉर्टेज** (1128X27=30456) **व डि व्ही. क्रमांक** 5505, **प्रमाणक क्रमांक निरंक दिनांक** 09.01.2012 **नुसार** 08 **बॉक्स** (**प्रती बॉक्स** 5 **कॉर्टेज किंमत प्रती बॉकस** (5641.66X8=45133) **असे एकूण** 30456+45133=75589 **किंमतीचे कॉर्टेज एकाच वित्तीय वर्षात खरेदी केल्याचे दिसून येते. सदर खरेदी रु.**50,000 **च्या वर असल्याने निविदा मागवून खरेदी करणे आवश्यक असताना नोटीसीव्दारे कोटेशन बोलवून खरेदी केल्याचे दिसून येते.**

**एकूण आक्षेपाधिन रक्कम रक्कम रुपये** 23636+15597=**रु.**39233

**उपरोक्तबाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक** 150 **दिनांक**10.02.2014 **रोजी निर्गमित करण्यात आलेले आहे. परंतु त्याबाबत कोणतेही अभिप्राय लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत.**

DVESMBM7301 (Ref No : 56, Hmm No : 150)

### *153 जनसंपर्क विभागातील खर्चाच्या अनुषंगाने आढळलेल्या उणींवाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :3322281 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1628768.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 172439.00/-

| |
|---|
| ***जनसंपर्क विभागाने जाहिराती देतांना शासकिय दराने दिलेल्या आहेत. मात्र सदर रकमेची अदायगी ही व्यवसायीक दराने दिल्याचे लेखापरीक्षणांती निदर्शनास येते.*** |

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या जनसंपर्क विभागाने केलेल्या जाहिरातीवरील खर्चाच्या देयकाचे लेखापरीक्षण केले असता पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.**

1) **शा.नि.पीयुबी/प्र.क्र.**73/2000/34,**दिनांक** 01.05.2001 **मधील क्रमांक** 6 **नुसार शासनमान्य दराचा अंगीकार करुन शासनमान्य धोरणाप्रमाणे त्या त्या वर्गातील वृत्तपत्रांमध्ये करावयाच्या समान तत्वावरील वाटपाच्या धोरणाचा कटाक्षाने अंमलबजावणीची प्रक्रिया व नियमावली मा.महासंचालक, माहिती व जनसंपर्क यांच्याकडून निश्चित करुन घेण्याचे निर्देश असतांना या अटीचे पालन झालेले आढळून येत नाही.**

2)**उपरोक्त निर्णयानुसार मा.महासंचालक,माहिती व जनसंपर्क यांच्याकडून वाटपाच्या धोरणाच्या मंजुरी अभावी वृत्तपत्रात जाहिरात देतांना काय निकष लावण्यांत आलेले आहेत त्याबाबतची संबंधीत विभागाकडून साधार स्पष्टता न झाल्यामुळे वृत्तपत्रनिवडीसाठी समान वाटप व वृत्तपत्र निवडीबाबत साशंकता वाटते.**

3)**निवडक वृत्तपत्रांच्या जाहिरातींची देयके तपासली असता पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येते आहे.**

I.**देयकासह जोडण्यांत आलेल्या प्रमाणपत्रावर** PAID AND CANCELLED **करुन सदर देयक रद्द करण्यांत आलेले नाही. त्यामुळे सदर देयक दुबार वापरुन अनेकदा प्रदान करण्याची**

**शक्यता नाकारता येत नाही.**

II.**संबंधीत देयकांच्या चलनावर जाहिरातीचा मजकूर व आकार योग्य असल्याची तपासणी करुन खातरजमा करण्यांत आलेली आहे अशा आशयाचे प्रमाणपत्र आढळून आले नाही म्हणजे खातरजमा न करताच प्रदान केले आहे असे दिसते.**

4) **डि व्ही.क्रमांक** 492 , **दिनांक** 03.05.011 **या देयकासंदर्भात----**

| **प्रमाणक क्रमांक** | **स्थुल रक्कम रु.** | **वजाती रु.** | **निव्वळ रक्कम रु.** | **वर्तमान पत्राचे नाव** | **आकार व दर** |
|---|---|---|---|---|---|
| 348/15.03.11 | 149760 | 1498 | 148262 | **दै.डि.एन.ऐ.** | 08x09x2080 |
| 368/21.03.11 | 12400 | 124 | 12276 | **दै.नवभारत** | 16x25x31 |
| 369/21.03.11 | 680000 | 6800 | 673200 | **दै.लोकसत्ता** | 16x25x1700 |
| 370/21.03.11 | 832000 | 8320 | 823680 | **दै.डी.ऐन.ऐ.** | 16x25x2080 |
| **एकूण्** | 1674160 | 16742 | 1657418 | | |

i) **शालिनी पब्लिसीटी ॲड क्रियेटीव्ह प्रायव्हेट लि.यांना सदर जाहिरातीसाठी प्राधीकृत करण्यांत आलेले होते.या संस्थेची निवड कशी करण्यांत आली याबाबत करण्यांत आलेला खुलासा नियमाधिन नसल्याचे दिसून येते. तसेच सदर संस्थेस शासकिय दराने जाहिरात प्रसिध्दीसाठी कळविण्यांत आलेले होते परंतू शासकीय दराचे अवलोकन न करता अदा करण्यांत आलेले दर जास्त दिसून येतात.सबब खालील प्रमाणे अदा केलेली रक्कम आक्षेपाधीन असल्याचे लेखापरीक्षणांती निदर्शनास येते. तसेच या जाहिरात संस्थेकडून एकूण रकमेवर सेवा कर आकारण्यांत आलेला नसल्यामुळे** 1674160x10.30=**रु.**172438 **वसुल करण्यांचे प्रस्तावीत करण्यांत येत आहे.**

**शासकिय दरापेक्षा जास्त दराने अदा केलेली रक्कम खालील प्रमाणे....**

| **प्रमाणक क्रमांक** | **आकार व वसुल करण्यांत आलेला दर** | **एकूण रक्कम** | **शासनाचा दर** | **एकूण रक्कम** | **तफावत** |
|---|---|---|---|---|---|
| 348/ 15.03.11 | 8x9x2080 | 149760 | 36 | 2592 | 147168 |
| 368/ 21.03.11 | 16x25x31 | 12400 | 31 | 12400 | 0 |
| 369/ 21.03.11 | 16x25x1700 | 680000 | 40 | 16000 | 664000 |
| 370/ 21.03.11 | 16x25x2080 | 832000 | 36 | 14400 | 817600 |
| **एकूण** | | 1674160 | | 45392 | 1628768 |

**एकूण आक्षेपाधीन रक्कम रु**1628768/- **एकूण वसुलपात्र रक्कम रु.**172438/-

**उपरोक्त मुदयांबाबत जनसंपर्क विभागास अर्धसमास पत्र क्रमांक** 77, **दिनांक** 16.01.2014 **निर्गमित**

**करण्यांत आले होते.संबंधीत विभागाचे पत्र क्रमांक जा.क्र.उपमपा / पिआरओ** / 303 / 2014, **दि.**18.01.2014 **नुसार खुलासा करण्यांत आलेली आहे. उपस्थित मुदयांशी सुसंगत असा नसल्यामुळे सदर खुलासा अमान्य करण्यांत येवून वरील आक्षेप कायम करण्यांत येत आहे**

DVESMBM7301 (Ref No : 57, Hmm No : 77)

## *154 संगणक खरेदीमधील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 133819.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 133819.00/-

***केंद्र तसेच राज्य् शासनाचे दरकरार उपलब्ध् असताना उल्हासनगर महानगरपालिका अधिनस्त् नागरी सुविधा केंद्रामार्फत एकुण तीन संगणक, तीन प्रिंटर्स व तीन युपीएस स्थानिक दरपत्रके मागवुन खरेदी करण्यात आलेले आहेत.***

उल्हासनगर महानगरपालिका अधिनस्त् नागरी सुविधा केंदामार्फत खालील कार्यादेशानुसार प्रत्येकी एक संगणक, एक प्रिंटर व एक युपीएस अशा प्रमाणे एकूण तीन संगणक, तीन प्रिंटर व तीन युपीएस स्थानिकरित्या दरपत्रके मागवुन खरेदी करण्यात आलेले आहेत.

1) कार्यादेश क्रमांक : उमपा/नासुकें/47, दिनांक 25.5.2013
2) कार्यादेश क्रमांक : उमपा/नासुकें/59, दिनांक 27.5.2013
3) कार्यादेश क्रमांक : उमपा/नासुकें/60, दिनांक 27.5.2013

संगणक खरेदीबाबतच्या प्रदानाचा तपशिल खालील प्रमाणे आहे-

| संस्थेचे नांव | प्रमाणक क्रमांक / दिनांक | धनादेश क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| मे. जयेश कॉम्प्युटर सर्विस. | 2930 / 21.9.2011 | 847616 | 1,33,819/- |

संगणक प्रिटर खरेदीबाबत राज्य् शासन माहिती व तंत्रज्ञान विभागाचे दरकरारपत्र क्रमांक : DIT/File-10/4076, दिनांक 24.1.2011 (वैधता दिनांक 30.06.2011 पर्यंत) तसेच केंद शासनाचे दरकरारपत्र क्रमांक : Computer/IT-1/RC-71090000/ 0511/81/01257/3429, दिनांक 19.10.2010 (वैधता दिनांक 31.10.2011 पर्यंत) उपलब्ध् असताना स्थानिक खरेदी करण्यात आलेले आहेत.

उपरोक्तबाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक : 37, दिनांक 21.11.2013 रोजी निर्गमित करण्यात आले असुन नागरी सुविधा केंद्रामार्फत जा.क्र./उमपा/नासुकें/334, दिनांक 26.11.2013 अन्वये अनुपालन सादर करण्यात आले आहे. सदर अनुपालन अमान्य् करण्यात येत असुन झालेला खर्च रुपये 133819 आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

( रुपये 133819 आक्षेपाधीन )

DMASGDM7201 (Ref No : 63, Hmm No : 37)

## *155 जेएनएनयुआरएम ई-गवर्नस प्रकल्पाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*केंद्र शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 456594.00/-

***उल्हासनगर महानगरपालिकेच्या ई- गवर्नस प्रकल्पाकरीता अतिरिक्त् साधनसामग्री खरेदी करण्यात आली असुन त्याबाबत सक्षम प्राधिका-याची मंजुरी घेतलेली नाही.***

उल्हासनगर महानगरपालिकेला जेएनएनयुआरएम अंतर्गत ई-गवर्नस प्रकल्पाकरीता नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : एनयुआर-2010/प्र.क्र.285/10/नवि533, दिनांक 31.3.2011 अन्वये निधी मंजुर करण्यात आलेला आहे.

1) प्रकल्प् किंमत - रुपये 5,62,19,000/-

2) केंद्र शासनाचा हिस्सा - रुपये 1,96,77,000/-

3) राज्य् शासनाचा वितरीत करावयाचा निधी - रुपये 21,08,000/-

1) उल्हासनगर महानगरपालिकेने त्यांचे कार्यादेश क्रमांक : युएमसी/आयटिडी/276/10, दिनांक 23.12.2010 अन्वये मे. मास्टेक लि. यांची ई-गवर्नस प्रकल्पाकरीता System Integrator म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. कार्यादेशातील Annexure-A व जेएनएनयुआरएम साठा नोंदवहीची पडताळणी केली असता मंजुरीपेक्षा जास्त् साधनसामग्री खरेदी करण्यात आलेली आहे. याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | नांव | परिमाण | दर प्रति (रुपये) | रक्कम (रुपये) | व्हॅट (रुपये) | एकूण (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | OF Cable 6F | 650 | 100/- | 65000/- | 3250/- | 68250/- |
| 2 | Adaptor SC MM | 58 | 1516/- | 87928/- | 3517/- | 91445/- |
| 3 | Connector MM SC | 58 | 1516/- | 87928/- | 3517/- | 91445/- |
| 4 | LIU 06 Port | 10 | 4035/- | 40350/- | 1614/- | 41964/- |
| 5 | 1x6 SC Adaptor | 18 | 1764/- | 31752/- | 1270/- | 33022/- |
| 6 | Patch Cord LC-SC | 20 | 2018/- | 40360/- | 1614/- | 41974/- |
| 7 | Patch Panel Cat 6 UTP | 6 | 6180/- | 37080/- | 1483/- | 38563/- |
| 8 | Information Outlet Cat 6 | 50 | 226/- | 11300/- | 452/- | 11752/- |
| 9 | Surface Mount Box | 50 | 22/- | 1100/- | 44/- | 1144/- |
| 10 | Floor Rack 45 U | 1 | 35611/- | 35611/- | 1424/- | 37035/- |
| | एकूण | | | 438409/- | 18185/- | 456594/- |

2) उपरोक्त् अतिरिक्त साधनसामग्री खरेदीबाबत उल्हासनगर महानगरपालिकेने सक्षम प्राधिका-याची मंजुरी घेतलेली नाही. त्यामुळे अतिरिक्त साधनसामग्रीकरीता झालेला खर्च रुपये 4,56,594/- (रुपये चार लाख छपन्न् हजार पाचशे चौ-याण्णव फक्त्) आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

(आक्षेपाधीन खर्च रुपये 4,56,594/-)

जेएनएनयुआरएम साठा नोंदवहीची पडताळणी केली असता खालीलप्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या आहेत.

1) <u>संगणक</u> - दिनांक 1.7.2011 रोजी 100 संगणक प्राप्त् झाले. दिनांक 27.2.2013 पर्यंत एकूण 50 संगणकांचे वाटप करण्यात आले असुन दिनांक 27.2.2013 नंतर (19 महिन्यांनंतर) उर्वरित 50 संगणकांचे वाटप करण्यात आलेले आहेत.

2) <u>टिएफटि मानेटर</u> - दिनांक 21.7.2011 रोजी 10 टिएफटि मानेटर प्राप्त् झाले असुन 9.8.2013 पासुन 2 मानेटरचे (2 वर्षानंतर) वाटप करण्यात आलेले आहेत. अदयाप 8 मॉनेटर शिल्ल्क असल्याचे निर्दशनास आले आहे.

3) <u>एचपी डेस्क्जेट प्रिंटर्स</u> - दिनांक 21.7.2011 रोजी 15 प्रिंटर्स प्राप्त् झाले असुन वाटप झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे.

4) <u>इपसन डॉटमॅटीक्स प्रिंटर्स</u> - दिनांक 21.7.2011 रोजी 10 प्रिंटर्स प्राप्त् झाले असुन वाटप झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे.

5) <u>स्कॅनर</u> - दिनांक 21.7.2011 रोजी 10 स्कॅनर प्राप्त् झाले असुन दिनांक 27.8.2013 पासुन लेखापरीक्षणाच्या दिनांकापर्यंत 4 स्कॅनरचे वाटप झालेले आहे. तसेच अदयाप 4 स्कॅनर शिल्ल्क आहेत.

6) <u>व्हिजीए स्लीटर</u> - दिनांक 21.7.2011 रोजी 10 व्हिजीए स्लीटर प्राप्त् झाले असुन वाटप झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे.

7) <u>युपीएस 600 व्हिए</u> - दिनांक 21.7.2011 रोजी 120 युपीएस प्राप्त् झाले असुन दिनांक 22.10.2013

पर्यंत 35 युपीएसचे वाटप करण्यात आलेले आहे व अदयाप 85 युपीएस शिल्लक आहेत.

8) <u>एचपी लेजरजेट प्रिंटर</u> - दिनांक 21.7.2011 रोजी 60 प्रिंटर प्राप्त् झाले असुन दिनांक 27.1.2013 पर्यंत 35 युपीएसचे वाटप करण्यात आलेले आहे व अदयाप 25 प्रिंटर्स शिल्लक आहेत.

9) <u>पॅचकॉड कॅट 6</u> - दिनांक 19.7.2011 रोजी 197 पॅचकॉड प्राप्त् झाले असुन वाटप झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेने ई-गवर्नस करीता तयार केलेला डिपीआर नुसार जेएनएनयुआरएम अंतर्गत ई-गवर्नस प्रकल्पाकरीता प्राप्त् झालेल्या साधनसामग्रीचे वितरण पुर्ण झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे. वितरण न झालेली साधनसामग्री वापराअभावी पडून राहील्यामुळे सदर साधनसामग्रीकरीता खर्च करण्यात आलेली रक्कम (सोबत जोडलेल्या परिशिष्ट : 3) गुंतुन पडलेली आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेने जेएनएनयुआरएम अंतर्गत राबविण्यात येणारा ई-गवर्नस प्रकल्पास सीएफसी विभाग वगळता इतर कोणत्याही विभागामार्फत प्रतिसाद देण्यात येत नसल्याचे निर्दशनास आले आहे.

उपरोक्त् बाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक : 60, दिनांक 19.12.2013 रोजी निर्गमित करण्यात आले असुन लेखापरीक्षण पथकास अनुपालन सादर करण्यात आलेले नाही.

DMASGDM7201 (Ref No : 66, Hmm No : 60)

## *156 उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दितील अनाधिकृत बांधकामांबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : ९ड*

***उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दितील अनाधिकृत बांधकामांबाबत कोणत्याही प्रकारची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.***

कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत शहरातील इमारती व जमिनीवर मालमत्ता कराची आकारणी करण्यात येते. महाराष्ट् शासनाने सन 2008 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक - 2 दिनांक 4.1.2008 रोजीचे राजपत्रात प्रसिध्द केला आहे. या अधिनियमामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मध्ये कलम 267 अ समाविष्ट केले आहे. या कलमात अवैध बांधकामांना शास्तीच्या रकमेची आकारणी करणेबाबत तरतुद करण्यात आलेली आहे. सदरचा अधिनियम हा दिनांक 4.1.2008

पासुन अंमलात आला असल्याने त्या तारखेनंतर जे अवैध बांधकाम व पुनर्बांधकाम केले जाईल त्याच्या बाबतीत सदर शास्तीची तरतुद लागू होईल असे कळविलेले आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दितील अनाधिकृत बांधकामांबाबतची तपशिलवार माहिती, संचिका लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्याची मागणी अर्धसमास ज्ञापन क्रमांक : 62, दिनांक 21.12.2013 अन्वये केली असता कर विभागाने त्यांचेकडील दिनांक 7.2.2014 च्या पत्रान्वये शहरात ज्या इमारतींचे किंवा इमारतीच्या भागाचे अवैधरित्या बांधकाम करण्यात आलेले आहे किंवा पुनर्बांधकाम करण्यात आलेले आहे अशा मालमत्तांची अनाधिकृत बांधकाम नियंत्रण विभागामार्फत् प्राप्त माहितीच्या आधारे सदर मिळकतीवर अधिनियमातील तरतुदीनुसार शास्ती लागू करण्यासंबंधी कार्यवाही सुरु असल्याचे कळविले आहे. तथापि अवैध बांधकामांची तपशिलवार माहिती, संचिका उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे सन 2011-2012 मधील महानगरपालिकेच्या हद्दितील किती बांधकामे अवैध आहेत व सदर बांधकामांवर कराच्या शास्तीची आकारणी केली आहे, याबाबत लेखापरीक्षण करता आले नाही.

शहरामध्ये 2011-2012 अखेर एकूण 123865 निवासी व 35718 अनिवासी तसेच 274 संकिर्ण बांधकामे असल्याचे त्यांचेकडील अनुपालनातील मुद्दा क्रमांक - 3 मध्ये नमुद करण्यात आलेले आहे. त्यापैकी अवैध असलेल्या बांधकामावर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मध्ये कलम 267 अ प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त् बाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक : 162, दिनांक 12.02.2014 रोजी निर्गमित करण्यात आले असुन लेखापरीक्षण पथकास अनुपालन सादर करण्यात आलेले नाही.

DMASGDM7201 (Ref No : 67, Hmm No : 162)

## *157 मालमत्ता कराच्या थकीत रकमेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***2011-2012 अखेर उल्हासनगर महानगरपालिकेची थकीत कराची रक्कम रुपये 158,61,46,032/- आहे. तसेच अर्थसंकल्पीय पुस्तिकेमधील 2011-2012 मध्ये प्रत्यक्ष वसुल करण्यात आलेल्या कराची रक्कम व कर विभागाने लेखापरीक्षण पथकास सादर केलेल्या माहितीत प्रत्यक्ष वसुल करण्यात आलेल्या कराच्या रक्कमेशी जुळत नसल्याचे निदर्शनास आले आहे.***

उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीत राहणा-या नागरीकांकडून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 127 नुसार वेगवेगळे कर वसुल केले जातात. अधिनियमातील कलम 128 मध्ये नमुद केल्यानुसार विहित पध्दतीने कराचे देयके संबंधीतांना पाठवुन वसुली केली जाते.

कर विभागाने सन 2010-2011, 2011-2012 व 2012-2013 या तीन वर्षाच्या कालावधीत मागणी केलेल्या व वसुल केलेल्या कराच्या रकमेचा तपशिल लेखापरीक्षणास सादर केला असुन सदर तपशिलपावरुन महानगरपालिकेने केलेल्या कराची मागणी व वसुली तक्त्यानुसार 2011-2012 अखेर मागील थकबाकी रुपये 106,68,95,471/- व चालु मागणीपैकी रुपये 51,92,50,561/- असुन एकूण रक्कम रुपये 158,61,46,032/- थकीत असल्याचे दिसुन येते. कर विभागाने 2010-2011, 2011-2012 व 2012-2013 या तीन वर्षाच्या कालावधीत मागणी केलेल्या व वसुल केलेल्या रकमेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | मागणीचा प्रकार | मागणी (रुपये) | वसुली (रुपये) | थकबाकी (रुपये) |
|---|---|---|---|---|
| 2010-2011 | थकबाकी | 1230221461 | 295484181 | 934737280 |
| | चालु मागणी | 591702104 | 240519062 | 351183042 |
| | एकूण | 1821923565 | 536003243 | 1285920322 |
| 2011-2012 | थकबाकी | 1313027952 | 246132481 | 1066895471 |
| | चालु मागणी | 797005557 | 277754996 | 519250561 |
| | एकूण | 2110033509 | 523887477 | 1586146032 |
| 2012-2013 | थकबाकी | 1582664963 | 199798463 | 1382866500 |
| | चालु मागणी | 955641441 | 309386562 | 646254879 |
| | एकूण | 2538306404 | 509185025 | 2029121375 |

उपरोक्त् तक्त्यावरुन असे दिसुन येते की, 2010-2011 ची थकीत रक्कम रुपये 128,59,20,322/- असताना 2011-2012 च्या सुरुवातीची शिल्ल्क रुपये 131,30,27,952/- घेण्यात आलेली असुन रुपये 2,71,07,630/- ची तफावत आहे. त्याचप्रमाणे सन 2011-2012 ची थकीत रक्क्म रुपये 158,61,46,032/- असताना 2012-2013 च्या सुरुवातीस रुपये 158,26,64,963/- घेण्यात आलेली असुन रुपये 34,81,069/- ने कमी घेण्यात आलेले आहे. तसेच अर्थसंकल्पीय पुस्तिकेमध्ये 2011-2012 मध्ये प्रत्यक्ष वसुल केलेल्या कराची रक्क्म व कर विभागाने लेखापरीक्षणास सादर केलेल्या कर वसुलीच्या रकमेमध्ये तफावत असल्याचे निर्दशनास आले आहे.

सदर तफावतीबाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक : 62, दिनांक 21.12.2013 अन्वये विचारणा केली असता, कर विभागाने त्यांचे दिनांक 7.2.2014 च्या पत्रामधील मुद्दा क्रमांक : 1 मध्ये अनुपालन सादर केले असुन सदर अनुपालनामध्ये महानगरपालिका स्थायी समिती व महासभेच्या बैठकीत महानगपालिका सदस्य कर वाढीची मागणी मान्य न करता मालमत्ता कर इत्यादींचे उद्दिष्टे वाढवुन अंदाजपत्रक संतुलित

करतात. अंदाजपत्रक मंजुरीचे अंतिम अधिकार महासभेस असल्याने दरवर्षी त्यांना वास्तविक अंदाज तयार करण्याबाबत विनंती करण्यात येते, परंतु विनंती अमान्य होत असल्याचे कर विभागाने अनुपालनालमध्ये नमुद केले आहे. परंतु अंदाजपत्रक सादर करताना मागील वर्षाची प्रत्यक्ष जमा व खर्चाची माहिती नमुद असल्याने महानगरपालिकेने सादर केलेले अनुपालन मुद्दयास अनुसरुन नाही.

थकीत रक्कम वसुलीबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 141 नुसार कोणत्याही इमारतीच्या किंवा जमिनीच्या बाबतीत अधिनियमान्वये देय असलेल्या मालमत्ता कराची थकबाकी असे कर देण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तीचा अशा इमारतीत किंवा जमिनीत कोणताही हितसंबंध असेल त्यावर आणि अशा इमारतीत किंवा जमिनीवर अशा व्यक्तीच्या मालकीची जी कोणतीही जंगम मालमत्ता सापडेल तीवर प्रथम भार असेल, व अशा थकीत मालमत्ता कराची रक्कम कलम 141(2) नुसार न्यायालयात दावा दाखल करुन दाव्याच्या खर्चासह जागामालकाकडून वसुल करण्याबाबत तरतुद आहे. त्यानुसार विभागाने कार्यवाही करुन मालमत्ता कराची थकीत असलेली रक्कम संबंधीतांकडून वसुल करणे आवश्यक होते. परंतु तशी कार्यवाही केली नाही.

DMASGDM7201 (Ref No : 69, Hmm No : 193)

## *158 कर विभागाने ठेवलेल्या पावती पुस्तक साठा नोंदवहीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***उल्हासनगर महानगरपालिकेच्या कर विभागाने ठेवलेल्या पावती पुस्तक साठा नोंदवहीबाबत पडताळणी केली असता प्राप्त् झालेली पावतीपुस्तके व वितरीत केलेली पावतीपुस्तके यांच्या नोंदी समोर कर संकलन अधिकारी यांची स्वाक्षरी तसेच शिक्का नसल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले आहे.***

उल्हासनगर महानगरपालिकेतील कर विभागाने नमुना - 1 मध्ये पावतीपुस्तके नोंदवही ठेवली असुन त्यामध्ये खालील प्रमाणे त्रुटी आढळुन आल्या आहेत.

सन 2011-2012 च्या पावतीपुस्तक लेख्यांची पडताळणी केली असता, भांडार विभागाने कर संकलन विभागास खालीलप्रमाणे पावतीपुस्तके वितरीत केली आहेत.

| अ.क्र. | भांडार विभाग साठा नोंदवही | पावतीपुस्तकांचा | एकूण | कर विभागास |
|---|---|---|---|---|

| | पृष्ठ क्रमांक व दिनांक | अनुक्रमांक | पावतीपुस्तके | दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | 26/31.01.2011 | 201 ते 300 | 100 | 31.01.2011 |
| 2 | 26/14.07.2011 | 301 ते 325 | 25 | 14.07.2011 |
| 3 | 26/14.10.2011 | 326 ते 350 | 25 | 14.10.2011 |
| 4 | 26/03.12.2011 | 351 ते 375 | 25 | 03.12.2011 |
| 5 | 26/27.12.2011 | 376 ते 400 | 25 | 27.12.2011 |
| 6 | 26/05.01.2012 | 01 ते 25 | 25 | 05.01.2012 |
| 7 | 26/05.01.2012 | 26 ते 50 | 25 | 05.01.2012 |

1) कर विभागाने सदर पावती पुस्तकांचा हिशोब ठेवताना एकूण प्राप्त् पावतीपुस्तकांची संख्या त्यांचेकडील नोंदवहीत नमुद केलेली नाही. त्यामुळे कोणत्या तारखेस किती पावतीपुस्तके प्राप्त् झाली याबाबतचा ताळमेळ घेता आला नाही. तसेच सदर नोंदवहीमध्ये कर संकलन अधिकारी यांची शिक्यानिशी स्वाक्षरी दिसुन येत नाही. त्यामुळे निरिक्षक / रोखपाल यांना दिलेली पावतीपुस्तके व त्यांचेकडून वापर झाल्यानंतर परत घेण्यात आलेली पावतीपुस्तकांच्या स्थळप्रती यावर नियंत्रण असल्याचे दिसुन येत नाही.

2) भांडार विभागातुन पावतीपुस्तक क्रमांक 201 ते 300 दिनांक 31.01.2011 रोजी घेतली असतांना कर विभागाने सदर पावती पुस्तकांचे वितरण दिनांक 30.12.2010 पासुन केल्याचे नोंदवहीतुन दिसुन येते. त्यावरुन भांडार विभागातुन पावतीपुस्तके प्राप्त् करण्यापूर्वीच सदर पावतीपुस्तकांचे वितरण कसे करण्यात आले, याबाबत अर्थबोध होत नाही.

उपरोक्त् बाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक : 194, दिनांक 17.02.2014 रोजी निर्गमित करण्यात आले असुन लेखापरीक्षण पथकास अनुपालन सादर करण्यात आलेले नाही.

DMASGDM7201 (Ref No : 71, Hmm No : 194)

## *159 वेतन निश्चित्ती मधील त्रुटी बाबत*

**आस्थापना खर्च वेतन आणि भत्ते.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*म.न.पां. निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| ***डॉ. राजाराम व्ही. रिजवाणी वैद्यकीय अधिकारी हे दिनांक 1-1-2006 पूर्वी 6500-10500 या वेतनश्रेणीत वेतन*** |

***आहरीत करीत होते. 6500-10500 या वेतन श्रेणीस 9300-34800 पी.बि.2 वेतन संरचना आणि ग्रेड वेतन रु. 4400 मंजूर करण्यात आले आहे. तथापि डॉ. रिजवाणी वैद्यकीय अधिकारी यांची दिनांक 1-1-2006 रोजी वेतन निश्चिती पी.बि.3 15600-39100 मध्ये केलेली असून त्यांना रु. 5400 ग्रेड वेतन अदा करण्यात आलेले आहे. त्यामुळे त्यांना अतिप्रदान झाले आहे बाबा साहेब साळुंखे लिपिक यांना चुकीचे वेतन निश्चित केल्याने अतिप्रदान झालेले आहे. मजूर,माळी, मदतनीस,शिपाई,सफाई कामगार यांना दिनांक 1-1-2006 पूर्वी 2550-3200 या वेतन श्रेणीत वेतन अदा करण्यात येत होते. दिनांक 1-1-2006 पूर्वी 2550-3200 नंतर 2610-4000 या पदोन्नतीच्या पदावर वेतन श्रेणीत वेतन निश्चिती करण्यात येत होती. त्या प्रमाणे 2610-4000 या वेतनश्रेणीस 1400 ग्रेड वेतन अनुज्ञेय असताना वरील संवर्गातील पदांना 1600 आणि दुसऱ्या पदोन्नती च्या वेळी 1900 ग्रेड वेतन देण्यात आल्याने अतिप्रदान झाले आहे.***

आस्थापना विभागातील निवडक सेवा पुस्तकाची तपासणी केली असता खालील प्रमाणे त्रुटी आढळून आलेल्या आहेत.

1. डॉ. राजाराम व्ही. रिजवाणी वैद्यकीय अधिकारी हे दिनांक 1-1-2006 पूर्वी 6500-10500 या वेतनश्रेणीत वेतन आहरीत करीत होते. महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम 2009 मधील परीशिष्ट 2 अ.क्र.12 मध्ये दाखविण्यात आल्या प्रमाणे 6500-10500 या वेतन श्रेणीस परिशिष्ठ 2 अ.क्र. 16 वर दाखविण्यात आल्याप्रमाणे 9300-34800 ही पी.बि. 2 वेतन संरचना आणि ग्रेड वेतन रु. 4400 मंजूर करण्यात आले आहे. तथापि डॉ. रिजवाणी वैद्यकीय अधिकारी यांची दिनांक 1-1-2006 रोजी वेतन निश्चिती पी.बि. 3 मध्ये 15600-39100 या वेतन संरचनेत केलेली असून त्यांना रु. 5400 ग्रेड वेतन अदा करण्यात आलेले आहे. त्यामुळे त्यांना खाली दर्शविल्या प्रमाणे अतिप्रदान झाले आहे

| दिनांक | देय वेतन संरचना | देय वेतन (रु.) | ग्रेड वेतन (रु.) | दिलेले वेतन (रु.) | ग्रेड वेतन (रु.) | फरक द महा (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1-1-2006 | पी.बि.2 | 15070 | 4400 | 15070 | 5400 | 1000 |
| 1-7-2006 | -----“---- | 15660 | 4400 | 15690 | 5400 | 1030 |
| 1-7-2007 | -----“---- | 16270 | 4400 | 16330 | 5400 | 1060 |
| 1-7-2008 | पी.बि 2 | 16890 | 4400 | 16990 | 5400 | 1100 |
| 3-2-2009 (विकल्प) | पी,बि.3 | 18190 | 5400 | 18370 | 5400 | 180 |
| 1-7-2009 | ------“----- | -----“----- | -----“---- | -----“---- | ------“--- | ------ |
| 1-7-2010 | -------“---- | 18900 | 5400 | 19090 | 5400 | 190 |
| 1-7-2011 | ------“---- | 19630 | 5400 | 19830 | 5400 | 200 |
| 1-7-2012 | -----“---- | 20380 | 5400 | 20590 | 5400 | 210 |
| 1-7-2013 | ------“---- | 21160 | 5400 | 21370 | 5400 | 210 |

2. बाबा साहेब साळुंखे लिपिक यांना खाली दाखविल्याप्रमाणे चुकीचे वेतन निश्चित केल्याने अतिप्रदान झालेले आहे.

| दिनांक | वेतन संरचना | देय वेतन (रु.) | ग्रेड वेतन (रु.) | दिलेले वेतन (रु.) | ग्रेड वेतन (रु.) | फरकद.म. (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1-7-2007 | पी.बि. 2 | 8080 | 1900 | 8090 | 1900 | 10 |
| 1-7-2008 | ---"-- | 8380 | 1900 | 8390 | 1900 | 10 |
| 28-2-08 विकाल्पासह 1-7-2009 | ----"---- | 9010 | 2400 | 9040 | 2400 | 30 |

3. मजूर, माळी, मदतनीस, शिपाई, सफाई कामगार यांना दिनांक 1-1-2006 पूर्वी 2550-3200 या वेतन श्रेणीत वेतन अदा करण्यात येत होते. दिनांक 1-1-2006 पासून IS या वेतन संरचनेत (4440-7440 ) अधिक 1300 ग्रेड वेतन अदा करण्यात येत होते. शासन निर्णय क्रमांक वेतन 199/प्र.क्र.2 /99 /सेवा/3 दिनांक 20-7-2001 अन्वये 12 वर्षाच्या सेवेनंतर आश्वासित प्रगती योजना आणि शासन निर्णय क्रमांक वेतन 1109/प्र.क्र41सेवा 3 दिनांक 5-7-2010 अन्वये 24 वर्षाची अर्हताकारी सेवा झाल्यानंतर सुधारित सेवा अंतर्गत दुस-या पदोन्नतीच्या वेळी अनुक्रमे 1600, 1900 अशा प्रकारे ग्रेड वेतन मंजूर केलेले आहे. दिनांक 1-1-2006 पूर्वी 2550-3200 नंतर 2610-4000 या वेतन श्रेणीत वेतन निश्चिती करण्यात येत होती. त्या प्रमाणे 2610-4000 या वेतनश्रेणीस 1400 ग्रेड वेतन अनुज्ञेय असताना वरील संवर्गातील पदांना 1600 आणि दुस-या पदोन्नतीच्या वेळी 1900 ग्रेड वेतन अदा करण्यात येत आहे.. प्रत्यक्षात 1900 हे ग्रेड वेतन वर्ग 3 च्या पदांना अनुज्ञेय आहे. वर्ग 4 मधील पदाना वर्ग 3 च्या पदावर पदोन्नती देण्यापूर्वी संबंधित कर्मचा-यांनी शासन निर्णय क्रमांक एस.आर.व्ही-1095/प्र.क्र.1 /95/बारा दिनांक 8-6-95 अन्वये वर्ग 3 च्या पदाची किमान अर्हता धारण करणे आवश्यक आहे. तथापि मजूर, माळी, मदतनीस यांना 24 वर्ष सेवा झाल्यानंतर दुसरया पदोन्नतीच्या वेळी रु. 1900ग्रेड वेतन देताना त्यांनी किमान अर्हता धारण केली नसल्याचे दिसून आले. तरी वरील संवर्गातील कर्मचारी यांना 12 व 24 वर्ष सेवा झाल्यानंतर 1600, 1900 ऐवजी अनुक्रमे 1400, 1600 असे ग्रेड वेतन देणे आवश्यक आहे. मात्र वर नमूद केल्या प्रमाणे जादा ग्रेड वेतन दिल्याने उल्हासनगर महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येते. या बाबत साधार खुलासा लेखा परीक्षणास सादर करण्यात आला नाही. सदर बाबत संबंधित विभागास अर्ध समास ज्ञापन क्रमांक 161 दिनांक 12/2/2014 अन्वये विचारणा करण्यात आली होती. विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.

DATDBWM5801 (Ref No : 118, Hmm No : 161)

## *160 श्री श्यामलाल छोटू भगूर, श्रीमती माया भगवान गायकवाड, सफाई कामगार यांच्या चुकीच्या वेतन निश्चिती बाबत*

**आस्थापना खर्च वेतन आणि भत्ते.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*म.न.पां.निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***श्यामलाल छोटू भगूर, माया भगवान गायकवाड, सफाई कामगार यांचे दिनांक 01/01/2006 रोजी चुकीचे वेतन निश्चित केल्याने त्यांना अतिप्रदान झाले आहे. तसेच शासन निर्णय क्रमांक अरजा/1488/395/सेवा 9, दिनांक 9/11/1990 अन्वये दिनांक 1/1/1991 पासून आगाऊ रजा जमा करताना मागील सहा महिन्याच्या कालावधीतील अकार्यदिन कालावधी विचारात घेतलेला नाही. त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.***

आस्थापना विभागातील काही निवडक सेवा पुस्तकांची तपासणी केली असता खाली दाखविण्यात आल्याप्रमाणे त्रुटी असल्याचे निदर्शनास आले आहे.

1) श्री श्यामलाल छोटू भगूर यांचे दिनांक 1/1/2006 रोजी रूपये 5960 वेतन निश्चित होणे आवश्यक असताना ते रूपये 6070 वर निश्चित केल्याने त्यांना खालील दाखविल्याप्रमाणे अतिप्रदान झाले आहे.

| दिनांक | देय वेतन रु. | ग्रेड वेतन रु. | दिलेले वेतन रु. | ग्रेड वेतन रु. | फरक दरमहा रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1/1/2006 | 5960 | 1300 | 6070 | 1300 | 110 |
| 1/7/2006 | 6180 | 1300 | 6300 | 1300 | 120 |
| 1/7/2007 | 6410 | 1300 | 6530 | 1300 | 120 |
| 1/7/2008 | 6650 | 1300 | 6770 | 1300 | 120 |
| 1/7/2009 | 6890 | 1300 | 7020 | 1300 | 130 |
| 1/7/2010 | 7140 | 1300 | 7270 | 1300 | 130 |
| 1/7/2011 | 7400 | 1300 | 7530 | 1300 | 130 |
| 1/7/2012 | 7670 | 1300 | 7800 | 1300 | 130 |
| 1/7/2013 | 7940 | 1300 | 8080 | 1300 | 140 |

2) श्रीमती माया भगवान गायकवाड, सफाई कामगार यांना खाली दाखविल्याप्रमाणे चुकीचे वेतन दिल्याचे निदर्शनास आले आहे.

| दिनांक | देय वेतन रु. | दिलेले वेतन रु. | फरक रु. |
|---|---|---|---|
| 2/11/2000 | 2780 | 2840 | 60 |
| 2/11/2001 | 2840 | 2900 | 60 |
| 2/11/2002 | 2900 | 2960 | 60 |
| 2/11/2003 | 2960 | 3020 | 60 |
| 2/11/2004 | 3020 | 3080 | 60 |

| | | | |
|---|---|---|---|
| 2/11/2005 | 3080 | 3140 | 60 |

दिनांक 1/1/2006 रोजी त्यांना रूपये 3080 वेतन देय असल्याने दिनांक 1/1/2006 पासून खाली दाखविल्याप्रमाणे त्यांना वेतन देय होईल.

| **दिनांक** | **देय वेतन रु.** | **ग्रेड वेतन रु.** | **दिलेले वेतन रु.** | **ग्रेड वेतन रु.** | **फरक दरमहा रु.** |
|---|---|---|---|---|---|
| 1/1/2006 | 5730 | 1300 | 5840 | 1300 | 110 |
| 1/7/2006 | 5940 | 1300 | 6060 | 1300 | 120 |
| 1/7/2007 | 6160 | 1300 | 6290 | 1300 | 130 |
| 1/7/2008 | 6390 | 1300 | 6520 | 1300 | 130 |
| 1/7/2009 | 6620 | 1300 | 6760 | 1300 | 140 |
| 1/7/2010 | 6860 | 1300 | 7010 | 1300 | 150 |
| 1/7/2011 | 7110 | 1300 | 7260 | 1300 | 150 |
| 1/7/2012 | 7370 | 1300 | 7520 | 1300 | 150 |
| 1/7/2013 | 7630 | 1300 | 7790 | 1300 | 160 |

3) शासन निर्णय क्रमांक अरजा/1488/395/सेवा 9, दिनांक 9/11/1990 अन्वये दिनांक 1/1/1991 पासून अर्जित तसेच अर्धवेतनी रजा परिगणना करण्याच्या पद्धतीमध्ये सुधारणा करण्यात आली. त्याप्रमाणे दिनांक 1 जानेवारी तसेच दिनांक 1 जुलै रोजी अर्जित तसेच अर्धवेतनी रजा अनुक्रमे 15 व 10 याप्रमाणे रजा कर्मचाऱ्यांच्या रजा खाती जमा करावयाची आहे. मात्र अशाप्रकारे आगावू रजा जमा करतांना मागील सहा महिन्यात जेवढे दिवस असाधारण रजा (वैद्यकीय कारणाशिवाय) झालेली असेल त्यासाठी 10 दिवसाला 1 अर्जित रजा आणि 18 दिवस असाधारण रजेला 1 अर्ध वेतनी रजा कमी करावयाची आहे. उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये रजा लेख्यांची तपासणी केली असता याप्रमाणे कार्यवाही होत नसल्याचे दिसून आले. उदाहरणार्थ -

1) रेखा विरसिंग मरोठिया, सफाई कामगार 1992 ते 2008 या कालावधीत त्यांचा अकार्यदिन 431 दिवसांचा असताना त्या प्रमाणात रजा कमी केल्याचे दिसून आले नाही.

2) अनिल महेंद्र मरोठिया, सफाई कामगार सन 1995 ते 2000 या कालवधीत झालेल्या असाधारण रजेच्या प्रमाणात अर्जित तसेच अर्धवेतनी रजा वजा केलेली नाही.

सदर बाबत संबंधित विभागास अर्ध समास ज्ञापन क्रमांक 166 दिनांक 13/02/2014 अन्वये विचारणा करण्यात आली होती, विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.

## *161 चुकीच्या वेतन निश्चित्ती मुळे झालेले अतिप्रदान*

**आस्थापना खर्च वेतन आणि भत्ते.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*म.न.पां. निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***श्री सोनू पोखरदास शिपाई यांना आदेश क्रमांक उमपा/ जकात विभाग/86/05 दिनांक 31-5 2005 अन्वये निलंबित करण्यात आले होते. त्यांना दिनांक 14/9/05 रोजी सेवेत पुनः घेण्यात आले. त्यांचा निलंबित कालावधी 117 दिवसाचा असल्याने त्यांची दिनांक 1/11/2005 ची वेतन वाढ दिनांक 24/2/06 रोजी देय होईल. सबब दिनांक 1/1/2006 रोजी त्यांचे वेतन रु. 3020 होत असल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम 2009 नियम क्रमांक 7(1) (अ) अन्वये 5600 वर निश्चित होणे आवश्यक होते. तथापि ते 5730 वर निश्चित केल्याने त्यांना अतिप्रदान झाले आहे. अशोक संतुल पेसवाणी रोड मुकादम दिनांक 1/1/96 पूर्वी 775-1150 या वेतन श्रेणीत रु 955 या वेतनावर वेतन घेत होते. त्यांचे दिनांक 1/1/96 रोजी 2975 या वेतनावर वेतन निश्चित होणे आवश्यक होते. मात्र ते रु. 3040 या वेतनावर निश्चित केल्याने अतिप्रदान झाले आहे. दिनांक 1-1-2006 रोजी ते 3720 वेतन घेत असल्याने सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे त्यांचे वेतन जादा अदा झालेले आहे.***

आस्थापना विभागातील निवडक सेवा पुस्तकांची तपासणी केली असता खालील प्रमाणे त्रुटी आढळून आलेल्या आहेत.

1. श्री सोनू पोखरदास शिपाई यांना आदेश क्रमांक उमपा/जकात विभाग/86/05 दिनांक 31/5/2005 अन्वये निलंबित करण्यात आले होते. त्यांना दिनांक 14/9/05 रोजी सेवेत पुन: घेण्यात आले. त्यांचा निलंबित कालावधी 117 दिवसाचा असल्याने त्यांची दिनांक 1/11/2005 ची वेतन वाढ दिनांक 24/2/06 रोजी देय होईल. सबब दिनांक 1/1/2006 रोजी त्यांचे वेतन रु. 3020 होत असल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम 2009 नियम क्रमांक 7(1)(अ) अन्वये 5600 वर निश्चित होणे आवश्यक होते. तथापि ते 5730 वर निश्चित केल्याने त्यांना खाली दर्शविल्या प्रमाणे अतिप्रदान झाले आहे.

| दिनांक | देय वेतन रु. | देय वेतन रु. | ग्रेड वेतन रु. | दिलेले वेतन रु. | ग्रेड वेतन रु. | फरक द.म |
|---|---|---|---|---|---|---|
| 1/1/2006 | पी.बि.1 | 5620 | 1300 | 5730 | 1300 | 110 |
| 1/7/06 | -----“---- | 5830 | 1300 | 5940 | 1300 | 110 |
| 1/7/07 | -----“---- | 6050 | 1300 | 6170 | 1300 | 120 |
| 1/7/08 | पी.बि 1 | 6270 | 1300 | 6400 | 1300 | 130 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1/11/2008कालबद्ध पदोन्नती | ----"--- | 6500 | 1500 | 6640 | 1500 | 140 |
| 1/7/09 | ------"----- | 6740 | 1500 | 6890 | 1500 | 150 |
| 1/7/10 | -------"---- | 6990 | 1500 | 7150 | 1500 | 160 |
| 1/7/11 | ------"---- | 7250 | 1500 | 7410 | 1500 | 160 |
| 1/7/12 | -----"---- | 7520 | 1500 | 7680 | 1500 | 160 |
| 1/7/13 | ------"---- | 7790 | 1500 | 7960 | 1500 | 170 |

2. अशोक संतुल पेसवाणी रोड मुकादम दिनांक 1/1/96 पूर्वी 775-1150 या वेतन श्रेणीत रु 955 या वेतनावर वेतन घेत होते. त्यांचे दिनांक 1-1-96 रोजी 2975 या वेतनावर वेतन निश्चित होणे आवश्यक होते. मात्र ते रु. 3040 या वेतनावर निश्चित केल्याने त्यांना खाली दाखविल्या प्रमाणे अतिप्रदान झाले आहे.

| दिनांक | देय वेतन रु. | दिलेले वेतन रु. |
|---|---|---|
| 1/1/96 | 2975 | 3040 |
| 1/6/96 | 3040 | 3105 |
| 1/6/97 | 3105 | 3170 |
| 1/6/98 | 3170 | 3235 |
| 1/6/99 | 3235 | 3300 |
| 1/6/2000 | 3300 | 3370 |
| 1/6/2001 | 3370 | 3440 |
| 1/6/2002 | 3440 | 3510 |
| 1/6/2003 | 3510 | 3580 |
| 1/6/2004 | 3580 | 3650 |
| 1/6/2005 | 3650 | 32720 |

दिनांक 1/1/2006 रोजी ते 3720 वेतन घेत असल्याने सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे त्यांचे वेतन खाली दाखविल्या प्रमाणे जादा अदा झालेले आहे.

| दिनांक | देय वेतन रु. | ग्रेड वेतन रु. | दिलेले वेतन रु. | ग्रेड वेतन रु. | `फरक दर महा |
|---|---|---|---|---|---|
| 1/1/06 | 6790 | 1600 | 6920 | 1600 | 130 |
| 1/7/06 | 7050 | 1600 | 7180 | 1600 | 130 |
| 1/7/07 | 7310 | 1600 | 7450 | 1600 | 140 |
| 1/10/07कालबद्ध पदोन्नती | 7580 | 1900 | 7730 | 1900 | 150 |
| 1/7/2008 | 7870 | 1900 | 8020 | 1900 | 150 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1/7/09 | 8170 | 1900 | 8320 | 1900 | 150 |
| 1/7/10 | 8480 | 1900 | 8630 | 1900 | 150 |
| 1/7/11 | 8800 | 1900 | 8950 | 1900 | 150 |
| 1/7/12 | 9130 | 1900 | 9280 | 1900 | 150 |
| 1/7/13 | 9460 | 1900 | 9620 | 1900 | 160 |

वरील प्रकरणात अतिप्रदान झालेले असल्याने अतिप्रदान रकमेची त्यावरील भत्त्यासह परिगणना करून संबंधित कर्मचाऱ्यांकडून ती वसुल करणे आवश्यक आहे. सदर बाबत संबंधित विभागास अर्ध समास ज्ञापन क्रमांक 159 दिनांक 12/02/2014 अन्वये विचारणा करण्यात आली होती. विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.

DATDBWM5801 (Ref No : 126, Hmm No : 159)

## *162 वेतन निश्चित्ती मधील त्रुटी बाबत.*

**आस्थापना खर्च वेतन आणि भत्ते.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*म.न.पां. निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***रामसुरत के. पाल यांना दिनांक 4-5-2007 रोजी कालबद्ध पदोन्नती देण्यात आली. उपरोक्त तारखेस त्यांच्या कडून शासन परिपत्रक क्रमांक वेपूर/1209/प्र.क्र.69 /सेवा-9 दिनांक 29/4/09 नियम क्रमांक 12 अन्वये वेतन निश्चिती करण्यासाठी संबंधित कर्मचाऱ्याने विकल्प दिल्याची माहिती प्राप्त झाली नाही. तथापि दिनांक 4/5/07 रोजी वेतन निश्चित केल्यानंतर त्यांना दिनांक 1/7/07 रोजी वेतनवाढ देण्यात आल्याने त्यांना अतिप्रदान झाले आहे. पूनम अरुण ठोंबरे सफाई कामगार यांना कार्यालयीन आदेश क्रमांक उमपा/ साप्रवी /आस्था/ प्र.क्र.04 /08/05 दिनांक 4/1/05 रोजी निलंबित करण्यात आले. त्यांना दिनांक 12/9/06 रोजी सेवेत पुन्हा घेण्यात आले. एकूण निलंबित कालावधी 616 दिवसाचा होता. सबब त्यांना दिनांक 12/8/07 रोजी पुढील वेतनवाढ देय होईल. तथापि त्यांना चुकीच्या वेतन वाढी दिल्याने अतिप्रदान झालेले आहे. दीपक येन. ऊर्जेनवाल आरोग्य निरीक्षक यांना दिनांक 8/5/07 रोजी आश्वासित प्रगती योजनेखाली पदोन्नती देण्यात आली. त्यांना दिनांक 8/5/07 ते दिनांक 31/8/09 या कालावधीत 2400 ग्रेड वेतनाप्रमाणे थकबाकीची रक्कम देय नसताना अदा करण्यात आली त्यामुळे त्यांना अतिप्रदान झालेले आहे.***

आस्थापना विभागातील निवडक सेवा पुस्तकाची तपासणी केली असता खालील प्रमाणे त्रुटी आढळून आलेल्या आहेत. 1) श्री रामसुरत के. पाल यांना दिनांक 4/5/2007 रोजी कालबद्ध पदोन्नती देण्यात आली. उपरोक्त तारखेस त्यांच्या कडून शासन परिपत्रक क्रमांक वेपूर/1209/प्र.क्र.69 /सेवा-9दिनांक 29/4/09 नियम क्रमांक 12 अन्वये वेतन निश्चिती करण्यासाठी संबंधित कर्मचाऱ्याने विकल्प दिला किवा कसे या बाबत माहिति प्राप्त झाली नाही.तथापि दिनांक 4/5/07रोजी वेतन निश्चित केल्यानंतर त्यांना दिनांक 1/7/07रोजी वेतनवाढ देण्यात आल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित नियम 2009 मधील नियम क्रमांक 10 अन्वये वेतन वाढीचा किमान कालावधी सहा महिने आवश्यक आहे. सबब श्री पाल यांना दिनांक 4/5/07 रोजी दुसऱ्या कालबद्ध पदोन्नतीच्या पदावरील वेतन निश्चिती नंतर पुढील वेतन वाढ दिनांक 1/7/08 रोजी देय होईल तथापि ती दिनांक 1/7/07 रोजी दिल्याने त्यांना खाली दाखविल्या प्रमाणे अतिप्रदान झाले आहे.

| दिनांक | देय वेतन संरचना | देय वेतन रु. | ग्रेड वेतन रु. | दिलेले वेतन रु. | ग्रेड वेतन रु. | फरक द.म |
|---|---|---|---|---|---|---|
| 1/7/2006 | IS | 7050 | 1600 | 7050 | 1600 | ---- |
| 4/5/07 | पी.बि 1 | 7310 | 1900 | 7600 | 190 | 290 |
| 1/7/08 | ----“---- | 6270 | 1300 | 6400 | 1300 | 130 |
| 1/11/08 | ----“--- | 7590 | 1900 | 7890 | 1900 | 300 |
| 1/7-/09 | ------“----- | 7880 | 1900 | 8190 | 1900 | 310 |
| 1/7/10 | -------“---- | 8180 | 1900 | 8500 | 1900 | 320 |
| 1/7/11 | ------“---- | 8490 | 1900 | 8820 | 1900 | 330 |
| 1/7/12 | -----“---- | 8810 | 1900 | 9150 | 1900 | 340 |
| 1/7/13 | ------“---- | 9140 | 1900 | 9490 | 190 | 350 |

दिनांक 4/5/07रोजी पदोन्नतीच्या तारखेस कार्यालयाने संबंधिताकडून वेतन निश्चितीचा विकल्प स्वीकारला असल्यास सदर विकल्प लेखा परीक्षणास सादर करण्यात आला नाही.

2) पुनम अरुण ठोंबरे सफाई कामगार यांना कार्यालयीन आदेश क्रमांक उमपा/साप्रवी / आस्था/प्र.क्र.4/805 दिनांक 4/1/05 रोजी निलंबित करण्यात आले.त्यांना दिनांक 12/9/06 रोजी सेवेत पुन्हा घेण्यात आले. एकूण निलंबित कालावधी 616 दिवसाचा होता. सबब त्यांना दिनांक 12/8/07 रोजी पुढील वेतनवाढ देय होईल. तथापि त्यांना खाली दाखविल्या प्रमाणे चुकीच्या वेतन वाढी दिल्याने अतिप्रदान झालेले आहे.

| दिनांक | देय वेतन रु. | दिलेले वेतन रु. |
|---|---|---|
| 7/12/05 | 3080 | 3140 |
| 12/8/07 | 3140 | 3200 |
| 1/8/08 | 3200 | 3260 |

सुधारित वेतन संरचनेत खालील प्रमाणे अतिप्रदान झालेले आहे.

| दिनांक | देय वेतन रु. | दिलेले वेतन रु. |
|---|---|---|
| 1/7/06 | 5940 | 5950 |

दिनांक 1/7/06 पासून ते 1/7/13 पर्यंत रु.१० प्रमाणे अतिप्रदान झालेले आहे. त्याची परिगणना करून त्यावरील भत्त्यासह संबंधित कर्मचाऱ्याकडून वसुली करणे आवश्यक आहे.

3) दीपक येन. ऊर्जेनवाल आरोग्य निरीक्षक यांना दिनांक 8/5/07 रोजी आश्वासित प्रगती योजनेखाली पदोन्नती देण्यात आली. त्यांना दिनांक 8/5/07 ते दिनांक 31-8-09 या कालावधीत 2400 ग्रेड वेतनाप्रमाणे थकबाकीची रक्कम अदा करण्यात आली असे सेवा पुस्तकात घेतलेल्या नोंदीवरून दिसून आले..शासन निर्णय क्रमांक वेतन 12109/प्र.क्र43सेवा 3 दिनांक 31/8/09 परीच्छेद 2 अन्वये उपरोक्त काळात केवळ काल्पनिक ग्रेड वेतन दाखविणे आवश्यक असून मूळ पदाचे संपूर्ण ग्रेड वेतन अधिक पदोन्नतीच्या पदाचे ग्रेड वेतन यातील फरकाच्या 50% रक्कम देय असताना ती पूर्ण दिल्याने त्यांना अतिप्रदान झाल्याचे दिसून येते .श्री दीपक येन.ऊर्जेनवाल आरोग्य निरीक्षक यांचे दिनांक 8/5/07 ते 31/8/09 या कालावधीच्या फरकाचे विवरणपत्र तयार करून रक्कम वसुल करावी. दिनांक 1/12006 ते 31/08/2009 या कालावधीत पदोन्नत झालेल्या सर्व कर्मचारी यांची थकबाकीची देयके लेखा परीक्षणास सादर केली नाहीत.

वरील प्रकरणात अतिप्रदान झालेले असल्याने अतिप्रदान रकमेची परिगणना त्यावरील भत्त्यासह करून संबंधित कर्मचाऱ्यांकडून ती वसुल करणे आवश्यक आहे. सदर बाबतीत योग्य तो खुलासा लेखा परीक्षणास करण्यात आला नाही. या बाबत अर्ध समास ज्ञापन क्रमांक 160 दिनांक 12/02/2014 अन्वये संबंधित विभागास विचारणा करण्यात आली होती. विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.

DATDBWM5801 (Ref No : 127, Hmm No : 160)

## *163 श्री परमानंद आनंद श्री जाधव,अनुरेखक आणि श्री मुकेश आयलानी कार्यकारी अभियंता यांच्या चुकीच्या वेतन निश्चिती मुळे त्यांना झालेले अतिप्रदान.*

**आस्थापना खर्च वेतन आणि भत्ते**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*म.न.पा. निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***श्री. परमानंद आनंदराव जाधव अनुरेखक हे दिनांक 1/1/2006 पूर्वी 4500-7000 या वेतनश्रेणीत वेतन घेत होते. सहाव्या वेतन आयोगानुसार दिनांक 1/1/2006 पासून सदरील वेतनश्रेणीस 2800 ग्रेड वेतन अनुज्ञेय आहे. तथापि श्री. जाधव अनुरेखक यांना 2900 याप्रमाणे ग्रेड वेतन देण्यात आले.. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता दिनांक 1/9/1990 पासून सहाय्यक अभियंता ( विद्युत) 2200-4000 या वेतनश्रेणीत पदोन्नत***

***झाल्याचे त्यांच्या सेवा पुस्तकावरून दिसून आले. दिनांक 1.1.1996 रोजी सदरील वेतनश्रेणीस 10650-325-15850 अशी वेतनश्रेणी होती. सदर वेतनश्रेणीस आणि कार्यकारी अभियंता या पदास सहाव्या वेतन आयोगानुसार दिनांक 1.1.2006 पासून 6600 ग्रेड वेतन देय व अनुज्ञेय आहे. तथापि श्री.आयलानी, कार्यकारी अभियंता यांना रूपये 6900 ग्रेड वेतन अदा केल्याने त्यांना अतिप्रदान झालेले आहे.***

आस्थापना विभागाचे लेखा परीक्षण करीत असतांना काही निवडक सेवा पुस्तकांची तपासणी केली असता खाली दाखविल्याप्रमाणे त्यात त्रुटी आढळून आल्या.

1. श्री.परमानंद आनंदराव जाधव अनुरेखक हे दिनांक 1/1/2006 पूर्वी 4500-7000 या वेतनश्रेणीत वेतन घेत होते. सहाव्या वेतन आयोगानुसार दिनांक 1/1/2006 पासून सदरील वेतनश्रेणीस 2800/- ग्रेड वेतन अनुज्ञेय आहे. तथापि श्री.जाधव अनुरेखक यांना 2900/- याप्रमाणे ग्रेड वेतन देण्यात येत असल्याचे त्यांच्या सेवा पुस्तकावरून दिसून आले. त्यामुळे त्यांना खाली दाखविल्याप्रमाणे अतिप्रदान झाले आहे.

| दिनांक | देय वेतन रु. | ग्रेड वेतन रु. | दिलेले वेतन रु. | ग्रेड वेतन रु. | फरक दरमहा रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1.1.2006 | 10700 | 2800 | 10700 | 2900 | 100 |
| 1.7.2006 | 11110 | 2800 | 11110 | 2900 | 100 |
| 1.7.2007 | 11530 | 2800 | 11540 | 2900 | 110 |
| 1.7.2008 | 11960 | 2800 | 11980 | 2900 | 120 |
| 1.7.2009 | 12410 | 2800 | 12430 | 2900 | 120 |
| 1.7.2010 | 12870 | 2800 | 12890 | 2900 | 120 |
| 1.7.2011 | 13340 | 2800 | 13370 | 2900 | 130 |
| 1.7.2012 | 13830 | 2800 | 13860 | 2900 | 130 |
| 1.7.2013 | 14330 | 2800 | 14370 | 2900 | 140 |

सर्व अनूरेखक यांच्या बाबत वर दाखविण्यात आल्याप्रमाणे योग्य ती दुरुस्ती करून अतिप्रदान रकमेची त्यावरील भत्त्यासह परिगणना करून संबंधितांकडून वसुल करणे आवश्यक आहे.

2. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता यांच्या सेवा पुस्तकाची तपासणी केली असता ते विद्युत पर्यवेक्षक आणि दिनांक 1.9.1990 पासून सहाय्यक अभियंता (विद्युत) 2200-4000 या वेतनश्रेणीत पदोन्नत झाल्याचे त्यांच्या सेवा पुस्तकावरून दिसून आले. दिनांक 1.1.1996 रोजी सदरील वेतनश्रेणीस 10650-325-15850 अशी समकक्ष वेतनश्रेणी होती. सदर वेतनश्रेणीस आणि कार्यकारी अभियंता या पदास सहाव्या वेतन आयोगानुसार दिनांक 1.1.2006 पासून 6600 ग्रेड वेतन देय व अनुज्ञेय आहे. तथापि श्री.आयलानी, कार्यकारी अभियंता यांना रूपये 6900 ग्रेड वेतन अदा केल्याने त्यांना खाली दाखविल्याप्रमाणे अतिप्रदान झालेले आहे.

| दिनांक | देय वेतन रु. | ग्रेड वेतन रु. | दिलेले वेतन रु. | ग्रेड वेतन रु. | फरक दरमहा रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1.1.2006 | 26460 | 6600 | 26460 | 6900 | 300 |
| 1.7.2006 | 27460 | 6600 | 27470 | 6900 | 310 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1.7.2007 | 28490 | 6600 | 28510 | 6900 | 320 |
| 1.7.2008 | 29550 | 6600 | 29580 | 6900 | 330 |
| 1.7.2009 | 30640 | 6600 | 30680 | 6900 | 340 |
| 1.7.2010 | 31760 | 6600 | 31810 | 6900 | 350 |
| 1.7.2011 | 32910 | 6600 | 32980 | 6900 | 370 |
| 1.7.2012 | 34100 | 6600 | 34180 | 6900 | 380 |
| 1.7.2013 | 35330 | 6600 | 35420 | 6900 | 390 |

वर दाखविण्यात आल्याप्रमाणे अतिप्रदान रकमेची त्यावरील भत्त्यासह परिगणना करून संबंधितांकडून वसुल करणे आवश्यक आहे. सदर बाबत संबंधित विभागास अर्ध समास ज्ञापन क्रमांक 165 दिनांक 13/02/2014 अन्वये विचारणा करण्यात आली होती. विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.

DATDBWM5801 (Ref No : 128, Hmm No : 165)

## *164 2011-2012 मधील निवडणूक खर्चाची प्रमाणके आणि आस्थापना विषयक अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्याबाबत*

**निवडणूक खर्च व इतर आस्थापना बाबी.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :602-2290 म.न.पां.निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 8218000.00/-

***निवडणुकीचा खर्च आवश्यक त्या अभिलेख्या अभावी तपासता न आल्याने सदर बाबीवरील संपूर्ण खर्च रक्कम रु.8218000/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. या शिवाय आस्थापना विभागाने सानुग्रह अनुदान, निलंबित कर्मचारी, विभागीय प्रकरणे तसेच आस्थापना खर्च विहित मर्यादेत आहे किवा कसे या बाबत अबिलेख आणि माहिती उपलब्ध केलेली नाही.***

1) निवडणूकी संदर्भातील 2011-2012 मधील रूपये 82,18,000/- च्या खर्चाच्या संचिका, प्रमाणके व तद्अनुषंगाने सर्व अभिलेख.लेखा परीक्षणास उपलब्ध करण्यात आले नाहीत. परिणामी सदरील खर्चाची कोणतीही लेखापरीक्षा करण्यात आली नाही. एवढ्या मोठ्या प्रमाणात खर्च झालेला असताना आणि त्याबाबत वारंवार विचारणा करून सुद्धा कोणताही अभिलेख तपासणीसाठी उपलब्ध न केल्याने संपूर्ण खर्च आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

2) 2011-2012 मध्ये उल्हासनगर महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचा-यांना प्रदान केलेल्या सानुग्रह

अनुदानाची संचिका, प्रमाणके लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आली नाहीत. परिणामी सदर बाबीची तपासणी करता आली नाही.

3) 2011-2012 या वर्षात निलंबित केलेल्या, सेवेत पुनः घेतलेल्या अधिकारी/कर्मचारी यांची संख्या देण्यात आली नाही. परिणामी 2011-2012 मध्ये किती कर्मचारी निलंबित होते आणि त्यांच्या निर्वाह भत्त्यावर किती खर्च झाला याची माहिती प्राप्त होऊ शकली नाही.

4) 2011-2012 अखेर प्रलंबित विभागीय चौकशी प्रकरणा बाबत कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही.

5) 2011-2012 मध्ये नियुक्त केलेले कंत्राटी कामगार व त्यांना अदा केलेल्या मंजूरीची रक्कम.या बाबत माहिती प्राप्त झाली नाही.

6) 2011-2012 अखेरीस अधिकारी/कर्मचारी यांच्या प्रशासकीय न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांची संख्या.लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

7) 2011- 2012 च्या आस्थापना खर्च उल्हासनगर महानगरपालिकेच्या जमेच्या तुलनेत तो विहीत मर्यादेत किंवा कसे या बाबत माहिती देण्यात आली नाही.

8) सन 2011- 2012 वर्षाखेरीस तयार करण्यात आलेली आणि राज्य शासनाच्या समाज कल्याण विभागाकडून प्रमाणित करून घेतलेल्या सर्व बिंदु नामावली नोंदवहया.बाबत कोणतीही माहिती उपलब्ध करून देण्यात आली नाही.

सदर बाबत संबंधित विभागास अर्ध समास ज्ञापन क्रमांक 137 दिनांक 05/02/2014 अन्वये विचारणा करण्यात आली होती. विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु. 8218000

DATDBWM5801 (Ref No : 129, Hmm No : 137)

## *165 श्री.विजय पी. रिजवाणी, कनिष्ठ अभियंता,श्री भरत जे भटीजा, कनिष्ठनअभियंता यांच्या चुकीच्या वेतन निश्चित्ती मुळे झालेले अतिप्रदान .*

**आस्थापना खर्च वेतन आणि भत्ते**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*म.न.पा. निधी निधी*

*अनियमितता कलम : ९ड*

***श्री. विजय पी. रिजवाणी, कनिष्ठ अभियंता 5500-175-9000 मध्ये वेतन आहरित करीत होते. त्यांना दिनांक 1.10.1994 रोजी कालबध्दी पदोन्नती देण्यात आली त्याप्रमाणे दिनांक 1.10.1994 रोजी त्यांचे वेतन 2000-3500 या वेतन श्रेणीत निश्चित करण्यात आले. मात्र त्यांनतर दिनांक 1.1.1996 रोजी 2000-3500 या वेतनश्रेणी***

***ऐवजी 8000-13500 या उच्च वेतन श्रेणीत वेतन निश्चित केल्याने त्याना अतिप्रदान झाले आहे. त्याप्रमाणे श्री.भरत जे. भटिजा कनिष्ठ अभियंता यांचे दिनांक 1.1.2006 रोजी सहाव्या वेतन आयोगात जादा प्रदान झाले आहे.***

1)श्री.विजय पी. रिजवाणी, कनिष्ठप अभियंता 5500-175-900 मध्येव वेतन आहरित करीत होते. त्यांाना दिनांक 1.10.1994 रोजी कालबध्द पदोन्नती देण्यात आली त्याप्रमाणे दिनांक 1.10.1994 रोजी त्यांचे वेतन 2000-3500 या वेतन श्रेणीत निश्चित करण्यात आले. मात्र त्यांनतर दिनांक 1.1.1996 रोजी या 6500-10500 वेतनश्रेणी ऐवजी 8000-13500 या उच्च वेतन श्रेणीत वेतन निश्चित केल्याने त्याना खाली दाखविल्यांप्रमाणे अतिप्रदान झाले आहे.

| दिनांक | देय वेतन/ग्रेड वेतन रु. | दिलेले वेतन रु. | फरकाची रक्कम दरमहा रु. |
|---|---|---|---|
| 1/1/1996 | 7100 | 8000 | 900 |
| 1/10/1996 | 7300 | 8275 | 975 |
| 1/10/1997 | 7500 | 8550 | 1050 |
| 1/10/1998 | 7700 | 8825 | 1125 |
| 1/10/1999 | 7900 | 9100 | 1200 |
| 1/10/2000 | 8100 | 9375 | 1275 |
| 1/10/2001 | 8300 | 9650 | 1350 |
| 1/10/2002 | 8500 | 9925 | 1425 |
| 1/10/2003 | 8700 | 10200 | 1500 |
| 1/10/2004 | 8900 | 10475 | 1575 |
| 1/10/2005 | 9100/ आगावू दोन 9500 वेतन | 10750/11575 | 1250 |

दिनांक 1.1.2006रोजी खाली दाखविल्याप्रमाणे त्यांना जादा वेतन अदा करण्यात आलेले आहे.

| दिनांक | देय वेतन रु. | ग्रेड वेतन रु. | दिलेले वेतन रु. | ग्रेड वेतन रु. | फरक दरमहा रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1/1/2006 | 17670 | 4400 | 21020 | 4400 | 4350 |
| 1/7/2006 | 18340 | 4400 | 21800 | 4400 | 4460 |
| 1/10/2006(पदोन्नती( | 19030 | 5400 | 22620 | 5400 | 4790 |
| 1/7/2007 | 19770 | 5400 | 23500 | 5400 | 4930 |
| 1/7/2008 | 20530 | 5400 | 24410 | 5400 | 5080 |
| 1/7/2009 | 21310 | 5400 | 25340 | 5400 | 5230 |
| 1/7/2010 | 22120 | 5400 | 26300 | 5400 | 5380 |
| 1/7/2011 | 22950 | 5400 | 27290 | 5400 | 5540 |
| 1/7/2012 | 23800 | 5400 | 28310 | 5400 | 5710 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1/7/2013 | 24680 | 5400 | 29360 | 5400 | 5880 |

2) भरत जे भटीज, कनिष्ठ अभ्रियंता

| दिनांक | देय वेतन रु. |
|---|---|
| 1/1/1996 | 6500 |
| 1/10/1996 | 6700 |
| 1/10/1997 | 6900 |
| 1/10/1998 | 7100 |
| 1/10/1999 | 7300 |
| 1/10/2000 | 7500 |
| 1/10/2001 | 7700 |
| 1/10/2002 | 7900 |
| 20/ 9/2003 विकाल्पासह<br>वेतन निश्चित्ती.01/10/2003 | 8275 |
| 1/10/2004 | 8550 |
| 1/9/2005 | 8825 |

3) श्री.भरत जे. भटिजा कनिष्ठ अभियंता यांचे दिनांक 1.1.2006 रोजी खाली दाखविल्याणप्रमाणे सहाव्या वेतन आयोगात जादा प्रदान झाले आहे.

| दिनांक | देय वेतन रु. | ग्रेड वेतन रु. | दिलेले वेतन रु. | ग्रेड वेतन रु. | फरक दरमहा रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1/1/2006 | 16410 | 5400 | 20000 | 5400 | 3590 |
| 1/7/2006 | 17070 | 5400 | 20770 | 5400 | 3700 |
| 1/7/2007 | 17750 | 5400 | 21560 | 5400 | 3810 |
| 1/7/2008 | 18450 | 5400 | 22370 | 5400 | 3920 |
| 1/7/2009 | 19170 | 5400 | 23210 | 5400 | 4040 |
| 1/7/2010 | 19910 | 5400 | 24070 | 5400 | 4160 |
| 1/7/2011 | 20670 | 5400 | 24960 | 5400 | 4290 |
| 1/7/2012 | 21460 | 5400 | 25870 | 5400 | 4410 |
| 1/7/2013 | 22270 | 5400 | 26810 | 5400 | 4540 |

कनिष्ठ अभियंता यांना वर दाखविण्यात आल्याप्रमाणे जादा वेतन अदा केलेले असल्याने सर्व कनिष्ठ अभियंता यांच्या सेवा पुस्तकाची तपासणी करून अतिप्रदान रकमेची त्यावरील भत्त्यासह परिगणना करण्यात येवून वसुलीची कार्यवाही पार पाडणे आवश्यक आहे . सदर बाबत संबंधित विभागास अर्ध समास ज्ञापन क्रमांक 203 दिनांक 21/02/2014 अन्वये विचारणा करण्यात आली होती. विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.

## *166 चुकीच्या वेतन निश्चिती मुळे झालेले अतिप्रदान*

**आस्थापना खर्च (वेतन आणि भत्ते)**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*म.न.पां. निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***शासन परिपत्रक क्रमांक वेपूर-1209/प्र.क्र. 69/सेवा-9, दिनांक 5.5.2010 दिनांक 1.1.2006 रोजी विद्यमान वेतनास 1.86 ने गूणल्यानंतर येणा-या वित्तलब्धीची रक्कम .99 पैशा पर्यत आल्यास ती मागील रूपये 10 च्या पटीत घ्यावयाची असून 100 पैशापेक्षा म्हणजेच रूपये 1 पेक्षा जादा आल्यास पुढील रूपये 10 च्या टप्प्यावर वेतन निश्चित करणे आवश्यक आहे. मात्र कार्यरत सर्व संवर्गातील कर्मचाऱ्या बाबत याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नसल्याने अतिप्रदान झालेले असून सर्व संबंधित कर्मचाऱ्या कडून वसुली होणे आवश्यक आहे***

आस्थापना विभागाच्या लेखापरिक्षणामध्ये मंजूर संवर्गातील निवडक सेवा पुस्तकांची तपासणी करण्यात आली. त्याबाबत लेखा परिक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. शासन परिपत्रक क्रमांक वेपूर-1209/प्र.क्र. 69/सेवा-9, दिनांक 5.5.2010 दिनांक 1.1.2006 रोजी विद्यमान वेतनास 1.86 ने गूणल्यानंतर येणा-या वित्तलब्धीची रक्कम .99 पैशा पर्यत आल्यास ती मागील रूपये 10 च्या पटीत घ्यावयाची असून 100 पैशापेक्षा म्हणजेच रूपये 1 पेक्षा जादा आल्यास पुढील रूपये 10 च्या टप्प्यावर वेतन निश्चित करणे आवश्यक आहे. मात्र मंजूर संवर्गातील खालील प्रकरणी याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नसल्याचे दिसून आले.

1.श्री.बाळकृष्ण गणपत फुलोरे मजूर (नियुक्ती 2.11.1996)

| दिनांक | देय वेतन रु. | ग्रेड वेतन रु. | दिलेले वेतन रु. | ग्रेड वेतन रु. | फरक रु. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1.1.2006 | 5730 | 1300 | 5730 | 1300 | 0 | |
| 1.7.2006 | 5940 | 1300 | 5950 | 1300 | 10 | |
| 1.7.2007 | 6160 | 1300 | 6170 | 1300 | 10 | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1.7.2008 | 6390 | 1300 | 6400 | 1300 | 10 | |
| 1.11.2008 | 6620 | 1600 | 6640 | 1600 | 20 | कालबध्द पदोन्नती |
| 1.7.2009 | 6870 | 1600 | 6890 | 1600 | 20 | |
| 1.7.2010 | 7130 | 1600 | 7150 | 1600 | 20 | |
| 1.7.2011 | 7400 | 1600 | 7420 | 1600 | 20 | |
| 1.7.2012 | 7670 | 1600 | 7690 | 1600 | 20 | |
| 1.7.2013 | 7950 | 1600 | 7970 | 1600 | 20 | |

दिनांक 2.11.1996 रोजी नियुक्त केलेल्या खालील मंजूर संवर्गातील कर्मचा-यांना वरील प्रमाणे वेतन अदा करण्यात आलेले आहे.

1) श्रीमती भिमा डि वाघमारे
2) दत्तात्रय कान्हू बनोरे
3) सूमनबाई यादव लोखंडे
4) जयराम कान्हू चिकनकर
5) हसन रशीर खान
6) हिराबाई कानजी मकवाना
7) अनंता वाळकू वायले
8) भगवान सी. गायकवाड
9) भाउसाहेब बनकर
10) बळीराम पा. कांबळे
11) विश्वनाथ वी. पाटील
12) प्रदिप सदाशिव आंबेकर
13) भिमराव हरि वाढविदे
14) राजेंद्र पदू जाधव

2) श्री.दिपक नारायण गायकवाड मजूर

| दिनांक | देय वेतन रु. | ग्रेड वेतन रु. | दिलेले वेतन रु. | ग्रेड वेतन रु. | फरक रु. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1.7.2008 | 6270 | 1300 | 6280 | 1300 | 10 | |
| 1.7.2009 | 6500 | 1300 | 6510 | 1300 | 10 | |
| 4.9.2009 | 6740 | 1600 | 6750 | 1600 | 10 | कालबध्द पदोन्नती |
| 1.7.2010 | 6990 | 1600 | 7000 | 1600 | 10 | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1.11.2011 | 7250 | 1600 | 7260 | 1600 | 10 | |
| 1.7.2012 | 7520 | 1600 | 7530 | 1600 | 10 | |
| 1.7.2013 | 7800 | 1600 | 7810 | 1600 | 10 | |

3) श्री.दिलीप गणपत कडव मजूर

| दिनांक | देय वेतन रु. | ग्रेड वेतन रु. | दिलेले वेतन रु. | ग्रेड वेतन रु. | फरक रु. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1.7.2007 | 5930 | 1300 | 5940 | 1300 | 10 | |
| 1.7.2008 | 6150 | 1300 | 6160 | 1300 | 10 | |
| 1.7.2009 | 6380 | 1300 | 6390 | 1300 | 10 | |
| 1.7.2010 | 6610 | 1300 | 6620 | 1300 | 10 | |
| 1.10.2010 | 6850 | 1600 | 6860 | 1600 | 10 | कालबध्द पदोन्नती |
| 1.7.2011 | 7110 | 1600 | 7120 | 1600 | 10 | |
| 1.7.2012 | 7380 | 1600 | 7390 | 1600 | 10 | |
| 1.7.2013 | 7650 | 1600 | 7660 | 1600 | | |

4) श्री.जयसिंग तात्याभाउ कदम मजूर

| दिनांक | देय वेतन रु. | ग्रेड वेतन रु. | दिलेले वेतन रु. | ग्रेड वेतन रु. | फरक रु. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1.7.2008 | 6270 | 1300 | 6280 | 1300 | 10 | |
| 26.3.2009 | 6500 | 1600 | 6510 | 1600 | 10 | |
| 1.7.2010 | 6750 | 1600 | 7000 | 1600 | 250 | |
| 1.7.2011 | 7000 | 1600 | 7260 | 1600 | 260 | |
| 1.7.2012 | 7260 | 1600 | 7530 | 1600 | 270 | |
| 1.7.2013 | 7530 | 1600 | 7810 | 1600 | 280 | |

श्री.जयसिंग तात्याभाउ कदम यांना दिनांक 26.3.2009 रोजी कालबध्द पदोन्नती देण्यात आल्याने महाराष्ट्र नागरी सेवा नियम (सुधारित वेतन) 2009 नियम क्रमांक 13(2) अन्वये त्यांना पुढील वेतनवाढ दिनांक 1.7.2009 एवजी दिनांक 1.7.2010 रोजी देय होईल मात्र ती दिनांक 1.7.2009 ला दिल्याने वरील प्रमाणे अतिप्रदान झालेले आहे.

5) श्री.रमेश लिंबाजी ढाले मजूर

| दिनांक | देय वेतन रु. | ग्रेड वेतन रु. | दिलेले वेतन रु. | ग्रेड वेतन रु. | फरक रु. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1.7.2008 | 6270 | 1300 | 6280 | 1300 | 10 | |
| 1.11.2008 | 6500 | 1600 | 6510 | 1600 | 10 | कालबध्द पदोन्नती |
| 1.7.2009 | 6750 | 1600 | 6760 | 1600 | 10 | |
| 1.7.2010 | 7020 | 1600 | 7030 | 1600 | 10 | |
| 1.7.2011 | 7280 | 1600 | 7290 | 1600 | 10 | |
| 1.7.2012 | 7550 | 1600 | 7560 | 1600 | 10 | |

6) याशिवाय खालील कर्मचा-यांना त्यांच्या नावासमोर दाखविलेल्या तारखेपासून चुकीचे वेतन दिल्याने जादा प्रदान झाले आहे.

| अ.क्र | कर्मचा-याचे नाव | पदनाम | दिनांक | देय वेतन रु.. | दिलेले वेतन रु. | फरक दरमहा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | प्रकाश बंडू पाढारे | गवंडी | 1.7.2007 | 7050 | 7060 | 10 |
| 2 | भगवान लक्ष्मण ससाणे | विद्युत मदतनिस | 1.7.2006<br>1.11.2008 | 5940<br>6600 | 5950<br>6640 | 10<br>40 |
| 3 | सदानंद यादव | विद्युत मदतनिस | 1.7.2006<br>कालबध्द पदोन्नती | 5940 | 5950 | 10 |
| 4 | खुशालसिंग रावत | वाहन चालक | 1.7.2009 | 6600 | 6640 | 40 |
| 5 | संजय वसंत मुकणे | लिपिक | 1.7.2008 | 8060 | 8070 | 10 |
| 6 | प्रकाश बोरसे | लिपिक | 1.7.2008 | 6700 | 6710 | 10 |
| 7 | सुनिल आर.तलरेजा | शिपाई | 1.7.2006 | 6700 | 6710 | 10 |
| 8 | गजानन लहू भोंडिवले | मजूर | 1.7.2006 | 5940 | 5950 | 10 |
| 9 | अनंता वाळकू वायले | मजूर | 1.7.2006 | 5940 | 5950 | 10 |
| 10 | श्रीमती आशा सुरेश कजानिया | माळी | 1.7.2007 | 5940 | 5950 | 10 |
| 11 | रूक्मिणी एम.शिरसाठ | माळी | 1.7.2006 | 5940 | 5950 | 10 |
| 12 | केशवप्रसाद एन.मिश्रा | सुरक्षा रक्षक | 1.7.2006 | 5930 | 5940 | 10 |
| 13 | अशोक एल.खंदारे | सुरक्षा रक्षक | 1.7.2006 | 5940 | 5950 | 10 |
| 14 | अशोक गंगाराम राउत | सुरक्षा रक्षक | 1.7.2006 | 5940 | 5950 | 10 |
| 15 | संतोष भिकू लाट | सफाई कामगार | 1.7.2006 | 5940 | 5950 | 10 |
| 16 | सुशिला विजय सियोने | सफाई कामगार | 1.7.2008 | 5940 | 5950 | 10 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 17 | भरत किशनलाल बनिया | सफाई कामगार | 1.7.2006 | 6270 | 6280 | 10 |
| 18 | बबन साहेबराव कांबळे | सफाई कामगार | 1.7.2006 | 5940 | 5950 | 10 |
| 19 | गुलबीर युनिलाल | सफाई कामगार | 1.7.2006 | 5940 | 5950 | 10 |
| 20 | अनिल महेंद्र मरोटिक | सफाई कामगार | 1.7.2006 | 5940 | 5950 | 10 |
| 21 | धनाजी बाळू परमार | सफाई कामगार | 1.7.2007 | 5230 | 5240 | 10 |
| 22 | गणाबाई शेम नारायण खरात | सफाई कामगार | 1.7.2008 | 6270 | 6280 | 10 |
| 23 | अरूण देवीदास कांबळे | सफाई कामगार | 1.7.2007 | 5230 | 5240 | 10 |
| 24 | विरपाल परशुराम कजानिया | सफाई कामगार | 1.7.2006 | 5940 | 5950 | 10 |
| 25 | अलका महादेव यादवे | सफाई कामगार | 1.7.2006 | 5940 | 5950 | 10 |
| 26 | गोपाळ विष्णू जाधव | सफाई कामगार | 1.7.2006 | 5940 | 5950 | 10 |
| 27 | शोभा एस.चव्हाण | शिपाई | 1.7.2006 | 5940 | 5950 | 10 |
| 28 | अनिल इश्वरलाल पहूजा | शिपाई | 1.7.2007 | 5930 | 5940 | 10 |
| 29 | दिपा साहेबराव साबळे | माळी | 1.7.2006 | 5940 | 5950 | 10 |
| 30 | गणेश आ.शिंदे | मजूर | 1.7.2006 | 5940 | 5950 | 10 |
| 31 | प्रकाश अंजूमल मटिया | मजूर | 1.7.2006 | 5940 | 5950 | 10 |
| 32 | राधा अवघडे | सफाई कामगार | 1.7.2008 | 6270 | 6280 | 10 |
| 33 | मच्छिंद्र राजाराम | सफाई कामगार | 1.7.2006 | 5940 | 5950 | 10 |
| 34 | बबन साहेबराव कांबळे | सफाई कामगार | 1.7.2006 | 5940 | 5950 | 10 |

याशिवाय वरील कर्मचा-यांच्या सेवा पुस्तकात नियुक्तीच्या तारखेपासून त्यांचा दोन वर्षाचा परिविक्षाधिन कालावधी असल्याचे नमुद केलेले आहे. मात्र सदर कालावधी संपविण्यात आल्याची एकाही सेवा पुस्तकात नोंद नसल्याचे दिसून आले. सबब म.ना.से. वेतन 1981 नियम क्र. 39 अन्वये दुसरी वेतनवाढ कशी देण्यात आली याचा खुलासा करण्यात आलेला नाही

विश्वनाथ वी. पाटील यांना तसेच काही मजूर कर्मचा-यांना महासभा ठराव क्रमांक 31, दिनांक 29/06/2007 अन्वये पूर्वीची रोजंदारी किंवा नैमितीक रजा विचारात घेवून त्यांना पूर्वलक्षी प्रभावाने मजूर या संवर्गात वेतन देण्याबाबत ठराव पारित झाल्याच्या नोंदी त्यांच्या सेवा पुस्तकात दिसून आल्या. मात्र त्याप्रमाणे वेतन आहरीत करण्यात करण्यात येत नाही. याबाबत योग्य तो खुलासा करण्यात आलेला नाही. दिनांक 29/06/2007 या ठरावाची प्रत लेखा परिक्षणास सादर केली नाही. सदर बाबत संबंधित विभागास अर्ध समास ज्ञापन क्रमांक 167 दिनांक 13/02/2014 अन्वये विचारणा करण्यात आले होते. विभागाचे उत्तर अप्राप्त आहे

DATDBWM5801 (Ref No : 150, Hmm No : 167)

## *167 श्री श्याम शिवनानी, लघुलेखक श्री भास्कर तानाजी मिरपगारे, उप स्थानक अधिकारी यांच्या चुकीच्या वेतन निश्चिती बाबत*

**आस्थापना खर्च, वेतन भत्ते**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*म.न.पां.निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***श्याम शिवनानी लघुलेखक, मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण नसल्याने त्याना मराठी भाषा उत्तीर्ण होण्यासाठी दिनांक 31.3.2004 पर्यत मुदतवाढ देण्यात आली होती. मात्र उपरोक्त कालावधीत ते मराठी भाषा उत्तीर्ण होवू शकले नाहीत. त्यामुळे त्यांच्या दिनांक 1.4.2004 पासून वेतनवाढी रोखण्यात आल्या. कार्यालयीन आदेश क्रमांक 723/08 दिनांक 31-12-2008 अन्वये त्यांनी वयाची 50 वर्ष पूर्ण केल्याने त्यांना परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट देण्यात आली. त्याप्रमाणे त्यांना दिनांक 1.4.2004 पासून सर्व वेतनवाढी मुक्त करून देण्यात आल्या. प्रत्यक्षात दिनांक 31.12.2008 च्या आदेशान्वये त्यांना सुट देण्यात आल्याने दिनांक 1.4.2003 रोजी ते घेत असलेले वेतन 8900 नंतर दिनांक 1.1.2009 रोजी 9100 करावयास हवे होते. मात्र तसे न करता मागील कालावधी पासून वेतनवाढी दिल्याने त्यांना अतिप्रदान झाले आहे भास्कर तानाजी मिरपगारे, उप स्थानक अधिकारी यांना दिनांक 17.2.2009 रोजी पदोन्नती देण्यात आली. त्याप्रमाणे दिनांक 17.2.2009 रोजी त्यांचे वेतन महाराष्ट्र नागरी सेवा वेतन 1981 नियम 11 (1) (अ) अन्वये रूपये 8920 वर निश्चित करण्यात आले. त्यानंतर पुढील वेतनवाढ दिनांक 1.7.2010 ऐवजी दिनांक 1.7.2009 ला दिल्याने त्यांना अतिप्रदान झाले आहे.***

आस्थापना विभागातील निवडक सेवा पुस्तकांची तपासणी केली असता खाली दर्शविल्याप्रमाणे त्यात त्रुटी आढळून आल्या आहेत.

1) श्याम शिवनानी, लघुलेखक, मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण नसल्याने त्याना मराठी भाषा उत्तीर्ण होण्यासाठी दिनांक 31.3.2004 पर्यत मुदतवाढ देण्यात आली होती. मात्र उपरोक्त कालावधीत ते मराठी भाषा उत्तीर्ण होवू शकले नाहीत. त्यामुळे त्यांच्या दिनांक 1.4.2004 पासून वेतनवाढी रोखण्यात आल्या. कार्यालयीन आदेश क्रमांक 723/08 दिनांक 31-12-2008 अन्वये त्यांनी वयाची 50 वर्ष पूर्ण केल्याने परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट देण्यात आली. त्या प्रमाणे त्यांना दिनांक 1.4.2004 पासून सर्व वेतनवाढी मुक्त करून देण्यात आल्या प्रत्यक्ष्यात. दिनांक 31.12.2008 च्या आदेशान्वये त्यांना सुट देण्यात आल्याने दिनांक 1.4.2003 रोजी ते घेत असलेले वेतन 8900 नंतर दिनांक 1.1.2009 रोजी 9100 करावयास हवे होते. मात्र तसे न करता मागील कालावधी पासून वेतनवाढी दिल्याने त्यांना खाली दर्शविल्याप्रमाणे अतिप्रदान झाले आहे.

| दिनांक | देय वेतन रु. | दिलेले वेतन रु. | फरक दरमहा रु. |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| 1.4.2004 | 8900 | 9100 | 200 |
| 1.4.2005 | 8900 | 9300 | 400 |

दिनांक 1.1.2006 रोजी रूपये 8900 या वेतनावर वेतन निश्चित करावयास हवे होते. मात्र ते 9300 वर केल्याने त्यांना अतिप्रदान झाले आहे.

| **दिनांक** | **देय वेतन रु.** | **ग्रेड वेतन रु.** | **दिलेले वेतन रु.** | **ग्रेड वेतन रु.** | **फरक दरमहा रु.** |
|---|---|---|---|---|---|
| 1.1.2006 | 16560 | 4400 | 17300 | 4400 | 740 |
| 1.7.2006 | 17190 | 4400 | 17960 | 4400 | 770 |
| 1.10.2006 (पदोन्नती 2) | 17840 | 5000 | 18630 | 5000 | 790 |
| 1.7.2007 | 18530 | 5000 | 19340 | 5000 | 810 |
| 1.7.2008 | 19240 | 5000 | 20070 | 5000 | 830 |
| 1.7.2009 | 19970 | 5000 | 20830 | 5000 | 860 |
| 1.7.2010 | 20720 | 5000 | 21610 | 5000 | 890 |
| 1.7.2011 | 21500 | 5000 | 22410 | 5000 | 910 |
| 1.7.2012 | 22300 | 5000 | 23240 | 5000 | 940 |
| 1.7.2013 | 23120 | 5000 | 24090 | 5000 | 970 |

2) भास्कर तानाजी मिरपगारे, उप स्थानक अधिकारी यांना दिनांक 17.2.2009 रोजी पदोन्नती देण्यात आली. त्याप्रमाणे दिनांक 17.2.2009 रोजी त्यांचे वेतन महाराष्ट्र नागरी सेवा वेतन 1981 नियम 11 (1) ( अ) अन्वये रूपये 8920 वर निश्चित करण्यात आले. त्यानंतर पुढील वेतनवाढ दिनांक 1.7.2010 ऐवजी दिनांक 1.7.2009 ला दिल्याने त्यांना खाली दाखविल्याप्रमाणे अतिप्रदान झाले आहे.

| **दिनांक** | **देय वेतन रु.** | **ग्रेड वेतन रु.** | **दिलेले वेतन रु.** | **ग्रेड वेतन रु.** | **फरक दरमहा रु.** |
|---|---|---|---|---|---|
| 17.2.2009 | 8920 | 2400 | 8920 | 2400 | - |
| 1.7.2009 | 8920 | 2400 | 9260 | 2400 | 340 |
| 1.7.2010 | 9260 | 2400 | 9610 | 2400 | 350 |
| 1.7.2011 | 9610 | 2400 | 9970 | 2400 | 360 |
| 1.7.2012 | 9970 | 2400 | 10350 | 2400 | 380 |
| 1.7.2013 | 10350 | 2400 | 10740 | 2400 | 390 |

वरील प्रकरणी अतिप्रदान रक्कमेची त्यावरील भत्त्यासह परिगणना करून संबंधितांकडून वसुली करणे आवश्यक आहे. सदर बाबत संबंधित विभागास अर्धसमास ज्ञापन क्रमांक 204 दिनांक 21/02/2014 अन्वये विचारणा करण्यात आली होती, विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.

DATDBWM5801 (Ref No : 158, Hmm No : 204)

## *168 खासदार निधी अंतर्गत केलेल्या कामाच्या देयकातून स्वामित्वधन रक्कम रु.131846 वसुल न केल्याबाबत.*

**खासदार निधी अंतर्गत विकास कामे**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :413 3224 केंद्र शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 131846.00/-

***खासदार निधी अंतर्गत केलेल्या विकास कामाच्या देयकातून गौण खनिज म्हणजेच वाळू, खडी, मुरूम, रबल, इत्यादी सामग्री वापरण्यासाठी त्याबाबतचे स्वामित्वधन रक्कम संबंधित मक्तेदाराच्या देयकातून वसुल करणे आवश्यक होते. परंतु उल्हासनगर महानगरपालिकेने या प्रमाणे कार्यवाही केलेली नाही. संबंधित मक्तेदाराने उपरोक्त गौण खनिज साठी स्वामित्वधनाची रक्कम राज्य शासनास अदा केल्याची पावती सादर केल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे वापर केलेल्या गौण खनिजावर देय असलेली स्वामित्व धनाची रक्कम (ROYALTY) संबंधित मक्तेदाराकडून वसुल करणे आवश्यक आहे.***

खासदार निधी अंतर्गत केलेल्या विकास कामाच्या देयकातून गौण खनिज म्हणजेच वाळू, खडी, मुरूम, रबल इत्यादी सामग्री वापरण्यासाठी त्याबाबतचे स्वामित्वधन रक्कम संबंधित मक्तेदाराच्या देयकातून वसुल करणे आवश्यक होते. परंतु उल्हासनगर महानगरपालिकेने या प्रमाणे कार्यवाही केलेली नाही. किवा संबंधित मक्तेदाराने उपरोक्त गौणखनिज साठी स्वामित्वधनाची रक्कम राज्य शासनास अदा केल्याची पावती सादर केल्याचे व त्याची पडताळणी म.न.पां.ने केल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे खाली नमूद केलेल्या कामावर वापरलेल्या गौणखनिजावर देय असलेली स्वमित्वधनाची (ROYALTY) संबंधित मक्तेदाराकडून वसुल करणे आवश्यक आहे. त्याचा तपशील खाली दाखविल्या प्रमाणे आहे.

| अ .क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक | प्रमाणक क्र. दिनांक | मक्तेदाराचे नाव | कार्यादेश क्रमांक | दिनांक | गौण खनिज परिमाण चौ.घन.मी. | दर प्र.घ.मि. | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | प्रभाग ६४मधिल आंबेडकर उद्यानात विकास | 1000000 | 4323/22/12/2011 | मयूर कामगार सहकारी संस्था | उमपा /साबावी/का अ/1655 | 25/1/10 | 480.29 | 35.34 | 16651 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कामे | | | | | | | | |
| 2. | शिवसेना कार्यालय समोर समाज मंदिर तयार करणे | 999860 | 5010/31/1/12 | शिवानी मजूर कामगार सह.स . | 3500 | 28/12/11 | 295.87 | 70.67 | 20910 |
| 3 | प्रभाग क्रमांक १० नाला तयार करणे आणे दुरुस्त करणे | 1000000 | 5009/31/1/12 | महादेव कृपा मजूर कामगार सह संस्था | 3305 | 20/9/11 | 171.44 | 70.67 | 12115 |
| 4 | कंपाउंड भिंत तयार करणे | 599200 | 4325/22/12/11 | जवाहर मजूर कामगार सह संस्था | 1653 | 21-/2/09 | 282.97 | 70.67 | 19998 |
| 5.. | राजीब गांधी नगर येथे नाला तयार करणे | 1000000 | 4789/16/1/12 | शंकर महादेव मजूर कामगार सह संस्था. | 3329 | 7/10/11 | 126.53 | 70.67 | 8942 |
| 6 | फुटपाथ तयार करणे c.h.m. college | 500000 | 264/23/4/12 | स्नेह मजूर कामगार सह. संस्था | 3394 | 11/11/11 | 21.84 | 70.67 | 1543 |
